
राम चंद्र श्रृंखला १
इक्ष्वाकुचे वंशज
“अमीश भारतातील पहिले साहित्यिक पॉपस्टार आहेत.”
–शेखर कपूर
अमीश
यात्रा


SCION OF IKSHVAKU
AMISH

## अमीश

1974 मध्ये जन्मलेल्या अमीश यांनी कोलकात्यातून आयआयएम केलं. बोअरिंग बँकर ते प्रथितयश लेखक असा पल्ला त्यांनी गाठला. त्यांच्या लेखन कारकिर्दीची सुरवात दी इम्मॉर्टल्स ऑफ मेलुहाने (शिव रचनात्रयीतील पहिले पुस्तक) झाली. या पुस्तकाने त्यांना अमाप प्रसिद्धी तर मिळवून दिलीच शिवाय वित्त सेवेतील आपल्या 14 वर्षांच्या कारकिर्दीपासून फारकत घेऊन पूर्णकाळ लेखनकार्यासाठी वाहून घेण्यास प्रोत्साहितही केलं. इतिहास, पुराण आणि तत्वज्ञानाबद्दल असलेल्या ओढ्यामुळे त्यांना जगातील विविध संस्कृती आणि धर्मातील सौंदर्य आणि अर्थ शोधण्यास प्रवृत्त केलं.

अमीश मुंबईत आपली पत्नी प्रीती आणि मुलगा नील यांच्यासमवेत रहातात.

www.authoramish.com
www.facebook.com/authoramish
www.twitter.com/authoramish

## मराठी अनुवाद- संध्या पेडणेकर

शिक्षण, पत्रकारिता, साहित्य संपादक (वेबसाइट), पटकथा लेखन, छोट्या पडद्यावरील कार्यक्रमांचं संचालन, शैक्षणिक सल्लागार इत्यादि क्षेत्रांत काम केल्यानंतर संध्या पेडणेकर यांनी लेखनक्षेत्राची आपल्या कायमस्वरूपी कार्यक्षेत्राच्या रूपात निवड केली. त्यांच्या लेखणीचं कसब हिंदी आणि मराठी भाषांमध्ये समान रूपानं व्यक्त होताना दिसून येतं. काही वर्षे महाविद्यालयांत हिंदी विषयाचं अध्यापन. विविध नियतकालिकांतून लेखन. हिंदी आणि मराठीतील नामांकित प्रकाशनसंस्थांतर्फे बरीच अनुवादित पुस्तकं प्रकाशित. काही मूळ कृती प्रकाशनाच्या मार्गावर आणि काही ई-प्रकाशनांतर्फे प्रकाशित.

सांप्रत पती सतीश आणि मुलगा चिन्मयसमवेत दिल्लीत वास्तव्य.

- ‘इतरही अनेकांनी अमीश त्रिपाठींपासून प्रेरणा घ्यावी असं मला वाटतं....’
-अमिताभ बच्चन. भारतीय अभिनेता आणि युगनायक

- ‘अमीश भारताचे टोल्कियन आहेत’ - Business Standard (Tolkien -The Hobbit, The Lord of the Rings आणि
  The Silmarillion सारख्या फँटॅसी कादंबऱ्यांचे प्रसिद्ध ब्रिटिश लेखक.)
- ‘अमीश भारतीय साहित्यातील पहिले पॉपस्टार आहेत’
  –शेखर कपूर, प्रसिद्ध चित्रपट निर्माते
- ‘अमीश .... पूर्वेकडील देशांचे पाउलो कोएल्हो आहेत.’
  – Business World
- ‘अमीश यांची पुराण कथांविषयीची कल्पकता भूतकाळात डोकावते आणि भविष्यांतील शक्यतांचा वेध घेते. त्यांच्या रचना मूळ कथांच्या प्रतिकृती असून स्फूर्तीदायक आहेत. मनाच्या खोल कपारी उघडणाऱ्या आणि सामूहिक जाणिवा जागविणाऱ्या आहेत.’ –दीपक चोप्रा, जगप्रसिद्ध आध्यात्मिक गुरु आणि प्रथितयश लेखक
- ‘अमीश भारतीय लेखनक्षेत्रातील नवा स्वर आहे. इतिहास आणि पुराणांमध्ये बुडालेली त्यांची नजर पारखी आहे आणि त्यांची लेखनशैली वाचकांवर गारुड करते.’ –शशी थरूर, खासदार आणि ख्यातनाम लेखक
- ‘...अमीश यांनी भारतातील बऱ्याच दंतकथा, लोककथा आणि पौराणिक कथांची सांगड घालून जलदगति थरारकथा अशा रीतीने गुंफल्या आहेत की त्या वाचताना देव, संस्कृती, इतिहास, दानव आणि नायक यांबद्दलच्या आपल्या कल्पना पार बदलून जातात.’ – High Blitz
- ‘अमीश यांच्या विक्रमी खपाच्या पुस्तकांमधून त्यांचं सहिष्णुतेचं तत्वज्ञान, मिथकांबद्दलची त्यांची जाण आणि त्यांच्या शिवाबद्दलच्या अनन्य भक्तीभावाचं दर्शन होतं.’
  – Verve
- ‘त्रिपाठी हे इतिहास आणि दंतकथांमधील तथ्यांवर आधारित अत्यंत मनोवेधक कथा लिहिणाऱ्या नव्या पिढीतील लेखकांच्या फळीतील लेखक आहेत.’ – The New Indian Express
- ‘... या देशातील युवकांना हिंदु पुराणकथांचा पुनःपरिचय करून देण्याबद्दल अमीश यांचं अभिनंदन करायला हवं.’
  – First City

www.authoramish.com

# इक्ष्वाकुचे वंशज

## राम चंद्र श्रृंखला 1

अमीश

अनुवाद : संध्या पेडणेकर

**वेस्टलँड लिमिटेड**
61, दुसरा मजला, सिल्वरलाइन बिल्डिंग, आलपाक्कम, मेन रोड, मदुरावोयल, चेन्नई – 600095
93, पहिला मजला, शामलाल रोड, दरियागंज, नवी दिल्ली – 110002
www.westlandbooks.in

इंग्रजी प्रथमावृत्ती – Scion of Ikshvaku Westland Ltd. 2015
हिंदी प्रथमावृत्ती – वेस्टलैंड लिमिटेड, यात्रा बुक्स के सहयोग से, 2015
मराठी प्रथमावृत्ती - वेस्टलँड लिमिटेड, यात्रा बुक्सच्या सौजन्याने, 2015

First ebook edition: 2016

प्रताधिकार - © अमीश त्रिपाठी 2015
सर्वाधिकार सुरक्षित

अमीश त्रिपाठी या पुस्तकाच्या लेखकाच्या रूपात आपली ओळख राखण्याचा नैतिक अधिकार दृढतापूर्वक व्यक्त करतात.

ही एक काल्पनिक कथा आहे. या कथेत वापरली गेली नावे, चरित्रे, स्थळे आणि घटना पूर्णपणे लेखकाच्या कल्पनेवर आधारित आहेत किंवा काल्पनिक रूपे त्यांचा वापर करण्यात आलेला आहे. त्यांचा कोणत्याही वास्तविक, जिवंत किंवा मृत व्यक्ती, घटना किंवा स्थानाशी कोणताही संबंध नाही.

आयएसबीएन – 978-93-86036-09-4

मुखपृष्ठ रूपरेखा – थिंक व्हाय नॉट

अनुवाद आणि टंकण – संध्या पेडणेकर

हे पुस्तक पुढील अटींवर विक्रीसाठी उपलब्ध आहे की, प्रकाशकाच्या लिखित अनुमतीशिवाय याचा कोणत्याही व्यावसायिक किंवा अन्य प्रकारे उपयोग करता येणार नाही. पुनःप्रकाशित करून हे पुस्तक विकले किंवा भाडेतत्वावर दिले जाऊ शकत नाही. बांधलेल्या किंवा खुल्या किंवा इतर कोणत्याही स्वरूपात प्रयोगात आणले जाऊ शकत नाही. या सर्व अटी पुस्तक खरेदी करणाऱ्यांवरही लागू असतील. या संदर्भातील सर्व प्रकाशनाधिकार सुरक्षित आहेत. या पुस्तकाचे आंशिक रूपात पुनःप्रकाशन किंवा पुनःप्रकाशनासाठी आपल्या जवळ बाळगणे किंवा पुस्तक पुनःप्रस्तुत करणे, याची अनुवादित प्रत तयार करणे किंवा इलेक्ट्रॉनिक, यांत्रिक, फोटोकॉपी, रेकॉर्डिंग वगैरे कोणत्याही प्रकारे याचा उपयोग करण्यासंबंधी संपूर्ण प्रकाशनाधिकार ज्यांचयाकड़े सुरक्षित आहेत ते अधिकारी आणि पुस्तकाच्या प्रकाशकांकडून पूर्वानुमती घेणे बंधनकारक आहे.

www.authoramish.com

माझे वडील विनयकुमार त्रिपाठी
आणि आई ऊषा त्रिपाठी यांना सादर अर्पण

खलील जिब्रानने म्हटलंय, आईवडील धनुष्यासारखे असतात
आणि मुले बाणासारखी असतात. धनुष्य जेवढे ताणेल
तेव्हढा बाण दूरवर पोहोचेल.
माझ्या या भरारीचा आधारही माझे आई-वडीलच आहेत

www.authoramish.com

ॐ नमः शिवाय
ब्रह्मांड भगवान शंकरांसमोर नतमस्तक होतं.
मीसुद्धा भगवान शंकरासमोर नतमस्तक होतो.

www.authoramish.com

रामराज्यवासी त्वम्, प्रोच्छ्रयस्व ते शिरम्
न्यायर्थ युद्धयस्व, सर्वेषु समं चरः
परिपालय दुर्बलम्, विद्धि धर्मं वरम्
प्रोच्छ्रयस्व ते शिरम्
रामराज्यावासी त्वम्

रामराज्यवासियांनो, आपलं मस्तक उंच राखा,
न्यायासाठी लढा, सर्वांना समान वागणूक द्या,
कमजोरांचं रक्षण करा. धर्म सर्वांहून श्रेष्ठ असतो हे
ध्यानात ठेवा.
आपलं मस्तक उंच राखा
हे रामराज्यवासियांनो

www.authoramish.com

## चरित्रे आणि महत्वाच्या जमातींची यादी

(वर्णक्रमानुसार)

**अरिष्टानेमी** – मलयपुत्रांचा सेनापती. विश्वामित्रांचा उजवा हात.

**अश्वपती** – ईशान्येकडील कैकय राज्याचा राजा. दशरथाचा निष्ठावान साथी. कैकयीचे पिता.

**उर्मिला** – सीतेची लहान बहीण. जनकाची औरस पुत्री. पुढे यांचा लक्ष्मणाशी विवाह होतो.

**कुबेर** – व्यापारी आणि रावणाआधीचा लंकेचा राजा.

**कुंभकर्ण** – रावणाचा भाऊ. तो सुद्धा नाग जातीचा म्हणजे जन्मतः व्यंग असलेला आहे.

**कुशध्वज** – सांकश्यचा राजा. जनकाचा लहान भाऊ.

**कैकयी** – कैकयचे राजा अश्वपती यांची कन्या. राजा दशरथाची दुसरी आणि प्रिय पत्नी. भरतची माता.

**कौसल्या** – दक्षिण कोसल नरेश भानुमन आणि त्यांची पत्नी माहेश्वरी यांची मुलगी. राजा दशरथांची ज्येष्ठ पत्नी. रामाची माता.

**जटायू** – मलयपुत्र जमातीचा म्होरक्या. सीता आणि राम यांचा नागा मित्र.

**जनक** – मिथिलेचा राजा. सीता आणि उर्मिलेचे पिता.

**दशरथ** – कोसलनरेश. चक्रवर्ती सम्राट. सप्त सिंधु प्रदेशाचा राजा. कौसल्या, सुमित्रा, कैकयी यांचा पती. राम, भरत, लक्ष्मण आणि शत्रुघ्नचे पिता.

**नागा** – व्यंग घेऊन जन्माला आलेली मानव जात.

**निलंजना** – अयोध्येच्या राजवंशातील व्यक्तींच्या तब्बेतीची काळजी घेणारी स्त्री डॉक्टर. ती दक्षिण कोसल प्रदेशातून आलेली आहे.

**भरत** – रामाचा सावत्र भाऊ. दशरथ आणि कैकयी यांचा पुत्र.

**मंथरा** – सप्तसिंधूतील सर्वात अधिक श्रीमंत व्यापारी. कैकयीची निष्ठावान साथी.

**मलयपुत्र** – सहावा विष्णू मानलेल्या भगवान परशुरामांचे वंशज.

**मृगस्य** – दशरथांच्या सेनेचा सरसेनापती. अयोध्येतील कुलीन व्यक्ती.

**राम** – चार भावंडांपैकी थोरला. अयोध्येचा (कोसल देशाची राजधानी) राजा दशरथ आणि त्यांची ज्येष्ठ पत्नी कौसल्या यांचा पुत्र. पुढे सीतेशी यांचा विवाह होतो.

**रावण** – लंकेचा राजा. विभीषण, शूर्पणखा आणि कुंभकर्णाचा भाऊ.

**रोशनी** – मंथरेची मुलगी. कर्तव्यनिष्ठ वैद्य. दशरथाच्या चार मुलांची मानलेली बहीण.

**लक्ष्मण** – दशरथ-सुमित्रेच्या जुळ्या मुलांपैकी एक. रामाशी एकनिष्ठ. पुढे याचे उर्मिलेशी लग्न होते.

**वशिष्ठ** – अयोध्येचे राजगुरु आणि चारही राजपुत्रांचे शिक्षक.

**वायुपुत्र** – रुद्रावतारातील महादेवाचे वंशज.

**विभीषण** – रावणाचा सावत्र भाऊ.

**विश्वामित्र** – मलयपुत्रांचा प्रमुख. सहावा विष्णू अवतार मानले गेलेल्या भगवान परशुरामांचे वंशज. राम-लक्ष्मणांचे अल्पकाळासाठीचे गुरु.

**शत्रुघ्न** – लक्ष्मणाचा जुळा भाऊ. दशरथ आणि सुमित्रा यांचा पुत्र.

**शूर्पणखा** – रावणाची सावत्र बहीण.

**समिची** – मिथिला नगरीची नागरी आणि सुरक्षा प्रमुख.

**सीता** – मिथिलेचा राजा जनक यांची दत्तक कन्या. मिथिलेची पंतप्रधान. पुढे रामबरोबर हिचा विवाह होतो.

**सुमित्रा** – काशी नरेशांची कन्या. दशरथांची तिसरी पत्नी. लक्ष्मण आणि शत्रुघ्न या दोघा जुळ्या भावांची माता.

ख्रिस्तपूर्व 3400मधील भारताच्या नकाशाच्या फोटोसाठी मलपृष्ठामागील पान पाहा.

www.authoramish.com

# आभार

जॉन डोटने जे काही लिहिलं त्या सगळ्याशी मी सहमत नाही पण एका बाबतीत त्यांचं म्हणणं अगदी बरोबर होतं. ते म्हणतात – 'कोणतीही व्यक्ती एकट्यानं जगू शकत नाही.' नेहमीच एकटेपणातून बाहेर काढणाऱ्या लोकांच्या सहवासात मी. राहिलो याबद्दल मी स्वतःला भाग्यवान समजतो. इतरांकडून मिळणारं प्रेम आणि सहयोग हाच सृजनशीलतेचा खरा आधार असतो. त्यांपैकी काही लोकांचे मी आभार मानू इच्छितो. मला या जीवनाचा आणि जीवनातील प्रत्येक गोष्टीचा आशिर्वाद दिला माझ्या प्रभु शिवाने. प्रभु रामालासुद्धा (माझे आजोबा पंडित बाबूलाल त्रिपाठी त्याचे अनन्य भक्त होते) पुन्हा माझ्या जीवनात आणलं.

नील. मला मिळालेला आशिर्वाद, माझा अभिमान, माझा हर्ष आहे माझा मुलगा नील. त्याचं नुसतं असणंसुद्धा माझ्यासाठी सुखावह आहे.

पत्नी प्रीती, बहीण भावना, मेहुणे हिमांशु, भाऊ अनीश आणि आशिश सगळ्यांनी या कथेसाठी योगदान दिलं. समर्पित भावनेनं केलेल्या मदतीबद्दल आणि या पुस्तकातील तत्वज्ञानासंबंधी वेळोवेळी दिलेल्या अमूल्य सल्याबद्दल माझी बहीण भावनाचे विशेष आभार. नेहमीप्रमाणेच यावेळीसुद्धा पत्नी प्रीतीने दिलेल्या मार्केटिंगच्या उत्तम सल्याबद्दल मी कायम तिचा कृतज्ञ आहे.

उषा, विनय, मीता, डोनेटा, शरनाज, स्मिता, अनुज, ऋता या माझ्या कुटुंबियांनी कायम माझ्याबद्दल दाखविलेल्या विश्वास आणि प्रेमाबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

शर्वरी- माझी संपादिका. आमच्यात एक वेगळंच नातं आहे. एरवी गंमत आणि हंशा पण जेव्हा संपादनाची वेळ येते तेव्हा आमच्यात कडाडून भांडणंही होतात. ही जोडी खास स्वर्गातच बनलेली!

गौतम, कृष्णकुमार, प्रीती, दीप्ती, सतीश, वर्षा, जयंती, विपिन, सेंथील, शत्रुघ्न, सरिता, अवनी, सन्योग, नवीन, जयशंकर, गुरुराज, सतीश आणि वेस्टलँडमधील फंटास्टिक टीम हे अगदी सुरवातीपासूनचे भागीदार आहेत.

अनुज, माझा एजंट. मोठ्या मनाचा थोर माणूस. लेखकाला असायला हवा तसा उत्तम मित्र आहे तो.

संग्राम, शालिनी, पराग, शाइस्ता, रेखा, ऋषिकेश, ऋचा, प्रसाद आणि या पुस्तकासाठीची जाहिरात कंपनी Think WhyNot मधील टीम. त्यांनी माझ्या मते अतिशय सुंदर मुखपृष्ठ बनवलंय! पुस्तकाचं - ट्रेलरसह बहुतेक सगळं मार्केटिंग साहित्यसुद्धा त्यांनीच बनवलंय. देशातील सर्वोत्तम जाहिरात कंपनी आहे ती!

पुस्तकाच्या 'ऑक्टोबझ' या सोशल मीडिया एजंसीची टीम आणि या टीममधील हेमल आणि नेहा. कामसू, सुपर स्मार्ट आणि कामासाठी समर्पित. कोणत्याही टीमसाठी मौल्यवान ठरतील त्या.

ट्रेलर फिल्मच्या प्रोडक्शन टीममधील जावेद, पार्थसारथी, रोहित आणि इतर सर्व सदस्य अफलातून आहेत. मला खरंच असं वाटतं की, लवकरच संपूर्ण जग जिंकतील ते.

संवाद माध्यमांसंदर्भात मित्र मोहनने दिलेल्या सूचना केवळ अमूल्य.

या पुस्तकाच्या पीआरची जबाबदारी लीलया पेलली क्ली पीआर एजंसी आणि तेथील विनोद, तोरल, निमिषा यांनी.

माझ्याबरोबर काम करणाऱ्या संस्कृत विदुषी मृणालिनीबरोबरच्या माझ्या चर्चा नेहमी प्रेरक आणि ज्ञानवर्धक ठरल्या. तिच्याकडून मला बरंच काही शिकायला मिळालं.

नाशिकमधील आतिथ्याबद्दल नितीन, विशाल, अवनी आणि मयूरी यांचेही आभार. या पुस्तकाचा काही भाग मी नाशिकमध्ये लिहिला.

शेवटी अतिशय महत्वाचे – आपण, माझे वाचक. शिवा ट्रिलॉजीला आपण दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल माझ्या संपूर्ण अस्तित्वासह मी आपला ऋणी आहे. या पुस्तकामुळे आपल्या आशा दुणावाव्यात अशी मला मनापासून अपेक्षा आहे. हे माझ्या नव्या मालिकेतील पहिलं पुस्तक आहे. हर हर महादेव!

www.authoramish.com

# प्रकरण 1

ख्रिस्तपूर्व 3400चा काळ, भारतातील गोदावरी नदीच्या आसपासचा भाग.

आपलं उंच, मजबूत आिण बांधेसूद शरीर झुकवून राम ओणवा झाला. धनुष्य स्थिर करताना त्यांने आपल्या उजव्या गुडघ्यावर भर दिला. बाण धनुष्यावर टेकवला पण वेळेआधी प्रत्यंचा ताणू नये हे त्याला ठाऊक होतं. आपल्या स्नायूंवर अनावश्यक ताण येऊ नये असं त्याला वाटलं. आता त्याला योग्य क्षणाची वाट पाहावी लागणार होती. वार वर्मी लागायला हवा.

'ते चाललं, दादा,' कुजबुजत लक्ष्मण आपल्या मोठ्या भावाला म्हणाला.

राम काही बोलला नाही. त्याची नजर सावजावर खिळली होती. डोक्यावर बांधलेल्या खोप्यातून निघालेल्या काही चुकार बटा हवेच्या झुळुकीसरशी हेलकावत होत्या. त्याची विस्कटलेली दाढी आणि पांढरं अधोवस्त्र हवेच्या तालावर डोलत होते. हवेची दिशा आणि वेग लक्षात घेऊन रामने आपला नेम ठीक केला. आपलं पांढरं उत्तरीय त्याने हलकेच बाजूला सारलं तेव्हा युद्धातील जखमांच्या खुणांनी भरलेली त्यांची सावळी छाती उघडी झाली. बाण सोडताना वस्त्राची आडकाठी होऊ नये.

हरण अचानक सावध झालं. त्यानं आपली नजर वर उचलली. कदाचित येणाऱ्या संकटाची चाहूल त्याला लागली असावी. हलकेच टापा टाकणाऱ्या हरणाचा हळू आवाजातील अस्वस्थ हुंकार रामला ऐकू आला. पण कुठूनही कसलीही चाहूल न लागल्याने क्षणभरात हरण पुन्हा गवत चरू लागलं. कळपापासून ते काही अंतरावर होतं. पलीकडेच असूनही घनदाट जंगलामुळे कळप थोडा दृष्टीआड झाला होता.

'प्रभु परशुरामांच्या कृपेनं त्यानं चाहूलीकडे दुर्लक्ष केलं,' लक्ष्मण कुजबुजला, 'देवाचे आभार मानायला हवेत, आज आपल्याला उत्तम भोजनाची गरज आहेच.'

'शूः.....'

लक्ष्मण एकदम गप्प झाला. आपल्याला आज शिकारीची गरज आहे हे रामलासुद्धा ठाऊक होतं. गेल्या तीस दिवसांपासून लक्ष्मण, स्वतः तो आणि त्याची पत्नी सीता जंगलात भटकत होते. मलयपुत्र जमातीतील काही लोक आपले म्होरके जटायूंबरोबर त्यांच्या सोबत होते.

काही अप्रिय घडण्याची शक्यता लक्षात घेऊन जटायूनेच त्यांना त्यांचं याआधीचं निवासस्थान सोडायला लावलं होतं. शूर्पणखा आणि विभीषणाबरोबरच्या त्यांच्या फिसकटलेल्या भेटीचे काही ना काही परिणाम होणार हे अपेक्षित होतंच. कारण ते दोघे लंकेच्या राक्षसकुलीन राजा रावणाची भावंडं होती. राजघराण्याचं रक्त सांडलं होतं, त्यामुळे रावण सूड उगवणार हे ि‌न ि‌क्चतच होतं.

गोदावरी नदीसोबत घनदाट दंडकारण्यातून ते पूर्व दिशेने बरंच अंतर कापून आले होते. त्यांना शोधणं किंवा त्यांच्यावर कुणाची नजर पडणं आता सहजासहजी शक्य नाही हे ते जाणून होते. शिवाय, त्यांना ठाऊक होतं की, नदी किंवा पाणवठ्यापासून दूर जाणं हे शिकारीच्या उत्तम संधी गमावण्यासारखं आहे. राम आणि लक्ष्मण अयोध्येचे राजकुमार होते. तेजस्वी आणि पराक्रमी रघुराजाचे, श्रेष्ठ क्षत्रिय रघुकुलाचे ते वंशज होते. कंद-मुळं खाऊन गुजराण करणं त्यांना अधिक

काळ जमण्यासारखं नव्हतं.

कोवळं, लुसलुशीत गवत खाण्यात गढून गेलेलं हरण तिथेच स्थिरावलं होतं. हाच तो क्षण हे रामला कळलं. धनुष्य आणि त्यावर चढलेला बाण धरलेला डावा हात त्यांनी वर उचलला, हात स्थिर केला. उजव्या हातानं प्रत्यंचा मागे, जवळ जवळ ओठांपर्यंत खेचली. त्यांचे गुरु महर्षी वशिष्ठ यांनी सांगितल्याप्रमाणे हुबेहूब आता त्यांचं कोपर जमिनीला जवळजवळ समांतर होतं.

कोपर कमजोर असतं म्हणून ते उंच धरा. शक्तीचा ओघ पाठीच्या स्नायूंमधून येऊ दे. पाठ मजबूत असते.

रामानं प्रत्यंचा आणखी किंचित खेचली आणि बाण सोडला. झाडांमधून सणाणत निघालेला बाण थेट हरणाच्या मानेत घुसला. हरण तात्काळ गतप्राण होऊन कोसळलं. अचानक शरीरात घुसलेल्या बाणाने उसळलेलं रक्त त्याच्या फुफ्फुसात भरल्यामुळे त्याच्या तोंडून अस्फुट किंकाळीही फुटली नाही. उंच-धिप्पाड लक्ष्मण वेगानं पण चोरपावलांनी पुढे झेपावला. चालता चालता त्यानं कंबरेला आडवी खोचलेली कट्यार म्यानातून काढून हातात घेतली. क्षणभरातच तो हरणाजवळ पोहोचला आणि त्यानं आपली कट्यार बरगड्यांमधून थेट हरणाच्या छातीत खुपसली.

एखाद्या प्राण्याला धराशायी केल्यानंतर इतर शिकारी परंपरागत पद्धतीनुसार जसे माफी मागतात त्याप्रमाणे माफी मागताना लक्ष्मण पुटपुटला, "हे निर्दोष जीवा, तुझे प्राण हरण्याबद्दल मला माफ कर." हरणाच्या कपाळाला हळुवारपणे स्पर्श करत त्याने म्हटलं, 'तुझ्या आत्म्याला पुनर्जीवन मिळो आणि तुझं शरीर माझ्या आत्म्याला तृप्त करो.'

हरणाच्या शरीरातून लक्ष्मण बाण काढत असताना रामही तेथे पोहोचला. बाण स्वच्छ पुसून त्याच्या मूळ मालकाकडे परत देताना लक्ष्मण पुटपुटला, 'पुन्हा वापरता येईल हा.'

बाण भात्यात सरकवताना रामानं आकाशाकडे नजर वळवली. पक्षांची आनंदी किलबिल सुरू होती. थोड्या अंतरावर चरत असलेल्या हरणांच्या कळपालाही धोका जाणवल्याची लक्षणं दिसत नव्हती. आपल्यापैकी एकाची हत्या झाल्याचं त्यांना जाणवलंही नव्हतं. रुद्रदेवाची छोटी प्रार्थना पुटपुटून रामानं या अचूक शिकारीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या शिकारीमुळे आपला ठावठिकाणा कुणालाही कळू नये ही त्यांची इच्छा होती. त्यांना लगेच तिथून निघायला हवं होतं.

घनदाट अरण्यातून राम आणि लक्ष्मण पुढे निघाले. राम पुढे चालत होता आणि लक्ष्मण मागे. त्या दोघांनी एका भक्कम दांड्यावर लटकवलेलं हरीण आपल्या खांद्यांवर पेललं होतं, दांड्याचं पुढचं टोक रामाच्या आणि मागचं लक्ष्मणाच्या खांद्यावर होतं. भक्कम दोरखंडानं पुढचे आणि मागचे पाय एकत्र बांधलेलं हरीण पाय वर आणि धड खाली अशा अवस्थेत दांड्यावर त्या दोघांच्या मध्ये हेलकावत होतं.

'हं, कित्येक दिवसांनी आज बऱ्यापैकी जेवण मिळणार,' लक्ष्मण म्हणाला.

रामाच्या चेहऱ्यावर स्मित उमटलं पण तो काही बोलला नाही.

'पण दादा, आपल्याला हे नीटसं शिजविता येणार नाही, होना?'

'हो, खरंय तुझं. धुरावरून आपण नेमके कुठे आहोत ते शत्रूला लगेच समजेल.'

'आपल्याला खरंच एवढी खबरदारी घ्यायची गरज आहे का? आतापर्यंत आपल्यावर एकदाही

हल्ला झाला नाहीय. कदाचित आपला माग हरवला असेल त्यांच्याकडून. आतापर्यंत कुणाही हल्लेखोरांशी आपला सामना झालेला नाहीय, हो ना? आपण कुठे आहोत ते त्यांना कळेलच कसं? दंडकारण्य खूप घनदाट आहे.'

'तुझं म्हणणं खरं असेलही. पण मला कोणताही धोका पत्करायचा नाहीय. आपल्याला सुरक्षित रहायला हवं.'

लक्ष्मणाचा हिरमोड झाला, पण तो गप्प राहिला.

त्याच्याकडे वळून न पाहाता राम म्हणाला, 'अर्थात, कंदमुळं खाण्यापेक्षा हे बरंच आहे.'

'नक्कीच.' लक्ष्मण म्हणाला.

थोडा वेळ काही न बोलता दोघे पुढे चालत राहिले.

मग लक्ष्मण म्हणाला, 'कट शिजतंोय हे नक्की. दादा, कोणता ओिण कसा ते नक्की माझ्या लक्षात येत नाहीय, पण नक्कीच काहीतरी शिजतंय. कदाचित् भरत दादा.....'

'लक्ष्मणा!' रामने छोट्या भावाला दटावलं.

चार भावंडांपैकी राम मोठा आणि भरत त्याच्या पाठीवरचा होता. रामाला वनवासाची शिक्षा सुनावल्यानंतर पिता दशरथांनी भरताला राज्याचा वारस घोषित केलं होतं. लक्ष्मण आणि शत्रुघ्न ही रामाची छोटी जुळी भावंडं. वडील भावांप्रतीच्या निष्ठेमुळे ते दोघे सध्या एकमेकांना दुरावलेले होते. शत्रुघ्न भरतसोबत अयोध्येतच राहिला होता. अन् लक्ष्मणानं बिनदिक्कत रामासोबत वनवासाचा खडतर पर्याय निवडला होता. भावप्रवण लक्ष्मणाला रामाचा भरतावरील विश्वास पटत नव्हता. आपल्या दादाला भरतच्या छुप्या राजकारणाबद्दल सावध करणं हे आपलं कर्तव्य आहे असं त्याला वाटायचं.

'दादा, तुला कदाचित हे ऐकायला आवडणार नाही,' लक्ष्मणानं आपलं म्हणणं पुढे रेटलं, 'पण मला खात्रीनं वाटतंय की त्यानं आपल्याविरुद्ध काहीतरी कट.....'

'आपण त्या कटाची पाळंमुळं खणून काढू,' रामनं लक्ष्मणाचं म्हणणं मध्येच तोडत त्याला आश्वासन दिलं. 'पण आधी आपल्याला सोबत्यांची गरज आहे. या बाबतीत जटायूचं म्हणणं बरोबर आहे. आपल्याला इथल्या मलयपुत्रांच्या ठिकाणावर पोहोचायला हवं. निदान त्यांच्याकडून आपण मदतीची अपेक्षा बाळगू शकतो.'

'कुणावर विश्वास टाकायचा हेच मला कळेनासं झालंय, दादा. गृध जातीच्या त्या माणसाचं आपल्या शत्रूशी संगनमत नसेल कशावरून?'

जटायू नागा प्रजातीचे होते – शारीरिक व्यंग घेऊन जन्माला आलेल्या लोकांची प्रजाती. नर्मदेच्या उत्तरेला असलेल्या सप्त सिंधु प्रदेशातील नागा प्रजात ही घृणित, भीतीदायक आणि बहिष्कृत प्रजाती होती. तरीही रामा जटायूंवर पूर्ण भरंवसा होता.

इतर नागांप्रमाणेच जटायूसुद्धा व्यंग घेऊनच जन्मले होते. पाहाणाऱ्याला चोचीचा भास व्हावा अशा रीतीनं जटायूंच्या चेहऱ्यावरचं तोंडाचं हाड बऱ्यापैकी उंच होतं. त्यांच्या डोक्यावर नव्हते पण चेहऱ्यावर मात्र भरपूर केस होते. माणूस असून ते या व्यंगामुळे गरुडासारखे दिसायचे.

सीतेचा विश्वास सगळया समस्यांचं समाधान असल्यासारखा राम म्हणाला, 'सीतेचा जटायूंवर विश्वास आहे, माझासुद्धा जटायूंवर विश्वास आहे आणि तू सुद्धा त्यांच्यावर विश्वास ठेवावास.'

लक्ष्मण गप्प राहिला. दोघे भाऊ मग पुढे चालत राहिले.

‘पण भरतदादा असं काही करेल हे तुला का पटत नाहीय?’

‘श्श...’, हाताने खुणावत रामानं लक्ष्मणाला गप्प रहायला सांगितलं. म्हणाला, ‘ऐक जरा....’

लक्ष्मणानं कानांना ताण दिला. त्याच्या कण्यातून शरीरभर भीतीची झिरझिर पसरली. रामानं वळून लक्ष्मणाकडे पाहिलं तेव्हा भीतीनं त्याचा चेहरा पांढरा फटक पडला होता. त्या दोघांनाही घाबरलेल्या आवाजातील किंकाळी ऐकू आली होती. ती सीतेची किंकाळी होती. दूरवरून आल्यामुळे आवाज क्षीण होता पण ती सीतेचीच किंकाळी होती हे नक्की. ती आपल्या पतीचा पुकारा करत होती.

हरीण तेथेच टाकून राम आणि लक्ष्मण आवाजाच्या दिशेनं धावत सुटले. आपल्या पर्णकुटीपासून ते काही अंतरावर होते.

चाळवलेल्या पक्षांच्या किलकिलाटावर सीतेचा आवाज ऐकू येत होता.

‘.....रामऽऽऽ..!’

ते आता जवळ पोहोचले होते. संघर्षामुळे होत असलेला धातूच्या खणखणाटाचा आवाज त्यांना आता स्पष्ट ऐकू येत होता.

जंगलातून वेगानं पुढे धावता धावता रामानं हाक दिली, ‘सीतेऽऽऽऽ!’

लढण्यासाठी लक्ष्मणानं धावता धावता तलवार उपसून हातात घेतली.

‘....रामऽऽऽ!’

‘तिला सोडून देऽऽऽ!’ घनदाट पानांमधून पुढे पुढे झेपावत राम ओरडला.

‘.....रामऽऽऽ..!’

रामाची बोटं धनुष्यावर आवळली. आता ते आपल्या पर्णकुटीपासून काही मिनिटांच्या अंतरावर होते. रामने पुन्हा हाक दिली, ‘सीतेऽऽऽऽ!’

‘रा....’

सीतेचा आवाज मध्येच थांबला. अनिष्टाची कल्पना दूर ठेवत राम धावत राहिला. त्याचा ऊर जोरजोरात धपापत होता. मनात चिंतेचं वादळ घोंघावत होतं.

तेव्हढ्यात मोठमोठ्या पंख्यांची घर्रम्म घर्रम्म अशी घरघर त्यांना ऐकू आली. पूर्वी एका प्रसंगी ऐकलेला हा आवाज त्यांच्या चांगलाच परिचयाचा होता. रावणाच्या उड्डाणयानाचा, पुष्पक विमानाचा आवाज होता तो.

‘नको!’ राम ओरडला. धावता धावता त्यानं धनुष्य उचलून समोर धरलं. त्याच्या डोळ्यातून आता अश्रू ओघळू लागले होते.

दोघेही पर्णकुटीजवळ पोहोचले. पर्णकुटी पूर्णपणे उध्वस्त झाली होती. सांडलेल्या रक्ताचे थेंब आणि डाग सगळीकडे पसरले होते.

‘सीतेऽऽऽऽ!’

तीव्र गतीने आकाशात दूर दूर अदृश्य होत चाललेल्या पुष्पक विमानाकडे पाहात रामाने बाण सोडला.

रामाचा हा वार निरर्थक गेला. कारण रावणाचं उड्डाणयान तोवर खूप दूर पोहोचलं होतं.

‘सीतेऽऽऽऽ!’

लक्ष्मणानं संपूर्ण पर्णकुटी धुंडाळली. मृत सैनिकांची शरीरं सर्वत्र विखुरलेली होती. सीता मात्र कुठेच नव्हती.

'..राज....कुमार....राम...'

रामानं तो क्षीण आवाज पटकन ओळखला. तो आवाजाच्या दिशेनं झेपावला. घायाळ आणि रक्तबंबाळ अवस्थेत पडलेले नागा योद्धा जटायू त्याला दिसला.

'जटायू!'

प्राणांतिक जखमांनी घायाळ जटायू खूप परिश्रमानं बोलले, 'तो...'

'काय झालं इथे?' रामानं त्याला विचारलं.

'रावणानं... तिचं.... अपहरण........... केलं....'

आकाशात दूरवर पोहोचलेल्य पुष्पक विमानाच्या ठिपक्याकडे आवेशानं पाहात राम उभा राहिला. तळमळून तो ओरडला,

'सीतेऽऽऽऽ!'

# प्रकरण 2

तेहत्तीस वर्षांपूर्वी, करछप बंदर, पश्चिम किनारा, भारत.

'देवा परशुरामा, कृपा करा,' दशरथ पुटपुटले. दशरथ सप्तसिंधु खोऱ्यातील विशाल कोसल देशाचे सार्वभौम राजे होते.

आज सप्तसिंधु प्रदेशाचे सार्वभौम राजे दशरथ राजधानी अयोध्येतून कूच करून विस्तीर्ण पसरलेल्या आपल्या साम्राज्याच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या पश्चिम किनारी पोहोचले होते. काही विद्रोही व्यापाऱ्यांना गंभीर धडा शिकवायचा होता त्यांना. वारसाहक्कानं वडिलांकडून, म्हणजे राजे अजकडून मिळालेलं राज्य दशरथांनी एक विशाल शक्तीशाली साम्राज्य बनवलं होतं. भारताच्या इतर प्रांतातील राजांना एक तर त्यांनी पदच्युत केलं होतं किंवा मांडलिकत्व मान्य करायला लावलं होतं. या राजंनी राजा दशरथांच्या शौर्याचा स्वीकार करून चक्रवर्ती सम्राटाच्या रूपात त्यांना मान्यता दिली होती.

'हो महाराज,' मृगस्य म्हणाले. राजा दशरथांच्या सेनेचे ते सरसेनापती होते. ते म्हणाले, 'याच गावाची दुर्दशा झालीय असं नाही. आपण उभे आहोत तेथून पन्नास किलोमीटर परिघातील सगळी गावं शत्रूनं उध्वस्त केली आहेत. मृत प्राण्यांचे देह टाकून विहिरींचं पाणी विषारी बनवलं. क्रूरपणानं उभी पिकं जाळून टाकली. संपूर्ण ग्रामीण क्षेत्र उध्वस्त केलं आहे.'

'जमिनी जाळून नष्ट करण्याची धोरणं....', अश्वपती म्हणाले. अश्वपती म्हणजे घोडदळप्रमुख. कैकय अयोध्येचं मित्रराष्ट्र होतं आणि या राज्याचे राजे या मोहिमेत दशरथाच्या सेनेचे अश्वपती होते. शिवाय, दशरथांच्या दुसऱ्या प्रिय राणींचे – कैकयींचे ते पिता होते.

'हो,' आणखी एका राजानं सहमती दर्शवली. ते म्हणाले, 'इथे आपण आपल्या पाच लाख सैनिकांना अन्न पुरवू शकणार नाही. आपली रसद खंडित झालीय.'

'त्या जंगली व्यापारी कुबेराकडे युद्धनीतीची ही जाण आली कुठून?' दशरथांनी विचारलं.

व्यापारी वैश्यांविषयी वाटणारा तिरस्कार लपवणं क्षत्रीय दशरथांना अवघड जात होतं. सप्तसिंधु प्रदेशातील क्षत्रीयांच्या दृष्टीने योद्ध्यानं युद्धात जिंकून आणलेलं धन म्हणजेच संपदा होती. व्यापारातील नफ्याद्वारे मिळवलेली संपत्ती त्यांच्या लेखी हीन आणि म्हणूनच तिरस्करणीय होती. अशा तिरस्करणीय मार्गानं धन कमावणाऱ्या व्यापाऱ्यांवर जरब आणि नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांच्यावर तऱ्हेतऱ्हेचे निर्बंध लादले गेले होते. अत्यंत अवघड धोरणं आखली होती. सप्तसिंधु प्रदेशातील कुलीन लोक आपल्या मुलांना व्यापारी बनण्याला नव्हे तर योद्धा किंवा विद्वान बुद्धीजीवी बनण्यासाठी प्रोत्साहन देत असत. वर्षानुवर्षे असंच चालत राहिल्यानं आता या साम्राज्यात व्यापारी वर्गाची संख्या कमी झाली होती. युद्धांमुळे अधिक संपत्ती न मिळाल्याने राज्याचा खजिना रिकामा होत चालला होता.

नफा कमावण्याची उत्तम संधी हेरून लंका बेटाच्या व्यापारी राजा कुबेराने सप्त सिंधु साम्राज्यात आपल्या सेवा उपलब्ध करण्यासंबंधीचा प्रस्ताव पाठविला. अयोध्या नगरीचे तत्कालीन राजा अज यांनी भरपूर वार्षिक कराच्या बदल्यात कुबेराला तिथे व्यापार करण्याचा एकाधिकार दिला. या करारातून मिळणारं धन अज राजा सप्तसिंधु साम्राज्याच्या मांडलिक

राज्यांना वाटून देत असे. यामुळे अयोध्येतील सर्व राज्यांची भरभराट जरी झाली असली तरी व्यापाराबद्दलच्या त्यांच्या एकूण दृष्टीकोनात कोणताही फरक पडला नव्हता. पण अलीकडे दशरथ ज्यावर आपला अधिकार समजायचे त्या व्यापारी कराच्या रकमेत या व्यापाऱ्याने आपल्यावतीनं कपात केली होती. एका व्यापाऱ्याचा हा उद्दाम निर्णय दशरथाच्या दृष्टीनं अर्थातच शिक्षेस पात्र होता. म्हणूनच आपल्या आणि आपल्या मांडलिक राजांच्या सेनेसह दशरथ करछपला आले होते. कुबेराला त्याची जागा दाखवून देण्यासाठी.

'महाराज, याबाबत आम्हाला फारशी माहिती नाहीय,' मृगस्य म्हणाले, 'ही कुबेराची अक्कल नाही, हे मात्र नक्की.'

'मग यामागे कोण आहे?' दशरथांनी विचारलं.

अश्वपती म्हणाले, 'आम्हाला त्याबाबत फारसं काही ठाऊक नाही. त्याचं वय तिशीपेक्षा जास्त नाही हे आम्ही ऐकून आहोत. व्यापारी संरक्षण दलाचा प्रमुख म्हणून काही वर्षांपूर्वी तो कुबेराला सामील झाला. हळूहळू त्यानं लोकांची भरती करत छोट्या दलाचं सैन्यात रूपांतर केलं. मला वाटतं, कुबेराला आपल्या विरुद्ध उठाव करण्याचा सल्ला यानेच पटवून दिला असावा यात आश्चर्य वाटण्यासारखं काही नाही. तो लठ्ठ, ऐदी कुबेर सप्त सिंधुच्या ताकदीला आव्हान देईल अशी कल्पनासुद्धा कुणी करू शकत नाही.'

'कोण आहे हा माणूस?' दशरथांनी विचारलं, 'आणि कुठून आलाय तो?'

'आम्हाला खरंच त्याच्या विषयी काहीही माहीत नाही महाराज,' मृगस्य म्हणाले.

'निदान तुम्हाला त्याचं नाव तरी ठाऊक आहे का?'

'होय महाराज, त्याचं नाव आहे - रावण'

राजवैद्य निलंजना अयोध्येच्या राज महालात घाईघाईनं आल्या. महाराणी कौसल्यांच्या – राजा दशरथांच्या पहिल्या पत्नीच्या महालातून त्यांना तातडीनं बोलावणं धाडण्यात आलं होतं.

दक्षिण कोसल राज्याच्या राजाची शांत आणि सौम्य स्वभावाची मुलगी कौसल्या यांचा विवाह राजा दशरथांबरोबर झाला होता. त्यांच्या विवाहाला आता तीस वर्षे उलटून गेली होती. राज्याला वारस न देऊ शकल्याचं दुःख त्यांना कायम सतावायचं. राज्याला वारस हवा म्हणून शेवटी राजा दशरथांनी कैकयींशी विवाह केला. उंच, सुडौल आणि गोऱ्यापान कैकयी पश्चिमेच्या शक्तीशाली कैकय साम्राज्याच्या राजकुमारी होत्या. कैकय साम्राज्याचे राजे अश्वपती दशरथाचे मित्र होते. पण या विवाहातूनही राज्याला वारस मिळाला नाही. म्हणून दशरथांनी काशी नगरीच्या दृढ आणि विनम्र राजकुमारी सुमित्राशी विवाह केला. जिथे रुद्रदेवाचा आत्मा वास करतो असं मानलं जातं त्या अहिंसेसाठी प्रसिद्ध अशा काशी नगरीची कन्या होत्या सुमित्रा. पण या तिसऱ्या विवाहानंतरही सम्राट दशरथांना पुत्रप्राप्ती झाली नाही. राज्याला वारस मिळाला नाही.

अशा परिस्थितीत जेव्हा महाराणी कौसल्यांना दिवस गेले तेव्हा ती गोष्ट साहजिकच सगळ्यांसाठी आनंदाची तशीच थोडी चिंतेचीसुद्धा होती. महाराणी कौसल्यांची चिंता समजण्यासारखीच होती. महाराणींच्या सेवेतील बहुतेक निष्ठावान सेविका त्यांच्या माहेराहूनच आणलेल्या होत्या. वारसाच्या जन्माशी निगडीत राजकारणातील समीकरणांची त्यांना चांगलीच जाणीव होती. त्यामुळे प्रत्येक बाबतीत खूपच सावधगिरी बाळगली जात होती. म्हणूनच छोट्या

तक्रारी किंवा फसव्या लक्षणांनी घाबरून जाऊन याआधीसुद्धा वैद्य निलंजनांना पाचारण करण्यात आलेलं होतं. अर्थात वैद्य निलंजनासुद्धा महाराणी कौसल्यांच्या माहेरच्या म्हणजे कौसल राज्यातील होत्या. त्या नेहमी अशा वेळी आपला त्रागा व्यक्त होऊ नये याची खबरदारी बाळगीत असत.

यावेळी मात्र त्यांनाही महाराणी कौसल्यांच्या प्रसवाची वेळ आली असं वाटत होतं. महाराणींना प्रसववेदना सुरू झाल्या होत्या.

झपाझप पावलं उचलताना वैद्य निलंजना बाळंतपण सुखरूप पार पडण्याबद्दल आणि पुत्ररत्नच जन्माला येण्याबद्दल देवा परशुरामाला साकडं घालीत होत्या.

‘तुमच्या नफ्यातील आमचा नऊ दशमांशाचा न्यायपूर्ण वाटा आम्हाला देण्याची आज्ञा मी तुम्हाला देतो. त्याबदल्यात तुम्हाला जीवदान मिळेल याची मी खात्री देतो,’ महाराज दशरथ गरजले.

संधीच्या अटींबरहुकूम करवसूलीसंदर्भातील शेवटचा उपाय म्हणून दशरथांनी आपल्या एका दूताला वाटाघाटींसाठी आधीच तेथे पाठविलं होतं. त्यावेळी विपक्षानं एखाद्या सुरक्षित स्थळी प्रत्यक्ष भेटीचा मार्ग पत्करला होता. दशरथांच्या सैनिक छावणीपासून करछप किल्यापर्यंतच्या मधल्या भागातील समुद्रकिनाऱ्याच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेटीची जागा निश्चित करण्यात आली होती. दशरथांसोबत अश्वपती, मृगस्य आणि अंगरक्षकांची वीस सैनिकांची एक तुकडी होती. कुबेर आपल्या सरसेनापती रावण आणि वीस अंगरक्षकांसमवेत आला होता.

थुलथुलीत देहाच्या कुबेरानं जेव्हा लटपटत्या चालीनं शिबिरात प्रवेश केला तेव्हा सप्तसिंधूच्या सैनिकांना त्याच्याबद्दल वाटणारा तिरस्कार लपवणं जड जात होतं. लंकेच्या त्या सत्तर वर्षीय तुंदिलतनु संपन्न व्यापाऱ्याच्या प्रचंड शरीराचा तोल सांभाळण्यासाठी असल्यासारखा देवदूतासारखा त्याचा तुरळक केस असलेला गोल चेहरा सुंदर होता. त्याची तुकतुकीत गौरवर्णी त्वचा त्याचं वय लपवत होती. कुबेरानं चमचमणाऱ्या हिरव्या रंगाचं धोतर आणि गुलाबी रंगाचं उत्तरीय पेहेरलं होतं. कित्येक मौल्यवान अलंकार त्यानं ल्यायले होते. त्याची गरगरीत कंबर आणि स्त्रैण हावभाव त्याच्या विलासी जीवनाचं प्रतिबिंब होते. त्याला पाहून दशरथांना वाटलं की कमजोर शरीर असणाऱ्या वैश्याचा कुबेर हा एक अस्सल नमूना आहे.

शब्दांतून डोकावू पाहाणाऱ्या या आपल्या भावनांवर दशरथांनी लगाम लावला. तरीही त्यांच्या मनात आलंच की, खरंच या नटमोगऱ्याला माझा सामना आपण करू शकू असं वाटतंय की काय?!

‘राजाधिराज....’ कुबेर अडखळत बोलू लागला. ‘मला वाटतं, जुन्या दरानं मोबदला देणं आता आम्हाला परवडणार नाही. किंमती वाढल्यायत. शिवाय व्यापारात आता पूर्वीसारखा नफाही मिळत नाही.....’

‘मोल-भाव करायच्या या वाह्यात युक्त्या आमच्यावर आजमावू नका,’ समोरच्या पीठावर हाताने जोरात थाप मारून दशरथानं जरबेच्या सुरात सुनावलं, ‘मी काही व्यापारी नाही! मी सम्राट आहे! सभ्य माणसाला या दोहोंतील फरक कळतो!’

कुबेराची अस्वस्थता दशरथाच्या नजरेतून सुटलेली नव्हती. त्या व्यापाऱ्याला कदाचित बोलणी

या थराला जातील याची कल्पना नसावी. करछपला पोहोचलेल्या सेनेचं प्रचंड दडपण त्याच्यावर आलं असावं. जरब आणखी थोडी वाढवली, थोड्या कडक शब्दांत सुनावलं की कुबेर स्वतःच आपली मूर्खपणानं उचललेली पावलं मागे घेईल अशी दशरथाची समजूत होती. आणि त्यानं दोन पावलं मागे घेतली की त्याला मोबदला म्हणून दोन टक्के सूट द्यायची असं दशरथानं ठरवलं होतं. कधी कधी थोडी उदारता असंतोष विझवू शकते हे दशरथ जाणून होते.

थोडं पुढे होऊन, नरम आवाजात दशरथ म्हणाले, ‘मी थोडी दयासुद्धा दाखवू शकतो. तुमच्या चुका माफ करू शकतो. पण त्यासाठी आधी तुम्हाला तुम्ही उचललेली सगळी पावलं मागे घ्यावी लागतील. त्यांवर नियंत्रण ठेवावं लागेल. माझ्या आज्ञांचं पालन करावं लागेल.’

घाबरलेल्या कुबेरानं आवंढा गिळला. उजवीकडे निर्विकार बसलेल्या रावणाकडे, म्हणजे आपल्या सेनापतीकडे त्याची नजर गेली. बसलेल्या रावणाला पाहूनही त्याच्या भक्कम शरीरयष्टीची आणि उंच बांध्याची पुरेपूर कल्पना येत होती. त्याच्या काळ्या त्वचेवर जखमांच्या व्रणांसह फोडांचे डाग होते. त्यावरून, बालपणी त्याला एखादा रोग झाला असावा याची कल्पना येत होती.

घनदाट दाढीमुळे त्याच्या चेहऱ्यावरचे व्रण झाकले जात होते. जाडजूड मिशांमुळे त्याचा चेहरा उग्र, राकट आणि भयानक दिसत होता. त्याच्या मुकुटात दोन बाजूंना दोन भयानक, लांब शिंगं लागलेली होती.

सेनापती रावण अगदीच निर्विकार बसला होता. त्यामुळे नाइलाजाने कुबेराला पुन्हा आपली नजर दशरथांकडे वळवावी लागली. तो पुन्हा बोलू लागला, ‘पण महाराज, आम्हाला बऱ्याच समस्यांना तोंड द्यावं लागतंय. शिवाय, आम्ही गुंतवलेली रक्कम......’

‘तुम्ही आमच्या सहनशीलतेचा अंत पाहाताय, कुबेर!’ दशरथ ओरडून म्हणाले. रावणाला दुर्लक्षून आपलं सगळं लक्ष कुबेरावरच केंद्रीत करत दशरथ गुरकावत म्हणाले, ‘तुम्ही सप्तसिंधूच्या सम्राटांना चिथावत आहात!’

‘पण महाराज....’

‘तुम्ही जर आम्हाला आमचा योग्य मोबदला दिला नाही तर उद्याचा दिवस तुमच्या आयुष्यातील शेवटचा दिवस ठरेल, हे लक्षात ठेवा. आधी मी तुमच्या या मुठभर सैन्याचा धुव्वा उडवेन आणि मग तुमच्या त्या शापित नगरीला बेचिराख करेन.’

‘पण आमचे श्रम आणि आमच्या जहाजांची किंमतसुद्धा निघत नाहीय....’

‘तुमच्या अडचणींचा पाढा माझ्यासमोर वाचू नका. मला त्याच्याशी काहीएक देणंघेणं नाही,’ दशरथ पुन्हा गरजले. त्यांच्या रागानं आता परिसीमा गाठली होती.

‘उद्यानंतर नक्की असेल,’ नम्रपणे रावण उद्गारला.

झटक्यात दशरथ रावणाच्या दिशेला वळले. त्यांच्या मनात आलं, कुबेराच्या सेनापतीनं मध्येच बोलण्याचा उद्दामपणा कसा केला? ओरडून ते म्हणाले,

‘तुझी एवढी हिम्मत?....’

‘तुम्ही असं कसं म्हणू शकता दशरथ?’ यावेळी रावणाचा स्वरही चढेल झाला.

दशरथ, अश्वपती आणि मृगस्य अवाक् होऊन पाहातच राहिले. सप्तसिंधूच्या सम्राटाशी असं संभाषण करण्याचं धारि�्य कोण कसा करू शकतो?

‘ज्या सेनेचं नेतृत्व माझ्याकडे आहे त्या सेनेला तुम्ही हरवू शकणार नाही,’ भयानक शांत

स्वरात रावणानं दशरथाला सांगितलं.

रागानं दशरथ ताड्कन् उभे राहिले. त्या झटक्याने त्यांचं आसन मागे कशावर तरी जाऊन आदळलं. आपलं बोट रावणाच्या दिशेनं दाखवत ते म्हणाले, 'अहंकारी माणसा, उद्या लढाईच्या मैदानात भेटू आपण!'

अत्यंत संथपणे रावण आपल्या आसनावरून उठून उभा राहिला. त्याच्या उजव्या हाताच्या मुठीत पदकासारखी कोणतीतरी लांबोळकी वस्तु होती. त्याच्या गळ्यातल्या माळेचं ते पदक होतं. त्या मुठीची नकळत रावण उघडझाप करत होता. रावणाच्या मुठीतल्या त्या पदकावर दशरथांची नजर पडली आणि भीतीने त्यांचे डोळे विस्फारले. त्या पदकात माणसाच्या हाताची दोन बोटं गोवलेली होती. हाडं कौशल्यानं सोन्यात मढवून घेतली होती. ते बीभत्स पदक रावणानं पुन्हा आपल्या मुठीत जेव्हा बंद केलं तेव्हा त्याच्यात सैतानी शक्तीचा संचार होऊ लागला असं दशरथांना वाटलं.

अविश्वासामुळे दशरथांची नजर रावणावरून हालत नव्हती. शत्रूच्या कवटीतून त्याचं रक्त किंवा दारू पिणाऱ्या आणि नंतर विजयाचं प्रतीक म्हणून ते जवळ बाळगणाऱ्या राक्षस जातीबद्दल दशरथ ऐकून होते. पण इथे एक असा योद्धा त्यांच्यासमोर उभा होता जो आपल्या शत्रूचा अवयव गळ्यात अडकवून फिरत होता! हा दानव आहे तरी कोण?

'नक्की, विश्वास बाळगा. उद्या मी तुमची वाट पाहीन,' टोमणा मारल्यासारखा रावण बोलला. दशरथ आपल्याकडे एकदम असा घाबरून जाऊन पाहातोय याची त्याला गंमत वाटत होती. पुढे शब्द चघळत तो म्हणाला, 'तुमचं रक्त शोषण्याचा आनंद मला अनुभवायचाय.'

झटक्यात वळून रावण शिबिराबाहेर चालता झाला. कुबेरसुद्धा आपल्या अंगरक्षकांसमवेत धडपडत त्याच्यामागून निघून गेला.

दशरथ रागानं फणफणत होते. 'उद्या आपण या किड्यांना चिरडून टाकू! खबरदार, कुणी या माणसाला हात नाही लावायचा,' दशरथांनी गर्जना करत म्हटलं. ते त्या कमजात रावणाबद्दल बोलत होते. म्हणाले, 'त्याला मीच मारणार!'

युद्धघटका जसजशी जवळ येत होती तसतसा दशरथांचा राग शिगेला पोहोचत चालला होता. 'मी त्याच्या शरीराचे तुकडे तुकडे करून ते कुत्र्यांना खाऊ घालणार,' दशरथ गरजले.

गप्प बसलेल्या महाराणी कैकयी आपल्या पतीला शिबिरातील त्या दालनात इकडून तिकडे फेऱ्या मारताना पाहात होत्या. युद्धाच्या वेळी त्या नेहमी आपल्या पतीसोबत असायच्या.

'अशा रीतीनं माझ्याशी बोलण्याचं त्याचं धाडसच कसं झालं?'

कैकयी अगदी लक्षपूर्वक आपल्या पतीचे सारे हावभाव पाहात होत्या. दशरथ उंच, सुंदर, सशक्त होते. सर्वोत्तम क्षत्रीय होते ते. काळजीपूर्वक कोरलेल्या मिशांमुळे त्यांचा चेहरा अगदी खुलून दिसत होता. शरीरयष्टी भक्कम, बांधेसूद असली तरी त्यावर केसांत मध्येच उगवलेल्या पांढरी बट आणि स्नायूंमध्ये पुसट उमटलेली शिथिलता यांसारख्या उतारवयाच्या खुणा दिसून येऊ लागल्या होत्या. मुनीवर्यांकडून खास राजवंशातील लोकांसाठी बनविल्या जाणाऱ्या गूढ पेय सोमरसानेसुद्धा सतत युद्धरत असण्यामुळे आणि खूप पिण्यामुळे उमटलेल्या या वार्धक्याच्या खुणा पुसट झाल्या नव्हत्या.

‘मी सप्तसिंधूचा सम्राट आहे,’ आपल्या छातीवर हात थोपटून दशरथ म्हणाले, ‘त्याची माझ्यासमोर बोलण्याची बिशाद झालीच कशी?’

सार्वजनिक जीवनासारखंच एकांतात बोलतानासुद्धा कैकयींचं आपल्या पतीबरोबरचं वागणं विनम्र आणि मधुर असे. याआधी त्यांनी दशरथांना एव्हढं क्रोधित झालेलं कधी पाहिलंच नव्हतं.

‘प्रिय,’ कैकयी म्हणाल्या, ’हा क्रोध उद्यासाठी जपून ठेवा. आधी भोजन करून घ्या. उद्या होणाऱ्या युद्धात आपल्याला शक्तीची गरज पडणार आहे.’

‘त्या मूर्खाला आपण कुणाला ललकारतोय याची कल्पना तरी आहे का? जीवनात मी कधीही कोणतं युद्ध हारलेलो नाही.’ दशरथ आपल्याच धुंदीत बोलत होते. कैकयी काय बोलतेय याकडे त्यांचं लक्षच नव्हतं.

‘उद्याच्या युद्धातही आपण विजयी व्हाल.’

दशरथ कैकयींकडे वळले आणि म्हणाले, ‘हो, मी उद्यासुद्धा जिंकेन. आणि त्यांच्या प्रेताचे तुकडे करून कुत्र्या-डुकरांना खाऊ घालेन.‘

‘अवश्य प्रिय. आपण यावर दृढ आहात ना?’

दशरथ रागानं फणफणले. वळून शिबिराबाहेर निघाले. पण आता मात्र कैकयी स्वतःवर नियंत्रण ठेवू शकल्या नाहीत. ‘सम्राट दशरथ!’ त्यांनी दटावणीच्या सुरात हाक मारली.

फेऱ्या मारता मारता दशरथ उभे राहिले. तशीच वेळ आली तरच त्यांची पत्नी त्यांच्याशी अशा सुरात बोलत असे. कैकयी त्यांच्या जवळ गेल्या. हात धरून त्यांना भोजनस्थळी घेऊन आल्या. दशरथाच्या खांद्यावर हात ठेवून त्यांनी त्यांना आसनावर बसवलं. भाकरीचा तुकडा तोडून भाजीसोबत घास त्यांच्या तोंडासमोर नेला. मग कुजबुजत त्या म्हणाल्या, ’तुम्ही नीट जेवला नाहीत, रात्री नीट झोपला नाहीत तर त्या राक्षसाला तुम्ही कधीही हारवू शकणार नाही.’ दशरथांनी तोंड उघडलं आणि कैकयीनं त्यांना घास भरवला.

# प्रकरण 3

मंचकावर पहुडलेल्या अयोध्येच्या महाराणी कौसल्या वय केवळ 40 वर्षांचं असूनही खूपच कमजोर आणि थकलेल्या वाटत होत्या. केस पांढरे झाले होते आणि त्यांच्या गौर, नितळ त्वचेसोबत बेजोड वाटत होते. त्यांची उंची थोडी कमी असली तरी त्या शरीरयष्टीनं मजबूत होत्या. वारस जन्माला घालण्यारून ज्या समाजात स्त्रियांचं महत्व ठरत असे त्या समाजात वांझपणाच्या दुःखानं त्यांना पोखरून काढलं होतं. ज्येष्ठ पत्नी असूनही केवळ काही कार्यक्रमांतच राजा दशरथ त्यांना आपल्यासोबत ठेवत असत. इतर वेळी घोर उपेक्षितेचं जिणं त्यांच्या वाट्याला पुजलेलं असे. त्यामुळे मनातून त्या खूपच कष्टी होत्या. दशरथ आपल्या दुसऱ्या पत्नीबरोबर म्हणजे कैकयीबरोबर जितका वेळ घालवत असत त्यापैकी केवळ काही क्षण आपल्या वाट्याला यावेत असं त्यांना वाटे.

कुळाला वारस देण्यानं, दशरथांच्या पहिल्या अपत्याला जन्म देण्यानं परिस्थिती पालटण्याची दाट शक्यता आहे याची महाराणी कौसल्यांना पूर्ण जाणीव होती. त्यामुळे शरीर जरी दुर्बल झालं असलं तरी आज त्यांच्या साऱ्या आशा पल्लवीत झालेल्या होत्या. सोळा तासांहूनही अधिक काळ त्यांना वेणा सहन कराव्या लागल्या होत्या. पण त्यांना या वेणा जाणवल्याच नव्हत्या. शल्यक्रियेनं बाळजन्माची क्रिया सुलभ करण्याची परवानगी डॉक्टरांना देण्याऐवजी त्यांनी सैनिकांसारखे या वेणांशी दोन हात करणेच पसंत केले.

'माझ्या मुलाचा जन्म नैसर्गिकरीत्याच होईल,' महाराणी कौसल्यांनी ठामपणानं सांगितलं होतं.

नैसर्गिकरीत्या जन्म होणं अधिक मंगल मानलं जात असे. म्हणून, आपल्या मुलाच्या भाग्याबद्दल कोणताही धोका पत्करण्याची त्यांची तयारी नव्हती.

'एके दिवशी तो राजा होणार!' कौसल्या म्हणाल्या, 'चांगलं भाग्य घेऊनच तो जन्माला येईल.'

वैद्य निलंजनांनी सुस्कारा सोडला. मुलगाच होणार याबद्दल त्यांना खात्री नव्हती पण त्यांना आपल्या महाराणींचं मन तसूभरही दुखवायचं नव्हतं. त्यांनी काही वेदनाशामक वनौषधींचा लेप महाराणींना लावला. आता महाराणींना थोडा वेळ मिळाला होता. मध्यान्ही आधी बाळाचा जन्म व्हायला हवा असं वैद्यांना वाटत होतं. ज्योतिष गणनेच्या आधारावर राज ज्योतिषांनी त्यांना ताकीद दिली होती की बाळ दुपारनंतर जन्माला आलं तर जन्मभर त्याला खडतर प्रसंगांना तोंड देत रहावं लागेल आणि सूर्य मध्यान्हीला पोहोचण्याआधी जर बाळाचा जन्म झाला तर एक आदर्श पुरुषाच्या स्वरूपात पुढील सहस्त्रों वर्षे लोकांत त्याचं नाव झालं असतं.

निलंजनानी प्रहर पात्रावर नजर टाकली. सहा तासांच्या क्षमतेनुसार प्रहर पात्र दिवसाचा वेळ मोजत असे. त्यावेळी सूर्योदय झालेला होता. दुसऱ्या प्रहरातील तिसऱ्या घटिकेची वेळ होती ती. आणखी तीन तासांत सूर्य मध्यान्हीला आला असता. मध्यान्हीआधी एक तासापर्यंत वाट पहाण्याचा आणि तोवर बाळाचा जन्म झाला नाही तर शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय निलंजनांनी घेतला होता.

महाराणी कौसल्यांच्या वेणा पुन्हा तीव्र झाल्या. त्यांनी आपले ओठ गच्च मिटून घेतले. मनातल्या मनात मुलासाठी योजलेल्या नावाचा जप सुरू केला. यामुळे त्यांना विशेष बळ

मिळालं. कारण त्यांनी योजलेलं नाव असामान्य होतं. विष्णूच्या सहाव्या अवतारातील नाव त्यांनी आपल्या बाळासाठी निवडलं होतं. विष्णू ही पदवी शुभाचा प्रसार करणाऱ्या अग्रणींना दिली जात असे. ही पदवी मिळवणारी सहावी व्यक्ती होते भगवान परशुराम. सामान्य लोकांमध्ये ते याच नावानं ओळखले जात असत. परशु म्हणजे फरसा किंवा कुऱ्हाड. विष्णुच्या सहाव्या अवताराला हे नाव दिलं गेलं कारण हे त्यांचं आवडतं हत्यार होतं. त्यांचं जन्मनाव होतं राम आणि आत्ता महाराणी कौसल्यांच्या मनात हेच नाव घुमत होतं.

राम...राम...राम...राम...

दुसऱ्या प्रहरातील चौथी घटिका तास सुरू होता होता दशरथांची युद्धाची तयारी पूर्ण झाली होती. आदल्या रात्री मुश्किलीनं त्यांना काही क्षणांचीच झोप घेता आली असावी. कारण आत्मसन्मानावर झालेल्या आघातामुळे रागाने ते रात्रभर तळमळतच होते. जीवनात आजपर्यंत त्यांना युद्धात कधी पराजय स्वीकारावा लागला नव्हता. पण यावेळी त्यांना केवळ युद्धातील जय अपेक्षित नव्हता. यावेळी त्यांना त्या भाडोत्री सैनिकाला युद्धात जीवे मारल्यानेच त्याला धडा शिकविल्याचे समाधान मिळाले असते.

अयोध्येच्या सम्राटांनी यावेळी आपल्या सैन्याची व्यूहरचना 'सूची व्यूह' पद्धतीने केली. सूची म्हणजे सुई. कारण, कुबेराच्या सैनिकांनी करछप किल्याच्या चारही बाजूंना घनदाट काटेरी झुडुपं लावली होती. त्यामुळे किनाऱ्यावर वसलेल्या या शहरावर जमिनीच्या बाजूने हल्ला करणं जवळ जवळ अशक्यच होतं. दशरथाच्या सैनिकांना किल्यावर हल्ला करण्यासाठी ही झुडुपं उपसून रस्ता बनविता आला असता, पण त्यात कित्येक आठवडे गेले असते. कुबेराच्या सैनिकांनी किल्याभोवतीची जागा भाजून काढली होती. त्यामुळे दशरथाच्या सेनेसाठी स्थानीय पातळीवर आहार आणि पाण्याचा दुष्काळच होता. त्यांच्या भांडारातील साठा लक्षात घेता आता त्यांच्याजवळ फारसा वेळ शिल्लक राहिलेला नव्हता. त्यांना शिधा संपण्याआधी हल्ला करणं भाग होतं.

याहून महत्वाचं म्हणजे रागामुळे दशरथांना धीर निघत नव्हता. म्हणूनच त्यांनी किनाऱ्यावरून किल्याकडे जाणाऱ्या एकुलत्या चिंचोळ्या पाऊलवाटेवरून हल्ला करण्याचं ठरवलं.

तसा हा किनारा रुंद होता. मोठ्या सैन्यासाठी तो अपुरा होता म्हणूनच दशरथांना आपल्या सैन्याची सूची-व्यूह रचना करावी लागली. सम्राटांसोबत उत्तम सैनिकी तुकड्या या व्यूहाच्या अग्रभागी रहाणार होत्या. आणि इतर सैनिक रांगेने त्यांच्यामागून येणार होते. त्यांनी आवर्ती हल्याची योजना आखली होती. त्यानुसार पहिल्या फळीने हल्ला करून लंकेच्या शत्रुपक्षाची फळी मोडून काढायची होती आणि पुढे मुसंडी मारण्याचा मार्ग मोकळा करायचा होता. त्यानंतर त्या फळीने मागे यायचे आणि दुसऱ्या फळीने आघाडी सांभाळायची. पुढे होऊन हल्ला करायचा. अशा प्रकारे कुबेराच्या सेनेला पांगवून नष्ट करायचं होतं.

आपल्या घोड्याला टाच मारून अश्वपती थोडे पुढे आले आणि दशरथांसमोर उभे राहिले.

'महाराज,' ते म्हणाले 'सैन्याची ही व्यूहरचना आपणास योग्य वाटते का?'

'राजा अश्वपती, आपल्याकडून मला इतर काही ऐकून घ्यायचं नाहीय!' दशरथ त्यांना म्हणाले. नेहमी आक्रामक असणाऱ्या आपल्या सासऱ्यांचा आजचा सावधगिरीचा इशारा देणारा नूर

पाहून अश्वपतींना थोडं आश्चर्यच वाटलं होतं. भारतवर्षातील विजययात्रेत ते नेहमी दशरथांसोबत राहिले होते. दशरथांना त्यांच्यावर पूर्ण भरवसा होता.

'मला वाटतं, आपल्या प्रचंड सेनेचा पूर्ण वापर सध्या आपण करू नये. पुढे हल्ला करणाऱ्या सैन्याच्या फळीमागे आपली मोठी सेना राहील. एकाच वेळी पूर्ण सेना लढणार नाही. आपणास ही योजना अक्कलहुशारीची वाटते का?'

'मला वाटतं की, केवळ हाच एक मार्ग आहे.' दशरथांनी आत्मविश्वासानं सांगितलं. 'आपला पहिला हल्ला जरी यशस्वी झाला नाही तरी सैनिक लाटांसारखे येत राहातील. कुबेराच्या षंढ सेनेतील शेवटचा सैनिक मारला जाईपर्यंत आपण आपले जोरदार हल्ले चढवतच राहू. पण मला खात्री आहे की आपल्याला एवढे प्रयत्न करावेच लागणार नाहीत. पहिल्या हल्यातच आपण त्यांचा पार धुव्वा उडवू!'

अश्वपतींनी डावीकडे पाहिलं. समुद्रात साधारण दोन किलोमीटर्सच्या अंतरावर कुबेराची गलबतं नांगर टाकून उभी होती. त्या गलबतांची बांधणी काहीशी वेगळीच वाटत होती. गलबतांचा पुढचा भाग खूप रूंद होता. अश्वपतींनी आश्चर्य व्यक्त करत म्हटलं, 'युद्धांत या गलबतांची काय जबाबदारी असेल बरं?'

'काहीही नाही!' दशरथ कौतुकानं आपल्या सासऱ्यांकडे पाहात स्मितहास्य करत म्हटलं. दशरथांना याआधी काही समुद्री युद्धं करण्याचा अनुभव होता, अश्वपतींना तो नव्हता. दशरथ पुढे म्हणाले, 'त्या मूर्खांनी अजून जहाजावरून नौका उतरवल्यादेखील नाहीत. त्या गलबतांमध्ये त्यांच्या सैन्याच्या आरक्षित तुकड्या जरी असल्या तरी त्यांना लगेच युद्धस्थळी नेता येणार नाही. गलबतावरून छोट्या, वल्हवत ऩेणाऱ्या नौका उतरवण्यात, त्यात सैनिकांना उतरवण्यात, आणि त्यांना युद्धस्थळी पोहोचण्यात त्यांना निदान काही तास तरी लागतील. तोवर किल्यात असणाऱ्या सैनिकांना आपण पार निकालात काढू.'

'किल्याबाहेर,' अश्वपतींनी करछपच्या दिशेने बोट दाखवत दशरथाची चूक दुरुस्त केली.

विचित्र गोष्ट म्हणजे, आपल्या भक्कम किल्याच्या सुरक्षिततेत राहून हल्ला परतविण्याचा सुरक्षित उपाय रावणानं स्वीकारला नव्हता. किल्याच्या तटावर ठिकठिकाणी सैनिकांची तैनाती करण्याऐवजी रावणानं आपल्या जवळ जवळ 50 हजार सैनिकांचा व्यूह किल्याबाहेरच्या समुद्रकिनाऱ्यावर केला होता.

'याआधी मीसुद्धा कुणी अशी विचित्र योजना केलेली पाहिली नाहीय,' सावधपणे अश्वपती म्हणाले. 'किल्याच्या भिंती मागे असल्याने त्यांना माघार घ्यायला जागाच उरली नाहीय. रावणानं असं का बरं केलं असेल?'

मिश्कीलपणे हसत दशरथ म्हणाले, 'कारण तो एक उलटा चालणारा मूर्ख आहे, म्हणून. आपण बोललो ते त्याला सिद्ध करून दाखवायचं आहे. अर्थात, माझ्या तलवारीचं टोक त्याच्या छातीत खुपसून मीच काय तो सोक्षमोक्ष लावणार आहे.'

अश्वपतींनी पुन्हा आपली नजर किल्याच्या तटाकडे वळवली. रावणाच्या सैनिकांचं ते निरीक्षण करू लागले. शिंगं लावलेलं भयंकर शिरस्त्राण घातलेला रावण आपल्या सैन्याचं नेतृत्व करत असल्याचं त्यांना एवढ्या दुरूनही स्पष्ट दिसत होतं.

अश्वपतींनी आपल्या सैन्यावर एक नजर टाकली. युद्ध सुरू होण्याआधी बहुधा सैनिक करतात तसे ते मोठमोठ्या आरोळ्या ठोकत होते, आणि शत्रुपक्षाच्या सैनिकांना शिव्या देत होते. त्यांनी

पुन्हा एकदा रावणाच्या सैन्यावर नजर टाकली. दशरथांच्या सैन्याच्या अगदी उलट स्थिती होती तेथे. त्यांच्या तोंडून अजिबात आवाज निघत नव्हते. तेथे कसली हालचालही जाणवत नव्हती. त्यांच्यात उत्तम सैनिकी शिस्त होती हे समजून येत होतं. व्यूह बनवून ते अत्यंत शांत, स्तब्ध पण सावध उभे होते.

अश्वपतींच्या कण्यातून भीतीची एक शिरशिरी दौडत शरीरभर पसरली.

हे सैनिक आमिष होते आणि दशरथ त्यांनाच खरं सैन्य मानत होते ही गोष्ट अश्वपतींच्या मनातून जाता जात नव्हती. तुम्ही जर आमीषाकडे धाव घेणारा मासा असाल तर बहुधा तुमचा शेवट चांगला होणार नाही.

आपली भीती व्यक्त करण्यासाठी अश्वपती दशरथांकडे वळले पण तोवर सप्तसिंधूच्या सम्राटांनी कूच केलं होतं.

---

सैन्याच्या पुढे घोड्यावर स्वार झालेले दशरथ निघाले होते. त्यांनी आत्मविश्वासानं भरलेली नजर आपल्या सैनिकांवर टाकली. तलवारी उपसून कर्कश्श आरोळ्या देत निघालेले पुंड होते ते. हल्ला करायला उत्सुक असलेले. घोडदळातील घोड्यांवरसुद्धा या वातावरणाचा परिणाम झाल्यासारखा वाटत होता. कारण घोड्यांना कह्यात ठेवण्यासाठी सैनिकांना त्यांचे लगाम खच्चून ओढावे लागत होते. त्या भव्य कत्तलीचा, वाहू घातलेल्या रक्ताच्या पाटांचा गंध जणू दशरथ आणि त्यांच्या सैन्याच्या रंध्रारंध्रातून झिरपून त्यांच्या अंगात भिनत चालला होता. त्यांना पूर्ण खात्री होती की यावेळीसुद्धा युद्धदेवता त्यांच्यावर विजयाचा वर्षाव करणार आहे. युद्धाचे ताशे वाजू देत!

डोळे बारीक करत दशरथांनी दूरवर दिसणाऱ्या लंकेच्या सैनिकांवर आणि त्यांचा नेता रावणावर नजर केंद्रित केली. त्यांच्या शरीरात रागाचा लावा खदखदत होता. त्यांनी तलवार उपसून उंच धरली. कौसल नगरी आणि तिच्या राजधानीच्या नगरी अयोध्येतील युद्ध गर्जना केली, ‘अयोध्याता, विजेतारा!’

"अजिंक्य नगरीतील जेते!"

त्यांच्या सैन्यातील सगळे सैनिक अयोध्येचे नव्हते. तरी कौसल राष्ट्राच्या वतीने लढण्यात त्यांना अभिमान वाटत होता.

सैनिकांनी दशरथांच्या आरोळीला प्रतिसाद दिला - ‘अयोध्याता, विजेतारा!’

तलवार खाली आणता आणता घोड्याला टाच देत दशरथ उद्गारले, ‘मारून टाका सगळ्यांना, अजिबात दयामाया दाखवू नका.’

‘दया माया नको.’ आपल्या निर्भय नेत्याच्या पाठोपाठ निघताना आपापल्या घोड्यांना टाचा मारत पहिल्या फळीतील घोडेस्वार गरजले.

मग तो सगळा गुंता हळूहळू उलगडत चालला. दशरथ आणि त्यांच्या उत्तम योद्ध्यांची एक भक्कम फळी सप्तसिंधूच्या सूचीव्यूहाचं टोक बनणार होती. ही फळी जेव्हा किनाऱ्यावर लंकेच्या सैनिकांच्या दिशेने कूच करून गेली तेव्हा सुद्धा रावणाचे सैनिक जागचे हालले नाहीत. शत्रूसैन्य केवळ शंभरेक मीटर्सवर येऊन ठेपलं, अनपेक्षितरीत्या रावण माघारी गेला. त्यामुळे दशरथांचा राग आणखी उफाळला. त्यांनी मोठ्यानं आरोळी देत घोड्याला टाच दिली. घोड्यानं

वेग घ्यावा आणि आपण लंकेची ही पुढची फळी फोडून लवकर रावणापर्यंत पोहोचावं हाच त्यांचा उद्देश होता.

रावणाला हेच तर हवं होतं. लंकेच्या पुढच्या फळीतील सैनिकांनी एकत्रितपणे गगनभेदी आरोळी ठोकली आणि अचानक हातातील तलवारी टाकून, खाली वाकून अवाढव्य लांबीचे भाले उचलून हातात घेतले. जवळ जवळ वीस फूट लांबीचे ते भाले इतके जड होते की एक भाला दोघा सैनिकांना मिळून उचलावा लागत होता. तांब्याची टोकं असलेले हे अणकुचीदार भाले त्यांनी दशरथांच्या चाल करून येत असलेल्या घोडदळावर रोखून फेकले. हल्याची कल्पनाही नसलेल्या घोड्यांच्या आणि त्यावर स्वार असलेल्या सैनिकांच्या शरीराला हे अणकुचीदार भाले कापत गेले. दशरथांचं घोडदळ जायबंदी होत गेलं. अचानक घोड्यांच्या कोलमडण्यानं घोडेस्वार पुढे फेकले गेले. तेवढ्यात करछप किल्याच्या उंच तटावर लंकेचे धनुर्धारी सैनिक प्रकटले. किल्ल्याच्या उंच तटावरून त्यांनी घोडदळामागून येणाऱ्या सप्तसिंधूच्या पायदळावर बाणांचा वर्षाव सुरू केला. या हल्ल्यामुळे दशरथांचं पायदळ अंधाधुंद कापलं गेलं.

दशरथांच्या घोडदळातील जे सैनिक भाल्यांच्या हल्ल्यात जखमी झाल्यानं आपल्या घोड्यावरून कोसळले होते ते शत्रूसैनिकांशी समोरासमोर भिडले. त्यांच्यात तुंबळ युद्ध सुरू झालं. राजा दशरथ सप्तसिंधूच्या सेनेचं मार्गदर्शन करत होते. त्यांनी आवेशानं तलवार उपसली. शत्रुसैन्यातील जो कुणी मार्गात येईल त्याला कापत ते पुढे निघाले. लंकेच्या उत्तम प्रशिक्षित सैनिकांच्या तलवारींच्या माऱ्याला आणि बाणांच्या भडिमाराला बळी पडत असलेल्या आपल्या सैनिकांची नोंदही त्यांच्या मनात होत होती. आपल्या सोबत सप्तसिंधूचा ध्वज घेऊन चाललेल्या सैनिकाला दशरथांनी ध्वज उंचावण्यास सांगितलं. शेवटच्या फळीतील सैनिकांपर्यंत पहिल्या फळीच्या सहाय्यार्थ त्वरित आक्रमणाचा संदेश पोहोचवण्याची ती खूण होती.

पण सगळीच गणितं चुकत चालली होती.

लंकेच्या गलबतावरील सैनिकी तुकड्यांनी अचानक नांगर उचलले, वल्ही सरसावली आणि ते वेगाने किनाऱ्याच्या दिशेने येऊ लागले. डोलकाठीवरची शिडं त्यांनी पूर्ण फडकावली होती. वाऱ्याचीही त्यांना उत्तम साथ मिळाली होती. काही क्षणांतच गलबतातील सैनिकांकडून दशरथांच्या नेतृत्वाखालील सेनेवर बाणांचा तुफान मारा होऊ लागला. गलबतावरील लंकेच्या धनुर्धाऱ्यांनी दशरथांच्या सेनेची धुळदाण उडवली. गलबतंच किनाऱ्याला येऊन लागतील याची दशरथांच्या सेनेतील कोणत्याही अधिकाऱ्याला अजिबात शक्यता वाटली नव्हती. कारण त्यामुळं गलबतं फुटली असती असा त्यांचा समज होता. अर्थात, ही गलबतं जमीन आणि पाणी या दोन्ही ठिकाणी चालणारी होती. कुबेराच्या कल्पक जहाज बांधणीकारांनी ती बनविली होती. त्यांचे सांगाडे वेगळ्या पद्धतीने बनविले गेले होते. पाण्यातून जमिनीवर येताना गलबताला बसणारा धक्का पेलण्याची क्षमता त्यांच्यात होती. ही गलबतं वेगानं किनाऱ्याकडे येता येता त्यांचा पुढचा रुंद भाग वरपासून केळीचे साल सोलावे तसा उघडून खालपर्यंत उघडला. सामान्य जहाजांचे साधारण सांगाडे नव्हते ते. गलबताच्या तळाला मोठमोठ्या बिजागरींनी ते जोडलेले होते. गलबतं किनाऱ्याला लागली तेव्हा त्यांचा पुढचा भाग तरफेसारखा जहाजापासून उघडून वाळूवर येऊन टेकला. यामुळे गलबतावरील सैनिकांसाठी राजमार्गच मोकळा झाला होता. पश्चिमेच्या देशांतून मागविलेल्या अजस्त्र घोड्यांवर स्वार झालेले लंकेचे घोडदळ भकाभका

ओकल्यासारखे गलबतातून वाळूच्या किनाऱ्यावर उतरले आणि मार्गात येणाऱ्या सगळ्यांची क्रूर कत्तल करत निघाले.

किनाऱ्यावरील आपल्या सैनिकांवर कोसळलेलं संकट पाहाता पाहाता दशरथांच्या अंत:प्रेरणेने त्यांना सैन्याच्या पिछाडीला काहीतरी भयंकर घडत असावं याची जाणीव करून दिली. अंधाधुंद लढत असलेल्या आसपासच्या मानवी समुद्रावरून दशरथांनी डोळे ताणून मागे नेमकं काय चाललंय हे पाहाण्याचा प्रयत्न केला. तेवढ्यात नजरेच्या कोपऱ्यानं डावीकडे चपळाईनं झालेली हालचाल टिपली. क्षणार्धात स्वसंरक्षणार्थ त्यांनी ढाल उचलली आणि लंकेच्या सैनिकाकडून आलेला वार ढालीवर झेलला. गगनभेदी गर्जना करत अयोध्येच्या राजाने हल्लेखोरावर तलवार चालवली. सणसणत चिलखताला भेदून ती त्याच्या शरीरात घुसली. पोट फाटलं अन् लंकेचा तो सैनिक मागल्या मागे कोसळला. त्याच्या फाटलेल्या पोटातून भळाभळा वाहाणाऱ्या रक्ताबरोबर चिकट गुलाबी रंगाची आतडी घाईघाईनं बाहेर सटकली. त्याला तिथेच रक्ताच्या थारोळ्यात मरण्यासाठी सोडून दशरथ जेव्हा पुढे निघाले तेव्हा त्यांच्या मनात दयेचा लवलेशही नव्हता.

'नाही!' ते किंचाळले. त्यांनी जे पाहिलं ते एका शक्तिशाली योद्ध्याचे हृदय भंगण्यासाठी पुरेसं होतं.

करछप किल्याच्या बाजूने लंकेच्या क्रूर धनुर्धाऱ्यांकडून आणि सैनिकांकडून दशरथांच्या सेनेवर पुढील बाजूने होत असलेल्या हल्लाने आणि भयानक घोडदळाचा मागून झालेल्या हल्ल्याने दशरथांच्या अजेय सैन्याची हिंमत खचत चालली होती. दशरथ अजेय सेनेचे सेनापती होते. आपल्या सेनेची अशारीतीने झालेली दारूण कोंडी कधी पहावी लागेल अशी त्यांनी कधी कल्पनाही केली नव्हती. सप्तसिंधूची सेना इतस्ततः धावत होती. 'नाही!' दशरथ पुन्हा गरजले, 'लढा! आपण अयोध्येचे अजिंक्य सैनिक आहोत! लढा!'

झपाट्यानं वार करून एका घावात दशरथांनी लंकेच्या एका योद्ध्याचं शीर धडावेगळं केलं. रावणाच्या एकामागून एक उसळत येणाऱ्या सैनिकांच्या लोटांचा सामना करण्यासाठी दशरथ जेव्हा वळले तेव्हा त्यांची नजर या सगळ्या विनाशाच्या कर्त्यावर पडली. समुद्रकिनाऱ्याजवळून आपले घोडदळ घेऊन चाललेल्या रावणावर त्यांची नजर पडली. लंकेच्या सैन्यातील तेवढी एकच जागा अयोध्येतील पायदळाने प्रतिहल्ला चढवण्यासारखी होती. आपल्या उत्तम प्रशिक्षित घोडदळासोबत रावण भयानक चीत्कार करत अयोध्येच्या पायदळातील बाहेरील रिंगणातील सैनिकांची क्रूर कत्तल करत सुटला होता. त्याच्या हालचालींचा वेग इतका प्रचंड होता की अयोध्येच्या सैनिकांना पुन्हा रिंगण बनविण्यासाठी वेळच मिळत नव्हता. आता हे युद्ध राहिलं नव्हतं, तो फक्त नरसंहार होता.

आपण युद्ध हारलो हे दशरथांना उमगलं. त्यांचा प्रण होता – हारण्यापेक्षा मृत्यू परवडला. त्यांची शेवटची एक इच्छा बाकी होती. लंकेच्या त्या राक्षसाच्या धडविहीन शिरावर त्यांना थुंकायचं होतं. तेव्हाच त्यांना शांती लाभली असती.

'हांऽऽऽऽ!' त्यांच्यावर झेप घेऊन येणाऱ्या लंकेच्या सैनिकाचा हात मनगटातून छाटताना दशरथ ओरडले. शत्रूला दूर सारत दशरथ पुढे चालले. काहीही करून त्यांना रावणापर्यंत पोहोचायचं होतं. एक ढाल आपल्या पोटरीवर येऊन आदळल्याचं त्यांना जाणवलं. आसपासच्या कोलाहलातूनही हाड तुटल्याचा आवाज त्यांना स्पष्ट ऐकू आला.

सप्तसिंधूचे शक्तीशाली सम्राट गर्जन करत मागे वळले. त्यांची तलवार उसळली आणि लंकेच्या ज्या सैनिकाने युद्धातील नियम मोडून त्यांच्यावर वार केला होता त्याचं डोकं त्यांनी सफाईनं छाटलं. तेव्हढ्यात त्यांना आपल्या पाठीवर जोरदार प्रहार झाल्याचं जाणवलं. तो टाळण्यासाठी त्यांना झटक्यानं वळायचं होतं. पण पोटरीच्या हाडामुळे ते त्यांना जमलं नाही. पुढे कोसळताना त्यांना अणकुचीदार काहीतरी छातीत घुसल्याचं जाणवलं. कुणीतरी त्यांच्या छातीत कट्यार भोसकली होती. पातं आत खोलवर गेल्याचं त्यांना जाणवलं नाही. की ती खोलवर गेली होती पण त्यांना जाणवलं नव्हतं? कदाचित आता त्यांच्या शरीराला वेदना जाणवतच नव्हती.... दशरथांना घेरी आली. डोळ्यांसमोर काळोख दाटून येतोय असं वाटलं. पडता पडता त्यांना जखमी होऊन कोसळणाऱ्या आणखी एका सैनिकाचा आधार मिळाला. समोरासमोर लढणाऱ्या सैनिकांत अंतर फारच कमी उरलं होतं. हळूहळू दशरथांचे डोळे मिटू लागले. मनातल्या मनात ज्या देवावर त्यांची पूरेपूर श्रद्धा होती त्या सूर्यदेवाला त्यांनी आळवलं, जगाचा पोषणकर्त्या शक्तीशाली सूर्यदेवा!

देवा, हे सगळं पाहाण्यासाठी मला जिवंत ठेवू नकोस. सूर्यदेवा मला मृत्यू द्या, मला मृत्यू द्या.

तो विनाशच होता.

घाबरलेले अश्वपती आपल्या श्रेष्ठ योद्ध्यांसोबत घोड्यांवर स्वार होऊन रणक्षेत्राकडे निघाले. करछप किल्यापर्यंत पोहोचण्यासाठी त्यांना शवांच्या गर्दीतून वाट काढावी लागत होती. करछप किल्ल्याच्या आसपास चाललेल्या लढाईच्या धुमश्चक्रीतच कुठेतरी मृत..... नाही नाही, गंभीररीत्या जखमी स्थितीतील दशरथ मिळतील अशी शक्यता होती.

आपण युद्ध हरलो हे अश्वपती समजून चुकले होते. त्यांच्या नजरेसमोरच सप्तसिंधूचे बरेचसे योद्धे या भीषण नरसंहारात बळी पडले होते. अश्वपती आता केवळ सम्राटांना वाचवू इच्छीत होते. आणि सम्राट त्यांचे जावई होते. त्यांची कैकयी विधवा नाही होणार.

युद्धक्षेत्रात पुढे जाण्यासाठी त्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागत होता. करछप किल्याच्या तटावरून होत असलेल्या बाणांच्या वर्षावापासून स्वतःला वाचविण्यासाठी त्यांनी एका हाताने ढाल उंच धरली होती.

‘त्या तिथे....’ एक सैनिक ओरडला.

दशरथांचं निःस्पंद शरीर दोन मृत सैनिकांच्या शवाखाली पडलेलं अश्वपतींना दिसलं. त्यांच्या जावयानं अजूनही हातात तलवार गच्च धरलेली होती. कैकय नरेश लागलीच घोड्यावरून उतरले. त्वरित इतर दोन सैनिक त्यांना आडोसा द्यायला धावले. अश्वपती दशरथांना ओढत आपल्या घोड्यापाशी घेऊन आले. सम्राटांचं जखमी शरीर त्यांनी घोड्याच्या पाठीवर जीनवर टाकलं, उडी मारून ते स्वतःही घोड्यावर स्वार झाले आणि काटेरी झुडुपांच्या रस्त्याने परतू लागले. ते इतक्या वेगाने निघाले होते की बरोबरीच्या योद्ध्यांना त्यांच्या सोबत रहाण्यासाठी आटापिटा करावा लागत होता. काटेरी झुडुपं जिथे संपली होती तिथे महाराणी कैकयी आपल्या रथात दृढपणे बसून होत्या. कौतुक करावं एवढ्या त्या शांत होत्या. वडिलांचा घोडा जवळ आला तेव्हा त्यांनी पुढे होऊन दशरथांचे पालथे शरीर रथात खेचून घेतले. शरीरात कित्येक बाण रुतलेल्या वडिलांकडे वळून पाहायसाठीसुद्धा त्या थांबल्या नाहीत. लगाम हाती घेतला आणि

आपल्या रथाला जुंपलेल्या चारही घोड्यांना हाकलं.

'व्हॉ! हल्या!' कैकयींनी हाकारा दिला. काटेरी झुडुपांमधून त्यांनी जेव्हा रथ हाकला तेव्हा दोन्ही बाजूंनी घोड्यांची शरीरं काट्यांनी उलत गेली. त्या गरीब प्राण्यांची चामडी आणि थोडं मांसही काट्यांनी क्रूरपणे सोलून काढलं. तरीही कैकयी त्यांना चाबकानं आणखी, आणखी फटकारत राहिल्या. रक्तबंबाळ झालेले आणि थकलेले घोडे शेवटी एकदाचे त्या काटेरी जंगलापलीकडे खुल्या मैदानात पोहोचले.

कैकयींनी लगाम खेचले आणि मागे पहिलं. काटेरी जंगलापलीकडे रावणाच्या सेनेतील काही घोडेस्वार त्यांच्या वडिलांचा आणि त्यांच्या सोबतच्या योद्ध्यांचा पाठलाग करत होते. आपल्या वडिलांना नेमकं काय अभिप्रेत होतं ते लगेच कैकयींच्या लक्षात आलं. ते रावणाच्या सैनिकांना तिच्या विरुद्ध दिशेला घेऊन चालले होते.

सूर्य मध्यान्हीला येऊ घातला होता. दुपार होण्यातच होती.

कैकयींनी सूर्याला बोल लावत म्हटलं, "धिक्कार सूर्य देवा!आपल्या समर्पित भक्ताचं आपण हे असं कसं होऊ दिलं?"

बेशुद्ध पतीच्या शेजारी त्या गडघे टेकून बसल्या. आपल्या अंगवस्त्राचा एक मोठा तुकडा त्याने फाडून काढला आणि दशरथांच्या छातीवरच्या खोल जखमेभोवती करकचून बांधला. त्या जखमांतून भळाभळा रक्त वाहात होतं. वाहाणारा तो रक्तप्रवाह काही प्रमाणात कमी झाला हे पाहिल्यानंतर कैकयी पुन्हा उभ्या राहिल्या. त्यांनी लगाम हाती घेतले. त्यांना धाय मोकलून रडायचं होतं. पण ती वेळ रडत बसण्याची नव्हती. आधी त्यांना आपल्या पतीचे प्राण वाचवायचे होते. त्यांना आता विवेकानं वागायला हवं.

कैकयींनी घोड्यांवर नजर टाकली. त्यांच्या शरीरातूनही रक्ताचे झरे वाहात होते. काटे घुसलेल्या ठिकाणी मांसाचे बारीक तुकडे बाहेर निघाले होते. घनदाट काटेरी उंच झुडुपांमधून रथ ओढून आणल्यामुळे ते प्रचंड दमून धापा टाकत होते. पण आत्ता त्यांना विश्रांती देणं कैकयींना परवडणारं नव्हतं. निदान काही वेळ तरी.

'माफ करा मला!' चाबूक उगारता उगारता त्या म्हणाल्या. हवेत फिरणाऱ्या चाबकाचा आवाज आला आणि क्षणात तो घोड्यांच्या पाठीवर क्रूरपणे बरसला. माफी मागत असल्यासारखे घोडे खिंकाळले पण जागचे हालले नाहीत. कैकयींनी फटकाऱ्यांची सरबत्ती केली तेव्हा ते पुढे निघाले.

'चला!' कैकयींनी म्हटलं. घोड्यांनी प्रचंड वेगानं धावावं म्हणून कैकयी घोड्यांवर क्रूरपणे पुन्हा पुन्हा चाबकांचे फटकारे मारत राहिल्या.

त्यांना आपल्या पतीचे प्राण वाचवायलाच हवेत.

अचानक एक बाण सूंसाटत आला आणि रथाच्या पुढल्या भागात रुतला. दचकून कैकयी वळल्या. रावणाचा एक घोडेस्वार अजूनही त्यांचा पाठलाग करत होता.

मागे वळून कैकयींनी पुन्हा चाबूक फटकारला, 'वेगाने! आणखी वेगाने!!'

बेधुंद होऊन जरी कैकयी घोडे हाकत होत्या तरी थोडं सरकून पतीला आपल्या शरीराचा आडोसा देण्याचं भानही त्यांना होतं.

निःशस्त्र स्त्रीवर हल्ला न करण्याचं स्त्रीदाक्षिण्य रावणाच्या राक्षसांमध्येही असेलच.

सूंसाटत आलेला बाण पाठीत घुसण्याआधी कैकयींना त्याचा सूंकार ऐकू आला. बाणाचा

धक्का एवढा जोरदार होता की कैकयींचं धड पुढे आणि डोकं मागे फेकलं गेलं. त्यांच्या डोळ्यांसमोर काजवे तरळले. वेदनेनं कैकयी विव्हळल्या. पण लगेच त्यांनी स्वतःला सावरलं. वेदनेमुळे अंगांगांतून वाहू लागलेल्या चेतनेनं त्यांना लक्ष केंद्रित करायला मदत केली. घोड्यांवर पुन्हा चाबूक चालवताना त्या किंचाळल्या, 'हल्याऽऽऽ'

आणखी एक बाण तिच्या कानांजवळून सणाणत गेला. त्यांच्या डोक्याची मागची बाजू तसूभराच्या फरकानं वाचली. खाचखळग्यांनी भरलेल्या रस्त्यावरून धावणाऱ्या रथामुळे दशरथांच्या वारंवार धक्के खाणाऱ्या निश्चेष्ट शरीरावर त्यांनी नजर टाकली अन् पुन्हा उद्गारल्या –

'वेगानं! आणखी वेगानं धावा!'

दुसरा बाण येत असल्याचा आवाज त्यांना ऐकू आला आणि लागलीच येऊन घुसलेल्या बाणाने त्यांची तर्जनी छाटली. एखाद्या खड्यासारखी तुटलेली तर्जनी बाजूला पडली. अचानक ढिल्या पडलेल्या पकडीमुळे चाबूक त्यांच्या हातून गळून पडला. आता आणखी होणाऱ्या जखमांसाठी त्यांचं मन तयार झालं, त्यांच्या शरीरानं वेदना सहन करण्यासाठी स्वतःला तयार केलं. त्या अजिबात किंचाळल्या नाहीत किंवा रडल्याही नाहीत.

पटकन् वाकून त्यांनी डाव्या हाताने चाबूक उचलला आणि रक्ताळलेल्या उजव्या हाताने लगाम धरले. पुन्हा त्यांचं यंत्रवत अचूक चाबूक फटकारणं सुरू झालं.

'धावा! तुमच्या राजाचे प्राण धोक्यात आहेत!'

आणखी एका बाणाचा सुंकार कैकयींना ऐकू आला. आणखी एक वार झेलण्यासाठी त्यांनी स्वतःला तयार केलं. पण यावेळी त्यांना वेदनेची किंकाळी मागून ऐकू आली. पटकन् नजर टाकली तेव्हा त्यांना समजलं की आपला शत्रू घायाळ झालाय. बाण त्याच्या उजव्या डोळ्यात खोलवर रुतला होता. घोडेस्वारांची एक टोळी आपल्याला येऊन मिळत असल्याचंही तिच्या लक्षात आलं. तिचे वडील आणि त्यांचे निष्ठावंत योद्धे आता तेथे येऊन पोहोचले होते. बाणांच्या वर्षावानं लंकेच्या त्या हल्लेखोराला घोड्यावरून खाली आणलं पण त्याचा पाय रिकिबीत अडकला. धावत्या घोड्यानं कित्येक मीटरपर्यंत त्याला फरफटत नेलं. रस्त्यावरच्या सगळ्या उंचवट्यांवर त्याचं डोकं धडकत गेलं.

कैकयींनी पुन्हा आपली नजर समोर नेली. आपल्याला जखमी करणाऱ्या माणसाच्या अशा क्रूर अंताचा आनंद अनुभवण्यास त्यांच्याजवळ अजिबात वेळ नव्हता.

दशरथांना वाचवायला हवं.

मग त्यांच्या हातातला चाबूक अविश्रांत फटकारत राहिला. घोड्यांना चिथावणी मिळत राहिली – 'धावा वेगाने! आणखी वेगाने!'

निलंजना अविश्रांत बाळाची पाठ थोपटत होत्या. बाळ अजून श्वास घेत नव्हता.

'चल! श्वास घे!'

पडल्या पडल्या महाराणी कौसल्या उत्सुकतेनं पाहात होत्या. खूप काळ द्याव्या लागलेल्या वेणांनी त्या अगदी थकून गेल्या होत्या. कोपरांवर धड उचलण्याचा त्यांनी प्रयत्न केला. निलंजनाला त्यांनी विचारलं, 'काय झालं? माझ्या बाळाला काही झालंय का?'

मागे उभी राहून पाहात असलेल्या सेविकेला निलंजनांनी सूचना दिल्या, 'महाराणींची पाठ टेकव. पडून रहायला त्यांना मदत कर.' सेविकेनं महाराणींना आधार देऊन त्यांची पाठ मंचकावर टेकायला मदत केली. श्रमानं शक्तिहीन झालेल्या कौसल्यांनी मंचकावर पाठ

टेकविण्यास नकार दिला. म्हणाल्या, ‘माझ्याकडे द्या त्याला!’

‘महाराणी .....’ कुजबुजत निलंजना म्हणाली. बोलता बोलता त्यांचे डोळे डबडबून आले.

‘त्याला आमच्याकडे द्या!!’

‘मला वाटतं असं करणं ठीक नहीं....’

‘त्याला आमच्याकडे द्या!’ आज्ञा टाळता येऊ नये अशी जरब महाराणींच्या आवाजात होती.

लगबगीनं निलंजना त्यांच्या जवळ गेली आणि तिने ते निस्पंद बाळ कौसल्येशेजारी ठेवलं. महाराणींनी आपल्या निस्पंद मुलाला छातीशी धरलं. त्याच क्षणी बाळानं हालचाल केली. कौसल्यांचे लांब केस त्यानं आपल्या बाळमुठीत पकडले.

‘राम!’ कौसल्यांनी हाक मारली.

मोठ्या परिश्रमानं मोठ्या आवाजात रडत रामनं या अवतारातील पहिला श्वास घेतला. ‘राम!’ कौसल्यांनी पुन्हा एकदा हाक मारली. त्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहात होते.

राम पूर्ण ताकदीनिशी रडत होता. आपल्या छोट्या हातातली संपूर्ण ताकद एकवटून त्यानं आईचे केस धरून ठेवले होते. मग त्यानं तोंड उघडलं आणि तो दूध पिऊ लागला.

निलंजनांचा आनंद फुटलेल्या धरणातून वाहाणाऱ्या पाण्यासारखा धो धो वाहात होता. आनंदानं त्या लहान मुलासारख्या हमसून हमसून रडू लागल्या. त्यांच्या मालकिणींनी मुलाला जन्म दिला होता! राज्याचा वारस जन्मला होता!

अशा आनंदधुंद अवस्थेतही निलंजनांना आपल्या प्रशिक्षणाचा विसर पडलेला नव्हता. जन्मवेळेच्या अचूक नोंदीसाठी कक्षातील दूरच्या एका कोपऱ्यात ठेवलेल्या प्रहरपात्राकडे त्यांनी नजर वळवली. राज ज्योतिषांना त्याची गरज लागेल हे तिला ठाऊक होतं.

वेळ पाहिली आणि ती श्वास घेणं विसरली.

रुद्रदेवा, दया करा!

ठीक मध्यान्हीची वेळ होती ती!

‘याचा अर्थ काय होतो?’ निलंजनानं विचारलं.

राज ज्योतिषी स्तिमित होते. ते स्थिर बसून राहिले.

क्षितिजावर सूर्य मावळण्याच्या बेतात होता. कौसल्या आणि राम दोघेही गाढ झोपी गेले होते. निलंजनाला शेवटी राजज्योतिषांच्या कक्षात जाण्यास वेळ मिळाला. रामाच्या भविष्याबद्दल जाणून घेण्यासाठी ती राजज्योतिषांकडे आली होती. ती म्हणाली,

‘आपण म्हणाला होतात की मध्यान्हीआधी जर त्याचा जन्म झाला तर एका महान राजाच्या रूपात इतिहासात त्याची नोंद होईल. आणि मध्यान्हीनंतर जर त्याचा जन्म झाला तर त्याला दुर्भाग्याला तोंड द्यावं लागेल. व्यक्तीगत जीवनात त्याला सुख लाभणार नाही.’

‘त्याचा जन्म ठीक मध्यान्हीला झाला हे तुला नक्की ठाऊक आहे ना?’ राज ज्योतिषांनी निलंजनांना विचारलं, ‘त्या आधीही नाही आणि नंतरही नाही?’

‘हो तर! मी अगदी खात्रीपूर्वक सांगते. ठीक मध्यान्हीला जन्मला तो!’

राज ज्योतिषांनी खोल श्वास घेतला. पुन्हा ते विचारमग्न झाले.

‘याचा अर्थ काय होतो?’ निलंजनांनी पुन्हा विचारलं, ‘काय लिहून ठेवलंय त्याच्या भाग्यात?

तो महान राजा बनेल की त्याच्या वाट्याला दुर्भाग्य येईल?'

'मला माहीत नाही.'

'तुम्हाला माहीत नाही म्हणजे काय?'

'म्हणजे मला माहीत नाही,' राजज्योतिषी म्हणाले. आपली चिडचिड त्यांना लपविता आली नाही.

निलंजना खिड़कीबाहेर पाहू लागल्या. बाहेर कित्येक एकरांपर्यंत राजवाड्याची बाग फुललेली होती. राजवाडा अयोध्येतील सर्वात उंच ठिकाणी, टेकडीवर होता. नगराच्या तटापलीकडील पाण्याकडे शून्य दृष्टी लावून पाहात असल्या तरी निलंजनांना आता काय करायला हवं हे ठाऊक होतं. जन्मवेळ नोंदणं ही केवळ त्यांचीच जबाबदारी होती. आणि ती मध्यान्हीची वेळ होती याची नोंद ठेवणं 'गरजेचं' नव्हतं. कुणाच्या लक्षात आलं असतं? त्यांनी आपल्या मनाशी निर्णय घेतला– राम मध्यान्हीआधी एक मिनिट जन्माला आला.

ती राज ज्योतिषांकडे वळली. म्हणाली, 'बाळाच्या जन्मवेळेबद्दल आपण गुप्तता बाळगाल.'

खरं तर निलंजनाला ही खबरदारी बाळगण्याची गरज नव्हती. राज ज्योतिषिसुद्धा कौसल्यांच्या माहेरच्या राज्यातील होते. त्यांना याबद्दल खात्री पटवून देण्याची गरजच नव्हती. निलंजनांसारखेच ते सुद्धा निष्ठावंत होते.

'अर्थातच', ते म्हणाले.

# प्रकरण 4

महर्षी वशिष्ठ दुर्गाच्या प्रवेशद्वारापाशी येऊन पोहोचले. त्यांच्यामागून आदरपूर्ण अंतर राखून चालणारे त्यांचे अंगरक्षकही होते. त्यांच्यावर नजर पडली अन् एवढ्या सकाळी राजगुरू कोठे चालले असावेत याबद्दल द्वारपालांना आश्चर्य वाटलं.

द्वारपालांच्या प्रमुखानं या महान विद्वानाला लवून नमस्कार केला आणि आदरानं तो बोलला, 'प्रणाम महर्षी.'

त्याच्या अभिवादनाचा मान लववून स्वीकार करून वशिष्ठ चालत राहिले.

सडपातळ बांधा आणि उंच शरीरयष्टी असलेल्या महर्षी वशिष्ठांच्या चालीत मार्दव आणि आत्मविश्वास होता. त्यांनी पवित्रतेचं प्रतीक असलेल्या पांढऱ्या रंगाचं धोतर आणि त्याच रंगाचं उत्तरीय पेहेरलं होतं. केशवपन केलेल्या डोक्यावर बांधलेली शेंडीची गाठ त्यांच्या ब्राह्मणत्वाची परिचायक होती. झुलती, लांब, सफेद दाढी, शांत-सौम्य नजर आणि सुरकुतलेल्या चेहऱ्यावरील विद्वत्तेची झांक त्यांच्या आंतरिक तेजाचं प्रतिबिंबच होतं.

पण अजेय नगरी अयोध्येच्या तटबंदीला घेरणाऱ्या विशाल कालव्याच्या दिशेने जाताना वशिष्ठ आपल्याच विचारांत गुंग होते. त्यांना जे समजलं होतं त्याबाबतीत नेमकं काय करावं याचा ते विचार करत होते.

सहा वर्षांपूर्वी रावणाच्या क्रूर सेनेनं सप्तसिंधूच्या सेनेची धुळदाण उडवली होती. त्यामुळे सप्तसिंधूच्या सेनेची प्रतिष्ठा धुळीला मिळाली होती तरी आजपर्यंत उत्तरेच्या कोणत्याही राज्याने अयोध्येला आव्हान दिलेलं नव्हतं. त्या दुर्दैवी दिवशी त्यांच्या सर्व अधीनस्थ राज्यांचीही वाताहात झाली होती. स्वतःला सावरण्यात गुंग असलेल्या त्यांच्यापैकी कोणत्याही राज्यानं म्हणूनच कमजोर अयोध्येला आव्हान दिलेलं नव्हतं. सप्तसिंधूच्या राज्यात जरी पहिल्यासारखी सुबत्ता नव्हती आणि त्यांच्या दराऱ्यालाही जरी गालबोट लागलं होतं तरी आजपावेतो दशरथच सप्तसिंधूचे सम्राट होते.

निर्दयी रावणानं अयोध्येकडून आपल्याला हव्या त्या अटी मान्य करवून घेतल्या होत्या. अपमानास्पद पराजयाच्या घटनेनंतर लंकेकडून दिल्या जाणाऱ्या वात्तीय करात एकतर्फी एक दशांशाची टक्के कपात केली गेली होती. त्याबरोबरच, सप्तसिंधू प्रदेशातून आता कमी किंमतीत वस्तु खरेदी केल्या जात असत. परिणामी, यादरम्यान लंकेची जरी सांपत्तिक भरभराट झाली असली तरी उत्तर भारतातील अयोध्या आणि इतर राज्ये गरीबीच्या दलदलीत रुतत गेली होती. आणि लंकेबद्दल मात्र - 'तेथील रस्तेसुद्धा सोन्यानं मढवलेले आहेत!' यासारख्या अफवा पसरलेल्या होत्या.

वशिष्ठांनी हात उंचावून आपल्या अंगरक्षकांना ते होते तिथेच उभे राहण्याचा इशारा केला. विशाल कालव्याच्या दिशेने तोंड करून असलेल्या महालाच्या सावलीत असणाऱ्या गच्चीत महर्षी वशिष्ठ पोहोचले. नजर उंचावून त्यांनी संपूर्ण कालव्यावर बांधलेल्या अप्रतीम गच्चीवर नजर टाकली. मग त्यांची नजर अथांग पसरलेल्या कालव्याच्या जलाशयावर गेली. एके काळी हा जलाशय अयोध्येच्या विपुल संपन्नतेचं प्रतीक होता, पण आता त्यातून गरीबी आणि ऱ्हासाची

लक्षणं व्यक्त होऊ लागली होती.

काही शतकांपूर्वी, सम्राट अयुतायुसांच्या शासनकाळात उग्र शरयू नदीचं पाणी खेचून हा कालवा बांधला गेला होता. त्यावेळी त्याचे आकारमान भव्य होते. पन्नास किलोमीटर्सहून अधिक असलेला त्याचा विस्तीर्ण घेर अयोध्येच्या तिसऱ्या आणि शेवटच्या तटाच्या भिंतीपर्यंत पसरलेला होता. आणि किनाऱ्यापासूनची त्याची रुंदीसुद्धा जवळ जवळ अडीच कि.मी. पेक्षा अधिक होती. या कालव्याची साठवण क्षमता प्रचंड होती. निर्माणानंतरच्या सुरवातीच्या काही वर्षांत पात्राच्या खालच्या अंगाला असलेल्या राज्यांनी पाण्याच्या तुटवड्याबद्दल तक्रारी केल्या होत्या. पण अयोध्येच्या शक्तीशाली योद्ध्यांनी त्यांच्या तक्रारी पार चिरडून टाकल्या होत्या.

या कालव्याचा एक मुख्य हेतु सैन्याशी निगडीत होता. एका अर्थी हा कालवा खंदक होता. त्याच्यामुळे किल्याला चारही बाजूंनी संरक्षण प्राप्त झालं होतं. संभाव्य हल्लेखोरांना या खंदकातून वल्ही चालवत नदीसारख्या रुंदीचा या कालवा ओलांडावा लागत असे. आणि हे वेडं साहस करणाऱ्या वीरांना कालव्याचं पात्र ओलांडताना कोणताही अडोसा नसल्यामुळे अजेय नगरी अयोध्येच्या तटावरून चोवीस तास धडाडत असणाऱ्या तोफांच्या माऱ्याला बळी पडावं लागत असे. या कालव्यावर चार मुख्य दिशांना चार पूल बांधलेले होते. किल्याच्या बाहेरील तटबंदीत या पुलांवरून नगरात प्रवेशासाठी पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण या चार दिशांना चार भक्कम प्रवेशद्वारे बनवलेली होती. प्रत्येक पूल दोन भागात विभागलेले होते, प्रत्येक भागात मनोरा आणि उचल-पाड करता येणारे पूल होते. ज्यान्वये कालव्याच्या ठिकाणीच किल्याला दुहेरी संरक्षणाची व्यवस्था केली गेली होती.

तरीही, या प्रचंड कालव्याला केवळ संरक्षण व्यवस्था मानणं चूक ठरलं असतं. अयोध्यावासियांसाठी हा कालवा एक धार्मिक प्रतीक होता. तो विशाल कालवा आणि त्यातील गूढ-गहिरं संथ पाणी त्यांना समुद्राची आठवण करून देत असे. अब्जावधी वर्षांपूर्वीच्या याच पौराणिक, अतिप्राचीन, आदिम शून्यभारित समुद्राच्या मध्यभागी या ब्रह्मांडाची निर्मिती झाली होती. अब्जावधी वर्षांपूर्वी एकाचा प्रचंड मोठा विस्फोट होऊन त्यातून अनेकाची निर्मिती झाली होती. आणि त्यातूनच निर्मितीच्या चक्राला चालना मिळाली होती.

आधुनिक युगात ज्याला परमपिता किंवा ब्रह्म म्हटले जाते त्या निराकार एकाचे अभेद्य नगरी अयोध्यानिवासी स्वतःला या विश्वातील प्रतिनिधि समजत असत. प्रत्येक जीवात, मग तो सजीव असो वा निर्जीव त्या परमपित्या ब्रह्माचा वास असतो असं ते मानत असत. काही पुरुष आणि महिला या अंतरात्म्याला जागृत करू शकत असत आणि त्यामुळे देव पदाला पोहोचू शकत असत. अशा रीतीने देव पदाला प्राप्त झालेल्या लोकांची अयोध्या नगरीत भव्य मंदिरे उभारली गेलेली होती. अयोध्यानगरीतील विशाल कालव्यात बेटं बनवून त्यावरसुद्धा अशी मंदिरे बांधलेली होती.

अर्थात, गुरु वशिष्ठ जाणून होते की या कालव्याच्या निर्मितीमागची कारणे अतिशय रोकठोक, रुक्ष असून ती अशा सांकेतिकता आणि अद्भुतरम्यता यांच्या पलीकडे जाणारी आहेत. वेगवान शरयू नदीला येणाऱ्या पुराच्या पाण्यावर नियंत्रण राखण्यासाठी यातील द्वारांचा उत्तम रीत्या उपयोग करून घेणे हाच या कालव्याच्या निर्मितीमागचा प्रमुख हेतू होता. पूर येणे ही त्याकाळी उत्तर भारतातील नेहमीची समस्या होती.

एरवी नदीतून पाणी काढण्याऐवजी कालव्याच्या शांत, सौम्य पात्रातून पाणी काढणं तसं सोपं

होतं. मोठ्या कालव्यांमधून काढलेल्या छोट्या कालव्यांनी संपूर्ण अयोध्या नगरीत पाणी खेळवलं जात असे. यामुळे शेती उत्पादनात अभूतपूर्व वाढ झाली होती. शेती उत्पादन वाढल्यामुळे कित्येक शेतकऱ्यांना जमीन कसण्याच्या कामातून मुक्तता मिळाली होती. कारण कौसल राज्यातील प्रचंड जनसंख्येला अन्नपुरवठा करण्यासाठी केवळ काही शेतकऱ्यांची मेहनत पुरेशी पडू लागली होती. शेतीकामातून उसंत मिळालेल्या मजूर वर्गाला कुशल सैन्य अधिकाऱ्यांनी उत्तम प्रशिक्षण देऊन सैन्यात भरती करून घेतलं होतं. त्यामुळे अयोध्येकडे उत्तम सेना तयार झाली होती. या सैन्यानं आसपासचे बरेच प्रदेश जिंकून घेतले. आज अयोध्येचा राजा असणाऱ्या महाराज दशरथांचे आजोबा महान सम्राट रघू यांनी आपल्या कारकिर्दीत संपूर्ण सप्त सिंधू प्रदेश जिंकून घेतला होता आणि ते चक्रवर्ती सम्राट बनले होते.

अशा प्रकारे कौसल राज्यात धनवर्षा होऊ लागली तेव्हा तेथे बांधकामांची जणू लाट आली. मोठमोठी मंदिरं, राजवाडे, सार्वजनिक स्नानगृहं, नाट्यगृहं आणि बाजारपेठा बांधल्या गेल्या. दगडांनी रचलेल्या कवितांसारख्या या भव्य इमारती अयोध्येच्या शक्ती आणि संपननतेची साक्षच देत असत. मोठ्या कालव्याच्या अलीकडील किनाऱ्यावर बांधलेली भव्य गच्ची ही अशा इमारतींपैकी एक. गंगा नदीपलीकडच्या प्रदेशातून आणलेल्या लाल रंगाच्या वाळूच्या विटांनी बांधलेल्या या गच्चीचा विस्तार खांबांच्या आधारे उभा केला होता. विशाल कालवा पाहाण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना सावली मिळावी म्हणून या गच्चीवर सुंदर नक्षीकाम केलेलं होतं. संपूर्ण गच्ची रंगीबेरंगी चित्रांनी सजवलेली होती. त्यात इंद्रदेव आणि इतर देवांच्या गोष्टी आणि अयोध्येवर राज्य करणाऱ्या पहिल्या महाराज इक्ष्वाकुंपासून सगळ्या राजांची माहिती सांगणारी चित्रं रेखाटलेली होती. छत वेगवेगळ्या भागात विभागलेलं होतं. प्रत्येक भागाच्या केंद्रस्थानी तळपत्या सूर्याचं चित्र कोरलेलं होतं. या सूर्याची किरणं चारही दिशांना फाकलेली दाखवली होती. सूर्याचं प्रतीक घेतलेलं होतं कारण अयोध्येचे राजे सूर्यवंशी होते. सूर्यदेवाचे वंशज. सूर्याप्रमाणेच त्यांची शक्तीसुद्धा दिगंत फैलावलेली होती. राक्षस कुलातील लंकेच्या राजाने पहिल्याच हल्ल्यात अयोध्येच्या सेनेला गारद करण्याआधीपर्यंत म्हणा हवं तर.

कालव्यात कृत्रीम बेटांची एक साखळी बनवलेली होती. त्यातील एका बेटावर मुनी वशिष्ठांची नजर स्थिरावली. या बेटावर इतर बेटांसारखं मंदिर नव्हतं. यावर तीन अजस्त्र संगमरवरी मूर्ती पाठीला पाठ लावून उभ्या केलेल्या होत्या. त्यांची तोंडे तीन दिशांना होती. त्यापैकी एक मूर्ती विश्वनिर्मात्या ब्रह्मदेवाची होती. जगातला तो सर्वश्रेष्ठ वैज्ञानिक म्हणायला हवा.. कित्येक शोधांचं श्रेय त्यांना दिलं जातं आणि त्यांच्या या शोधांवरच वैदिक संस्कृती बेतलेली आहे. त्यांनी घालून दिलेल्या नियमांनुसार म्हणजे ज्ञानाचा निरंतर शोध घेत आणि समाजाची निष्काम सेवा करत त्यांचे अनुयायी जीवन कंठत असतात. यांनाच काही काळानंतर ब्रह्म जात (ब्रह्मापासून जन्न झालेले) किंवा ब्राह्मण म्हटलं जाऊ लागलं.

या मूर्तीच्या उजव्या बाजूला भगवान परशुरामांची मूर्ती होती. समाज जेव्हा अकार्यक्षम, भ्रष्ट बनतो, किंवा जेव्हा धर्म बोकाळतो तेव्हा एका नव्या नेत्याचा उदय होतो जो आपल्या लोकांचं मार्गदर्शन करतो आणि त्यांचं जीवनमान सुधारतो. उत्तमाचा प्रसार करणाऱ्या अशा महान नेत्याला विष्णु म्हटलं जायचं. देवांसारखीच विष्णूंचीही पूजा केली जात असे. क्षत्रीय युगात भयंकर हिंसा माजल्यामुळे विष्णूने परशुरामाच्या अवतारात कित्येक शतकांआधी भारताला क्षत्रियांच्या वर्चस्वातून मुक्त केलं होतं. ब्राह्मणयुगात किंवा ज्ञानयुगातही त्यांचा वावर दिसून

येतो.

भगवान परशुरामांनंतर आणि ब्रह्मदेवाच्या डाव्या बाजूला त्रिदेवांच्या मूर्तीला पूर्णत्व देणारी रूद्र देवांची मूर्ती होती. रुद्रदेव म्हणजे पूर्वीचे महादेव. वाइटाचा अंत करणाऱ्यांना ही पदवी पुराणकाळी दिली जात असे. महादेवाचं काम मानवजातीला नव्या जीवनपद्धतीचं मार्गदर्शन करण्याचं नव्हतं. ती विष्णुंची जबाबदारी होती. महादेवांचं काम वाइटाचा शोध घेऊन त्याचा नाश करणं हेच होतं. वाइटाचा नाश झाला की चांगल्याचा आपोआप नव्या जोमाने विकास होतो. विष्णुंचे मूळ भारतातच होते पण महादेवांचे बहुधा तसे नसावे. याचे एक कारण असेही असू शकते की, जर ते भारतातील कोणत्याही भागातील असते तरी या महान देशातील त्या भागाबद्दल त्यांच्या मनात ओढा राहिला असता आणि त्यांच्या कामाच्या दृष्टीने ते योग्य ठरले नसते. वाइटाची निष्पक्ष परीक्षा करण्यासाठी, त्याचा उदय कधी झाला हे अलिप्तपणे पाहाण्यासाठी त्यांचं मूळ इथलं असून चालणार नव्हतं. रुद्रदेवांचं मूळ स्थान भारताच्या पश्चिम सीमेबाहेरील ‘परीहा’ क्षेत्रातील होतं.

वर्तमान वैदिक जीवन पद्धतीचा पाया असणाऱ्या या भव्य त्रिदेवांना वंदन करण्यासाठी गुडघ्यावर बसून वशिष्ठ मुनींनी कपाळ जमिनीला टेकवलं. मग डोकं वर उचलून त्यांनी हात जोडून नमस्कार केला.

‘हे पवित्र त्रिदेवा, मला मार्गदर्शन करा,’ वशिष्ठ मुनी पुटपुटले, ‘कारण मी बंड करणार आहे.’

त्रिदेवांवर वशिष्ठ मुनींची नजर टिकलेली असतानाच वाऱ्याची एक मंद झुळुक त्यांच्या कानांभोवती निनादली. संगमरवराची शोभा आता पहिल्यासारखी राहिली नव्हती. अयोध्येच्या स्वामींना आता याची नीट काळजी घेणं शक्य होत नव्हतं. ब्रह्मदेव, परशुराम आणि रुद्रदेवाच्या मुकुटातील सोन्याचा पत्रा सोलवटला होता. गच्चीच्या छतांच्या चित्रांवरून रंग उडू लागले होते. वाळूच्या विटांनी बनलेल्या जमिनीचे कित्येक ठिकाणी टवके उडू लागले होते. विशाल कालव्यात गाळ जमा होऊ लागला होता. आणि त्यामुळे ते सुकत चालले होते. बऱ्याच काळापासून कालव्याच्या या एकूण बांधकामाची अयोध्येच्या स्वामींनी प्रशासन विभागाकरवी डागडुजी करवून घेतली नव्हती. कारण कदाचित अशा कामांवर येणारा खर्च उचलणे आता अयोध्येच्या प्रशासनाला शक्य होत नसावे.

पण वशिष्ठांना समजून चुकलं होतं की शासनाकडे राज्यकारभार चालविण्यासाठी पुरेशी रक्कम नव्हतीच. आणि इच्छाही नव्हती. कालव्याचं पाणी जेव्हा उतरलं तेव्हा मोकळ्या झालेल्या जमिनीवर लोकांनी शिक्षेचं भय न बाळगता अतिक्रमण केलं होतं. दरम्यानच्या काळात अयोध्येची लोकसंख्या वारेमाप वाढली होती. काही वर्षांपूर्वी कालव्यांची एवढी वाईट स्थिती होईल याची कुणी कल्पनासुदधा केली नव्हती आणि आज त्या लोकांच्या अंगवळणी पडल्या होत्या.

परशुरामा, आज जीवनाला नवी दिशा मिळण्याची गरज आहे. माझ्या या महान देशाचं पुनरुज्जीवन देशभक्तांचा घाम आणि रक्त वाहून व्हायलाच हवं. मला जे हवंय ती बंडखोरीच आहे. आणि इतिहासाकडून जोवर न्याय केला जात नाही तोवर कित्येकदा ज्या लोकांसाठी ते काम करायचं ठरवतात त्याच लोकांकडून देशभक्तांवर देशद्रोहाचा आरोप लावला जातो.

गच्चीच्या पायऱ्यांवर कालव्यातून वाहून आलेली माती साचली होती. ती वशिष्ठांनी मुठीत उचलली, पुन्हा सोडली. अंगठ्यावर बसलेल्या मातीचा आपल्या भाळी उभा टिळा लावला.

"ही माती मला माझ्या प्राणांहून प्रिय आहे. माझ्या देशावर माझं प्रेम आहे. जे करण्याची गरज आहे ते मी करेन याची आज मी शपथ घेतो. मला धाडस द्या, देवा!"

वाऱ्यावर स्वार होऊन आलेले नादपूर्ण, मंद मंत्रोच्चार त्यांच्या कानांवर आले. त्यांनी उजवीकडे वळून काय चाललंय ते पाहिलं. थोड्या अंतरापलीकडून काही लोक गंभीरपणे चालले होते. ते देवाच्या पवित्र निळ्या रंगाचे झगे ल्यायले होते. आजकाल अशी दृश्यं दुर्मिळ होत चालली होती. संपत्ती आणि सत्ता मिळत गेली तसतशी सप्तसिंधूतील लोकांची आध्यात्मिक उत्सुकता लोप पावली होती. कित्येकांना वाटू लागलं होतं की त्यांच्या देवानं त्यांना वाऱ्यावर सोडून दिलंय. तसं नसतं तर त्यांचे एवढे हाल का बरं झाले असते?

पूजा करणाऱ्यांनी सहाव्या विष्णूरूपाचा – परशुरामाचा – नामजागर केला.

'राम राम राम बोलो, राम राम राम बोलो, राम राम राम बोलो, राम राम राम बोलो… '

नामाचा जप करायला सांगणारी अतिशय साधीसोपी प्रार्थना.

वशिष्ठांच्या चेहऱ्यावर स्मित उमललं. त्यांच्या मते हा एक शकुन होता.

"धन्यवाद परशुरामा, तुझ्या आशिर्वादासाठी धन्यवाद."

सहाव्या विष्णू अवताराचं नाव ठेवलेल्या अयोध्येच्या सहा वर्षांच्या सगळ्यात मोठ्या राजकुमारावर – रामावर आता त्यांच्या सगळ्या आशा लागून राहिल्या होत्या. महाराणी कौसल्यांनी आपल्या मुलासाठी ज्या 'राम' नावाची निवड केली होती त्यात 'चंद्र' नावाची भर घालण्याचा आग्रह वशिष्ठांनी धरला होता. महाराणी कौसल्येचे पिता दक्षिण कौसलचे राजा भानुमन आणि कुरुंची राणी माहेश्वरी चंद्रवंशी म्हणजे चंद्राचे वंशज होते. रामाच्या आईकडच्या आजोळातील लोकांच्या बाबतीत आपली निष्ठा दाखविणे शहाणपणाचे ठरेल. शिवाय, राम चंद्र म्हणजे 'चंद्राचा सुंदर चेहरा' आणि चंद्र हा सूर्याच्या परावर्तीत किरणांमुळेच प्रकाशित होतो. अगदी कवितेतच सांगायचे झाल्यास सूर्य चेहरा आहे आणि चंद्र त्याचे प्रतिबिंब. मग चंद्राच्या सुंदर चेहऱ्याचं खरं कारण कोण? 'सूर्य!' म्हणूनच रामचंद्र हे नाव योग्य होतं. अशा प्रकारे राम चंद्र सूर्यवंशी नावही होतं कारण त्याचे वडील दशरथ सूर्यवंशी होते.

नावामुळे भाग्य ठरतं असं प्राचीन काळापासून मानलं जातं. आणि म्हणूनच पालक अत्यंत काळजीपूर्वक आपल्या मुलांसाठी नावं निवडतात. एका परीनं नाव मुलांमध्ये स्वधर्म, व्यक्तिनिष्ठित धर्म आकांक्षा इ. जागवतं. या मुलाचं नाव खुद्द विष्णूच्या सहाव्या रूपाचं नाव आहे. आकांक्षा जागृत करण्यासाठी याहून श्रेष्ठ नाव कोणतं असू शकेल?

आणखी एका नावावर वशिष्ठांची आशा टिकून होती – भरत. रामाचा हा भाऊ त्याच्यापेक्षा सात महिन्यांनी लहान होता. रावणाशी झालेल्या युद्धाच्या वेळी भरतच्या आईला, म्हणजे कैकयीला आपल्या पोटात दशरथांचं मूल वाढतंय हे ठाऊक नव्हतं. वशिष्ठांना ठाऊक होतं की कैकयी तापट आणि दुराग्रही स्त्री आहे. ती स्वतः आणि ज्यांना ती आपलं मानते त्यांच्या बाबतीत ती पराकाष्ठेची महत्वाकांक्षी आहे. मोठ्या महाराणी कौसल्यांनी आपल्या मुलाचं नाव ठेवलं तेव्हा कैकयी मागे राहिल्या नाहीत. त्यांनीसुद्धा आपल्या मुलाचं कंकणभर सरसच नाव ठेवलं. सहस्त्रों वर्षांपूर्वी संपूर्ण भारतावर राज्य केलेल्या राजा भरतच्या नावावरून कैकयींनी आपल्या मुलाचं नाव ठेवलं – भरत.

प्राचीन भरत राजानं एकमेकांशी लढणाऱ्या सूर्यवंशी आणि चंद्रवंशी राजांना एका छत्राखाली आणलं होतं. अधून मधून घडणाऱ्या चकमकींकडे दुर्लक्ष करीत ते शांततेनं जगणं शिकले.

त्यांचं उदाहरण आज पाहायला मिळत होतं ते सूर्यवंशी राजा दशरथाच्या दोन राण्यांच्या रूपाने. दशरथ सूर्यवंशी राजा होते आणि महाराणी कौसल्या आणि महाराणी कैकयी चंद्रवंशी होत्या. महाराणी कैकयीचे वडील अश्वपती कैकयचे चंद्रवंशी राजा दशरथांचे अत्यंत विश्वासू सल्लागार होते.

या दोन्हींपैकी एका नावानं उद्दीष्ट नक्की साध्य होऊ शकेल.

पुन्हा एकदा परशुरामाच्या मूर्तीकडे पाहून त्यांनी त्यापासून बळ मिळवलं.

ते मला चूक ठरवतील याची कल्पना आहे मला, कदाचित ते मला शिव्या-शापही देतील. पण देवा, तूच तर म्हणाला होतास, की, नेत्याने स्वत:पेक्षा जास्त आपल्या देशावर प्रेम करावं.

आपल्या अंगवस्त्रात लपविलेली कट्यार वशिष्ठांनी चाचपून पाहिली. मग ती त्यांनी बाहेर काढली आणि तिच्या मुठीवर प्राचीन लिपित कोरलेलं नाव निरखलं – परशुराम!

खोल श्वास घेत त्यांनी कट्यार डाव्या हातात घेतली. उजव्या हाताच्या तर्जनीवर कट्यार खोलवर टोचून रक्त काढलं. जखमेखाली अंगठ्यानं दाब देऊन रक्ताचे काही थेंब कालव्याच्या पाण्यात सोडले.

या रक्ताची शपथ आहे मला. माझे बंड मी यशस्वी करेन किंवा तसे करताना आपल्या प्राणांची आहुती देईन.

वशिष्ठांनी शेवटी एकदा भगवान परशुरामांच्या मूर्तीवर नजर टाकली. डोकं झुकवून वंदन केलं. दोन्ही हात जोडून नमस्कार केला. मग मंद स्वरात भगवान विष्णुंच्या भक्तांसारखं नामस्मरण केलं,

'जय परशुराम!'

'परशुरामांची महिमा अमर राहो!'

# प्रकरण 5

महाराणी कौसल्या आनंदी होत्या, पण माता कौसल्या आनंदी नव्हत्या. रामाने राजमहाल सोडून जायला हवं हे त्यांना समजत होतं पण ज्या दिवशी रामाचा जन्म झाला त्याच दिवशी दशरथांचा रावणाबरोबरच्या युद्धात दारूण पराभव झाला होता. त्यामुळे दशरथांनी त्या पराभवासाठी रामाला दोषी ठरवलं होतं. त्या अशुभ दिवसाआधी कधीही दशरथांचा पराभव झाला नव्हता. ते पूर्ण देशाचे अजेय सम्राट होते. रामाच्या जन्माशी त्याचं पूर्व दुष्कर्म निगडीत आहे आणि महान सम्राट रघूंच्या वंशाला गालबोट लावण्यासाठीच त्याचा जन्म झाला आहे असं त्यांच्या मनानं घेतलं होतं. सर्व तऱ्हेनं दुर्बल कौसल्या याबाबत काहीही करू शकत नव्हती.

पहिल्यापासूनच कैकयी दशरथांची आवडती राणी होत्या. करछपच्या युद्धात त्यांनी दशरथांचे प्राण वाचवले होते तेव्हापासून तर दशरथ पूर्णपणे त्यांच्या कह्यात गेले होते. दशरथांना राम अशुभ वाटतो ही गोष्ट कैकयी आणि त्यांच्या दास-दासींनी शक्य तितक्या वेगात सगळीकडे पसरवली होती. राजा दशरथांना रामाचा जन्म अशुभ वाटत असे. लवकरच अयोध्येतील प्रजेलासुद्धा राजाला वाटतं तसंच वाटू लागलं. लोकांना वाटायचं की रामानं जन्मभर जरी सत्कृत्यं केली तरी '7032चा कलंक' तो कधीही पुसू शकणार नाही. प्रभु मनुंच्या पंचांगानुसार याच वर्षी दशरथाचा युद्धात पराजय झाला होता आणि रामाचा जन्म झाला होता.

म्हणून महाराणी कौसल्यांना वाटत होतं की रामने राजगुरू वशिष्ठांसोबत राजधानी सोडून जाणं चांगलं. अयोध्येच्या कुलीन लोकांपासून तो दूर राहील. या लोकांनी त्याला स्वीकारलंच नाहीय. शिवाय 'वशिष्ठांच्या गुरुकुलात ' राहून घेतलेल्या शिक्षणानं त्याचा फायदाच होईल. तेथे तो तत्वज्ञान, विज्ञान, गणित, नीतिशास्त्र, युद्धकौशल्य, कला इत्यादि विषय शिकेल. 'गुरुकुल ' म्हणजे खरं तर 'गुरुंचं कुटुंब '. पण ते गुरुंचं 'निवासी विद्यालय ' होतं. तेथून काही वर्षांनी तो स्वतःच्या भाग्याचा निर्धारक बनून परतेल.

महाराणींना हे सारं समजत होतं, पण वात्सल्यानं अंतःकरण भरलेल्या आईला मात्र तो आपल्यापासून दूर जाऊ नये असंच वाटत होतं. तिनं रामाला हृदयाशी धरलं अन् ती रडू लागली. आईला आधार देत राम अतिशय संयमानं उभा होता. महाराणी कौसल्या त्याला जवळ घेत होत्या, त्याचे मुके घेत होत्या. पण अत्यंत कोवळ्या वयात सुद्धा राम अत्यंत समंजसपणानं शांत उभा होता.

भरत रामाच्या अगदी उलट होता. तो धाय मोकलून रडत होता. त्याला आपल्या आईला सोडून दूर जायचं नवहतं. कैकयी आपल्या मुलाकडे रागानं पाहात होत्या. म्हणाल्या, 'तू माझा एकुलता मुलगा आहेस. असा दुर्बल नको होऊस. तू राजा होणार आहेस. राजासारखा वाग! जा, आपल्या आईचं मस्तक अभिमानानं उंचावेल असं काही कर!'

हे सगळं पाहून गुरु वशिष्ठ गालातल्या गालात हसत होते. संवेदनशील मुलांच्या भावना अतिशय तीव्र असतात. ती खदखदून हसतात आणि स्फुंदून स्फुंदून रडतात.

लक्ष्मण आणि शत्रुघ्न ही दशरथाच्या चार मुलांपैकी लहान जुळी मुलं आपल्या आईचा हात धरून उभी होती. त्यावेळी त्यांचं वय तीन वर्षांचं होतं. आसपास नेमकं काय चाललंय हे त्यांना

कळत नव्हतं. आपल्या मोठ्या भावांकडे पाहात ते आपलं काम करवून घेण्यासाठी संयमानं वागावं की आकांडतांडव करावं याचा विचार करत होते. अजून ते दोघे खूपच लहान आहेत हे वशिष्ठांना कळत होतं. पण त्यांना मागे सोडून जाणं त्यांना इष्ट वाटत नव्हतं. राम आणि भरतचं शिक्षण पूर्ण व्हायला बरीच वर्षे, कदाचित दशकही लागेल हे त्यांना ठाऊक होतं. या काळात या जुळ्या भावंडांना राजमहालात ठेवण्याची जोखीम त्यांना स्वीकारायची नव्हती. कुलीनांच्या राजकारणी कारस्थानांमुळे छोटे राजकुमार वेगवेगळ्या गटांत ओढले गेले असते. सतत कारस्थानं करण्यात गुंतलेल्या या कुलीनांनी आपलं उखळ पांढरं करण्यासाठी अयोध्येला आत्ताच वेठीला धरलं होतं. त्यांच्या या कुटील कारस्थानांमुळे अयोध्या नगरी रक्तबंबाळ झाली होती. या सगळ्यांवर नियंत्रण ठेवणारे सम्राट मात्र अशक्त आणि निरिच्छ झाले होते.

उन्हाळ्यात आणि हिवाळ्यात असे दोन वेळा उत्तरायण आणि दक्षिणायन काळी नऊ-नऊ दिवसांच्या सुट्टीवर राजकुमार आपल्या घरी परतणार होते. आपल्या प्रवासाची दिशा बदलून सूर्य जेव्हा विषुववृत्तापासून उत्तर किंवा दक्षिण टोकाला जातो त्या काळाला अयन काळ असे म्हणतात. प्राचीन नवरात्रोत्सव याच काळात साजरा केला जात असे. क्षितिजावरील उत्तर आणि दक्षिण दिशेच्या सूर्यदेवाच्या प्रवासाची सुरवात या काळापासून होते. अयोध्येत हे उत्सव अतिशय उत्साहात साजरे केले जात असत. माता-पुत्रांच्या भेटीसाठी एवढे अठरा दिवस पुरेसे आहेत असं गुरु वशिष्ठांना वाटत असे. आपल्या प्रवासात सूर्य जेव्हा विषुववृत्त ओलांडतो त्यावेळी दिवस आणि रात्र समान असतात. शरद आणि वसंतातील या काळाला विषुवकाल म्हणतात. मेष आणि तुला विषुवांच्या या काळात नवरात्राचे जे उत्सव साजरे केले जात असत ते राजपुत्र गुरुकुलातच साजरे करणार होते.

त्यानंतर राजगुरुंनी आपलं मन दशरथांवर केंद्रित केलं.

गेली सहा वर्षे सम्राटांचं मन त्यांना खात होतं. दुःखातिरेकानं त्यांची त्वचा सुरकुतू लागली होती. डोळे खोल गेले होते. केस पिकले होते. युद्धात जायबंदी झालेल्या पायामुळे त्यांचे दोन अत्यंत प्रिय विरंगुळेसुद्धा आता त्यांच्यानं होत नव्हते. व्यायाम आणि शिकार करणंही आता थांबलं होतं. आपलं दुःख विसरण्यासाठी त्यांनी मद्यपान सुरू केलं होतं. अती पिण्यामुळे त्याच्या झुकलेल्या खांद्यांच्या व्यक्तीमत्वात आधीचा भक्कमपणा आणि शक्तीशालीपणा शोधूनही सापडत नव्हते. रावणानं केवळ त्या एका दुर्दैवी दिवशी त्यांना हरवलं नव्हतं, तो रोज त्यांना तिळातिळानं हरवत होता.

'महाराज,' वशिष्ठांनी थोडं मोठ्या आवाजात म्हटलं, 'आपली परवानगी हवी.'

दशरथांनी निरिच्छपणे हात हालवून त्यांना परवानगी दिली.

शरदातील संक्रांतीनंतरचा तो दिवस होता. राजपुत्र अर्धवार्षिक सुट्टीवर राजमहालात परतले होते. पहिल्यांदा ते गुरुकुलात गेले होते त्या घटनेला आज तीन वर्षे पूर्ण झाली होती. उत्तरायणाची- सूर्याच्या उत्तर दिशेनं प्रवासाची सुरवात झाली होती. सहा महिन्यांनंतर उन्हाळ्यात सूर्यदेवांच्या प्रवासाची दिशा बदलून दक्षिणेकडे होणार होती.

सुट्टीतसुद्धा रामाचा जास्तीत जास्त वेळ गुरु वशिष्ठांसोबतच जात असे. सुट्टीच्या दिवसांत ते सुद्धा राजपुत्रांसमवेत राजमहालात रहायला आले होते. महाराणी कौसल्यांना हे जरी फारसं

रुचलं नसलं तरी केवळ तक्रार करण्यापलीकडे त्या काही करू शकत नव्हत्या. दुसरीकडे, राजकुमार भरत आपल्या मातेच्या कक्षाशिवाय इतर कुठे जाऊ शकत नव्हते. आपल्या स्वभावानुसार महाराणी कैकयी भरताला खूप सूचना देत आणि भरपूर प्रश्न विचारत. लक्ष्मण अलीकडेच घोडेस्वारी शिकला होता. आणि छोट्या छोट्या घोड्यांवर बसून रपेट करण्यात त्याला खूप गंमत वाटायची आणि त्यातच त्याचा वेळ जायचा. शत्रुघ्न... तो फक्त पुस्तकं वाचायचा!

एकदा रपेट संपवून लक्ष्मण माता सुमित्रेच्या कक्षाकडे जात असताना मातेच्या कक्षातून येणारे आवाज ऐकून कक्षाबाहेरच उभा राहिला. पडद्यांआडून त्यानं हळूच आत डोकावून पाहिलं.

'शत्रुघ्ना, तुला हे समजायला हवं की भरत दादा तुझी गंमत करत असतील, पण त्यांचं तुझ्यावर सगळ्यात जास्त प्रेम आहे. तुला नेहमी त्यांच्यासोबत रहायला हवं.'

शत्रुघ्नाच्या हातात ताम्रपृष्ठांचं एक पुस्तक होतं. ते त्याला वाचायचं होतं. त्यामुळे आईचं बोलणं तो फक्त ऐकल्यासारखं दाखवत होता.

'तू ऐकतोयस ना मी काय म्हणतोय ते?' अचानक आवाज चढवून सुमित्रांनी विचारलं.

'हो आई,' शत्रुघ्न वर पाहात म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावर संपूर्ण लक्ष देऊन ऐकत असल्याचा भाव होता.

'मला नाही वाटत तसं,' सुमित्रा म्हणाल्या.

शत्रुघ्नने आपल्या आईचं शेवटचं वाक्य पुन्हा उच्चारलं. वयाच्या मानाने त्याचे उच्चार अधिक स्पष्ट होते. सुमित्रांना ठाऊक होतं की, शत्रुघ्न त्यांचं बोलणं नीट लक्ष देऊन ऐकत नव्हता. अर्थात, याबद्दल त्या काही करूही शकत नव्हत्या.

लक्ष्मण धावतच आईजवळ पोहोचला आणि आनंदाचा कल्लोळ करत उडी मारून आईच्या मांडीवर बसला.

बोबड्या बोलात तो म्हणाला, 'मी ऐकेन तुझं आई!'

लक्ष्मणाभोवती हात टाकताना माता सुमित्रेच्या ओठांवर हसू उमटलं. त्या म्हणाल्या, 'हो रे, मला ठाऊक आहे की तू ऐकशील माझं! तूच माझा गुणी बाळ आहेस!'

ताम्रपत्रांच्या आपल्या पुस्तकांकडे पुन्हा वळण्याआधी शत्रुघ्नने एक नजर आपल्या आईवर टाकली.

'तू जे काही सांगशील ते मी नक्की करेन माते,' लक्ष्मण म्हणाला. त्याच्या निष्पाप डोळ्यांत प्रेम भरलं होतं.

'तर मग माझं ऐका', थोडं झुकून, चेहऱ्यावर विदूषकी आणि खलबत करत असल्याचे भाव आणून सुमित्रा म्हणाल्या. त्यांना ठाऊक होतं की लक्ष्मणाला असे विदूषकी हावभाव केलेले खूप आवडतात- 'तुमच्या वडील भावाला गरज आहे तुमची. तो अगदी साधा आणि निष्पाप माणूस आहे. त्यांना असं कोणीतरी हवंय जे त्यांचे डोळे आणि कान बनतील. आणि ते तसे कुणालाच आवडत नाहीत.' लक्ष्मणावर लक्ष केंद्रित करून मग त्या पुटपुटल्या, 'तुम्हालाच त्यांचं संकटांपासून रक्षण करायला हवं. लोक त्यांच्याबद्दल त्यांच्या मागे नेहमीच वाईट बोलतात. पण त्यांना मात्र नेहमी इतरांमध्ये चांगलंच दिसतं. त्यांचे शत्रू खूप आहेत. त्यामुळे कदाचित त्यांचं जीवन तुमच्यावरच अवलंबून असेल...... '

'खरंच?' नेमका धोका जरी नीट लक्षात आला नसला तरी डोळे विस्फारलेल्या लक्ष्मणानं

विचारलं.
'हो! आणि खरंच सांगते, त्यांचं रक्षण करण्यासाठी मी फक्त आपणावरच विश्वास ठेवू शकते.'
'चिंता करू नका माते,' लक्ष्मणाने पाठ ताठ करत आणि ओठांवर ओठ दाबत म्हटलं, महत्वाची कामगिरी मिळाल्यावर एखाद्या सैनिकाचे डोळे आनंदानं लुकलुकावेत तसे लक्ष्मणाचे डोळे लुकलुकत होते. 'मी नेहमी दादाची काळजी घेत जाईन.'
सुमित्रानं पुन्हा एकदा लक्ष्मणाला जवळ घेऊन कुरवाळलं. त्याच्याकडे पाहून त्या अभिमानानं हसल्या. म्हणाल्या, 'ठाऊक आहे आम्हाला.'

'दादा!' लक्ष्मण ओरडला. मुलांना रपेट देण्यासाठी प्रशिक्षित केलेल्या तट्टूवर स्वार होऊन तो त्याला पळविण्यासाठी टाच मारत होता. पण तट्टू पळायला तयार नव्हतं.
नऊ वर्षांचा राम त्याच्या तट्टूपेक्षा मोठ्या घोड्यावर बसून पुढे निघाला होता. त्याचा घोडा वेगात चालला होता. मिळालेल्या प्रशिक्षणानुसार घोड्याच्या टापांच्या लयीबरहुकूम जीनवर त्यांचं शरीर वर-खाली होत होतं. आजच्या रिकाम्या दुपारी त्या दोघांनी अयोध्येतील शाही रपेटीच्या मैदानात घोडेस्वारी करून उत्तम घोडेस्वार बनण्याचा सराव करण्याचं ठरवलं होतं.
'दादा! थांब!' लक्ष्मण काकुळतीला येऊन किंचाळला. घोड्याला पळवण्याचे त्याचे सारे प्रयत्न व्यर्थ चालले होते. त्यामुळे वैतागून त्याने मिळालेल्या आणि नीट न समजलेल्या साऱ्या सूचना विसरून घोड्याला संपूर्ण ताकदीनिशी चाबकानं व्यवस्थित फटकारायला आणि फटाफट टाचा मारायला सुरवात केली होती.
रामनं मागे वळून पाहिलं. आपल्या लहान भावाचा चाललेला एकूण आटापिटा पाहून तो हसला. त्यानं लक्ष्मणाला सावध केलं, 'लक्ष्मणा! घाई नको करूस, सावकाश!'
'थांब!' लक्ष्मण पुन्हा ओरडून म्हणाला.
लक्ष्मणाच्या आवाजातील निकड लक्षात आल्यावर लगेच रामनं लगाम खेचून घोड्याला थोपवलं. तेवढ्यात लक्ष्मण त्याच्यापाशी येऊन पोहोचला. घाईघाईनं आपल्या तट्टूवरून उतरून रामपाशी येत म्हणाला,
'दादा, खाली उतर!'
'काय?'
'खाली उतर!' वैतागलेल्या लक्ष्मणाने ओरडून पुन्हा सांगितले. पुढे होऊन त्यानं रामला हात धरून खाली खेचायला सुरवात केली.
त्रासिक चेहऱ्यानं घोड्यावरून खाली उतरता उतरता रामनं विचारलं, 'काय झालं, लक्ष्मणा?'
'ते पाहा!' बोट दाखवत लक्ष्मण म्हणाला. घोड्याभोवती लपेटलेल्या ज्या चामडी पट्ट्यावर जीन कसली जाते, जिच्यामुळे जीन जागीच रहाते तो पट्टा सुटत आला होता. लक्ष्मण तिकडेच बोट दाखवत होता.
'रुद्रदेवा, कृपा असो!' राम पुटपुटला. रपेट करताना जर पट्टा सुटला असता तर जीन जागेवरून सरकून घोडेस्वार घोड्यावरून खाली फेकला गेला असता. त्याला गंभीर दुखापत झाली असती. भयंकर दुर्घटनेपासून लक्ष्मणाने त्याला बचावलं होतं.
लक्ष्मणानं आपली चौकस नजर चारही दिशांना फिरवली. त्यावेळी त्याच्या डोक्यात आईचे

शब्द निनादत होते. रामला तो म्हणाला, 'दादा, कुणीतरी तुला मारून टाकायचा बेत केलाय.'

रामनं घोड्याभोवती बांधलेल्या पट्ट्याची आणि त्याला जोडणाऱ्या जीनच्या बक्कलांचं निरीक्षण केलं. बक्कलं जुनी होती असं दिसून आलं. कुणी जाणून-बुजून हे केल्याच्या खुणा दिसून येत नव्हत्या. अर्थात, निश्चितच लक्ष्मणानं त्याला घायाळ होण्यापासून किंवा कदाचित मृत्युपासून वाचवलं होतं.

रामनं हलकेच लक्ष्मणाला मिठी मारली. म्हणाला, 'धन्यवाद, भाऊ.'

'कटाबद्दल अजिबात घाबरू नकोस', लक्ष्मण गंभीरपणानं म्हणाला, आईने दिलेल्या सूचनेबद्दल आता त्याची पक्की खात्री झाली होती. 'मी तुझं रक्षण करीन दादा, नेहमी!'

प्रयत्नपूर्वक येणारं हसू दाबत राम म्हणाला, 'कट का? एवढा मोठा शब्द तुला कुणी शिकवला?'

'शत्रुघ्नने', लक्ष्मण म्हणाला. पुन्हा एकदा त्यानं चौफेर नजर दौडवून दगाफटका नसल्याची खात्री करून घेतली.

'शत्रुघ्नाने का?'

'हो, पण तू त्याची काळजी नको करू दादा. लक्ष्मण आहे ना, तुझं रक्षण करायला.'

रामनं आपल्या छोट्या भावाच्या कपाळाचा मुका घेतला आणि आपला त्याच्यावर भरंवसा आहे याची त्याला ग्वाही दिली. म्हणाला, 'मला आत्तापासूनच सुरक्षित वाटू लागलंय.'

या घटनेनंतर दोन दिवसांनी दोघेही भाऊ गुरुकुलात जाण्यासाठी तयार झाले होते. आदल्या रात्री राम शाही पागेत जाऊन घोड्याची लांबच्या प्रवासासाठी तयारी पाहून आला. त्या दोघांनाही दुसऱ्या दिवशी बराच मोठा पल्ला गाठायचा होता. अर्थात, पागेत सेवक होतेच. पण रामला हे काम करायला आवडायचं. यामुळे त्याला समाधान मिळायचं. कारण प्राण्यांव्यतिरिक्त त्याला दोष न देणारे फार कमी लोक होते. म्हणून प्राण्यांबरोबर वेळ घालवणं त्याला आवडत असे. टापांचा आवाज आला तेव्हा त्याने मागे वळून पाहिलं.

'लक्ष्मणा!' राम उद्गारला. आपल्या छोट्या घोड्यावर बसून समोरून येत असलेला लक्ष्मण जखमी होता. पुढे होऊन रामने लक्ष्मणाला घोड्यावरून उतरायला मदत केली. लक्ष्मणाची हनुवटी फाटली होती. तातडीने टाके घालण्याची गरज होती. लक्ष्मणाचा चेहरा आणि छाती रक्तानं माखले होते. तरी रामने त्याच्या जखमेचं निरीक्षण केलं तेव्हा लक्ष्मणानं अजिबात हुं का चूं केलं नाही. अतिशय धैर्यानं तो स्थिर उभा होता.

प्रेमानं त्याला दटावत राम म्हणाला, रात्रीच्या वेळी घोडेस्वारी करायची तुला बंदी आहे, ठाऊक आहे ना?

खांदे उडवत लक्ष्मण म्हणाला, 'हो. चूक झाली माझी... घोडा अचानक...'

'बोलू नकोस,' रामनं त्याला मध्येच अडवलं. त्याने बोलायसाठी तोंड उघडलं तेव्हा रक्त आणखी वेगानं ओघळू लागलं होतं. 'चल माझ्यबरोबर.'

जखमी भावाला घेऊन राम निलंजनांच्या कक्षाकडे धावला. महाराणी सुमित्रा आणि त्यांच्या

सेविकांनी त्यांना रस्त्यातच हटकलं कारण ते बराच वेळ नजरेस न पडलेल्या लक्ष्मणाला शोधत होते.

'काय झालं?' भळाभळा रक्त वाहाणाऱ्या लक्ष्मणावर नजर पडताच सुमित्रांनी ओरडून विचारलं.

लक्ष्मण काही न बोलता गप्प उभा राहिला. आपला दादा कधी खोटं बोलत नाही हे त्याला ठाऊक होतं. त्यामुळे आता आपल्यावर संकट कोसळणार याद्दल त्याची खात्री झाली होती. इथे काही काल्पनिक कथा रचून सांगायला अजिबात वाव नाही हे त्याला चांगलंच ठाऊक होतं. त्याला आधी आपल्या हातून घडलेल्या चुकीची कबूली द्यावी लागणार आणि त्यानंतर खात्रीनं मिळणाऱ्या शिक्षेपासून बचावासाठी धोरणंही आखावी लागणार होती.

'काही गंभीर नाही, छोटी आई,' राम म्हणाला. 'पण आपल्याला त्याला तातडीनं निलंजनांकडे न्यावं लागणार आहे.'

'पण झालं काय?' सुमित्रांनी पुन्हा विचारलं.

लक्ष्मणाला त्याच्या आईच्या रागापासून वाचवायला हवं हे रामनं ताडलं. त्या दिवशी लक्ष्मणानं त्याचे प्राण वाचविले होते ना! त्यावेळी त्याच्या सदसदविवेकबुद्धीला जे सुचलं ते त्यानं केलं. त्यानं सगळा दोष स्वतःकडे घेतला. म्हणाला, 'छोटी आई, सगळी माझी चूक आहे. लक्ष्मणाला घेऊन मी शाही पागेत घोड्यांची तयारी कुठवर आलीय ते पाहायला गेलो होतो. घोडा जरा बावचळला आणि त्याने अचानक मागे येत लक्ष्मणाला लाथ मारली. मलाच लक्ष ठेवायला हवं होतं. लक्ष्मणाला माझ्या मागे उभं रहायला सांगायला हवं होतं.'

रामचं बोलणं ऐकलं आणि सुमित्रा चटकन् त्यांच्या मार्गातून बाजूला होत म्हणाल्या, 'त्याला लगेच निलंजनांकडे न्या.'

दादा कधी खोटं बोलत नाही हे तिला ठाऊक आहे. लक्ष्मणाला त्याला अपराधी वाटू लागलं.

राम आणि लक्ष्मणांनी मग घाई केली. एका सेविकेनं मग त्यांच्या मागे जाण्याचा प्रयत्न केला तेव्हा महाराणी सुमित्रांनी हात उंचावून तिला थोपवलं. दोघांनाही लगबगीनं जाताना त्या पाहात राहिल्या. रामानं लक्ष्मणाचा हात गच्च पकडला होता. सुमित्रा समाधानानं हसल्या.

लक्ष्मणानं रामाचा हात आपल्या छातीपर्यंत आणला. आणि तो कुजबुजला, 'आपण नेहमी बरोबर राहू दादा, नेहमी.'

'बोलू नकोस लक्ष्मणा, रक्त वेगानं वाहू लागेल....'

अयोध्येच्या राजकुमारांना गुरुकुलात येऊन आता पाच वर्षे झाली होती. अकरा वर्षांच्या रामला पूर्ण वाढीच्या इतर प्रतिद्वंद्वींसोबत लढाईचा सराव करताना वशिष्ठ मोठ्या अभिमानानं पाहात होते. यावर्षापासून राम आणि भरतासाठी द्वंद्वयुद्धाच्या शिक्षणाची सुरवात झाली होती. लक्ष्मण आणि शत्रुघ्नाला आणखी दोन वर्षे द्वंद्वयुद्धाच्या प्रशिक्षणासाठी वाट पाहावी लागणार होती. सध्या त्यांना तत्वज्ञान, गणित आणि विज्ञानाच्या अभ्यासावरच समाधान मानून घ्यावं लागत होतं.

'चल, दादा!' लक्ष्मणानं आवाज दिला, 'हो पुढे आणि दे दणका!' लक्ष्मणाकडे पाहून वशिष्ठ कौतुकानं हसले. कधी कधी त्यांना लक्ष्मणाचं बोबडं बोलणं आठवायचं. आता लक्ष्मण नीट

बोलू लागला होता. पण आठ वर्षांच्या लक्ष्मणाचा उत्साही स्वभाव मात्र बदललेला नव्हता. त्याची रामवर पूर्ण निष्ठा होती, जीवापाड प्रेम होतं. रामनेच कदाचित पुढेमागे लक्ष्मणातील या निरंकुशतेला दिशा दिली असती.

मृदुभाषी आणि बुद्धिमान शत्रुघ्न लक्ष्मणाशेजारी बसला होता. ताम्रपत्रावरील हस्तलिखित 'ईशावास्य उपनिषद' वाचण्यात तो गुंग होता.

त्यानं एक संस्कृत श्लोक वाचला –

'पुशनेकरसे यम सूर्य प्रजापत्यः व्यूहः रश्मिन समूहः तेजोः;

यत्ते रूपम् कल्याणतमम् तत्ते पश्यामि यो'सावसौ पुरुष सोहस्मि।'

हे सूर्य देवा! सर्वांचं पोषण करणाऱ्या हे प्रजापतीच्या पुत्रा, एकांड्या यात्रेकरू, खगोलीय नियंत्रका, तुझे किरण मालव. तुझा प्रकाश विझव. या प्रकाशापलीकडील तुला मला पाहू दे. जो देव तुझ्यात आहे तोच देव माझ्यातही आहे याची मला जाणीव होऊ दे.

या तत्वज्ञानसंपूर्ण शब्दांचे सौंदर्य जाणवून शत्रुघ्न स्वतःशीच हसले. भरत त्याच्यामागे बसला होता. त्याने शत्रुघ्नाच्या डोक्यावर टपली मारून रामकडे बोट दाखवलं. अचानक उद्भवलेल्या व्यत्ययामुळे रागावलेल्या शत्रुघ्नने लक्ष्मणाच्या दिशेला आपला त्रासिक चेहरा वळविला. त्यावेळी त्याच्या डोळ्यांतून राग ओसंडून वाहात होता. भरतने आपल्या या छोट्या भावाच्या डोळ्याला डोळा भिडवला. त्यानंतर मात्र शत्रुघ्नने हस्तलिखित बाजूला ठेवून रामाकडे पाहिलं.

तलवारबाजीसाठी रामबरोबर वशिष्ठांनी जो प्रतिद्वंद्वी निवडला होता तो गुरुकुलानजीक राहाणाऱ्या जंगली जमातीचा सदस्य होता.

गंगेच्या दक्षिणेला आणि शोण नदीच्या पश्चिमेकडील टोकाला असलेल्या घनदाट अरण्यात हा आश्रम होता. तेथून पुढे नदीचे पात्र अचानक वळण घेत पूर्वेकडे निघाले होते. पुढे अग्नेय दिशेला वाहात जाऊन ते गंगेला मिळाले होते. हा भाग हजारों वर्षांपासून कित्येक गुरुंनी वापरला होता. जंगली जातीचे लोक त्या जागेची निगा राखीत असत. गुरुंना ती जागा भाडेतत्वावर देत असत.

गुरुकुलाकडे येणारा रस्ता सुरवातीला वृक्षांच्या घनदाट पर्णसंभारानं झाकला गेला होता आणि पुढे एका प्रचंड विस्ताराच्या वडाच्या पारंब्यांनी आच्छादलेला होता. त्यापलीकडे एक छोटी बखळ होती. या उघड्या जागेच्या मध्यभागी जमिनीत खाली जाणाऱ्या पायऱ्या कोरलेल्या होत्या. या पायऱ्या एका खोल खंदकाकडे नेत. हा संपूर्ण मार्ग घनदाट पर्णसंभारानं पूर्णपणे झाकलेला होता. त्यानंतर खंदकाचं भुयारी मार्गात रूपांतर होऊन तो एका पर्वताच्या खालील भागात नेऊन पोहोचवत असे. या भुयारी मार्गाच्या दुसऱ्या टोकाला लख्ख प्रकाश होता. तिथे हा मार्ग एका झऱ्याला जाऊन मिळत होता. झऱ्याच्या प्रवाहावर लाकडाचा पूल होता. त्यापलीकडे डोंगर उतारावरील खडक फोडून बनवलेलं अत्यंत साध्या बांधणीचं गुरुकुल होतं.

डोंगरातून एक मोठा चौकोनी घनाकार फोडून काढून ही जागा बनविलेली होती. प्रवेशद्वारासमोरच्या भिंतीत 20 छोटी मंदिरं कोरलेली होती. त्यातील काहींमध्ये देवतांच्या मूर्ती होत्या आणि काही मंदिरं रिकामी होती. यापैकी सहा मंदिरांमध्ये विष्णूच्या पहिल्या सहा अवतारांच्या मूर्ती होत्या. एका मंदिरात रुद्रदेवाची – महादेवाची – मूर्ती होती. आणि आणखी एका मंदिरात बुद्धिमान वैज्ञानिक ब्रह्मदेवाची मूर्ती होती. मधल्या मंदिरात देवांच्या राजाची – इंद्रदेवांची मूर्ती होती. इंद्र पर्जन्य आणि मेघ देवता आहे. म्हणून त्यांची मूर्ती मधल्या मंदिरात

यथोचित प्रतिष्ठापित केली गेली होती. त्यांच्या अवती-भोवतीच्या मंदिरांमध्ये इतर देवतांच्या मूर्ती होत्या. मंदिराच्या आसपासच्या समोरासमोरील भिंतींपैकी एका भिंतीत स्वयंपाकघर आणि भांडारघर बनवलेलं होतं आणि त्यासमोरील भिंतीत छोट्या छोट्या कप्प्यांसारख्या जागा गुरु आणि शिष्यांच्या झोपण्यासाठी बनविलेल्या होत्या.

आश्रमात अयोध्देचे राजकुमार राजाच्या कुटुंबातील सदस्यांसारखे नव्हे तर कामगार पालकांच्या मुलांसारखे रहात असत. गुरुकुलात इतर कुणालाही त्यांच्या राज परिवाराशी असलेल्या नात्याबद्दल काहीही माहिती नव्हती. परंपरेनुसार राजकुमारांना गुरुकुलात वेगळी नावं दिली गेली होती. रामाचं नाव सुदास, भरताचं वासु, लक्ष्मणाचं पौरव आणि शत्रुघ्नाचं नलतर्दक होतं. राजपरिवाराशी संबंधीत त्यांची एकूण ओळख गुरुकुलात निषिद्ध होती. गुरुकुलात अभ्यासाव्यतिरिक्त ते स्वच्छता राखणे, स्वयंपाक बनविणे, गुरुंची सेवा वगैरे कामे करत असत. अभ्यासातील नैपुण्यानं त्यांना जीवनातील ध्येयं साध्य करण्यात मदत झाली असती आणि इतर कामांमुळे त्यांच्यात विनम्रता बाणली असती. या विनम्रतेच्या आधारेच ते स्वतःसाठी योग्य ती जीवनध्येयं निवडू शकले असते.

'सुदास, तू आता तयार झालायस असं वाटतं,' वशिष्ठ रामाला म्हणाले. राम त्यांच्या दोन उत्तम शिष्यांपैकी एक होता. त्यानंतर गुरु त्यांच्या शेजारी बसलेल्या त्या जमातीच्या प्रमुखांकडे वळले. वशिष्ठ त्यांना म्हणाले, 'अधिपती वरुण, द्वंद्वयुद्ध पाहाण्याची वेळ झाली ना?'

स्थानिक लोक उत्तम यजमान तर होतेच शिवाय उत्कृष्ट योद्धेही होते. आपल्या शिष्यांना युद्धकलेतील नैपुण्य शिकविण्यात मदतीसाठी वशिष्ठांनी त्यांची सेवा स्वीकारली होती. आजच्यासारखेच, परीक्षेच्या वेळी ते युद्धातील प्रतिद्वंद्व्याची भूमिकासुद्धा निभावत असत. रामासोबत सराव करत असलेल्या त्या जमातीतील योद्ध्याला वरुण म्हणाले, 'मत्स्या....'

मत्स्य आणि राम लगेच प्रेक्षक दीर्घेकडे वळले आणि त्यांनी वशिष्ठ आणि वरुणांना वंदन केलं. मग ते दोघेही मंचाच्या एका बाजूला गेले आणि तेथे ठेवलेले रंगाऱ्यांचे कुंचले प्रत्येकी एक उचलले. लाल रंग भरलेल्या पात्रात ते बुडविले आणि त्या रंगाने आपल्या सरावाच्या लाकडी तलवारींची पाती आणि टोकं रंगविली. आता या तलवारी चालल्यावर शरीरावर त्या ज्या ठिकाणी स्पर्श करतील त्या ठिकाणी शिक्का उमटला असता आणि त्या शिक्क्यावरून वार किती घातक होता ते समजलं असतं.

राम पुन्हा अखाड्यात आला आणि त्याच्या केंद्रस्थानी पोहोचला. मत्स्यसुद्धा त्यांच्या पाठोपाठ आला. समोरासमोर आल्यानंतर प्रतिस्पर्ध्यांनी आदरानं एकमेकांना झुकून वंदन केलं.

'सत्य, कर्तव्य, सन्मान,' राम म्हणाला. गुरु वशिष्ठांकडून त्यानं ही घोषणा ऐकली होती. या घोषणेनं त्याच्या मनावर खोल परिणाम केला होता.

मत्स्य त्याच्याहून जवळ जवळ एक फूट अधिक उंच होता. रामाची घोषणा ऐकून हसत तो म्हणाला, 'विजय, कोणत्याही प्रकारे'.

रामने पवित्रा घेतला- पाठ ताठ, शरीर थोडं तिरकं, डोळे उजव्या खांद्यावरून पलीकडे रोखलेले, गुरु वशिष्ठांनी त्याला असंच शिकवलं होतं. अशा मुद्रेत त्याच्या शरीराचा कमीत कमी भाग शत्रुसमोर उघडा होता. मिळालेल्या शिकवणीनुसार त्याचा श्वास स्थिर, सहज आणि लयीत होता. त्याचा डावा हात तोल सांभाळण्यासाठी शरीरापासून थोडं अंतर राखून शिकवल्यानुसार अगदी स्थिर होता. त्याचा तलवार धरलेला हात खांद्यापासून थोडा उंच आणि कोपरापासून

थोडा झुकलेल्या स्थितीत होता. रामने हात हालवून खांद्याच्या स्नायूंना तलवारीचं वजन नीट पेलू दिलं. त्याचे गुडघे वाकलेले होते आणि गरजेनुसार चटकन् कोणत्याही दिशेला वळता यावं अशा रीतीने सारा भार चवड्यांवर टाकलेला होता. रामची तयारी पाहून मत्यला कौतुक वाटलं. त्याच्या मनात आलं, हा मुलगा प्रत्येक नियमाचं काटेकोर पालन करतोय.

या किशोराचे डोळे विशेष प्रभावशाली आहेत असं त्याला वाटलं. विरुद्ध उभ्या योद्ध्याच्या म्हणजे मत्स्यच्या डोळ्यांवर रोखलेली रामची नजर अत्यंत तीक्ष्ण होती. गुरु वशिष्ठांनी या मुलाला उत्तम प्रशिक्षण दिलंय. याच्या हातांआधी याच्या डोळ्यांची हालचाल होते.

क्षणभरासाठी मत्स्याचे डोळे किंचित विस्फारले. आता वार होणार हे रामनं जाणलं. आपल्या उंचीचा फायदा घेत मत्स्य पुढे झेपावला आणि त्याने तलवार रामच्या छातीच्या दिशेनं चालवली. त्याचा हा वार घातक ठरला असता पण रामने सफाईनं उजवीकडे सरकून त्याचा वार चुकवला. त्याच क्षणी त्याने आपला उजवा हात पुढे करत मत्स्यच्या मानेवर वार केला.

मत्स्य पटकन मागे सरकला.

'तू जोरात वार का नाही केलास, दादा,' लक्ष्मण ओरडला, 'हा वार घातक ठरायला हवा होता!'

मत्स्य दाद देत असल्यासारखा हसला. लक्ष्मणाच्या जे लक्षात आलं नव्हतं ते त्याच्या लक्षात आलं होतं. राम त्याला आजमावत होता. सावधगिरीनं पावलं उचलणारा योद्धा होता राम, प्रतिद्वंद्व्याच्या मनाची पूर्ण कल्पना आल्याशिवाय तो घातक वार करणार नव्हता. मत्स्यच्या हसण्यावर रामनं कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. त्याची नजर स्थिर होती. श्वास सहज होता. आपला प्रतिद्वंद्वी नेमका कशात डावा आहे हे त्याला आधी जाणून घ्यायचं होतं. मगच त्यानं वार केला असता.

मत्स्य आक्रामकपणाने त्याच्यावर चालून गेला. त्यानं रामावर आपल्या तलवारीने उजव्या बाजूला जोरात वार केला. राम मागे सरकला आणि त्याने सर्व ताकदीनिशी वार परतवला. मत्स्य उजव्या बाजूला झुकला आणि यावेळी त्याने रामच्या डाव्या बाजूने वार केला. त्याचा नेम रामच्या डोक्याजवळ होता. यावेळीसुद्धा मागे सरकता सरकता रामने वार परतविण्यासाठी आपली तलवार उंचावली. पाठोपाठ वार करत मत्स्य पुढे पुढे येत राहिला. तो रामला भिंतीपाशी नेऊन, त्याची कोंडी करून घातक वार करू इच्छित होता. राम त्याचे वार परतवत मागे सरत राहिला. अचानक रामने मत्स्यचा वार चुकवत उजवीकडे उडी घेतली आणि त्याच वेळी विजेच्या चपळाईने मत्स्यच्या हातावर वार केला. त्याने वार केलेल्या जागी मत्स्यच्या हातावर लाल रंग चिकटला. ही जखम होती, पण ज्यामुळे द्वंद्वयुद्ध थांबवावं लागावं अशी जीवघेणी जखम नव्हती. मत्स्य मागे झाला पण त्याची नजर रामवरून ढळली नाही. कदाचित तो अतिशय सावध झाला होता.

'वार करण्याचं धाडस नाही का रे दादा तुझ्यात?'

रामने कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. त्याने पुन्हा एकदा पवित्रा घेतला. गुडघे थोडे वाकवले, डावा हात हलक्यानं कमरेवर ठेवला, तलवार धरलेला उजवा हात पुढे केला.

'खेळ खेळला नाही तर खेळ जिंकता येत नाही,' मत्स्य ने रामला डिवचलं. 'तू केवळ हरणं टाळतोयस की तुला खरंच जिंकायचंय?'

राम शांत आणि स्थिर होता. त्याचं लक्ष केंद्रित होतं. तो आपल्या शक्तीचा जपून वापर करत

होता.

मत्स्यच्या मनात आलं, या किशोराचं लक्ष विचलित करणं कठिण आहे. त्यानं पुन्हा एकदा हल्ला केला. आपल्या उंचीचा फायदा घेत रामला हरवण्यासाठी मत्स्य पुन्हा पुन्हा वरच्यावर वार करत राहिला. त्याच्या वारांपासून स्वत:चा बचाव करता करता राम कधी उजवीकडे तर कधी डावीकडे झुकत राहिला आणि मागे जात राहिला.

वशिष्ठांच्या ओठांवर हसू फाकलं कारण राम आता काय करण्याचा प्रयत्न करतोय ते त्यांच्या लक्षात आलं.

मागे जाता जाता रामानं सहज जो उंचवटा चुकवला होता तो मत्स्यच्या लक्षात आला नाही. काही क्षणातच मत्स्य त्या उंचवट्याला अडखळला आणि नंतर त्याला आपला तोल सावरता आला नाही. रामनं मग एक क्षणही दवडला नाही. त्यानं लगेच आपला एक गुडघा टेकवला आणि मत्स्यच्या मांडीच्या सांध्यावर जोरात वार केला. घातक वार!

मत्स्यने खाली आपल्या मांडीच्या सांध्यासह आसपास लागलेला लाल रंग पाहिला. लाकडी तलवारीनं रक्त काढलं नव्हतं पण प्रचंड वेदना दिल्या होत्या. त्या व्यक्त करणं मत्स्यला कमीपणाचं वाटत होतं.

किशोराच्या कौशल्यानं प्रभावित झालेल्या मत्स्यने पुढे होऊन रामची पाठ थोपटली. म्हणाला, ‘युद्ध सुरू होण्याआधी युद्धक्षेत्राचं निरीक्षण करणं, तेथील काना-कोपऱ्यांची माहिती करून घेणं अत्यंत आवश्यक असतं. तू हा मूलभूत नियम लक्षात ठेवलास. मी विसरलो. शाब्बास, माझ्या पोरा.’

रामने तलवार खाली ठेवली. मग, डावा हात उजव्या हाताच्या कोपराला लावून उजव्या हाताच्या बांधलेल्या मुठीने मत्स्यला सलाम केला. जंगलात रहाणाऱ्या त्या जमातीत अशा प्रकारे इतरांना आदरानं वंदन केलं जात असे. मग तो म्हणाला, ‘आपल्याशी युद्धाचा सराव करण्याचा सन्मान मला मिळाला, महान आर्य.’

हसत मत्स्यने हात जोडून रामला नमस्कार केला. म्हणाला, ‘नाही, पोरा, हा सन्मान मला मिळाला खरं तर. आयुष्यात पुढे तू काय करणार आहेस याबद्दल मला उत्सुकता आहे.’

वरुण वशिष्ठांकडे वळून म्हणाले, ‘गुरुजी, आपला हा विद्यार्थी उत्तम आहे. तो केवळ कुशल योद्धा नाही, त्याचं वर्तन सुद्धा कुलीन आहे. कोण आहे हा?’

वशिष्ठ स्मितहास्य करत म्हणाले, ‘अधिपती, आपण जाणताच की मी हे उघड करणार नाही.’

तोपावेतो, मत्स्य आणि राम मंचाच्या टोकाला येऊन पोहोचले होते. रंग धुवून जाण्यासाठी पाण्याच्या एका टाकीत त्यांनी आपल्या तलवारी बुडवून ठेवल्या. रंग उतरला की धुतलेल्या तलवारी सुकवून, तेल पाजून, धोपटून पुन्हा वापरण्यासाठी तयार करून ठेवल्या जाणार होत्या.

वरुण आपल्या जमातीच्या दुसऱ्या एका योद्धयाकडे वळत म्हणाले, ‘गौडा, आता तुझी पाळी.’

वशिष्ठांनी गुरुकुलातील त्याच्या नावाने भरतला बोलावलं, ‘वासू!’

मंचावर चढण्याआधी गौडानं आशिर्वाद मिळविण्यासाठी आदरपूर्वक जमिनीला स्पर्श करून वंदन केलं. भरतने मात्र असं काहीही केलं नाही. तो पटकन् उभा राहिला आणि धावतच तलवारी ठेवलेल्या पेटीकडे गेला. आपल्याला कोणती तलवार हवी हे त्यानं आधीच हेरून ठेवलं होतं. सगळ्यात अधिक लांबीची तलवार त्याला हवी होती. पूर्ण वाढ झालेल्या प्रतिस्पर्ध्याला आपल्या उंचीमुळे मिळणारा फायदा लांब तलवारीने त्याला कमी करता आला असता.

गौडा लाडभरल्या कौतुकानं हसला. आपला प्रतिद्वंद्वी मूल आहे हे त्यानं हेरलं. मग त्यानं एक तलवार उचलली आणि मंचाच्या मध्यभागी पोहोचला. पण भरत तिथे नाही याचं त्याला आश्चर्य वाटलं. निर्भय किशोर आधीच मंचाच्या दुसऱ्या टोकाला- जिथे रंग आणि कुंचले ठेवलेले होते तिथे पोहोचला होता. तो तेथे आपली तलवार रंगवत होता.

'सराव नाही का करायचा?' गौडानं आश्चर्यानं विचारलं.

वळून त्याच्याकडे पाहात भरत म्हणाला, 'वेळ कशाला घालवायचा?'

गौडानं आपल्याला वाटलेली गंमत भुवया उंचावून व्यक्त केली. त्यानेही मग आपली तलवार रंगवली.

मग दोन्ही प्रतिद्वंद्वी मंचाच्या मध्यभागी पोहोचले. परंपरेनुसार त्यांनी झुकून एकमेकांना वंदन केलं. गौडा भरताकडून उच्चारल्या जाणाऱ्या वचनाची वाट पाहू लागला. त्याला वाटलं भरतसुद्धा आपल्या भावानं घेतलेल्या प्रतिज्ञेचाच पुनरुच्चार करेल.

'जिंका किंवा मरा,' उत्साहानं आपल्या छातीवर हात मारून भरत म्हणाला.

यावेळी मात्र गौडा आपलं हसू रोखू शकला नाही. तो खळखळून हसला. मग भरताला त्याने विचारलं, 'जिंका किंवा मरा? ही तुझी प्रतिज्ञा आहे का?'

राग लपविण्याचा प्रयत्नही न करता भरतनं त्याच्याकडे रोखून पाहिलं. चेहऱ्यावरचं हसू अजिबात न मावळलेल्या त्या योद्ध्यानं मान लववून आपली प्रतिज्ञा म्हटली, 'विजय, कोणत्याही प्रकारे'.

भरतचा पवित्रा पाहून पुन्हा एकदा गौडाला आश्चर्याचा धक्का बसला. त्याच्या भावाने असं अजिबात केलं नव्हतं, पण भरतने मात्र शत्रूवर साहसानं हल्ला केला. असं करून त्याने शत्रूसमोर आपलं संपूर्ण शरीर वार करण्यासाठी उपलब्ध करून दिलं. तलवार धरलेला हात त्याच्या बाजूला तसाच लटकलेला राहिला. तलवारीवरची त्याची पकडसुद्धा एकदम ढिली वाटत होती. त्याच्या एकूण आविर्भावातून उघड आव्हान व्यक्त होत होतं.

'तू पवित्रा घेणार नाहीस का?' गौडानं विचारलं. आपल्या हातून हा बेफिकीर मुलगा जखमी होणार की काय याची आता त्याला भीती वाटू लागली होती.

बेपर्वाईनं हसत भरत कुजबुजला, 'मी नेहमी लढाईसाठी तयारच असतो.'

यावर प्रतिक्रिया म्हणून गौडाने खांदे उडवले आणि तो पवित्रा घेऊन उभा राहिला.

आळसावून लक्ष्मण या जंगली जमातीतील योद्ध्याची चाललेली पूर्वतयारी पाहात राहिला.

अचानक गौडाने पुढे झेप घेतली आणि त्याने आपली तलवार भरतच्या ओटीपोटाच्या रोखाने चालवली. भरत गर्रकन स्वतःभोवती फिरला आणि त्याने आपली तलवार वरून खाली आणत गौडाच्या उजव्या खांद्यावर जोरदार वार केला. गौडा मागे सरकला. आपली वेदना दिसू नये याची त्याने खबरदारी घेतली.

'मी तुझा कोथळा बाहेर काढला असता,' भरतच्या ओटीपोटावर लागलेल्या लाल रंगाकडे लक्ष वेधत गौडा म्हणाला.

'त्याआधी तुझा हात तुटून जमिनीवर पडला असता,' भरतने गौडाच्या खांद्यावर आपल्या तलवारीच्या वाराने लागलेल्या लाल रंगाकडे खूण करत म्हटलं.

गौडा हसला आणि त्याने पुन्हा हल्ला केला. पण गौडाला आश्चर्याचा धक्का बसला जेव्हा भरतने अचानक उंच उडी मारून तलवार पुन्हा एकदा त्याच्यावर वरून चालवली. भरतचा हा

पवित्रा अप्रतीम होता. विशेषतः तलवार धरलेल्या हाताच्या बाजूने नसल्यामुळे एवढ्या उंचावरून आलेला वार चुकवणं गौडाला शक्य झालं नसतं. हार वार केवळ ढाल वापरूनच अडविता आला असता. पण ही अत्यंत कल्पक युक्ती यशस्वीपणे वापरू शकण्याएवढी भरतची उंची नव्हती. गौडाने मागे झुकत आपल्या उंचीचा फायदा घेत जोरात वार केला.

गौडाच्या तलवारीचा तडाखा हवेतून पुन्हा जमिनी वर येत असलेल्या भरतच्या छातीवर बसला. त्या धक्कयाने भरत मागे भेलकांडला आणि पाठीवर पडला. छातीत जिथे हृदय असतं तिथेच गौडाचा हा घातक वार भरताला लागला.

भरत त्वरित पुन्हा उठून आपल्या पायंवर उभा राहिला. त्याच्या त्वचेखालच्या धमन्या फुटल्या होत्या. त्यामुळे त्याच्या उघड्या छातीवर रक्त साकळल्याची खूण तयार झालेली दिसून येत होती. लाकडाची असली तरी त्या तलवारीने भरतला वेदना झाल्या असाव्यात. पण भरतने आपल्याला होत असलेल्या वेदनेकडे दुर्लक्ष केलं याचं गौडाला कौतुक वाटलं. भरतचा आविर्भाव मात्र अजिबात बदलला नव्हता. तो पुन्हा त्याच बेपर्वाईने आपल्या प्रतिद्वंद्व्याकडे पाहात उभा राहिला.

'ही चाल चांगली होती,' गौडा म्हणाला. 'मी ही याआधी पाहिली नव्हती. पण ती यशस्वी होण्यासाठी तुझी उंची जास्त हवी.'

डोळ्यातून आग ओकत भरत गौडाकडे पाहात राहिला. मग म्हणाला, 'मीसुद्धा एके दिवशी उंच होईन. तेव्हा आपण पुन्हा द्वंद्वयुद्ध करू.'

गौडा हसला. म्हणाला, 'नक्की करू, पोरा. मी त्या दिवसाची वाट पाहीन.'

वरुण वशिष्ठांकडे वळून म्हणाले, 'गुरुजी, दोन्ही बालक कुशल आहेत. ते कधी मोठे होतील असं वाटू लागलंय.'

वशिष्ठ समाधानानं हसले. म्हणाले, 'मलासुद्धा असंच वाटतंय.'

आपल्याच विचारांत गुंग राम आश्रमापासून काही अंतरावर असलेल्या झऱ्याकाठी बसला होता. संध्याकाळ झाली होती. संध्याकाळी पाय मोकळे करायला निघालेल्या वशिष्ठांची त्याच्यावर नजर पडली आणि गुरु आपल्या शिष्याजवळ पोहोचले.

पावलांचा आवाज ऐकून राम पटकन उठला. गुरुजींना पाहून हात जोडून त्यांना नमस्कार करत उद्गारला, 'गुरुजी'.

'बस, बस,' वशिष्ठ म्हणाले. मग ते सुद्धा रामशेजारी बसले. त्यांनी रामला विचारलं, 'कसला विचार करतोयस?'

'आपण आमची खरी ओळख अधिपती वरुणना का दिली नाही याबद्दल मला आश्चर्य वाटतंय,' राम म्हणाला, 'ते चांगले आहेत असं मला वाटतं. आपण त्यांच्यापासून सत्य का लपवतोय? आपण खोटं का बोलतोय?'

'सत्य लपवणं म्हणजे खोटं बोलणं नव्हे!' वशिष्ठ म्हणाले तेव्हा त्यांचे डोळे लकाकत होते.

'गुरुजी, सत्य लपवणं म्हणजे खोटं बोलणं नाही का?'

'नाही. तसं नसतं ते. कधी कधी सत्य बोलण्याने वेदना होतात, त्रास होतो. अशा वेळी गप्प रहाणं श्रेयस्कर असतं. खरं तर, कधी कधी थाप मारण्यानं किंवा धादांत खोटं बोलण्यानं चांगला

परिणाम होतो.’
‘पण गुरुजी, खोटं बोलण्याचं फळही भोगावं लागतं, खोटं बोलणं पाप आहे ना?’
‘कधी कधी खरं बोलण्याची वाईट फळं भोगावी लागतात. तर खोटं बोलण्यानं एखाद्याचे प्राण वाचू शकतात. खोटं बोलल्यानं कुणाला अधिकारप्राप्ती होऊ शकते आणि मिळालेल्या अधिकाराचा वापर चांगल्या कामासाठी करता येतो. तरीही तू खोटं बोलू नये असंच म्हणशील का? वेगळ्या शब्दांत असंही म्हणता येईल की खरा नेता आपल्या आत्म्यापेक्षा आपल्या लोकांवर जास्त प्रेम करतो. आपल्या लोकांसाठी खोटं बोलावं की बोलू नये अशी शंका खऱ्या नेत्याच्या मनात कधीही उत्पन्न होत नाही. आपल्या लोकांच्या भल्यासाठी खोटं बोलावं लागलं तर ते नक्की खोटं बोलतात.’
रामच्या कपाळावर नापसंतीच्या आठ्या पसरल्या. तो म्हणाला, ‘पण गुरुजी, जे लोक आपल्या नेत्याला खोटं बोलायला भाग पाडतात त्यांच्यासाठी संघर्ष करण्यात काय हंशील?...’
‘तुझं म्हणणं अतिशय बाळबोध आहे राम. एकदा तू सुद्धा लक्ष्मणासाठी खोटं बोलला होतास, आठवतंय ना?’
‘ते अगदी सहजप्रवृत्तीनं घडलं. त्यावेळी मला वाटलं की मला लक्ष्मणाचं रक्षण करायला हवं. पण नंतर त्याबद्दल मला नेहमीच अस्वस्थ वाटत राहिलं. आणि म्हणूनच याबाबतीत मला आपल्याशी बोलायचं होतं, गुरुदेव.’
‘आणि त्यावेळी मी जे म्हटलं होतं तेच आज पुन्हा सांगतो, की तुला याबाबतीत अपराधी वाटण्याची गरज नाही. संयमात आणि समतोलत्वात शहाणपण असतं. एखाद्या निष्पाप व्यक्तीला डाकूंपासून वाचविण्यासाठी तू जर खोटं बोललास तर ते चूक ठरेल का?’
‘संदर्भविहीन एखाद्या उदाहरणानं खोटं बोलण्याचं समर्थन करता येणार नाही, गुरुजी,’ रामला हे अजिबात पटत नव्हतं. ‘आई एकदा बाबांच्या रागापासून माझं रक्षण करण्यासाठी खोटं बोलली होती. वडिलांना लवकरच खरं काय ते समजलं. एके काळी ते नियमीतपणे आईला भेटायला येत असत. पण त्या घटनेनंतर ते कधीही आईला भेटायला आले नाहीत. त्यांनी तिच्याशी आपले सगळे संबंध तोडून टाकले.’
गुरूने दुखी होऊन आपल्या विद्यार्थ्याकडे पाहिले. खरं सांगायचं तर सम्राट दशरथ रावणाबरोबर झालेल्या युद्धातील आपल्या पराजयाचं कारण तुला मानतात. एरवी त्या घटनेव्यतिरिक्तही या ना त्या कारणाचं निमित्त करून त्यांनी महाराणी कौसल्यांना भेटायचं थांबवलंच असतं.
एक एक शब्द तोलून-मापून, अतिशय दक्षतेने वशिष्ठ पुढे बोलू लागले, ‘खोटं बोलणं चांगलं आहे असं मी अजिबात सुचवू इच्छित नाही. पण, विषाचा छोटासा कण कधी कधी जसं औषधाचं काम करतो तसं एखादं छोटं खोटं सुद्धा कधी कधी बरीच मदत करून जातं. नेहमी खरं बोलण्याची तुझी संवय अतिशय उत्तम आहे. पण खरं बोलणंच योग्य असं तुला का वाटतं? खरं बोलणं आपलं कर्तव्य आहे असं तुला वाटतं का? की, त्या दिवसाच्या घटनेनंतर तुला खोटं बोलण्याची भीती वाटू लागली आहे?’
राम गप्प राहिला, पुन्हा विचारांत गुंग झाला.
‘अधिपती वरुणांशी याचा काय संबंध याचाच तू विचार करतोयस ना?’
‘होय, गुरुजी.’

'आपण अधिपती वरूण यांच्या गावी गेलो होतो ते तुला आठवतंय का?'

'आठवतंय ना.'

एकदा सगळी मुलं आपल्या गुरुजींसोबत अधिपती वरुण यांच्या गावी गेले होते. केवळ पन्नास हजार वस्तीचं ते एक छोटं गाव होतं. तरीही, तिथे जे पाहिलं त्यामुळे सगळे राजपुत्र अतिशय प्रभावित झाले होते. शहराप्रमाणेच तेथील रस्ते व्यवस्थित आखलेले होते. वस्तीत घरांसाठीच्या आखीव-रेखीव चौकोनी जागा, त्यावर बांधलेली बांबूची मजबूत आणि भक्कम घरे, अधीपतींच्या घरापासून ते सामान्य गावकऱ्यांपर्यंत सगळ्यांची समान घरं, घरांना दरवाजे नव्हते. अपराध घडत नसत त्यमुळे प्रत्येक घराचं प्रवेशद्वार नेहमी उघडं असायचं. सर्व मुलांचं लालन-पालन केवळ त्यांचे पालक नव्हे तर गावची वडीलधारी मंडळी एकत्रितपणे करत असत.

तिथे गेलेले असताना सर्व राजपुत्रांचं अधीपतींच्या मदतनिसाबरोबर मजेदार संभाषण झालं. राजकुमारांना जाणून घ्यायचं होतं की घरं नेमकी कुणाच्या मालकीची होती- त्या घरात रहाणाऱ्या व्यक्तीच्या मालकीची की अधीपतींच्या मालकीची की एकूण समुदायाच्या सामूहिक मालकीची? मदतनीसानं दिलेलं उत्तर अतिशय विनोदी होतं : 'जमीन कुणाच्या मालकीची कशी काय होऊ शकते? खरं तर आपण जमीनीचे असतो!"

'त्या गावाबद्दल तुझं काय मत आहे?' वशिष्ठांनी रामला विचारलं आणि त्याला त्याच्या विचारांतून जागं केलं.

'जगण्याची किती सुंदर पद्धत आहे त्यांची. आम्हा शहरातल्या लोकांपेक्षा हेच जास्त सुसंस्कृत जीवन जगतात. त्यांच्याकडून कितीतरी गोष्टी शिकण्यासारख्या आहेत.'

'हं. आणि त्यांच्या जगण्याचा पाया काय आहे असं तुला वाटतं? अधीपती वरुणांचं गाव एवढं सुंदर का आहे? शतकानुशतकांपासून त्यांनी आपल्या जीवनशैलीत बदल का केले नसावेत?'

'गुरुजी, ते निःस्वार्थीपणे एकमेकांसाठी जगतात. त्यांच्यात कणभराचाही स्वार्थ नाही.'

वशिष्ठांनी आपलं डोकं नकारार्थी हालवलं, म्हणाले, 'नाही, सुदास. कारण त्यांच्या समाजातील मूलभूत कायदे अतिशय साधे आहेत. कुणी कधी तोडू शकत नाहीत, काहीही झालं तरी सगळ्यांना त्यांचं पालन करावंच लागतं.'

जीवनाचे गुपित कळल्यासारखे रामचे डोळे विस्फारले. 'कायदे...'

'हो राम, कायदे! कायदेच समृद्ध सामाजिक जीवनाचा पाया असतात. कायदे समस्यांचं समाधान असतात.'

'कायदे...'

'अधून मधून एखाद्या छोट्या कायद्याचं उल्लंघन झालं तर काय बिघडतं असं एखाद्याला वाटण्याची शक्यता आहे. हो ना? विशेषतः समाजाच्या भल्यासाठी जे कायदे असतात त्यांच्या संदर्भात लोकांची अशी भावना असते. खरं सांगतो, मीसुद्धा कधी एखाद्या उदात्त हेतूसाठी काही नियम तोडले आहेत. पण याबाबत अधिपती वरुणांचा वेगळा दृष्टीकोन आहे. कायद्याबद्दल त्यांचा समर्पणभाव केवळ परंपरांवर आधारित नाही; आणि केवळ तेच करणं योग्य आहे या समजुतीवरही आधारीत नाही. मानवाच्या मनातील अतिशय शक्तीशाली आठवणींवर, बालपणातील अपराधीपणाच्या भावनेवर तो आधारलेला आहे. त्यांच्या समाजात कोणत्याही मुलाकडून कायदा जर तोडला गेला तर, मग तो कायदा कितीही छोटा किंवा क्षुल्लक असला तरी त्या मुलाला त्यासाठी शिक्षा ही भोगावीच लागते. त्यानंतर तोडल्या गेलेल्या

कोणत्याही कायद्यामुळे त्याला आणखी अपमान सहन करावा लागतो. तुला जसं इतरांचं त्यामुळे भलं होणार असलं तरी खोटं बोलायला आवडत नाही- कारण लहानपणी तुझ्या आईला खोटं बोलण्याची भयंकर शिक्षा सोसावी लागली होती, त्यामुळे तुला आजही खोटं बोलणं शक्य होत नाही, त्याप्रमाणेच अधीपती वरुणनाही आपल्याकडून कायदा तोडला जाणं अशक्य वाटतं.'

'मग आमची ओळख लपविण्याचा त्यांच्या कायद्यांशी काही संबंध आहे का? आम्ही खरे कोण आहोत हे जाणणं म्हणजे त्यांच्या दृष्टीनं कायद्याचं उल्लंघन आहे काय?'

'हो!'

'कोणता कायदा?'

'अयोध्येच्या राजपरिवारातील लोकांची मदत करण्यापासून त्यांचा कायदा त्यांना रोखतो. का ते मला माहीत नाही. का ते निदान त्यांना तरी माहित असेल याची मला खात्री नाही. पण कित्येक शतकांपासून त्यांच्यात हा कायदा लागू आहे. आज त्या कायद्याला काहीही अर्थ नाही. पण तरी ते या कायद्याचं कठोर पालन करतात. मी कुठला हे त्यांना ठाऊक नाही. कधी कधी मला वाटतं की हे जाणून घेण्याची त्यांची इच्छासुद्धा नाही. माझं नाव वशिष्ठ आहे एवढीच माझ्याबद्दल त्यांना माहिती आहे.'

राम थोडा हैराण झाला. त्यानं वशिष्ठांना विचारलं, - 'आपण इथे सुरक्षित आहोत ना?'

'या गुरुकुलाने ज्यांना स्वीकारलं त्यांचं रक्षण करणं हे ते आपलं कर्तव्य मानतात. हा सुद्धा त्यांचा कायदा आहे. आता त्यांनी आपला स्वीकार केलेलाच आहे, तेव्हा ते आपल्याला इजा पोहोचवणार नाहीत. पण त्यांना जर तुम्ही चौघे कोण आहात हे समजलं तर ते आपल्याला इथून हाकलून लावतील. आपल्या कामात व्यत्यय आणू इच्छिणाऱ्या इतर याहून मोठ्या शत्रूंपासून तसे आपण येथे सुरक्षित आहोत.'

राम चिंतामग्न झाला.

'तर, मी खोटं नाही बोललो सुदास. मी फक्त सत्य उघड केलं नाही. या दोन गोष्टींत फरक आहे.'

# प्रकरण 6

पहिल्या प्रहराच्या पाचव्या तासाला गुरुकुलाच्या आसपासचं वातावरण पक्षांच्या किलबिलाटानं प्रसन्न झालं. पहाट उगवली होती. जंगलातील निशाचर प्राणी आपल्या दिवसाच्या आश्रयस्थानाकडे परतत होते आणि त्याचवेळी इतर प्राणी दिवसभर कष्ट करण्यासाठी घरट्यातून निघायची तयारी करत होते. अयोध्येचे चार राजकुमारसुद्धा काही वेळापूर्वीच जागे झाले होते आणि त्यांची दिनचर्या सुरू झाली होती. गुरुकुलाची स्वच्छता केल्यानंतर त्यांनी स्नान उरकलं होतं. स्वैपाक केला होता आणि त्यांची सकाळची प्रार्थनासुद्धा म्हणून झाली होती. आता ते गुरु वशिष्ठांसमोर अर्धवर्तुळाकारात मांडी घालून आणि हात जोडून बसले होते. गुरूंनी पद्मासन घातलं होतं. एका मोठ्या वटवृक्षाखालील उंचवट्यावर ते सर्व बसले होते.

त्यांची शाळा सुरू होण्याआधी रोजच्या रिवाजानुसार ते त्यावेळी गुरुची प्रशंसा करणाऱ्या गुरुस्तोत्राचं पठन करत होते.

स्तोत्र संपलं आणि सगळ्या शिष्यांनी विनम्रतेनं गुरुंना चरण-वंदन केले. गुरू वशिष्ठांनी सर्वांना समान आशिर्वाद दिले – 'माझ्या ज्ञानाची आपणा सर्वांमध्ये वृद्धी होवो, आणि एके दिवशी आपणांत माझे गुरु बनण्याची पात्रता निर्माण होवो.'

राम, भरत, लक्ष्मण आणि शत्रुघ्न आपल्या ठरलेल्या जागी जाऊन बसले. रावणाबरोबर झालेल्या त्या भयानक युद्धाला आता तेरा वर्षे उलटून गेली होती. राम तेरा वर्षांचा झाला होता. भरत आणि रामात आता किशोरवयाची लक्षणे दिसू लागली होती. त्यांना कंठ फुटून आवाज भरड आणि घोगरा होऊ लागला होता. आवाजाची पट्टीसुद्धा बदलू लागली होती. ओठांवर मिसरुड फुटू लागली होती आणि उंची झरझर वाढू लागली होती. त्यांची पोरवयाची शरीरं भक्कम आणि भरदार बनू लागली होती.

कोवळ्या शरीरांमुळे शिकणं जरी जड जात असलं तरी आता लक्ष्मण आणि शत्रुघ्नांनी द्वंद्वयुद्धाचा सराव सुरू केला होता. तत्वज्ञान, विज्ञान आणि गणिताचं त्यांचं प्राथमिक शिक्षण पूर्ण झालं होतं. देवभाषा संस्कृतवर त्यांनी प्रभुत्व प्राप्त केलं होतं. एकूण पृष्ठभूमी तयार झाली होती. बीज पेरण्याची योग्य वेळ आली हे गुरुजींनी ओळखलं.

वशिष्ठांनी विचारलं, 'तुम्हाला आपल्या संस्कृतीच्या उत्पत्तीबद्दल माहिती आहे का?'

लक्ष्मणाचं वाचन फारसं नव्हतं पण प्रश्नांची उत्तरं देण्यासाठी तो नेहमीच उत्सुक असायचा. यावेळीसुद्धा त्याने हात वर केला आणि बोलायला सुरवात केली, 'ब्रह्मांड निर्मितीची सुरवातच.....'

'नाही पौरव,' गुरुकुलातील त्याच्या नावाने त्याला संबोधून वशिष्ठ म्हणाले, 'माझा प्रश्न ब्रह्मांडाविषयी नाही, आपल्याविषयी आहे. या युगातल्या वैदिक लोकांबद्दल होता.'

लगेच राम आणि भरताची डोकी शत्रुघ्नाकडे वळली.

'गुरुजी,' शत्रुघ्न बोलू लागला, 'हजारों वर्षांपूर्वी प्रज्ञ कुळातील राजकुमार मनुदेवांपासून याची सुरुवात होते.'

'गुरुजींचा लाडोबा,' भरत चिडवत कुजबुजला. शत्रुघ्नच्या पुस्तकी कीडा असण्याबद्दल तो

त्याची भरपूर थट्टा जरी करत असला तरी आपल्या या छोट्या भावाच्या अगाध ज्ञानाचं त्याला खूप अप्रुप होतं.

वशिष्ठांनी भरतकडे पाहात विचारलं, 'तुला काही सांगायचंय का?'

'नाही गुरुजी,' भरत चटकन् उद्गारला.

'बरं तर नलतर्दक,' शत्रुघ्नाचं गुरुकुलातील नाव वापरत आणि त्याच्याकडे पाहात वशिष्ठ म्हणाले, 'बरं, पुढे सांग'.

'असं म्हणतात की हजारो वर्षांपूर्वी पृथ्वीचा बराचसा भाग बर्फाखाली झाकलेला होता. कारण त्याकाळी पाणी गोठलेल्या स्वरूपात म्हणजेच घनरूपात होतं. समुद्राची पातळीसुद्धा आजच्यापेक्षा बरीच खाली होती.'

'बरोबर आहे तुझं,' वशिष्ठ म्हणाले, 'फक्त एक गोष्ट सोडून. आणि ती म्हणजे, ही फक्त मानलेली गोष्ट नाहीय. हे सत्य आहे नलतर्दक. हिमयुग केवळ सिद्धांत नाहीय.'

'हो गुरुजी,' शत्रुघ्न म्हणाला, 'समुद्राची पातळी बरीच खाली असल्याने भारताचा भूप्रदेश आजच्या तुलनेनं समुद्राच्या पात्रात बराच आतपर्यंत पसरलेला होता. लंकाद्वीप, असुरांचा राजा रावणाची राजधानी, भारताच्या भूप्रदेशाला जोडलेलीच होती. गुजरात आणि कोकणाचा भागही समुद्रात गेलेला होता.

'आणि मग?'

'आणि मला वाटतं, इथे.....'

वशिष्ठांनी शत्रुघ्नवर कडक नजर टाकली तेव्हा शत्रुघ्न बोलता बोलता मध्येच थांबला. हात जोडून नमस्कार करत म्हणाला, 'माफ करा गुरुजी, मला वाटतं असं नव्हे तर ही वस्तुस्थिती आहे.'

वशिष्ठ हसले.

'हिमयुगात भारतात दोन थोर संस्कृत्या होत्या. एक भारतात अग्नेय दिशेला होती जिचं नाव होतं संगमतमिल. यांच्याकडे लंकेतील थोडी जमीन होती आणि बरीच मोठी इतर जमीनही होती जी सध्या पाण्याखाली गेलीय. त्याकाळी कावेरी नदीचं पात्र बरंच रुंद होतं आणि तिची लांबीसुद्धा अधिक होती. या संपन्न आणि शक्तीशाली प्रदेशावर पंड्या वंशाच्या लोकांचं राज्य होतं.'

'आणि?'

'दुसऱ्या संस्कृतीचे नाव होते, द्वारका. आधुनिक गुजरात आणि कोंकण समुद्र किनाऱ्यानजीकचा बराच मोठा प्रदेश द्वारका संस्कृतीने व्यापलेला होता. आज हा प्रदेश समुद्रात बुडालेला आहे. हा प्रदेश यादव कुळाच्या आधिपत्याखाली होता, यादव म्हणजे यदुचे वंशज.'

'बोलत रहा.'

'हिमयुगाच्या शेवटी अचानक समुद्राच्या पातळीत प्रचंड वाढ झाली. त्यात संगमतमिल आणि द्वारका संस्कृती नष्ट झाल्या. या संस्कृतींचे मुख्य प्रदेश आज समुद्राच्या तळाशी गेलेले आहेत. या संकटातून वाचलेल्या लोकांनी आपल्या देशाचे जनक प्रभु मनूंच्या नेतृत्वाखाली उत्तर दिशेला प्रयाण केले आणि तेथे नव्याने जीवनाची सुरवात केली. ते स्वतःला विद्येची, ज्ञानाची लेकरे मानत असत. अभिमानाची बाब म्हणजे, त्याच वैदिक लोकांचे आपण सर्व वंशज आहोत.'

'खूप छान, नलतर्दक. फक्त आणखी एक मुद्दा राहिला. धरणीमातेच्या स्वाभाविक

कालचक्राच्या प्रमाण वेळेनुसार हिमयुगाचा अचानक अंत झाला. पण मानवाच्या दृष्टीने हा अंत अचानक झालेला नव्हता. आपल्याला कित्येक दशकांपासून, नव्हे शतकांपासून धोक्याच्या सूचना मिळत होत्या. तरीही आपण काहीही केलं नाही.'

मुलं लक्ष एकवटून ऐकत होती.

'संगमतमिल आणि द्वारका अतिशय आधुनिक संस्कृती होत्या, मग त्यांनी संकट येण्यापूर्वी काही उपाय का केले नाहीत? याबाबतीत पुरावेही मिळालेले आहेत की येऊ घातलेल्या संकटाची त्यांना खूप आधीपासून माहिती होती. धरणी मातेनं त्यांना बऱ्याच वेळा धोक्याच्या सूचना दिलेल्या होत्या. स्वतःला वाचविण्यासाठी काही तंत्रज्ञान त्यांच्याकडे असाण्याजोगे किंवा विकसित करण्याजोगे ते निश्चितच बुद्धिमानही होते. तरीही त्यांनी काहीही केलं नाही. प्रभु मनूंच्या नेतृत्वाखाली त्यांच्यापैकी केवळ काही लोकच वाचले. असं का?'

नेहमीप्रमाणेच घाईघाईनं निर्णय घेत लक्ष्मण म्हणाला, 'ते आळशी होते, म्हणून.'

वशिष्ठांनी दीर्घ निःश्वास सोडला. म्हणाले, 'पौरव, अरे उत्तर देण्याआधी माणसानं थोडा विचार करावा.'

लक्ष्मण हिरमुसून गप्प झाला.

'तुझ्याजवळ विचार करण्याची क्षमता आहे, पौरव,' वशिष्ठ म्हणाले, 'पण तू नेहमी घाई करतोस. लक्षात ठेव, आधी करण्यापेक्षा बरोबर करणं महत्वाचं असतं.'

'होय गुरुजी,' नजर खाली वळवत लक्ष्मण म्हणाला. पण लगेच त्याने पुन्हा आपला हात वर केला न् विचारलं, 'मग ते लोक बिघडलेले, भ्रष्ट किंवा बेफिकीर होते का?'

'आता तू कल्पना लढवतोयस पौरव. आपल्या नखांचा वापर करून दार किलकिलं करण्याचा प्रयत्न करू नकोस, किल्लीने दरवाजा उघड.'

लक्ष्मण पुन्हा निरुत्तर झाला.

''योग्य उत्तरा'कडे धावू नकोस,' वशिष्ठ त्याला समजावत म्हणाले, 'कौशल्य नेहमी 'अचूक प्रश्न' विचारण्यात असतं.'

'गुरुजी,' राम म्हणाला, 'मी एक प्रश्न विचारू शकतो का?'

'नक्कीच, सुदास,' वशिष्ठ म्हणाले.

'आपण म्हणालात की, त्यांना कित्येक दशकांपासून, नव्हे शतकांपासून या विनाशाबद्दलच्या सूचना मिळत होत्या. त्यांच्या वैज्ञानिकांनी या सूचना उलगडण्याचा प्रयत्न केला असेलच ना?'

'हो त्यांनी तसा प्रयत्न केला होता.'

'मग त्यांनी या सूचना सगळ्यांपर्यंत, आणि विशेषतः राजघराण्यापर्यंत पोहोचवल्या होत्या का?'

'हो, त्या तशा त्यांनी पोहोचवल्या होत्या.'

'त्यावेळी प्रभु मनु पांडियन राजा होते की राजकुमार? याबाबत मी उलट-सुलट मतं ऐकून आहे..'

वशिष्ठ कौतुकानं हसले. म्हणाले, 'त्यावेळी प्रभु मनु लहान राजकुमारांपैकी एक होते.'

'आणि तरीही राजानं नव्हे तर त्यांनी आपल्या प्रजेला वाचवलं.'

'हो.'

'लोकांना सुरक्षित स्थळी पोहोचविण्यासाठी राजाव्यतिरिक्त इतर कुणाची गरज लागली

म्हणजे राजा आपलं कर्तव्य नीट पार पाडत नव्हता हे उघड आहे. म्हणजे मग संगमतमिल आणि द्वारकेच्या विनाशाचं कारण अयोग्य नेतृत्व होतं का?'

'तुला काय वाटतं, अयोग्य राजा एक व्यक्ती म्हणूनही अयोग्य असतो का?' वशिष्ठांनी विचारलं.

'नाही,' भरत म्हणाला. 'कैकदा सन्माननीय व्यक्तीचं नेतृत्वसुद्धा अयोग्य असू शकतं. आणि राष्ट्राला ज्या प्रकारचं नेतृत्व हवं असतं ते कधी एखाद्या विवादित चरित्राच्या व्यक्तीकडून मिळणंसुद्धा शक्य असतं.'

'अगदी बरोबर! आपल्या प्रजेसाठी केलेल्या कार्यावरूनच राजाचं मूल्यमापन करणं योग्य असतं. त्यांच्या खाजगी जीवनाचा याच्याशी काहीही संबंध नसतो. पण त्यांच्या सार्वजनिक जीवनाचं एकमेव कर्तव्य मात्र हेच असतं की प्रजेचं पोषण करणं आणि प्रजेचं जीवनमान सुधारणं.'

'बरोबर आहे,' भरत म्हणाला.

वशिष्ठांनी एक दीर्घ श्वास घेतला. त्यांच्या मनानं कौल दिला, 'होय, ती वेळ आता येऊन ठेपलेली आहे.' त्यांनी विचारलं, 'मग तो रावण आपल्या प्रजेसाठी योग्य राजा होता का?'

चोहीकडे शांतता पसरली.

राम उत्तर द्यायला तयार नव्हता. रावणाबद्दल त्याच्या मनात केवळ तिरस्कार होता. लंकेच्या या माणसाने अयोध्येची केवळ धुळदाणच उडवली होती असं नव्हे तर रामचं संपूर्ण भविष्य त्याने उध्वस्त केलं होतं. रावणाच्या विजयामुळे त्याचं संपूर्ण आयुष्य कलंकित केलं होतं. आता रामानं काहीही जरी केलं तरी वडिलांसाठी आणि एकूण अयोध्येच्या प्रजेसाठी तो अपशकुनीच रहाणार होता.

शेवटी भरतने कोंडी फोडली. तो म्हणाला, 'आपण हे स्वीकारायला तयार नसू कदाचित, पण रावण आपल्या प्रजेच्या दृष्टीनं एक चांगला राजा होता. तो एक उत्तम प्रशासक होता. समुद्री व्यापाराच्या माध्यमातून त्याने आपल्या प्रजेसाठी समृद्धी खेचून आणली होती. कित्येक बंदरांचा कारभार तो उत्तमरीत्या सांभाळत होता. त्यामुळेच त्याच्या शहरांचे रस्ते सोन्यानं मढवलेले असल्याची कीवदंती पसरली आणि त्याच्या राजधानीला सोन्याची नगरी म्हटलं जाऊ लागलं. निस्संशय तो एक चांगला राजा होता.'

'आणि एका उत्तम व्यक्तीबद्दल तुझं काय म्हणणं आहे जो एक राजा आहे आणि कायमसाठी खिन्न झाला आहे? त्याच्या व्यक्तीगत दुःखामुळे त्याच्या प्रजेचं नुकसान होत आहे. तो दुःखात आहे म्हणून प्रजेचे हाल होताहेत. मग त्याला चांगला राजा म्हणावं का?'

वशिष्ठांचा रोख कुणाकडे होता हे अगदी उघड होतं. शिष्य बराच वेळ शांत राहिले. उत्तर देण्याचं साहस त्यांच्यापैकी कुणाजवळही नव्हतं.

यावेळीही भरतनेच उत्तर देण्याचं साहस दाखवलं. उत्तर देण्यासाठी हात उंचावत तो म्हणाला, 'नाही, तो चांगला राजा नाही.'

वशिष्ठांनी मान हालवली. जन्मजात बंडखोराच्या साहसावर विश्वास ठेवा.

'आजच्यासाठी एवढंच पुरे,' इतर काही न बोलता वशिष्ठांनी अचानक वर्ग संपवला. म्हणाले, 'एरवीप्रमाणेच, आपल्यात आज झालेल्या चर्चेवर मनन करणे हा तुमचा गृहपाठ आहे.'

रामाच्या खांद्याला हलकेच स्पर्श करत भरत म्हणाला, ‘आता माझी पाळी, दादा.’

राम लगेच आपली थैली कमरबंदात खोचत म्हणाला, ‘अरे हो, माफ कर.’

भरत जमिनीवर घायाळ होऊन पडलेल्या सशाकडे वळला. त्याने आधी सशाला बेशुद्ध केलं आणि चटकन् त्याच्या पावलात अडकलेलं लाकडाचं कूस खेचून काढलं. सशाच्या पावलाची जखम पिकली होती. पण भरतने लावलेल्या औषधामुळे संसर्ग वाढला नसता. सध्या बेशुद्ध असला तरी काही मिनिटांतच सशाला जाग आली असती आणि नंतर यथावकाश तो बराही झाला असता.

भरत औषधी वनस्पतींनी हात स्वच्छ करत असताना रामानं हळुवारपणे सशाला उचललं आणि शिकारी प्राण्यांपासून दूर राहील अशा रीतीने झाडाच्या एका खोबणीत त्याला ठेवलं. मग भरतकडे पाहात तो म्हणाला, ‘लवकरच त्याला जाग येईल, जगेल तो.’

भरत समाधानानं हसला. म्हणाला, ‘रुद्रदेवाची कृपा.’

राम, भरत, लक्ष्मण आणि शत्रुघ्न आपल्या दर पंधरवड्याच्या जंगलातील सफरीसाठी निघाले होते. या सफरीत ते आजारी प्राण्यांची सुश्रुषा करत असत. शिकारी प्राण्यांच्या शिकारीत ते ढवळाढवळ करीत नसत कारण शिकार करणं हा त्यांचा निसर्गधर्मच होता. पण या सफरीदरम्यान त्यांना जर एखादा घायाळ प्राणी दिसला तर ते त्या प्राण्याची आपल्याकडून शक्य ती सारी मदत करीत असत.

शत्रुघ्न दूर उभा राहून आपल्या वडील भावांचं काम पाहात होता. तो म्हणाला, ‘दादा.’

भरत आणि रामनं लगेच वळून त्याच्याकडे पाहिलं. शत्रुघ्नच्या बराच मागे अव्यवस्थित अवतारातील लक्ष्मण एका झाडावर खडे फेकत उभा होता.

‘लक्ष्मणा, मागे नको राहूस,’ राम त्याला म्हणाला, ‘आपण आश्रमात नाही, जंगलात आहोत. इथे एकटं रहाणं धोकादायक आहे.’

कंटाळलेल्या लक्ष्मणानं एक सुस्कारा सोडला आणि पुढे येऊन तो आपल्या भावंडांना सामील झाला.

‘बरं, तू काय म्हणत होतास, शत्रुघ्ना?’ रामनं आपल्या छोट्या भावाकडे पाहात विचारलं.

‘भरत दादानं सशाच्या जखमेवर जट्यादी तेल लावलं. जखमेवर तेल लावल्यानंतर जर कडुलिंबाच्या पानानं जखम बांधली नाही तर या तेलाचा परिणाम होणार नाही.’

‘खरंय तुझं म्हणणं, शत्रुघ्ना,’ रामनं कपाळावर थापट मारत म्हटलं.

भरत आपल्या कातडी पिशवीतून कडुलिंबाची पाने काढू लागला आणि रामने पुन्हा सशाला उचलून हातात घेतलं.

समाधानानं हसत भरतने शत्रुघ्नाकडे पाहिलं अन् त्याला विचारलं, ‘तुला माहीत नाही असं जगात काही आहे का रे शत्रुघ्ना?’

शत्रुघ्ननेही हसतच उत्तर दिलं, ‘फारसं काही नसावं बहुतेक.’

भरतने कडुलिंबाची पाने सशाच्या जखमेवर बांधली आणि पुन्हा त्याला झाडाच्या खोबणीत ठेवलं.

राम म्हणाला, ‘आपण आपल्या या पंधरवड्याच्या फेरीत खरंच या प्राण्यांना मदत करतो की

केवळ आपल्या सद्सद्विवेकबुद्धीची तुष्टी करतो?'
उदास हसत भरत म्हणाला, 'फारसं काही करत नसलो तरी आपल्या सद्सद्विवेकबुद्धीकडे निदान दुर्लक्ष तरी करत नाही आपण.'
रामनं आपलं डोकं हालवत म्हटलं, 'तू एवढ्या उपहासानं का बोलत आहेस?'
'आणि तुला यात कोणताही दोष कसा दिसत नाही?'
रामनं सहिष्णुपणानं आपल्य भुवया उंचावल्या आणि तो पुढे निघाला. भरत त्याच्याबरोबर निघाला. लक्ष्मण आणि शत्रुघ्नही सामील झाले. काही पावलं मागे राहून ते त्यांच्यासोबत चालू लागले.
'मानव जातीबद्दल जाणल्यानंतरसुद्धा तुला त्यांच्यातील दोष कसे काय दिसत नाहीत?', भरतने विचारलं.
राम म्हणाला, 'आपणात मोठेपण दडलेलं असतं, भरत. आपल्याला फक्त एका प्रेरणादायक नेत्याची गरज असते.'
'दादा,' भरत म्हणाला, 'माणसात चांगुलपणा नसतो असं मला सुचवायचं नाहीय. तो असतोच. आणि त्यासाठी लढा देणं योग्यच असतं. पण त्याच्यात एवढा क्रूरपणासुद्धा भरलेला असतो की कधी कधी मला वाटतं की या ग्रहावर मनुष्यप्राणी उद्भवलाच नसता तर बरं झालं असतं.'
'हे म्हणजे अती झालं! आपण काही एवढे वाईट नाही.'
भरत मंद हसला. म्हणाला, 'मला फक्त एवढंच सुचवायचं आहे की जास्तीत जास्त माणसांमध्ये महानता आणि चांगुलपणा असतो हे काही खरं नाही.'
'तुला नेमकं काय म्हणायचंय?'
'लोकांनी नियम पाळायला हवेत म्हणून ते त्यांनी पाळावे अशी आशा करणं हा खरं तर अती आशावाद. स्वार्थी हितसंबंधांशी खरं तर नियम पक्के सांधलेले असावेत कारण त्यामुळेच मूलतः लोक प्रेरित होत असतात. त्यांच्या या सहजप्रवृत्तीच्या आधारेच माणसांना चांगुलपणाकडे हाकावं लागतं.'
'लोक महानतेच्या हाकेलासुद्धा प्रतिसाद देतात.'
'नाही दादा, ते असा प्रतिसाद देत नाहीत. काही लोक देतीलही, पण बहुतेक लोक देणार नाहीत.'
'रुद्रदेवानं लोकांना निःस्वार्थीपणानेच मार्गदर्शन केलं ना?'
'हो,' भरत म्हणाला, 'पण त्यांचं अनुकरण करणाऱ्या बहुतेक लोकांच्या मनात आपले स्वार्थी हेतु साध्य करण्याच्या सुप्त इच्छा होत्याच. आणि हे वास्तव आहे.'
राम मान हालवत म्हणाला, 'यावर आपलं कधीही एकमत होणं शक्य नाही.'
भरत स्मित करत म्हणाला, 'खरंय तुझं, पण तरीही माझं तुझ्यावर खूप प्रेम आहे!'
रामाच्या ओठांवरही स्मित खेळू लागलं. मग तो विषय बदलत म्हणाला, 'तुझी सुट्टी कशी गेली? आपण तिथे असताना तुझ्याशी बोलायला मला वेळच मिळाला नाही...'
'कारण तुला ठाऊक आहे.' भरत उद्गारला, 'पण यावेळची सुट्टी नेहमीएवढी वाईट गेली नाही.'
आपल्या आजोळच्या लोकांचं अयोध्येत येणं भरतला खूप आवडत असे. त्यांच्या येण्यामुळे आपल्या कडक आईच्या ससेमिऱ्यातून त्याची सुटका होत असे. आपल्या भावांबरोबर त्यानं

आपला जास्तीत जास्त वेळ घालवावा हे कैकयीला आवडत नसे. तिचं जर चाललं असतं तर तिने सुट्टीसाठी घरी आलेल्या भरतला केवळ आपल्यासाठीच राखून ठेवलं असतं. महान बनून त्यानं आईचं भाग्य कसं उदयाला आणायला हवं याबद्दल निरंतर त्याच्याशी बोलून ती भरतसाठी परिस्थिती आणखी बिकट बनवत असे. फक्त आपल्या रक्ताच्या नातलगांशी भरतला संबंध ठेवू देणं तिला खटकत नसे. त्याच्या सुट्टीच्या दिवसांत कैकयीच्या आई-वडिलांच्या येण्यामुळे भरतची आपल्या आईच्या तावडीतून सुटका होत असे. यावेळी त्याची जवळजवळ सगळी सुट्टी आजी-आजोबांच्या प्रेमळ आणि लाडावणाऱ्या सहवासात गेली होती.

रामनं गंमतीनं भरतच्या पोटात एक गुद्दा मारला 'अरे, आई आहे ती तुझी, भरत. जगातील सगळं चांगलं तुझ्या वाट्याला यावं हीच तिची इच्छा असते.'

'त्याऐवजी मला थोडं प्रेम मिळालं तरी चालेल दादा. मी तीन वर्षांचा असताना घडलेली ती गोष्ट मला अजून आठवते. एकदा माझ्या हातून दुधाचा पेला पडला म्हणून तिने मला मारलं होतं! तिच्या दासींच्या समक्ष तिने मला इतक्या जोरात मारलं होतं.'

'तीन वर्षांचा असताना काय घडलं होतं ते सुद्धा तुला आठवतं का? मला वाटलं फक्त मलाच आठवतं.'

'कसा विसरेन मी? मी एक छोटासा मुलगा होतो त्यावेळी. तो ग्लास किती मोठा आणि वजनदार होता. निसटला माझ्या हातून! बस्स एवढंच. पण तिनं मला का मारावं?'

राम आपल्या सावत्र आई कैकयीला नीट जाणत होता. तिने बऱ्याच निराशा झेलल्या होत्या. त्यांच्या कुटुंबातील ती अतिशय बुद्धिमान मुलगी होती. दुर्दैवानं, तिच्या बुद्धिमत्तेमुळे तिच्या वडिलांना अभिमान वाटावा असं काही घडलं नाही. उलट, त्यांच्या मुलापेक्षा - युद्धजीतपेक्षा - कैकयी उजवी निघाली या गोष्टीचं अश्वपतींना नेहमी वैषम्य वाटत असे. आपला समाज स्त्रियांच्या योग्यतेचा योग्य तो सन्मान करत नाही याचं रामला फार वाईट वाटत असे. आणि आता बुद्धिमान पण विफल कैकयीला आपल्या स्वप्नांची पूर्तता आपल्या मुलाकडून- भरतकडून करून हवी होती. आपल्या महत्वाकांक्षा तिला आपल्या मुलाकडून पूर्ण करून घ्यायच्या होत्या.

आपल्या मनातले विचार रामने व्यक्त मात्र केले नाहीत. त्यानं भरतला सल्ला देणं टाळलं.

विचारमग्न भरत पुढे बोलत राहिला, 'मला तुझ्या आईसारखी आई मिळायला हवी होती. तिने माझ्यावर निरपेक्ष प्रेम केलं असतं. माझं डोकं नसतं खाल्लं.'

राम काही बोलला नाही पण त्याला वाटलं भरतच्या मनात काहीतरी सलतंय.

'काय झालं भरत?' आपल्या छोट्या भावाकडे न पाहाताच रामनं विचारलं

लक्ष्मण आणि शत्रुघ्नाला ऐकू जाऊ नये म्हणून भरत थोड्या हळू आवाजात म्हणाला, 'दादा, आज गुरुजी काय म्हणाले ते ऐकलंस ना?'

रामनं आपला श्वास रोखून धरला.

'दादा?' भरत म्हणाला,

राम दचकला. म्हणाला, 'हा देशद्रोह आहे. असे विचार मी मनातही आणू देणार नाही.'

'देशद्रोह? आपल्या राष्ट्राच्या भल्याचा विचार करणं म्हणजे देशद्रोह?'

'ते आपले वडील आहेत! आपली काही कर्तव्यंही आहेत....'

त्याला मध्येच तोडत भरतनं विचारलं, 'पण ते एक चांगले राजा आहेत असं खरंच तुला वाटतं का?'

‘मनुस्मृतीमध्ये एक कायदा आहे जो स्पष्टपणे सांगतो की एका पुत्राचं कर्तव्य....’

‘कायदा काय म्हणतो ते मला सांगू नकोस, दादा,’ मनुच्या पुस्तकात जे लिहिलं होतं ते जणू वारल्यासारखा हात हालवत भरत म्हणाला, ‘मी सुद्धा मनुस्मृती वाचलीय. तुला काय वाटतं ते मला जाणून घ्यायचंय.’

‘कायद्याचं पालन केलं जावं असं मला वाटतं.’

‘खरंच? तुला एवढंच म्हणायचंय का?’

‘यालाच जोडून मी असंही म्हणेन...’

‘काय?’

‘कायद्याचं नेहमीच पालन केलं जावं.’

भरतनं संतापानं आपले डोळे गरगर फिरवले.

‘काही अपवादात्मक परिस्थितींमध्ये याचा उपयोग होत नाही हे मी जाणतो. पण कोणत्याही परिस्थितीत जर प्रामाणिकपणे कायद्याचं पालन केलं तर काही काळात एक उत्तम समाज निर्माण व्हायलाच हवा.’

‘अयोध्येत कुणीही कायद्याला कवडीची किंमत देत नाही, दादा! आपली संस्कृती अस्ताला जाण्याच्या शेवटच्या स्थितीला पोहोचलेली आहे. या पृथ्वीतलावरील आपण सगळ्यात जास्त दांभिक लोक आहोत. आपण इतरांमधील भ्रष्टाचारावर टीका करतो, पण आपल्या अप्रामाणिकपणाकडे मात्र सर्रास डोळेझाक करतो. चूका करणाऱ्यांबद्दल आपल्याला तिरस्कार वाटतो आणि आपण गुन्हे करतो. आपल्या वाईट वर्तनाकडे, छोट्या-मोठ्या चुकांकडे आनंदाने काना-डोळा करतो. अगदी तावातावाने आपल्या सगळ्या दुःखांसाठी आपण रावणाला दोष देतो. आणि प्राप्त परिस्थितीला आपणसुद्धा जबाबदार आहोत ही गोष्ट सपशेल विसरतो.’

‘आणि हे सगळं कशामुळे बदलेल?’

‘असं वागणं हा मुष्यस्वभाव आहे. आपल्यावर येणाऱ्या संकटांसाठी आपण स्वतःला दोषी ठरविण्याऐवजी इतरांना दोषी ठरवणं पत्करतो. हे मी आधीसुद्धा सांगितलं होतं आणि आज पुन्हा सांगतो. माणसातील या स्वार्थीपणाचासुद्धा समाजाच्या भल्यासाठी उपयोग करून घेणारी पद्धत तयार करेल असा राजा आपल्याला हवा.’

‘निरर्थक, आपल्या उदाहरणानं वाट दाखवणारा एक महान नेता आपल्याला हवाय. असा नेता हवा जो माणसाला आपल्यातील देवत्वाची ओळख पटवून घेण्याची प्रेरणा देईल! लोकांना जे हवं ते करण्याचं स्वातंत्र्य देणारा नेता आपल्याला नकोय.’

‘नाही दादा, अकलेनं वापर केला तर स्वातंत्र्यासारखा मित्र नाही.’

‘स्वातंत्र्याचं आणि कायद्याचं मित्रत्व कधीच नसतं. एखाद्या समाजात रहायचं किंवा नाही याबद्दलचा निर्णय तुम्ही तेथील कायद्याच्या आधारे घेण्यासाठी स्वतंत्र असाल, पण तुम्ही जोवर त्या समाजात रहाता तोवर तुम्हाला त्या समाजाचे नियम मानावेच लागतात.’

भरत म्हणाला, ‘कायदा गाढव असतो आणि कायम गाढवच राहील. कायदा फक्त एक साधन आहे, एका उद्देशपूर्तीचं साधन.’

रामनं हसून या चर्चेचा समारोप केला. भरतने हसत आपल्या भावाच्या पाठीवर थाप मारली.

‘तर, महान नेत्याबद्दलच्या तुझ्या कल्पनेप्रमाणे नेत्याने प्रेरणादायक असायला हवं, माणसाला त्याच्या आतील देवत्वाची ओळख पटवणारं असायला हवं आणि अशाच इतर काही गोष्टी.....’

भरत म्हणाला, ‘बाबा या आदर्शाच्या कसोटीवर उतरणारे आहेत असं तुला वाटतं का?’

रामनं भरतकडे एक रागाचा कटाक्ष टाकला आणि त्या नजरेतूनच भरतला कळवलं की हा मासा अशा गळाला कधी लागणार नाही.

रामाच्या खांद्यावर चापटी मारत भरत मोकळ्या मनाने हसला न् म्हणाला, ‘जाऊ दे दादा, जाऊ दे ते!’

ही एकप्रकारे रामावर झालेली कुरघोडीच होती. पण एका कर्तव्यपारायण मुलासारखा तो स्वतःच्या मनातही आपल्या वडिलांविरुद्ध बंडखोरीचे विचार येऊ देणार नव्हता.

लक्ष्मण काही पावलं सोडून मागून येत होता. ही चर्चा त्याच्यापर्यंत पोहोचली नव्हती, तो जंगलातल्या नेहमीच्या खोड्यांमध्ये गुंग होता.

शत्रुघ्न मात्र आपल्या दोघा भावंडांमध्ये चाललेला संवाद अगदी मन लावून ऐकत होता. त्याच्या मनात आलं, राम दादा खूपच आदर्शवादी आहे. भरतदादा मात्र व्यावहारिक आणि सच्चा आहे.

# प्रकरण 7

आणखी एक?

आपल्या आश्चर्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत रामने आपले विचार व्यक्त होऊ दिले नाहीत. ही याची पाचवी मैत्रीण!

करछपच्या युद्धात दशरथाची हार झाली त्याला आता सतरा वर्षे झाली होती. सोळाव्या वर्षी भरतला प्रेमातील आनंदाचा साक्षात्कार झाला होता. तो आकर्षक आणि दिलफेक होता. त्याला मुली जेवढ्या आवडायच्या तेवढाच तोसुद्धा मुलींना आवडायचा. जमातींच्या परंपरा उदारमतवादी असल्याने अधिपती वरुण यांच्या जमातीतील स्त्रिया सामर्थ्यशाली होत्या. गुरुकुलाच्या स्थानिक यजमान जमातीतील महिलांना त्यांच्या पसंतीच्या व्यक्तीशी संबंध ठेवण्याची मुभा होती. भरत त्यांच्यामध्ये विशेष लोकप्रिय होता.

एक सुंदर, सुकुमार कन्येचा हात धरून तो रामाकडे आला. कन्या वयाने भरतपेक्षा मोठी – साधारण विशीची होती हे उघड होतं.

‘कसं काय चाललंय भरत?’

‘याहून उत्तम कधीच नव्हतं, दादा!’ हसत भरत उद्गारला. ‘पापच याहून चांगलं असेल.’

राम विनयानं हसला आणि शालीनतेनं मुलीकडे वळला.

‘दादा’, भरत म्हणाला, ‘ओळख करून देतो. ही राधिका. अधिपती वरुण यांची कन्या.’

‘आपल्या परिचयानं धन्य झालो,’ विनयानं मान लववत आणि हात जोडून नमस्कार करत राम म्हणाला.

गंमत वाटून राधिकानं आपल्या भुवया उंचावल्या. म्हणाली, ‘भरतनं बरोबरच सांगितलं होतं, हास्यास्पदरीत्या औपचारिक आहेस तू.’

तिच्या या स्पष्टवक्तेपणामुळे रामचे डोळे विस्फारले गेले.

तिचा हात सोडून देत भरत घाईघाईनं उद्गारला, ‘मी हा ‘हास्यास्पद’ शब्द अजिबात वापरला नव्हता. दादासाठी मी असा शब्द कसा काय वापरेन?’

प्रेमानं भरतच्या केसांत हात फिरवत राधिका म्हणाली, ‘ठीक आहे, ‘हास्यास्पद’ शब्द मी माझ्यावतीने वापरला. पण तुझा हा औपचारिकपणा मला खूप आवडला. आणि भरतलासुद्धा तो आवडतो. अर्थात्, हे तुला कळलंच असेल म्हणा.’

‘धन्यवाद,’ थोडा ताठ होत आपलं उत्तरीय सावरत राम म्हणाला.

रामला असा असहज झालेला पाहून राधिका खुद्कन हसली. बायकांच्या मोहापासून अलिप्त रामला सुद्धा मान्य करावंच लागलं की तिच्या हसण्यात अप्सरेसारखी सुंदर मोहकता होती.

राधिकाला आपल्यातील बोलणं समजू नये याची दक्षता घेत राम जुन्या संस्कृत भाषेत भरतला म्हणाला, ‘सा वर्तते लावण्यवती’

भरतला रामासारखी जुन्या संस्कृत भाषेची जाण नव्हती तरी रामने तिच्या सौंदर्याला दिलेल्या प्रशस्तीपत्राचा अर्थ त्याला कळला. ‘ती खूपच सुंदर आहे,’ असं राम म्हणाला होता.

भरतकडून काही प्रतिक्रिया येण्याआधी राधिका बोलली, ‘अहम् जानामि’’

'मला ठाऊक आहे.'
शरमिंधा झालेल्या रामने टोमणा मारला, 'प्रभु ब्रह्मांची कृपा, तुला तर जुनी संस्कृत भाषासुद्धा उत्तम येते.'
राधिका हसली. म्हणाली, 'आजकाल आपण जरी नवी संस्कृत भाषा बोलत असलो तरी जुने ग्रंथ समजून घेण्यासाठी जुन्या संस्कृतची जाण असावीच लागते.'
आपणही काहीतरी बोललं पाहिजे हे भरतला जाणवलं. तो म्हणाला, 'तिच्या बुद्धिमत्तेनं प्रभावित नको होऊस दादा, ती खरंच खूप सुंदर आहे!'
रामनं स्मितहास्य करत आदरानं हात जोडून तिला नमस्कार केला आणि म्हणाला, 'राधिका, माझ्या बोलण्याचा राग आला असेल तर मला माफ कर.'
राधिकाने हसत मान डोलावली. म्हणाली, 'नाही नाही, मला राग आला नाही. आपल्या सौंदर्याची सभ्य शब्दांत केलेली प्रशंसा कोणत्या मुलीला आवडणार नाही?'
'माझा लहान भाऊ भाग्यवान आहे.'
'मी सुद्धा कमी भाग्यवान नाही,' पुन्हा एकदा भरतच्या केसांतून हात फिरवत राधिका म्हणाली.
आपल्या भावावर चढलेला प्रेमाचा कैफ रामच्या लक्षात येत होता. यावेळची गोष्ट नक्कीच काही तरी वेगळी होती. आधीच्या मैत्रिणींपेक्षा राधिका त्याच्यासाठी जास्त महत्वाची होती हे दिसत होतं. पण रामला जंगलातील त्या जमातींच्या परंपरांचीसुद्धा माहिती होती. निःसंशय त्यांच्या मुली मुक्त होत्या पण त्या आपल्या जमातीतील मुलांशीच विवाह करत असत. जमातीबाहेरील मुलांशी विवाह करणं त्यांच्या जमातीत निषिद्ध होतं. यामागचं कारण रामला समजलं नव्हतं. हा नियम कदाचित जंगलातील लोकांची पवित्रता शाबूत राखण्यासाठी बनवलेला असेल किंवा कदाचित निसर्गमातेला सोडून दूर शहरात रहाणाऱ्या लोकांना ते कमी दर्जाचे मानत असावेत. या सगळ्यात आपल्या भावाचं मन दुखावलं जाऊ नये असं मात्र त्याला वाटलं.

'आणखी किती लोणी खाशील?!' भरतला लोण्याचं एवढं आकर्षण का आहे हे रामला कळत नव्हतं.
संध्याकाळची वेळ होती, तिसऱ्या प्रहरातील शेवटची घटिका होती. गुरुकुलात राम आणि भरत एका झाडाखाली आराम करत होते. लक्ष्मण आणि शत्रुघ्न या रिकाम्या वेळेचा उपयोग रपेटीच्या सरावासाठी करत होते. पण मोकळ्या मैदानात चाललेल्या या रपेटीत त्यांच्यात शर्थीची चुरस लागलेली होती. चार भावांत लक्ष्मण उत्तम घोडेस्वार होता आणि शत्रुघ्नला तो सहज मात देऊ शकत असे.
'मला आवडतं ते, दादा,' खांदे उडवत लोण्यानं माखलेल्या तोंडानं भरत म्हणाला.
'पण आरोग्यासाठी बरं नाही ते, लठ्ठपणा येतो त्याने.'
आपल्या पिळदार, सुडौल शरीराचं प्रदर्शन करीत भरतने आपल्या बाहूचे स्नायू फुलवले, श्वास घेत छाती फुलवली न् विचारलं, 'मी लठ्ठ वाटतो का तुला?'
राम हसला. 'मुलींना तू आकर्षक वाटतोस, मग माझं मत काय कामाचं?'

‘तेच तर म्हणतोय मी!’ गालात हसत भरत उद्गारला. त्यानं मडक्यातून आणखी लोणी काढून तोंडात टाकलं.

रामनं हलकेच आपला हात भरतच्या खांद्यावर ठेवला. आपल्या भावाच्या चेहऱ्यावरची काळजी पाहून भरतनं लोणी खाणं थांबवलं.

राम हळुवार आवाजात त्याला समजावू लागला, ‘भरत, तुला ठाऊक आहे ना....’

त्याला मध्येच तोडून भरत म्हणाला, ‘असं कधीच होणार नाही दादा.’

‘पण भरत....’

‘दादा, विश्वास ठेव माझ्यावर. तुझ्यापेक्षा मी मुलींना चांगला ओळखतो.’

‘तुला ठाऊक आहे ना, अधिपती वरुणांच्या जमातीतील लोकांना चालत नाही...’

‘दादा, माझं तिच्यावर जेवढं प्रेम आहे तेवढंच तिचंही माझ्यावर प्रेम आहे. माझ्यासाठी राधिका कायदा मोडेल. ती मला सोडणार नाही, खरंच, विश्वास ठेव माझ्यावर.’

‘तू तिच्याबद्दल एवढी खात्री कशी काय देऊ शकतोस?’

‘मला खात्री आहे.’

‘पण भरत...’

‘दादा, माझ्याबद्दल चिंता करणं सोडून दे आणि फक्त आनंदात रहा.’

रामने भरतला समजावण्याचा आपला प्रयत्न सोडून दिला. भरतच्या खांद्यावर हळुवार थोपटून तो म्हणाला, ‘बरंय तर मग, माझ्यावतीनं खूप खूप अभिनंदन!’

नाटकीपणानं भरतनं आपलं डोकं लववलं न् म्हटलं, ‘धन्यवाद, हे दयावान महाराज!’

रामच्या चेहऱ्यावर मनमोकळं स्मित झळकलं.

भरतनं त्याला विचारलं, ‘दादा, तुझं अभिनंदन करण्याची संधी मला कधी मिळणार आहे?’

रामनं रागीट चेहऱ्यानं भरतकडे पाहिलं.

‘तू कधी कोणत्या मुलीकडे आकर्षित झाला नाहीस का? इथे किंवा अयोध्येत? आपल्या वार्षिक सुट्टीत आपण तेथे गेलो होतो तेव्हा कितीतरी मुलींना भेटला होतास तू....’

‘त्यांच्यापैकी कुणीही त्या योग्यतेची नाही.’

‘कुणीही नाही?’

‘नाही.’

‘तुला नेमकं काय हवंय?’

रामची नजर जंगलात दूरवर हरवली. म्हणाला, ‘मला मुलगी नव्हे पूर्ण स्त्री हवी.’

‘आहा! मला ठाऊकच होतं या गंभीर चेहऱ्यामागे एक खोडकर मुलगा लपलेला आहे.’

रामने कृतककोपाने डोळे वटारले आणि भरतच्या पोटात हलकेच एक गुद्दा लगावला. म्हणाला, ‘मला तसं नव्हतं म्हणायचं आणि हे तुलाही ठाऊक आहे.’

‘मग काय म्हणायचंय तुला?’

‘मला अपरिपक्व मुलगी नकोय. प्रेम दुय्यम असतं. ते महत्वाचं नसतं. जिचा मी आदर करू शकेन असं कुणीतरी मला हवं.’

‘आदर?’ भरतनं कपाळावर आठ्या चढवत म्हटलं, ‘कंटाळवाणं वाटतं.’

‘नाती केवळ गंमतीसाठी नसतात. विश्वास आणि आपण आपल्या जोडीदाराच्या भरवशानं राहू शकतो याचं ज्ञानही तितकंच महत्वाचं असतं. आवेगयुक्त अनुराग आणि उत्तेजनेवर

आधारलेली नाती जास्त काळ टिकत नसतात.'

'खरं का?'

रामनं लगेच आपलं बोलणं सावरून घेत म्हटलं, 'अर्थात तुझं आणि राधिकाचं प्रेम वेगळं आहे म्हणा.'

'अर्थातच,' हसत भरत म्हणाला.

'मला वाटतं मला असं म्हणायचंय की मला माझ्याहून चांगली स्त्री हवी, अशी स्त्री की जिच्यासमोर मला आदरानं मान लवविण्याची इच्छा व्हावी.'

भुवया सूचकपणे उंचावून चेहऱ्यावर मिश्किल हसू आणत भरत म्हणाला, 'दादा, आपण मोठ्या व्यक्तींसमोर आणि पालकांसमोर मान लववितो. पत्नीसोबत आपण आपलं आयुष्य, प्रेम आणि आवडी-निवडी वाटून घेत असतो. ब्रह्मदेवाची शपथ! ज्या मुलीशी तू लग्न करशील तिच्याबद्दल मला दया वाटेल. इतिहासात तुमच्या प्रेमाची नोंद 'प्रचंड कंटाळवाणं' अशी होईल!'

गंमतीत भरतला ढकलत राम दिलखुलास हसला. भरतनं भांडं खाली टाकून रामला पुन्हा ढकललं. दोघेही खाली पडले. भरत पटकन उठून उभा राहिला आणि तेथून धावतच दूर निघून गेला.

'धावण्यात तू मला हरवणं शक्य नाही, थांब भरत, हा मी आलो!' रामही झटकन् उठून उभा राहिला आणि आपल्या भावाच्या मागे धावला.

'तू कुणाचा पक्षधर आहेस?' पाहुण्यानं विचारलं

गुरुकुलात एका गूढ व्यक्तीनं शांतपणे प्रवेश केला होता. गुरू वशिष्ठांना आश्रमाला त्यांची भेट गुप्त राखायची होती. त्यांच्या इच्छेचा मान राखून आगंतुक व्यक्ती रात्री उशीरा आली होती. सुदैवानं रात्रीच्या त्या प्रहरी आश्रमात आपल्या बिछान्यात झोपून रहाण्याऐवजी नियम तोडून लक्ष्मण रपेटीला गेला होता. परतत असताना आश्रमापासून दूर एक अनोळखी घोडा कुणाच्या दृष्टीस पडू नये अशा सावधरीतीने बांधलेला त्याला दिसून आला.

त्यानं अजिबात आवाज न करता आपला घोडा तबेल्यात नेऊन बांधला आणि आपल्या गुरूंना या अनाहूत घुसखोराबद्दल सांगण्याचं ठरवलं. वशिष्ठांची खोली रिकामी पाहून लक्ष्मणाचा संशय दुणावला. स्वतःला रोखणं अशक्य झाल्यानं त्यानं नेमकं काय चाललंय याचा छडा लावण्याचं ठरवलं. शेवटी त्याला पुलाखाली आपले गुरू त्या गूढ आगंतुकाशी हळू आवाजात बोलताना दिसले. लपत-छपत लक्ष्मण त्यांच्या जवळ पोहोचला. एका झुडुपाआड लपून त्याने त्या दोघांमधील संभाषण ऐकलं. 'अजून माझ्या मनाचा निर्णय होत नाहीय,' वशिष्ठ म्हणाले.

'आपल्याला लवकर निर्णय घ्यायला हवा, गुरुजी.'

'का?'

आगंतुकाला नीट पाहू शकत नसला तरी आता लक्ष्मणाला आपल्या भीतीवर नियंत्रण ठेवणं जड जात होतं. अंधारातसुद्धा आगंतुकाचा गोरा रंग आणि प्रचंड, भरदार शरीर पूर्णपणे लपून राहिलेलं नव्हतं. त्याच्या सर्वांगावर लव होती आणि पाठीच्या खालच्या भागातून विचित्रपणे अंग उगवलेलं दिसत होतं. संपूर्ण सप्तसिंधू प्रदेशात ज्यांच्याबद्दल भय पसरलेलं होतं त्या शरीरिक व्यंग घेऊन जन्माला येणाऱ्या नागा जातीतील तो कुणीतरी होता हे उघड होतं. इतर बहुतेक

नागा व्यक्तींसारखी याने आपली ओळख लपविण्यासाठी मुखवटा किंवा बुरख्याचा वापरही केला नव्हता. त्यानं कमरेखालील भागावर प्राचीन भारतीय शैलीनं धोतर नेसलेलं होतं.

'कारण ते तुमच्या मागावर आहेत,' अर्थपूर्ण नजेरनं बरंच काही सांगत तो नागा माणूस म्हणाला.

'हो का? मग?'

'आपणास भीती वाटत नाही का?'

'मला भीती का वाटायला हवी?'

नागा हळुवारपणे हसला. म्हणाला, 'साहस आणि मूर्खपणा यात केसाएवढा फरक असतो.'

'आणि मित्रा, हा फरक गत गोष्टींचे अवलोकन केल्याने लक्षात येतो. मी जर यशस्वी ठरलो तर लोक मला वीर समजतील. मी जर अयशस्वी ठरलो तर मला लोक मूर्ख म्हणतील. मला जे बरोबर वाटतं ते मला करू दे. निर्णय मी भविष्यावर सोपवतो.'

नागा व्यक्तीला हे पटलं नाही. त्यानं आपली हनुवटी पुढे काढत आपली नापसंती व्यक्त केली. पण वाद संपवला. 'मी काय करावं अशी तुमची अपेक्षा आहे?'

'सध्या काहीही नाही. सध्या फक्त वाट पाहू,' वशिष्ठ म्हणाले.

'तुम्हाला ठाऊक आहे का की रावण....'

'हो मला ठाऊक आहे.'

'आणि तरीही इथेच राहाल आणि काहीही करणार नाही का?'

'रावण....' वशिष्ठ कुजबुजले. मग काळजीपूर्वक शब्द निवडत म्हणाले, 'त्याचेही काही उपयोग होण्यासारखे आहेत.'

हे ऐकून बसलेल्या धक्क्यावर लक्ष्मणाने मोठ्या मुश्किलीने नियंत्रण ठेवलं. आपल्याला शांत रहायला हवं हे तशा परिस्थितीतही त्याच्या लक्षात आलं होतं.

'काही लोकांना खात्रीपूर्वक असं वाटतंय की आपण सम्राट दशरथांविरुद्ध उठाव करण्याची तयारी करत आहात.' तो नागा म्हणाला. त्याच्या आवाजातून अविश्वास स्पष्टपणे व्यक्त होत होता.

वशिष्ठ मंदपणे हसले. म्हणाले, 'त्यांच्याविरुद्ध उठाव करण्याची गरजच नाहीय. वास्तविक पाहाता आताही राजधानी त्यांच्या नियंत्रणाबाहेरच आहे. ते उत्तम व्यक्ती आहेत पण सध्या ते खिन्नतेच्या दलदलीत अडकलेले आहेत. पराभूत मनोवृत्तीचे शिकार झाले आहेत. माझं ध्येय मोठं आहे.'

नागानं त्यांची चूक सुधारत म्हटलं, 'आपलं ध्येय.'

'अर्थात,' हसत हसत त्याचा खांदा थोपटत गुरु वशिष्ठ उद्गारले. 'माफ करा मला, हे आपलं सामूहिक ध्येय आहे. पण लोकांना जर असं वाटत असेल की आमची महत्वाकांक्षा केवळ अयोध्येपुरती आहे, तर त्यांना त्याच भ्रमात राहू द्यावं.'

'हो, खरंय आपलं म्हणणं.'

'माझ्याबरोबर या,' वशिष्ठ म्हणाले, 'मला आपल्याला काहीतरी दाखवायचे आहे.'

ते दोघेही तेथून निघून गेले तेव्हा लक्ष्मणाने मोठा सुस्कारा सोडला. त्याचं हृदय जोरजोरानं धडधडत होतं.

गुरुजी नेमकं काय करताहेत? आपण इथे सुरक्षित आहोत का?

चोहीकडे नजर फिरवून कुणी पाहात नसल्याची खात्री पटली तेव्हा लक्ष्मण झुडुपाआडून बाहेर आला आणि घाईघाईनं रामच्या निवासस्थानाच्या दिशेने निघाला.

‘लक्ष्मणा, जा जाऊन झोप,’ चिडलेल्या रामानं लक्ष्मणाला कानपिचकी दिली. बावचळलेल्या लक्ष्मणानं त्याला झोपेतून जागं केलं होतं. घाबऱ्या-घुबऱ्या झालेल्या लक्ष्मणानं जे काही सांगितलं ते रामानं ऐकून घेतलं होतं. त्याला वाटलं की कट-कारस्थानं केली जात आहेत अशी शंका घेण्याची आपल्या भावाची आवड पुन्हा एकदा जागृत झाली असावी.

‘दादा, मी तुला सांगून ठेवतो, अयोध्येसंबंधी काहीतरी शिजतंय हे नक्की... आणि गुरुजी त्यात सामील झालेले आहेत.’

‘हे तू भरतला सांगितलंस का?’

‘अर्थातच नाही! कदाचित तो सुद्धा त्यांना सामील झालेला असेल!’

रामने तीक्ष्ण नजरेने पहात लक्ष्मणाला खडसावले, ‘तो सुद्धा तुझा दादाच आहे, लक्ष्मणा!’

‘दादा, तू खूप साधाभोळा आहेस. अयोध्या कट-कारस्थानांचं केंद्र बनलं आहे हे तू अजिबात मान्य करत नाहीस. गुरुजी सुद्धा यात सामील झाले आहेत. इतर लोकही सामील असतील. माझा केवळ तुझ्यावर विश्वास आहे. आम्हा सगळ्यांचं रक्षण करण्याची जबाबदारी तुझ्यावर आहे. तुला हे सांगून मी आपली जबाबदारी पार पाडली आहे. आता यापुढे याचा छडा लावण्याची जबाबदारी तुझी आहे.’

‘यात छडा लावण्यासारखं काहीही नाही, लक्ष्मणा. आपल्या खोलीत परत जा आणि झोप.’

‘दादा....’

‘आपल्या खोलीत जा लक्ष्मणा! आत्ता!’

# प्रकरण 8

‘जगण्याची आदर्श रीत कोणती?’ गुरु वशिष्ठांनी विचारलं.

पहाटेच्या वेळी गुरुकुलात अयोध्येचे चार राजपुत्र गुरुस्तोस्त्र पठनानंतर गुरुसमोर बसले असताना गुरु वशिष्ठांनी त्यांना हा प्रश्न विचारला.

‘बोला?’ कोणत्याही राजकुमाराकडून उत्तर आलं नाही तेव्हा गुरुंनी त्यांना पुन्हा एकदा विचारलं.

मग त्यांनी लक्ष्मणाकडे पाहिलं. दरवेळी पहिलं उत्तर त्याच्याकडून येत असल्यानं यावेळीही लक्ष्मण आधी बोलेल असं त्यांना वाटलं. पण त्याच्यावर नजर गेली तेव्हा त्यांना थोडं आश्चर्य वाटलं. लक्ष्मण गप्प होताच, पण थोडा चिंतेतही दिसत होता.

‘काही बिनसलंय का पौरव?’ गुरु वशिष्ठांनी त्याला विचारलं.

लक्ष्मणने रामवर एक तक्रारखोर कटाक्ष टाकला आणि मग त्याने आपली नजर जमिनीकडे वळवली. खाली पाहात तो उद्गारला, ‘काही नाही गुरुजी.’

‘तू उत्तर देशील का या प्रश्नाचं?’

‘मला उत्तर ठाऊक नाही, गुरुजी.’

वशिष्टांनी चेहऱ्यावर आपली नापसंती व्यक्त केली. याआधी कधीही माहित नसलेल्या प्रश्नाचं उत्तर देण्यापासून लक्ष्मण मागे राहिला नव्हता. मग ते भरतकडे वळत म्हणाले, ‘वासू, तू उत्तर देण्याचा प्रयत्न करशील का?’

‘गुरुजी, जगण्याची आदर्श रीत म्हणजे,’ भरत बोलू लागला, ‘सगळ्यांनी आरोग्य, संपत्ती, सुख इत्यादींसमवेत जीवनाशी सुसंवाद साधून आपलं जीवितकर्तव्य पूर्ण करत रहाणे.’

‘एखाद्या समाजात असं कधी घडून येतं?’

‘खरं तर हे जवळ जवळ अशक्यच आहे! पण हे जर शक्य असेल तर ते केवळ स्वातंत्र्यातूनच घडून येऊ शकतं. लोकांना आपला मार्ग शोधण्याची सूट द्या, त्यांना त्यांचं उद्दीष्ट नक्की सापडेल.’

‘पण प्रत्येक व्यक्तीला केवळ स्वातंत्र्य मिळालं म्हणून आपला मार्ग शोधता येईल का? आणि समजा, एखाद्याचं स्वप्न इतर व्यक्तीच्या स्वप्नाच्या विरोधी असेल तर?’

या प्रश्नाचं उत्तर देण्यापूर्वी भरतने थोडा विचार केला. मग तो म्हणाला, ‘बरोबर आहे तुमचं. स्वप्नं परस्परविरोधी असतील तर बलवान माणसानं केलेल्या आपल्या स्वप्नपूर्तीच्या प्रयत्नांमुळे दुर्बल माणसाचं स्वप्न चिरडून जाण्याची शक्यता नेहमीच राहाणार.’

‘मग?’

‘म्हणून सरकारने दुर्बलांचं रक्षण करायला हवं. केवळ शक्तीवानांना जिंकू देणं योग्य नाही. त्यामुळे जनतेच्या मनात असंतोष निर्माण होण्याची शक्यता असते.’

‘पण असं का, दादा?’ शत्रुघ्नने विचारलं, ‘माझं म्हणणं असं आहे की, जो शक्तीमान असेल त्याला जिंकू द्यावं. समाजाच्या हिताच्या दृष्टीनं ते योग्य ठरेल नाही का?’

‘पण मग हा जंगलचा कायदा झाला ना?’ वशिष्ठांनी विचारलं, ‘बळी तो कान पिळीचा कायदा

स्वीकारला तर दुर्बल लोक मरून जातील. '

'आपण त्याला जंगलचा कायदा म्हटलंत गुरुजी, पण मी त्याला निसर्गाचा कायदा म्हणेन.' शत्रुघ्न म्हणाला. 'निसर्गाच्या कायद्यावर टीका करणारे आपण कोण? अत्यंत दुर्बल असलेल्या हरिणांची जर वाघांनी शिकार केली नाही तर त्यांची संख्या भरमसाठ वाढेल. ते जंगलातील सगळी हिरवळ फस्त करतील आणि शेवटी जंगले नष्ट होतील. केवळ बलवान जगणं हे जंगलाच्या दृष्टीनं फायद्याचं ठरेल. अशा रीतीनं निसर्गच समतोल साधत असतो. या नैसर्गिक प्रक्रियेत सरकारने ढवळाढवळ करता कामा नये. सरकारने दुर्बलांचं रक्षण होईल अशी केवळ व्यवस्था निर्माण करावी. दुर्बलांनाही टिकून रहाण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. त्यानंतर मात्र सरकारने समाजाला आपला मार्ग स्वतः शोधण्याची संधी द्यावी. सगळ्यांच्या स्वप्नांची पूर्तता करणं ही सरकारची जबाबदारी नाही.'

'पण मग सरकार हवंच कशाला?'

'काही आवश्यक गोष्टींसाठी सरकारची गरज असते. या गोष्टी व्यक्ती पुरवू शकत नाही. सीमेचं रक्षण करण्यासाठी सैन्य राखणं, सगळ्यांसाठी मूलभूत शिक्षणाची व्यवस्था करणं इ. गोष्टींसाठी सरकार हवं. प्राण्यापासून माणूस वेगळा आहे कारण तो आपल्यातील दुर्बलांना मारून टाकत नाही. पण सरकारच्या हस्तक्षेपाने जर दुर्बलांची संख्या भरमसाठ वाढली आणि त्यामुळे बलवानांवर गदा आली तर काही काळाने समाजव्यवस्थाच कोलमडेल. समाजाने हे कदापि विसरता कामा नये की आपल्या नागरिकांपैकी गुणवान लोकांच्या विचार आणि कार्यामुळेच आपली भरभराट होते. जर बलवानांच्या आकांक्षांना डावलून आपण दुर्बलांच्या इच्छांना जास्त महत्व देत राहिलो तर संपूर्ण समाजाचा ऱ्हास होईल.'

वशिष्ठ हसले. 'सम्राट भरतनंतर त्यांच्या वारसांच्या कारकिर्दीत भारताच्या झालेल्या अवनतीच्या कारणांचा तू सखोल अभ्यास केलायस, हो ना?'

शत्रुघ्नने मान डोलावली. हजारो वर्षांपूर्वी भरत नावाचा एक चंद्रवंशी राजा होऊन गेला. देवांचा राजा इंद्रानंतर महान सम्राटांमध्ये त्याचं नाव घेतलं जातं. सम्राट भरतनेच सर्वप्रथम संपूर्ण भारत आपल्या छत्राखाली आणला. त्याचे सरकार अत्यंत कनवाळू आणि प्रजेचं उत्तम पालनपोषण करणारं होतं अशी त्याची कीर्ती आहे.

'मग, त्याच्या उत्तराधिकाऱ्यांनी सम्राट भरत यांनी लागू केलेली व्यवस्था नीट काम करेनाशी झाल्याचं लक्षात आल्यावर बदलली का नाही?' वशिष्ठांनी विचारलं.

'मला माहित नाही,' शत्रुघ्न उद्गारला.

'कारण, सम्राट भरत यांच्या राज्याचं धोरण त्याआधीच्या तितक्याच यशस्वी पण वेगळ्या पद्धतीला झालेल्या प्रतिक्रियेतून उदयाला आलं होतं. सम्राट भरत यांच्या राज्यानं स्वातंत्र्य, अनुराग आणि सौंदर्य या तीन तत्वांना प्राधान्य असलेल्या स्त्रैण जीवन पद्धतीच्या भरभराटीची परिसीमा गाठली होती असं मानलं जातं. चरमोत्कर्षसमयी ही व्यवस्था दयाळू, सर्जनशील आणि दुर्बलसमावेशक असते. पण स्त्रैण पद्धतीचा जेव्हा ऱ्हास होतो तेव्हा ती भ्रष्ट, गैरजबाबदार आणि अवनत बनते.'

'गुरुजी,' राम म्हणाला, 'जगण्याच्या इतर पद्धतीसुद्धा आहेत हे आपल्याला सुचवायचं आहे का? उदाहरणार्थ, पौरुष पद्धत?'

'हो, पौरुष पद्धत सत्य, कर्तव्य आणि सन्मान या तीन तत्वांवर आधारित आहे.

चरमोत्कर्षकाळी ही पद्धत अतिशय कार्यक्षम, न्यायी आणि समतावादी असते. पण अवनतकाळी ती मतांध, कठोर आणि दुर्बल वर्गाच्या बाबतीत निर्दयी होते.'

'म्हणजे, ऱ्हासोन्मुख स्त्रैण संस्कृतीवर उपाय ठरते पौरुष संस्कृती,' राम म्हणाला, 'आणि पौरुष संस्कृतीच्या ऱ्हास समयी स्त्रैण पद्धत योग्य ठरते, असंच ना?'

'हो,' गुरुजी म्हणाले, 'जीवन चक्राकार चालते.'

'आजचा भारत हा ऱ्हासकालीन स्त्रैण संस्कृतीचा देश आहे असं म्हणता येईल का?' भरतने विचारलं.

वशिष्ठांनी भरतकडे पाहिलं आणि ते म्हणाले, 'खरं तर आजचा आपला देश गोंधळलेला देश आहे असं म्हणावं लागेल. या देशाला सध्या आपली ओळख लागत नाहीय. माझ्या मते आज या देशात स्त्रैण आणि पौरुष संस्कृतींची सरमिसळ झालेली आहे. पण मला निवडच करायची म्हटलं तर मी म्हणेन की या वेळी आपण ऱ्हासकालीन स्त्रैणसंस्कृतीचे सदस्य आहोत.'

'मग सध्या आपल्यासमोर प्रश्न आहे तो हा की, आपण पौरुष संस्कृतीचा स्वीकार करावा की स्त्रैण संस्कृती पुनरुज्जीवित करावी?' भरत म्हणाला. 'स्वातंत्र्याला पारखा होऊन भारताचा निभाव लागेल असं मला तरी वाटत नाही. हा बंडखोरांचा देश आहे. कोणत्याही विषयावर आम्ही वादावादी करतो किंवा हमरीतुमरीवर येतो. केवळ स्त्रैणपद्धतीचा, स्वातंत्र्याचा अवलंब करूनच आपण यशस्वी होऊ शकतो. पौरुष पद्धत काही काळासाठी येथे यशस्वी ठरू शकते पण ती फार काळ टिकू शकणार नाही. पौरुष पद्धतीनुसार चालायचं म्हणजे आज्ञाधारकपणा हवा आणि आपण फार काळ आज्ञाधारकपणे वागू शकत नाही.'

'असं आज आपल्याला वाटतंय,' वशिष्ठ म्हणाले. 'पण आपण कायम असे नव्हतो. एके काळी पौरुष संस्कृतीच भारताची ओळख होती.'

थोडा वेळ भरत विचारात गुंग झाला.

पण रामच्या मनात कुतूहल निर्माण झालं होतं. तो गुरुजींना म्हणाला, 'गुरुजी, आपण म्हणालात की सम्राट भरत यांनी लागू केलेली स्त्रैण संस्कृती बदलाची गरज निर्माण होऊनही बदलू शकली नाही, कारण ती त्याआधीच्या पौरुष संस्कृतीच्या ऱ्हासोन्मुखतेतून निर्माण झालेल्या वाइटाची प्रतिक्रिया म्हणून जन्माला आलेली होती. कदाचित, त्यांच्या दृष्टीने, आधीची संस्कृती वाईट ठरवली गेली होती.'

'बरोबर आहे तुझं म्हणणं, सुदास'

'आपण आम्हाला आधीच्या पौरुष संस्कृतीबद्दल माहिती देऊ शकाल का?' रामने विचारलं. 'आपल्या आजच्या समस्यांवर त्यात आपल्याला उपाय सापडतील का?'

'कित्येक सहस्त्रकांपूर्वी या साम्राज्याचा विकास झाला. या साम्राज्यानं प्रचंड वेगाने भारताचा सर्व भूभाग जिंकून घेतला. त्यांची संस्कृती पूर्णपणे वेगळी होती. भरभराटीच्या काळात या साम्राज्यानं श्रेष्ठतेची नवनवी शिखरं काबीज केली होती.'

'हे लोक कोण होते?'

'आता आपण जेथे आहोत तेथेच या साम्राज्याचा पाया रोवला गेला होता. त्यानंतर आजपर्यंत इतका काळ उलटला की या आश्रमाचं महत्व लोकांच्या विस्मृतीत गेलं.'

'इथे?'

'हो. इथेच त्या साम्राज्याच्या पूर्वजांनी आपल्या महान गुरुकडून शिक्षण घेतलं. गुरुंनी त्यांना

पौरुष जीवन पद्धतीची सारी माहिती दिली. हा त्यांचाच आश्रम आहे.'

'ते महान ऋषी कोण होते?' रामनं आश्चर्यानं विचारलं.

वशिष्ठांनी एक खोल श्वास घेतला. उत्तर ऐकून राजपुत्रांना धक्का बसणार हे त्यांना ठाऊक होतं. त्या प्राचीन ऋषींची आज सगळ्यांना भीती वाटते. म्हणून कुणी कधीही त्यांचं नाव उघडपणे घेत नसत. वशिष्ठांनी आपली नजर रामवर स्थिर करत सांगितलं, 'महर्षी शुक्राचार्य.'

ऐकताच भरत, लक्ष्मण आणि शत्रुघ्न भीतीने गारठले. शुक्राचार्य असुरांचे गुरु होते. आणि असुर कट्टर राक्षस होते. त्यांनी भारताचा जवळ जवळ संपूर्ण भूप्रदेश जिंकून घेतला होता. ही हजारों वर्षांआधीची माहिती आहे. पण शेवटी सुरांनी कित्येक वर्षे चाललेल्या क्रूर लढाईनंतर त्यांना हरवलं. यांनाच आज आदराने देव मानलं जातं. शेवटी जरी असुरांचा निःपात झाला असला तरी या युद्धामुळे भारताचे अपरिमित नुकसान झाले होते. हजारो लोक मारले गेले होते. त्यामुळे संस्कृतीची पुनःस्थापना करण्यात पुढची कैक वर्षे गेली. देवांच्या राजा इंद्रानं सर्व असुरांना भारतातून हाकलून देण्याची खबरदारी घेतली. सूडाच्या न्याय्य भावनेनं आणि तर्कहीन भीतीने शुक्राचार्यांचं नाव धुळीला मिळवलं गेलं.

आश्चर्याच्या धक्क्यामुळे विद्यार्थी कोणत्याही प्रकारची प्रतिक्रिया देण्यापलीकडे गेले होते. पण इतरांहून वेगळेपणाने चमकणाऱ्या रामच्या डोळ्यात कुतूहल दिसून येत होतं.

गुरु शुक्राचार्यांच्या उल्लेखामुळे आपल्या शिष्यांच्या मनात उडालेल्या हल्लकल्लोळाचा सुगावा घेण्यासाठी गुरु वशिष्ठ रात्रीच्या वेळी आश्रमातून निघाले. लक्ष्मण आणि शत्रुघ्न आपापल्या खोलीत गाढ झोपी गेलेले होते. पण राम आणि भरत जागेवर नव्हते. वशिष्ठांनी आसपासच्या परिसरात त्यांचा शोध घेण्याचं ठरवलं. शुभ्र चांदण्यामुळे परिसर उजळून निघाला होता. थोड्या वेळातच त्यांना पुढे काही अंतरावर कुणी कुजबुजत असल्याचा आवाज ऐकू आला. थोडं जवळ गेल्यावर कोण्या मुलीला काही समजावून सांगण्याच्या खटपटीत असलेला भरत त्यांना दिसला.

भरत विचारत होता, 'पण का...?'

'मला माफ कर भरत,' ती मुलगी शांतपणे बोलत होती, 'आमच्या जमातीचे नियम मी मोडणार नाही.'

'पण माझं तुझ्यावर प्रेम आहे राधिका..... तुझं सुद्धा माझ्यावर प्रेम आहे..... मग आपण इतर लोक काय म्हणतात याचा विचारच का करायचा?'

वशिष्ठ लगेच मागे फिरले आणि दुसऱ्या दिशेने चालू लागले. कुणाच्या खाजगी आणि दुखद प्रसंगी उपस्थित रहाणं योग्य नाही.

राम कुठे आहे?

मनात काही आल्यानं वशिष्ठांनी पुन्हा आपली चालण्याची दिशा बदलली. दगडी पायवाटेनं ते खडकाच्या बाह्य मध्यवर्ती भागात बांधलेल्या छोट्या मंदिरांच्या दिशेनं निघाले. असुरांचा पराभव केलेल्या देवांचा राजा इंद्रदेवांच्या मंदिरात त्यांनी प्रवेश केला. इंद्रदेवांचे मंदिर मध्ये असण्यामागील सांकेतिकता स्पष्ट होती कारण इंद्रदेवांनी शुक्राचार्यांचा वारसा पुसून टाकणाऱ्या सेनेचं नेतृत्व केलं होतं.

इंद्रदेवांच्या मोठ्या मूर्तीमागून वशिष्ठांना मंद आवाज ऐकू आला. त्यांची पावलं आपोआप

तिकडे वळली. मूर्तीमागे चार-पाच लोक सहज मावतील एवढी मोकळी जागा होती. भिंतीवर लावलेल्या एका मशालीच्या उजेडात गुरु वशिष्ठांची आणि इंद्रदेवाच्या मूर्तीची अशा दोन सावल्या जमिनीवर हेलकावत होत्या.

मूर्तीमागील जागेत त्यांना राम दिसला. गुडघ्यांवर बसून तो लोखंडांच्या दांड्यांनी संरक्षित एका मोठ्या दगडावर कोरलेला शिलालेख पाहात होता. वाचून झाल्या क्षणी त्याला आसपास गुरु वशिष्ठांची चाहूल लागली.

'गुरुजी,' म्हणत राम तात्काळ उठून उभा राहिला.

वशिष्ठ त्याच्याजवळ गेले. त्यांनी रामाच्या खांद्यावर आपला हात ठेवत त्याला पुन्हा बसता केला. मग राम जो शिलालेख वाचत होता तो पाहू लागले.

'यात काय लिहिलं आहे ते तू वाचू शकतोस का?' वशिष्ठांनी विचारले.

ती एक विस्मृतीत गेलेली प्राचीन लिपी होती.

'याआधी कधी मी ही लिपी पाहिली नव्हती,' राम म्हणाला.

'ही अति प्राचीन लिपी आहे. ही असुरांची लिपी असल्याकारणाने भारतात या लिपीचा वापर निषिद्ध आहे.'

'असुर महान पौरुष संस्कृतीचे पालन करणारे साम्राज्य होते असं आज आपण सांगितले, हो ना?'

'हो.'

रामने शिलालेखाकडे बोट दाखवून विचारले, 'यात काय लिहिले आहे, गुरुजी?'

वशिष्ठांनी शिलालेखातील अक्षरांवर आपली तर्जना फिरवीत ती वाचली. मग म्हणाले, "ब्रह्मांड शुक्राचार्यांचं नाव कसं काय घेऊ शकेल? कारण ब्रह्मांड किती छोटं आहे आणि गुरु शुक्राचार्य किती महान आहेत."

'रामनं हलकेच शिलालेखावरील लिपीतील अक्षरांना स्पर्श केला. हा दगड त्यांचं आसन होतं अशी आख्यायिका आहे. ते याच आसनावर बसून शिकवीत असत.' वशिष्ठ म्हणाले.

राम वशिष्ठांकडे पाहात म्हणाला, 'गुरुजी, मला त्यांच्याबद्दल सांगा.'

'आजही काही लोकांची अशी समजूत आहे की या पृथ्वीतलावर जन्माला आलेल्या महान भारतीय व्यक्तीमत्वांपैकी शुक्राचार्य एक होते. त्यांच्या बालपणाविषयी मला फारशी माहिती नाहीय. अपुष्ट माहितीनुसार त्यांचा जन्म इजिप्तमधील एका गुलाम कुटुंबात झाला होता. बालपणातच त्यांच्या कुटुंबाने त्यांचा त्याग केला होता. एका असुर यात्रेकरू राजकुमारीने त्यांना दत्तक घेतले आणि भारतात आणून आपल्या मुलाप्रमाणे त्यांचे संगोपन केले. पण त्यांनी केलेल्या कामाचे जवळ जवळ सर्व पुरावे जाणूनबुजून नष्ट केले गेले. आणि जे थोडेफार उरले होते त्याचे स्वरूप तत्कालीन संपन्न अभिजात वर्गाने पूर्णपणे बदलून टाकले. पण शुक्राचार्य एक तल्लख आणि मोहून टाकणारं व्यक्तीमत्व होतं. त्यांनी उपेक्षित, अधिकारशून्य भारतीय राजांना घेऊन त्याकाळी अजेय सेना निर्माण केली होती.'

'अधिकारशून्य, उपेक्षित भारतीय राजांना घेऊन? पण असुर विदेशी होते, हो ना?'

'अर्थातच नाही. हा काही लोकांनी पद्धतशीरपणे केलेला दुष्प्रचार आहे. कित्येक असुर देवांचे नातलग होते. आणि खरं हेच आहे की देव आणि असुर एकाच पूर्वजांचे, मानसकुळाचे, वारस होते. असुर मोठ्या कुटुंबातील गरीब आणि दुर्बल नातेवाईक असल्याकारणाने लोक त्यांचा

तिरस्कार करत किंवा त्यांना विसरून जाणं अधिक पसंत करत. शुक्राचार्यांनी कठोर मेहनत, शिस्तबद्धता, एकी आणि असुरांप्रती कर्मठ निष्ठा इत्यादी तत्वांवर आधारित भक्कम तत्वज्ञानाच्या आधारे त्यांना पुन्हा एकत्र आणलं आणि नवी आव्हानं पेलायला तयार केलं.'

'पण केवळ एवढ्याने विजय मिळवणं आणि अधिसत्ता स्थापन करणं शक्य नाही. मग त्यांना असं नेत्रदीपक यश मिळण्यामागे काय कारण होतं?'

'ते क्रूर, जंगली योद्धे होते म्हणून त्यांना विजय मिळाला असं असुरांचा तिरस्कार करणाऱ्यांचं म्हणणं होतं.'

'पण आपणास हे मान्य नाही, हो ना? '

'देवसुद्धा पराक्रमी होते. ते क्षत्रियांचं युग होतं. योद्ध्यांच्या गुणांची सगळीकडे वाहवा होत असे. सुर असुरांहून वरचढ नसले तरी असुरांइतकेच युद्धकलेत निपुण होते. असुरांचा त्यांच्यातील एकीमुळे, समान उद्देशामुळे विजय होत असे, देवांमध्ये कैक मते होती, त्यामुळे त्यांचे पारडे थोडे हलके पडत असे.'

'पण मग हळूहळू असुरांचा ऱ्हास कसा झाला? ते नरम पडले का? देवांनी त्यांच्यावर विजय कसा मिळवला?'

'बहुतेकदा असं घडतं, की आपल्या यशाचं कारणच काही काळानंतर आपल्या अपयशाला कारणीभूत ठरतं. शुक्राचार्यांनी सर्व असुरांना 'एकम्' म्हणजे 'एकच देव' या संकल्पनेच्या आधारे एका छत्राखाली आणलं होतं. एका देवाची पूजा करणारे सारे त्यांच्या लेखी समानच होते.'

रामने हरकत घेत म्हटलं, 'पण हा नवा विचार नव्हता! ऋग्वेदातही एकम्, सर्वशक्तीमान एकचा उल्लेख आहेच ना? आजही आपण याला सर्व आत्म्यांचा एक बिंदू – परमात्मा मानतोच ना? स्त्रैणसिद्धांतांच्या आधारे चालणारे देवसुद्धा एकम् चे तत्व मानत असत.'

'या दोहोतील एक सूक्ष्म फरक तुझ्या लक्षात येत नाहीय, सुदास. ऋग्वेदात स्पष्टपणे सांगितलेलं आहे की एकम् म्हणजे एक देव. आपली आत्मिक उन्नती व्हावी म्हणून, त्याच्या अनेक सूक्ष्म रूपांना जाणता जाणता आपण त्याला त्याच्या मूळ रूपांत ओळखू शकू या अपेक्षेने तो अनेक स्वरूपांत, अनेक देवांच्या रूपाने आपल्यासमोर येतो. आपल्या आसपास पसरलेल्या निसर्गातही वैविध्य आहे. आपण वैविध्याशी लगेच जोडले जातो. शुक्राचार्य वेगळे होते. पण शुक्राचार्यांनी याचं प्रतिपादन वेगळ्या प्रकारे केलं, त्यांनी सांगितलं की या एकम् ची इतर सर्व रूपे मिथ्या आहेत. ती आपल्याला माया, म्हणजेच भासमय दुनियेत घेऊ जातात. एकम् हा एकमेव खरा देव, एकमेव वास्तव आहे. त्या काळात हे विचार अतिशय उग्र होते. यामुळे आध्यात्मिक क्षेत्रातील उतरंड, पदानुक्रम नष्ट झाले. एकम् वरील त्यांच्या विश्वासामुळे वेद जाणणारे आणि न जाणणारे सगळे समान पदावर आले.'

'यामुळे संपूर्ण मानव जात समानपदाला पोहोचली.'

'खरंय तुझं. कारण काही काळपर्यंत ही व्यवस्था उत्तम चालली. कारण या व्यवस्थेत असुरांमधील सगळे भेदभाव नष्ट झाले होते. इतकेच नव्हे तर, ही पद्धत लागू झाल्यानंतर देवादि इतर समुदायातील उपेक्षित आणि शोषित लोकही असुरांना येऊन सामील होऊ लागले, कारण या नव्या पद्धतीत त्यांची सामाजिक पत अचानक उंचावू लागली. पण मी जसं बरेच वेळा सांगत असतो तशी प्रत्येक गोष्टीची जशी चांगली बाजू असते तशीच वाईट बाजूही असते. असुरांना वाटत असे की एकम् ला मानणारे सर्व समान असतात. पण एकम् ला न मानणाऱ्यांबद्दल त्यांचे

विचार काय होते?'

'ते त्यांच्या बरोबरीचे नव्हेत, असंच ना?' रामने अंदाजानं विचारलं.

'हो. विविधता न मानणाऱ्या सगळ्यांनीच एक देवतेच्या संकल्पनेचा स्वीकार केला पाहिजे या असुरांच्या भूमिकेतून असहिष्णुता निर्माण झाली. उपनिषदांमध्ये अशा शक्यतेबद्दल सावध केलं गेलेलं आहे.'

'हो. मला ते स्तोत्र, विशेषतः त्यातील हा दोहरा पाठ आहे- छोट्या मुलाच्या हातात धारदार तलवार देणं ही उदारता नव्हे तर बेजबाबदारपणा आहे. असुरांच्या बाबतीतही हेच झालं ना?'

'हो. शुक्राचार्यांनी ज्यांची आपले शिष्य म्हणून निवड केलेली होती, जे त्यांच्या निकट सानिध्यात होते त्यांच्याजवळ एकम् ची ही पूर्णपणे नवी संकल्पना समजण्याची बौद्धिक आणि आध्यात्मिक कुवत होती. पण असुरांच्या साम्राज्याचा अपेक्षित अफाट विस्तार झाला आणि या विस्तारात नाना प्रकारचे लोक प्रचंड संख्येने सामील झाले. कालांतराने या लोकांचा एकम् वरील विश्वास कायम राहिला, पण त्यांची संपूर्ण समर्पणाची कल्पना तीव्र होत गेली आणि ते अधिकाधिक कट्टर बनत गेले. आपला देवच खरा आणि इतरांचे देव खोटे अशी भावना त्यांच्यामध्ये वाढीला लागली. एकम् वर विश्वास न ठेवणाऱ्यांचा ते तिरस्कार करू लागले. इतका, की शेवटी ते त्यांची हत्या करू लागले.'

'काय?' रामच्या अंगावर काटा उभा राहिला. 'पण हे त्यांनी स्वीकारलेल्या विचारसरणीच्या विरुद्ध जाणारं होतं! एकम् च्या एका स्तोत्रात असंही म्हटलेलं आहे की एकम् नीट समजला असल्याची एकच खूण आहे आणि ती म्हणजे एका देवाची ही संकल्पना समजलेली व्यक्ती कुणाचाही द्वेष किंवा तिरस्कार करू शकणार नाही. कारण एकम् चराचरात सामावलेला आहे. जर तुम्हाला कुणा व्यक्तीबद्दल किंवा वस्तूबद्दल तिरस्कार वाटत असेल तर त्याचा अर्थ तुम्ही एकम् चा तिरस्कार करता असाच होतो!'

'हो, खरंय तुझं म्हणणं. दुर्दैवाने असुरांना मात्र आपण करतोय तेच योग्य आहे असं वाटत होतं. त्यांची संख्या वाढली तशी त्यांच्या अचानक व भयानक हल्ला करण्याचे प्रशिक्षण दिलेल्या सैनिकांनी आपल्या दहशतवादी कार्यांची सुरवात केली. त्यांनी मंदिरं भुईसपाट केली, मंदिरातील मूर्ती, इतर तीर्थस्थानांची तोडफोड केली, इतर देवांची भक्ती करण्यावर दृढ राहणाऱ्या लोकांची कत्तल केली.'

रामने खेदाने डोकं हालवत म्हटलं, 'अशा वागण्यानं त्यांनी सगळ्यांनाच आपल्या विरुद्ध केलं असावं.'

'अगदी बरोब्बर! आणि परिस्थिती पालटतेच. जेव्हा परिस्थिती पालटली तेव्हा असुरांचे कुणीही मित्र उरले नव्हते. त्याचवेळी, अनेकत्वावर विश्वास ठेवणाऱ्या देवांनी आपली मतं कधीही कुणावर लादली नाहीत. आणि लादणार कसे म्हणा, आपली नेमकी जीवनपद्धत कोणती याबद्दल त्यांची आपसातही एकवाक्यता नव्हती! त्यामुळे अचानक अशी परिस्थिती उद्भवली की देवांना मित्र निवडीचे कित्येक पर्याय उपलब्ध झाले. असुरांच्या कायमच्या चिथावण्याने, डिवचण्याने आणि हिंसेने असुरांव्यतिरिक्त इतर सारेच त्रस्त झालेले होते. त्या सगळ्यांनी असुरांच्या शत्रूशी, म्हणजेच देवांशी हातमिळवणी केली. शिवाय, असुरांपैकीच कित्येकांना असुरांकडून चाललेली अतिहिंसा मंजूर नव्हती आणि ते त्याचा विरोध करू लागले होते. अशा असुरांनी आपली राजनिष्ठा बदलली आणि ते देवांना येऊन मिळाले. अशा सर्व

परिस्थितीत असुरांचा पराजय झाला तर त्यात नवल ते काय?'

रामने मान हालवून आपली संमती दर्शवली. तो म्हणाला, 'पुरुष पद्धतीतील ही सर्वात मोठी जोखिम असते, हो ना? आपल्या विशिष्टत्वाची भावना सहज असहिष्णुता आणि कर्मठपणात बदलू शकते. विशेषतः संकटसमयी याची शक्यता अधिक असते. स्त्रैणसंस्कृतीत हे संकट उद्भवत नाही.'

'कर्मठ असहिष्णुतेमुळे बेसुमार शत्रू निर्माण होतात आणि त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचा संवाद साधणे शक्य नसते. पण स्त्री–प्रधान पद्धतीत वेगळ्या संकटांचा सामना करावा लागतो. आणि त्यापैकी सगळ्यात महत्वाचे संकट म्हणजे एखाद्या उच्च ध्येयासाठी आपला मोर्चा बांधण्याच्या कामी येणाऱ्या अडचणी. स्त्रैणपद्धतीचे अनुयायी बहुधा इतके विभागलेले असतात की कोणत्याही कारणासाठी एका निशाणाखाली त्यांना एकत्र आणण्यासाठी मोठी करामतच घडून यावी लागते.'

रामने स्त्रैणपद्धतीमुळे आजच्या भारतात पडलेल्या फुटी आणि अकार्यक्षमतांची वाइटात वाइट उदाहरणं पाहिली होती. त्यामुळे पौरुष संस्कृतीबद्दल जाणून घेण्यासाठी तो अतिशय उत्सुक वाटत होता. तो म्हणाला, 'पौरुष संस्कृतीला पुनरुज्जीवित करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. भारतात आज जी संकटे उद्भवलेली आहेत ती निवारण्यासाठी कदाचित असुरांच्या या पद्धतीतून मार्ग मिळण्याची शक्यता आहे. अर्थात असुरांची पद्धत हुबेहूब स्वीकारता येणार नाही आणि तशी ती स्वीकारली जाऊही नये. त्यात काही सुधारणा आणि फेरबदल करण्याची गरज आहे. प्रश्न विचारण्याला, शंका उपस्थित करण्यास उत्तेजन दिले पाहिजे. आणि आपल्या आजच्या परिस्थितीवर लागू पडतील असे उपाय त्याआधारे बनवून घ्यायला हवेत.'

'पण स्त्रैणपद्धत का नको?' गुरु वशिष्ठांनी विचारलं.

'मला वाटतं की स्त्रैणपद्धतीतील नेते आपल्या जबाबदारीकडे पाठ फिरवतात. ते आपल्या अनुसरणकर्त्यांना असा संदेश देतात- 'हा तुमचा निर्णय आहे.' आणि जेव्हा काही चुका घडतात तेव्हा कुणालाही त्यासाठी जबाबदार धरता येत नाही. पौरुष संस्कृतीत नेत्याला संपूर्ण जबाबदारी आपल्या माथी घ्यावी लागते. आणि नेते जेव्हा जबाबदारी स्वीकारतात तेव्हाच समाज खऱ्या अर्थाने कार्यरत होतो. संपूर्ण समाजाला तेव्हाच दिशा आणि उद्देश मिळतो. नाहीतर केवळ अंतहीन वादविवाद, विश्लेषणं होतात आणि समाज पक्षाघात झाल्यासारखा निष्क्रीय होतो.'

वशिष्ठ हसले. म्हणाले, 'तू गोष्टींचं जरा जास्तच सरळीकरण करतोयस. अर्थात, त्वरित सुधारणा, बदल हवे असतील तर पौरुष पद्धत जास्त उत्तम परिणाम साधू शकणारी पद्धत आहे याबाबतीत दुमत नाही हे मलासुद्धा कबूल आहे. स्त्रैण पद्धतीत बदल घडवून आणण्यासाठी थोडा वेळ लागतो. पण दीर्घकालीन परिणामकारकतेच्या दृष्टीने परिणाम साधण्यासाठी जरी अधिक काळ लागत असला तरी स्त्रैण पद्धत अधिक स्थिर आणि टिकाऊ ठरते.'

'इतिहासाकडून धडे घेतल्यास पौरुष पद्धतही अधिक स्थिर पद्धत ठरू शकते.'

'तू अशी नवी पद्धत आजमावण्यास तयार आहेस का?'

'नक्की, मला प्रयत्न करायला आवडेल,' रामने प्रांजलपणे सांगितले, 'माझ्या मातृभूमीप्रती- या महान देशाप्रती ते माझं कर्तव्यच आहे.'

'पौरुष पद्धत तू ज़रूर आजमाव. पण माझी एक सूचना आहे, त्या पद्धतीचं नाव तू असुर

पद्धती असं अजिबात देऊ नकोस. आज हा केवळ अपशब्द बनून राहिला आहे. त्यामुळे तू जर हा शब्द वापरलास तर सुरवातीलाच ती रसातळाला जाईल.'

'मग, आपण कोणतं नाव सुचवाल?'

'नावामुळे काहीही फरक पडत नाही. फरक पडतो तो त्यायोगे स्वीकारल्या जाणाऱ्या तत्वज्ञानामुळे. एके समयी असुर पौरुष पद्धतीचं आणि देव स्त्रैण पद्धतीचं प्रतिनिधित्व करायचे. मग असुरांचा नाश झाला आणि केवळ देवच उरले. सूर्यवंशी आणि चंद्रवंशी देवांचे वंशज म्हणजे स्त्रैण पद्धतीचे अनुयायी आहेत. पण एकूण सांगायचं तर, तुला ठाऊकच आहे, मला तुझ्याकडून ज्या अपेक्षा आहेत त्या जर तू पूर्ण केल्यास सूर्यवंशी पौरुष जीवन पद्धतीचं प्रतिनिधित्व करतील आणि चंद्रवंशी आपल्या पितरांच्या म्हणजे देवांच्या स्त्रैण पद्धतीचा वारसा पुढे चालवतील.'

रामने पुन्हा एकदा खालील शिलालेखावर नजर टाकली. ज्या अज्ञात इसमाने कित्येक वर्षांपूर्वी तो तिथे कोरला होता त्याच्याबद्दल तो विचार करू लागला. ते खरंतर वांझ बंडखोरीसारखं होतं. शुक्राचार्यांच्या नावावर सगळीकडे बहिष्कार टाकण्यात आला त्यांच्या निष्ठावान सेवकांना त्यांचे नाव उच्चारण्याचीसुद्धा बंदी होती. कदाचित सार्वजनिकरीत्या आपल्या गुरुचा सन्मान करू न शकल्याच्या जखमेवर मलम लावण्याची ही त्यांची पद्धत असावी.

वशिष्ठांनी रामाच्या खांद्यावर आपला हात टाकला. म्हणाले, 'मी तुला शुक्राचार्यांच्या जीवनाबद्दल, त्यांच्या तत्वज्ञानाबद्दल आणखी माहिती देईन. ते अलौकिक बुद्धीमान व्यक्ती होते. त्यांच्या बाबतीत धडे घेऊन तू एका मोठ्या साम्राज्याची स्थापना करू शकशील. पण एक गोष्ट लक्षात ठेव, महान व्यक्तींच्या यशातून तू बरंच काही शिकू शकशील पण त्याहून जास्त तू त्यांच्या अपयशातून आणि चुकांमधून शिकू शकशील.'

'होय गुरुजी.'

# प्रकरण 9

'गुरुजी, यानंतर बराच काळ आपली भेट होणार नाही,' नागा म्हणाला.

इंद्रदेवाच्या मंदिरात शुक्राचार्यांवर झालेल्या राम आणि वशिष्ठांमधल्या चर्चेनंतर काही महिने उलटले होते. राजपुत्रांचे गुरुकुलातील औपचारिक शिक्षण पूर्ण झाले होते. दुसऱ्या दिवशी राजपुत्र आपल्या निवासस्थानी परत जाणार होते. आश्रमातून परत जाण्याआधी एकदा रात्रीच्या अंधारात शेवटची रपेट करण्यासाठी लक्ष्मण गेला होता. तेथून परतताना आधी एकदा पाहिल्याप्रमाणेच त्याने पुन्हा एकदा गुरुजींना एका संशयास्पद नागा व्यक्तीशी बोलताना पाहिले.

पुलाखाली ते दोघे पुन्हा एकदा भेटत होते.

'हो, हे कठिण आहे,' वशिष्टांनी मान्य करत म्हटलं, 'अयोध्येतील लोकांना माझ्या वेगळ्या जीवनाबद्दल माहित नाहीय. पण त्यांच्याशी संवाद साधण्याचा मार्ग मी शोधून काढेन.'

तो बोलत असताना त्याच्या पाठीच्या खालच्या भागातून वाढलेले मांस शेपटासारखे हालत होते. 'आपल्या जुन्या मित्राचे रावणाशी असलेले संबंध दृढ होत असल्याचे मी ऐकून आहे.'

डोळे मिटून वशिष्ठांनी खोल श्वास घेतला. मग ते मृदु आवाजात म्हणाले, 'तो नेहमीच माझा मित्र राहील. मी जेव्हा एकटा पडलो होतो तेव्हा त्याने मला मदत केली होती.'

नागाने डोळे बारीक केले. त्याची उत्सुकता जागी झाली होती. 'गुरुजी, आपण ही गोष्ट मला कधीतरी सांगायला हवी. काय झालं होतं नेमकं?'

वशिष्ठ हसले तेव्हा त्यांच्या ओठाला मुरड पडली. मग ते म्हणाले, 'काही गोष्टी न सांगितलेल्याच बऱ्या.'

आपण दुखऱ्या जागी बोट ठेवल्याचं नागाच्या लक्षात आलं. त्यानं मग पुढे न विचारण्याचा निर्णय घेतला.

'पण तू इथे का आला आहेस हे मला ठाऊक आहे,' वशिष्ठांनी विषय बदलत म्हटलं.

नागा हसत म्हणाला, 'मला ठाऊक असायला हवं.....'

'राम,' वशिष्ठ फक्त एवढंच बोलले.

नागाला आश्चर्य वाटलं असावं. तो म्हणाला, 'मला भरत असेल असं वाटलं होतं.....'

'नाही, राम. केवळ रामच.'

नागानं मान डोलावली. म्हणाला, 'हं, तो राजपुत्र राम असेल तर. आपण आमच्या मदतीवर विसंबू शकता हे आपण जाणताच.'

'हो, मला याची जाणीव आहे.'

आवाज न करता त्यांचं संभाषण ऐकत असलेल्या लक्ष्मणाला आपल्या हृदयाचे ठोके वाढत असल्याचे जाणवले.

'दादा, खरंच जग म्हणजे काय ते तुला समजत नाही,' लक्ष्मण ओरडला.

'हे इक्ष्वाकु देवा, लक्ष्मणा, जा, जाऊन झोप,' जेरीस आलेला राम पुटपुटला, 'तुला सगळीकडे

नुसत्या कट-कारवायाच दिसतात.'

'पण...'

'लक्ष्मण!'

'दादा, या लोकांनी तुला मारण्याचा निर्णय घेतलाय. मला माहीत आहे.'

'कुणीही मला मारण्याचा प्रयत्न करत नाहीय यावर तुझा कधी विश्वास बसणार आहे? गुरुजी मला का मारतील? एवढ्या मोठ्यानं रडण्याऐवजी मला सांग की कुणी मला मारण्याचा प्रयत्न का करेल?!' राम उद्गारला. 'तू रपेटीला गेला होतास तेव्हा कुणीही मला मारण्याचा प्रयत्न केला नाही. आणि आत्ता सुद्धा कुणी मला मारण्याचा प्रयत्न करत नाहीय. मी एवढा महत्वाचा कुणी लागून गेलेलो नाहीय, समजलं का? आता जा आणि झोप!'

'दादा, तुला काहीही ठाऊक नाहीय. अशा प्रकारे मी तुला कसा काय वाचवणार, मला समजत नाहीय.'

'कसं ते ठाऊक नाही, पण तू कायम माझं रक्षण करशील,' गोड आवाजात लक्ष्मणाचा गालगुच्चा घेत राम म्हणाला, 'आता जा आणि झोप.'

'दादा...'

'लक्ष्मण!'

'पुन्हा आपल्या घरात तुझं स्वागत आहे बाळा,' कौसल्या म्हणाल्या.

महाराणी कौसल्यांना आपले आनंदाश्रु लपवणं अशक्य झालं होतं. दोन्ही हातांनी रामाचे खांदे पकडून त्या रामाकडे पाहात बोलत होत्या. भावनांच्या अशा उघड प्रदर्शनानं राम थोडा अवघडला होता. आईसारखाच अठरा वर्षांच्या या अयोध्येच्या राजकुमाराचा रंग सावळा आणि त्वचा नितळ होती. त्यावर त्याने नेसलेलं पांढऱ्या रंगाचं धोतर आणि उत्तरीय शोभून दिसत होतं. रुंद खांदे, सडपातळ शरीर आणि मजबूत पाठ त्याच्या धनुर्विद्येतील कौशल्याची साक्ष देत होते. त्याच्या लांब केसांचा डोक्यावर सुंदर अंबाडा बांधलेला होता. कानात त्याने साधी कुंडलं आणि गळ्यात रुद्राक्षांची माळ घातली होती. सूर्य आणि त्याच्या फाकलेल्या किरणांच्या आकाराची त्याची कुंडले होती. सूर्याचे वंशज, सूर्यवंशी राजांचं ते प्रतीक होतं. गळ्यातील माळेत गोवलेले लंबवर्तुळाकार, तपकिरी रंगाचे रुद्राक्ष याच नावाच्या वृक्षापासून काढलेले होते. हजारो वर्षांपूर्वी भारताचं वाईट शक्तींपासून रक्षण करणाऱ्या रुद्रदेवांचं ते प्रतीक होते.

आईच्या डोळ्यांतून वाहाणारे अश्रु थांबले तेव्हा शेवटी राम आईपासून दूर सरकला. एक गुडघा टेकून बसला आणि त्याने आदराने डोकं झुकवून वडिलांना वंदन केलं. दरबारात हा सोहोळा पाहाताना शांतता पसरलेली होती. अपराजेय राजा दशरथाच्या दरबारात गेल्या दोन दशकात असा सोहोळा झाला नव्हता. महान योद्धा असलेल्या सम्राट रघुंनी म्हणजे रामच्या पणजोबांनी या दरबारासह संपूर्ण राजमहाल बनविलेला होता. युद्धातील नेत्रदीपक विजयांच्या आधारे त्यांनी अयोध्येच्या राजवंशाची शान पुन्हा प्रस्थापित केली होती. त्यांच्या अद्वितीय कामगिरीमुळेच 'इक्ष्वाकु वंश' त्यानंतर 'रघु वंश' नावाने ओळखला जाऊ लागला. रामला हा बदल आवडला नव्हता, कारण त्याला हा आपल्या वंशावळीशी विश्वासघात वाटत असे. एखाद्या व्यक्तीची कामगिरी कितीही मोठी असली तरीही त्याच्या पूर्वजांच्या कामगिरीवर तिचा झाकोळ

येऊ नये. त्याला आपलं कुटुंब 'इक्ष्वाकुचे वंशज' म्हणून ओळखलं जाणं जास्त आवडलं असतं कारण इक्ष्वाकु त्यांच्या राजवंशाचे संस्थापक होते. पण रामच्या या मताशी लोकांना फारसं काही देणंघेणं नव्हतं.

राम अजूनही गुडघा टेकून अभिवादनाच्या मुद्रेत उभा होता पण त्याच्या या अभिवादनाला अजून अधिकृत पोच मिळालेली नव्हती. सम्राटांच्या उजव्या बाजूला बसलेल्या राजगुरु वशिष्ठांची नजर त्यांच्या चेहऱ्यावर खिळली होती. राजगुरुंच्या चेहऱ्यावर सुक्ष्म नाराजी उमटलेली दिसून येत होती.

दशरथांची नजर शून्यात हरवलेली होती. ते आपल्याच विचारांत गुरफटलेले होते. सिंहासनाच्या सोनेरी सिंहाकृती दांड्यांवर त्यांचे हात विसावलेले होते. सिंहासनावरील सोनेरी रंगाचा चांदवा अमूल्य हिऱ्या-मोत्यांनी सजलेला होता. भव्य दरबार आणि सिंहासन अयोध्यावासियांच्या सामर्थ्य, पराक्रम आणि शक्तीचं प्रतीक होते. किंवा, कधीकाळी होते असं म्हणू हवं तर. भिंतींवरचे पोपडे आणि झिजलेले कंगोरे कधीकाळी भरभराटीत असलेल्या राज्याच्या या दरबाराच्या अवनतीची कहाणी सांगत होते. कदाचित कर्ज चुकवण्यासाठी सिंहासनात मढलेली हिरे-माणके खेचून काढल्याच्या खुणा दिसत होत्या. तरीही हजार खांबांचा तो दरबार खूपच भव्य दिसत होता. पण जुन्या जाणत्या नजरांना ठाऊक होतं की दरबाराच्या या मंडपानं याहून भव्य काळ पाहिलेला होता ज्याकाळी भिंतींवर ऋषी, संत आणि विद्वान लोकांच्या मूर्तींमधील जागेत रेशमी, पताका फडफडायच्या. आज त्या मूर्तींवरही धूळ साचलेली दिसत होती.

राम वाट पाहात होता आणि त्याला त्या मुद्रेत पाहून उपस्थितांमध्ये जाणवून येण्याइतपत अस्वस्थता पसरली होती. दरबाऱ्यांमध्ये चाललेली कुजबुज एका गोष्टीची पुष्टी करत होती- राम दशरथाचा आवडता पुत्र नव्हता.

राम मात्र निश्चल होता. खरं सांगायचं तर त्याला या गोष्टीचं अजिबात आश्चर्य वाटलेलं नव्हतं. तिरस्कार आणि टोमण्यांकडे दुर्लक्ष करण्याची आता त्याला संवय झाली होती. गुरुकुलातून येऊन घरी घालवलेली प्रत्येक सुट्टी त्याच्यासाठी छळासमान होती. बहुतेक लोक अगदी ठरवून केल्यासारखे त्याला त्याच्या जन्माशी जोडल्या गेलेल्या दुर्भाग्याची या ना त्या कारणाने कायम आठवण करून देत असत. मनुच्या कॅलेंडरमधील तारखेनुसार लागलेला '7032चा कलंक' विसरायला कुणीही तयार नव्हतं. या कलंकामुळे त्याचे बालपण दुःखात गेले होते, पण वडिलांसम गुरु वशिष्ठांनी त्याला एकदा जे सांगितलं होतं ते त्याला आठवलं-

'किमपि नु जानाहः वदिश्यंति। तदेव कार्यम् जानानाम्।'

लोक निरर्थक काहीही बोलत असतात, तेच त्यांचं काम असतं.

कैकयी आपल्या पतीजवळ गेल्या, गुडघ्यावर बसल्या आणि त्यांनी दशरथांचा उजवा आंशिक पंगू पाय उचलून पायटेकण्यावर टेकवला. लोकांसमोर आपलं कर्तव्यदक्ष आणि समर्पित पत्नीचं चित्र उभं करण्यात त्या अति दक्ष होत्या. एकांतात मात्र त्यांची आक्रामकता उफाळून येत असे. यावेळीसुद्धा फुत्कार टाकल्यासारख्या त्या बोलल्या, 'रामच्या अभिवादनाला उत्तर द्या. आणि संरक्षक नव्हे, वंशज म्हणा.'

सम्राटांच्या चेहऱ्यावर क्षणकाल चैतन्य झळकलं. बोलताना त्यांनी राजाला शोभेल अशा रीतीनं आपली हनुवटी उंचावली न् म्हणाले, 'रघुवंशी राम चंद्र, उठा.'

वशिष्ठांनी नाराजीने डोळे बारीक करून पाहिले आणि राम वर नजर टाकली.

दरबारात कुलीनांच्या पहिल्या रांगेत बसलेल्या एका गौरकांतीच्या स्त्रीवर त्यांची नजर गेली. त्या स्त्रीने सोन्याचे भरपूर दागिने घातले होते आणि खूप सजून त्या आल्या होत्या. त्यांच्या पाठीला बाक होता आणि चेहऱ्यावर जुन्या रोगाच्या खुणा होत्या. चेहऱ्यावरचे डाग आणि पाठीवरील कुबडामुळे सजून धजून आलेल्या असूनही दरबारात त्यांची उपस्थिती भेडसावणारी वाटत होती. शेजारी उभ्या असलेल्या पुरुषाकडे किंचित वळून त्या कुजबुजल्या, 'हं... आलं का लक्षात तुझ्या, द्रुह्यु? संरक्षक नाही बरं, फक्त वंशज.'

द्रुह्युने आदरपूर्वक मान हालवत सप्तसिंधूतील या अती श्रीमंत आणि शक्तीशाली व्यापारी महिलेला उद्देशून म्हटले, 'होय, देवी मंथरा.'

मोठा मुलगा म्हणून रामचा जो जन्मसिद्ध अधिकार होता तो त्याला दिला जाणार नाही हा स्पष्ट संकेत दरबारात उपस्थित असणाऱ्या सगळ्यांना दशरथांनी त्याला 'संरक्षक' संबोधणं टाळलं यातून मिळाला होता. राम हसतमुखानं उठून उभा राहिला तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरून सम्राटांच्या संबोधनाचं त्याला वाईट वाटल्याचं व्यक्त होत नव्हतं. हात जोडून नमस्कार करताना डोकं लववत तो खणखणीत आवाजात गंभीरपणे म्हणाला, 'या महान भूमीतील सगळ्या देवता आपलं रक्षण करोत, पिताश्री.' मग एक पाऊल मागे सरकून तो आपल्या भावांसमवेत असलेल्या आपल्या जागेवर परतला.

रामाशेजारी उभा असलेला भरत उंचीनं रामापेक्षा छोटा होता पण त्याचा बांधा थोराड होता. कित्येक वर्षे केलेल्या मेहनतीच्या कामामुळे त्याचे स्नायू पिळदार झाले होते आणि त्याच्या अंगावरच्या जखमांच्या खुणांमुळे तो आकर्षक दिसत असला तरी त्याचा दराराही वाटत असे. त्याने आपल्या आईचा गोरा रंग घेतला होता. आजच्या या सोहळ्यासाठी त्याने भडक निळे धोतर आणि उत्तरीय पेहेरले होते. आपले लांब केस बांधण्यासाठी त्याने सुंदर, नाजूक मोरपिसाचं भरतकाम असलेलं बंधन वापरलं होतं. पण त्याच्या आकर्षक व्यक्तीमत्वाचा महत्वाचा भाग होता त्याचा चेहरा आणि त्याचे डोळे. त्याचे धारदार नाक, मजबूत हनुवटी आणि खोडकरपणाने भरलेले डोळे त्याच्या व्यक्तीमत्वातील गोडवा व्यक्त करत. पण या क्षणीमात्र त्याच्या डोळ्यातून दु:ख व्यक्त होत होतं. एक काळजीभरला कटाक्ष राम वर टाकल्यानंतर तो जेव्हा आपल्या पिता दशरथांकडे वळला तेव्हा त्याच्या नजरेत राग भरलेला होता.

त्यानंतर भरत जाणून-बुजून बेफिकीरपणे चालत पुढे गेला आणि सम्राटांसमोर एक गुडघा टेकून उभा राहिला. पण त्याने मान तुकवली नाही हे पाहून दरबारातील उपस्थितांना आश्चर्याचा धक्का बसला. आपल्या पित्याकडे तो रागाने पाहात राहिला.

कैकयी अजूनही दशरथांच्या शेजारी उभ्या होत्या. त्यांनी भरतवर डोळे वटारले आणि त्याला मान लवविण्याची खूण केली. पण अशा धाकाचा परिणाम व्हावा इतका भरत आता लहान राहिला नव्हता. कुणाच्या लक्षात येणार नाही अशा रीतीने मान थोडी खाली आणून कैकयी दशरथांच्या कानात काही कुजबुजल्या. त्यांनी जे सांगितलं होतं त्याबरहुकूम दशरथ म्हणाले,

'रघुवंशी भरत, ऊठ.'

भरत आनंदाने हसला. आपल्यालाही 'संरक्षका'ची पदवी दिली गेली नाही याचा त्याला आनंद झाला. उठून उभा राहात तो सहजपणे उत्साहाने म्हणाला,

'इंद्रदेव आणि वरुणदेवांच्या कृपेनं आपणास विद्वत्ता प्राप्त होवो, पिताश्री.'

आपले भाऊ जेथे उभे होते तेथे परतताना त्याने रामला डोळा घातला. राम निर्विकार उभा होता.

त्यानंतर वंदन करण्याची लक्ष्मणाची पाळी होती. तो पुढे आला तेव्हा सभेतील उपस्थितांना त्याची भव्य शरीरयष्टी आणि प्रचंड उंची पाहून धक्का बसला. इतरवेळी नेहमी त्याचा वेष अस्ताव्यस्त असायचा, पण आज माता सुमित्रांनी आपल्या गोऱ्या राजकुमाराच्या वेषभूषेची काळजी घेऊन सभेत तो व्यवस्थित वेषात उपस्थित राहील इकडे जातीनं लक्ष पुरवलं होतं. आपल्या प्रिय भावाप्रमाणेच लक्ष्मणसुद्धा अलंकार ल्यायणं टाळत असे. आजच्या या प्रसंगी त्यानेसुद्धा वडील भाऊ रामप्रमाणे फक्त कानांत कुंडलं आणि गळ्यात रुद्राक्षाची माळ घातलेली होती. त्याने आणि त्याच्यानंतर शत्रुघ्ननेही पुढे होऊन सम्राट दशरथांना अभिवादन केलं. नेहमीप्रमाणेच लहान शत्रुघ्न या सोहोळ्यासाठी व्यवस्थित सजला होता. त्याचे केस नीट बांधलेले होते, धोतर आणि उत्तरीय नीट चापून-चोपून बसवलेलं होतं आणि मोजके दागिने घातले होते. त्या दोघांनाही सम्राट दशरथांनी महाराज रघुंचे वंशज – 'रघुवंशी' असंच संबोधलं.

त्यानंतर दरबाराच्या कामकाजाच्या पूर्ततेची घोषणा करण्यात आली. सम्राटांशेजारी उभ्या असणाऱ्या सेवकाला पुढे येण्याचा संकेत करत महाराणी कैकयी दशरथांना मदत करण्यासाठी पुढे झाल्या. आपला हात सेवकाच्या खांद्यावर ठेवून उठत असताना दशरथांची नजर आपल्या आसनावरून उठून उभ्या असलेल्या गुरु वशिष्ठांकडे गेली. दशरथांनी आपले हात जोडून त्यांना वंदन करत म्हटलं, 'नमस्ते, गुरुदेव.'

वशिष्ठांनी आपला उजवा हात उंचावून सम्राटांना आशिर्वाद देत म्हटले, 'इंद्रदेव आपल्याला दीर्घायु देवो, महाराज.'

दशरथांनी मान डोलावली आणि एकत्र उभ्या असलेल्या आपल्या मुलांवर एक धावता कटाक्ष टाकला. त्यांची नजर रामवर स्थिरावली तेव्हा ते अस्वस्थ होऊन खाकरले, मागे वळले आणि लंगडत सेवकाच्या मदतीने निघून गेले. महाराणी कैकयीसुद्धा त्यांच्या पाठोपाठ निघून गेल्या.

भालदारानं दरबारातून महाराजांच्या प्रस्थानाची ललकारी दिली तेव्हा सारे दरबारी दरबारातून बाहेर पडू लागले.

मंथरा मात्र बसल्या जागेवरून उठल्या नाहीत. दूरवर उभ्या असलेल्या चार राजपुत्रांवरून त्यांची नजर हालत नव्हती.

'काय झालं, देवी?' द्रुह्यूने कुजबुजत विचारलं.

द्रुह्युच्या हावभावावरून त्याला मंथरांची भीती वाटत असावी हे उघड दिसत होतं. मंथरा सम्राटांपेक्षा अधिक श्रीमंत असल्याची वदंता होती. शिवाय, राजमहालातील अतिशय प्रभावशाली व्यक्ती- महाराणी कैकयींशी त्यांचं व्यवस्थित जुळत असे. काही खोडकर लोक असंसुद्धा म्हणत की लंकेच्या दैत्य राजा रावणाशी सुद्धा त्यांचे सख्य आहे. तर काही विचारी लोक ही केवळ अफवा समजून दुर्लक्ष करत.

'भावांचं आपसात सख्य दिसतंय...,' मंथरा कुजबुजली.

'हो, दिसतंय खरं....'

'गंमतच आहे... वाटलं नव्हतं, पण चित्तवेधक आहे हे...'

द्रुह्यूने चौघा भावांवर एक चोरटी नजर टाकली. मग तो कुजबुजला, 'देवी, आपण कसला विचार करताहात?'

मंथरा म्हणाल्या, ‘बऱ्याच काळापासून मी याबद्दल विचार करतेय की आपण रामाला टाळू शकणार नाही. गेल्या अठरा वर्षांपासून अपमान सहन करूनही आणि होत असलेल्या बदनामीनंतरही जर तो ताठ मानेनं उभा आहे तर आपल्या लक्षात यायला हवं की तो पोलादी व्यक्तीमत्वाचा धनी आहे आणि उत्साही भरत आपल्या या मोठ्या भावाला समर्पित आहे.’

‘मग आपण काय करायला हवं?’

‘ते दोघेही योग्य आहेत. या दोघांपैकी कुणावर डाव लावायचा याचा निर्णय करणं कठिण आहे.’

‘पण भरत हा महाराणी कैकयींचा....’

‘मला वाटतं,’ आपल्या सेवकाचं वाक्य मध्येच तोडत मंथरा म्हणाल्या, ‘यांच्याबरोबरचा संवाद वाढव असं रोशनीला मी सांगते. या चौघांच्या व्यक्तीमत्वाबद्दल मला जाणून घ्यायला हवं.’

द्रुह्युला आश्चर्याचा धक्का बसला. तो उद्गारला, ‘देवी, खरोखर मला माफ करा, पण आपली मुलगी अगदी कन्याकुमारी देवीसारखी निष्पाप आहे. कदाचित तिला एवढी अवघड कामगिरी...’

‘अरे निर्बुद्धा, आपल्याला तिच्या निष्पाप, शालीन आणि सभ्य असण्याचीच तर गरज आहे. कन्याकुमारी देवीबद्दल सर्व बलवान पुरुषांना आकर्षण असतं. कारण कुमारिकांचा नेहमी आदर आणि रक्षण करायचं असतं ना!’

# प्रकरण 10

‘धन्यवाद,’ भरत म्हणाला तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर हसू विलसत होतं. उजव्या मनगटार बांधलेल्या सोनेरी राखीचं कौतुक त्याच्या डोळ्यांत दिसत होतं. एक नीट-नेटकी, ठेंगणी-ठुसकी मुलगी त्याच्या शेजारी उभी होती. तिचे नाव रोशनी.

राजकुमारांच्या स्वागत समारंभानंतर काही आठवडे उलटले होते. लक्ष्मण आणि शत्रुघ्नांच्या मनगटावर बहिणीचं रक्षण करण्याच्या प्रतिज्ञेची खूण असलेली राखी बांधून झाली होती. यावेळी रोशनीने परंपरेत थोडा बदल करत मोठ्यांपासून लहानांपर्यंत बांधण्याऐवजी लहानांपासून मोठ्यांपर्यंत राखी बांधायची असं ठरवलं होतं. अयोध्येच्या मुख्य राजवाड्याच्या आलीशान राजसी बागेत ते सगळे बसलेले होते. एका उंच टेकडीवर असलेल्या राजमहालातून अयोध्या शहर, पलीकडील भिंती आणि त्याही पलीकडे असणाऱ्या विशाल जलाशयाचा मनोरम देखावा दिसत असे. राखीव वनस्पति उद्यानासारखी बागेची रचना केलेली होती. या बागेत केवळ सप्तसिंधू प्रदेशातीलच नव्हे तर जगभरातील महान साम्राज्यातील फुलांची रोपे लावली होती. या विविध फुलांमधून व्यक्त होणारे सौंदर्य सप्तसिंधू प्रदेशातील लोकांच्या वैविध्यपूर्णतेचे जणू प्रतीकच होते. राजवाड्याकडे येणाऱ्या नागमोडी रस्त्याच्या दुतर्फा पसरलेली मैदाने अचूक भौमितिक आकारातील हिरव्यागार गवताच्या गालीच्यांसारखी दिसत होती. अयोध्येच्या वैभवाला लागलेल्या उतरत्या कळेमुळे या बागा आणि मैदानांच्या जोपासणीवर परिणाम झाला होता आणि त्यामुळे या हिरव्यागार गालिच्यात अधे-मधे मोकळी जमीन दिसू लागली होती.

रोशनीने भरतच्या कपाळावर चंदनाचा टिळा लावला. मंथरेच्या मुलीने आपल्या आईचा गोरा रंग घेतला होता, पण इतर सर्व बाबतीत मात्र ती आईपेक्षा खूप वेगळी होती हे लपून रहात नव्हतं. नाजूक आणि छोट्या बांध्याची रोशनी मंजुळ बोलणारी, नाजुक आणि छोट्या मुलांसारखी होती. पारिवारिक संपन्नता असूनही तिने अतिशय साधा पोषाख पेहेरला होता. फिकट पिवळ्या रंगाच्या अधोवस्त्रावर तिने पांढऱ्या रंगाची चोळी घातली होती. रुद्राक्षांनी बनविलेली छोटी कुंडले आणि कड्यांमुळे तिच्या गंभीर चेहऱ्यावर उत्सवी रंग चढला होता. नेहमीप्रमाणे झुबक्यात मागे बांधलेल्या कुरळ्या लांब केसांनी तिच्या चेहऱ्याला छान महिरप दिली होती. पण तिच्या व्यक्तीमत्वातील सगळ्यात जास्त जादुई परिणाम तिचे डोळे साधत असत. तिच्या डोळ्यांत निष्पाप कोमलता आणि एखाद्या देवाशी एकाकार झालेल्या योगिनीसारखा अमर्याद कनवाळूपणा होता.

भरतने आपल्या कमरेला खोचलेली सोन्याच्या मोहरांनी भरलेली थैली हातात घेऊन रोशनीला देत म्हटले, ‘हे तुझ्यासाठी.’

रोशनीने हलकेच आपली नापसंती व्यक्त केली. राखी बांधून झाल्यानंतर बहिणीला रक्कम किंवा काही भेटवस्तू देण्याची पद्धत अलीकडे निघाली होती. रोशनीसारख्या काही स्त्रियांना ही पद्धत पसंत नव्हती. ब्राह्मणांचं विद्या देण्याचं, वैश्यांचं व्यापाराचं आणि शूद्रांचं अंगमेहनतीचं काम आपणसुद्धा करू शकतो असा या स्त्रियांना स्वतःबद्दल विश्वास होता. त्यांच्यासाठी केवळ

क्षत्रियांचं कामच आव्हान देणारं ठरू शकत होतं. हिंस्र कामांसाठी लागणारं शारीरीक बळ त्यांच्याकडे नव्हतं आणि तो त्यांचा कलही नव्हता. निसर्गानं त्यांना त्याऐवजी दुसरे गुण बहाल केलेले होते. राखीपौर्णिमेला शारीरिक संरक्षणाच्या प्रतिज्ञेव्यतिरिक्त भावांकडून इतर काहीही स्वीकारणं म्हणजे स्त्रिया उणे असल्याची कबूली देण्यासारखं आहे असं त्यांना वाटत असे. असे जरी असले तरी, अर्थातच, रोशनीला दिलेली भेट नाकारण्याचा उद्धटपणा करायचा नव्हता.

'भरत, मी मोठी आहे तुझ्यापेक्षा,' रोशनी हसत म्हणाली, 'तू मला पैसे द्यावेस हे योग्य वाटत नाही. पण तू माझ्या संरक्षणाचं दिलेलं वचन मात्र मी स्वीकारते.'

'हो हो, नक्कीच,' पटकन् असं म्हणत भरतने मोहरांची थैली पुन्हा कंबरपट्ट्यात खोचली. 'तू मंथरांची मुलगी आहेस. तुला धनाची काय गरज?'

रोशनी गप्प राहिली. ती दुखावली हे रामच्या लक्षात आलं. आपल्या आईकडे असलेली अफाट संपत्ती रोशनीला अस्वस्थ करते हे रामला ठाऊक होतं. आपल्या देशातील कित्येक लोक दारिद्याच्या चिखलात अडकून पडलेले आहेत याची तिला जाणीव होती आणि तिला याचं वैषम्यही वाटत असे. तिच्या आईकरवी दिल्या जाणाऱ्या भव्य मेजवान्यांना जाणं ती शक्यतो टाळत असे. स्वतःबरोबर लवाजमा घेऊन फिरणंसुद्धा ती टाळत असे. मैत्रेयी स्मृती शीर्षकाच्या प्रसिद्ध नियमावलीत सर्वात अधिक महत्वाचं गणल्या गेलेल्या मुलांचं शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रातील कित्येक मदतकार्यांना ती आपला पैसा आणि वेळ देऊन हातभार लावत असे. आपल्या वैद्यकीय कौशल्याचा वापर ती गरजूंना मदत करण्यासाठी करत असे.

'रोशनीताई, भरतदादानं तुला राखी बांधायची परवानगी दिली हे आश्चर्यच म्हणायला हवं,' आपल्या वडील भावाला चिडवत आणि तेथे पसरलेल्या अवघड शांततेचा भंग करत शत्रुघ्न म्हणाला.

'हो तर,' लक्ष्मण शत्रुघ्नला सामील होत म्हणाला, 'आमच्या दादाला मुली आवडतात, पण केवळ भाऊ म्हणून नाही बरं.'

'आणि मुलींनाही तो आवडतो असं मी ऐकून आहे...' रोशनी म्हणाली. तेव्हा ती अत्यंत जिव्हाळ्यानं भरतकडे पाहात होती. तिने भरतला विचारलं, 'जिच्याबरोबर कायम एकत्र रहाण्याची इच्छा व्हावी अशी कुणी स्वप्नसुंदरी भेटली नाही का आजपर्यंत?'

'माझी अशी एक स्वप्नसुंदरी आहे खरी,' भरत म्हणाला, 'पण गोची अशी आहे, की मला जाग आली की ती गायब होते.'

शत्रुघ्न, लक्ष्मण आणि रोशनी खळखळून हसले पण राम त्यांना सामील होऊ शकला नाही. त्याला ठाऊक होतं की भरत आपल्या अंतरीची वेदना शर्थीनं विनोदामागे लपवतोय. अजूनही त्याचं मन राधिकामध्ये गुंतून पडलेलं आहे. तिच्यासाठी आपल्या भावनाप्रधान भावानं जन्मभर झुरत राहू नये असं रामला वाटलं.

'आता माझी पाळी' राम म्हणाला. पुढे होत त्याने आपलं उजवं मनगट पुढे केलं.

दूरवर गुरु वशिष्ठ चालले असल्याचं लक्ष्मणानं पाहिलं. लगेच त्याची शोधक नजर आसपास सगळीकडे फिरली. आपल्या गुरुंबद्दलचा संशय अजून त्याच्या मनातून निघून गेलेला नव्हता.

आपल्या मनगटावर बांधलेल्या सोनेरी राखीकडे आणि मग रोशनीकडे पाहात राम म्हणाला, 'मी कायम तुझं रक्षण करण्याची शपथ घेतो'.

रश्मीच्या ओठांवर स्मित उमललं. तिने रामाच्या कपाळावर चंदनाचा टिळा लावला. मग वळून

ती जवळच्या एका तिवईवर आरतीची थाळी ठेवण्यासाठी गेली.

'दादा!' पुढे झोपावून रामला बाजूला ढकलत लक्ष्मण ओरडला.

लक्ष्मणच्या प्रचंड ताकदीमुळे बेसावध राम बाजूला फेकला गेला. क्षणभरापूर्वी राम जेथे उभा होता तेथे एक मोठी फांदी मोठा आवाज करत कोसळली. कोसळण्यापूर्वी ती लक्ष्मणाच्या खांद्याला चाटून गेली आणि त्यामुळे त्याच्या खांद्याचे हाड तुटले. हाडाची टोकं बाहेर निघाली आणि भयानक वेगाने रक्त वाहू लागलं.

'लक्ष्मणा!' सगळे भाऊ एकसाथ ओरडले आणि लक्ष्मणाच्या दिशेने धावतच निघाले.

'तो बरा होईल,' शल्यचिकित्सा कक्षातून बाहेर पडता पडता रोशनी म्हणाली. आयुरालयाच्या प्रतीक्षालयात वशिष्ठ, राम, भरत आणि शत्रुघ्न उत्कंठेने वाट पाहात उभे होते. रुग्णालयाच्या भिंतीशी लागून ठेवलेल्या खुर्च्यांपैकी एकीवर महाराणी सुमित्रा निस्पंद बसलेल्या होत्या. त्यांचे डोळे भरून आले होते. रोशनीने दिलेली बातमी ऐकताच त्या पटकन उठल्या आणि त्यांनी रोशनीला मिठी मारली.

'कोणत्याही प्रकारचं कायमस्वरूपी नुकसान होणार नाही, महाराणी,' रोशनीने महाराणी सुमित्रांना खात्री दिली. 'त्याचं हाड पुन्हा जागेवर बसवलंय. आपला मुलगा पूर्णपणे बरा होईल. फांदी त्याच्या डोक्यावर कोसळली नाही हे आपलं नशीब.'

'लक्ष्मण एखाद्या बैलासारख्या मजबूत बांध्याचा आहे हे आपलं नशीब,' गुरु वशिष्ठ म्हणाले, 'कुणी लेचापेचा तो धक्का सहन करू शकला नसता.'

लक्ष्मणाने डोळे उघडले तेव्हा तो उच्चकुलींनांसाठी असलेल्या एका मोठ्या खोलीत होता. त्याचा बिछाना मोठा होता पण नरम-मुलायम नव्हता, त्याच्या घायाळ खांद्याला आधार देणारा होता. अंधारात त्याला स्पष्ट दिसत नव्हतं पण त्याला एक मंद स्वर ऐकू आला. काही सेकंदांतच त्याला आपल्या बिछान्यापाशी लाल डोळे घेऊन उभा असलेला राम दिसला.

मी दादाला जागं केलं लक्ष्मणला वाटलं.

लक्ष्मण जागा झाल्याचं लक्षात येताच तीन परिचारिका लक्ष्मणाच्या बिछान्याच्या दिशेने धावल्या. लक्ष्मणाने हलकेच मान हालवली आणि त्या जागीच उभ्या राहिल्या.

रामने हलकेच लक्ष्मणाच्या डोक्याला स्पर्श केला, 'लक्ष्मणा…'

'दादा… ते झाड….'

'ती फांदी कुजली होती लक्ष्मण, म्हणूनच ती कोसळली. आपलं दुर्भाग्य, दुसरं काय? आज तू पुन्हा एकदा माझे प्राण वाचवलेस….'

'दादा… गुरुजी….'

'फांदी तू आपल्या खांद्यावर झेललीस…. जो वार माझ्या भाग्यात लिहिलेला होता तो तू स्वतःवर झेललास.' बोलता बोलता राम झुकला आणि त्याने लक्ष्मणाच्या कपाळावर आपला होत ठेवला.

लक्ष्मणाला आपल्या चेहऱ्यावर एक कढत अश्रु ओघळल्याचं जाणवलं. 'दादा…'

‘बोलू नकोस. झोपायचा प्रयत्न कर. आराम कर.’ बोलता बोलता रामने आपला चेहरा दुसरीकडे वळवला.

रोशनी आयुरालयाच्या त्या कक्षात आली. तिने राजपुत्रासाठी काही औषधं आणली होती. अपघाताला आता एक आठवडा उलटला होता. लक्ष्मणाची तब्बेत आता बरीच सुधारली होती आणि एका जागी पडून तो अस्वस्थ झाला होता.

‘इतर सगळे जण कुठे आहेत?’, त्याने विचारलं.

‘परिचारिका अजून येथेच आहेत,’ हसतमुखानं रोशनी म्हणाली. एका वाटीत तिने काही औषधं खलली आणि वाटी लक्ष्मणाला दिली. ‘तुझे भाऊ आंघोळ करून कपडे बदलण्यासाठी राजवाड्यात गेले आहेत. लवकरच परततील ते.’

औषध प्यायल्यावर क्षणभर लक्ष्मणाचा चेहरा वेडावाकडा झाला आणि त्याच्या तोंडून उद्गार निघाला, ‘छी:!’

‘चव जितकी घाण तितका त्या औषधाचा चांगला परिणाम होतो!’

‘तुम्ही वैद्य रुग्णांना असे का छळता?’

‘धन्यवाद,’ रोशनी हसली. तिने वाटी एका परिचारिकेकडे सोपवली. पुन्हा लक्ष्मणाकडे वळत तिने विचारलं, ‘आता कसं वाटतंय तुला?’

‘डावा खांदा अजुनी बधीर आहे.’

‘वेदनाशामकामुळे बधीरता आहे ती,’

‘मला नकोत ती.’

‘कितीही तीव्र वेदना तू सहन करू शकतोस हे मला माहीत आहे. पण तू जोवर माझा रुग्ण आहेस, तोवर तुला वेदना सहन कराव्या लागू नयेत याची मी काळजी घेईन.’

लक्ष्मण हसला, म्हणाला, ‘मोठ्या बहिणीसारखी बोललीस.’

‘नाही, वैद्यासारखी बोलले,’ खोटं रागावत रोशनी म्हणाली. बोलता बोलता तिची नजर लक्ष्मणाच्या उजव्या मनगटावर अजूनही असलेल्या, आपण बांधलेल्या सोनेरी राखीवर गेली. बाहेर जाण्यासाठी ती वळली आणि पुन्हा थांबली.

‘काय झालं?’ लक्ष्मणने विचारलं.

रोशनीने परिचारिकांना बाहेर जाण्याची विनंती केली. मग ती पुन्हा लक्ष्मणाच्या बिछान्यापाशी आली. म्हणाली, ‘तुझे भाऊ इथे जवळ जवळ पूर्णवेळ होते. तुझ्या आईसाहेबसुद्धा आणि सावत्र आईसुद्धा आल्या होत्या. दररोज त्या तुला भेटायला येत असत. दिवसभर येथेच असत आणि फक्त झोपण्यासाठी राजमहालात परत जात. मला त्यांच्याकडून हेच अपेक्षित होतं. पण गेला आठवडाभर राम इथेच आहे, तो इथून हालला नाहीय. तो इथेच झोपला. परिचारिकांनी करायची बरीच कामे त्याने तुझ्यासाठी केली.’

‘ठाऊक आहे मला, तो माझा दादा आहे....’

रोशनी हसत सांगू लागली, ‘एकदा रात्री उशीरा तुला तपासण्यासाठी मी आले होते. तेव्हा मी त्याला झोपेत बोलताना ऐकलं. तो म्हणत होता, ‘माझ्या भावाला माझ्या पापांची शिक्षा देऊ नका, मला शिक्षा द्या, मला शिक्षा द्या.’’

‘तो प्रत्येक गोष्टीसाठी स्वतःलाच जबाबदार ठरवतो,’ लक्ष्मण म्हणाला. ‘सगळ्यांनी त्याचं जीवन नरक बनवलंय.’

लक्ष्मण कशाबद्दल बोलतोय हे रोशनीला ठाऊक होतं.

‘आपण हारलो त्याला दादा जबाबदार आहे असं लोक का म्हणतात? दादाचा फक्त त्या दिवशी जन्म झाला होता. त्या दिवशी लंकेबरोबर झालेल्या युद्धात आपण हरलो कारण आपल्यापेक्षा ते उत्तम रीत्या लढले.’

‘लक्ष्मण, तुला एवढं बोलायचं.....’

‘अशुभ! शापित! अपवित्र! कोणत्याही प्रकारे अपमान करणं बाकी ठेवलं नाही. तरीही तो खंबीरपणे, भक्कम उभा आहे. तो कुणाचा तिरस्कार करत नाही, कुणावर चिडत नाही. खरं तर, जन्मभर संपूर्ण जगावर चिडावं असं जग त्याच्याशी वागलं. पण त्यानं सन्मानाचं जिणं पसंत केलं. तो कधीच खोटं बोलत नाही, तुला ठाऊक आहे का, तो कधीही खोटं बोलत नाही!’ बोलता बोलता लक्ष्मण रडू लागला. ‘आणि तरी तो एकदा खोटं बोलला. फक्त माझ्यासाठी! परवानगी नाही हे ठाऊक असूनसुद्धा मी एकदा रात्री रपेटीसाठी गेलो होतो. मी पडलो आणि मला खूप लागलं. आईसाहेब एवढ्या रागावल्या होत्या. पण मला कुणी रागं भरू नये म्हणून दादा खोटं बोलला. तो म्हणाला, मी त्याच्या सोबत तबेल्यात होतो आणि घोड्यानं मला लाथ मारली. माझ्या आईसाहेबांचा त्याच्यावर पटकन् विश्वास बसला. कारण दादा कधीही खोटं बोलत नाही. त्यानं आपल्या आत्म्यावर डाग लागू दिला. मला माझ्या आईसाहेबांच्या रागापासून वाचविण्यासाठी तो खोटं बोलला. तरीही लोक त्याला काय काय म्हणतात.....’

रोशनीने पुढे होऊन हळुवारपणे लक्ष्मणाच्या चेहऱ्याला स्पर्श केला. त्याच्या गालांवरून ओघळणारे अश्रू पुसले.

तो मात्र तीव्र आवेगाने बोलत राहिला. त्याच्या गालांवरून अश्रू ओघळत राहिले. ‘एक वेळ अशी येईल की जगाला तो किती मोठा माणूस आहे ते समजेल. सूर्याला काळे ढग कायम व्यापू शकत नाहीत. एके दिवशी आभाळ मोकळं होईल. लखलखीत प्रकाश पसरेल. त्यावेळी सगळ्यांना समजेल माझा दादा किती मोठा आहे ते.’

‘मला ते आत्ताही माहीत आहे,’ रोशनी कोमल स्वरात म्हणाली.

मंथरा कार्यालयातील आपल्या कक्षात खिडकीपाशी उभ्या होत्या. त्यांच्या राजेशाही महालाच्या एका टोकाला त्यांचं कार्यालय होतं. त्यांच्या इस्टेटीला उत्तम प्रमाणबद्ध बाग व्यापून होती. ती मोठी असली तरी राजमहालाला लागून असणाऱ्या बागेपेक्षा छोटी होती आणि हे विचारपूर्वक ठरवून आखलेलं होतं. मंथराचा महालसुद्धा एका टेकडीवर होता पण ती टेकडी राजमहाल असलेल्या टेकडीहून थोड्या कमी उंचीची होती. त्यांच्या निवासस्थानावरून त्यांच्या सामाजिक स्थितीची उत्तम कल्पना येत असे.

ती एक अतिशय कुशाग्रबुद्धीची महिला उद्योजक होती यात कोणतीही शंका नाही, शिवाय ती चाणाक्ष होती. सप्तसिंधू प्रदेशातील व्यापार-उद्योगाविषयी असलेल्या अननुकूल वातावरणामुळे प्रचंड संपत्ती असूनही समाजातील त्यांचं स्थान निम्न होतं. हे त्यांच्या तोंडावर बोलण्याचं धाडस कुणामध्येच नव्हतं पण लोक आपल्याबद्दल- ‘विदेशी- राक्षस रावणाचा फायदा कमावणारा

हुजऱ्या', असं बोलतात हे त्यांना चांगलंच ठाऊक होतं. खरी गोष्ट ही होती की, सर्व व्यापारी-उद्योजकांना रावणाच्या लंकावासी व्यापाऱ्यांशीच सौदे करावे लागत असत, याला कोणताही पर्याय नव्हता कारण सप्तसिंधू प्रदेशातील विदेश व्यापाराचे एकाधिकार राक्षसांच्या या राजाकडे सुरक्षित होते. ही संधी व्यापाऱ्यांकरवी नव्हे तर अयोध्येच्या राजाकरवी केली गेली होती आणि सप्तसिंधू प्रदेशातील सर्व व्यापाऱ्यांवर या करारातील नियम पाळणे बंधनकारक होते. सगळ्यात जास्त यशस्वी उद्योजक असल्याकारणाने व्यापारी विरोधी पूर्वाग्रहांचा परिणाम मंथरांना सर्वात अधिक सोसावा लागत होता.

पण मंथरांना बालपणी बरेच अपमान सहन करावे लागले होते त्यामुळे अशा प्रकारचे अपमान सहन करणे हे त्यांच्या जवळ जवळ अंगवळणी पडले होते. गरीब कुटुंबात त्यांचा जन्म झाला होता. लहानपणी त्यांना देवी झाल्या होत्या. त्यामुळे त्यांच्या निस्तेज चेहऱ्यावर कायमस्वरूपी व्रण पडले होते. हे थोडं म्हणून की काय, वयाच्या अकराव्या वर्षी त्यांना पोलियो झाला. काळानुरूप त्याची इतर सगळी लक्षणं नष्ट झाली, पण उजव्या पायाला मारलेला लकवा मात्र थोड्याफार प्रमाणात उरला होता ज्यामुळे त्यांना किंचित लंगडत चालावं लागत असे. वीस वर्षांची असताना चालण्याच्या विचित्र ढबीमुळे त्या एकदा मैत्रिणीच्या घरी गेल्या असता गच्चीवरून खाली कोसळल्या होत्या ज्यामुळे त्यांच्या पाठीत विचित्र व्यंग निर्माण झालं होतं. त्यामुळे त्या वयात त्यांची अतिशय क्रूर थट्टा केली जात असे. आजही त्यांच्याकडे तिरस्कारानेच पाहिलं जातं. अर्थात्, सांपत्तिक स्थितीमुळे कुणीही ही गोष्ट त्यांना तोंडावर बोलून दाखवत नसे. त्यांच्याकडे अफाट संपत्ती होती. इतकी की त्यातून कौसलच्या आणि इतर काही राजांच्या कुटुंबांचा सारा राजसी खर्च एका पैशाचंही कर्ज न घेता निघू शकत होता. म्हणूनच, या संपत्तीमुळेच त्यांना प्रचंड ताकत मिळाली होती आणि लोकांना त्यांची भीड वाटायची.

'देवी, आपल्याला काही बोलायचं होतं?', द्रुह्यूने त्यांच्यापासून अदबीने काही फुटांच्या अंतरावर उभं राहून त्यांना विचारलं.

खास त्यांच्यासाठी बनविलेल्या गिरद्यांच्या खुर्चीवर बसून मंथरा कार्यालयातील आपल्या टेबलावर मरगळून टेकल्या होत्या. द्रुह्यू त्यांच्या समोर, टेबलापलीकडे उभा होता.

त्यांनी आपलं बोट वाकवून इशारा केला आणि लगेच द्रुह्यू टेबल ओलांडून त्यांच्या जवळ गेला आणि गुडघ्यांवर बसून त्या काय सांगताहेत ते ऐकू लागला. त्यावेळी कार्यालयात त्यांच्याव्यतिरिक्त इतर कोणीही नव्हतं. त्यामुळे त्यांच्यात झालेल्या बोलण्यातील अवाक्षरही कुणाला कळण्याची शक्यता नव्हती. सर्व मदतनीस तळमजल्यावरील सचिवालयाच्या जोड इमारतीत होते. द्रुह्यूला त्यांच्या मौनाचा अर्थ समजत असे. त्यांच्याशी वाद घालण्याचं साहस त्याच्यात नव्हतं. म्हणून तो त्यांच्या बोलण्याची वाट पाहात राहिला.

'जे जाणलं पाहिजे ते सगळं मला कळलंय,' शेवटी मंथरांनी घोषणा केली. त्या पुढे म्हणाल्या, 'माझ्या गोड मुलीने - रोशनीने नकळत चारही राजपुत्रांच्या चारित्रिक विशेषतांबद्दल माहिती पुरवली. मी यावर सखोल विचार केला आणि निर्णय घेतले. भरतकडे परराष्ट्रनीतीसंबंधी कार्याची सूत्रं सोपवावी आणि राम नगर रक्षक दलाचा प्रमुख बनेल.'

द्रुह्यूला हे ऐकून आश्चर्य वाटलं. तो म्हणाला, 'पण, आपला कल राजपुत्र रामकडे असावा असं मला वाटलं होतं, देवी.'

परराष्ट्रनीतिविषयक काम मिळणं हे अयोध्येच्या राजकुमारासाठी अतिशय उत्तम संधी

मिळण्यासारखं होतं कारण या कामानिमित्ताने इतर राज्यांशी संबंध निर्माण करण्याची संधी मिळाली असती. आणि अशा प्रकारे भविष्यातील एका मजबूत साम्राज्याचा पाया तयार करता येणार होता. अयोध्या अजूनही सप्तसिंधू संघाचा सर्वाधिपती होता पण आता त्यात आधीएवढा बलशालीपणा नव्हता. म्हणून, इतर राजांबरोबर संबंध वाढवण्याचा फायदा झाला असता.

या तुलनेत नगर रक्षक दलाच्या प्रमुखाचं पद एका राजपुत्रायोग्य नव्हतं. राज्यात अपराध दर वाढले होते, कायदा आणि सुव्यवस्थेची अतिशय वाईट स्थिती होती आणि बहुतेक धनाढ्य घराण्यांनी आपल्या पदरी सुरक्षा पथकं बाळगली होती. यामुळे गरीबांचे हाल होत होते, अर्थात, राज्यातील एकूण बिकट स्थितीचे वर्णन अशा सरळ-साध्या शब्दांत करता येणं शक्य नव्हतं. खरं तर या गोंधळाच्या स्थितीला बऱ्याच मोठ्या प्रमाणात लोक स्वतःसुद्धा कारणीभूत होते. एकदा गुरु वशिष्ठ याबाबत म्हणाले होते की, कमी प्रमाणात लोक जर कायद्याची पायमल्ली करत असतील तर सुव्यवस्था राखणं राज्याला शक्य असतं. पण सगळेच जर कायदा धाब्यावर बसवू लागले तर निर्माण होणारा गोंधळ आणि बदल रोखणं अशक्य असतं. आणि परिणामांची क्षिती न बाळगता अयोध्येतील प्रत्येक जण बिनधास्त कायदा मोडत होते.

भरतने जर परराष्ट्रनीतीची सूत्रं व्यवस्थितपणे सांभाळली तर यथावकाश दशरथानंतर गादी सांभाळण्यासाठी तो उत्तम दावेदार ठरला असता आणि राम नसत्या उठाठेवीत गुंतून पडला असता. तो जर कठोर झाला आणि जर त्याने राज्यातील अपराध दर खाली आणला तर लोक त्याच्या क्रूरपणासाठी त्याचा तिरस्कार करू लागले असते. जर तो सहृदय राहिला असता तर राज्यातील अपराधांचा दर असाच वाढता राहिला असता आणि याचं खापर लोकांनी त्याच्या डोक्यावर फोडलं असतं. आणि जरी कोणत्या तरी जादूने त्याला अपराधांवर नियंत्रण ठेवून लोकप्रियता मिळवता आली असती तरी त्याचा त्याला कोणताही फायदा झाला नसता. कारण भावी राजा निवडण्यात प्रजेच्या मताला काही किंमत नव्हती.

'हो, राम मला आवडतो,' टाळल्यासारखं मंथरा बोलल्या, 'पण मला नफा कमावणं त्याच्याहून जास्त आवडतं. आपल्या व्यवसायाच्या दृष्टीनं योग्य घोड्यावर पैज लावणं कधीही फायदेशीरच ठरेल. आणि हे राम किंवा भरत यांच्यामधून निवड करणं नाहीय, ही निवड कौसल्या आणि कैकयीमधील निवड आहे. आणि मला खात्री आहे, यात कैकयीच खात्रीशीररीत्या जिंकेल. रामाकडे योग्यता असेलही पण कैकयीचा सामना करण्याचं सामर्थ्य राममध्ये नाही.'

'होय, देवी.'

'शिवाय, कुलीनगण रामचा तिरस्कार करतात हे विसरू नकोस. करछपच्या लढाईतील पराभवासाठी ते त्याला कारणीभूत मानतात. म्हणून, रामसाठी उत्तम पद राखून ठेवणं आपल्याला महागात पडेल. खूप धन खर्चून लालूच द्यावी लागेल. परराष्ट्र नीती प्रमुख पदावर भरतला स्वीकारण्यासाठी आपल्याला तेवढी रक्कम खर्च करावी लागणार नाही.'

'आपला खर्चही कमी होईल,' हसतच द्रुह्यू म्हणाला.

'हो, व्यवसायाच्या दृष्टीनं हे सुद्धा चांगलंच आहे.'

'आणि, मला वाटतं, यासाठी महाराणी कैकयी आपल्या कृतज्ञ राहातील.'

'आणि त्यामुळे आपलं नुकसान नक्कीच होणार नाही.'

'देवी, याबाबतीत मी सगळं सांभाळेन. सध्या राजगुरु वशिष्ठ अयोध्येत नाहीत, त्यामुळे आपलं काम सोपं होणार आहे. ते राजकुमार रामाचे कट्टर समर्थक आहेत.'

तोंडातून शब्द बाहेर पडल्यानंतर द्रुह्यूंना राजगुरुंचं नाव घेतल्याचा पश्चाताप झाला.

‘गुरुजी कुठे आहेत याचा तू अजून शोध घेऊ शकला नाहीस, होय ना?’ वैतागून मंथरांनी विचारलं. ‘इतके दिवस ते गेलेत तरी कुठे? ते परत कधी येणार आहेत? तुला काहीही माहीत नाही!’

‘नाही, देवी,’ द्रुह्यू म्हणाला. मान खाली घालत त्याने माफी मागितली, ‘माफ करा मला.’

‘कधी कधी मला वाटतं की मी याला एवढा लठ्ठ पगार देऊन कामावर ठेवलंच कशासाठी मी?’

द्रुह्यू गप्प उभा राहिला. पुढे एकही शब्द उच्चारण्याची त्याला भीती वाटली. हात उंचावून मंथराने त्याला तेथून निघून जाण्याचा इशारा केला.

# प्रकरण 11

‘तू अतिशय उत्तम रक्षादलप्रमुख बनशील,’ रोशनी म्हणाली. आनंदाने तिचे डोळे छोट्या मुलांच्या डोळ्यांसारखे लुकलुकत होते. ‘अपराध कमी होतील आणि आपल्या प्रजेच्या दृष्टीने ते उत्तम ठरेल.’

मनावर कसलातरी ताण असल्यासारखा हिरमुसला होऊन बसलेल्या रामसोबत राजमहालाच्या बागेत रोशनी बसली होती. रामला उपसेनाप्रमुख पद किंवा तत्सम जबाबदारी मिळण्याची अपेक्षा होती. अर्थात तो हे आत्ता रोशनीला सांगणार नव्हता.

‘मला हे झेपेल असं वाटत नाही,’ राम म्हणाला. ‘उत्तम नगररक्षक प्रमुखाला लोकांच्या सहयोगाची गरज असते. आणि तुला तो मिळणार नाही असं तुला वाटतं का?’

रामाच्या ओठांवर निस्तेज हसू उमटलं. तो म्हणाला, रोशनी, तू खोटं बोलत नाहीस हे मला ठाऊक आहे. लोक मला सहयोग देतील असं तुला खरंच वाटतं का? लंकेकडून झालेल्या आपल्या पराभवाला सगळेजण मीच कारणीभूत आहे असं समजतात. माझ्यावर ‘7032चा कलंक’ लागलेला आहे.

थोडं पुढे सरकून रोशनी मनापासून बोलू लागली, ‘तुझा केवळ कुलीनांशी म्हणजे, आपल्यासारख्या लोकांशी संबंध आलेला आहे. ज्यांना आपण ‘जन्मजात बरोबर’ आहोत असं वाटत असतं. हो, या लोकांना तू आवडत नाहीस हे खरं आहे. पण राम, आणखी एक अयोध्या आहे जिथे कुलीनांच्या दृष्टीनं ‘जन्मजात चुकलेले’ लोक म्हणजे सामान्य लोक रहातात. या दोन वर्गात कोणत्याही प्रकारचं प्रेम किंवा आपलेपणा नसतो. आणि लक्षात ठेव, कुलीनांकडून छळ केला गेलेल्या कुणाबद्दलही- अगदी एखाद्या कुलीनाबद्दलही –त्यांच्या मनात सहानुभूती असते. केवळ कुलीनांना तू आवडत नाहीस म्हणून सामान्य लोक तुझ्यावर प्रेम करतील. आणि याच कारणासाठी ते तुझे अनुयायीसुद्धा बनतील.’

तोपर्यंत राम केवळ राजसी विश्वातील अनुभवांच्या बुडबुड्यात जगत आला होता. रोशनी ज्या जगाबद्दल बोलत होती त्याचा त्याला अजिबात अनुभव नव्हता, त्यामुळे या वेगळ्या जगाबद्दल त्याच्या मनात कुतूहल निर्माण झालं.

‘आपल्यासारखे लोक खऱ्या जगात कधी पाऊलच टाकत नाहीत. तिथे काय चाललंय याचा आपल्याला पत्ता नसतो. मी सामान्य लोकांमध्ये मिसळते. माझा त्यांच्याशी संवाद घडतो. आणि मला असं वाटतं की मी त्यांना थोडंफार ओळखते. एक प्रकारे तुझा तिरस्कार करून कुलीनांनी तुझ्यावर उपकारच केलेत. त्यांनी तुला सामान्य प्रजेत लोकप्रिय बनविण्यासाठी तुझी मदतच केलीय. आपलं ऐकून घेण्यासाठी आता तू त्यांचं मन वळवू शकतोस. या शहरातील अपराधावर तू नाटकीयरीत्या नियंत्रण आणू शकशील याबद्दल माझी खात्री आहे. तू बरंच काही बदलू शकशील, चांगलं घडवून आणू शकशील. माझा जितका तुझ्यावर विश्वास आहे, तेवढा तू स्वतःवर विश्वास ठेव न् मग बघ.’

वर्षभरातच रामनं जे बदल लागू केले होते त्यांचे परिणाम दिसून येऊ लागले. त्याने मुख्य समस्येलाच हात घातला – बहुतेक लोकांना कायदे माहीतच नव्हते. काही लोकांना कायद्याच्या पुस्तकांची म्हणजे स्मृतींची नावंसुद्धा माहित नव्हती. यालाही एक कारण होतं. कित्येक प्रकारचे कायदे, ज्यापैकी काही परस्परविरोधी सुद्धा होते असे कायदे शतको-न्-शतकं बनत राहिले होते. मनु स्मृती लोकांना ठाऊक होती, पण मनुस्मृतीच्यासुद्धा कैक आवृत्या आहेत हे सुद्धा कित्येक लोकांना ठाऊक नव्हतं. उदाहरणार्थ- बृहद् मनुस्मृती. इतरही काही लोकप्रिय आवृत्या आहेत. उदा.– याज्ञवल्क्य स्मृती, नारद स्मृती, अपस्तंभ स्मृती, यम स्मृती आणि व्यास स्मृती. इ. नगर रक्षक त्यांना माहित असलेल्या आवृत्तीतील कायदा तात्कालिक रूपानं लागू करत असत. न्यायालयात न्यायाधीशांना त्यांचा जन्म ज्या जमातीत झालेला असेल त्यानुसार दुसऱ्याच कोणत्यातरी स्मृतींच्या आवृत्तीचं ज्ञान असायचं. रक्षकगण एका स्मृतीतील कायद्याखाली अटक करत आणि न्यायाधीश न्याय देण्यासाठी स्मृतीच्या दुसऱ्याच आवृत्तीतील कायद्याचा निकष लावीत. अशावेळी शंका निर्माण होत ज्या पुढे कटुतेत परिवर्तीत होत आणि यामुळे प्रचंड गोंधळ माजत असे. अपराधी वेगवेगळ्या स्मृतींमधील कायद्यातील पळवाटांचा आणि विसंगतींचा फायदा घेऊन आपली सुटका करून घेत. त्याचवेळी कित्येक निरपराधी केवळ अज्ञानामुळे तुरुंगात खितपत पडून रहात आणि तुरुंगांमध्ये प्रचंड गर्दी होऊन जाई.

कायदा सरळसोपा करून त्याचे एकीकरण करण्याची गरज आहे हे रामने ओळखले. त्याने स्मृतींचा अभ्यास केला आणि योग्य, सुसंगत, साध्या आणि आपल्या काळाशी सुसंबद्ध कायदे निवडले. त्यानंतर अयोध्येत या कायद्याचं पालन होईल आणि इतर सर्व स्मृतींच्या आवृत्ती प्रचारात नसल्याचं घोषित केलं. शिलांवर हे कायदे कोरून त्या शिला अयोध्येतील मंदिरांत बसवण्यात आल्या. यापैकी बहुतेक शिलालेखांच्या शेवटी एक वाक्य कोरण्यात आलं होतं – कायद्याबद्दलचं अज्ञान माफीसाठी सबब ठरू शकत नाही. दवंडी पिटणाऱ्यांना दररोज सकाळी कायद्याचं सार्वजनिक वाचन करण्याचं काम दिलं गेलं. यामुळे केवळ काही दिवसांत सगळ्यांना कायद्याचं ज्ञान मिळालं.

सामान्य लोकांकरवी लवकरच रामला एक बिरूद बहाल करण्यात आलं – 'न्यायप्रवर्तक राम'

रामने केलेली दुसरी सुधारणा याहून क्रांतीकारी होती. त्याने नगर रक्षक दलाला हा कायदा निर्भीडपणे आणि निडरपणे लागू करण्याचा अधिकार दिला. रामला एक साधी गोष्ट माहीत होती- समाजाने आपला आदर करावा अशी नगर रक्षक दलाची अपेक्षा होती. याआधी आदर कमावण्याची अशी संधी त्यांना दिली गेली नव्हती. कायद्याचं उल्लंघन करणाऱ्या उच्च आणि बलवानांविरुद्ध जर त्यांनी बिनदिक्कत योग्य ती कारवाई केली असती तर लोकांमध्ये त्यांच्याबद्दल भीतीयुक्त आदर निर्माण झाला असता. रामने बऱ्याच वेळा दाखवून दिलं की कायदा त्याच्यावरसुद्धा समानरूपे लागू होतो.

याबाबतीत एक उदाहरण वरचेवर दिले जात असे. राम एकदा संध्याकाळ उलटून गेल्यानंतर शहरात परतत होता. त्यावेळी गडाचे दरवाजे बंद असत. किल्लेदारानं गडाचे दरवाजे राजकुमारासाठी उघडले तेव्हा रामनं त्याला- 'रात्रीच्या वेळी कुणीही आले तरी गडाचे दरवाजे उघडले जाणार नाहीत' हा नियम मोडल्याबद्दल समज दिली. ती रात्र रामने शहराबाहेर घालवली आणि दुसऱ्या दिवशी गडाचे दरवाजे उघडल्यानंतरच अयोध्येत प्रवेश केला. अयोध्येतील कुलीनांनी जरी जाणूनबुजून या घटनेकडे दुर्लक्ष केलं तरी सामान्य लोक पुढे कित्येक महिने

याच बाबतीत चर्चा करत राहिले.

कुलीनांपैकी काही लोकांच्या चुकांसाठी जेव्हा नगर रक्षकांनी त्यांना पकडलं तेव्हा त्यांनी नगर रक्षकांना दटावून मामला दाबून टाकण्याचा प्रयत्न केला आणि रामने मध्ये पडून नगर रक्षकांची बाजू घेतली तेव्हा मात्र कुलीनांचा राग अनावर झाला. आपल्यालाही कायदा लागू केला जातो हे पाहून ते विस्मित झाले, पण लवकरच त्यांना कळून चुकले की यानंतर सगळ्यांसाठी समान रूपानं कायदा लागू होणार आहे. त्यामुळे रामबद्दल त्यांच्या मनात असलेला तिरस्कार कित्येकपटींनी वाढला. त्यांनी रामला हुकूमशहा आणि धोकादायक अधिकारी म्हणायला सुरवात केली. पण सामान्य लोकांचं अयोध्येच्या या ज्येष्ठ राजपुत्रावरील प्रेम आणखी दृढ झालं. अपराध दरात घट आली कारण अपराध्यांना सरळ तुरुंगात टाकलं जात असे किंवा त्यांच्याबाबतीत तात्काळ निवाडा केला जात असे. हळू हळू अयोध्येतील कायदा आणि सुव्यवस्था पुन्हा सुधारू लागली. निष्पाप लोकांना अयोध्या सुरक्षित वाटू लागली. स्त्रिया रात्रीच्या वेळी एकट्या बाहेर फिरू लागल्या. त्यांच्या आयुष्यातील या नाट्यपूर्ण बदलाचं श्रेय त्यांनी रामला दिलं.

अशाच रीतीनं सर्व कार्य सुरळीतपणे पार पडत राहिलं असतं तर दशकभरापूर्वीच राम एक उत्तम आख्यायिका बनणार हे निश्चित होतं. आजच्या मितीला या दिशेने त्याची वाटचाल सुरू झाली होती, एका लोकनायकाचा जन्म झाला होता.

'तू स्वतःसाठी बरेच शत्रु निर्माण करतोयस, मुला,' एकदा महाराणी कौसल्या रामला म्हणाल्या, 'एवढ्या काटेकोरपणे तू कायदा लागू करू नयेस.'

रामबद्दल कुलींनाकडून कित्येक तक्रारी ऐकून चिंतीत झालेल्या महाराणी कौसल्यांनी त्याला आपल्या महालातील खाजगी दालनात बोलावून घेतलं होतं. उत्साहाच्या भरात राम कायदा लागू करत आहे आणि अशाने त्याच्या बाजूने असणारे थोडेफार दरबारीसुद्धा त्याच्या विरुद्ध जातील असं महाराणींना वाटत होतं.

'केवळ काही लोकांवरच कायदा लागू होत नाही, माताश्री,' त्यांना समजावताना राम म्हणाला, 'कायदा सगळ्यांसाठी समान असायला हवा. शिक्षा भोगणं कुलीनांना जर आवडत नसेल, तर त्यांनी चुका करू नयेत.'

'मी कायद्याबद्दल बोलत नाही, राम. पण जर सेनानायक मृगस्यांच्या खास सेवकाला शिक्षा केल्याने तुझ्या वडिलांना आनंद होईल असं जर तुला वाटत असेल तर ते चुकीचं आहे. ते पूर्णपणे कैकयीच्या कह्यात आहेत.'

दशरथांना औदासिन्य आल्यानंतर राज्यात सेनाप्रमुख मृगस्यांचं प्रस्थ खूप वाढलं होतं. महाराणी कैकयींचे सारे विरोधक ते जणू चुंबक असल्यासारखे त्यांच्याशी हातमिळवणी करू लागले होते. आपल्याबद्दल निष्ठा व्यक्त करणाऱ्यांच्या अपराधांकडे किंवा अकार्यक्षमतेकडे दुर्लक्ष करण्याबद्दल त्यांची ख्याती होती. यामुळे भयानक युती निर्माण होत असे. आपल्या आदेशांकडे हेतुपुरस्सरपणे दुर्लक्ष करण्याबद्दल महाराणी कैकयींना त्याच्याबद्दल राग होता. महाराणी कैकयींच्या मतांमुळे महाराज दशरथांच्या मनातही आपल्या या सेनाप्रमुखांबद्दल अढी निर्माण झालेली होती.

हल्लीच रामने मृगस्यच्या एका मदतनीसाकरवी एका खेडूताची बळकावलेली जमीन त्याल परत करण्यासाठी कायद्याचा वापर केला होता. रामने सेनाप्रमुखांच्या त्या मदतनीसाला त्याच्या या बेकायदेशीर कामाबद्दल दंडही ठोठावला होता. प्रचंड दबदबा असलेल्या सेनाप्रमुखांच्या मर्जीतील माणसावर अशा प्रकारची कारवाई याआधी कुणीही केलेली नव्हती.

'सेना प्रमुख मृगस्य किंवा माता कैकयींच्या राजकारणात मला काडीचाही रस नाही. त्या व्यक्तीनं कायदा तोडला आणि त्याबद्दल त्याला शिक्षा झाली, बस्स एवढंच.'

'कुलीनांच्या मनात जे येतं ते ते करतात, राम.'

'मला शक्य असेल तर मी ते मुळीच होऊ देणार नाही!'

'राम....'

'कुलीनांनी कुलीनांना शोभेलसं वागावं, माता. आर्यांची हीच रीत आहे. तुमच्या जन्मानं नव्हे, तुमच्या कर्मानं तुमचं श्रेष्ठत्व ठरतं. कुलीन असणं हा जन्मसिद्ध अधिकार नव्हे, ती एक मोठी जबाबदारी आहे.'

'राम, तुला समजत कसं नाही?! सेना प्रमुख मृगस्य हे आपले एकमेव मित्र सदस्य आहेत दरबारात. इतर सर्व शक्तीशाली कुलीन कैकयीच्या बाजूने आहेत. वेळ पडली तर, केवळ मृगस्यच आपल्या बाजूने उभे राहातील. मृगस्य किंवा त्यांच्या विश्वासातील मंडळी आपल्या बाजूने असतील तोवरच आपण सुरक्षित आहोत.'

'याचा कायदा पालनाशी काय संबंध?'

आपली नाराजी लपविण्यासाठी कौसल्याला फार प्रयत्न करावे लागत होते. 'तुझ्यासाठी मदत उभी करणं किती अवघड आहे हे तुला कळतंय का राम? लंकेतील आपल्या पराभवाला सगळेजण तुलाच जबाबदार मानतात.'

त्यांच्या या वादाचं रामनं काहीही उत्तर दिलं नाही तेव्हा महाराणी कौसल्या त्याला समजावत म्हणाल्या, 'अर्थात्, त्यात तुझा काही दोष होता असं मला म्हणायचं नाहीय, बाळा. पण वास्तव हेच आहे ना? आपल्याला व्यावहारिक दृष्टीनं विचार करायला हवा की नको? तुला राजा व्हायचंय की नाही?'

'मला चांगला राजा व्हायचं आहे. आणि ते जर शक्य नसेल तर, खरं सांगतो, मला राजा व्हायचं नाही.'

महाराणी कौसल्यांनी क्रोधातिरेकाने डोळे झाकले. मग सावकाश डोळे उघडत त्या म्हणाल्या, 'राम, मला वाटतं तू आपल्या स्वतःच्याच दुनियेत रमतोयस. तुला वास्तविक जगात रहाण्याची सवय करून घ्यायला हवी. माझं तुझ्यावर निरतिशय प्रेम आहे आणि मी तुला मदत करायचा प्रयत्न करतेय हे तू समजून घे.'

'माता, आपण जर आमच्यावर प्रेम करत असाल तर, मी कसा आहे ते समजून घेण्याचा प्रयत्न करा,' राम जरी शांत स्वरात हे बोलला तरी त्याच्या डोळ्यांत त्याचा पोलादी निश्चय स्पष्ट दिसत होता. तो पुढे बोलू लागला, 'ही माझी जन्मभूमी आहे. ती ज्यास्थितीत माझ्याकडे आली त्यापेक्षा उत्तम स्थितीपर्यंत तिला आणणं हे माझं कर्तव्य आहे. आणि हे माझं कर्तव्य मी एक राजा बनून, नगर रक्षक दल प्रमुख बनून किंवा केवळ एक साधा खेडूत बनूनही मी ते पार पाडीन.'

'राम, तुला कळत नाही...'

मोठ्या आवाजात केलेल्या एका घोषणेने महाराणी कौसल्यांचं बोलणं अर्धवट राहिलं, 'अयोध्येच्या महाराणी कैकयी येत आहेत!'

राम लगेच उठून उभा राहिला. महाराणी कौसल्यासुद्धा उठून उभ्या राहिल्या. रामने आपल्या आईकडे एक नजर टाकली. आपल्या आईच्या डोळ्यांत त्याला दुर्बल राग दिसला. कैकयी त्यांच्यासमोर आल्या तेव्हा त्यांच्या ओठांवर हसू पेरलेलं होतं. हात नमस्कारासाठी जोडलेले होते. 'नमस्कार, ताई. आपल्या मुलाबरोबर आपण घालवत असलेल्या या खाजगी क्षणांत व्यत्यय आणल्याबद्दल मी आपली मनापासून माफी मागते.'

'त्यात वावगं काही नाही, कैकयी,' आवाजात गोडवा घोळवून महाराणी कौसल्या बोलल्या, 'तेवढंच महत्वाचं काही असल्याशिवाय आपण तसदी घेतली नसतीत, हे मी जाणते.'

'हो, खरंय आपलं म्हणणं. कारण तसंच महत्वाचं आलं म्हणून....' मग रामकडे वळून त्या म्हणाल्या, 'तुझे पिताश्री शिकारीवर जात आहेत, राम.'

'शिकारीला?' रामने आश्चर्यानं विचारलं.

राजा दशरथ मोठ्या शिकारीसाठी कधी गेल्याचं रामला आठवत नव्हतं. कधीकाळी तरबेज शिकारी असणाऱ्या महाराज दशरथांना लढाईत झालेल्या जखमेमुळे अशा साध्यासुध्या मनोरंजनापासूनही वंचित केलं होतं.

'भरतला मी त्यांच्याबरोबर पाठवलं असतं, मला आवडणारं हरणाचं मांस मला खायला मिळालं असतं, पण तो सध्या परराष्ट्र नीती संबंधीत कार्यानिमित्ताने ब्रंगदेशात आहे. म्हणून ही अवघड कामगिरी तुझ्या बळकट खांद्यावर देण्याबद्दल मी विचार करत होते.'

राम किंचित हसला. कारण त्याला ठाऊक होतं की माता कैकयी विशिष्ट प्रकारचं मांस खायला मिळावं म्हणून नव्हे तर राजा दशरथांचं रक्षण करण्यासाठी त्याला त्यांच्याबरोबर पाठवू इच्छिते. पण कैकयी दशरथांविषयी कोणत्याही प्रकारे सार्वजनिक ठिकाणी वाईट बोलणार नाही आणि त्यांच्यासाठी राज परिवार सुद्धा 'सार्वजनिक'च होता. रामने दोन्ही हात जोडून नमस्कार करत म्हटलं, 'आपली आज्ञा पालन करणे हा माझा सन्मानच आहे, छोटी माताश्री.'

कैकयीच्या चेहऱ्यावर हसू उमललं. त्या म्हणाल्या, 'धन्यवाद.'

कौसल्येनं शांतपणे रामकडे पाहिलं. त्यांच्या मनात जे चाललं होतं त्याचा मागमूसही त्यांच्या चेहऱ्यावर दिसत नव्हता.

'ती इथे कशासाठी येत आहे?'

राजमहालातील महाराणी कैकयींच्या कक्षाच्या द्वारपालानं महाराणी कौसल्यांच्या आगमनाची ललकारी दिली तेव्हा सम्राट दशरथांनी रागानं विचारलं. दशरथ आणि कैकयी मंचकावर पहुडलेले होते. कैकयींनी महाराज दशरथांचे केस त्यांच्या कानाभोवती खोचले. म्हणाल्या, 'काही का असेना, लवकर आटोपून परत या.'

'तुम्हालाही यावं लागेल, प्रिये,' दशरथ म्हणाले.

कैकयीने रागाने एक सुस्कारा सोडला. मग त्या मंचकावरून खाली उतरल्या. पटकन् आपले उत्तरीय उचलून खांद्यावर टाकलं आणि त्याचं दुसरं टोक आपल्या उजव्या मनगटाभोवती गुंडाळलं. मग मंचकाच्या दुसऱ्या बाजूला जाऊन त्यांनी दशरथाला उतरण्यास मदत केली.

गुडघ्यांवर बसून त्यांनी त्यांचे धोतर ठीक केले. त्यांचे उत्तरीय उचलून ते त्यांच्या खांद्यावर टाकले. मग त्यांना आधार देऊन त्या स्वागतकक्षात घेऊन आल्या.

दशरथ नीट स्थिरस्थावर झाले तेव्हा कैकयीने आदेश दिला, 'महाराणी कौसल्यांना येऊ द्या.'

महाराणी कौसल्या पाठोपाठ येणाऱ्या दोन सेवकांसह प्रविष्ट झाल्या. त्यापैकी एकाच्या हातात एक मोठी सोनेरी थाळी होती आणि त्या थाळीत महाराज दशरथांची तलवार होती. दुसऱ्या सेवकाच्या हातात एक पूजेचं तबक होतं. हे पाहून महाराणी कैकयी आश्चर्यानं सावरून बसल्या. दशरथ नेहमीप्रमाणेच आपल्यात हरवलेले होते.

'ताई,' हात जोडून नमस्कार करत कैकयी कौसल्यांना म्हणाल्या, 'आनंद आहे की आज दुसऱ्यांदा आपली भेट होत आहे.'

'मलासुद्धा याचा खूपच आनंद वाटतोय, कैकयी,' कौसल्या म्हणाल्या. 'महाराज शिकारीवर जाणार आहेत असं आपण म्हणालात. म्हणून मला वाटलं की त्यांच्या शिकारीला जाण्याची साग्रसंगीत तयारी झाली पाहिजे.'

युद्धावर निघालेल्या पतीला त्याच्या प्रमुख पत्नीकडून विधिपूर्वक तलवार देण्याचा कार्यक्रम जुन्या काळापासून केला जात असे.

'ज्या ज्या वेळी मी महाराजांना तलवार अर्पण केली नाही तेव्हा गोष्टी नीटपणे पार पडल्या नाहीत,' कौसल्या म्हणाल्या.

अचानक दशरथांच्या चेहऱ्यावरील हरवलेला भाव पुसून निघाला. मग त्यांच्या चेहऱ्यावर आठ्या पसरल्या. एखाद्या तुच्छ वाटणाऱ्या गोष्टीतून कोणतीतरी मोठी गोष्ट घडून यावी तद्वत त्यांना मोठा धक्का बसल्याचं जाणवलं. ते जेव्हा करछपच्या युद्धासाठी निघाले होते तेव्हा महाराणी कौसल्यांनी त्यांना तलवार दिली नव्हती. आणि ती त्यांच्या जीवनातली पहिली हार होती. त्यांनी आपल्या पहिल्या पत्नीच्या दिशेने सावकाश एक पाऊल पुढे टाकले.

महाराणी कौसल्यांनी आपल्या सेवकाच्या हातातून पुजेचं तबक घेतलं आणि दशरथांना सात वेळा ओवाळलं. मग त्यांनी तबकातून चिमूटभर केशर उचलून महाराज दशरथांच्या कपाळावर त्याचा उभा टिळा रेखला. म्हणाल्या, 'विजयी होऊन परता...'

महाराणी कैकयी मिस्किलपणे हसत मध्येच म्हणाल्या, 'ते लढाईवर चालले नाहीत, ताई.'

दशरथांनी कैकयीकडे दुर्लक्ष्य केलं आणि ते कौसल्यांना म्हणाले, 'वाक्य पूर्ण करा, कौसल्या.'

कौसल्यांनी निराशेचा आवंढा गिळला. आपण महाराणी सुमित्रांचं म्हणणं ऐकायला नको होतं असं त्यांना वाटलं. इथे येण्यात आपल्याकडून मोठी चूक झाली असंही त्यांना वाटलं. पण त्यांनी रीतीनुसार आपलं वाक्य पूर्ण केलं, 'विजयी होऊन परता किंवा परतूच नका.'

रोमांच आणि गौरवासाठी जगणाऱ्या तरुण दशरथांच्या व्यक्तीमत्वाची आठवण करून देणारी ठिणगी आपल्या पतीच्या डोळ्यात उडाल्याचा कौसल्यांना क्षणकाल भास झाला. 'माझी तलवार कोठे आहे?' दशरथांनी गंभीरपणे आपले हात पुढे करत विचारलं.

मागे वळून कौसल्यांनी लगेच पूजेचं तबक सेवकाकडे दिलं. मग त्यांनी दोन्ही हातांनी तलवार उचलली, पतीसमोर आल्या, रीतीनुसार झुकून त्यांना वंदन केलं आणि त्यांना त्यांची तलवार दिली. दशरथांनी तीतून ताकद मिळवत असल्यासारखी ती मजबूतीनं आपल्या हातात पकडली.

कैकयीने एकदा दशरथांकडे, मग कौसल्यांकडे पाहिलं. विचारांत हरवल्यासारखे त्यांचे डोळे बारीक झाले.

नक्की ही सुमित्रांची कल्पना असावी. हे सगळं कौसल्या स्वतः आखू शकत नाहीत. रामला दशरथांबरोबर जाण्याची विनंती करण्यात कदाचित माझ्याकडून चूक झाली असावी.

त्याकाळी राजानं शिकारीवर जाण्याचा मोठा सोहोळा असे जो कित्येक आठवड्यांपर्यंत चालत असे. या कामगिरीवर राजासोबत त्याचा भला मोठा लवाजमा जात असे. शिकार काळादरम्यान राजाचा दरबार अयोध्येच्या उत्तर टोकाला जंगलात बनलेल्या शिकार-महालात लागत असे.

त्यांच्या आगमनानंतर एक दिवसाने शिकारीची सुरवात झाली. शिकारीच्या त्यांच्या पद्धतीत कित्येक सैनिक मोठ्या प्रदेशात- कधी कधी पन्नास किलोमीटर्स एवढ्या विस्तीर्ण प्रदेशात- विखरून गराडा घालीत असत. मग सर्व जण या वर्तुळाच्या मध्याकडे सरकत पुढे पुढे येत आणि असे पुढे येताना निरंतर ढोल-ताशे मोठमोठ्या आवाजात वाजवून हाकारा देत असत. यामुळे हळूहळू तेथील सारे प्राणी मोठ्या क्षेत्रातून आकसत आणलेल्या छोट्या, बंदिस्त क्षेत्राकडे येत. बहुतेकदा ती पाणवठ्याची जागा असे. या ठिकाणी आधीपासून राजा आणि त्याच्या सोबत आलेला शाही परिवार दबा धरून बसलेला असे. ते मग या मारक क्षेत्रात आलेल्या प्राण्यांवर हल्ला करून त्यांच्या शिकारीचा राजेशाही खेळ खेळत असत.

शाही हत्तीच्या पाठीवर बांधलेल्या हौद्यात महाराज दशरथ उभे होते. राम आणि लक्ष्मण त्यांच्या मागे बसलेले होते. दशरथांना पाणवठ्याच्या दिशेने येत असलेल्या पाणी पिण्यात गढलेल्या वाघाच्या मंद आवाजाची चाहूल लागली. त्यांनी आपल्या माहूताला हत्तीला तिकडे घेऊन जायला सांगितलं. काही क्षणांतच दशरथांचा हत्ती शिकार खेळण्यात गुंतलेल्या लव्याजम्यापासून वेगळा झाला. आवाजाचा मागोवा घेत आपल्या पुत्रांसमवेत ते एकटेच निघाले.

चोहीकडे घनदाट झाडी होती. तेथील कित्येक वृक्ष हत्तींपेक्षाही उंच होते. त्यांनी सूर्यकिरण रोखले होते. त्यामुळे तेथे पसरलेल्या दाट काळोखात समोरच्या झाडांपलीकडचे काहीही दिसत नव्हते.

लक्ष्मण रामच्या दिशेने झुकला आणि म्हणाला, ‘दादा, इथे वाघ आहे असं मला वाटत नाहीय.’

राम समोर उभ्या असलेल्या आपल्या वडिलांना पाहाण्यात गुंतला होता. त्याने लक्ष्मणाला गप्प रहाण्याची खूण केली. दशरथांचा उत्साह अनिवार होत चालला होता. त्यांच्या शरीराचा पूर्ण भार त्यांच्या डाव्या, भक्कम पायावर पडलेला होता. हौद्याच्या जमिनीवर तयार एक विशिष्ट तांत्रिक रचना तयार केली गेली होती. त्याआधारे त्यांच्या शिथिल पडलेल्या पायाला आधार दिला गेला होता. या नूतन पद्धतीत हौद्याच्या जमिनीवर वर्तुळाकार फिरती चकती बसवली होता जिच्या मधोमध लाकडाचा जाडसर दांडा रोवून त्याच्या वरच्या टोकाला गुडघ्याला आधार देण्याची जागा बनविली गेली होती. याच गोलावर दांड्याच्या हौद्याच्या जमिनीवरील टोकाजवळ चामड्याचं पायताण होतं ज्यावर पट्टे बसवलेले होते. या पायताणाचा पुढील चामडी भाग थेट गुडघ्यापर्यंत वर गेलेला होता जो पायाच्या गुडघ्याखालच्या भागाला संरक्षण देत होता. पायताणावर पाय ठेवून पट्टे बांधले आणि गुडघा त्याच्यासाठी बनविलेल्या जागी ठेवून चामडी पट्ट्यांनी आवळला की एकीकडे शिथिल पायाला आधार मिळत होता आणि त्याचवेळी फिरत्या चकतीमुळे पायाला गोलाकार गती मिळत होती ज्यायोगे सर्व दिशांना बाण चालवणं

शक्य झालं होतं. अधू पायाची अशी व्यवस्था झाली असली तरी बाण चढवून उंच धरलेल्या धनुष्यामुळे आलेला ताण सम्राट दशरथांच्या पाठीवर स्पष्ट दिसून येत होता.

आपल्या थकलेल्या शरीराला वडिलांनी एवढे श्रम देऊ नयेत असं रामला मनोमन वाटत होतं. पण आपल्या थकल्या शरीराची पर्वा न करता एवढे परिश्रम करण्याच्या त्यांच्या धैर्याचं त्याला कौतुकसुद्धा वाटत होतं.

'खरं सांगतो, तिथे काहीही नाहीय, बघच तू,' लक्ष्मण पुन्हा कुजबुजला.

'शू:ऽऽऽऽ' रामने पुन्हा त्याला गप्प केलं.

लक्ष्मण गप्प झाला. अचानक दशरथांनी आपला उजवा खांदा ताणला आणि धनुषयाची प्रत्यंचा ताणली. या तंत्राकडे पाहाता पाहाता रामचा चेहरा आक्रसला. दशरथाचं कोपर बाणाच्या रेघेत नव्हतं. त्यामुळे त्यांच्या खांद्यांच्या पेशींवर जास्त दाब पडणार होता. सम्राटांच्या भाळावर आता घर्मबिंदू दिसू लागले होते. पण त्यांनी आपला मोर्चा सोडला नाही. काही क्षणांत त्यांनी बाण सोडला. मोठी किंकाळी ऐकू आली त्यावरून त्यांचा बाण वर्मी लागला हे सिद्ध झालं होतं. एके काळी सर्वविजेता असणाऱ्या आपल्या वडिलांच्या धैर्याचं रामला कौतुक वाटलं.

दशरथ अवघडल्यासारखे हौद्यावरील दांड्यावर झुलून मागे वळले. लक्ष्मणाकडे उपहासाने पाहात ते त्याला खोचून बोलले, 'तरुणा, मला कधी कमी लेखू नकोस बरं.'

लक्ष्मणानं लगेच आपलं डोकं लववत म्हटलं, 'माफ करा मला, माझा हेतू तो नव्हता....'

'त्या वाघाचं धूड उचलून आणायला सांगा सैनिकांना. त्यांना जे धूड मिळेल त्याच्या डोळ्यात घुसून मेंदूपर्यंत बाण पोहोचलेला असेल.'

'होय पिताश्री, सांगतो...'

'पिताश्री!' पुढे झेपावता झेपावता राम किंचाळला. त्याने म्यानातून खंजीर काढून हातात घेतला.

हौद्यावर आलेल्या एका झाडाच्या फांदीवर एक चित्ता पुढे आला तेव्हा पानांची खूप सळसळ झाली. त्या कावेबाज जनावराने बऱ्याच परिश्रमाने हल्ल्याची आपली योजना बनविलेली होती. फांदीवरून चित्त्याने झेप घेतली तेव्हा दशरथांचे त्याच्याकडे लक्ष नव्हते. पण रामने अचूक क्षण साधला होता. त्याने पुढे झेपावून हवेतच चित्त्याच्या छातीत खंजीर खुपसला. पण अचानक वार करावा लागल्याने रामचा नेम चुकला. खंजीर चित्त्याच्या काळजात घुसला नव्हता. चित्ता केवळ जखमी झाला होता, मेला नव्हता. जोराने डरकाळी फोडून त्याने आपला पंजा मारला. खंजीर उपसून पुन्हा वार करण्याच्या नादात राम चित्त्याशी भिडला. पण खंजीर घट्ट रुतून बसला होता. थोडा मागे होत चित्त्याने रामच्या डाव्या खांद्याचा चावा घेतला. चित्त्याला हौद्याबाहेर ढकलण्याचा प्रयत्न करत असलेल्या रामच्या तोंडून वेदनेनं किंकाळी निघाली. चित्त्याने रामच्या खांद्याचा लचका तोडत आपलं तोंड मागे खेचलं. रामच्या खांद्यातून रक्ताचं कारंजं वाहू लागलं. उपजतबुद्धीनुसार चित्ता रामच्या गळ्याचा वेध घेण्याचा प्रयत्न करू लागला. रामने खंजीराचा नाद सोडून आपला उजवा हात मोकळा केला आणि त्या हाताने सारे बळ एकवटून चित्त्याच्या डोक्यावर बुक्की मारली.

दरम्यानच्या वेळेत लक्ष्मण रामपर्यंत पोहोचण्याचा शर्थीनं प्रयत्न करत होता. लाकडाच्या दांड्याला अडकलेल्या दशरथांनी त्याचा मार्ग रोखून धरला होता. त्यांना टाळण्यासाठी लक्ष्मणाने उंच उडी घेतली. वर लटकणाऱ्या झाडाच्या एका फांदीच्या आधाराने सूर मारत त्याने

हौद्याबाहेर उडी घेतली आणि तो हौद्याबाहेर, हत्तीच्या मानेजवळ थेट चित्त्याच्या मागे पोहोचला. त्याने आपला खंजीर हातात घेतला आणि रामाच्या खांद्याचा पुन्हा चावा घेण्यासाठी पुढे झेपावण्याच्या प्रयत्नात असलेल्या चित्यावर वार केला. सुदैवाने खंजीर चित्त्याच्या डोळ्यात घुसला. चित्याने वेदनेने कळवळत पुन्हा डरकाळी फोडली. त्याच्या छिन्नविछिन्न खोबणीतून रक्ताची धार उसळली. लक्ष्मणाने आपल्या खांद्याला ताण देत खंजीर चित्त्याच्या मेंदूपर्यंत खुपसला. क्षणकाल ते जनावर तडफडलं आणि मग शांत होऊन खाली पडलं, त्याचा जीव गेला होता.

लक्ष्मणाने चित्त्याचं ते धूड सहज उचललं आणि जमिनीवर फेकलं. मागे हौद्यात राम रक्ताच्या थारोळ्यात पडला होता.

'राम!' दशरथांनी टाहो फोडला. त्यांना रामकडे जायचं होतं पण लाकडी दांड्याला त्यांचा पाय अडकून पडला होता. त्यातून पाय सोडवण्याचा ते प्रयत्न करू लागले.

लक्ष्मण माहुताकडे वळला आणि त्याला आज्ञा दिली, 'छावणीकडे परत फिरा!'

अचानक घडत असलेल्या घटनांनी माहूत गर्भगळित झाला होता. लक्ष्मणाने दिलेल्या आज्ञेचा अर्थ कळायला त्याला वेळ लागला. तेवढ्यात सम्राट दशरथांनी त्याला आज्ञा केली, 'छावणीकडे परत फिरा! आत्ता!'

रात्री उशीरापर्यंत शिकारीच्या त्या छावणीत दिवे जळत होते आणि कावरे बावरे झालेले लोक कोणत्या ना कोणत्या कामानिमित्ताने इकडून तिकडे धावपळ करत होते. अयोध्येचा घायाळ राजकुमार सम्राटांच्या प्रचंड मोठ्या आणि आलीशान तंबूत पहुडला होता. खरं तर त्यानं दवाखान्याच्या तंबूत असायला हवं होतं पण त्यांच्या मुलावर सम्राटांच्या तंबूत इलाज केले जावेत ही दशरथांची इच्छा होती. रामचा पांढुरका पडलेला देह जखमेभोवती गुंडाळलेल्या पट्ट्यांनी भरून गेला होता. भरपूर रक्त वाहून गेल्यामुळे तो फारच क्षीण झाला होता.

'राजकुमार राम,' वैद्यांनी रामला स्पर्श करत हळुवार आवाजात हाक मारली.

'त्याला जागं करायलाच हवं का?' दशरथांनी विचारलं. ते रामच्या बिछान्याच्या डाव्या बाजूला ठेवलेल्या एका आरामखुर्चीत बसले होते.

'होय महाराज,' वैद्य म्हणाले, 'आता त्यांना हे औषध घ्यायचं आहे.'

वैद्यांनी पुन्हा एकदा हाक मारली तेव्हा रामने डोळे किलकिले केले आणि उजेडाशी जुळवून घेत उघडले. हातात औषधाची वाटी घेऊन उभे असलेले वैद्य त्याला दिसले. तोंड उघडून रामने औषध घेतले आणि त्याच्या कडू चवीने त्याचा चेहरा वेडावाकडा झाला. वैद्यांनी मागे वळून सम्राटांना अभिवादन केलं आणि ते तेथून निघून गेले. रामला पुन्हा झापड येऊ लागली तेव्हा त्याचे लक्ष मंचकावर डोक्याच्या बाजूला लागलेल्या सोनेरी छत्राकडे गेले. छत्राच्या मध्यभागी सूर्यवंशाची खूण असलेलं मोठ्या सूर्याचं चारही दिशांना किरण फाकलेलं चित्र विणलं होतं. रामचे डोळे खाड्कन उघडले आणि त्याने धडपडत उठण्याचा प्रयत्न केला. त्यानं सम्राटांच्या बिछान्यात झोपलं नाही पाहिजे.

'पडून रहा,' हातानं संकेत करत सम्राट दशरथांनी त्याला सांगितलं.

लक्ष्मण लगेच बिछान्याकडे धावत गेला आणि त्याने आपल्या दादाला शांत करण्याचा प्रयत्न

केला.

'सूर्यदेवासाठी तरी निदान, पडून रहा, राम!' दशरथ म्हणाले.

दशरथाकडे पाहात पाहात राम पुन्हा बिछान्यावर आडवा झाला. मग तो दशरथांना म्हणाला, 'पिताश्री, माफ करा मला, आपल्या बिछान्यात मी झोपायला नको होतं...'

दशरथांनी हात वारून रामचं बोलणं मध्येच थांबवलं. आपल्या वडिलांमध्ये दिसून येत असलेला बदल रामाच्या लक्षात आला. त्यांच्या डोळ्यात पुन्हा चमक आली होती, आवाजाला धार आली होती आणि ते सावध दिसत होते. आईकडून दशरथांबद्दल ऐकलेल्या सगळ्या गोष्टी रामला आठवल्या. आपण दिलेल्या आज्ञेकडे दुर्लक्ष अजिबात खपवून न घेणारा एक शक्तीशाली माणूस रामसमोर बसलेला होता. रामने त्यांचं हे रूप आधी कधीही पाहिलेलं नव्हतं.

दशरथ आपल्या सेवकांकडे वळून म्हणाले, 'थोडा वेळ आम्हाला एकांतात राहू दे.'

लक्ष्मण सेवकांबरोबरच बाहेर निघाला.

'तू नव्हे, लक्ष्मण,' दशरथ म्हणाले.

लक्ष्मणाची पावलं थबकली. पुढच्या आज्ञेची तो वाट पाहू लागला. दशरथ तंबूच्या कोपऱ्यात पसरलेल्या चित्त्यांच्या आणि वाघांच्या कातड्यांकडे पाहात होते. त्यांनी आणि त्यांच्या मुलांनी मिळून केलेल्या प्राण्यांच्या शिकारीत जिंकलेल्या ढालीच होत्या त्या.

'का?' दशरथांनी विचारलं.

'पिताश्री?' रामने गोंधळून विचारलं.

'तू माझ्यासाठी आपलं जीवन धोक्यात का घातलंस?'

राम काहीही बोलला नाही.

दशरथ पुढे बोलू लागले, 'माझ्या पराजयाचं खापर मी नेहमी तुझ्या डोक्यावर फोडत आलो. माझं संपूर्ण राज्य तुला याबद्दल दोष देतं. तुला यासाठी शिव्याशाप देतं. तुझं संपूर्ण जीवन यात पोळत आलं. पण तरी तू कधी बंड केलं नाहीस. मला वाटलं कदाचित तू कमजोर असशील. पण कमजोर लोक आपल्याला छळणाऱ्यावर दुर्भाग्याचा बडगा पडला की आनंदोत्सव साजरा करतात. आणि तू मात्र मला वाचविण्यासाठी आपल्या प्राणांची बाजी लावलीस. का?'

रामने केवळ एका साध्या वाक्यात उत्तर दिलं, 'कारण तो माझा धर्म होता, पिताश्री.'

दशरथांची प्रश्नार्थी नजर रामवर खिळली. आज पहिल्यांदाच आपल्या मोठ्या मुलाशी ते काहीतरी अर्थपूर्ण बोलत होते. त्यांनी विचारलं, 'फक्त हेच कारण होतं?'

'इतर कोणतं कारण असू शकतं?' रामने विचारलं.

'मला माहीत नाही,' अविश्वास दर्शवत दशरथ म्हणाले. मग त्यांनी विचारलं, 'कदाचित तुला युवराज पद हवं असेल?'

भाग्याच्या या खेळावर यावेळी रामला हसू आलं. तो म्हणाला, 'मी जरी आपल्याला पटवून दिलं तरी कुलीन लोक माझा स्वीकार करणार नाहीत, पिताश्री. आणि म्हणूनच माझ्या योजनांमध्ये या गोष्टीला अजिबात स्थान नाही. आज मी जे काही केलं ते मी नेहमीच करत रहायला हवं : मला आपल्या धर्माचं पालन करायला हवं. धर्माशिवाय इतर काहीही महत्वाचं नाही.'

'म्हणजे, रावणाच्या हातून माझा जो पराभव झाला त्यासाठी तुला दोष देणं तुला पटत नाही का?'

'मला काय वाटतं हा प्रश्न नाही, पिताश्री.'

'तू माझ्या प्रश्नाचं उत्तर दिलं नाहीस.'

राम काही बोलला नाही.

दशरथांनी पुढे झुकत म्हटलं, 'बोल राम, उत्तर दे.'

'पिताश्री, हे ब्रह्मांड आपल्या अनेक जन्मांतील कर्मांचा हिशोब कशाप्रकारे ठेवतं ते मला माहीत नाही. मला फक्त एवढंच माहीत आहे की, युद्धात तुमचा पराजय व्हावा अशा प्रकारचं कोणतंही काम या जन्मी मी केलेलं नसावं. कदाचित ते माझ्या पूर्वजन्मीचं एखादं कृत्य असेल.'

दशरथांच्या ओठांवर मंद स्मित झळकलं. ते आपल्या मुलाला जाणून घेण्याचा प्रयत्न करत होते.

'मृगस्याशी तुझं काय वैर आहे?' दशरथांनी विचारलं.

आपले वडील अजूनही राजकारणातील घडामोडींची नोंद ठेवतात याचं रामला आश्चर्य वाटलं. 'कोणतंही वैर नाही, पिताश्री.'

'मग त्याच्या एका माणसाला तू शिक्षा का केलीस?'

'त्याने कायदा मोडला म्हणून.'

'मृगस्य किती बलवान आहे हे तुला ठाऊक नाही का? तुला त्याची भीती वाटत नाही का?'

'कायद्यापुढे कुणीही मोठा नसतो, पिताश्री. आणि धर्माहून श्रेष्ठ कुणीही नसतो.'

दशरथ हसले. त्यांनी विचारलं, 'मी सुद्धा नाही?'

'एका सम्राटांनी याबद्दल फार समर्पक असं म्हटलेलं आहे : धर्म सर्वश्रेष्ठ आहे, राजाहूनही श्रेष्ठ. धर्म देवांहूनही श्रेष्ठ आहे.'

दशरथांच्या कपाळावर नापसंतीच्या आठ्या उमटल्या. त्यांनी विचारलं, 'कुणी असं म्हटलंय?'

'आपण असं म्हटलंय, पिताश्री. काही दशकांपूर्वी जेव्हा आपला राज्याभिषेकाचा शपथसमारंभ झाला होता तेव्हा आपण असं म्हटलं होतं. मला असं सांगितलंय की आपण आपले महान पूर्वज इक्ष्वाकुंचे शब्दच त्यावेळी पुन्हा मांडले होते.'

दशरथ रामकडे पाहातच राहिले. त्यांचं मन गत काळ ओलांडत आठवणींच्या इतिहासात डोकावून आपल्यातील त्या शक्तीशाली व्यक्तीचा शोध घेण्यात गुंतलं होतं.

'झोप आता, माझ्या बाळा,' दशरथ म्हणाले, 'तुला विश्रांतीची गरज आहे.'

# प्रकरण 12

वैद्यांनी औषध घेण्यासाठी रामला जागं केलं तेव्हा दुसरा प्रहर नुकता सुरू होत होता. औषध घेतल्यानंतर रामने जेव्हा खोलीत इकडे तिकडे नजर फिरवली तेव्हा आनंदी दिसणारा लक्ष्मण आपल्या मंचकाशेजारी उभं असल्याचं त्याला दिसून आलं. लक्ष्मणानं नेहमीचा साधा धोतर आणि अंगवस्त्राचा पोषाख केला होता. त्याच्या केशरी रंगाचं उत्तरीय प्रभा फाकलेल्या सूर्याच्या कुलदर्शक चित्रांच्या उभ्या ओळीने सजलेलं होतं.

'बाळा?'

रामाने मान वळवून पाहिलं तेव्हा मंचकाच्या डाव्या बाजूला उभे असलेले वडील त्याला दिसले. त्यांनी आपली राजसी वस्त्रप्रावरणे पेहेरलेली होती. सम्राट आपल्या प्रवासातील सिंहासनावर विराजमान झाले होते. त्यांच्या डोक्यावर सूर्यवंशाचा मुकुट होता.

'सुप्रभात,' राम म्हणाला, 'पिताश्री'.

दशरथांनी मान हालवून अभिवादनाचा स्वीकार केला. म्हणाले, 'अर्थातच ही एक शुभ प्रभात असणार आहे.'

आपल्या शामियान्याच्या प्रवेशद्वाराकडे वळत त्यांनी आवाज दिला, 'कोण आहे रे तिकडे?'

एक रक्षक घाईघाईने पडदा सरकवून आत आला. त्याने घाईघाईने सम्राटांना मुजरा केला.

'कुलीनांना आत येऊ द्या.'

रक्षकाने पुन्हा एकदा सलाम केला आणि मागल्या पावली परत गेला. काही मिनिटांतच कुलीनांनी तेथे एकापाठोपाठ प्रवेश केला. सम्राटासमोर ते अर्धवर्तुळाकारात उभे राहून कामकाज सुरू होण्याची वाट पाहू लागले.

'मला माझा मुलगा दिसू द्या,' दशरथ म्हणाले.

सम्राट दशरथांच्या आवाजातील जरब जाणवून दरबारीजनांना आश्चर्य वाटले आणि ते लगेच बाजूला सरले.

दशरथांनी रामाकडे पाहात म्हटलं, 'ऊठ'

रामाला उठण्यात मदत करण्यासाठी लक्ष्मण पुढे धावला पण दशरथ महाराजांनी हात उंचावून त्याला थांबवलं. कुलीन लोक जमिनीला खिळल्याप्रमाणे उभे राहून पाहात राहिले. अतिशय दुर्बल झालेला राम आधी कसाबसा उठून बसला, मग धडपडत उभा राहिला आणि कसाबसा आपल्या वडिलांजवळ गेला. सम्राटांसमोर पोहोचताच त्याने हळू हळू महाराजांना मुजरा केला.

दशरथांनी आपल्या मुलाच्या डोळ्याला डोळा दिला. खोल श्वास घेऊन स्पष्ट शब्दात आदेश दिला, 'वाक'.

अचानक घडणाऱ्या घडामोडींनी रामला धक्का बसला होता. त्याचा विश्वासच बसत नव्हता. त्याला नीट हालचालही करता येत नव्हती. त्याने रोखण्याचा खूप प्रयत्न केला पण शेवटी त्याच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले.

दशरथाच्या आवाजात थोडा ओलावा आला, ते म्हणाले, 'गुडघा टेक, माझ्या बाळा.'

मनात उसळणाऱ्या भावनांशी दोन हात करत रामनं जवळच ठेवलेल्या एका तिवईचा आधार

घेतला आणि अतिशय कष्टाने त्याने एक गुडघा जमिनीवर टेकवला, मान खाली घातली आणि भाग्यात जे लिहून ठेवलं असेल त्याची वाट पाहू लागला.

दशरथ स्थिर आवाजात बोलू लागले. शाही शामियानाबाहेरसुद्धा त्यांचा आवाज घुमत होता, 'रघु वंशाचे संरक्षक राम चंद्र, उठा.'

दरबारातील सगळ्यांनी अचानक श्वास रोधला तेव्हा शामियान्यात तो आवाज घुमला.

दशरथांनी आपली मान उंचावली तेव्हा सारे दरबारी गप्प झाले.

राम अजूनही मान लववून उभा होता. शत्रूंना आपल्या डोळ्यांतील आसवं दिसू नयेत असं त्याला वाटत होतं. मनावर पूर्ण नियंत्रण मिळेपर्यंत तो जमिनीकडे पाहात राहिला. मग त्याने मान उंचावून आपल्या वडिलांकडे पाहिलं आणि शांत आवाजात बोलला, 'या देशाचे सर्व देव आपलं रक्षण करत राहोत, बाबा.'

दशरथांची नजर आपल्या मुलाच्या मनाचा जणू ठाव घेत होती. त्यांच्या चेहऱ्यावर हास्याची रेघ उमटली. मग ते आपल्या कुलीनांकडे पाहात म्हणाले, 'आम्हाला एकांत हवा.'

सेनाप्रमुख मृगस्यांनी काही बोलण्याचा प्रयत्न केला, 'महाराज, पण....'

दशरथांनी क्रुद्ध कटाक्ष टाकत त्यांना मध्येच थांबवत विचारलं, ''आम्हाला एकांत हवा', यातील कोणता शब्द तुम्हाला समजला नाही, मृगस्य?'

'मला माफ करा, महाराज', मृगस्य म्हणाले आणि ते बाहेर निघण्यासाठी कुलीनांना वाट दाखवू लागले.

शामियान्यात दशरथ, राम आणि लक्ष्मण उरले. उठून उभे राहाताना दशरथांनी आपल्या डाव्या पायावर खूपच जोर दिला. मात्र, लक्ष्मणाने देऊ केलेली मदत त्यांनी नाकारली. उठून उभे राहिल्यानंतर त्यांनी लक्ष्मणाला जवळ बोलावलं आणि त्याच्या मजबूत खांद्याचा आधार घेऊन ते लंगडत रामजवळ पोहोचले. तोवर रामसुद्धा उठून ताठ उभा राहिला होता. त्याच्या चेहऱ्यावर अवर्णनीय भाव होते आणि डोळे भावपूर्ण झाले असले तरी तो कुठेतरी हरवला असल्याचंही सांगत होते.

दशरथांनी रामच्या खांद्यावर आपले हात ठेवले. ते रामला म्हणाले, 'मी कदाचित बनलो असतो पण बनू शकलो नाही तसा माणूस तू बन, रामा.'

राम मंद आवाजात कुजबुजला, 'पिताश्री...'

'मला अभिमान वाटावा असा बन,' दशरथ म्हणाले, त्यांच्या डोळ्यांतही आता अश्रु दाटून येऊ लागले होते.

'पिताश्री...'

'मला अभिमान वाटू दे तुझा, माझ्या बाळा.'

राजा दशरथ अयोध्येच्या राजवाड्यातील कैकयींच्या महालातून बाहेर पडले तेव्हा राजपरिवाराच्या संरचनेत घडलेल्या बदलाविषयीचे सारे अंदाज शांत झाले. रामला अचानक युवराजपद का देऊ केलं हा प्रश्न कैकयी वारंवार आणि खूप जोर देऊन त्यांना विचारू लागल्या होत्या आणि ते त्या प्रश्नाचं त्यांना समाधानकारक उत्तर देऊ शकले नव्हते. आपल्या खाजगी सेवकवर्गासह राजा दशरथ महाराणी कौसल्यांच्या महालात राहू लागले होते. अयोध्येच्या

गोंधळलेल्या महाराणींना अचानक पुन्हा एकवार त्यांचा दर्जा परत मिळाला होता. आपल्या पदात अचानक झालेल्या या उन्नतीमुळे बुजऱ्या महाराणी कौसल्या शेफारून गेल्या नव्हत्या. अत्यंत विचारीपणाने त्यांनी काही निर्णय घेतले होते. त्यांनी आपल्या महालात कोणतेही बदल केले नव्हते. हे सौभाग्य फार काळ टिकणार नाही या भीतीपोटी त्या काही करत नव्हत्या का हे सांगणं कठिण होतं.

रामच्या सगळ्या भावांना या बदलामुळे खूप आनंद झाला होता. ब्रंगहून परतल्यानंतर लगेचच भरत आणि शत्रुघ्न त्याला भेटण्यासाठी महालातील त्याच्या कक्षात आले होते. घराकडे परतत असताना प्रवासातच त्यांना याबद्दलची माहिती मिळाली होती. रोशनीनेही त्यांच्यासोबत रामला भेटायचं ठरवलं.

'अभिनंदन दादा!' भरत म्हणाला. आनंदातिरेकाने त्याने रामला मिठी मारली.

'तू पात्र आहेस या पदासाठी,' शत्रुघ्न म्हणाला.

'नक्कीच,' रोशनी म्हणाली. आनंद तिच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहात होता. ती म्हणाली, 'इकडे येत असताना मला गुरु वशिष्ठ भेटले. अयोध्येतील अपराध दरातील घट ही राम काय करू शकतो याची केवळ एक छोटीशी चुणुक असल्याचं ते सांगत होते.'

'हो, तर!' लक्ष्मण उत्साहाने म्हणाला.

'ठीक आहे, ठीक आहे,' राम म्हणाला. 'आता तुम्ही सगळे मला लाजवताय बरं.'

'हो,' भरत हसतच म्हणाला, 'आम्हा सगळ्यांना तेच तर हवंय, दादा!'

'मला जेवढं कळतं त्यावरून सांगतो, कोणत्याही धर्मग्रंथामध्ये सत्य बोलण्यावर बंदी घातलेली नाही,' शत्रुघ्न म्हणाला.

'आणि आपण त्याच्या म्हणण्यावर विश्वास ठेवायला हवा, दादा,' खळखळून हसत लक्ष्मण म्हणाला. 'माझ्या माहितीत असलेला शत्रुघ्न हा एकुलता माणूस असा आहे की जो वेद, उपनिषद, ब्राह्मण, आरण्यकं, वेदांग, स्मृती आणि इतर जे काही माणसाने अर्जित केलेलं आहे किंवा माणसाला जे माहीत आहे ते सगळं जाणतो!'

'त्याचा मेंदू एवढा वजनदार आहे आणि त्याचा याच्या शरीरावर इतका भार पडतो की त्यामुळे याची उंची खुंटली!' भरतनेही कोपरखळी मारली.

शत्रुघ्नने आनंदाने हसत हसत लक्ष्मणाच्या कमावलेल्या पोटावर गंमतीने एक गुद्दा मारला.

लक्ष्मण खळखळून हसला. म्हणाला, 'तुला काय वाटतं शत्रुघ्ना, तुझे एवढे हळुवार गुद्दे मला लागतील? आईच्या पोटात तयार झालेल्या सगळ्या मेंदूच्या पेशी तुझ्या वाट्याला आल्या असतील, पण सगळी शक्ती मला मिळालेली आहे.'

सगळे आणखी मोठ्या आवाजात खळखळून हासले. अयोध्येच्या दरबारात जरी कितीही राजकारणी डावपेच लढवले जात असले तरी चारही भावांमध्ये आपापसात मजबूत बंधुभाव आहे हे जाणवून रोशनीला आनंद झाला होता. खरंच कदाचित, देव अयोध्येच्या भविष्यकालीन प्रगतीकडे लक्ष देत असावेत.

रामचा खांदा थोपटत ती म्हणाली, 'निघायला हवं मला.'

'कुठे निघायचंय?'

'सराइयाला. आपल्या आसपासच्या खेड्यात दर महिन्याला मी एक वैद्यकीय शिबिर घेते हे तुला ठाऊकच आहे. या महिन्यात सराइयामध्ये शिबिर आहे.'

राम थोडा चिंतेत पडला. म्हणाला, ‘मी तुझ्यासोबत काही अंगरक्षक पाठवतो. सराइयाच्या आसपासची गावं सुरक्षित नाहीत.’

रोशनी हसत म्हणाली, ‘तुला धन्यवाद दिले पाहिजेत. राज्यातील अपराधी घडामोडी सध्या अतिशय कमी झाल्या आहेत. तू लागू केलेल्या कायद्यांच्या अंमलामुळे हे शक्य झालं. आता तशी काळजी करण्यासारखं काहीही नाहीय.’

‘अजून मला अपराध पूर्णपणे आटोक्यात आणणं शक्य झालेलं नाहीय. तुलाही हे ठाऊक आहे. हे पाहा, थोडी दक्षता बाळगण्यात अपाय काहीही नाही.’

बऱ्याच कालापूर्वी तिने बांधलेली राखी अजूनही रामच्या उजव्या मनगटावर बांधलेली आहे हे रोशनीच्या लक्षात आलं. ती मंद हसली. म्हणाली, ‘चिंता करू नकोस, राम. मी दिवसा जाऊन परत येतेय. रात्र होण्याआधी मी परतेन. आणि मी एकटी नाहीय. माझ्यासोबत माझे मदतनीसही आहेत. आम्ही गाववासियांना मोफत औषधं देऊ आणि गरज पडली तर आवश्यक आणि शक्य ते वैद्यकीय इलाज करू. कुणी मला इजा पोहोचवणार नाही. ते काही वाईट का करतील काही?’

भरत त्यांच्यातील संभाषण ऐकत होता. पुढे येत त्याने रोशनीच्या खांद्याभोवती आपला हात टाकला अन् म्हणाला, ‘तू एक चांगली स्त्री आहेस, रोशनी.’

‘हो मी आहेच तशी,’ म्हणत रोशनी लहान मुलांसारखी हसली.

आपलं घोडदौडीचं कौशल्य आजमावण्यापासून दुपारचं रणरणतं उन्हसुद्धा लक्ष्मणाला हतोत्साहित करू शकलं नाही. भरधाव धावणाऱ्या घोड्याला अचानक थांबवण्याला युद्धात कमालीचं महत्व असतं हे तो जाणून होता. या कलेत नैपुण्य मिळविण्यासाठी त्यानं शहरापासून थोडा दूरवरचा भाग सरावासाठी निवडला होता जिथे उंच उभे कडे खाली थेट शरयूच्या वेगानं वाहाणाऱ्या पाण्यात उतरत होते.

‘आणखी वेगाने!’ कड्याच्या दिशेने धावत्या घोड्याला टाच मारत लक्ष्मण ओरडला.

घोडा कड्याच्या दिशेने भरधाव निघाला. लक्ष्मणने शेवटच्या क्षणांपर्यंत वाट पाहिली. मग उजव्या हाताने करकचून लगाम खेचला आणि खोगीरावर पुढे झुकून त्याने आपला डावा हात घोड्याच्या गळ्याभोवती टाकला. त्या भव्य घोड्याने लगेच प्रतिसाद दिला आणि हिणहिणत आपले पुढले दोन पाय हवेत उचलले. सगळा भार मागल्या पायांवर आला आणि जेव्हा अटळ मृत्युपासून केवळ काही फुटांवर तो उभा राहिला तेव्हा त्या घोड्याच्या मागल्या खुरांनी जमिनीवर खुणा उमटल्या. भारदस्तपणे लक्ष्मण घोड्यावरून उतरला. त्याने आयाळीखाली घोड्याची मान कौतुकानं गोंजारली.

‘उत्तम..... उत्तम कामगिरी केलीस.’

आपली झुपकेदार शेपुट हालवून घोड्यानं आपल्या प्रशंसेचा स्वीकार केला.

‘पुन्हा एकदा करूया?’

घोड्याला आता पुरे झालं होतं. नाकातून आवाज काढत त्याने मान जोरदार हालवून जणू आपली हरकत नोंदवली. घोड्याला थोपटत लक्ष्मण मंद हासला. स्वार होत त्याने लगाम हाती घेऊन घोडा विरुद्ध दिशेला वळवला. ‘ठीक आहे. चल आपण घरी परतू,’ तो घोड्याला

म्हणाला.

जंगलातून परतत असताना काही अंतरावर एक बैठक भरलेली होती. ती जर लक्ष्मणाला दिसली असती तर तेथे जाऊन काय चाललंय हे पाहायला लक्ष्मणाला आवडलं असतं. तेथे गुरु वशिष्ठ त्याच गूढ नागा व्यक्तीशी कोणत्यातरी सखोल चर्चेत गुंगले होते.

'बरं, ते जाऊ दे, मात्र मला माफ करा, तुम्ही...'

'...हारलात?' त्याचं वाक्य वशिष्ठांनी पूर्ण केलं. बऱ्याच लांबलेल्या आणि काहीही सूचना न देता घालवलेल्या सुट्टीवरून ते अयोध्येत परतले होते.

'मी हा शब्द वापरला नसता, गुरुजी.'

'पण तोच योग्य शब्द आहे. पण हा केवळ आपला पराभव नाही, हा पराभव.....'

काहीतरी ऐकू आल्याचा भास झला म्हणून वशिष्ठ बोलता बोलता गप्प झाले.

'काय झालं?' नागानं विचारलं.

'तुला काही ऐकू आलं का?' वशिष्ठांनी त्याला विचारलं.

नागानं चारही बाजूला सावध नजर फिरवली. लक्षपूर्वक काही सेकंदांपर्यंत आवाजाचा कानोसा घेतला आणि मग आपलं डोकं नकारार्थी हालवलं.

'राजकुमार रामबद्दल काय?' बोलणं पुढे नेत नागा व्यक्तीनं विचारलं. 'आपला मित्र त्याचा शोध घेत इकडे येत आहे हे आपण जाणता ना?'

'ते मला ठाऊक आहे.'

'आता आपला काय करायचा विचार आहे?'

'आता मी काय करणार?' वशिष्ठांनी पुन्हा त्यालाच विचारत आपण काहीही करू शकत नाही याअर्थी आपले हात हवेत उंचावले. मग ते म्हणाले, 'खुद्द रामालाच आता काय ते करावं लागेल.'

तेवढ्यात त्यांना कुटकी मोडल्याचा स्पष्ट आवाज ऐकू आला. कदाचित प्राणी असेल कुठला तरी असं त्यांना वाटलं. नागा म्हणाला, 'मला निघावं लागेल'.

'हो,' वशिष्ठांनी होकार दिला.

विजेच्या चपळाईनं तो आपल्या घोड्यावर स्वार झाला. मग वशिष्ठांकडे वळून म्हणाला, 'आज्ञा द्यावी.'

वशिष्ठांनी हसत हात जोडून त्याला नमस्कार केला. 'रुद्रदेवांच्या सोबतीने जा, मित्रा.'

नागानं नमस्कार करत म्हटलं, 'रुद्रदेवावर विश्वास ठेवा, गुरुजी.'

नागानं मग हलकेच घोड्याला टाच दिली आणि तो निघून गेला.

'पाय मुरगळलाय फक्त', पायाभोवती पट्टी गुंडाळत रोशनी त्या मुलाला धीर देत म्हणाली, 'एखाद-दोन दिवसात ठीक होईल.'

'नक्की ना?' मुलाच्या चिंताग्रस्त आईने विचारले.

आसपासच्या वस्त्यांमधून कित्येक गावकरी सराइया गावच्या चौकात जमले होते. रोशनीने अत्यंत सहनशीलतेने त्या सगळ्यांवर उपचार केले होते. तो मुलगा शेवटचा रुग्ण होता.

'होय,' त्या मुलाच्या डोक्यावर हलकेच चापटी मारत रोशनी म्हणाली. मुलाचा चेहरा ओंजळीत घेऊन रोशनी त्याला म्हणाली, 'आता मी काय सांगते ते लक्ष देऊन ऐक. पुढचे काही दिवस

झाडांवर अजिबात चढायचे नाही, पळापळी करायची नाही. घोटा जोवर बरा होत नाही तोवर काळजी घेशील ना?’

मुलाच्या आईने मध्येच बोलत म्हटलं, ‘मी त्याच्यावर लक्ष ठेवेन. तो घरातच राहील.’

‘छान,’ रोशनी म्हणाली.

‘रोशनी ताई,’ ओठांचा चंबू करून खोटं खोटं रागावत तो मुलगा म्हणाला, ‘माझी मिठाई कुठंय?’

रोशनीने हसतच आपल्या एका मदतनीसाला खूण केली. त्याने आणलेल्या पिशवीतून एक मिठाई काढून तिने त्या मुलाला दिली. मिठाई मिळाली म्हणून मुलगा खूश झाला. त्याच्या केसांतून रोशनीने हात फिरवला. मग ती आपल्या खुर्चीतून उठली. पाठ ताणून तिने आळस दिला. मग गावच्या प्रमुखाकडे वळून ती म्हणाली, ‘आता आम्हाला रजा द्यावी. आम्ही आता निघतो.’

‘आत्ता निघायलाच हवं का बायो?’, प्रमुखानं विचारलं, ‘उशीर झालाय तसा. रात्री आधी तुम्ही अयोध्येत पोहोचू शकणार नाही. नगराचे प्रवेशद्वार बंद होईल तुम्ही पोहोचण्याआधी.’

‘नाही नाही, मला वाटतं आम्ही पोहोचू वेळेवर,’ रोशनी म्हणाली. ‘मला वेळेवर पोहोचायलाच हवं. आज संध्याकाळी मी अयोध्येत हवी असं माझ्या आईने बजावलंय. त्यांनी एक कार्यक्रम ठरवलाय आणि मला त्या कार्यक्रमात असायलाच हवं.’

‘ठीक आहे. जशी आपली इच्छा बायो,’ गावप्रमुख म्हणाला, ‘पुन्हा एकदा खूप खूप आभार. आपण नसतात तर आम्ही काय केलं असतं कोण जाणे.’

‘खरं तर आपण ब्रह्मदेवाचे आभार मानायला हवेत. त्यानेच मला हे कौशल्य दिलं ज्याआधारे मी आपली मदत करू शकते.’

गावप्रमुख नेहमीसारखं रोशनीला पाय धरून नमस्कार करण्यासाठी वाकले आणि रोशनी नेहमीप्रमाणेच मागे सरली. म्हणाली, ‘माझे पाय धरून मला लाजवू नका. मी वयाने आपल्यापेक्षा लहान आहे.’

प्रमुखानं दोन्ही हात जोडून रोशनीला नमस्कार केला आणि ते म्हणाले, ‘रुद्रदेवाची तुमच्यावर नेहमी कृपा असू दे, बायो.’

‘ त्याची आपणा सगळ्यांवरच कृपा असू दे!’ रोशनी म्हणाली. मग ती आपल्या घोड्यापर्यंत चालत गेली. झटक्यात घोड्यावर स्वार झाली. तिच्या दोघा मदतनीसांनी आधीच आपलं सामान आवरलं होतं आणि ते आपापल्या सामानासह घोड्यावर स्वार झाले होते. रोशनीने संकेत केला आणि ते तिघे निघाले. पाहाता पाहाता ते त्या गावाबाहेर पोहोचले.

काही क्षणांतच आठ घोडेस्वार गावप्रमुखाच्या घरासमोर जमले. ते जवळच्याच इसला नावाच्या गावातून आले होते. त्यांनी त्या दिवशी रोशनीकडून औषध घेतलं होतं. त्यांच्या गावात तापाची साथ आली होती. त्यांच्यापैकी एक इसला गावाच्या प्रमुखाचा किशोरवयीन मुलगा धेनुका होता.

‘भावा,’ प्रमुख त्यांना म्हणाला, ‘ज्या वस्तुंची गरज होती ते सगळं मिळालं ना?’

‘हो,’ धेनुका म्हणाला, ‘पण रोशनी बायो कुठे आहेत? मला त्यांचे आभार मानायचे आहेत.’

गावप्रमुखाला आश्चर्य वाटलं. कारण धेनुका आपल्या हेंगाड्या आणि क्रूर वागणुकीबद्दल प्रसिद्ध होता. आज तो पहिल्यांदाच रोशनीला भेटला होता. मग त्याला वाटलं, रोशनीच्या

सुसंस्कृत आणि चांगल्या वागणुकीचा याच्या मनावर परिणाम झाला असावा. तो म्हणाला, 'त्या नुकत्याच आपल्या घोड्यावर स्वार होऊन निघून गेल्या. रात्र होण्याआधी त्यांना अयोध्येत पोहोचायचं होतं.'

'बरं,' धेनुका म्हणाला. तो गावातून बाहेर जाणारा रस्ता न्याहाळत होता. मग हसत त्याने घोड्याला टाच दिली.

'मी आपली मदत करू का, देवी?' धेनुकाने विचारलं.

अचानक आलेल्या या व्यत्ययाने आश्चर्य वाटलं अन् रोशनीने मागे वळून पाहिलं. त्यांनी थोड्या वेळात बरंच अंतर कापलं होतं आणि ते शरयू नदीकाठी थोडा वेळ विश्रांती घेण्यासाठी थांबले होते. अयोध्येपासून तासाभराच्या अंतरावर होते ते.

आधी तो कोण आहे हे रोशनीच्या लक्षात आलं नाही. पण लक्षात आलं तेव्हा ती ओळखीचं हसू हसली.

'ठीक आहे धेनुका,' रोशनी म्हणाली. 'आमच्या घोड्यांना थोडी विश्रांती हवी होती. माझ्या मदतनीसांनी औषधं कशी द्यायची हे सांगितलं असेलच ना?'

'हो तर,' धेनुका विचित्र हसत म्हणाला.

अचानक रोशनीला अस्वस्थ वाटू लागलं. तेथून लगेच निघून जायला हवं असं तिला आतून वाटलं. 'तुमच्या गावातील लोकांना लवकरच बरं वाटेल.'

ती आपल्या घोड्यापर्यंत पोहोचली. घोड्याचा लगाम तिनं हातात घेतला तशी धेनुकाने पटकन् आपल्या घोड्यावरून उडी मारली. पुढे येऊन त्याने तिचा हात धरला आणि तिला मागे खेचत म्हणाला, 'गडबड कसली आहे, देवी?'

रोशनीने त्याला मागे ढकलले आणि सावकाश परत फिरली. तोवर धेनुकाच्या टोळीतील इतर सदस्य घोड्यावरून खाली उतरले. त्यांच्यापैकी तिघे जण रोशनीच्या मदतनीसांकडे निघाले.

रोशनीच्या कण्यातून भीतीची वीज चमकत गेली. अडखळत ती म्हणाली, 'मी... मी तुमच्या लोकांना बरं केलं...'

धेनुका भेसूर हसत म्हणाला, 'हो, ठाऊक आहे मला. तू मलाही बरं करशील असं वाटतंय मला...'

अचानक मागे वळून रोशनी धावू लागली. तीन लोक तिच्या मागे धावले. लवकरच त्यांनी तिला पकडलं. त्यांच्यापैकी एकानं तिच्या सणसणीत थोबाडीत लगावली. रोशनीच्या ओठांतून रक्ताची चिळकांडी उडाली. दुसऱ्या माणसाने क्रूरपणे तिचा हात मुरगळत तिच्या पाठीमागे नेला.

धेनुका सावकाश सहज चालत तिच्याजवळ पोहोचला. हात पुढे करून तिचा चेहरा कुरवाळत तो म्हणाला, 'कुलीन स्त्री.....हं...गंमत येणार आज.'

त्याची टोळी गडगडाटी हसू लागली.

'दादा!' रामच्या कार्यालयात घुसता घुसता लक्ष्मण किंचाळला.

रामने डोळे वर उचलून त्याच्याकडे पाहिले नाही. तो आपल्या समोरच्या टेबलावर पडलेल्या दस्तऐवजांच्या चळतीत हरवला होता. दुसऱ्या प्रहरातील ती पहिली घटिका होती आणि त्याला थोडी शांती हवी होती.

रामने नेहमीप्रमाणे हातातील कागद वाचता वाचता विचारलं, 'आता काय झालं, लक्ष्मण?'

'दादा...' भावनांच्या हलकल्लोळामुळे लक्ष्मणाच्या तोंडून आवाज फुटत नव्हता.

'लक्ष्...' राम बोलता बोलता गप्प झाला. त्याने वर पाहिलं तेव्हा डोळ्यातून अश्रुधारा वाहात असलेला लक्ष्मण त्याला दिसला. रामने काळजीने विचारलं, 'काय झालं?'

'दादा... रोशनी ताई...'

राम ताडकन् उठून उभा रहिला. मागे त्याची खुर्ची कोलमडली. खडबडून त्याने विचारलं, 'काय झालं रोशनीला?'

'दादा....'

'कुठे आहे ती?'

# प्रकरण 13

मती गुंग झालेला भरत थिजल्यासारखा उभा होता. लक्ष्मण आणि शत्रुघ्न धाय मोकलून रडत होते. मंथरानं मृत मुलीचं डोकं आपल्या मांडीवर ठेवलं होतं. तिची नजर दूर कुठेतरी, शून्यात लागली होती. तिचे डोळे सुजले होते पण त्यांत अश्रूंचा मागमूसही नव्हता. तिचे सारे अश्रू संपून गेले होते. रोशनीचं शरीर सफेद कापडात गुंडाळलेलं होतं. मंथराच्या माणसांना ती शरयू नदीच्या किनारी रक्तबंबाळ आणि विवस्त्रावस्थेत सापडली होती. तिच्या एका मदतनीसाचं शव तेथून थोड्या अंतरावर पडलेलं होतं. दुसऱ्या मदतनीसाचं शरीर रस्त्याशेजारी मिळालं होतं. तो गंभीर जखमी अवस्थेत पण जिवंत होता. वैद्य त्याच्यावर उपचार करत होते. राम तेथेच उभा होता. त्याचा चेहरा भावशून्य होता पण रागानं त्याचे हात शिवशिवत होते. रोशनीच्या मदतनीसाला त्याला प्रश्न विचारायचे होते.

दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत जेव्हा रोशनी परतली नाही तेव्हा मंथरांनी आपल्या मुलीला शोधायला आणि परत आणायला सराइयाला आपली माणसे पाठवली होती. पहाटे शहराचे प्रवेशद्वार उघडल्या उघडल्या ते निघाले होते. शहरापासून तासाभराच्या अंतरावर आल्यावर त्यांना रोशनीचं प्रेत दिसलं. तिच्यावर पाशवी सामूहिक बलात्कार झाला होता. सपाट पृष्ठभूमीवर तिचं डोकं बऱ्याच वेळा आपटण्यात आलं होतं. तिला झाडाला बांधून ठेवण्यात आलं होतं हे तिच्या मनगटावरील आणि पाठीवरील खुणांवरून लक्षात येत होतं. तिच्या संपूर्ण शरीरावर माराचे डाग आणि क्रूर चावे घेतल्याच्या खुणा होता. त्या राक्षसांनी तिच्या ओटीपोटाच्या आसपासची आणि दंडावरची चामडी दातांनी सोलून काढलेली होती. दुसऱ्याचा छळ करून आनंद मिळवण्याच्या रुग्ण मानसिकतेच्या कर्मकांडांतर्गत कोणत्यातरी बोथट औजारानं तिला सर्वांगावर मारण्यात आलं होतं. एका बाजूने तिचा चेहरा ओठांपासून ते गालाच्या हाडापर्यंत फाटलेला होता. ही जखम आणि तिच्या तोंडात साकळलेल्या रक्ताच्या गुठळ्यांवरून हे सगळं तिने जिवंतपणी सहन केल्याचं समजत होतं. तिच्या संपूर्ण शरीरावर वीर्याचे डाग दिसून येत होते. अतिशय क्रूररीत्या तिचा अंत झाला होता कारण एका हल्लेखोरानं तिच्या घशात अम्ल ओतलं होतं.

मदतनीसानं अतिशय कष्टानं डोळे उघडले. राम लगेच त्याच्यावर झुकला आणि गुरकावत त्याला विचारलं, 'कोण होते ते?'

'महाराज, तो बोलू शकेल असं वाटत नाही,' वैद्य म्हणाले.

रामनं वैद्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केलं. तो मदतनीसाच्या तोंडाजवळ गुडघ्यावर बसला आणि त्याने पुन्हा विचारलं, 'कोण होते ते?'

अतिशय कष्टाने रोशनीच्या मदतनीसाने कुजबुजत एक नाव उच्चारलं आणि पुन्हा त्याची शुद्ध हरपली.

रोशनी कुलीन आणि सर्वसामान्य लोकांत समान रूपानं लोकप्रिय असणारं दुर्मिळ व्यक्तीमत्व

होतं. तिने आपलं संपूर्ण आयुष्य जनकल्याणासाठी वाहिलेलं होतं. तिच्या व्यक्तीमत्वात कुठेही बोट ठेवण्याएवढीसुद्धा उणीव नव्हती. सौंदर्य आणि प्रतिष्ठेची ती मूर्तीमंत प्रतिमा होती. कित्येक लोक तिची तुलना कुमारिका देवी कन्याकुमारीशी करत असत. म्हणूनच या क्रूर अपराधामुळे लोकांचा उफाळून आलेला राग अभूतपूर्व होता. संपूर्ण शहर प्रतिदंडाची मागणी करत होतं.

पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या अपराध्यांना लवकरच इसला खेड्यातून पकडून आणण्यात आलं. गावच्या प्रमुखानं जेव्हा आपल्या मुलाला वाचविण्याचा प्रयत्न केला तेव्हा गावच्या महिलांनी त्याला बेदम चोप दिला होता. गप्प राहून त्यांनी बराच काळ धेनुकाचे पाशवी अत्याचार सहन केले होते. रामच्या पोलीस दलातील सुधारित पद्धतीमुळे तपासकार्य पूर्ण झालं होतं. कमीत कमी वेळात न्यायाधीशांपुढे मामला मांडण्यात आला होता आणि त्या नराधमांना शिक्षा ठोठावण्यात आली होती. आठवड्याभरातच अपराध्यांना शिक्षा देण्याची तयारी सुरू झाली होती. सगळ्यांना, केवळ एका व्यक्ती व्यतिरिक्त- धेनुकाव्यतिरिक्त, इतर सगळ्यांना मृत्युदंड ठोठावण्यात आला होता. बलात्कार आणि खुनाच्या या जघन्य घटनेतील मुख्य अपराधी धेनुकाला तो अल्पवयीन असल्याने कायद्यातील एका तांत्रिक बाबीमुळे मृत्युदंड सुनावता आला नव्हता. त्यामुळे राम आतल्या आत उध्वस्त झाला होता. कायदा तोडता आला नसता, कारण राम कायद्याचा रक्षक होता. राम – न्याय प्रवर्तक होता. निदान रामच्या उपस्थितीत नाही. पण रोशनीने रामला राखी बांधली होती आणि राम अपराधभावनेने ग्रस्त झाला होता. कारण तो कायद्यासमोर हतबल झाला होता. आपल्या बहिणीच्या भयानक रीत्या झालेल्या हत्येचा सूड उगवणं किंवा त्या घटनेतील मुख्य अपराध्याला शिक्षा सुनावणं त्याला शक्य झालं नव्हतं. त्यामुळे आता त्याला स्वतःलाच शिक्षा करणं भाग होतं. आणि स्वतःला वेदना देऊन तो नेमकं तेच करत होता.

आपल्या खाजगी अभ्यासिकेच्या गच्चीत एका खुर्चीवर तो एकटाच बसला होता. ज्या झाडाखाली रोशनीने त्याच्या मनगटावर राखी बांधली होती त्या झाडाकडे तो टक लावून पाहात होता. त्याची नजर आपल्या मनगटातील राखीच्या त्या सोनेरी धाग्याकडे गेली अन् त्याचे डोळे दुथडी भरून वाहू लागले. दुपारचं रणरणतं ऊन त्याच्या उघड्या धडाला पोळत होतं. त्याने नजर उचलून सूर्याकडे पाहाताना हातांनी डोळ्यांवर आडोसा केला. मग खोल श्वास घेतला अन् उजव्या जखमी हाताकडे पाहिलं. मग त्याने उजव्या बाजूला तिवईवर ठेवलेला लाकडाचा तुकडा उचलला. त्याचं एक टोक धगधगत होतं.

पुन्हा एकदा आकाशाकडे पाहात तो पुटपुटला, ‘मला माफ कर, रोशनी.’

मग त्याने आपल्या उजव्या दंडाच्या आतल्या बाजूवर लाकडाचं धगधगतं टोक टेकवलं. याच हाताच्या मनगटावर राखीचा पवित्र धागा बांधलेला होता जो आपल्या बहिणीचं रक्षण करण्याच्या त्याच्या गंभीर प्रतिज्ञेची त्याला आठवण करून देत होता. त्याच्या तोंडून दुखाचा सुस्कारासुद्धा निघाला नाही. त्याची पापणी एकदासुद्धा वेदनेने लवली नाही. मांस जळल्याचा वास वातावरणात पसरला.

‘मला माफ कर....’

रामने आपले डोळे बंद केले. त्याच्या बंद डोळ्यांतून निर्बाध वाहाणारे अश्रू त्याच्या गालांवरून ओघळत राहिले.

काही तासांनंतर राम दुःखी मनानं आपल्या कार्यालयात बसला होता. त्याची अवस्था फारच दयनीय झाली होती. त्याच्या दंडावर धनुर्धारी बांधतात तशी पट्टी बांधलेली होती ज्याखाली त्याची जखम झाकली गेली होती.

'पण हे चूक आहे, दादा!'

लक्ष्मण रामच्या कार्यालयात आला तेव्हा रागानं अक्षरशः फणफणत होता. रामने त्याच्याकडे पाहिलं. त्याच्या डोळ्यातील दुःखानं त्याच्या मनातली आग झाकली होती.

'कायदा तसा आहे, लक्ष्मण,' राम शांतपणे म्हणाला, 'कायदा तोडता येत नाही. कायदा सर्वश्रेष्ठ असतो. तुझ्या किंवा माझ्यापेक्षा महत्वाचा. किंवा इतर कशाहीपेक्षा....'

रामचे पुढील शब्द त्याच्या घशात अडकले. तो तिचे नाव उच्चारू शकत नव्हता आता.

'वाक्य पूर्ण कर, दादा!' भरत दारातून आत येतायेता रोखठोकपणे म्हणाला.

रामने नजर वर उचलली. त्याने भरतच्या दिशेने 'पुरे' याअर्थी हात उंचावत दुःखाने कळवळत म्हटलं, 'भरत...'

भरत आत आला. त्याचे डोळे दुःखानं भरून आले होते. त्याचे शरीर ताठरले होते आणि त्याची बोटे कापत होती. तरीही त्याच्या मनात जे वादळ घोंघावत होतं ते व्यक्त करायला ही सारी लक्षणं पुरेशी नव्हती. तो म्हणाला, 'तुला जे म्हणायचं आहे, ते म्हण, दादा!'

'भरत, अरे, ऐकून तरी घे माझं....'

'हो, बोल ना! सांगून टाक की, तुझा कायदा रोशनीपेक्षा महत्वाचा आहे!' भरतच्या डोळ्यांतून अश्रूंचा अनिर्बंध पूर वाहात होता. तो म्हणाला, 'तुझ्या मनगटातील त्या राखीपेक्षा तुला कायदा महत्वाचा वाटतो हे सांगूनच टाक तू!' त्याने पुढे झुकून रामचा उजवा दंड पकडला. रामने हुं का चूं केले नाही. भरत बोलतच राहिला, 'सांग की रोशनीला आपण जे तिचं कायम रक्षण करण्याचं वचन दिलं होतं त्यापेक्षा तुला तुझा कायदा जास्त महत्वाचा वाटतो ते.'

'भरत,' त्याच्या मगरमिठीसारख्या पकडीतून आपला दंड सावकाश सोडवून घेत राम म्हणाला, 'कायदा स्पष्ट शब्दांत सांगतो की अल्पवयीनांना फाशीची शिक्षा देता येत नाही. धेनुकाचे वय कमी आहे आणि म्हणून कायद्यान्वये त्याला फाशीची शिक्षा देता येणार नाही.'

'खड्ड्यात गेला तुझा कायदा!' भरत ओरडत म्हणाला, 'हे कायद्यासंबंधी नाहीय! हे न्यायासंबंधी बोलतोय आपण! या दोन्हीतील फरक तुला समजत नाही का, दादा? तो राक्षस मेलाच पाहिजे!'

'हो, तो मरायलाच हवा,' हृदय पिळवटून टाकणाऱ्या अपराधभावनेने पिचलेला राम म्हणाला, 'पण एका अल्पवयीनाला अयोध्येत फाशी दिली जाणार नाही. कायदा हेच सांगतो.'

'धिक्कार असो, दादा!' तिवईवर हात आपटत भरत म्हणाला.

त्यांच्या मागून एक मोठा आवाज आला, 'भरत!'

तिघाही भावांनी वळून पाहिलं तेव्हा दारात राजगुरु वशिष्ठ उभे असलेले त्यांना दिसले. चटकन् सावरत भरतने दोन्ही हात जोडून त्यांना आदरानं नमस्कार केला. लक्ष्मणने मात्र औपचारिकता पाळली नाही. त्याचा अनिर्बंध राग आता गुरुजींवर केंद्रित झाला.

वशिष्ठ सावकाश पण दृढ पावलं टाकत आत आले. ते म्हणाले, 'भरत, लक्ष्मण, तुमचा मोठा

भाऊ बरोबर बोलत आहे. कोणत्याही परिस्थितीत कायद्याचा आदर करायला हवा आणि पालनही करायला हवं.'

'मग आम्ही रोशनीला जे वचन दिलं होतं, त्याचं काय गुरुजी? त्याला काही अर्थ नाही का?' भरतने विचारलं. 'तिचं रक्षण करण्याचं वचन आम्ही तिला दिलं होतं, आमचं तिच्याबाबतीतही काही कर्तव्य होतं ना? आणि आम्ही ते पाळू शकलो नाही. म्हणून आता आम्हाला तिच्या बाबतीत घडलं त्याचा सूड उगवायचा आहे.'

'तुमचा शब्द कायद्याहून मोठा नाही.'

'गुरुजी, रघुवंशी कधीही आपण दिलेला शब्द पडू देत नाहीत,' कुटुंबातील एक जुनं वचन सांगत भरत म्हणाला.

'जर तुम्ही दिलेला शब्द कायद्याच्या विरोधात जात असेल, तर तुम्ही तो मोडावा आणि आपल्या नावावर कमीपणा घ्यावा,' वशिष्ठ म्हणाले, 'हाच धर्म आहे.'

'गुरुजी,' योग्यायोग्यतेचा सारासार विचार आणि स्वतःवरील नियंत्रण धाब्यावर बसवून लक्ष्मण ओरडला.

'हे पाहा!' वशिष्ठ रामच्या दिशेने पुढे जाता जाता म्हणाले. त्यांनी रामच्या उजव्या हातावरची पट्टी काढली आणि सगळ्यांना नीट दिसावं म्हणून त्याचा हात उंचावला. रामनं आपला हात सोडवून घेण्याचा प्रयत्न केला पण वशिष्ठांनी तो गच्च पकडला होता.

रामच्या दंडाच्या आतल्या भागावरची जखम पाहून लक्ष्मणाला आणि भरतला धक्का बसला. रामच्या उजव्या दंडाचा आतील भाग भाजला होता. जखमेपासची त्वचा होरपळून काळी पडली होती.

'तो वरचेवर स्वतःला डागण्या देतोय. दररोज. कायद्याच्या तांत्रिकतेमुळे धेनुकाला फाशी देता येणार नाही, असा ज्या दिवशी न्यायाधीशांनी निर्णय दिला त्या दिवसापासून,' वशिष्ठांनी सांगितलं, 'मी त्याला थांबविण्याचा प्रयत्न करतो, पण रोशनीला दिलेला शब्द पाळता आला नाही म्हणून स्वतःला अशा रीतीने शिक्षा देतोय तो. पण तो कायदा मात्र मोडणार नाही.'

सात बलात्कारींना फासावर चढवण्याची कारवाई पार पडली तेव्हा राम तेथे उपस्थित राहिला नव्हता.

मुख्य अपराध्याला फाशी देऊ न शकण्याच्या क्रोधात न्यायाधीशांनी इतर सात कैद्यांना वाइटात वाईट प्रकारे शिक्षा करण्याचे फरमान काढले होते. त्यांनी ही शिक्षा कशी दिली जावी याचे बारकावेसुद्धा दिलेले होते. फाशीची शिक्षा लवकरात लवकर देण्यासंबंधी रामच्या नव्या कायद्याने प्रमाण मानलेली फाशी देण्याची त्वरित प्रक्रिया म्हणजे – गळफास लावून प्राण जाईपर्यंत फासावर लटकवणे. रामच्या हुकुमनाम्यान्वये तुरुंगातील ठरलेल्या ठिकाणी फाशी देण्याची क्रिया उरकली जावी असाही निर्देश दिलेला होता. त्याच हुकूमनाम्याच्या शेवटी दिलेल्या पोटकलमान्वये न्यायाधीशांना फाशी देण्याची प्रक्रिया ठरविण्याचा विशेषाधिकार दिलेला होता. याच पोटकलमाच्या आधाराने रागाने पेटून उठलेल्या न्यायाधीशांनी फाशी कशी द्यायची याबद्दलच्या अपवादात्मक प्रक्रियेसंबंधी सविस्तर सूचना दिलेल्या होत्या. त्यान्वये – फाशीची शिक्षा सार्वजनिक ठिकाणी दिली जाणार होती, अपराध्यांचा जीव जाईपर्यंत त्यांचे रक्त

वाहू दिले जाणार होते, ही शिक्षा अधिकात अधिक वेदनामयी बनविण्यात येणार होती. या शिक्षेच्या योग्यतेबद्दल खात्री देताना त्यांच्यावतीने सांगितले होते की या शिक्षेमुळे लोकांसमोर भविष्यात कायम एक धडा उभा राहील. खाजगीत त्यांच्यात जेव्हा चर्चा झाली तेव्हा आपापसात त्यांचे असेही बोलणे झाले की यामुळे लोकांनासुद्धा आपला न्याय्य राग व्यक्त करण्याची योग्य ती संधी मिळेल. न्यायाधीशांनी दिलेला हा निर्णय मानण्यावाचून नगर रक्षकांसमोर कोणताही पर्याय उरला नव्हता.

फाशी देण्यासाठी शहराच्या बाहेरील बाजूच्या भिंतीपलीकडे एक खास चबूतरा बनविण्यात आला होता. त्या चबूतऱ्याची उंची साधारण चार फुटांहून अधिक होती. दुरूनही फाशीची शिक्षा दिसावी हा या व्यवस्थेमागचा हेतू होता. फाशी देण्याचा हा अभूतपूर्व कार्यक्रम पाहाण्यासाठी हजारो लोक बाहेरील भिंतीजवळ पोहोचले होते. त्यापैकी कित्येकांनी स्वतःबरोबर कुजकी अंडी आणि सडलेली फळं आणली होती. यांचा वापर ते अग्निगोलासारखा करणार होते.

कैद्यांना कारागृहातील जाळीच्या छकड्यांमधून फाशीच्या स्थळी आणण्यात आलं होतं. कैद्यांना जेव्हा छकड्यांमधून उतरवण्यात आलं तेव्हा तेथे जमा झालेल्या लोकांमध्ये रागाचा हुंकार घुमला. त्यांच्या शरीरावरील जखमांवरून स्पष्ट लक्षात येत होतं की त्यांना कारागृहातही बेदम चोप देण्यात आला होता. प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही राम कारागृहातील पहारेकऱ्यांच्या आणि इतकेच नव्हे तर कैद्यांच्याही रागाला आवर घालू शकला नव्हता. त्यांच्यापैकी प्रत्येकाला रोशनीच्या मदतीचा कोणत्या ना कोणत्या रूपाने कधी न कधी उपयोग झाला होता. आपल्याला मिळालेल्या मदतीच्या परतफेडीची त्यांची इच्छा अतिशय तीव्र झाली होती.

अपराध्यांना चौथऱ्यावर आणण्यात आलं. चौथऱ्यावर उभारलेल्या लाकडी चौकटीवर त्यांना उभं करून त्यांना मानखोडा घातला गेला. मानखोडा म्हणजे मोठ्या लाकडी फळीला डोकं आणि हात अडकविण्यासाठी केलेल्या गोलांमध्ये माणसाचे डोके आणि हात अडकवून त्याला सार्वजनिक छळासाठी उभा करणे. अशा रीतीने कैद्यांना मानखोडा घातल्यानंतर कारागृहातील रक्षकवर्ग चौथऱ्यावरून खाली उतरला.

तेथे जमा झालेल्या लोकांना दिला गेलेला हा उघड संकेत होता. लोकांनी अचूक नेम धरून गोळे फेकायला सुरवात केली. ते त्यांना शिव्याशापही देत होते आणि त्यांच्यावर थुंकतही होते. इतक्या दूरवरून फेकलेल्या अंडी आणि फळांमुळेसुद्धा जखमा होऊन रक्त वाहू लागलं होतं. कैद्यांना प्रचंड वेदना होऊ लागल्या होत्या. कोणत्याही प्रकारच्या अणकुचीदार वस्तू किंवा मोठे दगड फेकण्यास लोकांना मनाई केली गेली होती. गुन्हेगार लगेच मरावेत असं कुणालाही वाटत नव्हतं. त्यांनी जे केलं होतं त्याची भरपाई त्यांना करावी लागणार होती. त्यांचा अनन्वित छळ करायचा होता.

हे जवळ जवळ अर्धा तास चाललं. फाशी देणाऱ्या अधिकाऱ्यांनी लोकांना हल्ला थांबविण्याची विनंती केली. थकल्यामुळे लोकांचाही हल्याचा वेग मंदावला. लोक थांबले तसे अधिकारी चौथऱ्यावर चढून पहिल्या गुन्हेगाराजवळ गेले. भीतीने त्याचे डोळे विस्फारले गेले होते. दोघा मदतनीसांच्या मदतीने त्याने त्या गुन्हेगाराचे दोन्ही पाय दोन दिशांना इतके फाकवले की खोड्यात त्याची मान खेचली गेली. मग फाशी देणाऱ्यानं जवळच जमिनीवर ठेवलेल्या साहित्यातून एक जाड खिळा आणि लोहाराच्या भल्यामोठ्या हातोड्यासारखी एकदम मोठी हातोडी उचलली. मदतनीसाने फाकवलेल्या पायांपैकी एक पाऊल लाकडी पृष्ठभागावर दाबून

धरलं तेव्हा फाशी देणाऱ्या ने शांतपणे त्याचा पाय खिळ्यावर लयीत हातोडा ठोकून लाकडी जमिनीशी जोडला. गुन्हेगाराने टाहो फोडला आणि गर्दीने पसंतीची आरोळी ठोकली. फाशी देणाऱ्याने – वधिकाने – आपण केलेलं काम ठीक झालं की नाही ते पाहिलं. आणखी काही हातोड्याचे घाव घालून काम पूर्ण केलं. मग तो समाधानानं मागे फिरला. गुन्हेगार वेदनेनं कळवळायचा नुकता थांबला तेव्हा वधिक त्याच्या दुसऱ्या पावलाकडे वळला.

हे भयानक काम वधिकाने इतर सहा गुन्हेगारांवरही केलं. त्याने त्यांचे पाय खिळे ठोकून लाकडी जमिनीला जोडले. गर्दी आनंदाने वेडीपिशी झाली होती. गुन्हेगारांच्या प्रत्येक किंकाळीवर गर्दी आनंदाने आरोळ्या ठोकत होती. जेव्हा हे काम पूर्ण झालं तेव्हा वधिक चौथऱ्याच्या समोरच्या बाजूला गेला आणि त्याने लोकांना अभिवादन केलं. गर्दीने आनंदाच्या हुंकारांनी त्याला प्रोत्साहन दिलं.

मग तो पुन्हा पहिल्या गुन्हेगाराजवळ गेला. तोवर तो गुन्हेगार बेशुद्ध झाला होता. त्याला काही औषध पाजण्यात आलं आणि जागा होईपर्यंत त्याला थोबाडीत मारण्यात आलं.

वधिक गुरकावत गुन्हेगाराला म्हणाला, 'यातली गंमत अनुभवण्यासाठी तू जागा रहायला पाहिजे.'

'मला मारून टाका...' गुन्हेगारानं त्याला गळ घातली, 'दया करा.... कृपा करून दया करा...'

वधिकाचा चेहरा दगडासारखा निर्विकार झाला. चारच महिन्यांपूर्वी रोशनीने त्याच्या बायकोचं बाळंतपण करून त्याच्या मुलीला जन्माला घातलं होतं. फीदाखल ती त्यांच्या झोपडीत त्यांच्यासोबत जेवली होती. 'तू रोशनी बायोवर दया दाखवली होती का रे लूतभरल्या कुत्र्या?'

'चुकलं माझं... चुकलं....कृपा करा... मारून टाका मला.' गुन्हेगार हंबरडा फोडून रडू लागला.

निर्विकारपणाने वधिक तेथून निघून गेला.

तीन तासांच्या क्रूर सार्वजनिक छळानंतर वधिकानं कमरेला बांधलेल्या म्यानीतून एक तीक्ष्ण सुरी काढली. त्यानं पहिल्या गुन्हेगाराच्या उजव्या हातावरची मानखोडाची पकड सैल केली. आणि त्याचा हात त्यातून ओढून काढला. त्याच्या मनगटाचं बारकाईनं निरीक्षण केलं. लवकर रक्त न वाहाणारी नस त्याला शोधायची होती. तशी नस मिळाली तेव्हा तो हसला.

'उत्तम,' वधिक उद्गारला. मग त्याने सुरीने नाजुकपणाने गुन्हेगाराची ती नस कापली. रक्ताच्या छोट्या चिळकांड्या उडाल्या. वेदनेनं गुन्हेगार कळवळला. आता सावकाश, काही तासांनंतर त्याला मृत्यु येणार होता. वधिकानं इतर सहा कैद्यांच्या उजव्या मनगटांवरच्या त्याच नसा शोधून कापल्या. दरवेळी सुरी जेव्हा नस कापायची, रक्त उडायचं तेव्हा गर्दीतून शिव्याशापांची लाखोली वाहिली जायची.

त्यानंतर वधिकानं चौथऱ्यावरून उतरण्याआधी आजचं त्याचं काम पूर्ण झालं असल्याचा गर्दीला संकेत केला. गर्दीतून पुन्हा एकवार गोळे फेकले जाऊ लागले. अधून मधून एखादा अधिकारी जाऊन वाहाणाऱ्या रक्ताचा प्रवाह नीट सुरू असल्याची खात्री करून येत असे तेवढा वेळ लोक गोळे फेकायचे थांबत. शेवटच्या गुन्हेगाराचा मृत्यू होण्यासाठी आणखी अडीच तास लागले. पुढल्या अनेक पुनर्जन्मांपर्यंत नीट लक्षात राहील अशा रीतीने त्या सहा जणांचे अतिशय संथगतीने रक्त वाहून मृत्यू झाले होते.

गुन्हेगार मृत झाल्याची घोषणा केली गेली. गर्दीने घोषणा दिली, 'देवी रोशनी चिरायू होवो!'

चौथऱ्याजवळच्याच एका उंच बनविलेल्या जागी मंथरा एका खुर्चीत बसलेल्या होत्या. अजूनही त्यांचे डोळे तिरस्कार आणि राग ओकत होते. वधिकानं आपल्या इच्छेनं त्या सहा नराधमांना छळलं असतं याबद्दल त्यांना शंका नव्हतीच, कारण रोशनीवर लोकांचं खूप प्रेम होतं. तरीही फाशी देण्याच्या कोणत्याही क्रौर्यापासून गुन्हेगारांना वंचित न ठेवण्यासाठी त्यांनी वधिकाला मोठी रक्कम दिली होती. बराच वेळ चाललेल्या या छळादरम्यान त्यांची पापणीही लवली नव्हती. त्यांच्या चेहऱ्यावर उमटणारी वेदनेची प्रत्येक छटा त्यांनी टिपून घेतली होती. आता ते सगळं संपलं होतं. तरीही त्यांचं समाधान झालेलं नव्हतं. त्यांना अजून मोकळं वाटत नव्हतं.

एक मडकं त्यांनी छातीशी धरलेलं होतं. त्या मडक्यात मृत रोशनीच्या अस्थी होत्या. त्यांनी जेव्हा खाली पाहिलं तेव्हा त्यांच्या डोळ्यांतून ओघळलेला अश्रु त्या मडक्यावर पडला. मंथरा म्हणाल्या, ‘मी तुला वचन देते माझ्या बाळा, त्या शेवटच्यालासुद्धा त्याने तुला दिलेल्या त्रासाचं फळ भोगावं लागेल. धेनुकालासुद्धा न्यायदेवतेचा वार झेलावाच लागेल.’

# प्रकरण 14

‘हे नृशंस आहे,’ राम म्हणाला, ‘रोशनी ज्या ज्या बाबतीत आग्रही होती त्या सगळ्याच्या विरुद्ध आहे हे.’

राम आणि वशिष्ठ रामच्या खाजगी कार्यालयात होते.

‘हे नृशंस आहे असं तुला का वाटतं?’ वशिष्ठांनी विचारलं, ‘बलात्काऱ्यांना मारू नये असं तुला वाटतंय का?’

‘त्यांना फाशी व्हायला हवी हे खरंय, कायदा तसं सांगतो. पण ज्या प्रकारे हे केलं गेलं..... निदान न्यायाधीशांनी क्रोधाला बळी पडून निर्णय देऊ नये. ज्या प्रकारे फाशी देण्याचं कार्य पार पाडलं गेलं ते पाशवी होतं, हिंस्त्र आणि अमानवीय होतं.’

‘हो का? म्हणजे मानवीयतेनं फाशी देण्याचा प्रकारही अस्तित्वात आहे का?’

‘आपण या वागण्याचं समर्थन करताहात का गुरुजी?’

‘एक गोष्ट सांग, आता यानंतर बलात्काऱ्यांना आणि खुन्यांना कायदा तोडताना भीती वाटेल का?’

रामला मनाविरुद्ध मान्य करावंच लागलं, ‘हो...’

‘मग, या शिक्षेमागचा हेतु सिद्ध झाला ना?.’

‘पण रोशनीला हे आवडलं नसतं...’

‘क्रूरतेचा सामना केवळ क्रूरतेनंच केला जाऊ शकतो असं मत मांडणारी एक विचारधारा आहे. आगीचा सामना आगीनेच केला जाऊ शकतो, राम.’

‘पण रोशनी म्हणायची की डोळ्यासाठी डोळा हा न्याय लागू केला तर सगळं जग आंधळं होईल.’

‘अहिंसा उत्तम गुण आहे यात शंका नाही, पण तिचं पालन क्षत्रियांच्या, हिंसेच्या युगात राहून करता येत नाही. क्षत्रिययुगात रहाताना, जेव्हा इतर सगळे ‘डोळ्यासाठी डोळा’ या न्यायानुसार चालत असतील तेव्हा जर तुम्ही एकटे जर ‘डोळ्यासाठी डोळा हा न्याय लागू केला तर सगळं जग आंधळं होईल’ असं मानणारे असाल तर शेवटी तुम्ही आंधळे होणार हे नक्की. विश्वव्यापी सिद्धांतांनासुद्धा बदलत्या विश्वानुसार बदलावं लागतं.’

रामला हे पटत नव्हतं. मान हालवत तो म्हणाला, ‘कधी कधी मला वाटतं की मी त्यांच्यासाठी लढावं अशी माझ्या लोकांची योग्यता तरी आहे का?’

‘खऱ्या नेत्यानं केवळ लायक लोकांसाठी लढायचं नसतं. त्यानं आपल्या लोकांना त्यांच्या क्षमतेनुसार उत्तमात उत्तम साध्य करण्यासाठी प्रेरित करायचं असतं. खरा नेता नीच व्यक्तीचा बचाव करत नाही, तो त्याला देवात बदलतो; अगदी त्याच्यातसुद्धा वास करत असलेल्या देवाला जागवतो. धर्म संकटाचं ओझं तो आपल्या छातीवर वाहातो आणि आपले लोक चांगल्या व्यक्ती बनतील याची काळजी घेतो.’

‘गुरुजी, तुम्ही परस्परविरोधी बोलताहात. मला एक सांगा, ही पाशवी शिक्षा समर्थन करण्याजोगी आहे का?’

'माझ्या स्वतःच्या मताप्रमाणे – नाही. पण जग काही तुझ्या आणि माझ्यासारख्या लोकांनी बनलेलं नाहीय. इथे विविध प्रकारच्या मतांचं समर्थन करणारे सगळ्या प्रकारचे लोक आहेत. चांगल्या शासकानं आपल्या प्रजेला पूर्ण समतोल राखून केंद्रस्थानी असणाऱ्या धर्माच्या दिशेने हळुवार पद्धतीने प्रेरित करायला हवं. गोंधळ आणि विघातक हिंसा माजवणारा राग जर समाजात व्यापलेला असेल तर नेत्यानं अशा समाजाला स्थिरता आणि शांतीच्या दिशेनं न्यावं. पण, जर समाज निश्चेष्ट असेल, तक्रार न करणारा असेल तर नेत्याने अशा समाजाला, मग ती रागाची, प्रतिस्पर्धेची प्रतिक्रिया का असेना, सक्रीय सहभागासाठी प्रेरित करावं. या विश्वातील प्रत्येक गोष्टीचा काही ना काही हेतु आहे, विश्वाच्या पसाऱ्यात निर्हेतुक असं काहीही नाही. प्रत्येक भावनेला इथे अर्थ आहे आणि तिचा विरोध करणारी भावनासुद्धा आहे. उदा. क्रोध आणि शांती. शेवटी समाजात समतोल साधला गेला पाहिजे. पण रोशनीवर बलात्कार करून तिचा खून करणाऱ्यांविरुद्ध व्यक्त झालेला हा जनाक्रोश अन्यायाला उत्तर देणारा आहे का? असेल, किंवा कदाचित नसेलही. पुढल्या काही दशकांत आपल्याला नक्की काय ते कळून येईल. सध्या मात्र तिचं महत्व केवळ तणाव मुक्त करणारी व्यवस्था एवढंच आहे.'

अत्यंत विचलित झालेल्या रामने खिडकीबाहेर नजर वळवली.

अधिक वेळ गमावणं परवडणार नाही हे वशिष्ठांनी जाणलं. त्यांच्याजवळ आता फार वेळ उरला नव्हता. 'राम, जरा माझं ऐक.'

'हो, गुरुजी.' राम म्हणाला.

'कुणीतरी अयोध्येत येत आहे. तो तुझ्यासाठी येतोय. तो फार मोठा माणूस आहे. तो तुला घेऊन जाणार आहे. मी हे थांबवू शकत नाही, थांबवणं माझ्या कुवतीत नाही.'

'तो कोण आहे...'

वशिष्ठ बोलत राहिले, 'यात तुला कोणत्याही प्रकारचा धोका नाही, याची मी तुला खात्री देतो. पण ते लोक तुला माझ्याबद्दल बरंच उलट-सुलट सांगतील. तू एक लक्षात ठेव, माझ्यासाठी तू माझ्या मुलासारखाच आहेस. मला तुला आपला स्वधर्म पूर्ण करताना पाहायचं आहे. तेच तुझ्या जीवनातील खरं कर्तव्य आहे. माझं कार्य तुझ्या कर्तव्यपूर्तीनेच परिभाषित होईल.'

'गुरुजी, आपण काय म्हणताय ते माझ्या लक्षात येत नाही...'

'माझ्याबद्दल जे ऐकशील त्यावर विश्वास ठेवू नकोस. तू मला माझ्या मुलासारखा आहेस. आत्ता मी तुला फक्त एवढंच सांगू इच्छितो.'

गोंधळलेल्या रामने हात जोडून गुरुजींना नमस्कार करत म्हटलं, 'होय गुरुजी.'

'मंथरा, कृपा कर आणि समजून घे, मी काहीएक करू शकत नाही,' कैकयी म्हणाल्या, 'कायदाच तसा आहे.'

मंथरांनी अयोध्येच्या दुसऱ्या क्रमांकाच्या राणीची भेट घेण्यात वेळ दवडला नव्हता. फाशीच्या घटनेच्या दुसऱ्या दिवशी सकाळी कैकयींना एक दृढप्रतिज्ञ व्यक्ती भेटायला आली. महाराणी कैकयी न्याहरी करत होत्या. मंथरांनी सोबत न्याहरी करायला नकार दिला होता. त्यांना फक्त आपल्या इच्छेनुसार न्याय हवा होता. दशरथांवर आता त्यांचा फार कमी प्रभाव उरला आहे हे कैकयी कुणाहीसमोर कबूल करणार नव्हत्या, रामसमोर तर अजिबात नाही. म्हणून त्यांनी

कायद्याला दोष देण्याचा पवित्रा घेतला. स्वाभिमानी लोकांना आपला पराभव पत्करण्यापेक्षा राजकीय कर्तव्यांच्या बांधिलकीचा आडोसा घेणं केव्हाही जास्त योग्य वाटतं.

पण मंथरांना नकार दिला जाणार नाही. धेनुकाला शहरातील अत्युच्च सुरक्षित तुरुंगात कैदेत ठेवलं आहे हे त्यांना ठाऊक होतं. त्यांच्या मनात जे होतं ते राजघराण्यातील एक व्यक्तीच केवळ करू शकत होती हे त्यांना ठाऊक होतं. त्या कैकयींना म्हणाल्या, 'महाराणी, राज्यातील प्रत्येक कुलीनाला खरेदी करण्याइतका पैसा माझ्याजवळ आहे, हे आपण जाणता. शपथेवर सांगते की, तो सगळा पैसा मी आपल्या चरणांशी ठेवेन.'

कैकयीच्या हृदयचा एक ठोका चुकला. मंथरांच्या अकूत संपत्तीच्या मदतीने त्यांना भरतला राजा बनवणंसुद्धा शक्य होईल हे त्यांना चांगलंच ठाऊक होतं. सरळ होकार न देण्याची काळजी घेत त्या म्हणाल्या, 'आपल्या या शपथेबद्दल आभार. पण ही भविष्यातील शपथ झाली. भविष्यात काय होणार आहे याचा कुणी भरंवसा देऊ शकेल का?'

मंथराने आपल्या अंगवस्त्रात हात घालून एक हुंडी काढली. त्यांच्या आधिकारिक शिक्क्याचा दस्तऐवज होता तो. त्यात उल्लेखिलेली रक्कम चुकविण्याचे प्रतिज्ञापत्र होते ते. ते स्वीकारताना कैकयींना पूर्ण जाणीव होती की हुंडीच्या रूपाने त्यांना चलन मिळत होते. सप्त सिंधू प्रदेशात मंथरांची एवढी पत होती की त्यांच्यातर्फे अधिकृत हुंडी कुठेही वठवली जाऊ शकली असती. कैकयींनी लगेच हुंडी स्वीकारली आणि त्यावरची रक्कम पाहिली. महाराणी कैकयींना रक्कम पाहून धक्का बसला. हुंडीवर नीट आकड्यांत लिहिलेली रक्कम अयोध्येच्या दहा वर्षांच्या महसूलाहूनही अधिक होती. क्षणभरात मंथरांनी कैकयींना सम्राटांपेक्षा अधिक श्रीमंत बनविलं होतं! या स्त्रीकडे किती रक्कम आहे याची कल्पना करणं महाराणींच्याही आवाक्याबाहेरचं होतं.

मंथरा म्हणाल्या, 'एवढ्या मोठ्या रकमेची हुंडी वठविणं व्यापाऱ्यांना जड जाईल याची मला कल्पना आहे, देवी. जेव्हा आपल्याला पैशांची गरज भासेल तेव्हा मी स्वतः ही हुंडी वठवेन. त्यात उल्लेखिलेली रक्कम सुवर्णमुद्रांच्या रूपात आपल्याला मिळेल.'

कैकयींना एक विशेष कायदा माहीत होता, हुंडी देणाऱ्याकडून ती वठविण्यास नकार दिला गेल्यास त्या व्यक्तीला ऋणकोच्या तुरुंगात अनेक वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली जाऊ शकते.

मंथरांचं काम झालं होतं, तरी त्यांनी आणखी एक प्यादं पुढे ढकललं, 'हे धन जिथून आलं तेथे आणखी पुष्कळ अजून बाकी आहे. आणि ते सगळं आपल्या सेवेत अर्पण आहे.'

कैकयींनी हुंडीवरची पकड घट्ट केली. अलीकडच्या काळात घडलेल्या घटनांमधून जन्माला आलेली आपल्या मुलाच्या भवितव्यासंबंधीची सारी स्वप्नं पूर्ण करण्याची जणू गुरुकिल्लीच त्यांना सापडली होती.

मंथरा कशाबशा आपल्या आसनावरून उठल्या, लंगडत लंगडत कैकयींजवळ गेल्या आणि वाकून कैकयींच्या कानात काही कुजबुजू लागल्या, 'मला त्याला वेदना झालेल्या पाहायच्या आहेत. जितक्या वेदना त्याने माझ्या मुलीला दिल्या तितक्या वेदना त्याला द्यायच्या आहेत. त्याला लवकर मरण यावं अशी माझी अजिबात इच्छा नाहीय.'

कैकयींनी मंथरांचे हात घट्ट पकडले, न् म्हणाल्या, 'महान इंद्रदेवांची शपथ घेऊन सांगते, त्या नराधमाला न्याय म्हणजे काय ते चांगलंच कळेल.'

पाषाणाच्या थंड, निःशब्द नजरेनं मंथरांनी कैकयींवर नजर रोखली. त्यांचं संपूर्ण शरीर क्रूर

क्रोधानं शिवशिवलं.
‘त्याला प्रचंड त्रास होईल,’ कैकयींनी आपल्या प्रतिज्ञेचा पुनरुच्चार केला, ‘रोशनीचा सूड उगवला जाईल. अयोध्येची राणी आपल्याला हे वचन देते.’

‘माते, त्या राक्षसाला मारणं मला आवडेल, माझ्यावर विश्वास ठेव,’ भरत प्रामाणिकपणे म्हणाला, ‘असं करणं खरं तर न्यायाच्या बाजूनं लढणंच होईल, पण राम दादाच्या नव्या कायद्याने असं करण्यावर बंदी घातलीय.’

मंथरा निघून गेल्या गेल्या कैकयी भरतच्या कक्षात गेल्या. आपल्याला नेमके काय आणि कसे करायचेय हे त्यांना ठाऊक होते. आपल्या मुलाच्या मनात महत्वाकांक्षा जागी करण्याचा प्रयत्न करणं व्यर्थ आहे हे त्या जाणून होत्या. आपल्या आईहून अधिक तो आपल्या सावत्र भावाशी एकनिष्ठ होता. तिला त्याच्या न्यायबुद्धीला जागं करावं लागेल, न्याय्य राग जागवावा लागेल, रोशनीबद्दलच्या त्याच्या प्रेमाची आठवण द्यावी लागेल.

‘भरत, हा कायदा खरंच मला समजत नाहीय. कोणता न्याय केला या कायद्यानं?’ कैकयींनी अतिशय रागानं विचारलं, ’मनु स्मृतीत स्पष्टपणे सांगितलंय ना, की जिथे स्त्रियांचा अनादर होतो तेथून देव निघून जातात?’

‘होय माते, पण हा कायदा आहे! अल्पवयीनांना फासावर चढवता येत नाही.’

‘तुला ठाऊक आहे का, धेनुका आता अल्पवयीन नाही राहिला. अपराध जेव्हा घडला तेव्हा तो अल्पवयीन होता.‘

‘मला ते ठाऊक आहे, माते. याबद्दल माझं दादाशी मोठ्ठं भांडणसुद्धा झालंय. मी तुझ्याशी सहमत आहे. कायद्याच्या तांत्रिकतेपेक्षा न्याय कितीतरी मोठा आहे. पण दादाला हे मान्य नाहीय ना!’

रागाने फणफणत कैकयी म्हणाल्या, ‘हो, त्याला कळत नाही.’

‘दादा आदर्श जगात जगतो. खऱ्या जगात तो जगत नाही. एका आदर्श समाजाची मूल्यं त्याला लागू करायची आहेत, पण अयोध्या आदर्श समाज नाहीय ही गोष्ट तो पार विसरतो. आपण आदर्शापासून फार लांब आहोत. आणि धेनुकासारखे नराधम कायम कायद्यातील त्रुटी शोधून काढतात आणि त्यांच्या आधारे शिक्षा मिळण्यापासून स्वतःचा बचाव करतात. इतर जण त्याच्याकडून धडा शिकतील. असे कायदे लागू करण्यापूर्वी नेत्यानं समाजाला असे आदर्श कायदे लागू करण्यायोग्य बनवावं.’

‘मग, तू का नाही....’

‘मी करू शकत नाही. मी जर त्यानं बनवलेला कायदा तोडला किंवा केवळ त्याबद्दल संशय जरी व्यक्त केला तरी त्याची विश्वसनीयता धोक्यात येईल. जर खुद्द त्याचा भाऊ त्याला गंभीरपणे घेत नसेल तर इतर कोण का बरं त्याला गंभीरपणे घेईल?’

‘तू मूळ मुद्दा विसरतोयस. आतापर्यंत रामच्या कायद्याला घाबरणाऱ्यांना आता कळून येईल की या कायद्यात काही त्रुटी आहेत. त्या त्रुटींची पळवाट शोधून त्यांचा गैरफायदा घेता येईल. ते मग त्यानुसार कामाला लागतील. सज्ञानांच्या योजनेबरहुकूम अल्पवयीनांकडून अपराध करवले जाऊ लागतील. आपल्या समाजात कित्येक गरीब, विफल, नाउमेद तरुण मुलं आहेत. त्यांना

अगदी सहज, मुठभर मोहरा देऊन अपराधाच्या जगात खेचून आणता यईल.'

'हो, शक्य आहे खरं.'

'म्हणून, धेनुकाचं उदाहरण घालून द्यायला हवं. त्यातूनच अशा लोकांना धडा घालून देता येईल.'

भरतने प्रश्नार्थक नजरेनं कैकयीकडे पाहात विचारलं, 'माते, आपण यात एवढं लक्ष का घालताय?'

'मला आपल्या रोशनीला न्याय मिळवून द्यायचा आहे.'

'खरंच का?'

'ती कुलीन स्त्री होती, भरत. तुला राखी बांधणाऱ्या बहिणीवर एका गांवढळानं बलात्कार केला,' शेवटी कैकयी मुद्यावर आल्या.

'मला उत्सुकता वाटतेय, की, जर हे उलट घडलं असतं तरी तुझी हीच प्रतिक्रिया झाली असती का? जर एका कुलीन पुरुषानं एखाद्या खेड्यातल्या स्त्रीवर बलात्कार केला असता तर तेव्हासुद्धा तू अशाच प्रकारे न्यायाच्या बाजूने उभी राहिली असतीस का?'

कैकयी गप्प राहिल्या. कारण त्यांनी जर होकार दिला असता तर भरतचा त्यांच्यावर विश्वास बसला नसता.

'मला मात्र एखाद्या बलात्कारी, खुनी कुलीनाला सुद्धा फाशीवर चढवावं असंच वाटलं असतं,' भरत गुरकावला, 'अगदी जसं धेनुकाला फाशी चढवावं असं मला वाटतंय, तसंच. खरा न्याय तो हाच.'

'मग धेनुका अजून जिवंत कसा आहे?'

'इतर बलात्काऱ्यांना शिक्षा दिलीच ना!'

'म्हणजे, आंशिक न्याय! पहिल्यांदाच पाहातेय असं. हा कपटीपणा आहे, नाही का?' 'आंशिक न्याय असा नसतोच, मुला! एक तर तुम्हाला न्याय मिळतो, किंवा मिळत नाही!'

'माते...'

'त्यांच्यापैकी सगळ्यात अधिक क्रूर माणूस तर अजून जिवंत आहे! इतकंच नव्हे, तर तो अयोध्येचा पाहुणा बनून राहातोय अयोध्येत! त्याच्या रहाण्या-खाण्याचा खर्च शाही खजिन्यातून दिला जातोय, तुझ्या खजिन्यातून! तू स्वतः त्या व्यक्तीची बडदास्त राखतोयस ज्याने तुझ्या बहिणीवर बलात्कार करून तिला ठार मारलं!'

भरत गप्प राहिला.

'कदाचित रामचं रोशनीवर पुरेसं प्रेमच नसेल...' कैकयी बोलतच राहिल्या.

'रुद्रदेव कृपा करा! माते, आपण असं कसं म्हणू शकता? राम दादा स्वतःला शिक्षा देतोय कारण.....'

'यातून कशी काय भरपाई होईल? याला काही अर्थ तरी आहे का?! यामुळे रोशनीला न्याय कसा काय मिळणार?'

भरत पुन्हा गप्प राहिला.

'तुझ्या धमन्यांत कैकयांचं रक्त वाहातंय. तुझ्या अंगात अश्वपतींचं रक्त सळसळतंय. आपला, 'सांडलेल्या रक्ताला रक्त सांडूनच उत्तर दिलं जाईल!' हा प्राचीन प्रण तू विसरलास का? त्यामुळेच इतरांना तुमचा दरारा वाटेल.'

‘अर्थातच मला तो आठवतोय, मां! पण तरी मी राम दादाच्या विश्वसनीयतेला तडा जाईल असं काहीही करणार नाही.’

‘मला एक मार्ग सुचतोय...’

गोंधळून भरत कैकयीकडे पाहात राहिला.

‘तू एका परराष्ट्रनीतीशी संबंधीत भेटीसाठी अयोध्येतून निघून जावंस. मी तुझी अनुपस्थिती जाहीर करेन. मग तू गुप्तपणे पुन्हा अयोध्येत परत ये. आपल्या काही विश्वासू लोकांच्या मदतीनं तुरुंगावर हल्ला कर आणि धेनुकाला घेऊन निघून जा. त्याचं काय करायचं हे तुला ठाऊक आहे. काम पूर्ण झाल्यानंतर तू आपल्या परराष्ट्रभेटीच्या कामासाठी पुढे जा. हे तू केलंयस याचा कुणालाही पत्ता लागणार नाही. संपूर्ण शहरात या हत्येबद्दल संशयाचं वातावरण तयार होईल. कारण अयोध्येत अशी कुणीही व्यक्ती नाही जिला धेनुकाच्या मरण्याची इच्छा नाही. हे कुणी केलं ते शोधून काढणं रामला अशक्य होईल. कुणीही तुझा या घटनेशी संबंध जोडणार नाहीत त्यामुळे तुला पाठीशी घालण्याचा ठपका राम वर येणार नाही. राम खुन्याला एक वेळ शोधू शकला नाही, एवढाच या गोष्टीचा अर्थ निघेल. आणि सगळ्यात महत्वाचं म्हणजे, न्याय घडेल.’

‘तू खरोखर याचा बारकाईनं आणि सर्वांगानं विचार केलायस,’ भरत म्हणाला, ‘मग आता सांग, राजकीय आमंत्रणाशिवाय मी शहर कसा काय सोडून जाऊ? मी जर आमंत्रणाशिवाय जाण्याची परवानगी मागितली तर त्याने संशय उत्पन्न होईल.’

‘तुझ्यासाठी कैकय राज्यातून राजकीय भेटीसाठी आमंत्रण आलेलं आहे.’

‘नाही, असं कोणतंही आमंत्रण आलेलं नाहीय.’

‘आहे तर,’ कैकयी म्हणाली. ‘रोशनीच्या मृत्युनंतर उद्भवलेल्या गोंधळात ते कुणाच्या लक्षात आलं नाहीय.’

आपल्याला नव्यानं मिळालेल्या पैशांमधून काही पैसे वापरून आपण कैकयांकडून आलेलं मागल्या तारखेचं एक आमंत्रण अयोध्येच्या कागदपत्रात मिसळून ठेवलंय हे कैकयींनी भरतला कळू दिलं नाही. ‘या आमंत्रणाचा स्वीकार कर आणि आपल्या बहिणीच्या आत्म्याच्या शांतीसाठी तिला न्याय मिळवून दे.’

भरत निश्चल, बर्फासारखा थंड बसून राहिला. आपली आई जे बोलली त्यावर तो विचार करत होता.

‘भरत?’

त्या तिथेच आहेत हे पाहून धक्का बसल्यासारखं त्यानं त्यांच्याकडे पाहिलं.

‘करशील की नाही करणार तू हे?’

भरत स्वतःशीच बोलल्यासारखा बोलला, ‘कधी कधी न्याय करण्यासाठी तुम्हाला कायदा तोडावा लागतो.’

कैकयींनी आपल्या उत्तरीयातून एक रक्ताळलेल्या पांढऱ्या कापडाचा तुकडा काढला. तो तुकडा रोशनीचं शव ज्या पांढऱ्या कापडात गुंडाळलं होतं त्याचा एक तुकडा होता. त्यांनी तो भरतला दिला. म्हणाल्या, ‘न्याय मिळवण्यात तिला मदत कर.’

भरतने आईच्या हातातून तो कापडाचा तुकडा घेतला, त्याच्याकडे टक लावून पाहिलं. मग आपल्या मनगटातील राखीकडे पाहिलं. त्याने डोळे बंद केले तेव्हा त्याच्या गालांवर अश्रू ओघळून आले.

कैकयींनी जवळ येऊन भरतला घट्ट मिठी मारली. 'शक्ती देवीचं तुझ्यावर लक्ष आहे बाळा. ज्या नराधमानं एका स्त्रीवर असे अत्याचार केले त्याला तू शिक्षा केल्याशिवाय सोडू नकोस. ध्यानात ठेव.'

शक्ती माता एक अशी देवता होती जिचा सर्व भारतीयांना आधार आणि भीती वाटायची.

'सांडलेल्या रक्ताला रक्त सांडूनच उत्तर दिलं जाईल!'

दार किलकिलं झाल्याच्या आवाजानं शाही कारागृहातील एकांत कोठडीत झोपलेल्या धेनुकाची झोपमोड झाली.

तिथे अजिबात उजेड नव्हता. उंच असलेल्या खिडकीपलीकडील आकाशातसुद्धा चंद्रविहीन मिट्ट काळोख दाटलेला होता. त्याला धोक्याची जाणीव झाली. त्याने आपलं शरीर दरवाजाच्या दिशेनं वळवलं. झोपेचं सोंग घेतलेल्या धेनुकाच्या मुठी आवळल्या गेल्या, हल्ला करण्यासाठी तो तयार होता. त्यानं आपले डोळे किलकिले करून पाहिलं पण काळोखात काहीही पाहाणं अशक्य होतं.

आपल्या डोक्याजवळ त्याला मंद शीळ ऐकू आली. धेनुकाने ताडकन् उठत ठोसा लगावला. पण तिथे कुणीही नव्हतं. पण आवाज वरूनच आला होता. गोंधळलेल्या धेनुकाची नजर नेमकं काय चाललंय हे पाहाण्यासाठी चारी बाजूंना धावली. पण अनपेक्षितपणे वार आला.

डोक्याच्या मागच्या बाजूला जोरदार वार झाल्यानं धेनुका पुढे फेकला गेला. एका हातानं त्याचे केस धरून त्याला उचललं आणि एक ओलं कापड त्याच्या नाकावर दाबलं. गोड वासाच्या त्या द्रवपदार्थाची धेनुकाला लगेच ओळख पटली. तो स्वतः आपल्या कित्येक सावजांवर त्या द्रवाचा प्रयोग करत असे. आपण याचा सामना करू शकत नाही हे त्याच्या लक्षात आलं. काही सेकंदातच तो बेशुद्ध झाला.

मळलेल्या वाटेवर फिरणाऱ्या चाकांच्या मंद आवाजाने धेनुकाला जाग आली. डोक्यावर मारलेल्या फटक्याव्यतिरिक्त बहुधा त्याला कोणत्याही प्रकारची इजा झालेली नव्हती. डोकं मात्र त्या वारानं भयंकर दुखत होतं. त्याचं अपहरण करणाऱ्यांनी त्याला इजा पोहोचवलेली नव्हती. त्याच्या मनात आलं, कोण असतील ते? आपल्याला पळून जाण्यासाठी मदत करण्याकरिता वडिलांनी पाठवले असतील का हे लोक? तो नेमका कुठे आहे? आता रस्त्यावरील उंचवट्यांमुळे चाकं खडखडू लागली होती आणि रातकिड्यांच्या निरंतर येत असलेल्या आवाजावरून अंदाज लावता येत होता की ते बहुधा शहराबाहेर, जंगलात असावेत. त्यानं आपण नेमके कुठे आहोत ते पाहाण्यासाठी डोकं वर उचलण्याचा प्रयत्न केला. पण पुन्हा एकदा त्याच ओल्या कापडानं त्याला बेशुद्ध केलं.

तोंडावर मारलेल्या पाण्याच्या हबक्यानं धेनुकाची तंद्री तुटली. मोठ्यानं शिव्या देत त्यानं डोकं हालवलं.

अतिशय सभ्य आवाजात कुणी म्हणालं, ‘चल, जागा हो आता!’

आश्चर्यचकित झालेला पण सावध धेनुका उठून बसला. गवताची वाहातूक करण्यासाठी वापरतात तसल्या एका बंद छकडा गाडीत आपण आहोत हे त्याच्या लक्षात आलं. त्याच्या शरीराच्या आसपास पसरलेलं थोडं गवत त्यानं हातानं बाजूला सारलं. खाली उतरण्यासाठी त्याला मदत देऊ केली गेली. बाहेर अजूनही काळोख होता पण काही मशाली पेटवलेल्या होत्या. त्यांच्या प्रकाशात त्याला आसपासची थोडी कल्पना आली. त्याला अजूनही थोडं गुंगीत असल्यासारखं आणि भेलकांडल्यासारखं वाटत होतं. कदाचित त्याला दिल्या गेलेल्या गुंगीच्या औषधामुळे असेल. स्वतःला स्थिर करण्यासाठी त्यानं हात लांबवत गाडीचा आधार घेतला.

‘हे पी,’ अचानक त्याच्याशेजारी उगवलेल्या एका व्यक्तीनं एक प्याला पुढे करत त्याला सांगितलं.

धेनुकानं त्याच्या हातातून प्याला घेतला पण त्यातील पदार्थाबद्दल तो साशंक होता.

‘मला जर तुला मारायचे असतं तर मी ते केव्हाच करून मोकळा झालो असतो,’ तो माणूस म्हणाला. ‘हे प्यायल्यानं तुझं डोकं गरगरायचं थांबेल. पुढे जे काही होणार आहे त्यासाठी तू टक्क जागा असायला हवास.’

धेनुकानं मग आढेवेढे न घेता प्यालातील द्रव संपवला. क्षणार्धात त्याला बदल जाणवला. त्याच्या डोक्यातली गुंगी उडाली मन सावध झालं. त्याचं डोकं स्थिर झालं तेव्हा त्याला आसपास वाहात्या पाण्याचा आवाज ऐकू आला.

कदाचित मी नदीपाशी आहे. सूर्य उगवला की मी पोहोत सुरक्षित स्थळी पोहोचेन. पण बाबा कुठे आहेत? केवळ त्यांनाच अधिकाऱ्यांना लाच देऊन माझ्या सुटकेची व्यवस्था करणं शक्य होतं.

‘धन्यवाद,’ ग्लास त्या माणसाला परत देत धेनुका त्याला म्हणाला, ‘पण माझे वडील कुठे आहेत?’

त्या माणसानं काहीही न बोलता त्याच्या हातातील पेला घेतला आणि तो अंधारात विरघळून गेला. धेनुका तिथे एकटाच उरला. त्या माणसाला त्यानं पुन्हा एकदा आवाज दिला, ‘ए! कुठे चाललास तू?’

तो माणूस जिथे गायब झाला होता तेथूनच एक भक्कम अंगापिंडाचा एक माणूस आला. मशालींच्या उजेडात त्याची गोरी त्वचा चमकली. पाठोपाठ त्याचे हिरव्या रंगाचे धोतर आणि अंगवस्त्रही चमकलं. त्याचे लांब केस एका छोट्या पट्टीत गुंतवून डोक्यावर व्यवस्थित बांधलेले होते. त्यावर एक नाजुक कशिदाकारीने सोनेरी मोरपीस बनवलेलं होतं. एरवी खोडकर असणारे त्याचे डोळे आत्ता बर्फाच्या सुरीसारखे झाले होते.

‘राजकुमार भरत!’ लगेच एक गुडघा टेकून बसत धेनुका उद्गारला.

काहीही न बोलता भरत धेनुकाच्या दिशेने चालत गेला.

कोसलातील स्त्रियांना भरत किती प्रिय होता याबद्दल धेनुका ऐकून होता. भरतला उद्देशून तो म्हणाला, ‘मला समजून घ्याल याची मला खात्री होती. तुमच्या नैतिक बाबतीत अत्यंत काटेकोर आणि साध्या-सरळ भावाकडून मला काहीही अपेक्षित नव्हतं.’

भरत शांत श्वास घेत उभा राहिला.

‘बायकांना आपल्या मनोरंजनासाठीच निर्माण केलं गेलंय हे आपण जाणता, स्वामी, पुरुषांनी

वापरण्यासाठीच बायका असतात!' धेनुका हलकेच हसला, मान लववून त्यानं वंदन केलं आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पुढे होऊन भरतच्या उत्तरीयाला स्पर्श करण्याचा प्रयत्न केला.

भरतनं झटक्यात धेनुकाचा हात बाजूला सारला आणि त्याचा गळा पकडला. दात खात भरत बोलू लागला तेव्हा त्याच्या आवाजातून क्रूरता ठिबकत होती, 'बायका वापरून घेण्यासाठी नसतात, प्रेम करण्यासाठी बायका असतात.'

धेनुकाच्या चेहऱ्यावरील भाव अचानक बदलले. मूर्तीमंत भीती त्याच्या चेहऱ्यावर दिसू लागली. बंदिस्त जनावराप्रमाणे तो जागीच खिळून उभा राहिला. अचानक कुठून तरी मजबूत शरीरयष्टीचे 20लोक तेथे आले. भरतने धेनुकाचा गळा आवळण्याचा प्रयत्न केला तेव्हा धेनुका भरतच्या तावडीतून सुटण्यासाठी धडपडला.

'स्वामी,' एक माणूस मागून म्हणाला.

भरतने आपला श्वास रोखला आणि अचानक धेनुकाला सोडून दिलं. म्हणाला, 'इतक्या सहज मरण येणार नाही तुला.'

धेनुकाने श्वास घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याला प्रचंड ढास लागली. तशातही अचानक वळून त्यानं पळून जाण्याचा प्रयत्न केला. दोन माणसांनी त्याला पकडलं आणि लाथा मारत, खेचत, ओरडत पुन्हा छकड्यापाशी आणलं.

'कायदा!' धेनुका किंकाळला, 'कायदाच आहे तसा! मला शिक्षा होऊ शकत नाही. मी अल्पवयीन होतो तेव्हा!'

तिसरा माणूस पुढे आला आणि त्याने धेनुकाच्या जबड्यावर ठोसा लगावला. धेनुकाचा जबडा फाटला, एक दात पडला आणि रक्त वाहू लागलं. तो धेनुकाला म्हणाला, 'पण आता तू अल्पवयीन नाहीस.'

'पण राजकुमार रामने लागू केलेले कायदे...'

धेनुकाचे शब्द मध्येच रोखले गेले कारण त्या माणसाने पुन्हा त्याच्या तोंडावर ठोसा लगावला होता. यावेळी धेनुकाचं नाक फुटलं होतं. मग त्यानं धेनुकाला विचारलं, 'तुला इकडे आसपास कुठे दिसतो का राम?'

'बांधा त्याला?' भरत म्हणाला.

काही लोकांनी मशाली हातात घेतल्या. दोघे जण त्याला मागे खेचत एका मोठ्या झाडा जवळ घेऊन निघाले. मग त्यांनी त्याचे हात दोन बाजूला खेचून दोरानं झाडाच्या बुंध्याला बांधले. त्याचे पाय फाकवून ते सुद्धा हातांसारखेच झाडाभोवती बांधले. मग त्यांच्यापैकी एकाने मागे वळून भरतला सांगितले, 'काम झालं, स्वामी.'

भरत बाजूला वळून म्हणाला, 'शत्रुघ्ना, तुला शेवटचं सांगतो, जा. तू इथे थांबायची गरज नाही. या सगळ्यापासून लांब रहा तू...'

त्याला मध्येच थांबवत शत्रुघ्न म्हणाला, 'मी नेहमी तुझ्या शेजारीच असेन, दादा.'

भावहीन डोळ्यांनी भरत शत्रुघ्नाकडे काही काळ पाहात राहिला.

शत्रुघ्न पुढे बोलत राहिला, 'हे सगळं कायद्याविरुद्ध असेलही, पण हे न्याय्य आहे.'

भरतने होकारार्थी मान हालवली आणि तो पुढे निघाला. तो धेनुकाजवळ आला तेव्हा त्यानं आपल्या कंबरपट्ट्यातून एक पांधऱ्या कापडाचा रक्तात बुडालेला तुकडा काढला, आदराने कपाळाला लावला आणि आपल्या उजव्या मनगटात तो बांधला- राखीच्या थोडा वर.

सिंहांच्या गराड्यात अडकलेल्या गर्भगळित मेंढीसारखी धेनुकाची स्थिती झाली होती. तो बें बें करू लागला. म्हणाला, 'मेरे स्वामी, कृपा करून मला जाऊ द्या. मी शपथेवर सांगतो, जन्मात कधीही पुन्हा कोणत्याही स्त्रीला हात लावणार नाही.'

भरतने पुन्हा एकदा त्याच्या सणसणीत थोबाडीत मारली. विचारलं, 'ही जागा ओळखीची वाटते का?'

धेनुकानं आसपास नजर फिरवली आणि त्याच्या लक्षात आलं. याच जागी त्याने आणि त्याच्या साथीदारांनी रोशनीवर बलात्कार केला होता आणि नंतर तिला मारून टाकलं होतं.

भरतने आपला हात पुढे केला. एका सैनिकाने लगेच पुढे होऊन त्याला एक धातूची कुप्पी दिली. भरतने तिचे झाकण उघडले आणि ती धेनुकाच्या नाकाजवळ धरली. म्हणाला, 'वेदना म्हणजे काय ते तुला लवकरच कळेल.'

कुप्पीतील द्रावाचा अम्लीय वास ओळखताच धेनुका रडत म्हणाला, 'स्वामी, मला माफ करा.... मला माफ करा....कृपा करा....मला जाऊ द्या.....'

'रोशनी दीदीचा टाहो आठव, लूतभरल्या कुत्र्या,' शत्रुघ्न गुरगुरला.

धेनुका अत्यंतिक निराशेनं बरळू लागला, 'देवी रोशनी फार चांगल्या होत्या. स्वामी.... मीच अधम होतो.... मला माफ करा.... आणि, आणि तुम्हा असं केलेलं त्यांना आवडणार नाही....'

भरतने ती कुपी सैनिकाला परत केली. त्याचवेळी दुसऱ्या एका सैनिकाने त्याला एक मोठा फिरक्यांचा खिळा दिला. भरतने खिळ्याचं अणकुचीदार टोक धेनुकाच्या खांद्यावर टेकवलं. म्हणाला, 'कदाचित तू म्हणतोयस ते खरंही असेल. ती इतकी चांगली होती की तुझ्यासारख्या नराधमालाही तिने माफ केलं असतं. पण मी तिच्याएवढा चांगला नाही.'

धेनुकाचा धीर सुटला. एका सैनिकानं पुढे होऊन भरतला हातोडा दिला तसा तो तारस्वरात कळवळत किंचाळू लागला.

'तुला वाट्टेल तितका किंचाळ, मूर्खा,' तो सैनिक म्हणाला, 'तू कितीही किंचाळलास तरी कुणालाही तुझा आवाज ऐकू जाणार नाही.'

'नको! कृपा करा.....'

भरतनं हातोड्यासह हात उंचावला. फिरक्यांच्या खिळ्याचं टोक त्यानं धेनुकाच्या खांद्यावर टेकवलं. त्याला फक्त एक पुरेसं मोठं बीळ बनवायचं होतं ज्यातून अम्ल ओतता आलं असतं. लगेच मृत्यू आला असता तर त्यामुळे त्याची वेदनाही लगेचच शांत झाली असती.

'सांडलेल्या रक्ताला रक्त सांडूनच उत्तर दिलं जाईल!'भरत पुटपुटला

हातोडी खाली आली. खिळा सर्रकन आत सरला. वेदनेचा स्पष्ट, खळाळत वाहाणाऱ्या शरयूच्या लाटांच्या आवाजांपेक्षा उंच तार स्वर आसमंतात फैलावत गेला.

# प्रकरण 15

सूर्याच्या पहिल्या किरणांनी अंधाराला ढकललं तेव्हा शरयू नदीपल्याड भरत आणि शत्रुघ्नला भेटण्यासाठी कैकयी निघाल्या. ते ठिकाण अयोध्येच्या उत्तरेकडील सीमेपलीकडे होतं. अयोध्येच्या दक्षिण दिशेकडील टोकाला जिथे सध्या धेनुकाचं प्रेत पडलेलं आहे, तेथून हे ठिकाण किमान दोन तास रपेटीच्या अंतरावर आहे.

आदल्या रात्री घडलेल्या घटनेनंतर दोघा भावांनी आपल्या अंगावर लागलेले रक्ताचे डाग आणि इतर खुणा परिश्रमपूर्वक धुवून नाहीसे केले होते. त्यांनी स्वच्छ कपडे परिधान केल्यानंतर रक्तानं भरलेले त्यांचे कपडे जाळून टाकण्यात आले होते. कैकयीसोबत भरतचे अंगरक्षक होते.

आपल्या रथातून कैकयी खाली उतरल्या आणि त्यांनी दोघांनाही जवळ घेत म्हटलं, 'तुम्हा दोघांनी न्याय केला, बाळांनो.'

भरत आणि शत्रुघ्न काही बोलले नाहीत. शांत चेहऱ्यांच्या मुखवट्याआड त्यांच्या मनात कालचं वादळ अजूनही घोंघावत होतं. त्यांच्या मनात उठत असलेल्या रागाच्या लाटा अजून पूर्णपणे थंडावलेल्या नव्हत्या. कधी कधी न्याय करण्यासाठी क्रोधाची गरज असते. पण क्रोधाचे एक विचित्र वैशिष्ट्य असे की क्रोध हा आगीसारखा असतो आणि त्याला जितके खाद्य द्याल तितका तो भडकत राहातो. क्रोध कधी सोडून द्यावा हे समजायला खूप मोठी अक्कल लागते. लहान असल्याकारणाने ही गोष्ट त्या दोघा भावांना अजून नीटशी समजलेली नव्हती.

'आणि आता तुम्हा दोघांनी निघायला हवं,' कैकयी म्हणाल्या.

भरतने रोशनीच्य रक्ताने माखलेल्या पांढऱ्या कापडाचा तुकडा काढून कैकयींना परत केला.

तो घेत कैकयी म्हणाल्या, 'मी स्वतः हे मंथरांना परत करते.'

भरतने खाली वाकून आपल्या आईला नमस्कार केला. म्हणाला, 'येतो, माते.' शत्रुघ्नने काहीही न बोलता कैकयींचे पाय धरून त्यांना वंदन केले आणि त्यांचा निरोप घेतला.

कावळ्यांच्या कर्कश्श आवाजाने आणि त्यांच्या आपसातील टोचा-टोचीमुळे तेथून जात असलेल्या काही गावकऱ्यांना धेनुकाचं प्रेत सापडलं. कावळे त्याचं मांस ओरबाडत होते आणि त्यासाठीच त्यांची आपापसात बाचाबाची चालली होती.

त्याचं शरीर अजूनही झाडाला बांधलेल्या स्थितीतच होते. गावकऱ्यांनी दोर तोडून ते खाली जमिनीवर ठेवले. तो जिवंत असतानाच त्याच्या शरीराला क्रूरपणे कित्येक भोकं पाडली गेली होती. त्या जखमांच्या तोंडाशी साचलेल्या रक्ताच्या खपल्यांनी ही गोष्ट स्पष्ट लक्षात येत होती. त्या भोकांभोवतीच्या जळालेल्या त्वचेवरून त्या प्रत्येक भोकामध्ये कोणतातरी अम्लीय पदार्थ ओतला गेला होता हे स्पष्ट दिसून येत होतं.

धेनुकाच्या पोटात आरपार – मागे झाडापर्यंत जेव्हा तलवार घुसली तेव्हा त्याचं मरण आता अटळ आहे हे स्पष्ट झालं. बहुधा तो हळूहळू रक्त ठिबकून मरण पावला असावा. कावळे जेव्हा मांसासाठी त्याच्यावर पहिल्यांदा झेपावले तेव्हा तो बहुधा जिवंत असावा.

एका खेडुताने धेनुकाला ओळखले. 'आपण इथून निघून जाऊ,' तो म्हणाला.

'नको, आपण वाट पाहू इथे,' त्यांचा म्होरक्या म्हणाला. आपल्या एका माणसाला अयोध्येत जाऊन बातमी देण्यास सांगताना त्याच्या डोळ्यातून आश्रु ओघळला. रोशनीचा दयाळू स्वभाव त्यांनासुद्धा माहीत होता. धेनुकाला कायद्यातील काही तांत्रिक बाबींमुळे फाशी दिलं जाणार नाही हे जेव्हा त्याला समजलं होतं तेव्हा त्याला प्रचंड राग आला होता. आपणच त्याला मारून टाकावं असंही त्याला वाटलं होतं. शरयू नदीकडे वळून नमस्कार करत त्याने शरयू देवीचे आभार मानले. शेवटी न्याय केला गेला होता.

खाली पाहात तो प्रेतावर थुंकला.

अयोध्येच्या उत्तर द्वारातून मंथरा आपल्या घोड्यांच्या रथात बसून बाहेर पडल्या तेव्हा अंगरक्षकांसमवेत त्यांच्यासोबत त्यांचा खास माणूस, द्रुह्युसुद्धा उपस्थित होता. मोठा तलाव ओलांडून स्थिर गतीने ते नदीकिनारी असलेल्या स्मशानात अर्ध्या तासात पोहोचले. घाटाच्या पार टोकाला मिथकांमध्ये वर्णित पहिल्या मर्त्याचं म्हणजे यमाचं मंदिर होतं. मजेदार गोष्ट अशी की यमाला 'मृत्युदेवता' म्हणून तर ओळखलं जायचंच शिवाय त्याला धर्माचा देवता म्हणूनसुद्धा ओळखलं जात असे. धर्म आणि मृत्यू यांच्यात परस्परसंबंध असल्याचं पुरातनकाळी लोक मानत असत. ते असंही मानत असत की मृत्यूनंतर जीवाच्या कर्मा-धर्माचा हिशोब केला जातो. त्यात जर समतोल नसेल तर आत्म्याला या धरणीवर दुसरे शरीर धारण करून पुन्हा जन्म घ्यावा लागतो. आणि जर समतोल असेल तर आत्म्याला मुक्ती मिळते – म्हणजे, पुनर्जन्माच्या चक्रातून तो मुक्त होतो. आणि आत्मा ब्रह्मांडीय आत्म्याशी – परमात्म्याशी, एकम्, ब्रह्मन् बरोबर तादात्म्य पावतो.

यमदेवाच्या मंदिरात सात पुजाऱ्यांनी रोशनीचं क्रियाकर्म केलं. मंथरांच्या हातातील छोट्या गडूत त्यांच्या अत्यंत सुंदर कृतीची राख होती. दुसऱ्या गडूत त्या दिवशी सकाळी कैकयींनी दिलेलं पांढरं कापड होतं.

थोड्या काळातच घडलेल्या या कित्येक खळबळजनक गोष्टींबद्दल विचार करत द्रुह्यु नदीकिनारी बसला होता. त्याच्या मालकिणीत कित्येक बदल घडले होते आणि आता ते कदाचित कायम तसेच रहाणार होते. त्यानं मंथरांना त्यांच्या व्यापाराला आणि स्वतः त्यांनासुद्धा नुकसान होईल अशा कित्येक, आजपर्यंत कधीही न केलेल्या गोष्टी गेल्या काही दिवसांत करताना पाहिलं होतं. आपली जन्मभराची कमाई तिनं सूडाच्या आगीत झोकली होती. या काही दिवसांत त्यांनी जेवढी रक्कम उधळली होती ती पाहून मूर्तिमंत देवांनासुद्धा भोवळ आली असती. उधळपट्टी केल्या जात असलेल्या रकमेचा बराच मोठा भाग केवळ मंथरांचा नव्हता. आता त्यांना स्वतःची काळजी वाटू लागली होती. देवळाच्या दारात काही घडल्यानं त्यांचं लक्ष तिकडे गेलं.

घाटाकडे जात असताना मंथरांची चाल अधिकच लंगडी वाटू लागली होती. कुबडामुळे त्यांची पाठ अधिकच झुकलेली वाटत होती. ओठ शिवल्यासारखे त्यांचे रक्षक त्यांच्यामागे चालले होते. त्यांच्यामागे मंत्रोच्चार करीत पंडित येत होते. अतिशय संथपणे, एका वेळी एक एक पायरी उतरत मंथरा पाण्यापर्यंत पोहोचल्या. शेवटल्या पायरीवर त्या बसल्या. नदीचं पाणी त्यांच्या

पावलांना हलकेच स्पर्श करू लागलं. रक्षकांना दूर रहाण्याचा त्यांनी संकेत केला. पंडितसुद्धा एक पायरी वरच उभे राहिले. तेथूनच ते आत्म्याला वैतरणी नदी ओलांडून दुसऱ्या जगात प्रवेश करणं सोपं जावं म्हणून मोठमोठ्यानं संस्कृत मंत्र म्हणत होते. ईशा वास्य उपनिषदातील एक श्लोक दोन वेळा म्हणून प्रार्थना पूर्ण केली. हाच श्लोक दहनक्रियेच्या वेळीसुद्धा म्हटला गेला होता-

वायुर अनिलम् अमृतम् ; अथेदम् भासमंतम् शरीरम्

हे नश्वर शरीर भस्म होऊन जाऊ दे. पण जीवनाच्या श्वासाचं गंतव्य इतरत्र आहे. त्या श्वासाला अविनाशी श्वासात मिसळून जाण्याचा मार्ग सापडू दे.

द्रुह्यू दूर उभा राहून हे सर्व कार्य पार पडत असताना पाहात होता. त्याचं संपूर्ण लक्ष मंथरांवर केंद्रीत झालं होतं. मंथरा- जी कधीकाळी अत्यंत व्यवहारी आणि तीक्ष्ण बुद्धीची स्त्री होती. आज समोरची आकृती त्यांना मंथरांच्या सावलीसारखी वाटली. एक विचार वारंवार त्यांच्या मनात येत राहिला,

ही म्हातारी आता हारली. खऱ्या मालकासारखी ती पुन्हा कधी आपल्या उपयोगी यायची नाही. आता स्वतःचं हित आपल्यालाच साधायला हवं.

मंथरांनी गडू आपल्या छातीशी धरला. खोल श्वास घेतला आणि शेवटी जे करण्याशिवाय गत्यंतर नव्हतं ते करण्यासाठी बळ एकवटलं. गडूचं झाकण उघडून त्यांनी त्यातील आपल्या मुलीची राख पाण्यात सोडून दिली. ती पाण्यासोबत वाहात निघाली. त्यांनी रक्ताळलेला पांढऱ्या कापडाचा तो तुकडा चेहऱ्याला लावला आणि पुटपुटल्या, 'पुन्हा या घाणेरड्या जगात येऊ नकोस माझ्या बाळा. तुझ्यासारख्या निर्मळ लोकांसाठी हे जग नाही बनलेलं.'

पाण्याबरोबर वाहात आपल्यापासून दूर जात असलेले आपल्या मुलीचे अंश मंथरा पाहात राहिल्या. मग त्यांनी आकाशाकडे आपली नजर वळवली तेव्हा त्यांच्या डोळ्यांत क्रोध होता. त्यांचं हृदय क्रोधानं होरपळत होतं.

राम...

मंथरांनी आपले डोळे घट्ट बंद केले. त्यांचा श्वास अनियंत्रित झाला.

तू त्या नराधमाला संरक्षण दिलंस... तू धेनुकाचं रक्षण केलंस.... मी हे लक्षात ठेवीन...

'यासाठी कोण जबाबदार आहे?' रामने गुरकावत विचारलं. त्याचं संपूर्ण शरीर ताणामुळे ताठरलं होतं. त्याच्या अवती-भवती रक्षक-अधिकारी होते.

धेनुकाच्य निर्घृण खुनाची बातमी मिळताच राम तिकडे रवाना झाला होता. सगळे अधिकारी गप्प होते. एका माणसाच्या रागाची करामत पाहून ते आश्चर्यचकित झाले होते. केवळ त्याच्या शरीरयष्टीबद्दलच त्या माणसाचं वर्णन आता उपलब्ध होतं.

'हा कायद्याचा अपमान आहे, ही कायद्याची अवहेलना आहे. न्यायदानाच्या पद्धतीचं हे विकृतीकरण आहे,' राम म्हणाला आणि त्यानं पुन्हा विचारलं, 'कुणी केलं हे?'

'मला... मला माहीत नाही, महाराज,' घाबरलेला एक अधिकारी म्हणाला.

घाबरलेल्या त्या अधिकाऱ्याकडे झुकत राम म्हणाला, 'तुला खरंच मी तुझ्यावर विश्वास ठेवावा असं वाटतंय का?'

मागून मोठ्यांदा कुणीतरी म्हणालं, ‘दादा!’

रामने वर पाहिलं तेव्हा घोड्यावर स्वार झालेला लक्ष्मण त्यांच्या दिशेने येत असलेला त्याला दिसला.

‘दादा,’ जवळ येताच लक्ष्मण म्हणाला, ’तुला लगेच माझ्यासोबत यावं लागेल.’

‘आत्ता नाही, लक्ष्मण,’ राम नकार दर्शवणारे हातवारे करत म्हणाला, ’आत्ता मी कामात आहे.’

‘दादा,’ लक्ष्मण म्हणाला, ‘गुरु वशिष्ठांनी तुला बोलावलंय.’

रामने नाराजीने लक्ष्मणाकडे पाहिले. म्हणाला, ‘आलोच मी. तू गुरुजींना सांग की मला...’

लक्ष्मणानं आपल्या मोठ्या भावाला मध्येच थांबवत म्हटलं, ‘दादा, महर्षी विश्वामित्र आलेत! ते तुला बोलावताहेत. फक्त तुलाच बोलावताहेत.’

राम आश्चर्यचकित होऊन लक्ष्मणाकडे पाहातच राहिला.

विश्वामित्र मलयपुत्रांचे प्रमुख होते. सहावा विष्णू मानलेल्या भगवान परशुरामांच्या वंशजांची रहस्यमयी जमात. धरणीवर परशुरामांचे कार्य पुढे चालवण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. सप्तसिंधूतील लोकांच्या मनात मलयपुत्रांच्या ताकदीबद्दल पुराणांमध्ये आलेल्या उल्लेखांमुळे आश्चर्यमिश्रीत आदरभावना होती. विश्वामित्रांच्या भयंकर कीर्तीमुळे त्यांच्याबद्दलची भीती वाढली होती. ते जन्मतः क्षत्रीय होते. महान राजा गाधी यांचे ते पुत्र होते आणि त्यांचं नाव होतं कौशिक. तरुण असताना ते एक पराक्रमी योद्धा होते पण स्वभाववैशिष्ट्यामुळे त्यांना पुढे ऋषी बनण्याची प्रेरणा झाली. ऋषी बनण्यासाठी त्यांना कित्येक संकटं झेलावी लागली, संकटांवर मात करतच ते यशस्वी झाले. पुढे ते ब्राह्मणपदापर्यंत पोहोचले आणि मलयपुत्रांचं प्रमुखपद त्यांनी मिळवलं. मलयपुत्रांचं प्रमुखपद स्वीकारल्यानंतर त्यांनी आपलं नाव बदलून विश्वामित्र असं ठेवलं. पुढील महादेव अवतरल्यानंतर त्यांना मदत करण्याची जबाबदारी मलयपुत्रांवर टाकण्यात आली होती. पण, वेळ आली की विष्णूच्या पुढील अवताराला श्रेष्ठत्वाला नेणं हेच आपलं प्राथमिक कर्तव्य आहे असं ते मानत असत.

रामने धेनुकाच्या शवावर एक नजर टाकली मग पुन्हा त्याने लक्ष्मणाकडे पाहिलं. दोन कर्तव्यांपैकी आधी कोणतं पार पाडावं या कात्रीत ते अडकले होते. लक्ष्मण आपल्या घोड्यावरून उतरला आणि त्याने कोपराला धरून रामला बाजूला नेलं.

‘दादा, हे काम तू नंतरही पूर्ण करू शकशील,’ लक्ष्मण म्हणाला, ‘महर्षी विश्वामित्रांना वाट पाहायला लावणं बरं नाही. त्यांच्या रागाबद्दल आपण सगळे ऐकून आहोतच.’

रामने लगेच आपला घोडा मागवला.

एका अधिकाऱ्याने लगेच त्यांचा घोडा आणून त्यांना दिला. राम घोड्यावर स्वार झाला आणि त्याने हलकेच घोड्याला टाच दिली. लक्ष्मणाने त्याचं अनुकरण केलं. घोडे शहराकडे भरधाव वेगाने निघाले. काही दिवसांपूर्वी वशिष्ठ मुनींबरोबर घडलेला विचित्र संवाद रामला आठवला.

‘कुणीतरी येत आहेत..... मी हे थांबवू शकत नाही.....’

‘महर्षी विश्वामित्रांना माझ्याकडून काय हवं असेल बरं?’ राम स्वतःशीच पुटपुटला.

‘....तू त्यांचंसुद्धा एक काम करणार आहेस.....’

रामनं आपलं मन पुन्हा वर्तमानात आणलं. मग चॅक चॅक असा आवाज काढत त्यानं घोड्याला घाई करण्याची सूचना दिली.

‘आपण मला नकार देताहात का महाराज?’ विश्वामित्रांनी अत्यंत मधुर आवाजात विचारलं. पण त्या गोड आवाजाआड दडलेली धमकी लपून रहात नव्हती.

त्यांची कीर्ती आणि पद कमी भीतीदायक होते म्हणून की काय, त्यांचं शरीर आडदांड आणि उंच-पुरं होतं. त्यामुळेही त्यांची अविजीत छबी अधिक दुर्दांत वाटत असे. त्यांची उंची जवळ जवळ सात फूट होती. शरीराचे अवयव प्रचंड आकारांचे होते, मोठं पोट होतं, छाती, खांदे आणि दंड भक्कम आणि मांसल होते. त्यांची शुभ्र, भुरभुरणारी दाढी, गाठ मारलेली शेंडी, विशाल नितळ डोळे, खांद्यावर रुळणारं जान्हवं, आणि हे सगळं ज्या पार्श्वभूमीवर होतं ते प्रचंड विरोधाभास निर्माण करणारं युद्धातील कित्येक जखमांच्या व्रणांनी सजलेलं शरीर आणि चेहरा. केशरी रंगाचं धोतर आणि उत्तरीयामुळे त्यांचा काळा रंग अधिक उठावदार वाटत होता.

सम्राट आणि त्यांच्या तीन राण्यांनी महर्षींचं स्वागत सम्राटांच्या खाजगी कार्यालयात केलं होतं. आल्या आल्या महर्षींनी विषयाला हात घातला होता. त्यांच्या एका आश्रमावर वरचेवर हल्ले होत होते आणि त्यांचा सामना करण्यासाठी त्यांना रामची मदत हवी होती. त्यांच्या येण्यामागचा मुख्य हेतू हाच होता. कोणत्या प्रकारचे हल्ले होत होते, आणि भारतातील अत्यंत बलशाली मानल्या जाणाऱ्या मलयपुत्रांचं रक्षण युवक राजपुत्र राम कसा करणार होता इत्यादी बाबतीत त्यांनी काहीही माहिती दिली नव्हती. तरीही, मलयपुत्रांच्या प्रमुखाला कोणताही प्रश्न विचारण्याची किंवा त्यांच्या सूचनेला नकार देण्याची सोय नव्हती.

अस्वस्थ दशरथांनी आवंढा गिळला. त्यांच्या चांगल्या दिवसांतही त्यांनी कधी विश्वामित्रांना नाराज करण्याचं साहस केलं नसतं. खरं सांगायचं तर आत्ता ते प्रचंड घाबरले आणि गोंधळून गेले होते. गेल्या काही महिन्यांत त्यांच्या मनात रामबद्दल खूप प्रेम निर्माण झालं होतं. त्यांना रामला दूर कुठेही पाठवायचं नव्हतं. शेवटी धीर एकवटून ते बोलू लागले, ‘महात्मन्, त्याला आपल्यासोबत पाठवायचं नाही असं मला सुचवायचं नाहीय. फक्त एवढंच की, सरसेनापती मृगस्ययुद्धा हे काम तितक्याच उत्कृष्टपणे करू शकतात. माझं पूर्ण सैन्य आपल्या सेवेत ऋजू होईल आणि.... ’

‘मला राम हवा,’ विश्वामित्र म्हणाले. त्यांचे डोळे दशरथांच्या डोळ्यात रोखून पाहात होते त्यामुळे सप्तसिंधूच्या बादशहांना अस्वस्थ वाटत होतं. ‘आणि, मला लक्ष्मणही हवा.’

विश्वामित्रांनी मांडलेल्या प्रस्तावावर काय बोलावं तेच कौसल्यांना समजत नव्हतं. एकीकडे या महान ऋषींचा सहवास रामला मिळणार आणि तो त्यांच्या विश्वासातला होणार याबद्दल त्यांना आनंद झाला होता, तर दुसरीकडे त्यांना ही चिंतासुद्धा वाटत होती की विश्वामित्र रामच्या युद्धकौशल्याचा केवळ स्वतःसाठी उपयोग करून घेतील आणि नंतर त्याला सोडून देतील. शिवाय, रामच्या अनुपस्थितीत कैकयी भरतसाठी युवराजपद मिळविण्याची खटपट करतील. अशा परिस्थितीत त्या ज्या एकाच प्रकारे प्रतिसाद देत असत त्याचप्रमाणे त्यांनी यावेळीही प्रतिक्रिया दिली – त्या मूकपणे अश्रू ढाळू लागल्या.

कैकयीसमोर मात्र असा कोणताही पेच पडला नव्हता. मंथराच्या कटात सामील होण्यास होकार दिल्याचा त्यांना आता पश्चाताप होत होता. आत्ता भरत इथे असायला हवा होता असं त्यांना वाटत होतं. ‘महर्षी,’ कैकयी म्हणाल्या, ‘भरतला आपल्यासोबत पाठवण्यात मला खूप

अभिमान वाटला असता. फक्त आपल्याला थोडी वाट पाहावी लागेल...'

'पण भरत अयोध्येत नाहीय,' महर्षी म्हणाले. त्यांना माहीत नाही असं काहीच नाही असं वाटत होतं.

'बरोबर आहे आपलं, महर्षी,' कैकयी म्हणाल्या, 'मी आपल्याला हेच सांगू इच्छीत होते, आपल्याला काही आठवडे कदाचित वाट पाहावी लागेल. भरतला परत बोलावण्यासाठी मी त्वरित संदेश पाठवून देते.'

विश्वामित्रांनी कैकयींच्या डोळ्यांत रोखून पाहिलं. कैकयीने घाबरून नजर खाली वळवली. तिला उगीचच आपली सारी गुपितं अचानक उघडकीला आल्यासारखं वाटलं. काही क्षण तिथे अस्वस्थ करणारी शांतता पसरली. नंतर विश्वामित्रांचा भारदस्त आवाज कक्षात घुमला, 'मला राम हवा, महाराज, आणि लक्ष्मणसुद्धा. मला इतर कुणीही नकोय. मग, त्या दोघांना तुम्ही माझ्याबरोबर पाठवताय की नाही?'

'गुरुजी,' महाराणी सुमित्रा म्हणाल्या, 'संभाषणात व्यत्यय आणल्याबद्दल मी मनापासून माफी मागते, पण मला वाटतं की इथे नियमांमध्ये एक मोठा घोटाळा होतोय. आपण आमच्यासोबत आता काही काळ आहात, पण आमचे आदरणीय राजगुरु महर्षी वशिष्ठांना अजून आपल्या भेटीचा आनंद प्राप्त झाला नाहीय. त्यांना इथे बोलावण्यासाठी संदेश पाठवावा का? ते इथे आले की आपण आपली चर्चा पुढे नेऊ.'

विश्वामित्र हासले. 'हं...! म्हणजे मी जे काही ऐकलं होतं ते खरंय म्हणायचं. तिसऱ्या आणि सगळ्यात लहान राणी सर्वात अधिक चतुर आहेत तर.'

'नाही नाही, महर्षी. मी चतुर नाही.' बोलता बोलता सुमित्रांचा चेहरा शरमेनं लाल झाला. त्या कशाबशा म्हणाल्या, 'मला फक्त हेच सुचवायचं होतं की नियमांची....'

'हो हो, बरोबर आहे,' विश्वामित्र म्हणाले, 'आपण नियमांचं उचित पालन करा, आपण आपल्या राजगुरूंना निरोप पाठवा. ते आल्यानंतरच रामबाबत आपण बोलू.'

सम्राट आणि त्यांच्या महाराणी घाईघाईनं तेथून निघून गेल्या. आता तिथे फक्त महर्षी आणि काही घाबरलेले सेवकगण उरले.

---

वशिष्ठ शाही खाजगी कार्यालयात एकटेच आले. तेथे येताच त्यांनी सेवकांना रजा दिली. ते गेले आणि लगेच विश्वामित्र दात-ओठ खात उभे राहिले. 'मग? त्याला माझ्यापासून दूर राखण्यासाठी तू काय उपाय करणार आहेस, दिवोदास?'

विश्वामित्रांनी जाणून-बुजून वशिष्ठांच्या गुरुकुलातील- ज्यावेळी ते छोटे होते आणि अजून शिक्षण घेत होते त्यावेळच्या नावाचा उल्लेख केला होता.

'मी आता मुलगा नाही राहिलो, महर्षी विश्वामित्र,' वशिष्ठ कृत्रिम शांतपणाने म्हणाले. ते पुढे म्हणाले, 'माझं नाव वशिष्ठ आहे आणि आपण मला महर्षी वशिष्ठ या नावाने संबोधलेलं आवडेल मला.'

विश्वामित्र जवळ आले. म्हणाले, 'दिवोदास, तुझं म्हणणं काय आहे? एरवी, तुझं हे शाही कुटुंब आपापसात विभागलेलं आहे. दशरथाला मुलांना आपल्यापासून दूर पाठवायचं नाहीय. कौसल्या गोंधळलेली आहे. कैकयीला भरतनेच माझ्यासोबत यावं असं निश्चितपणे वाटतं. आणि

सुमित्रा, चतुर सुमित्रा, कोणत्याही परिस्थितीत आनंदी राहाणारी सुमित्रा- तिने आपल्या दोन मुलांना दोन गटात सामील करून ठेवलंय. कुणीही जरी जिंकलं तरी ती त्यांच्यासोबत असेल. तू इथे चांगलं काम केलंयस. हो ना, राज गुरू? '

विश्वामित्रांच्या बोलण्यातील खोचकपणा वशिष्ठांनी कानाआड केला. याबाबतीत आपण फार काही करू शकत नाही हे त्यांच्या लक्षात आलं होतं. त्यांना कळून चुकलं होतं की, आपण कितीही जरी वाद घातला तरी राम आणि लक्ष्मणाला विश्वामित्रांच्या सोबत जावंच लागणार.

'कौशिक,' विश्वामित्रांना त्यांच्या बालपणीच्या नावानं हाक मारत वशिष्ठ म्हणाले, 'कितीही अयोग्य असलं तरी तू पुन्हा एकदा आपला हेका चालवणार आहेस असं दिसतंय.'

राजगुरूंना कह्यात घेतल्यासारखे विश्वामित्र वशिष्ठांच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे आले. म्हणाले, 'आणि तू पुन्हा एकदा पळून जाणार असं दिसतंय. अजून तुला लढण्याचं वावगं आहे का रे दिवोदासा?'

वशिष्ठांनी आपल्या मुठी गच्च आवळल्या. पण आलेला राग त्यांच्या चेहऱ्यावर अजिबात दिसला नाही. 'मी जे केलं ते कशासाठी केलं ते तुला कळणार नाही कधी. मी तसं केलं, कारण....'

'समस्तांच्या भल्यासाठी?' त्यांना मध्येच तोडत विश्वामित्र मिश्किलपणे म्हणाले, 'आणि यावर मी विश्वास ठेवावा असं तुला खरंच वाटतं का? लोक जेव्हा आपला भित्रेपणा एखाद्या महान कारणामागे दडवतात ना, तेव्हा त्यापेक्षा दयनीय इतर काहीही नसतं.'

'आणि तू सुद्धा आपल्या क्षत्रियत्वाचा कोणताही गुण सोडलेला नाहीस, हो ना? क्षत्रियांचा उद्धटपणा नष्ट करणाऱ्या परशुराम देवांचा स्वतःला अवतार मानण्याचं दुःसाहस तुझ्यात अजून आहे, हो ना?'

'दिवोदास, अरे सगळ्यांना माझ्या पार्श्वभूमीची पूर्ण माहिती आहे. मी निदान काही लपवत नाही.' विश्वामित्रांनी समोरच्या ठेंगण्याकडे पाहात उपहासानं म्हटलं. 'तुझ्या त्या अनमोल छोट्यासमोर तुझी खरी पार्श्वभूमी उघड करू का? मी काय केलं होतं ते सांगू त्याला?'

'तू कधी माझ्यावर उपकार केले नाहीस!' शेवटी स्वतःवरील ताबा हरवून वशिष्ठ ओरडले.

'वाटल्यास आता करीन म्हणतो,' हसत विश्वामित्र म्हणाले.

वशिष्ठ मागे वळले आणि तरातरा त्या खोलीतून निघून गेले. इतका काळ उलटून गेला असला तरी त्यांना अजूनही आपल्या जुन्या मैत्रीखातर त्या उद्धट विश्वामित्रांच्या बाबतीत शिष्टाचार निभावावा असं वाटलं.

# प्रकरण 16

एका आठवड्यानंतर राम आणि लक्ष्मण शरयू नदीच्या पात्रातून खालच्या अंगाला वाहात चाललेल्या मलयपुत्र प्रमुखांच्या जहाजाच्या कठड्याजवळ उभे होते. ते गंगा नदीकिनारी असणाऱ्या विश्वामित्रांच्या अनेक आश्रमांपैकी एका आश्रमात चालले होते.

'दादा, हे प्रचंड जहाज महर्षी विश्वामित्रांच्या मालकीचे आहे. यापाठोपाठ येणारी इतर दोन जहाजंसुद्धा त्यांच्याच मालकीची आहेत,' लक्ष्मण कुजबुजला. 'या नावेत किमान तीनशे प्रशिक्षित आणि अनुभवी योद्धे आहेत. त्यांच्या गुप्त राजधानीत असे आणखी हजारो सैनिक असल्याचं मी ऐकलंय. कुठे आहे त्यांची ही गुप्त राजधानी कुणास ठाऊक. असं असताना, त्यांना आमच्या मदतीची गरज का लागावी हे त्या परशुरामदेवालाच माहीत.'

'मला ठाऊक नाही,' नदीच्या विस्तीर्ण पात्राकडे पाहात राम म्हणाला. नावेतील इतर व्यक्ती त्यांच्यापासून अंतर राखून असत. 'याला काय अर्थ आहे? पण पिताश्रींचा हुकूम आहे की आपण महर्षी विश्वामित्रांना आपला गुरु मानावं आणि हे.....'

'दादा, मला वाटतं पिताश्रींसमोर दुसरा कोणताही पर्याय नव्हता.'

'आपल्यासमोरही नाही.'

काही दिवसांनंतर विश्वामित्रांनी नांगर टाकण्याची आज्ञा दिली. छोट्या नौका पाण्यात उतरवल्या गेल्या. राम आणि लक्ष्मणसहित पन्नास लोक नौका वल्हवत किनाऱ्यावर पोहोचले.

नौका किनाऱ्याला लागताच मलयपुत्र नौकांमधून उड्या मारून चिंचोळ्या किनाऱ्यावर उतरले आणि त्यांनी पूजेसाठी जागा तयार करायला सुरवात केली.

'आपण इथे काय करणार आहोत, गुरुजी?' रामने नमस्कारासाठी हात जोडत विनम्रपणे विचारले.

'तुमच्या राजगुरूंनी तुम्हाला या जागेबद्दल काहीही सांगितलेलं नाही का?' विश्वामित्रांनी विचारलं. हे विचारताना त्यांच्या चेहऱ्यावर मिश्किल हसू होतं आणि त्यांच्या भुवया जुळल्या होत्या.

राम आपल्या गुरु वशिष्ठांबाबत काहीही वाईट बोलणार नव्हता पण लक्ष्मणामध्ये एवढा पाचपोच नव्हता.

'नाही, गुरुजी, त्यांनी नाही सांगितलं,' लक्ष्मणनं जोरजोरात मान हालवत म्हटलं.

'याच ठिकाणी परशुरामांनी कार्तवीर्य अर्जुनाशी युद्ध करण्यासाठी जाण्याआधी पाचव्या विष्णूअवतार असलेल्या वामन देवांची प्रार्थना केली होती.'

'वा:,' या नव्यानं मिळालेल्या माहितीच्या आधारे सभोवार आदराचा दृष्टिक्षेप टाकत लक्ष्मण म्हणाला.

'त्यांनी इथे बल-अतिबल पूजा सुद्धा केली,' विश्वामित्रांनी सांगितलं,'ज्यामुळे त्यांना भूक आणि तहानेपासून मुक्ती मिळाली आणि त्यांना उत्तम तब्बेतीचं वरदान मिळालं. '

‘आपणही आम्हाला शिकवावं अशी मी आपणास विनंती करतो,’ हात जोडून आदरानं राम विश्वामित्रांना म्हणाला.

लक्ष्मण अस्वस्थ झाला हे स्पष्टपणे दिसून येत होतं. त्याला भूक आणि तहानेपासून मुक्ती नको होती. आपला आहार आणि पेये त्याला आवडत असत.

‘नक्की,’ विश्वामित्र म्हणाले, ‘मी पूजेला बसेन तेव्हा तुम्ही दोघे माझ्या जवळ बसा. पूजेमुळे तुमची भूक आणि तहान निदान एका आठवड्यासाठी तरी कमी होते. शिवाय, तब्बेतीवर होणारा पूजेचा परिणाम जन्मभर कायम रहातो.’

काही आठवड्यांत नावांचा तांडा शरयू आणि गंगा नदीच्या संगमावर पोहोचला. तेथून त्यांनी गंगेच्या पात्रात पश्चिमेकडे नावा हाकारल्या. काही दिवसांनी त्यांनी नांगर टाकले. आणि तात्पुरत्या धक्क्याला नावा बांधल्या. काही मोजक्या लोकांना नावांवर ठेवून राम, लक्ष्मणसहित दोनशे योद्ध्यांसह विश्वामित्र पायी निघाले. अग्नेय दिशेला साधारण चारेक तासांच्या प्रवासानंतर ते मलयपुत्रांच्या एका स्थानिक आश्रमात पोहोचले.

राम आणि लक्ष्मणाला सांगण्यात आलं की आश्रमावर होणाऱ्या हल्ल्यांपासून बचावकार्याला हातभार लावण्यासाठी त्यांना तेथे बोलावण्यात आले आहे. पण त्या दोघांनी तेथे जे काही पाहिलं ते पाहून दोघेही भाऊ चकित झाले. आश्रमात कोणत्याही प्रकारची संरक्षण व्यवस्था नव्हती. काटेरी झाडा-झुडुपांचं कुंपण काही प्राण्यांना दूर राखण्यासाठी पुरेसं असेलही कदाचित, पण सशस्त्र सैनिकांपासून बचावासाठी ते खचितच पुरेसं नव्हतं. आश्रमाजवळचा झरासुद्धा संरक्षित नव्हता. त्यालाही कुंपण नव्हतं. आश्रमावर हल्ला होणार हे जर गृहित असेल तर तिथे कुंपण असायला हवं होतं. आश्रमाजवळ कुणी आलेलं दिसण्यासाठी कुंपणाच्या अलीकडची किंवा पलीकडची जागा मोकळी नव्हती. आश्रमातील मातीच्या भिंती आणि शाकारलेली छप्परं असलेल्या झोपड्या इतक्या जवळ जवळ होत्या की आग फैलावण्याची दाट शक्यता होती. फक्त एका झोपडीला आग लागण्याचा अवकाश, झटपट ती आग संपूर्ण आश्रमात पसरायला वेळ लागणार नव्हता. प्राण्यांना सुद्धा कुंपणाजवळ ठेवण्याऐवजी आश्रमातील एकदम आतल्या कोटात ठेवण्यात आलेलं होतं. प्राण्यांना कुंपणाजवळ ठेवण्याची व्यवस्था असायला हवी होती कारण उपजतबुद्धीने त्यांना संकटाची चाहूल आधी लागते.

‘काहीतरी गडबड आहे, दादा,’ लक्ष्मण हळूच कुजबुजला. ‘हा आश्रम अगदीच नव्यानं बनवलेला दिसतोय. अगदी हल्ली. इथली संरक्षणव्यवस्था, स्पष्टच सांगायचं झालं तर, कुचकामी आहे. आणि...’

रामनं त्याला डोळ्यांनीच दटावून गप्प रहायला सांगितलं. लक्ष्मण बोलायचा थांबला आणि मागे वळला तेव्हा त्याला विश्वामित्र त्यांच्या दिशेने येत असलेले दिसले. अति उंच असलेल्या लक्ष्मणाहूनही ते किंचित अधिक उंच होते.

‘जेवणाला चला, अयोध्येच्या राजकुमारांनो,’ विश्वामित्र म्हणाले, ‘जेवण झाल्यानंतर बोलू आपण.’

अयोध्येचे राजकुमार एकीकडे बसलेले होते. मलयपुत्रांचे प्रसिद्ध सेनाप्रमुख आणि विश्वामित्रांचा उजवा हात मानल्या जाणाऱ्या अरिष्टानेमींनी दिलेल्या सूचनांचं पालन करण्यात गढलेल्या आश्रमवासियांची आसपास धावपळ चाललेली होती. विश्वामित्र एका पिंपळाच्या झाडाखाली सुखासनात बसले होते. प्रत्येक पाऊल दुसऱ्या पायाच्या गुडघ्याखाली येईल अशा रीतीने त्यांनी आपले पाय साध्या पद्धतीने दुमडून घेतले होते. हाताचे तळवे त्यांनी गुडघ्यांवर टेकवले होते. त्यांचे डोळे बंद होते. ध्यानाचं हे सहज यौगिक आसन होतं.

लक्ष्मणाने पाहिलं की अरिष्टानेमी राजकुमारांच्या दिशेने संकेत करत आपल्या एका सेवकाबरोबर बोलत होते. काही सेकंदांत केसरी रंगाचं अधोवस्त्र आणि त्याच रंगाची चोळी ल्यायलेली एक स्त्री हातात केळीची पानं घेऊन राम आणि लक्ष्मणाकडे आली. पाने त्यांच्यासमोर ठेवून रीतीनुसार तिने त्या पानांवर पाण्याचे शिंतोडे मारले. तिच्यापाठोपाठ हातात अन्नाची भांडी घेऊन आणखी काही छोटे विद्यार्थी आले. त्या स्त्रीच्या कुशल देखरेखीखाली अन्न वाढण्यात आलं.

ताटं तयार झाली तशी तिने हात जोडले आणि म्हणाली, 'अयोध्येच्या राजकुमारांनो, कृपया खाऊन घ्या.'

लक्ष्मणाने संशयभरल्या नजरेने आधी समोर ठेवल्या गेलेल्या अन्नाकडे आणि मग दूर उभ्या असलेल्या विश्वामित्रांकडे पाहिले. महर्षींसमोरसुद्धा एक केळीचं पान मांडण्यात आलं होतं आणि त्यावर एक जांबाचं फळ ठेवण्यात आलं होतं. याच फळाच्या नावावरून भारताचं जुनं जंबुद्वीप हे नाव पडलं होतं.

'मला वाटतं ते आपल्यावर विषप्रयोग करणार आहेत, दादा,' लक्ष्मण म्हणाला. 'पाहुणे म्हणून आपल्याला एवढं सगळं खाणं दिलंय. आणि महर्षी विश्वामित्र मात्र फक्त एक जांबाचं फळ खाताहेत?'

'ते फळ खाण्यासाठी नाहीय, लक्ष्मणा,' भाकरीचा तुकडा मोडून त्यासोबत भाजी उचलताना राम म्हणाला.

'दादा!' रामाने खाऊ नये म्हणून त्याचा हात ओढत लक्ष्मण म्हणाला.

राम हसला. म्हणाला, 'त्यांना आपल्याला मारायचंच असतं तर नावेत त्यांच्याकडे जास्त चांगली संधी होती. हे अन्न विषाक्त नाही. खा!'

'दादा, तू सगळ्यांवर विश्वास ठेवतोस...'

'लक्ष्मणा, खा.'

'इथे त्यांनी हल्ला केला होता,' वशिष्टांनी कुंपणाच्या एका भागाकडे बोट दाखवत म्हटलं.

'इथे गुरुजी?' आश्चर्यानं रामनं विचारलं. मग पुन्हा विश्वामित्रांकडे वळण्याआधी त्याने एक कटाक्ष लक्ष्मणावर टाकला.

'हो, इथेच,' विश्वामित्र म्हणाले.

अरिष्टानेमी विश्वामित्रांच्या मागे गप्प उभे होते.

रामचा अविश्वास आता पक्का होत चालला होता कारण विश्वामित्र जे दाखवत होते त्या ठिकाणी हल्ला झाला असेल असं वाटत नव्हतं. कुंपणाचा साधारण दोन मीटरचा भाग

होरपळला होता. काही उपदव्यापी लोकांनी तेल ओतून आग लावली असावी. पण त्यांच्याजवळ पुरेसं तेल नसावं. कारण कुंपणाचा तेवढा भाग सोडला तर इतर सर्व कुंपण सुरक्षित होतं. त्यांनी कदाचित रात्रीच्या वेळी हल्ला केला असावा. त्यावेळी साचलेल्या दवामुळे कदाचित जाळपोळ करण्याचा त्यांचा पोरकट प्रयत्न फसला असावा.

हे कुण्या गंभीर हल्लेखोराचे प्रयत्न नव्हते हे उघड होतं.

कुंपणातील छोट्या मोकळ्या जागेतून राम कुंपणापलीकडे पोहोचला. तेथे त्याला अर्धवट जळालेल्या कापडाचा एक तुकडा सापडला.

लक्ष्मण लगेच रामच्या पाठोपाठ गेला. रामच्या हातातून कापडाचा तो तुकडा घेऊन त्याने त्याचा वास घेतला. पण त्याला त्यावर कोणत्याही ज्वलनशील पदार्थाचा अंश सापडला नाही. 'हा उत्तरीयाचा तुकडा आहे. त्यांच्यापैकी चुकून कुणाचीतरी वस्त्रे आग लावताना पेटली असावीत. मूर्ख कुठचे.'

लक्ष्मणाला तिथे एक सुरी दिसली. ती रामकडे देण्याआधी त्याने लक्षपूर्वक तपासली. ती जुनी आणि गंजलेली असली तरी धारदार होती. पण कुणा योद्ध्याची ती नक्कीच नव्हती.

रामने विश्वामित्रांकडे पाहात विचारलं, 'आपली काय आज्ञा आहे, गुरुजी?'

'हे हल्लेखोर कोण आहेत ते तू शोधून काढ. त्यांच्यामुळे आमच्या आश्रमातील कामांमध्ये आणि आमच्या पूजेअर्चेत व्यत्यय येतो,' विश्वामित्र म्हणाले, 'त्यांना संपवावंच लागेल.'

वैतागलेला लक्ष्मण मध्येच म्हणाला, 'पण हे लोक तर अजिबात कुशल ना....'

रामने त्याला गप्प राहाण्याची खूण केली. 'आपल्या सूचनेचं मी पालन करेन, गुरुजी, कारण माझ्या वडिलांनी मला हेच करायला सांगितलंय. पण तुम्ही आमच्याशी इमानदार असायला हवं. एवढे सैनिक आपल्या आज्ञेत असताना आपण आम्हाला का बोलावलंत?'

'कारण, तुझ्यात असं काही तरी आहे जे माझ्या सैनिकांमध्ये नाही,' विश्वामित्र म्हणाले.

'ते काय?'

'अयोध्येचं रक्त.'

'पण त्याने काय फरक पडतो?'

'हल्लेखोर जुन्या संहितेतील असुर आहेत.'

'ते असुर आहेत?' लक्ष्मण उद्गारला. 'पण आता भारतात असुर उरले नाहीत. बऱ्याच काळापूर्वी रुद्रदेवांनी सर्व असुरांचा नाश केला होता.'

विश्वामित्रांनी 'आता याचं काय करू?' अशा नजरेनं लक्ष्मणाकडे पाहिलं. मग ते त्याला म्हणाले, 'मी तुझ्या मोठ्या भावाशी बोलतोय.' मग रामकडे वळून ते म्हणाले, 'जुन्या काळचे असुर अयोध्यावासियांवर हल्ला करण्याचं स्वप्नातसुद्धा आणणार नाहीत. '

'पण का, गुरुजी?'

'शुक्राचार्यांबद्दल ऐकलंयस का?'

'हो. ऐकलंय. ते असुरांचे गुरु होते. असुर त्यांची पूजा करत किंवा करत असत.'

'आणि शुक्राचार्य मुळचे कुठले होते ते ठाऊक आहे का?'

'इजिप्तचे.'

विश्वामित्र हसले. मग हसतच बोलले, 'होय, तांत्रिक दृष्ट्या तुझं बरोबर आहे. पण भारताचं हृदय अत्यंत विशाल आहे. जर कुणी विदेशी व्यक्ती इथे आली आणि तिने इथल्या धरतीला

आपली माता मानलं तर ती मग विदेशी रहात नाही. ती मग भारतीय व्यक्तीच बनते. शुक्राचार्य इथे लहानाचे मोठे झाले. त्यांचं गाव कोणतं याचा अंदाज बांधू शकतोस का?'

रामचे डोळे आश्चर्यानं विस्फारले. तो उद्गारला, 'अयोध्या?'

'हो, अयोध्या. म्हणून जुन्या काळाचे असुर कोणत्याही अयोध्यावासियावर हल्ला करणार नाहीत. कारण त्यांच्यासाठी ती पवित्र भूमी आहे.'

दुसऱ्या दिवशी दुसऱ्या प्रहराच्या पहिल्या तासाला राम, लक्ष्मण आणि अरिष्टानेमी आश्रमातून घोड्यांवर स्वार होऊन निघाले. त्यांच्यासोबत पन्नास योद्धे होते. ते दक्षिण दिशेला निघाले. असुरांची स्थानीय वस्ती एक दिवसाहून थोडा अधिक काळाच्या रपेटीच्या अंतरावर होती.

'मला त्यांच्या नेत्यांविषयी सांगा, अरिष्टानेमी,' रामने अतीव आदराने मलयपुत्रांच्या सरसेनापतीला विचारले.

अरिष्टनेमी उंचीने लक्ष्मणाएवढाच होते. पण लक्ष्मणाच्या तुलनेने थोडे सडपातळ, जवळ जवळ हाडकुळे होते. त्यांनी केशरी रंगाचं धोतर नेसलं होतं आणि उजव्या खांद्यावर उत्तरीय टाकलं होतं. त्याचं एक टोक त्यांच्या उजव्या मनगटाभोवती गुंडाळलेलं होतं. त्यांनी जान्हवं घातलेलं होतं. त्यांच्या डोक्यावरील गाठ मारलेली शेंडी ते ब्राह्मण असल्याची साक्ष देत होती. पण इतर ब्राह्मणांहून त्यांच्यात एक गोष्ट वेगळी होती – त्यांच्या गव्हाळ वर्णाच्या शरीरावर लढाईतील जखमांच्या भरपूर खुणा होत्या. त्यांचं वय सत्तर वर्षांहून अधिक असल्याचं बोललं जात असे, पण ते 20 वर्षांहून एक दिवसही मोठ्या वयाचे वाटत नव्हते. कदाचित विश्वामित्रांनी त्यांना रहस्यमय पेय सोमरसाबद्दल माहिती दिली असावी. सोमरस देवांचं पेय मानलं जाई. या पेयातील वय वाढू न देण्याचा गुण माणसाची तब्बेत तब्बल 200 वर्षेपर्यंत ठणठणीत राखत असे.

'असुरांचं प्रमुखपद ताटका नावाच्या एका स्त्रीकडे होतं. त्या असुरांचे प्रमुख सुमाली यांच्या पत्नी होत्या,' अरिष्टानेमींनी सांगितलं, 'ताटका राक्षस कुळातील स्त्री होती.'

रामचा चेहरा उतरला. तो म्हणाला, 'मला वाटलं होतं की, राक्षस सुद्धा देवांचे दूरचे नातलग असावेत आणि आम्ही सगळेच त्यांचे वंशज असू.'

'राक्षस योद्धा आहेत, राजकुमार राम. 'राक्षस' शब्दाचा अर्थ काय आहे हे तुला ठाऊक आहे का? संस्कृत शब्द 'रक्षा'वरून हा शब्द निघालेला आहे. आणि 'रक्षा' शब्दाचा अर्थ आहे 'संरक्षण.' असं म्हणतात की त्यांच्याशी युद्धात हारणारे लोक त्यांच्याकडून संरक्षण मागत असत. यातूनच मग राक्षस शब्द निर्माण झाला. पुराणकालातील ते सर्वश्रेष्ठ योद्धे होते. पुढे त्यांच्यापैकी काही लोक देवांना जाऊन मिळाले आणि काही असुरांना. रावणसुद्धा अर्ध असुर आहे.'

'अच्छा!' राम उद्गारला तेव्हा आपोआप त्याच्या भुवया उंचावल्या.

अरिष्टानेमी पुढे म्हणाले, 'ताटकासोबत पंधरा योद्ध्यांचा एक समूह होता. त्यांचं नेतृत्व ताटकाचा मुलगा सुबाहु करीत असे. त्यांच्या वस्तीत स्त्रिया, मुलं आणि म्हातारे मिळून 50पेक्षा अधिक लोक नव्हते.'

रामच्या कपाळाला आठ्या पडल्या, फक्त पंधरा सैनिक?

दुसऱ्या दिवशी पहाटे त्या सगळ्यांनी आदल्या रात्री जेथे मुक्काम केला होता ते ठिकाण सोडले.

'येथून साधारण एक तासाच्या प्रवासाच्या अंतरावर असुरांची वस्ती आहे,' अरिष्टानेमी म्हणाले, 'आपल्या सैनिकांना मी टेहेळणी करणाऱ्यांबद्दल आणि सापळ्यांबद्दल सावध रहाण्याच्या सूचना दिल्या आहेत.'

पुढे जाता जाता रामने आपला घोडा अरिष्टानेमींच्या घोड्याजवळ नेला. त्या मितभाषी सैनिकासोबत अधिक संभाषण करण्याची त्याची इच्छा उघड होती. 'अरिष्टानेमी,' राम म्हणाला, 'महर्षी विश्वामित्रांनी जुन्या काळातल्या असुरांचा उल्लेख केला होता. त्यांचं एकूण सैन्य केवळ एवढ्या पन्नास लोकांचं खचितच नसणार. केवळ पन्नास लोक एखादी जमात तगवू शकत नाहीत. मग या जमातीचे इतर सदस्य कुठे आहेत?'

अरिषटनेमी हासले पण त्यांनी उत्तर दिलं नाही. हा मुलगा हुशार आहे. याच्याशी सांभाळूनच बोला असं गुरुजींना सांगायला हवं.

राम प्रश्न विचारत राहिला. 'असुर जर भारतात असते तर त्यांनी आपल्यावर म्हणजे देवांच्या वंशजांवर हल्ला केला असता. यावरून लक्षात येतं की ते इथे नाहीत. मग ते कुठे आहेत?'

अरिष्टानेमी जाणवेल-न जाणवेल अशा रीतीनं हसले. मग त्यांनी डोक्यावर असलेल्या जंगली झाडांच्या गडद छत्राकडे पाहिलं. त्या छत्रामुळे सूर्यप्रकाश रोखला गेला होता. त्यांनी रामला सत्य सांगण्याचा निर्धार केला. रामला त्यांनी विचारलं, 'वायुपुत्रांबद्दल ऐकलंयस का?'

'हो तर, ऐकलंय ना!' राम म्हणाला, 'आणि कोण असे आहेत ज्यांनी ऐकलं नसेल? पूर्व महादेव रुद्रदेवांचे ते वंशज आहेत. तुमचे लोक ज्याप्रमाणे आधीच्या विष्णुदेवांचे - परशुरामांचे वंशज आहेत अगदी त्याचप्रमाणे. वाइटापासून नेहमी भारताचं संरक्षण करण्याची जबाबदारी वायुपुत्रांवर आहे. तशीच वेळ आली तर त्यांच्यापैकी एक पुढील महादेव बनू शकतात असा त्यांना विश्वास आहे.'

अरिष्टानेमी गूढपणे हसले.

'पण याचा असुरांशी काय संबंध?' रामने विचारलं.

अरिष्टानेमींच्या चेहऱ्यावरील हसू मावळलं नाही.

'रुद्रदेवांची शपथ, भारताच्या शत्रूला म्हणजे असुरांना वायुपुत्रांनी आश्रय दिलाय की काय?'

'होय. दिलाय खरा.'

रामला राग आला. 'पण का? आमच्या पूर्वजांनी भारतातील असुर साम्राज्य नष्ट करण्यासाठी आकाश-पाताळ एक केलं होतं. त्यांनी खरं तर सर्व देवांचा आणि त्यांच्या वंशजांचा तिरस्कार केला पाहिजे. पण नाही, ते तर सरळ त्यांच्याशी हातमिळवणी करताहेत. त्यांच्या दलात सामील होताहेत. ज्या दलाचं काम भारताचं वाइटापासून संरक्षण करणं आहे ते आपल्या शत्रूच्या वंशजांचं रक्षण का करत आहेत?'

'हो, रक्षण करतायत खरे.'

राम थक्क झाला होता, त्याने विचारलं, 'पण का?'

'कारण रुद्रदेवांनी त्यांना तसं करण्याची आज्ञा दिली होती.'

या चर्चेतून काहीही निष्पन्न होणार नाही. रामला प्रचंड धक्का बसला होता, पण त्याहीपेक्षा

महत्वाचं हे की, यामुळे त्याच्या मनात काही प्रश्न निर्माण झाले. आकाशाकडे पाहात तो विचारात गढला. पौरुष संस्कृतीतील लोक विचित्र होते यात शंका नाही, पण ते उदात्त होते हे सुद्धा तितकंच खरंय. अशा काही वेड्या पीरांना तो आता भेटायला चालला होता.

पण त्यांना नष्ट का करायचं? त्यांनी कोणता कायदा तोडलाय? अरिष्टानेमीला नक्की ठाऊक असेल. पण तो मला सांगणार नाही. तो महर्षी विश्वामित्रांशी एकनिष्ठ आहे. आंधळेपणानं त्यांच्यावर हल्ला करण्याआधी मला असुरांबद्दल आणखी माहिती मिळविली पाहिजे.

अरिष्टानेमी आपलं मन वाचण्याचा प्रयत्न केल्यासारखे आपल्याकडे टक लावून पाहाताहेत हे लक्षात आलं आणि रामच्या कपाळावर आठ्या पडल्या.

घोड्यांवर स्वार झालेली तुकडी साधारण गेल्या अर्ध्या तासापासून रपेट करत चालली होती. रामनं मौन राहूनच त्यांना थांबण्याचा संकेत केला. लगेच सगळ्यांनी आपापल्या घोड्यांचे लगाम खेचले आणि ते थांबले. अरिष्टानेमी आणि लक्ष्मणांनी आपापले घोडे सावकाश रामच्या घोड्यापाशी आणले.

'वर पाहा,' राम हळू आवाजात बोलला, 'त्या झाडावर.'

साधारण पन्नासेक मीटर्सच्या अंतरावरील एका अंजीराच्या झाडावर जमिनीपासून वीसेक मीटर्सच्या उंचीवर बांधलेल्या मचाणात शत्रूचा एक सैनिक बसलेला होता. मचाणाला आडोसा देण्यासाठी समोर काही फांद्या ओढून बांधल्या होत्या पण त्यामुळे मचाणाला पुरेसा आडोसा मिळालेला नव्हता.

लक्ष्मण तिरस्कारानं म्हणाला, 'त्या मूर्खाला नीटसा आडोसासुद्धा निर्माण करता आलेला नाहीय.'

असुरांच्या त्या सैनिकानं लाल रंगाचं धोतर पेहेरलं होतं. यामागे जर त्यांचा हेरगिरीचा किंवा टेहेळणीचा उद्देश असला तर तो पूर्णपणे विफल ठरलेला होता. कारण कावळ्यांच्या थव्यात असलेल्या पोपटासारखा लाल रंग त्याच्या तिथे असण्याची दवंडी पिटत होता.

'ते लाल रंग पवित्र मानतात,' अरिष्टानेमी म्हणाले. 'जेव्हा जेव्हा ते लढाईला जातात तेव्हा तेव्हा ते लाल रंगाची वस्त्रं पेहेरतात.'

यावर विश्वास ठेवणं लक्ष्मणाला जड गलं. तो म्हणाला, 'पण तो इथे हेर आहे, योद्धा नाही! पोरकट.'

रामने खांद्यावर लावलेलं धनुष्य उतरवलं आणि दोरीचा ताण तपासला. पुढे झुकून गळ्यातून प्रेमळ आवाज काढत त्यानं आपल्या घोड्याची मान थोपटली. त्याचा घोडा निश्चल झाला. रामनं पाठीवर बांधलेल्या भात्यातून एक बाण काढला, धनुष्यावर चढवला आणि प्रत्यंचा मागे खेचली. नेम धरला आणि बोट उडवून बाण सोडून दिला. क्षेपणास्त्रासारखा निशाणाकडे निघालेला बाण बरोब्बर लक्ष्यावर जाउन लागला. रामने बाण मचान बांधलेल्या जाड दोरखंडावर सोडला होता. दोरखंड तुटला आणि मचान ढासळल्यानं त्यावर बसलेला असुर झाडाच्या फांद्यांना अडखळत खाली जमिनीवर येऊन कोसळला. फांद्यांना अडखळल्यामुळे त्याचा खाली पडण्याचा वेग कमी झाला होता. त्यामुळे तो जेव्हा जमिनीवर पडला तेव्हा त्यामानानं त्याला फारसं लागलं नव्हतं.

अरिष्टानेमी धनुर्विद्येतील रामाचं कौशल्य पाहातच राहिले. त्यांच्या मनात आलं, धनुर्विद्येत हा

मुलगा पारंगत आहे.

'शरण आलास तर तुला कोणतीही इजा होणार नाही,' रामने त्याला आश्वासन दिलं, 'आम्हाला तुझ्याकडून केवळ काही प्रश्नांची उत्तरं हवीत.'

असुर लगेच उठून उभा राहिला. तो एक किशोरच होता, वय पंधरा वर्षांहून अधिक नव्हतं त्याचं. राग आणि तिरस्कारानं त्याचा चेहरा वाकडा झाला होता. जोरात खाकरून थुंकल्यानंतर त्यानं आपली तलवार बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. पण दुसऱ्या हाताने म्यान दाबून न धरल्यामुळे तलवार पूर्ण बाहेर येण्याऐवजी मध्येच अडकून राहिली. शिव्या घालत त्याने पूर्ण ताकदीनिशी तलवार ओढली आणि तलवार म्यानीतून निघाली. अरिष्टानेमी घोड्यावरून खाली उतरले आणि त्यांनी सावकाश आपली तलवार उपसली.

'आम्ही तुला मारणार नाही,' राम त्याला म्हणाला, 'कृपा करून शरण ये.'

त्या बिचाऱ्या मुलाची तलवारीच्या मुठीवरली पकड एकदम चुकीची आहे हे लक्ष्मणाच्या ध्यानात आलं. लढताना अशा पद्धतीने तलवार पकडली तर तो लवकरच थकला असता. शिवाय, तलवारीचं ओझं खांदे आणि त्रिशिरस्क स्नायूंऐवजी त्याच्या हाताच्या कोपर आणि मनगटाच्या मधल्या भागावर पडत होतं. तलवारीच्या मुठीच्या शेवटच्या टोकाजवळ त्यानं तलवार धरली होती. अशाच रीतीनं त्याने जर तलवार धरली तर नक्की त्याच्या हातातून ती निखळून पडली असती!

असुर पुन्हा एकदा थुंकला. मग मोठ्यानं किंचाळत म्हणाला, 'अरे किड्यांच्या विष्ठांनो! तुम्हाला काय वाटलं, तुम्ही आम्हाला हरवाल? खरा देव आमच्याबरोबर आहे. तुमचे खोटे देव तुमचं रक्षण करू शकणार नाहीत! तुम्ही सगळे मरणार! मरणार!'

'आपण इथे का आलो? या वेडपटांना मारायला?' लक्ष्मणानं चिडचिड करत हवेत हात फेकत म्हटलं.

रामने लक्ष्मणाकडे दुर्लक्ष केलं आणि तो पुन्हा त्या योद्ध्याशी बोलू लागला. विनम्रपणाने त्यानं विचारलं, 'मी तुला विनंती करतो, कृपा करून शस्त्रं खाली टाक. आम्ही तुला मारू इच्छीत नाही.'

अरिष्टानेमी हळूहळू पुढे सरकू लागले. ते असुराला घाबरवू इच्छित होते पण परिणाम मात्र बरोब्बर उलटा झाला.

असुर मोठ्याने ओरडला, 'सत्यम एकम!'

त्याने अरिष्टानेमींवर हल्ला केला. सगळं एवढं अचानक घडलं की रामला मध्यस्थी करायची संधीच मिळाली नाही. असुराने अरिष्टानेमींवर त्यांच्या एकप्रकारच्या शस्त्राने हल्ला केला. त्याच्यामते बहुधा तो जीवघेणा वार असायला हवा होता. पण तो अरिष्टानेमींच्या जवळ नव्हता. उंच अरिष्टानेमींनी सहज मागे सरून त्याचा वार हुकवला.

'थांब!' अरिष्टानेमी म्हणाले.

पण त्या किशोरवयीन योद्ध्याने जोरात आरोळी ठोकली, तलवार घेतलेला हात घुमवला, आणि डावीकडून उडी घेतली. खरं तर असा उलटा हात चालवण्यासाठी त्याने दोन्ही हातांनी तलवार पकडायला हवी होती. तरीसुद्धा अरिष्टानेमीसारख्या पराक्रमी व्यक्तीबाबत ती त्याची चूक ठरण्याची शक्यताच अधिक होती. मलयपुत्राने झेप घेऊन असा ठोसा लगावला की त्या असुराच्या हातातून तलवार कुठल्याकुठे जाऊन पडली. त्याच वेगात अरिष्टानेमीने वरून

असुराच्या छातीवर एक फटका मारला. घाबरून असुराने शरण यावं अशी कदाचित त्याची इच्छा होती.

अरिष्टानेमींनी मागे सरकून आपली तलवार नरम जमिनीत घुसवली, त्याचा अर्थ असा की माझ्याकडून तुला धोका नाही.

मोठ्या आवाजात ते म्हणाले, 'मागे जा. मला तुला मारायचं नाहीय. मी मलयपुत्र आहे,' मग हळू आवाजात अरिष्टानेमी अशा रीतीने बोलले की केवळ त्या असुरालाच ऐकू जाईल, 'शुक्राचार्यांचे डुक्कर.'

बिथरलेल्या असुराने पाठीमागे म्यानीला लावलेली सुरी खेचून काढली आणि ओरडत पुढे गेला, 'मलयपुत्रा कुत्र्या!'

अरिष्टानेमी मागे सरकले. स्वसंरक्षणार्थ त्यांचे हात पुढे आले. त्यांनी उजव्या हातात धरलेली तलवार आडवी वर आली. असुर केवळ अरिष्टानेमींच्या तलवारीच्या दिशेने धावत गेला आणि तलवारीचं पातं त्याचं पोट कापत गेलं.

'अरेरे!' मागे सरणाऱ्या अरिष्टानेमींच्या तोंडून उद्गार निघाला. मागे सरकून त्यांनी तलवार खेचून काढली. रामकडे वळले तेव्हा त्यांच्या डोळ्यात पश्चाताप भरलेला होता.

आश्चर्याचा धक्का बसलेल्या असुराच्या हातून त्याची सुरी खाली पडली. त्याची नजर खाली आपल्या पोटाकडे गेली. थेंबाथेंबाने ठिबकायला सुरवात झालेलं रक्त पाहाता पाहाता उसळी मारून वाहू लागलं. क्षणाक्षणाला त्याचा वाहाण्याचा वेग वाढतच होता. त्याला बसलेला धक्का एवढा प्रचंड होता की वेदनेची जाण त्याला आलीच नाही. आपल्याच शरीराकडे तो ते इतर कुणाचं शरीर असल्यासारखं पाहात राहिला. त्याच्या बुद्धीला जेव्हा हे सगळं पेलवणं अशक्य झालं तेव्हा तो कोसळला. मग त्याने वेदनेने नव्हे तर भीतीने किंकाळी फोडली.

वैतागून अरिष्टानेमींनी आपली ढाल जमिनीवर फेकली. 'असुरा, मी तुला थांब असं म्हणालो होतो!'

रामने आपलं डोकं पकडलं. त्याच्या तोंडून उद्गार निघाले, 'रुद्रदेवा, दया करा...'

असुराने आता वेदनेने टाहो फोडला होता. आता त्याला वाचवण्याचा कोणताच उपाय नव्हता. ज्या वेगाने रक्त वाहात होतं त्यावरून समजून येत होतं की अरिष्टानेमींच्या तलवारीने त्याच्या शरीरातील अनेक महत्वाचे अवयव आणि नसा कापून काढले होते. आता रक्त वाहून तो काही वेळात मरणार हे निश्चित होते.

मलयपुत्र रामकडे वळत म्हणाला, 'मी त्याला ताकीद दिली होती... तू त्याला ताकीद दिली होती... तो स्वतःच माझ्या तलवारीवर धावत येऊन आदळला...'

रामने डोळे मिटले आणि वैतागाने डोके हालवले, म्हणाला, 'या मूर्खाला वेदनेपासून मुक्ती द्या.'

अरिष्टानेमींनी आपल्या पायापाशी पडलेल्या त्या असुराकडे पाहिले. तो एक गुडघा टेकून खाली बसला. आपल्या चेहऱ्यावरचे भाव फक्त त्या असुराला दिसावेत अशा रीतीने तो खाली वाकला. रामच्या आज्ञेचं पालन करण्यापूर्वी त्यानं असुरावर घृणेचा कटाक्ष टाकला.'

# प्रकरण 17

रामने पुन्हा एकदा संकेत करून सगळ्यांना थांबविले.

घोड्यावर बसलेला लक्ष्मण त्याच्याजवळ येता येता म्हणाला, 'हे अयोग्यतेच्या सगळ्या सीमांपलीकडचे लोक आहेत.'

राम, लक्ष्मण आणि अरिष्टानेमी दूरवर दिसणाऱ्या असुर वस्तीकडे पाहात उभे होते. संभाव्य ह्ल्यापासून बचावासाठी त्यांनी आपल्या वस्तीभोवती कुंपण घातलं होतं पण ते अगदीच साधं होतं. युद्धतंत्रात कुशल असलेल्या लोकांनी ते बनवलं असल्यासारखं अजिबात वाटत नव्हतं. अंबाडीच्या दोरखंडात जखडलेल्या उंच अणकुचीदार खांबांचं कुंपण संपूर्ण वस्तीभोवती घातलेलं होतं. बाण, भाले किंवा तत्सम इतर शस्त्रांपासून या कुंपणामुळे जरी संरक्षण मिळत असलं तरी आग लागली असती तर हे कुंपण बघत बघता जळून खाक झालं असतं. वस्तीजवळून वाहाणाऱ्या ओढ्याभोवती कोणतीच संरक्षण व्यवस्था केलेली नव्हती. ओढा बराच खोल होता त्यामुळे त्यातून चालत जाणं शक्य नसलं तरी घोड्यावर स्वार झालेले लोक नक्कीच तो ओलांडू शकले असते.

अरिष्टानेमी हसत म्हणाला, 'नक्की सांगतो, हा असंरक्षित ओढा म्हणजे आमिष आहे असं त्यांना वाटत असेल.'

शत्रू नेमका याच बाजूने हल्ला करेल हे गृहित धरून त्यांनी ओढ्याच्या उथळ प्रवाहाच्या पलीकडे किनाऱ्यालगत छोटासा खंदक बनविला होता आणि थातुरमातुर उपायांनी तो लपविला होता. या सुक्या खंदकात लपलेल्या असुरांच्या धनुर्धारींनी ओढ्यातून येणाऱ्या आगंतुकांवर बाणांचा मारा केला असता. सैद्धांतिकदृष्ट्या ही प्रभावी युद्धनीती होती पण ज्याप्रकारे इथे ती लागू केली गेली होती ती अतिशय अकुशल आणि निकृष्ट होती.

जवळच वाहात्या पाण्यात काही पडल्याचा आवाज ऐकून राम सावध झाला. खंदक जवळच असल्याचा अंदाज त्याने लावला. ओढ्याजवळची जमीन असल्याकारणाने पाणी जमिनीत मुरलं होतं. त्यामुळे खंदक निसरडा झाला असावा, खंदक नीटपणे जलरोधी बनविलेला नसावा आणि कुणी सैनिक घसरून पडला असावा असा रामने अंदाज बांधला.

अकुशलतेचा आणखी एक नमूना म्हणून की काय, असुरांनी जवळपास खंदकावर येणाऱ्या झाडावर एक मचाण बांधलं होतं. कदाचित ओढा ओलांडून येणाऱ्या शत्रूवर मचाणावर बसलेल्या धनुर्धाऱ्यांकडून बाणांचा वर्षाव करण्याची कल्पना असावी, पण सध्या मचाण रिकामं होतं. हे पाहाताच रामच्या मनात खंदकात लपून बसलेल्या असुरांवर हल्ला करण्याची एक नामी युक्ती आली.

रामने घोड्याच्या कानात गुणगुणल्यासारखा आवाज काढला आणि ती सूचना नेमकी पाळत घोडा निश्चल उभा राहिला. रामने लीलया भात्यातून एक बाण काढून धनुष्यावर चढवला.

अरिष्टानेमी त्याला म्हणाला, 'भात्यातून निघालेला बाण वळून वेगाने खंदकात जाणं शक्य नाही, राजकुमारा. ते खंदकात खोलवर बसलेले असावेत. यावेळी त्यांच्यावर वार करणं शक्य नाही.'

रामने वाऱ्याच्या गतीनुसार बाणाची दिशा ठरवत सांगितलं, 'मी खंदकाचा नेम धरलेला नाही, अरिष्टानेमी.'

प्रत्यंचा मागे ओढून त्याने बाण सोडता सोडता बाणाच्या शेवटच्या टोकाला लागलेल्या पिसांना बोटांनी फिरकी दिली. बाण गरगरत वेगाने पुढे गेला आणि मचाण बांधून ठेवणाऱ्या दोरखंडाला त्याने एका झटक्यात कापलं. दोरखंड उलगडत गेला आणि मचाणासाठी वापरलेले ओंडके एकापाठोपाठ एक घरंगळत थेट खंदकात जाऊन कोसळू लागले.

'अत्युत्तम!' अरिष्टानेमी हसत उद्गारले.

ज्या ओंडक्यांनी मचाण बांधलं होतं ते जीवे मारण्याएवढे मोठ्या आकाराचे नसले तरी, घायाळ करण्यासारखे जरूर होते. ओंडके कोसळले आणि लागलीच खंदकातून घाबरलेल्या सैनिकांच्या किंकाळ्या ऐकू येऊ लागल्या.

लक्ष्मणानं रामकडे पाहात विचारलं, 'आपण आता...'

'नाही,' रामनं लक्ष्मणाला काय विचारायचंय ते ओळखून त्याचं म्हणणं खोडलं. 'आपण वाट पाहू. मला त्यांच्याशी युद्ध करायचं नाहीय. ते आपल्याला जिवंत मिळतील असं बघायचंय.'

अरिष्टानेमींच्या ओठांवर हलकं स्मित उमललं.

खंदकातून राग आणि वेदनाभरल्या किंकाळ्या येत राहिल्या. कदाचित असुर त्यांच्यावर पडलेले ओंडके दूर सारत असावेत. थोड्याच वेळात एक असुर खंदकातून बाहेर आला. त्याच्यापाठोपाठ स्वतःला खेचत इतर सैनिकही बाहेर आले. त्यांच्यापैकी जो सर्वात उंच होता तो त्यांचा नेता होता. त्यानं आपल्या लोकांची पाहाणी केली. आणि मग मागे वळून त्याने आपल्या प्रतिस्पर्ध्यांकडे पाहिले.

'तो सुबाहू,' अरिष्टानेमींनी सांगितले, 'ताटकाचा मुलगा आणि त्यांचा सेनाप्रमुख.'

सुबाहूच्या डाव्या खांद्याचं हाड ओंडका पडल्यामुळे सरकलं होतं पण एरवी त्याला आणखी दुखापत झाली नव्हती असं वाटत होतं. त्यानं आपली तलवार उपसली, अर्थात ती उपसण्यासाठी त्याला बरेच श्रम पडले, कारण त्याचा डावा हात घायाळ असल्याकारणाने म्यान नीट धरू शकत नव्हता. त्यानं तलवार उगारली आणि आरोळी दिली. त्याच्या सैनिकांनी त्याचं अनुकरण केलं.

हे सर्व पाहून रामला खूप गंमत वाटत होती. हसावं की पराक्रमाच्या या मूर्ख प्रदर्शनावर त्यांचं अभिनंदन करावं हे त्याला समजेना.

'अरे देवा परशुरामा,' लक्ष्मण उसासत म्हणाला, 'हे लोक मूर्ख आहेत का? आमच्याकडे पन्नास घोडेस्वारांचं बळ आहे हे त्यांच्या ध्यानात नाही का आलं? '

'सत्यम् एकम्!' सुबाहूने गर्जना केली.

'सत्यम् एकम्!' इतर असुरांनीही गर्जना केली.

मूर्खपणा वाटत असला तरी अजूनही राक्षसांनी आपले प्रयत्न सुरू ठेवलेले पाहून गुरु विश्वामित्रांनी कल्पना दिलेली असूनही रामला मोठं आश्चर्य वाटलं. त्यानं मागे वळून पाहिलं आणि तो रागावला. म्हणाला, 'लक्ष्मण, अयोध्येचं निशाण कुठे आहे? तू ते उचलून का धरलं नाहीस?'

'काय?' लक्ष्मणने पुन्हा विचारलं. त्यानं लगेच मागे नजर टाकली आणि त्याच्या लक्षात आलं की मागच्या सैनिकांनी मलयपुत्रचा झेंडा उचलून धरलेला होता, कारण ही मोहिम विश्वामित्रांनी

आखली होती.'

'आत्ता तो झेंडा फडकाव!' असुरांवरून नजर ढळू न देता राम ओरडला. असुर हल्ला करण्याच्या बेतातच होते.

खोगीरात अडकवून ठेवलेला झेंडा लक्ष्मणाने खेचून काढून फडकावला. याच झेंड्याखाली अयोध्यावासी लढाई करायला जात असत. पांढऱ्या कापडावर मधोमध लाल रंगातील गोल आकाराचा सूर्य आणि त्याचे चारही दिशांना फाकलेले किरण. झेंड्याच्या खालच्या भागात सूर्यकिरणांच्या प्रकाशात न्हालेला एक झेप घेणारा तेजस्वी सुंदर वाघ होता.

'हल्ला!' सुबाहूने ओरडत आज्ञा दिली.

'सत्यम् एकम्!' ओरडत असुर चाल करून आले.

रामने मूठ वळली आणि हवेत उंचावून तो ओरडला, 'अयोध्याता विजेतारा!'

अयोध्यावासियांची ही युद्धापूर्वी देण्याची घोषणा होती, अविजीत शहरातील विजेते!

लक्ष्मणाने झेंडा उंच धरला आणि त्याने आरोळा ठोकली, 'अयोध्याता विजेतारा!'

असुर जागच्या जागीच थांबले. ते दोघा राजकुमारांकडे आणि अयोध्येच्या झेंड्याकडे पाहातच राहिले. रामचा घोडा जेथे उभा होता तेथून अवघ्या पन्नास फुटांवर येऊन ते उभे होते.

सुबाहूने आपली तलवार खाली आणली आणि तो हळूहळू पुढे येऊ लागला. आता त्याच्या चालीत कोणतेही आव्हान किंवा धमकी नव्हती.

'तुम्ही अयोध्येवरून आलायत का?' सुबाहूने आपण बोललेलं त्यांना ऐकू जावं इतपत पुढे येत विचारलं.

'मी अयोध्येचा युवराज आहे,' राम म्हणाला, 'शरण आलात तर अयोध्येची शपथ घेऊन सांगतो, तुम्हाला कोणत्याही प्रकारची इजा पोहचवली जाणार नाही.'

लुळ्या पडलेल्या हातातून सबाहूची तलवार निखळून खाली पडली, तो गुडघ्यावर बसला, इतर असुरांनी त्याचं अनुकरण केलं. त्यांच्यापैकी काही आपापसात कुजबुजत होते. पण त्यांची कुजबूज इतक्या मोठ्या आवाजात होती की रामला ते काय बोलताहेत ते ऐकू येत होतं.

'शुक्राचार्य...'

'अयोध्या....'

'एकम् चा उद्घोष'...... ''

राम, लक्ष्मण आणि मलयपुत्रांचं असुर वस्तीत धूमधडाक्यात स्वागत करण्यात आलं. चौदा असुर सैनिकांच्या सन्मानार्थ खुद्द ताटका उभी होती. वस्तीतील स्त्रियांनी आपापल्या जखमी पुरुषांचा ताबा घेतला आणि त्या त्यांच्या सेवेला लागल्या. मलयपुत्रांनी आधीच त्यांना निशस्त्र केलं होतं.

यजमान आणि पाहुणे मध्यवर्ती चौकात पोहोचले, तिथे झटपट उरकलेल्या अल्पोपहारानंतर रामने मलयपुत्रांच्या प्रमुखाला म्हटलं, 'अरिष्टानेमी, कृपया मला एकट्याला असुरांकडे सोडा.'

'का बरं?' अरिष्टानेमींनी विचारलं.

'मला त्यांच्याबरोबर एकांतात बोलायचं आहे.'

लक्ष्मणाने लगेच जोरदार विरोध नोंदवला, 'दादा, मी जेव्हा या लोकांवर हल्ला करू नये असं

म्हणालो, तेव्हा मला हे लोक चांगले आहेत आणि आपण त्यांच्याबरोबर बोलणी करायला हवीत असं म्हणायचं नव्हतं. मला फक्त एवढंच वाटत होतं की त्यांच्यावर हल्ला करणं आपल्याला कमीपणाचं होतं. आता त्यांनी शरणागती पत्करलीय तेव्हा आपला आणि त्यांचा संबंध इथे संपला. त्यांना मलयपुत्रांवर सोपवू आणि आपण अयोध्येस परतू.'

'लक्ष्मणा,' राम म्हणाला, 'त्यांच्याशी मला बोलायचंय असं मी म्हणालो.'

'कशाबद्दल बोलणार आहेस तू दादा?' लक्ष्मणाने हट्टानं विचारलं. पुढे तो म्हणाला, 'हे जंगली लोक आहेत. पशू आहेत ते. रुद्रदेवांच्या कोपातून जे काही उरलं त्यापैकी हे आहेत. आपला वेळ त्यांच्यासाठी वाया घालवू नकोस.'

रामचं शरीर जाणवेल न जाणवेल असं ताठरलं, त्याचा श्वास संथ झाला. आपण रागावलो आहोत असा भाव त्यानं चेहऱ्यावर आणला. हे कशासाठी ते लक्ष्मणाच्या लगेच लक्षात आलं. आपल्या भावाच्या एरवी अत्यंत शांत असणाऱ्या मनात खोल कुठेतरी साठत राहिलेला राग होता तो. त्याला हे सुद्धा माहीत होतं की रामाचा हा राग कठोर होता, आता तो कुणाचंही ऐकणार नव्हता. लक्ष्मणानं आपले हात हवेत उंचाऊन आपली नाराजी व्यक्त केली.

अरिष्टानेमीने खांदे उडवले. म्हणाला, 'ठीक आहे, बोल तू त्यांच्याशी. पण आमच्या अनुपस्थितीत तुझं त्यांच्याशी बोलणं योग्य नाही.'

'आपला सल्ला मी लक्षात ठेवेन. धन्यवाद! पण माझा त्यांच्यावर विश्वास आहे.' राम म्हणाला.

ताटका आणि सुबाहूंनी रामचं बोलणं ऐकलं. त्यांना आश्चर्य वाटलं कारण त्यांना कायम शत्रू मानलं जात असे.

अरिष्टानेमींनीसुद्धा मग रामचं म्हणणं मान्य केलं. तरी त्यांनी असुरांना आपल्या मनातली गोष्ट स्पष्ट शब्दांत सुनावलीच. म्हणाले, 'ठीक आहे, आम्ही दूर जातोय. पण आम्ही घोड्यांवर स्वार होऊन युद्धासाठी तयार राहू. संकटाची जरा जरी चाहूल लागली की आम्ही लगेच येऊ आणि तुम्हा सगळ्यांनाच मारून टाकू.'

अरिष्टानेमी परतण्यासाठी वळले, रामने पुन्हा एकदा सूचना दिली, यावेळी ती विशेषतः संरक्षक लक्ष्मणासाठी होती, 'मला एकट्यानं त्यांच्याशी बोलायचंय, लक्ष्मणा.'

'मी तुला त्यांच्यासोबत एकटा सोडून जाणार नाही, दादा.'

'लक्ष्मणा...'

'मी तुला एकटं सोडून जाणार नाही, दादा!'

'ऐक माझ्या भावा, मला थोडा....'

लक्ष्मणानं आपला आवाज उंचावून म्हटलं, 'मी तुला एकटं सोडून जाणार नाही, दादा!'

'ठीक आहे,' शेवटी रामला आपला हट्ट सोडावा लागला.

अरिष्टानेमी आणि मलयपुत्रांचे सैनिक वस्तीच्या सामेपाशी, ओढ्याच्या पुढे जाऊन उभे राहिले. ते सगळे घोड्यांवर स्वार होऊन संकटाची पहिली चाहूल लागता क्षणी राम आणि लक्ष्मणाच्या मदतीला धावून जाण्याच्या तयारीने उभे होते. मध्यवर्ती चौकात एका उंचवट्यावर दोघे भाऊ बसले होते आणि असुर त्यांच्याभोवती जमा झाले होते. सुबाहूच्या जखमी दंडावर पट्टी बांधलेली होती. आपल्या आईच्या -ताटकाच्या– पुढ्यात तो बसला होता.

'तुम्ही सावकाश आत्महत्या करताहात,' राम म्हणाला.

'आम्ही केवळ आमच्या कायद्याचे पालन करत आहोत,' ताटका म्हणाली.

रामच्या कपाळावर नापसंतीच्या आठ्या उमटल्या. त्याने विचारलं, 'मलयपुत्रांवर वरचेवर हल्ला करून तुम्हाला काय मिळतं?'

'आम्हाला त्यांचं रक्षण करायचंय. ते जर आमच्या बाजूला आले, आपल्या खोट्या श्रद्धा जर त्यांनी सोडून दिल्या आणि एकम् ची हाक ऐकली तर त्यांच्या आत्म्याचं रक्षण होईल.'

'म्हणजे वरचेवर हल्ले करून, त्यांच्या धार्मिक कार्यात बाधा आणून आणि त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करून तुम्ही त्यांना वाचवताय असं तुमचं म्हणणं आहे का? '

'होय,' ताटका म्हणाली. त्यावरून तिचा अजब तर्क सोडायला ती तयार नाहीय हे स्पष्टच होतं. पुढे ती म्हणाली, 'आणि खरंच, आम्ही मलयपुत्रांना वाचविण्याचा प्रयत्न करतोय असं नाही, खरं तर हे खुद्द एकम् करतोय! आम्ही फक्त त्याची साधनं आहोत.'

'पण एकम जर तुमच्या बाजूने असेल तर शेकडो वर्षांपासून मलयपुत्रांची भरभराट कशी होत आहे? आणि, तुमच्या एकम् चा अस्वीकार करणारे सप्त सिंधू प्रदेशातील लोक इतकी वर्षे अजेय कसे काय राहिले? तुम्ही असुरांनी पुन्हा एकदा भारतावर विजय का नाही मिळवला? एकम् तुमची मदत का करत नाही?'

'देव आमची परीक्षा पाहातोय, आम्ही त्याच्या मार्गावर अजून पूर्णपणे चालू लागलो नाहीय ना, म्हणून.'

'परीक्षा घेतोय?' रामने विचारलं, 'गेल्या शकडो, नव्हे हजारो वर्षात असुरांतर्फे लढलेल्या सगळ्या लढायांत त्यांना हरवून एकम् त्यांची परीक्षा घेतोय?'

ताटकाने याचं उत्तर दिलं नाही. रामने विचारलं, 'तो तुमची परीक्षा घेत नसेल असा कधी विचार मनात आलाय का? तो तुम्हाला काही शिकविण्याचा प्रयत्न करत असेल कदाचित. काळ-वेळेनुसार आपणही बदलावं हे कदाचित तो तुम्हाला सांगू इच्छीत असेल. एखाद्या डावपेचामुळे जर आपण हारलो तर पुन्हा पुन्हा त्याच डावपेचाच्या आधारे - कधीतरी याचा वेगळा परिणाम निघेल या खुळ्या आशेवर लढत रहाणं हा शुद्ध मूर्खपणा आहे असं शुक्राचार्यांनीसुद्धा सांगितलंय ना?'

'पण या घृणित आणि पतित देवांच्या नियमांचं आम्ही कसं काय पालन करणार? त्यांच्या सर्व गोष्टी सैद्धांतिक स्वरूपात अतिशय उत्तम असतात पण वस्तुतः परिस्थिती नेमकी उलट असते.' ताटका म्हणाली.

'हे 'घृणित आणि पतित देव' आणि त्यांचे वंशज गेली कित्येक शतकं सत्तेवर आहेत,' तावातावानं लक्ष्मण म्हणाला, 'त्यांनी भव्य शहरं उभी केली, एक सुंदर संस्कृती निर्माण केली आणि या काळात कुठेही खिजगणतीत नसलेल्या दरिद्री वस्त्यांमध्ये तुम्ही रहात आलात. यावरून वाटतं की तुम्हा लोकांनाच आपले सिद्धांत आणि वर्तणुक बदलण्याची गरज आहे.'

'लक्ष्मण....' त्याला गप्प रहाण्याची खूण करण्यासाठी आपला हात उंचावत राम म्हणाला.

'याला काही अर्थ आहे का दादा?' लक्ष्मण ऐकून घ्यायला तयार नव्हता, 'कोणत्या भ्रामक जगात रहातात हे लोक? वस्तुस्थिती त्यांना दिसतच नाही की काय?'

'त्यांचा कायदाच त्यांच्यासाठी सगळ्यात मोठं सत्य आहे, लक्ष्मण. पौरुष पद्धतीनुसार जगणाऱ्या पुरुषांसाठी बदल स्वीकारणं अशक्य असतं. ते केवळ आपल्या कायद्यानुसार जगत

असतात. आणि त्यांचा कायदा जर बदलत्या काळानुसार जुळवून घेणारा नसेल तर बदल स्वीकारणं आणि बदलणं त्यांच्यासाठी खूपच कठिण होऊन बसतं. त्याऐवजी ते आपल्या कायद्यातील स्थिरतेला उरी बाळगून जगणं जास्त पसंत करतात. बदलाच्या बाबतीत स्त्रैण संस्कृतीची उदार आणि मुक्त प्रवृत्ती आपल्याला दिसतच नाही उलट ती आपल्याला भ्रष्ट, अस्थिर आणि अतिरेकी वाटते.'

'आपण? आपल्याला?' लक्ष्मणाने भुवया उंचावत विचारलं. रामने आपल्याला पुरुषी संस्कृतीचं प्रतीक मानावं हे त्याला अजिबात पचत नवहतं.

ताटका आणि सुबाहू दोघा भावांमधला संवाद लक्ष देऊन ऐकत होते. सुबाहूनं आपली बंद मूठ छातीवर ठेवत प्राचीन असुर परंपरेनुसार सलाम केला.

रामने लक्ष्मणाला विचारलं, 'धेनुकाचं जे केलं ते चूक होतं असं तुला वाटतं का?'

'आपल्या एकम् च्या परिभाषेशी सहमत नसलेल्या लोकांना असुर जसे मारून टाकतात ते जास्त चूक आहे असं मला वाटतं.'

'याबाबत मी तुझ्याशी सहमत आहे. असुरांची कृत्यं केवळ चुकीची नव्हती तर ती क्रूर होती,' राम म्हणाला, 'पण मी धेनुकाबद्दल बोलत होतो. लोकांनी त्याचं जे केलं ते चूक होतं असं तुला वाटतं का?'

लक्ष्मण काहीही बोलेना.

'उत्तर दे लक्ष्मणा,' राम म्हणाला, 'तुला ते चूक वाटतं का?'

'मी कधीही तुला विरोध करणार नाही हे तुला ठाऊक आहे, दादा...'

'तू काय करतोस किंवा करशील हे मी विचारत नाहीय, तुला याबद्दल काय वाटतं?'

लक्ष्मण गप्प राहिला, पण त्याच्या गप्प राहाण्यातून त्याचं उत्तर काय असावं हे उघड होतं.

'धेनुका कोण?' सुबाहूने विचारलं.

'एक घोर अपराधी. समाजावरील डाग. त्यानं जे केलं त्याची भरपाई पुढले हजारो जन्म त्याचा आत्मा करत राहील,' राम म्हणाला, 'पण कायद्याने त्याच्या मृत्यूची आज्ञा दिलेली नव्हती. शुक्राचार्यांची आज्ञा नसती तर त्यानं कितीही घृणित अपराध जरी केलेला असता तर त्याला फाशी दिली गेली असती का?'

सुबाहूने क्षणभराचाही विलंब न लावता उत्तर दिलं, 'नाही.'

राम लक्षात येईल न येईलसं हसला आणि लक्ष्मणाकडे वळत म्हणाला, 'कायदा सर्वांसाठी समान रूपानं लागू असतो. त्याला कुणीही अपवाद नसतं. आणि कायदा कधीही तोडायचा नसतो, अपवाद केवळ.....'

लक्ष्मण रामापासून थोडा दूर गेला. त्याला खात्री होती की धेनुकाच्या बाबतीत जे घडलं तोच न्याय योग्य होता.

राम असुरांच्या त्या छोट्या समूहाला उद्देशून पुन्हा बोलू लागला, 'मी तुम्हाला काय सांगायचा प्रयत्न करतोय ते समजून घ्या. तुम्ही कायदा मानून चालणारे लोक आहात. तुम्ही पौरुष संस्कृतीनुसार वागता. पण तुमचे कायदे आता फारसे प्रभावी ठरत नाहीत. गेल्या कित्येक शतकांपासून ते नीट चालत नाहीत कारण जग बदललंय. आणि हेच तुम्हाला तुमचं कर्म पुन्हा पुन्हा तुम्हाला सांगायचा प्रयत्न करत आहे. कर्म जर वरचेवर नकारात्मक संकेत देत असेल तर ते तुमची परीक्षा घेत नाहीय, ते तुम्हाला काहीतरी शिकविण्याचा प्रयत्न करतंय. आपल्यातील

शिष्याला जागं करा, एका नव्या शुक्राचार्यांचा शोध घ्या. तुम्हाला एका नव्या पौरुष संस्कृतीची गरज आहे, तुम्हाला नव्या कायद्यांची गरज आहे.'

ताटका बोलू लागली, 'गुरु शुक्राचार्यांनी म्हटलं होतं की योग्य वेळ आली की आपल्याला नव्यानं मार्ग दाखविण्यासाठी त्यांचा पुनर्जन्म होणार आहे.....'

असुरांचा तो समूह बराच वेळ शांत होता.

मग अचानक एकाच वेळी ताटका आणि सुबाहू उठून उभे राहिले. त्यांनी आपल्या मुठी आपल्या छातीवर टेकवून आणि वाकून रामला नमस्कार केला. ही असुरांची परंपरागत पूर्ण सलाम देण्याची पद्धत होती. त्यांच्यामागून त्यांच्या सैनिकांनी आणि त्यानंतर स्त्रिया, मुलं आणि वृद्धांनीसुद्धा ताटका आणि सुबाहूप्रमाणेच रामला वंदन केलं.

रामला मात्र आपल्या छातीवर प्रचंड ओझं आल्याचा भास झाला. त्या ओझ्यानं त्याचा श्वास गुदमरला. गुरु वशिष्ठांचे शब्द त्यांच्या संकल्पशक्तीसह त्याला आठवले. तुझ्यावर खूप मोठी जबाबदारी आहे. तुझं कार्य अत्यंत महत्वाचं आहे. त्या कार्याशी इमान राख. विनम्र रहा, पण आपली जबाबदारी न पेलण्याइतका विनम्र होऊ नकोस.

लक्ष्मण आधी असुरांकडे आणि मग रामाकडे रागाने पाहात राहिला. जे चाललं होतं त्यावर त्याचा विश्वासच बसत नव्हता.

'आपली आम्हास काय आज्ञा आहे, देवा?' ताटकाने विचारलं.

'आज बहुतेक असुर वायुपुत्रांसमवेत भारताच्या पश्चिम सीमेलगत, परीहा नावाच्या ठिकाणी रहातात,' राम म्हणाला, 'माझ्या मते मलयपुत्रांच्या मदतीने तुम्ही तिथे आश्रय घ्यावा.'

'पण मलयपुत्र आमची मदत का म्हणून करतील?'

'मी त्यांना विनंती करेन.'

'तिथे जाऊन आम्ही काय करणार?'

'तुमच्या पूर्वजांनी रुद्रदेवाला जे आश्वासन दिलेलं होतं त्याचं पालन करा. वायुपुत्रांसमवेत तुम्ही भारताचं रक्षण करा.'

'पण आज भारताचं रक्षण करणं म्हणजे देवांचं रक्षण करणंच आहे....'

'हो खरंय ते.'

'पण मग आम्ही त्यांचं रक्षण का करायचं? ते आमचे शत्रु आहेत. ते....'

'तुम्ही त्यांचं रक्षण करा कारण रुद्रदेवांनी तुम्हाला तसा आदेश दिलेला आहे.'

सुबाहूने आपल्या आईचा हात धरून तिला थांबविलं. म्हणाला, 'आपण म्हणाल तसं आम्ही करू, देवा.'

अनिश्चयाने घेरलेल्या ताटकाने आपल्या मुलाच्या मुठीतून झटक्यात आपला हात सोडवून घेतला. ती म्हणाली, 'पण ही आमची पवित्र मातृभूमी आहे. आम्हाला भारतात रहायचे आहे. तिच्या कुशीतून बाहेर गेलो तर आम्ही सुखी होऊ शकणार नाही.'

'कालांतराने तुम्ही परत याल. पण जेव्हा परत याल तेव्हा असुर म्हणून परतणार नाही. असुर जीवनपद्धती आता लोप पावली. तुम्ही एका नव्या रूपात परताल. याबद्दल मी तुम्हाला शपथेवर खात्री देतो.'

# प्रकरण 18

घडलेल्या एकूण घडामोडींमुळे क्रोधी विश्वामित्र रागावतील असं लक्ष्मणाला वाटलं होतं. पण रागावण्याऐवजी त्यांच्या मनात कुतूहल निर्माण झालेलं लक्ष्मणानं पाहिलं. ते प्रभावित झाल्याचंही लक्ष्मणाला जाणवलं. लक्ष्मणाला हे सगळं नीटसं उलगडलं नाही.

पिंपळाभोवती बांधलेल्या पारावर महर्षी पद्मासन घालून बसले होते. त्यांची पावलं दुसऱ्या पायाच्या मांडीवर वरच्या दिशेला तोंड करून ठेवलेली होती. डोक्याच्या मागल्या बाजूला बांधलेली त्यांच्या शेंडीची गाठ जोरात वाहात असलेल्या वाऱ्यानं उडत होती. पांढऱ्या रंगाचं आपलं उत्तरीय त्यांनी उतरवून शेजारी ठेवलेलं होतं.

'बस,' विश्वामित्र म्हणाले, 'मला बहुधा आणखी थोडा वेळ लागेल.'

राम, लक्ष्मण आणि अरिष्टानेमी त्यांच्या आसपास बसले. काही अंतरावर शिस्तीत आणि शांतपणे उभे असलेले असुर त्यांनी पाहिले. त्यांना कुणी बांधून ठेवलेलं नव्हतं. वस्तीतील घाबरलेल्या रहिवाशांच्या सूचना कानांआड करत राम याबाबत खास आग्रही राहिला होता. आणि असुरांना बेड्या किंवा पायबंद घालण्याची काहीही गरज नव्हती हे दिसत होतं. ते अतिशय शिस्तीत उभे होते. आपल्या जागेवरून त्यांच्यापैकी कुणीही हाललं नव्हतं. तरीही सुरक्षिततेचा उपाय म्हणून अरिष्टानेमींनी त्यांच्या भोवती तीस पहारेकरी उभे केले होते.

विश्वामित्र रामला म्हणाले, 'अयोध्येच्या राजकुमारा, तू मला आश्चर्याचा धक्का दिलास. सर्व असुरांना मारून टाकण्याच्या माझ्या आज्ञेचं तू पालन का केलं नाहीस? तुझ्याजवळ या असभ्य लोकांना अचानक एवढं सभ्य बनविणारा एखादा मंत्र आहे का?'

'आत्ता आपण जे म्हणालात त्यावर खुद्द आपलासुद्धा विश्वास नाही हे मला ठाऊक आहे, गुरुजी,' राम शांतपणे म्हणाला, 'असुर असभ्य आहेत असं आपणासही वाटत नाही. आपल्याला तसं वाटणं शक्यही नाही कारण मी आपणास रुद्रदेवांची पूजा करताना पाहिलेलं आहे. आणि रुद्रदेवांचे वंशज असलेल्या वायुपुत्रांना असुर जाऊन मिळालेले आहेत हे मला माहीत आहे. वायुपुत्र आपले कर्मसाथी आहेत. म्हणून मला वाटतं की, आपण आत्ता जे म्हणालात ते केवळ मला उद्युक्त करण्यासाठी होतं. आणि तुम्ही असं का म्हणालात याचं मला आश्चर्य वाटतं.'

इतरांची उपस्थिती विसरून रामवर खिळत विश्वामित्रांची नजर क्षणभर विस्फारली. पण रामच्या प्रश्नावर उत्तरादाखल ते काही बोलले नाहीत. मग त्यांनी विचारलं, 'तुला खरंच या वेडपटांना सोडवण्यात काही अर्थ आहे असं वाटतं का?'

'हा प्रश्न इथे गौण आहे, गुरुजी. त्यांना नष्ट का करायचं हा मुद्दा आहे. त्यांनी कोणता कायदा मोडलाय?'

'त्यांनी माझ्या आश्रमावर कित्येकदा हल्ला केलाय.'

'पण त्यांनी कुणाचीही हत्या केलेली नाही. मागल्या वेळी केलेल्या हल्ल्यात त्यांनी केवळ कुंपणाचा थोडासा भाग जाळला आणि तुमची काही खोदकमाची हत्यारं तोडली. या अपराधासाठी त्यांना मृत्युदंड मिळायला हवा असं एखाद्या स्मृतीतील कायद्यात म्हटलं आहे का? नाही. अयोध्येतील ज्या कायद्यांचं मी नेहमी पलन करतो तो स्पष्टपणे सांगतो की दीन-

दुबळ्यांनी जर कायद्याचं उल्लंघन केलेलं नसेल तर त्यांचं संरक्षण करणं हे समाजातील समर्थ लोकांचं कर्तव्य आहे.'

'पण, मी दिलेली आज्ञा अगदी स्पष्टच होती.'

'माझ्या या स्पष्टवक्तेपणासाठी मलासुद्धा माफ करा, गुरुजी. पण या असुरांना खरोखर जर तुम्हाला मारून टाकायचं असतं तर अरिष्टानेमींनी आपल्यासाठी ते काम अगदी सहज केलं असतं. तुमचे योद्धे प्रशिक्षित आहेत. हे असुर अकुशल आहेत. मला खात्री आहे की, तुम्ही अयोध्येच्या राजकुमारांना या कामासाठी पाचारण केलंत ते अशासाठी की ते आमच्याशिवाय इतर कुणाचं ऐकणार नाहीत याची तुम्हाला पूर्ण खात्री होती. तुम्हाला त्यांच्यामुळे उत्पन्न झालेल्या समस्येवर समोरासमोरचा सामना नको होता तर एखादा व्यावहारिक उपाय हवा होता. अशा रीतीनं मी कायद्याचं पालनही केलेलं आहे आणि आपल्याला खरोखर जे हवं होतं ते सुद्धा साधलेलं आहे. पण एक गोष्ट माझ्या लक्षात येत नाहीय की, आपला नेमका हेतू तुम्ही मला आधी का सांगितला नाही.'

विश्वामित्रांच्या चेहऱ्यावर आधी कधीही न दिसलेला आश्चर्यमिश्रीत आदर भाव झळकत होता. रामने आपल्याला मात दिली असंही त्यांना वाटलं. ते समाधानानं हसले. त्यांनी रामला विचारलं, 'आपल्या गुरूंना तू नेहमी असेच प्रश्न विचारत असतोस का?'

राम काही बोलला नाही. पण न बोलून त्यानं जे उत्तर दिलं होतं ते स्पष्ट होतं. विश्वामित्र नव्हे, वशिष्ठ त्याचे गुरु होते. विश्वामित्रांना हे पद त्याने केवळ आपल्या पित्याच्या सांगण्यावरून दिलं होतं.

'बरोबर आहे तुझं,' रामच्या मौनाकडे दुर्लक्ष करत विश्वामित्र पुढे म्हणाले, 'असुर वाईट लोक नाहीत. फक्त धर्माबाबत त्यांची समज आजच्या समाजाला साजेशी नाहीय. कधी कधी अनुयायी चांगले असले तरी त्यांच्या नेत्यांमुळे त्यांना हार पत्करावी लागते. त्यांना परीहाला पाठविण्याची कल्पना चांगली आहे. कदाचित तिथे त्यांना आपल्या जीवनाचं उद्दीष्ट मिळेल. आपण त्यांना पोहोचविण्याची तयारी करू.'

'धन्यवाद, गुरुवर्य,' राम म्हणाला.

'तुझ्या पहिल्या प्रश्नाचं मी आत्ता लगेच उत्तर देणार नाहीय. नंतर देईन कदाचित,' विश्वामित्र म्हणाले.

दोन आठवड्यांत वायुपुत्रांच्या भारताच्या पश्चिम सीमेपलीकडील छुप्या शहराकडे जाण्यासाठी असुरांसह मलयपुत्रांची एक छोटी तुकडी सज्ज झाली. यादरम्यान असुरांच्या जखमा पूर्णपणे भरून निघाल्या होत्या.

मलयपुत्रांच्या वस्तीच्या प्रवेशद्वाराजवळ विश्वामित्र उभे होते. या प्रवासासाठी सज्ज झालेल्या आपल्या लोकांना ते शेवटच्या काही सूचना देत होते. अरिष्टानेमी, राम आणि लक्ष्मण त्यांच्या शोजारी उभे होते. तेवढ्यात ताटका आणि सुबाहू तेथे पोहोचले. मलयपुत्र आपापल्या घोड्यांवर स्वार होण्यासाठी निघून गेले तेव्हा ताटका आणि सुबाहू विश्वामित्रांजवळ आले.

'धन्यवाद, आपल्या या मदतीबद्दल,' मान लववून आणि हात जोडून विश्वामित्रांना वंदन करत ताटका म्हणाली.

असुर स्त्रीकडून दाखविल्या गेलेल्या या शिष्टाचारामुळे विश्वामित्रांच्या चेहऱ्यावर हसू उमटलं. परवानगी घेण्यासाठी ताटकाची नजर श्रीरामाकडे वळली. रामने हसून आपली संमती दर्शवली.

'तुमचे असुर बांधव पश्चिमेकडे राहातात,' विश्वामित्र ताटकाला म्हणाले, 'ते आपणास संरक्षण देतील. मावळतीच्या दिशेनं जा, तुम्ही त्यांच्या ठिकाणावर पोहोचाल.'

ताटका थोडी ताठरत म्हणाली, 'परीहा काही आमचा देश नव्हे. आमचा देश हा आहे – भारत. देव जितका काळ येथे राहिले तितकाच काळ आम्हीसुद्धा येथे आहोत.'

राम मध्ये पडत म्हणाला, 'आणि योग्य वेळी आपण पुन्हा इथे परताल. पण आता मावळतीच्या दिशेनं जा.'

विश्वामित्रांनी आश्चर्यानं रामकडे पाहिलं, पण ते काही बोलले नाहीत.

'आपण जसं ठरवलं होतं तसं घडून आलं नाही, गुरुजी,' अरिष्टानेमी म्हणाले. विश्वामित्र मलयपुत्रांच्या वस्तीजवळच्या एका तलावाकाठी बसले होते. गुरुजींसोबत असताना नेहमी ते जसे ठेवत असत तशीच आताही त्यांनी आपली तलवार म्यानीतून काढून शेजारी तयार ठेवली होती. वेळ पडलीच तर, कुणी विश्वामित्रांवर हल्ला करण्याचं धरिष्ट्य केलंच तर त्यांना चपळाई करावी लागणार होती.

'पण आपण नाराज वाटत नाहीय,' विश्वामित्र म्हणाले.

आपल्या नेत्याच्या नजरेला नजर देणं टाळून अरिष्टानेमी दूरवर पाहात राहिले. जे बोलायचं होतं ते बोलणं त्यांना थोडं अवघड वाटत होतं. 'खरं सांगायचं तर... गुरुजी... मला तो मुलगा आवडला..... मला वाटतं त्याच्याजवळ....'

डोळे बारीक करून विश्वामित्रांनी अरिष्टानेमींकडे पाहिलं. म्हणाले, 'आपण ज्यांच्याप्रती समर्पित आहोत त्यांना विसरू नका.'

अरिष्टानेमींनी मान तुकवली. ते म्हणाले, 'अर्थात गुरुजी. मी कधी आपल्या आज्ञेबाहेर आहे का?'

काही क्षण तेथे अस्वस्थ शांतता पसरली. विश्वामित्रांनी खोल श्वास घेतला. समोर पसरलेल्या पाण्याच्या विशाल पात्रावर त्यांची नजर स्थिरावली. मग जणू स्वतःशीच बोलत असल्यासारखे ते म्हणाले, 'त्यांच्या वस्तीतच जर असुर त्यांच्याकडून मारले गेले असते तर.... बरं झालं असतं.'

चतुर अरिष्टानेमींनी त्यांना विरोध केला नाही.

विश्वामित्रांनी डोकं हालवलं. पश्चातापदग्धतेचं हसू त्यांच्या ओठांवर आलं. ते पुटपुटले, 'मला मात देण्याचा प्रयत्नही न करणाऱ्या एका मुलानं आज मला मात दिलीय. तो केवळ आपल्या नियमांचं पालन करत होता.... '

'आता आपण काय करायचं?'

'आपण दुसऱ्या योजनेचं पालन करायचं. स्पष्टच आहे, हो ना?'

'दुसऱ्या योजनेबद्दल मला कधीच खात्री वाटली नव्हती, गुरुजी. या गोष्टींवर आपलं पूर्ण नियंत्रण आहे असं मला वाटत नाही....'

विश्वामित्रांनी त्यांना त्यांचं वाक्य पूर्ण करू दिलं नाही. ते मध्येच म्हणाले, 'चुकताय तुम्ही.'

अरिष्टानेमी गप्प राहिले.

‘तो धोकेबाज वशिष्ठ रामचा गुरु आहे. वशिष्ठांवर जोवर रामचा पूर्ण विश्वास आहे तोवर मी रामवर विश्वास टाकू शकत नाही.’

अरिष्टानेमींच्या मनात शंका होत्या पण ते गप्प राहिले. ‘वशिष्ठ’ या विषयावरील सगळ्याच चर्चा धोकादायक ठरतात हे त्यांना ठाऊक होतं.

निर्णय घेतल्यासारखे विश्वामित्र म्हणाले, ‘आपण त्या दुसऱ्या योजनेचं पालन करायचं.’

निर्णय घेतल्यासारखे विश्वामित्र म्हणाले, ‘आपण त्या दुसऱ्या योजनेचं पालन करायचं.’

‘पण आपल्याला त्याच्याकडून असलेल्या अपेक्षा तो पूर्ण करेल का?’

‘त्याला प्रिय असलेल्या कायद्यांचाच आपल्याला त्याच्यावर वापर करावा लागेल. एकदा का हे घडलं की मग त्यानंतर घडणाऱ्या एकूण एक घटना माझ्या नियंत्रणात राहातील. वायूपुत्र चुकताहेत हे माझं म्हणणं बरोबर आहे हे मी त्यांना दाखवून देईन.’

असुर परिहाला जाण्यासाठी निघाले त्याच्या दोन दिवसांनंतरची गोष्ट. आश्रमात चाललेल्या घाई गडबडीमुळे राम-लक्ष्मणांची झोप मोडली. आन्हिकं उरकल्यानंतर ते आपल्या झोपडीतून बाहेर आले. उगवत्या सूर्याची आणि रुद्रदेवांची प्रार्थना करण्यासाठी ते तलावाकाठी निघाले.

अरिष्टानेमीसुद्धा त्यांच्यासोबत निघाले. चालता चालता ते म्हणाले, ‘आपण लवकरच निघू.’

‘आम्हाला सांगितल्याबद्दल धन्यवाद, अरिष्टानेमी,’ राम म्हणाला.

काही लोक एक अतिशय मोठी पेटी अत्यंत काळजीपूर्वक वाहून नेत होते ते रामने पाहिलं. त्या पेटीत कोणतीतरी अत्यंत वजनदार गोष्ट असावी. कारण धातूने बनलेल्या वाहकावर ती लादलेली होती आणि बारा लोक तिचं वजन पेलत चालले होते.

‘हे काय आहे?’ मनात संशय उद्भवल्यानं कपाळावर आठ्या घालत लक्ष्मणाने विचारलं.

‘त्यात जे आहे ते चांगलंही आहे आणि वाईटही,’ रामच्या खांद्यावर हात ठेवत अरिष्टानेमींनी रहस्यमयरीत्या सांगितलं. मग विचारलं, ‘तुम्ही कुठे चालला आहात?’

‘सकाळच्या प्रार्थनेसाठी निघालोय.’

‘मीसुद्धा येतो.’

एरवी दररोज सकाळी अरिष्टानेमी परशुरामांची प्रार्थना करत असत. राम आणि लक्ष्मणासमवेत त्या दिवशी त्यांनी रुद्र-महादेवांची प्रार्थना कायची ठरवलं. शेवटी, सर्व दिव्यत्व एकाच ठिकाणाहून येत असतं.

प्रार्थना संपल्यानंतर तलावाकाठच्या एका मोठ्या दगडावर ते बसले होते.

‘ताटका आणि त्यांच्या जमातीचं परिहामध्ये बस्तान बसेल किंवा कसं याबद्दलचा विचार कधी कधी माझ्या मनात येतो,’ अरिष्टानेमी म्हणाले.

‘नक्कीच त्यांचं बस्तान तेथे नीट बसेल,‘ राम म्हणाला, ‘समोरचा आपल्यापैकीच एक आहे हे एकदा त्यांच्या मनात ठसलं की मग त्यांचं सगळ्यांशी जुळतं.’

त्यांच्यावर ताबा ठेवण्याचा एकमात्र उपाय म्हणजे त्यांना त्यांच्या लोकांसोबत ठेवणं. निदान सध्या तरी केवळ हाच एक उपाय आहे असं दिसतं. एरवी, इतरांशी जुळवून घेणं त्यांना खूप

जड जातं.’

‘त्यांच्या विचारपद्धतीबद्दल मी बराच विचार केला. एकम्बद्दल त्यांच्या ज्या भावना आहेत तिथेच खरी समस्या आहे.’

‘एकम् म्हणजे त्यांचा एक देव?’

‘हो,’ राम म्हणाला, ‘आपल्याला कित्येक वेळा सांगितलं गेलंय की एकम् आपल्या भासमय जगाच्या पलीकडे रहातो. तो निर्गुण आहे. गुणांमुळेच भासमय, अस्थिर जगाची निर्मिती होते ना? ती अशाश्वत, अस्थिर असते कारण वेळेचा कोणताही क्षण शाश्वत नसतो. आणि म्हणूनच त्याला केवळ निराकार नव्हे तर निर्गुणही मानतात हो ना?’

‘अगदी बरोबर,’ अरिष्टानेमी म्हणाले.

‘आणि एकम् जर या सगळ्याच्या पलीकडे असेल तर तो कुणाची बाजू कशी काय घेणार?’ रामने विचारलं, ‘तो जर निराकार असेल तर एखाद्या आकाराबद्दल इतका आग्रही कसा होईल? आणि म्हणून तो कोणत्याही एका गटाचा होणं शक्य नाही. तो सगळ्यांचाच असेल आणि त्याच वेळी तो कुणाचाही नसेल. आणि हे केवळ मानवांच्या बाबतीत नव्हे तर ब्रह्मांडातील प्राणी, वनस्पती, पाणी, धरणी, ऊर्जा, तारे, अवकाश इ. सर्वांबद्दलच आहे. कोण काय विचार करतं, कुणाचा कशावर विश्वास आहे इत्यादींचा प्रश्नच येत नाही. जे काही आहे ते केवळ एकम् मुळे आहे आणि त्यातूनच निर्माण झालेले आहे.’

अरिष्टानेमींना हे पटलं. मान हालवत ते म्हणाले, ‘आकारांनी बनलेलं आपलं जग आणि एकम् चं निराकार जग यातील याच मूलभूत गैरसमजुतीमुळे त्यांना वाटतं की आमचा देव खरा आणि तुमचा देव खोटा. एखाद्या अक्कल असणाऱ्या माणसाला जसं हे कळतं की तो आपल्या मूत्रपिंड आणि आतड्यापैकी एकाला दुसऱ्याहून अधिक पसंती देऊ शकत नाही तसाच एकम् अनेकांमधून केवळ एका जमातीची निवड करू शकत नाही. आणि एकम् चा याहून वेगळा विचार करणं मूर्खपणाचं ठरेल.’

‘बरोब्बर!’ राम म्हणाला, ‘तो जर दुसऱ्याला टाळून माझी बाजू घेणार असेल तर तो एकम् कसा राहील? कधी एकाची बाजू न घेणारा, सर्वांचाच असणारा, निष्ठा किंवा भीतीची अपेक्षा न बाळगणारा, किंबहुना कशाचीही मागणी न करणारा देवच खरा एकम् असू शकतो. कारण एकम् आहे आणि केवळ त्याच्या अस्तित्वातूनच इतर सगळ्यांना अस्तित्व प्राप्त झालेले आहे. ’

अरिष्टानेमींना अयोध्येच्या या बुद्धिमान राजकुमाराबद्दल आदर वाटू लागला होता. पण हे विश्वामित्रांसमोर कबूल करण्याची त्यांना भीती वाटत होती.

राम पुढे म्हणाला, ‘आदर्श पौरुष समाज निर्माण करण्याचा शुक्राचार्यांचा निर्णय योग्यच होता. असा समाज कार्यकुशल, न्यायी आणि आदरणीय असतो. त्यांनी श्रद्धेवर त्याचा पाया ठेवण्याची चूक केली. वास्तविक पाहाता अशा जगाचा पाया त्यांना भौतिक आणि आध्यात्मिक गोष्टींची सरमिसळ होऊ न देता केवळ कायद्याच्या आधारे ठेवायला हवा होता. काळ-वेळ नेहमी बदलतेच आणि ती तशी बदलली की कायदा बदलता येतो पण श्रद्धा बदलणं जड जातं. बदलत्या काळ-वेळेनुसार माणूस अधिकाधिक तीव्रपणे आपल्या श्रद्धेला चिकटत जातो. कठिण काळात माणूस आपल्या श्रद्धांना आणखी चिकटून रहातो. पण पौरुष पद्धत जर कायद्यावर आधारित असेल तर गरज उद्भवल्यानंतर कायदे बदलता येतात. म्हणूनच पौरुष जीवन पद्धतीची निर्मिती कायद्यांच्या आधारे करावी, श्रद्धेच्या पायावर नाही.’

'असुरांना वाचवणं खरंच शक्य आहे असं तुला वाटतं का? भारतात कित्येक असुर रहातात. छोट्या छोट्या गटात ते विभागलेले आहेत, पण आहेत हे नक्की.'

'मला वाटतं ते अतिशय शिस्तप्रिय अन् न्यायी बनतील. ज्यांना मी आपलं मानतो त्या कायदा तोडणाऱ्या, बंडखोर लोकांपेक्षा ते नक्कीच चांगले ठरतील. त्यांचे कायदे आता कालबाह्य झाले आहेत आणि हीच असुरांची खरी समस्या आहे. ते चांगले लोक आहेत. त्यांना फक्त ज्ञानी आणि प्रभावशाली नेतृत्वाची गरज आहे.'

'तू त्यांना हवा असलेला नेता बनू शकतोस असं तुला वाटतं का? तू त्यांच्यासाठी जगण्याची एक नवी रीत तयार करू शकशील?'

रामने खोल श्वास घेतला. म्हणाला, 'माझ्या नशिबात कोणती भूमिका माझ्यासाठी लिहिलेली आहे हे मला माहीत नाही, पण....'

लक्ष्मण मध्येच म्हणाला, 'गुरु वशिष्ठांना वाटतं की, राम दादा पुढचे विष्णू बनणार आहेत. ते केवळ असुरांचंच नव्हे तर संपूर्ण भारताचं नेतृत्व करणार आहेत. माझासुद्धा यावर ठाम विश्वास आहे. राम दादासारखा कुणीही नाही.'

रामने लक्ष्मणाकडे पाहिलं. त्याच्या चेहऱ्यावरच्या भावांबद्दल तर्क लावणं अशक्य होतं.

अरिष्टानेमी थोडे मागे झुकले. त्यांनी खोल श्वास घेतला आणि ते म्हणाले, 'तू एक चांगला माणूस आहेस. खरं तर वेगळाच आहेस. इतिहासात तू महत्वाची कमगिरी बजावशील हे सुद्दा माझ्या लक्षात येतंय. अर्थात, ती भूमिका नेमकी कोणती हे मात्र आत्ता मला माहीत नाही.'

रामचा चेहरा निर्विकारच होता.

'मी तुला एवढंच सांगेन की विश्वामित्र काय म्हणतात ते ऐकून घे,' अरिष्टानेमी म्हणाले, 'आज ते इतर सर्व ऋषींहून बुद्धीमान आणि शक्तीशाली आहेत. आणि या 'इतर' ला अपवाद कुणीही नाही.'

यावरही रामकडून कोणतीही प्रतिक्रिया आली नाही. पण त्याचा चेहरा किंचित ताठरला.

'अपवाद कुणीही नाही,' अरिष्टानेमींनी पुन्हा एकदा हे शब्द उच्चारून त्यांचं महत्व अधोरेखीत केलं. त्यांचा रोख सरळ सरळ वशिष्ठांवर होता.

* * *

ते जंगलातून संथ गतीने चालले होते. काफिल्याच्या पुढे आणि त्या भारी वजनाच्या पेटीच्या थेट मागे विश्वामित्र आणि अरिष्टानेमी होते. राम आणि लक्ष्मणाला काफिल्याच्या शेवटी रहाण्यास सांगितले होते. इतर सर्व मलयपुत्र मध्ये पायी चालत होते. गंगा किनारी उभ्या असलेल्या नौकांपर्यंत पोहोचण्यासाठी त्यांना काही तासांचा अवधी लागणार होता.

विश्वामित्रांनी मानेने खूण करून अरिष्टानेमींना बोलावले. अरिष्टानेमींनी लगेच आपल्या घोड्याचा उजव्या बाजूचा लगाम खेचला आणि ते विश्वामित्रांजवळ आले.

'मग?' विश्वामित्रांनी विचारले.

'त्याला माहीत आहे,' अरिष्टानेमी म्हणाले, 'महर्षी वशिष्ठांनी त्याला आधीच सांगितलंय.'

'तो धोकेबाज, दुतोंड्या, उपरा....'

विश्वामित्रांनी आपल्या रागाला वाट मोकळी करून दिली तेव्हा अरिष्टानेमी दूरवर कुठेतरी पाहात राहिले. त्यानंतर तिथे केवळ धुमसणारी शांतता उरली. शेवटी त्या निष्ठावान अनुयायानं

बोलण्यासाठी बळ एकवटलं, ‘मग, आता काय करायचं, गुरुजी?’

‘जे आपल्याला करावं लागेल ते आपण करायचं,’ विश्वामित्र म्हणाले.

# प्रकरण 19

प्रवाहाच्या दिशेने चाललेल्या त्या तीन जहाजांच्या तांड्यांमधल्या मुख्य जहाजाच्या वरच्या मजल्यावर राम आणि लक्ष्मण उभे होते. प्रवासादरम्यान विश्वामित्र जास्तीत जास्त वेळ आपल्या खोलीत घालवत असत. या संधीचा अरिष्टानेमींनी फायदा घेतला. या मलयपुत्राच्या मनात अयोध्येच्या राजकुमारांविषयी जबरदस्त कुतूहल निर्माण झालं होतं.

‘आज राजकुमार कसे आहेत?’ त्यांच्याजवळ येता येता अरिष्टानेमींनी विचारलं.

रामने त्या दिवशी आपले लांब केस धुतले होते आणि तो ते समुद्रावरल्या खाऱ्या, दमट हवेत सुकवण्याचा प्रयत्न करत होता.

‘या उकाड्यानं हैराण आहेत,’ लक्ष्मण म्हणाला.

अरिष्टानेमी हसले. म्हणाले, ‘प्रवासाला आत्ता नुकती सुरवात झालीय. पाऊस सुरू व्हायला अजून कित्येक महिन्यांचा अवकाश आहे. वातावरण चांगलं होण्याआधी ते बरंच वाईट होणार आहे.’

‘म्हणूनच आम्ही इथे उघड्यावर आलो. कोणताही दुष्काळ देवाकडून मिळालेली देणगीच तर असते!’ लक्ष्मण म्हणाला. बोलताना नाटकीपानं तो आपल्या हातांनी चेहऱ्याला वारा घालत होता. जेवणानंतर इतरही बरेच जण खालच्या भागात जाऊन कामाला लागण्याआधी जहाजाच्या वरच्या भागात फेरफटका मारायला आले होते.

अरिष्टानेमींनी रामच्या जवळ येत विचारलं, ‘आमच्या पूर्वजांबद्दल तू जे काही बोललास ते ऐकून मला आश्चर्य वाटलं. तू देवांविरुद्ध आहेस का?’

कधी ना कधी हा विषय निघणार हे रामला ठाऊक होतं. तो म्हणाला, ‘आपण हा विषय पुन्हा कधी काढणार याची मी वाट पाहात होतो.’

‘आता तुझं वाट पाहाणं संपलं,’ अरिष्टानेमी म्हणाले.

राम हसत म्हणाला, ‘मी देवांविरुद्ध नाही. आम्ही त्यांचे वंशज आहोत. मी पौरुष जीवन पद्धतीचा, त्यांच्या कायदे, आज्ञाधारकपणा, सन्मान आणि न्यायाची पद्धत या सगळ्याचाच प्रशंसक आहे. अनिर्बंध स्वातंत्र्याऐवजी मला नेहमी ही पद्धत जास्त आवडते.’

‘अनुराग आणि स्वातंत्र्याशिवायही स्त्रैण संस्कृतीत इतर बरंच काही असतं, राजकुमार.’ अरिष्टानेमी म्हणाले, ‘स्त्रैण पद्धतीत अनिर्बंध सर्जकतासुद्धा असते.’

‘हो, मान्य आहे मला. पण स्त्रैण पद्धत जेव्हा ऱ्हासोन्मुख होते तेव्हा लोकांमध्ये फुटीरता येते आणि ती समाजातील दुर्बल घटकांसाठी अनिष्टकारी बनते. मुळात जन्मावर नव्हे तर कर्मावर आधारित देवांच्या जातीव्यवस्थेचे नियम मध्यकाळात अतिशय कठोर बनले. त्यांच्यावर जातीयतेचा आणि राजकारणाचा पगडा बसला. यामुळेच असुरांकडून त्यांचा सहज पराभव झाला. उत्तरकालीन देवांनी जेव्हा सुधारणा घडवून आणल्या आणि जातीय व्यवस्थेला लवचिक बनवलं तेव्हा सत्ता पुन्हा त्यांच्या ताब्यात आली. ते बळकट बनले. त्यांनी पुन्हा असुरांचा पराभव केला.’

‘हो, पण पौरुष पद्धतसुद्धा उतरत्या काळात कठोर आणि कर्मठ बनते. केवळ एकम् बद्दलची

देवांची व्याख्या वेगळी होती म्हणून असुरांनी देवांवर क्रूर हल्ले केले आणि अर्थातच हे माफ करण्यायोग्य नाही.'

'मान्य आहे मला. पण या हल्ल्यांमुळे देवांना एकत्र आणलं की नाही? त्या भयानक हिंसाचारातून काही सकारात्मक गोष्टीसुद्धा घडल्या हे देवांनी मान्य करायला हवं. जाती व्यवस्थेमुळे निर्माण झालेल्या वाईट गोष्टींचा सामना त्यांना करावा लागला. आपल्यात एकी असायला हवी हे त्यांना समजलं. माझ्या मते, इंद्रदेव त्यानंतर सहज एक सुधारणा घडवून आणू शकले. त्यांनी पुन्हा जातीय व्यवस्था लवचिक बनवली. त्यानंतरच्या युगातील एकत्रित आलेल्या देवांनी असुरांचा पराभव केला आणि त्यावेळी आपल्या धार्मिक कट्टरतेमुळे असुरांचा पराभव झाला.'

'म्हणजे, त्या क्रूर हिंसेबद्दल देवांनी असुरांप्रती कृतज्ञ असायला हवं असं तुझं म्हणणं आहे का?'

'नाही, मला असं सुचवायचं नाहीय,' राम म्हणाला, 'मला फक्त एवढंच म्हणायचं आहे की, अत्यंत भयानक घटनांमधूनसुद्धा काहीतरी चांगलं निपजू शकतं. प्रत्येक वाइटात काहीतरी चांगलं दडलेलं असतं तसंच प्रत्येक चांगल्यात काहीतरी वाईट दडलेलं असतं. जीवन अतिशय क्लिष्ट, गुंतागुंतीचं आहे. केवळ समतोल व्यक्तीच जीवनाच्या दोन्ही बाजू पाहू शकते. उदाहरणार्थ, असुरांचा अनुभव जुना आणि विस्मृत झाल्यामुळे आज समाजात पुन्हा जातीव्यवस्था कठोर झाली आहे ना? आज पुन्हा माणसाचं समाजातील स्थान त्याच्या जन्मानुसार ठरवलं जातंय. त्याच्या कर्मानुसार नाही. यामुळे सप्तसिंधूच्या महत्वाला ग्रहण लागलंय असं तुम्हाला वाटत नाही का?'

'ठीक आहे!' लक्ष्मण म्हणाला, 'पुरे झाली ही तात्विक चर्चा. डोकं फुटायची वेळ आली!'

अरिष्टानेमी खळखळून हासले. राम कौतुकानं आपल्या छोट्या भावाकडे पाहात राहिला.

'सुदैवानं आपण अयोध्येत पोहोचू त्याआधी हे सगळं संपेल,' लक्ष्मण म्हणाला.

'हं हं' अरिष्टानेमी म्हणाले, 'अयोध्येत पोहोचायला आणखी थोडा वेळ लागेल राजकुमार.'

'म्हणजे काय?' रामने विचारलं.

'अयोध्येला परतण्याआधी विश्वामित्रांना मिथिला नगरीत जायचं आहे. तिथे त्यांचं महत्वाचं काम आहे.'

'आणि हे तुम्ही आम्हाला कधी सांगणार होतात?' लक्ष्मणने थोड्या नाराजीनेच विचारलं.

'आत्ता सांगतोय ना!' अरिष्टानेमी म्हणाले.

लक्ष्मणाला धीरानं घ्यायची खूण करत राम म्हणाला, 'ठीक आहे, अरिष्टानेमी. गुरु विश्वामित्रांना सगळं आलबेल वाटेपर्यंत आम्ही त्यंच्याबरोबर रहायचं असं आमच्या वडिलांनी आम्हाला सांगितलंय.'

'मिथिला....' लक्ष्मण करवादला, 'ते नष्टप्राय शहर!'

सप्तसिंधू प्रदेशातील इतर मोठ्या शहरांहून मिथिला नगरी वेगळी होती. राजा मिथिंनी ती वसविली होती. इतर मोठ्या शहरांप्रमाणे मिथिला नदीकिनारी वसलेलं शहर नव्हतं, म्हणजे, गंडकी नदीनं आपला प्रवाह पश्चिम दिशेला वळविल्यानंतर ते तसं राहिलं नव्हतं. नदीचं पात्र पश्चिमोन्मुख झाल्यानं मिथिला नगरीचं भाग्य पालटलं. सप्त सिंधू प्रदेशातील महत्वाच्या शहरांमधून तिचं स्थान झपाट्यानं खाली गेलं. भारतातील बहुतेक व्यापार नदीच्या घाटांवरून

केला जात असे. गंडकीने आपला प्रवाह बदलला आणि एका रात्रीत मिथिलेचं भाग्य रसातळाला गेलं. रावणाच्या चतुर व्यापाऱ्यांनी मिथिलेत नेमलेल्या व्यापाऱ्यांकडून आपलं प्रतिनिधित्व काढून घेतलं. मोठ्या प्रमाणावर चालणारा व्यापार अत्यंत किरकोळ स्तरापर्यंत आला आणि त्यामुळे मिथिलेतील त्यांचे अस्तित्व अत्यंत नगण्य झाले.

जनक मिथिलेचे राजे होते. ते अत्यंत सभ्य, समर्पित आणि आध्यात्मिक प्रवृत्तीचे गृहस्थ होते. ते एक आदर्श व्यक्ती होते, अर्थात्, राजा म्हणून नव्हे. ते जर आध्यात्मिक गुरु असते तर जगातील सर्वश्रेष्ठ आध्यात्मिक गुरु ठरले असते. पण नशिबानं त्यांना राजेपद दिलं होतं. राजा म्हणून त्यांनी आपल्या प्रजेच्या आत्मिक उन्नतीसाठी आपल्या धर्मसभांमधून पुरेपूर प्रयत्न केले होते. पण आर्थिक प्रगती आणि सुरक्षितता इत्यादी महत्वाच्या गोष्टी प्रचंड दुर्लक्षित झाल्या होत्या.

मिथिला नगरीच्या दुर्भाग्यात भर म्हणून की काय राज्याची सूत्रं निश्चितपणे जनकचे छोटे भाऊ कुशध्वज यांच्या हाती गेली होती. गंडकी नदीचा बदललेला प्रवाह सांकष्यच्या सीमेपर्यंत गेला होता. आणि सांकष्यचे राजेपद कुशध्वजांकडे होते. मिथिलेचं झालेलं नुकसान सांकष्यच्या पदरात भाग्याच्या रूपात पडलं होतं. पाण्याच्या सहज उपलब्धतेमुळे व्यापाराची भरभराट तर झालीच होती शिवाय सांकष्यच्या लोकसंख्येतही बेसुमार वाढ झाली होती. पैसा आणि मनुष्यबळाच्या उदंड वाढीच्या बळावर कुशध्वजांनी सप्तसिंधू प्रदेशात स्वतःला आपल्या राजकीय कुटुंबाच्या प्रतिनिधीच्या रूपात स्थापित केलं होतं. अधून मधून मिथिलेला भेट देऊन त्याने आपसातील भेद उघड न होऊ देण्याची खबरदारी घेतली असली तरी हे केवळ वरकरणी असून कुशध्वज मिथिलेला आपल्या राज्यात सामील करून घेण्याच्या प्रयत्नांत असल्याची वदंता होती.

'गुरुजींची तशी इच्छा असेल तर आपण तिकडेच जाऊ लक्ष्मण,' राम म्हणाला, 'सांकष्यहून आपल्याला मार्गदर्शकाची गरज लागेल, हो ना? सांकष्यहून मिथिलेकडे जाणारा रस्ता ठीक नाहीय असं मी ऐकून आहे.'

'आधी एक रस्ता होता,' अरिष्टानेमी म्हणाले, 'पण नदीने दिशा बदलली तेव्हा तो तिच्या पात्राखाली गेला. पुन्हा रस्ता बांधण्याचा प्रयत्न केला गेला नाही. मिथिलेकडे..... धन नाही. त्यांच्या पंतप्रधानांना सूचना पाठवली आहे, त्या करतील मार्गदर्शक पथकाची व्यवस्था.'

'राजा जनकांची मुलगी पंतप्रधान आहे हे खरंय का?' लक्ष्मणाने विचारलं, 'आमचा यावर विश्वासच बसत नाहीय. तिचं नाव उर्मिला आहे का?'

अरिष्टानेमींकडून उत्तर येण्याआधी रामनं विचारलं, 'एक स्त्री पंतप्रधान आहे यावर विश्वास ठेवणं जड का जातंय लक्ष्मणा?' पुढे तो म्हणाला, 'पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांची बौद्धिक क्षमता असते.'

'मला ठाऊक आहे, दादा,' लक्ष्मण म्हणाला, 'पण हे असामान्य आहे, एवढंच.'

'मोहिनीसुद्धा स्त्रीच होत्या,' राम म्हणाला, 'आणि त्या विष्णू होत्या हे लक्षात ठेव.'

लक्ष्मण गप्प राहिला.

अरिष्टानेमींनी लक्ष्मणाच्या खांद्याला स्पर्श करत म्हटलं, 'बरोबर आहे तुझं, राजकुमार लक्ष्मण. राजा जनकांची मुलगीच त्यांची पंतप्रधान आहे हे खरंय. पण त्यांची खरी मुलगी राजकुमारी उर्मिला नव्हे, तर त्यांची दत्तक कन्या या राज्याची पंतप्रधान आहे.'

‘दत्तक कन्या?’ रामने आश्चर्याने विचारले. त्या काळी दत्तक मुलांना समान हक्क क्वचितच दिले जात असत. रामने कायद्यात बदल घडवून ही बाब ठीक करण्याचा निर्णयसुद्धा घेतला होता.

‘होय!’ अरिष्टानेमी म्हणाले.

‘मला याची जाणीव नव्हती. नाव काय आहे तिचं?’

‘तिचं नाव आहे, ‘सीता’.’

‘आपण सांकष्यच्या राजाला भेटायला जाणार नाही का?’, रामने विचारलं.

शहरापासून काही किलोमीटर्सच्या अंतरावर असलेल्या सांकष्य बंदराला विश्वामित्रांच्या नावा येऊन लागल्या तेव्हा मिथिलेची नगर सुरक्षा आणि शिष्टाचार अधिकारी समीची आपल्या प्रतिनिधीमंडळासोबत त्यांच्या स्वागतासाठी तेथे उपस्थित होत्या. समीची आणि त्यांचे सोबती 100 मलयपुत्रांच्या छोट्या तुकडीला घेऊन मिथिलेला परतणार होते. विश्वामित्रांसोबत आलेले इतर लोक नांगरलेल्या नावांवर मागेच रहाणार होते.

‘नाही,’ आपल्या घोड्यावर स्वार होता होता अरिष्टानेमी म्हणाले, ‘विश्वामित्रांना अज्ञात राहून हे शहर ओलांडायचंय. राजा कुशध्वज सध्या प्रवासात आहेत आणि त्यांची इकडे फिरकण्याची शक्यता आहे.’

रामला आणि त्याला घालायला दिलेल्या साध्या शुभ्र वस्त्रांचे लक्ष्मणाने निरीक्षण केले. वस्त्र सामान्य होते म्हणजे, राजकुमार साध्या वेषात नगरप्रवेश करणार होते.

‘गुप्त रूपाने?’ लक्ष्मणाने विचारले, त्याची नजर 100 मलयपुत्रांवर गेली. टोमणा मारत तो म्हणाला, ‘खरंच, मला अजिबात कळलं नसतं.’

अरिष्टानेमी हसले. त्यांनी आपले गुडघे आतल्या बाजूला आवळले. संकेत मिळाल्याबरोबर त्यांचा घोडा पुढे निघाला. राम आणि लक्ष्मणसुद्धा आपापल्या घोड्यांवर स्वार होऊन त्यांच्यामागून निघाले. विश्वामित्र आधीच निघून गेले होते. ते या तांड्याच्या पुढे समीची सोबत होते.

जंगलातील वाट इतकी अरुंद होती की एकावेळी केवळ तीन घोडे चालू शकत होते. अधून मधून जुना दगडी रुंद मार्ग लागत असे. पण बहुतेक भागातील रस्त्यांवर जंगलवाढीने अतिक्रमण केलेलं होतं. त्यामुळे कित्येकदा बरंच अंतर घोड्यांना एकामागे एक चालून कापावं लागत होतं.

‘तुम्ही याआधी मिथिलेला भेट दिली नाहीय, हो ना?’ अरिष्टानेमींनी विचारलं.

‘नाही, कधी तशी गरज उद्भवली नाही,’ राम म्हणाला.

‘काही महिन्यांआधी तुमच्या भावाने, भरतने, सांकष्यला भेट दिली होती.’

‘अयोध्येच्या परराष्ट्र नीतीसंबंधी कार्याचा तो प्रमुख आहे. त्यामुळे सप्तसिंधू प्रदेशातील राजांशी त्याच्या भेटी-गाठी होणं स्वाभाविक आहे.’

‘अच्छा? मला वाटलं तो राजा कुशध्वजांना विवाह संबंधांच्या संदर्भात भेटला असावा.’

लक्ष्मणाच्या कपाळावर नापसंतीदर्शक आठ्या पसरल्या. तो म्हणाला, ‘विवाहसंबंधांच्या

संदर्भात? अयोध्येला जर वैवाहिक संबंध जोडायचे झाले तर अधिक बलशाली राज्यांशी ते जोडतील. सांकष्यसारख्या राज्यांशी ते का मैत्री करतील?'

'बहुविवाह संबंधांपासून आपणास कुणी रोखू शकत नाही. व्यक्तीगत बंध मजबूत करून राजनैतिक मैत्री दृढ करण्यासाठी विवाह केला जातो असं काही लोकांचं म्हणणं आहे.'

लक्ष्मणानं रामकडे एक चोरटा कटाक्ष टाकला.

'काय झालं?' अरिष्टानेमींनी विचारलं, 'तुला पटत नाहीय का?' लक्ष्मणाने रामकडे टाकलेला चोरटा कटाक्ष त्यांच्या नजरेतून सुटला नव्हता.

लक्ष्मण म्हणाला, 'रामला वाटतं, विवाह पवित्र असतो. त्याचा राजकीय मैत्रीसाठी वापर करू नये.'

अरिष्टानेमींनी भुवया उंचावल्या. ते म्हणाले, 'पुरातन काळी असंच होतं. हो. पण आता या गोष्टींवर कुणाचाच विश्वास उरलेला नाहीय.'

'आपल्या पूर्वजांनी केलेल्या सगळ्याच गोष्टींचा मी पुरस्कर्ता नाहीय,' राम म्हणाला, 'पण काही गोष्टी पुनरुज्जीवित करण्यायोग्य आहेत. त्यापैकी एक म्हणजे विवाहसंबंधांकडे दोन व्यक्तींमधील पवित्र भागीदारीच्या रूपाने पाहाणे. विवाह म्हणजे दोन शक्तीकेंद्रांमधील राजनैतिक संबंध नव्हेत.'

'जे मोजके लोक असं समजतात तू त्यांच्यापैकी एक आहेस असं दिसतंय.'

'याचा अर्थ मी चूक आहे असा होत नाही.'

लक्ष्मणाने पुन्हा संवादात भाग घेत म्हटले, 'दादाला असंही वाटतं की, पुरुषाने फक्त एका स्त्रीशी विवाह करावा. त्याला वाटतं की बहुविवाह पद्धतीमुळे स्त्रियांवर अन्याय होतो आणि म्हणून त्यावर बंदी घातली पाहिजे.'

'मला नेमकं असं वाटत नाही, लक्ष्मणा,' राम म्हणाला, 'माझं म्हणणं असं आहे की कायदा सगळ्यांच्या बाबतीत सारखा असायला हवा. जर एका पुरुषाला अनेक स्त्रियांशी विवाह करण्याची परवानगी असेल तर एखाद्या स्त्रीची इच्छा असेल तर तिलासुद्धा अनेक पुरुषांशी विवाह करण्याची परवानगी असायला हवी. आजचा कायदा पुरुषधार्जिणा आहे. हे चूक आहे. पुरुषांच्या बहुविवाहपद्धतीला त्याची मान्यता आहे पण स्त्रियांच्या बहुविवाहपद्धतीला नाही. हे चूक आहे. माझं मत सांगायचं झालं तर, मला असं वाटतं की पुरुषानं एक स्त्री शोधावी आणि जन्मभर तिच्याशी ईमान राखावं.'

'ब्रह्मदेवाला धन्यवादच दिले पाहिजेत की तुझ्या मते पुरुषाने कित्येक जन्मांपर्यंत एकाच स्त्रीशी इमान राखावं असं नहीये,' अरिष्टानेमींनी चेष्टा केली.

राम हसला.

'पण राजकुमार राम,' अरिष्टानेमी म्हणाले, 'तुला ठाऊकच असेल की काही शतकांपूर्वीच पुरुषांच्या बहुविवाहपद्धतीची सुरवात झाली. आपण सूर्यवंशी आणि चंद्रवंशीयांमध्ये 50 वर्षांपर्यंत चाललेल्या युद्धातून वाचलेलो आहोत. हजारो लोक या युद्धादरम्यान मरण पावले. पुरेसे वर उरले नव्हते म्हणून पुरुषांना एकाहून अधिक स्त्रियांशी विवाह करण्याची मुभा देण्यात आली. स्पष्टच सांगायचं तर आपल्या देशाची लोकसंख्या वाढायला हवी होती. त्यानंतरच अधिकाधिक लोकांनी बहुविवाह पद्धतीचा स्वीकार केला.'

'पण आता आपल्यापुढे तशी समस्या नाहीय ना?' रामने विचारले, 'मग पुरुषांनी ही मुभा

कायम राखण्याचे कारण काय?'

अरिष्टानेमी गप्प राहिले. काही क्षणांनंतर त्यांनी रामला विचारलं, 'तू फक्त एकाच स्त्रीशी विवाह करू इच्छितोस का?'

'हो,' राम म्हणाला, 'आणि मी जीवनभर तिच्याशी इमान राखून राहीन. दुसऱ्या स्त्रीकडे मी पाहाणारही नाही.'

'दादा,' लक्ष्मण गालात हसत म्हणाला, 'तू इतर स्त्रियांकडे पाहाणं कसं टाळशील? स्त्रिया सगळीकडेच असतात. प्रत्येक वेळी स्त्री समोर आली की तू डोळे मिटणार आहेस का?'

राम हसला. म्हणाला, 'मला काय म्हणायचंय ते तुला समजलंय. माझ्या पत्नीकडे मी ज्या नजरेने पाहीन तसा मी इतर स्त्रियांकडे पाहाणार नाही.'

अरिष्टानेमींना हे फारच चित्तवेधक वाटत होतं. त्यांनी रामला विचारलं, 'स्त्रीमध्ये काय गुण असावेत असं तुला वाटतं?'

राम बोलणार तेवढ्यात लक्ष्मण म्हणाला, 'नाही, नाही, नाही. या प्रश्नाचं उत्तर मला द्यावं लागेल.'

अरिष्टानेमी गंमतीने हसत लक्ष्मणाकडे पाहात राहिले.

'एकदा दादा म्हणाला होता,' लक्ष्मण म्हणाला, 'की जिला पाहून आदरानं मान लवेल अशी स्त्री त्याला हवी.'

बोलून झाल्यावर लक्ष्मणाला मोठा अभिमान वाटला. आपल्या भावाच्या मनातली एवढी खाजगी गोष्ट आपण जाणतो हे त्याला खूप छान वाटत होतं.

अरिष्टानेमींनी गोंधळलेली नजर रामवर सथिर करत विचारलं, 'डोकं आदरानं झुकवणारी?'

राम काही बोलायला तयार नव्हता.

अरिष्टानेमी समोर पाहात राहिले. रामला जिच्याबद्दल आदर वाटेल अशा एका स्त्रीला ते ओळखत होते.

# प्रकरण 20

आठवड्याभरानंतर विश्वामित्र आणि त्यांचा लवाजमा मिथिला नगरीत पोहोचला. दलदलीची आणि पाणथळ जमीन असल्याकारणाने आणि पावसाचे भरपूर पाणी मिळत असल्याकारणाने मिथिला नगराच्या आसपासची जमीन अत्यंत सुपीक होती. मिथिलेच्या शेतकऱ्यांनी जरी मुठभर दाणे टाकले तरी महिन्याभरानंतर पीक तयार असे असं म्हणत. इतकी तेथील जमीन सुपीक होती. अर्थात मिथिलेच्या शेतकऱ्यांनी शेतीसाठी जमीन तयार केली नव्हती आणि ते फारसं बियाणंही फेकत नसत. त्यामुळे या नैसर्गिक कृपेचा उपयोग जंगलानंच पुरेपूर करून घेतला होता. मिथिला नगरीभोवती अगदी घनदाट जंगल होतं. कोणतीही मोठी नदी तेथून वहात नसल्यानं मिथिला नगरी जगाशी तुटली होती. नद्यांमुळे एकमेकांच्या संपर्कात असणाऱ्या भारतातील जवळ जवळ इतर सर्व प्रमुख शहरांपासून ती वेगळी पडली होती.

‘आपण नद्यांवर एवढे विसंबून का आहोत?’, रामने विचारलं, ‘आपण रस्ते का नाही बांधत? मिथिलेसारखे शहर असं इतर शहरांपासून वेगळं पडायला नकोय.’

‘कधीकाळी चांगले रस्ते होते इथे,’ अरिष्टानेमी म्हणाले, ‘वाटल्यास तू ते पुन्हा तयार करवून घेऊ शकशील.’

हा तांडा जंगलातून पुढे चालला असता सुरक्षिततेसाठी कधीकाळी बांधलेला खंदक त्यांना दिसला. आता तो तलावात बदलला होता. लोक या तलावातून पाणी भरत असत. हा तलाव संपूर्ण शहराला वेढा घालून होता. त्यामुळे मिथिला नगरीला द्वीपाचं स्वरूप आलं होतं. या तलावात मगरींसारखे प्राणी नव्हते कारण आता या खंदकाचा संरक्षणासाठी किंवा सैनिकी कार्यासाठी वापर केला जात नसे. पाण्यापर्यंत सहज पोहोचता यावं म्हणून तलावाच्या किनाऱ्यावर पायऱ्या बांधलेल्या होत्या. मोठमोठ्या चक्क्या तलावातून पाणी उपसत आणि ते पाणी संपूर्ण शहरातून खेळवलं जाई.

हे सगळं पाहून लक्ष्मण म्हणाला, ‘खंदकातील पाण्याचा संपूर्ण नगरासाठी पाण्याच्या मुख्य स्त्रोतासारखा उपयोग करणं हा शुद्ध वेडेपणा आहे,’ लक्ष्मण म्हणाला, ‘नगराला वेढा घालणारं शत्रुसैन्य सगळ्यात आधी नगराचा पाणी पुरवठा खंडित करतील, किंवा याहून वाईट म्हणजे, ते या पाण्यात विष कालवतील.’

‘बरोबर आहे तुझं,’ अरिष्टानेमी म्हणाले, ‘मिथिलेच्या पंतप्रधानांच्या लक्षात ही बाब आली म्हणूनच त्यांनी नगराच्या मध्यभागी एक छोटा पण खोल तलाव बनविला आहे.’

तलावाच्या अलीकडच्या किनाऱ्याजवळ राम, लक्ष्मण आणि अरिष्टानेमी घोड्यावरून उतरले. त्यांना शहरात प्रवेश करण्यासाठी तराफ्याच्या पुलावरून पलीकडे जावं लागणार होतं. तराफ्याचा पूल बहुधा समान आकाराचे ओंडके एकाला एक जोडून बांधून तयार केलेला असतो. तो हालता पूल असतो. त्यामुळे त्यावरून जाताना पायउतार होऊन घोड्यासोबत चालत जाणंच अधिक श्रेयस्कर ठरतं.

अरिष्टानेमींनी उत्साहानं विषद करून सांगितलं, ‘इतर प्रकारच्या पुलांपेक्षा हा पूल बनविणं स्वस्तात पडतंच, शिवाय नगरावर हल्ला झालाच तर हा पूल सहज नष्ट करता येतो. इतकंच

नव्हे तर, तोडलेला पूल तितक्याच सहजपणानं पुन्हा बांधताही येतो.'

रामने मान हालवत त्यांचं बोलणं ऐकून घतलं. त्याला एका गोष्टीचं आश्चर्य वाटत होतं की अरिष्टानेमी मिथिला नगरीबद्दल एवढी माहिती का देताहेत? शहर एकूणच अत्यंत गरीब वाटत होतं. त्या नगरीकडे या तात्पुरत्या पुलाऐवजी कायमचा पूल बांधण्याएवढी संपत्तीसुद्धा नाही का?

अर्थात, आज लंकेव्यतिरिक्त भारतातील कोणते राज्य श्रीमंत आहे? लंकेतील लोकांनी आमचं सगळं सोनं नेलं.

पूल ओलांडून ते मिथिलेच्या तटबंदीतील दारासमोर पोहोचले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या दारावर कोणतीही घोषणा किंवा राजकीय कुटुंबाला अभिमानस्वरूप सैनिकी निशाणी असलेलं चित्र रंगविलेलं किंवा कोरलेलं नव्हतं. त्याऐवजी दारावर विद्येची देवता सरस्वतीदेवीची मोठी प्रतिमा लावली होती. दारावर अर्ध्या भागात ती कोरलेली होती त्याखाली दोन ओळी लिहिल्या होत्या-

स्वगृहे पूज्यते मूर्खा; स्वग्रामे पूज्यते प्रभुः

स्वदेशे पूज्यते राजा; वद्वान सर्वत्र पूज्यते.

मूर्खाची पूजा त्याच्या घरी केली जाते, प्रमुख आपल्या खेड्यात पुजला जातो, राजाची पूजा त्याच्या नगरात केली जाते आणि बुद्धीमानाची पूजा सर्वत्र केली जाते.

राम हसला. विद्येला समर्पित आहे हे शहर.

'नगरीत प्रवेश करायचा का?' अरिष्टानेमींनी घोड्याचा लगाम खेचून चाबूक फटकारत विचारलं. बोलता बोलता ते पुढे निघालेसुद्धा!

रामने मानेनेच लक्ष्मणाला संकेत केला. तेसुद्धा निघाले.

तिघांनी नगरप्रवेश केला.

दारापलीकडे एक साधा सरळ रस्ता होता जो पुढे आणखी एका भिंतीतील दाराकडे जात होता. तो दरवाजा बाहेरील भिंतीतील दारापासून साधारण एक किलोमीटर्सच्या अंतरावर होता. या दोन भिंतींमधील रस्त्याव्यतिरिक्तची जागा नीट विभागलेल्या शेतजमिनीची होती. त्या शेतांतील पिके कापणीसाठी तयार उभी होती.

'उत्तम,' राम म्हणाला.

'होय दादा, किल्याच्या दोन भिंतींमध्ये पीक घेतल्याने शहराचा अन्नपुरवठा सुरक्षित होतो,' लक्ष्मण म्हणाला.

'त्याहून महत्वाचं म्हणजे, इथे मनुष्यवस्ती नाही. त्यामुळे बाहेरील तटबंदीची भिंत ओलांडून येणाऱ्या शत्रू सैन्याला गारद करण्यासाठी ही जागा उत्तम आहे. तटबंदीच्या दुसऱ्या भिंतीपर्यंत पोहोचण्यासाठी शत्रूसैन्याला बरेच सैनिक गमवावे लागतील आणि पटकन माघारही घेता येणार नाही. सैनिकक्षेत्राच्या दृष्टीने ही रचना उत्तमच आहे. नगराला वेढून असणारी मनुष्यवस्तीरहित रिकामी जागा. दादा, आपल्याला अयोध्येतही अशी रचना करायला हवी.'

किल्याच्या दुसऱ्या भिंतीनजीक येता येता अरिष्टानेमींनी आपल्या चालण्याचा वेग वाढवला.

'त्या समोर दिसताहेत त्या खिडक्या आहेत का?' आतील तटबंदीच्या भिंतीतील वरच्या भागाकडे संकेत करत लक्ष्मणाने विचारलं.

'होय,' अरिष्टानेमी म्हणाले.

'म्हणजे येथील लोक दुर्गाच्या भिंतीचा आपल्या घरासारखा उपयोग करतात?' आश्चर्य वाटल्याने लक्ष्मणाने विचारलं.

'होय,' अरिष्टानेमी म्हणाले.

'ओह!' खांदे उडवत लक्ष्मण म्हणाला.

समोर पाहाणाऱ्या अरिष्टानेमींच्या चेहऱ्यावर हसू पसरलं.

'अरे हे काय!' लक्ष्मण अचानक उद्गारला. मिथिला नगरीची दुसरी तटबंदी ओलांडताच त्याच्या तोंडून हे उद्गार निघाले होते. तो जागीच उभा राहिला. त्याचा हात तलवारीवर गेला. तो म्हणाला, 'आपल्याला सापळ्यात अडकवलंय!'

'शांत हो राजकुमार,' हसत अरिष्टानेमी म्हणाले, 'हा सापळा नाहीय. मिथिला नगरी अशीच आहे.'

दुसरी तटबंदी ओलांडल्यानंतर ते एका सलग भिंतीच्या मोठ्या इमारतीसमोर पोहोचले होते. एकाला एक लागून असलेल्या घरांची ती सामाईक भिंत होती. मधमाशांच्या पोळ्यासारखी तेथली घरे एकमेकांना अगदी खेटून बांधलेली होती. दोन घरांमध्ये अजिबात मोकळी जागा नव्हती. प्रत्येक घराच्या भिंतीत वरच्या बाजूला एक खिडकी ठेवण्यात आलेली होती. पण रस्त्याच्या बाजूनेसुद्धा कोणत्याही घराला दार नव्हतं. त्यामुळेच पुढे कुठेही न जाता येणाऱ्या भिंतीपाशी आपण पोहोचलो आहोत किंवा दबा धरून बसलेल्या सैनिकांच्या सापळ्यात अलगद येऊन पडलो आहोत असं लक्ष्मणाला वाटलं होतं. शिवाय विश्वामित्रांचा लवाजमासुद्धा कुठेतरी गायब झाला होता. त्यामुळेसुद्धा लक्ष्मणाला असं वाटणं साहजिक होतं.

'रस्ते कुठे आहेत?' रामने विचारलं.

सगळीच घरं एकमेकांना खेटून असल्यामुळे तिथे रस्त्यांनाच काय, पायवाटांनाही पुरेशी जागा नव्हती.

'माझ्या मागून या,' अरिष्टानेमी म्हणाले. त्या दोघांचा उडालेला गोंधळ पाहून त्यांना गंमत वाटत होती. एका घराच्या इमारतीत बनलेल्या दगडी पायऱ्यांवर त्यांनी आपले घोडे घातले.

'तुम्ही त्या घराच्या छतावर का जाताय?! आणि आपल्या घोड्यांना घेऊन जाताय?' लक्ष्मण उद्गारला.

'राजकुमार, माझ्या मागोमाग या,' अरिष्टानेमी शांतपणे म्हणाले.

धीर देण्यासाठी जणू रामने लक्ष्मणाची पाठ थोपटली. अनिच्छेनं लक्ष्मणसुद्धा आपल्या घोड्याला घेऊन अरिष्टानेमींमागोमाग दगडी पायऱ्या चढू लागला. ते जेव्हा छतावर पहोचले तेव्हा तेथील दृश्य त्यांच्या कल्पनेपलीकडचे होते.

तेथील सगळ्या घरांचे मिळून असलेले छत म्हणजे एक मोकळा, स्वच्छ मंचच होता. जमिनीच्या वर ही दुसरी जमीन होती. त्यावर रस्ते रंगवलेले होते. या विविध दिशांना येत-जात असलेले लोक सोद्देश अथवा निरुद्देश ते पाहू शकत होते. दूरवर चाललेला विश्वामित्रांचा लवाजमा सुद्धा तेथे दिसून येत होता.

'अरे देवा! कुठे आहोत आपण? आणि हे सगळे लोक कुठे चाललेत?' लक्ष्मणाने विचारलं. त्याने जीवनात आधी कधीही असे काही पाहिलेले नव्हते.

‘पण लोक या घरांमध्ये कसे प्रवेश करतात?’ रामने विचारले.

जणू काही त्याच्या उत्तरादाखलच एका माणसानं एक जमिनीसपाट दार उघडलं. हे बहुधा त्याच्या घराचं छत असावं ज्यावर पदपथ होता. तेथून तो पायऱ्या उतरून आपल्या घरात गेला. मागे त्याने दार बंद केलं, तेव्हा रामच्या ध्यानात आलं की पदपथांवर ठराविक ठिकाणी अशी दारं होती आणि या पदपथांवर वाहतुकीला मनाई होती. हे दरवाजे लोकांच्या घरांना जाणारे होते. घरांच्या काही रांगांमध्ये उभ्या, लांबट, चिंचोळ्या रिकाम्या जागा होत्या. ज्यावर लोखंडी जाळ्या लावलेल्या होत्या. पदपथांवर उघडणाऱ्या या खिडक्यांमधून काही घरांमध्ये हवा आणि सूर्यप्रकाश खेळवला होता.

‘पावसाळ्यात हे लोक काय करतात?’ लक्ष्मणानं विचारलं.

‘पाऊस येतो तेव्हा ते खिडक्या बंद ठेवतात,’ अरिष्टानेमी म्हणाले.

‘पण मग उजेड, वाऱ्याचं काय?’

अरिष्टानेमींनी निश्चित अंतरावर खोदलेल्या नलिकांकडे इंगीत केलं. ते म्हणाले, ‘दर चार घरांसाठी अशा नलिकांसारख्या मोकळ्या जागा खोदलेल्या आहेत. घरांच्या खिडक्या या मोकळ्या जागेत उघडतात. इथूनच त्यांना मोकळी हवा आणि उजेड मिळतो. पावसाळ्यात वाहून येणारं पाणी या मोकळ्या जागेत खाली जमा होतं आणि तेथून ते मधमाशांच्या पोळ्यासारख्या या घरांखालून वाहात बाहेरील तटबंदीच्या भिंतीपलीकडे खंदकात जातं किंवा नगराच्या आत असलेल्या तलावात जातं. थोड्या पाण्याचा शेतीसाठी वापर केला जातो.’

‘अरे देवा परशुरामा!’ लक्ष्मण उद्गारला, ‘जमिनीखाली बांधलेली गटारं! किती चांगली कल्पना आहे! रोगांवर नियंत्रण ठेवण्याचा आदर्श उपाय? ’

पण रामचे लक्ष दुसऱ्याच एका गोष्टीनं वेधून घेतलेले होते, ‘पोळं? या भागाला या नावानं ओळखलं जातं का?’

‘हो,’ अरिष्टानेमी म्हणाले.

‘का? यांची रचना मधमाश्यांच्या पोळ्यासारखी आहे म्हणून?’

‘हो,’ अरिष्टानेमी हसत म्हणाले.

‘इथे अर्थात विनोदबुद्धि आहे तर.’

‘तुझ्याकडेही ती असावी अशी मी अपेक्षा करतो. कारण आपल्याला इथेच रहायचे आहे.’

‘काय?’ लक्ष्मण म्हणाला.

‘राजकुमार’, क्षमायाचना करणाऱ्या स्वरात अरिष्टानेमी म्हणाले,’ या मधमाश्यांच्या पोळ्यामध्ये मिथिलेचे कामगार रहातात. जसजसे आपण नगराच्या आतल्या बाजूला जाऊ तसतशा बागा, रस्ते, मंदिरे, बाजारपेठा लागतील आणि मग श्रीमंतांची घरं आणि महाल लागतील. पण तुम्हाला ठाऊकच आहे की तुम्ही इथे गुप्तरूपात वावरावं अशी विश्वामित्रांची इच्छा आहे.’

‘आम्ही इथे आलेलो आहोत हे जर पंतप्रधानांना ठाऊक असेल तर हे नेमके कसं साध्य होणार आहे?’

‘पंतप्रधानांना फक्त एवढंच माहीत आहे की गुरु विश्वामित्र आपल्या साथीदारांसमवेत आलेले आहेत. त्यांना अयोध्येचे राजकुमार आले आहेत हे ठाऊक नाहीय. निदान सध्या तरी नाही!’

‘आपण अयोध्येचे राजकुमार आहोत,’ लक्ष्मण म्हणाला. रागाने त्याच्या मुठी आवळलेल्या होत्या. ‘सप्तसिंधू प्रदेशाच्या राजांची राजधानी आहे ती, आपल्याला इथे अशी वागणूक

मिळणार आहे?'

'आपण फक्त एका आठवड्यासाठी इथे आहोत', अरिष्टानेमी म्हणाले. 'कृपा करून...'

'ठीक आहे', मध्येच बोलत राम म्हणाला, 'आम्ही राहू येथेच.'

लक्ष्मण रामकडे वळून म्हणाला,'पण दादा....'

आपण याआधी यापेक्षाही साध्या जागेत राहिलेलो आहोत, लक्ष्मणा, केवळ काही दिवसांचा तर प्रश्न आहे. मग आपण घरी जाऊ. आपल्या वडिलांच्या इच्छांचा आपल्याला आदर करायला हवा!"

'तुम्ही दोघे आरामात आहात अशी मी अपेक्षा करतो', विश्वामित्र छतावरील दरवाजातून घरात उतरता उतरता म्हणाले.

दुपारी तिसऱ्या प्रहराच्या तिसऱ्या तासाच्या वेळी विश्वामित्र पोळा वस्तीत भेटीला आले. दोघा भावांना पोळ्याच्या आतल्या बाजूला टोकाचं घर दिलं गेलं होतं. त्यापलीकडे बाग होती. शहरातील आतल्या भागात असलेल्या उच्चभ्रू वस्तीत असलेल्या अनेक बागांसारखी ती बाग होती. सुदैवाने त्यांचं घर टोकाला असल्यानं त्यांच्या घराला बाहेर बागेत उघडणारी खिडकी होती.

राम आणि लक्ष्मण अजून शहराच्या आंतरिक भागात गेले नव्हते. विश्वामित्रांच्या रहाण्याची सोय नगराच्या मध्यवर्ती भागातील राजमहालात केली गेली होती. कधी काळी राजमहाल प्रचंड मोठा होता पण दयाळू राजा जनक यांनी राजवाड्याचा बराच भाग हळूहळू ऋषी आणि त्यांच्या शिष्यांना वापरण्यासाठी दिला होता. या तत्वज्ञ राजाला वाटत असे की मिथिला नगरी सर्व विद्वानांना लोहचुंबकासारखी भासावी. या महान गुरुंवर ते आपल्या छोट्या खजिन्यातून भेटींचा वर्षाव करत असत.

'आपणापेक्षा नक्कीच कमी आरामात आहोत, गुरुजी,' लक्ष्मण म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावर राग स्पष्ट दिसून येत होता. धुसफुसत तो म्हणाला, 'मला वाटतं माझ्या भावाला आणि मलाच फक्त गुप्त वेषात रहावं लागणार आहे.'

विश्वामित्रांनी लक्ष्मणाकडे दुर्लक्ष केलं.

'आम्ही ठीक आहोत, गुरुजी,' राम म्हणाला, 'कदाचित मिथिलेतील आमची कामगिरी पूर्ण करण्यासंबंधी आपणाकडून आम्हास मार्गदर्शनाची वेळ आली असावी. आम्ही अयोध्येत परतण्यासाठी उत्सुक आहोत.'

'बरोबर आहे,' विश्वामित्र म्हणाले, 'तर मग मी सरळ मुद्यावरच येतो. अयोध्येच्या राजाने आपल्या मुलीचे – सीतेचे - स्वयंवर आयोजित केलं आहे.'

'स्वयंवर' ही भारतातील वरसंशोधनाची पुरातन पद्धत होती. मुलीचे वडील उपवर मुलांचा मेळावा आयोजित करत आणि त्यापैकी कुणालाही आपल्या पतीच्या रूपात वरण करण्याचं स्वातंत्र्य आपल्या मुलीला देत. किंवा, आपल्या मुलीला मिळवण्यासाठी ते एखादा पण लावत. पण जिंकणाऱ्याच्या हातात ते आपल्या मुलीचा हात जन्मभरासाठी देत.

सप्तसिंधूतील बलशाली राजघराण्यांमध्ये मिथिला नगरीचा समावेश नव्हता. त्यामुळे सप्तसिंधू प्रदेशाच्या मालकाची राजधानी असलेल्या अयोध्येचा मिथिला नगरीतील मुलीशी वैवाहिक

नातेसंबंध जुळून येणं केवळ अशक्य होतं. रामसुद्धा विश्वामित्रांचं बोलणं ऐकून अवाक् झाला होता. पण लक्ष्मणाला मात्र हे सगळं आता असह्य झालं होतं.

'आम्हाला इथे या स्वयंवराला संरक्षण देण्यासाठी बोलावण्यात आलं आहे का?' लक्ष्मणानं विचारलं. मग तो उद्गारला, 'हे तर त्या वेडपट असुरांशी आम्हाला लढायला लावण्याहून भयंकर आहे.'

यावेळी विश्वामित्र रागावून लक्ष्मणाकडे वळले. रागानं ते काही बोलणार त्याआधी राम विनयानं बोलू लागला,

'गुरुजी,' विनयानं बोलणाऱ्या रामची प्रसिद्ध सहनशक्तीसुद्धा आता संपुष्टात येऊ लागली होती, 'आमच्या वडिलांना मिथिला नगरीशी विवाहसंबंध जोडण्याची इच्छा असावी असं मला वाटत नाही. राजकारणासाठी विवाह करणार नाही अशी मीसुद्धा शपथ घेतलीय. पण...'

यावेळी विश्वामित्रांनी रामलासुद्धा बोलताना मध्येच थांबवलं. ते म्हणाले, 'स्वयंवरात भाग घेण्यास नकार देण्यास आता थोडा विलंब झालेला आहे, राजकुमार.'

काय घडवून आणलं गेलंय हे रामच्या तत्काळ लक्षात आलं. घोर प्रयत्नानं त्यानं आपला स्वर विनम्र राखत म्हटलं, 'माझ्या वडिलांशी किंवा माझ्याशी आधी बोलल्याशिवाय आपण माझं नाव स्वयंवरात दाखल कसं केलंत?'

'तुझ्या वडिलांनी मला तुझा गुरु नेमलंय. आणि तुला परंपरांचं उत्तम ज्ञान आहे, राम. पिता, माता किंवा गुरु मुलाच्या लग्नाचा निर्णय घेऊ शकतात. हा कायदा तू मोडणार आहेस का?'

आश्चर्यानं अवाक झालेला राम आपल्या जागेवरच खिळून उभा होता. त्याच्या डोळ्यांत अंगार फुलला होता.

'शिवाय, उपवर मुलांच्या यादीत नाव असूनसुद्धा जर तू स्वयंवरात उपस्थित रहाण्यास नकार दिलास तर, तुझ्याकडून उष्ण स्मृती आणि हरित स्मृतींमधल्या कायद्याचं उल्लंघन होईल. तुला नक्की नकार द्यायचाय का?'

रामने एका शब्दाने उत्तर दिले नाही. रागाने त्याचे सर्वांग थरथर कापत होते. विश्वामित्रांनी त्याला लबाडीने सापळ्यात अडकवले होते.

'माफ करा,' पायऱ्या चढता चढता राम अचानक उद्गारला. मग त्याने छतातील दार उघडले आणि तो बाहेर आला. लक्ष्मण आपल्या भावापाठोपाठ निघाला आणि मागे त्याने जोरात आपटून दार बंद केले.

विश्वामित्र समाधानाने हसले. 'येतील परत ते. त्यांच्यासमोर कोणताही पर्याय नाही. कायदा स्पष्ट आहे,' ते म्हणाले.

अरिष्टानेमींनी विषादाने बंद दराकडे पाहिले. मग पुन्हा आपल्या गुरुंकडे पाहिले. पण त्यांनी गप्प रहाणेच पसंत केले.

# प्रकरण 21

पायऱ्या उतरून राम तळमजल्यावर म्हणजे जमिनीवर आला. तेथून तो सार्वजनिक बागेत आला आणि समोर आलेल्या पहिल्या बाकावर बसला. आपल्या मनात चाललेल्या घनघोर वादळाखेरीज त्याला इतर कशाचीही शुद्ध नव्हती. त्यावेळी जवळून जाणाऱ्या कुणालाही त्याची नजर जमिनीवर खिळलेली आहे असे वाटले असते. ध्यानात तल्लीन असावा तसा त्याचा श्वास लयीत आणि मंद चालला होता. पण लक्ष्मण आपल्या भावाला पूर्ण ओळखत होता. त्याच्या रागाची लक्षणंसुद्धा लक्ष्मणाला ठाऊक होती. त्याला जेवढा अधिक राग येत असे तेवढा तो अधिक शांत भासत असे. लक्ष्मणाला अशावेळी अनावर वेदना होत असत. कारण अशा वेळी त्याचा भाऊ कोषात जात असे, त्याच्यापासून एकदम तुटल्यासारखा वेगळा होऊन जात असे.

'खड्ड्यात गेलं हे सगळं दादा!' लक्ष्मण शेवटी कडाडला, 'त्या भपकेबाज गुरुला सांग की उडत गेलास तू आणि आपण आत्ताच्या आत्ता इथून निघून जाऊ.'

रामने कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. आपला भाऊ जे बडबडला त्यातील अवाक्षरही ऐकू आलं असल्याची खूण त्याच्या चेहऱ्यावर उमटली नाही.

'दादा', लक्ष्मण म्हणाला, 'तू किंवा मी सप्तसिंधूच्या राजेशाही कुटुंबामध्ये विशेष लोकप्रिय आहोत असं काही नाहीय. भरत दादाला हे सगळं सांभाळू दे. अप्रिय असण्यातील काही फायद्यांपैकी एक फायदा हा आहे की लोक आपल्याबद्दल काय विचार करतात याची फारशी पर्वा त्यांना करावी लागत नाही.'

'लोकांचं माझ्याबद्दल काय मत आहे याची मला पर्वा नाही,' राम म्हणाला, आश्चर्य वाटावं एवढा त्याचा आवाज शांत होता. 'पण कायद्याचं काय करायचं?'

'तो तुझा कायदा नाहीय. तो आपला कायदासुद्धा नाहीय. विसर तो!'

राम पुन्हा हरवल्यासारखा कुठेतरी पाहू लागला.

'दादा,' आपला हात रामच्या खांद्यावर ठेवत लक्ष्मणाने हाक दिली.

रामचं शरीर ताठरलं.

'दादा, तू जे काही ठरवशील त्यात मी तुझ्यासोबत आहे.'

रामचा खांदा सैल झाला. शेवटी आपल्या दुःखी भावावर त्यानं नजर टाकली. तो हसला, म्हणाला, 'चल, आपण नगरात एक फेरी मारू. मला जरा आपलं डोकं थंड करायचंय. हे सगळं डोक्यातून काढून टाकायचंय मला.'

पोळा वस्तीपलीकडे मिथिला नगरी थोडी व्यवस्थित होती. आखीव रस्ते होते, त्यांच्या बाजूंनी आलीशान बंगले होते. आलीशान ही फक्त बोलायची पद्धत झाली. कारण अयोध्येतील आलीशान बंगल्यांच्या वास्तुशास्त्राशी त्यांची अजिबात तुलना होऊ शकली नसती. सामान्य जनांच्या साध्या वस्त्रांत असल्याकारणाने त्यांच्याकडे कुणाचेही लक्ष गेले नव्हते.

फिरता फिरता ते बाजाराच्या प्रमुख ठिकाणी आले. हा बाजार मोकळ्या जागी असलेल्या

एका चौकोनी इमारतीत बनला होता. या चौकोनी इमारतीत चारही बाजूंनी पक्की, दगडी बांधामाची महागडी दुकानं होती. मधल्या जागेतील मोकळ्या जागेत तात्पुरती दुकाने लावलेली होती. या दुकानांतच कमी किंमतीच्या वस्तू खरेदीसाठी ठेवलेल्या होत्या. या दुकानांना व्यवस्थित क्रमांक दिलेले होते. दुकानांवर बांबूंच्या आधारे रंगीत कापडांचे तंबू ताणलेले होते. उभ्या-आडव्या आणि सरळ रेषांत मांडलेल्या या दुकानांमध्ये लोकांना फिरता येण्याच्या दृष्टीने मोकळी जागा ठेवलेली होती.

'दादा!' लक्ष्मण एक आंबा उचलत म्हणाला. आपल्या दादाला आंबे आवडतात हे त्याला ठाऊक होतं. तो म्हणाला, 'या मोसमातील पहिले आंबे असावेत हे. उत्तम नसतील, पण आंबे ते आंबेच ना!'

राम हलकेच हसला. लक्ष्मणाने लगेच दोन आंबे विकत घेतले. एक रामला दिला आणि दुसरा आंबा चोखत तो पुढे निघाला. त्याला तसा आंबा खाताना, त्यातील गर चोखून घेताना पाहून रामला हसू आलं.

लक्ष्मणाने त्याच्याकडे पाहात म्हटलं, 'चाखत, थोडा रस ओघळू देत, मनमुराद नाही खाल्ले तर आंबे खाण्यात मजा ती काय?'

रामनेही मग आपल्या भावाप्रमाणेच मोठ्याने आवाज करत आपल्या आंब्यातील रस चोखला. लक्ष्मणाचा आंबा आधी संपला. साल आणि कोय निष्काळजीपणे लक्ष्मण रस्त्यावर फेकून देणार होता पण रामने वेळीच त्याला आवरत दटावलं, 'लक्ष्मण...'

काही झालंच नाही असा आव आणत लक्ष्मण उभा राहिला. मग तसाच पुढे एका दुकानाजवळ खणलेल्या उकीरड्याजवळ तो पोहोचला. त्यानं उकीरड्यात कोय टाकली. कोय आणि सालीची ती योग्य जागा होती. रामनेही त्याच्या पाठोपाठ जाऊन हेच केलं. मग ते परतण्यासाठी मागे वळले. तेव्हा त्याच दिशेने पुढे थोड्या अंतरावर काहीतरी गडबड, लगबग चाललेली त्यांच्या दृष्टीस पडली. काय चाललंय हे पाहाण्यासाठी ते त्या दिशेने लगबगीनं निघाले.

कुणीतरी भांडकुदळ स्वरात कर्कश्श आवाजात म्हणत होतं, 'राजकुमारी सीता, सोडून द्या त्या मुलाला!'

उत्तरादाखल आलेला स्त्रीस्वर म्हणाला, 'सोडणार नाही!'

आश्चर्यचकित झालेल्या रामनं लक्ष्मणाकडे पाहिलं.

'काय चाललंय पाहू तरी,' लक्ष्मण म्हणाला.

राम आणि लक्ष्मण गर्दीतून मार्ग काढत पुढे निघाले. गर्दीचं रिंगण तोडून ते जेव्हा मध्ये पोहोचले तेव्हा त्यांच्या लक्षात आलं की हा बहुधा चौकाचा मध्यवर्ती भाग असावा. ते कोपऱ्यावरील एका दुकानाच्या मागे उभे राहिले. पुढे एक छोटा मुलगा पाठमोरा उभा होता. सात-आठ वर्षांचा असेल तो. त्याच्या हातात एक फळ होतं. तो एका स्त्रीमागे दडला होता. स्त्रीसुद्धा राम-लक्ष्मणला पाठमोरीच दिसत होती. स्त्रीसमोर बराच मोठा क्रुद्ध जमाव उभा होता.

'ती राजकुमारी सीता आहे का?' लक्ष्मणाने विचारलं. मागे वळून रामकडे पाहिलं आणि लक्ष्मण श्वास घेणंच विसरला. नजरबंदी झाल्यासारखा राम सीतेकडे टक लावून पाहात होता. त्याच्यासाठी काळ जणू थांबला होता. या अद्भुत घटनेचा लक्ष्मण साक्षीदार झाला होता.

एकटक पाहात राम अत्यंत निश्चल होऊन उभा होता. त्याचा चेहरा अत्यंत शांत होता.

आपल्या सावळ्या भावाच्या चेहऱ्यावर फुललेली लाली लक्ष्मणाच्या ध्यानात आली. नक्कीच त्याचं हृदय जोरजोरात धडधडत असावं. सीता त्यांच्याकडे पाठ करून उभी होती मिथिलेच्या स्त्रियांच्या मानाने ती अतिशय उंच, जवळ जवळ रामच्या उंचीची होती. सडपातळ आणि मांसल शरीरामुळे ती देवीच्या सैन्यातील योद्ध्यासारखी दिसत होती. तिचा रंग गव्हाळ होता. तिने फिक्या पिवळसर रंगाचं अधोवस्त्र आणि पांढऱ्या रंगाची चोळी पेहेरली होती. उत्तरीय तिने उजव्या खांद्यावर टाकलं होतं. त्याचं एक टोक तिच्या अधोवस्त्रात खोचलेलं होतं आणि दुसरं टोक तिच्या डाव्या हाताभोवती गुंडाळलेलं होतं. तिच्या कंबरेला छोटी म्यान अडकवलेली रामला दिसली. ती रिकामी होती. सीता त्याच्यापेक्षा वयानं थोडी मोठी असल्याचं त्याला सांगण्यात आलं होतं. ती पंचवीस वर्षांची होती.

रामला विचित्र अस्वस्थपणा जाणवला. तिचा चेहरा हातात धरण्याची तीव्र इच्छा त्याला झाली.

'राजकुमारी सीता!' गर्दीतील एक माणूस ओरडला. तो बहुधा त्या जमावाचा म्होरक्या असावा. त्यांच्या पेहेरावावरून ते उच्चकुळातील असावेत हे उघड होतं. 'पोळा वस्तीत रहाणाऱ्या या नीचाला संरक्षण देणं थांबवा! त्याला आमच्या हवाली करा!'

'त्याला कायद्यानुसार शिक्षा दिली जाईल!' सीता म्हणाली, 'तुम्ही कायदा हातात घेऊ शकणार नाही!'

रामच्या चेहऱ्यावर स्मित उमटलं.

'तो चोर आहे. आम्हाला एवढंच ठाऊक आहे. तुमचा कायदा कुणाच्या बाजूनं असतो ते आम्हाला माहीत आहे. द्या त्याला आमच्याकडे.' बोलणारा माणूस गर्दीतून इंचभर पुढे आला. वातावरण तंग झालं होतं. पुढे काय होणार याचा कुणालाही अंदाज नव्हता. कोणत्याही क्षणी परिस्थिती आटोक्याबाहेर जाण्याची शक्यता निर्माण झाली होती. अगदी कमजोर हृदयाच्या व्यक्तीलासुद्धा गर्दीमुळे हत्तीचं बळ येऊ शकतं हे रामला ठाऊक होतं.

सीतेने सावकाश आपल्या म्यानीला हात घातला. तिथे तिची सुरी असायला हवी होती. तिचा हात ताठरला. रामची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. सीतेने अचानक कोणतीही हालचाल केलेली नव्हती आणि आपल्याजवळ हत्यार नाही हे लक्षात आल्यानंतरही तिच्या चेहऱ्यावर किंवा आविर्भावात कोणताही बदल बदल झालेला नव्हता.

सामान्य स्वरात सीता बोलली, 'कायद्याला कोणताही भेदभाव मंजूर नाही. मुलाला शिक्षा मिळेलच. पण तू जर कायदा हातात घेतलास तर तुलाही शिक्षा मिळेल.'

राम अचंभित झाला. तीसुद्धा कायदा मानते....

लक्ष्मण हसला. आपल्या भावाला जेवढं आहे तेवढंच कायद्याचं वेड असलेली दुसरी व्यक्ती कधी भेटेल असं त्याला स्वप्नातही वाटलं नव्हतं.

'बास, पुरे झालं!' तो माणूस ओरडला. त्यानं जमावाकड़े पाहिलं आणि हातवारे करत तो किंचाळू लागला- 'ही आली बघा मोठी न्यायप्रिय बाई! आम्ही शेकडो लोक आहोत! येऊन तर पाहा!'

'पण ही राजकुमारी आहे!' मागून कुणीतरी ताकीद देण्याचा प्रयत्न केला पण त्याचा आवाज अगदीच दुबळा होता.

'नाही, ती राजकुमारी नाही!' तो माणूस पुन्हा ओरडला, 'ती काही राजा जनकांची खरी मुलगी

नाही. ती दत्तककन्या आहे!'

अचानक सीताने त्या मुलाला बाजूला सरकवले. एक पाऊल मागे येत सीतेने पायानेच एका दुकानाचे कापडी छप्पर पेललेला बांबू हालवला. तो जेव्हा जमिनीवर पडला तेव्हा विजेच्या चपळाईने तिने तो पायाने उडवला आणि हाताने पकडला. हातातल्या हातात तिने तो झेलला. आणि मग अशा रीतीने फिरवला की हवेत फिरलेल्या त्या बांबूतून सूंऽऽऽ असा आवाज निघाला. घाबरलेला जमावप्रमुख फटक्याच्या घेरापासून दूर आहोत याची खात्री करून घेत जिथे होता तिथेच उभा राहिला.

'दादा!' लक्ष्मण म्हणाला, 'आपण मदतीसाठी जायला हवं.'

'परिस्थिती तिच्या आटोक्यात आहे.'

सीतेने बांबू फिरवणं थांबविलं आणि गरज लागली की पटकन् वापरता येईल अशा रीतीनं तो बगलेत दाबून धरला. मग ती म्हणाली, 'शांत रहा आणि आपापल्या घरी परत जा. कुणालाही काहीही होणार नाही. या मुलाला कायद्यानुसार शिक्षा दिली जाईल. जास्त नाही आणि कमीही नाही.'

जमाव प्रमुखानं सुरी उपसली आणि पुढे झेप घेतली. त्यानं पातं फिरवलं तशी सीता मागे सरकली. स्वतःला सावरत एक पाऊल मागे जाऊन तिने दुसऱ्या पायाचा गुडघा जमिनीवर टेकवला. आणि दोन्ही हातांनी पेलत बांबू हवेत फिरवला. खाली आलेला बांबू त्या माणसाच्या पायांवर गुडघ्याच्या मागे लागला. त्या तडाख्यानं त्याचे गुडघे हेलपाटण्याआधी आपला दुसरा गुडघा टेकवून आणि दोन्ही हातांचा वापर करून सीतेने त्याच्या वाकलेल्या पायांत अडकवून बांबू असा फिरवला की तो माणूस हवेत हवेत उंच फेकला गेला. त्याचे पाय हवेत वर गेले आणि खाली येताना तो पाठीवर दाणकन् आदळला. क्षणार्धात सीता उसळी मारून उभी राहिली. दोनही हातांत धरून तिने बांबू आपल्या डोक्याच्या वर पकडला आणि जोरात खाली आणून त्याच्या छातीवर एक तडाखा लगावला. त्याच्यासाठी एकच तडाखा पुरेसा ठरला. त्या भयानक तडाख्यानं त्या माणसाच्या बरगड्या तुटल्याचा आवाज आला.

सीतेने पुन्हा फिरवून बांबू हातात घेतला आणि आधीसारखेच पुन्हा त्याचे एक टोक बगलेत दाबून धरले. डावा हात लांबवत दोन्ही पाय दूर ठेवून तोल सांभाळत आणि कोणत्याही दिशेला झुकण्याच्या तयारीत राहात तिने गर्दीला विचारले, 'आणखी कुणाला यायचंय?'

गर्दी मागे सरकू लागली. झटक्यात आपल्या नेत्याने खाल्लेला क्रूर मार पाहून त्यांना अक्कल आली असावी. त्यांनी जे जाणलं ते त्यांना नीट उमगावं म्हणून सीतेने त्यांना खडसावून विचारलं, 'आणखी कुणाला फुकटात बरगडी तोडून हवीय का?'

गर्दी मागे हटू लागली. मागले लोक पांगू लागले.

रामच्या उजव्या बाजूला उभ्या असलेल्या एका माणसाला सीतेने बोलावले. तो आला तेव्हा जमिनीवर पडलेल्या माणसाकडे बोट दाखवत ती म्हणाली, 'कौस्तव! काही लोकांना गोळा करून विजयला आयुरालयात ने. मी नंतर त्याच्याकडे पाहीन.'

कौस्तव आणि त्याचे मित्र पुढे सरसावले. ती मागे वळली तेव्हा रामने तिला पूर्ण पाहिले.

संपूर्ण ब्रह्मांडाने आपलं सारं कौशल्य पणाला लावून हा सुंदर आणि परिपूर्ण चेहरा बनविला असावा असं त्याला वाटलं. त्याच्या मनानं त्याला ग्वाही दिली – हीच ती... तिच्या गोल चेहऱ्याचा रंग तिच्या शरीराच्या मानाने अधिक गोरा होता. तिच्या गालाची हाडे उंच होती. नाक

अपरं पण तीक्ष्ण होतं. तिचे ओठ बारीकही नव्हते आणि जाडही नव्हते. एकमेकांपासून दूर असलेले तिचे डोळे बारीक नव्हते न् विशाल सुद्धा नव्हते. सुरकुती नसलेल्या पापण्यांच्या वर असलेल्या दाट भुवया धनुष्याकृती होत्या. तिच्या डोळ्यातील नितळता नुकत्या घडलेल्या घटनेमुळे आता थोडी भडकलेली वाटत होती. तिच्या उजव्या कानशिलावर एक हलक्या रंगाची जन्मखूण होती. रामला तिचा चेहरा अत्यंत सुंदर आणि नितळ वाटला. तिचा चेहरा हिमालयातील लोकांसारखा होता. लहानपणी काठमांडूला भेट दिली असता रामने असे चेहरे तिथे पाहिलेले होते. तिथल्या आठवणी रामला अत्यंत प्रिय होत्या. तिचे सरळ आणि काळेभोर केस वेणीत गुंफून नीट अंबाडा बनवून बांधलेले होते. योद्ध्याच्या तिच्या शरीरावर युद्धातील अभिमानास्पद जखमांच्या खुणा होत्या.

'दादा....' लक्ष्मणाचा आवाज खूप दूरवरून येत आहेसा त्याला वाटलं. खरं तर त्याला तो जवळ जवळ ऐकूच येत नव्हता.

राम संगमरवरी पुतळ्यासारखा उभा होता. लक्ष्मण आपल्या भावाला पूर्णपणे ओळखत होता. त्याला ठाऊक होतं की दादाचा चेहरा जेवढा हरवलेला तेवढा त्याच्या मनातील भावनांच्या वादळाचा वेग असतो.

लक्ष्मण रामच्या खांद्याला स्पर्श करत म्हणाला, 'दादा...'

राम अजूनही हरवलेलाच होता. लक्ष्मणने पुन्हा आपली नजर सीतेकडे वळवली.

तिने लाठी बाजूला फेकून दिली आणि चोरी करणाऱ्या मुलाचं बखोट पकडून त्याला समोर आणत म्हणाली, 'चल, असा समोर ये.'

'ताई,' तो मुलगा विनवू लागला, 'मला माफ कर. ही शेवटची वेळ. मला खरंच खूपच वाईट वाटतंय.'

सीतेने त्या मुलाचा हात पकडला आणि ती राम-लक्ष्मण जेथे उभे होते त्या दिशेला झपाझप चालत पुढे येऊ लागली. लक्ष्मणानं रामचं कोपर धरून त्याला बाजूला खेचण्याचा प्रयत्न केला पण राम जणू कोणत्या तरी दैवी शक्तीच्या आहारी गेला होता. त्याचा चेहरा भावविहीन झाला होता. शरीर स्थिर झालं होतं. पापण्या लवणं विसरल्या होत्या. त्याचा श्वास संथ गतीनं आणि नियमीत लयीत चालला होता. हालचाल काय ती त्याच्या वाऱ्याच्या झुळुकीनं हालणाऱ्या उत्तरीयाचीच होत होती. रामच्या स्थिरतेमुळे उत्तरीयाचं ते हालणंसुद्धा लक्ष वेधून घेत होतं.

विवश झाल्यासारखी रामने आपली मान लववली.

लक्ष्मण श्वास घेणं विसरून गेला. त्याचं तोंड उघडंच राहिलं. हा दिवस पहायला मिळेल असं त्याला स्वप्नातही वाटलं नव्हतं. त्याच्या भावासारख्या पुरुषाकडून एखादी स्त्री कौतुक मिळवणार होती? कायम मनाच्या आज्ञेत आणि नियंत्रणात असणाऱ्या आपल्या दादाच्या हृदयावर प्रेमाचा आघात होईल असं त्याला स्वप्नातही वाटलं नव्हतं. प्रत्येक माणसाचं शरीर अभिमानानं उंचावण्याचं आणि इतरांना नमन करण्यात सुख मानण्याचं उद्दीष्ट ज्याच्या मनासमोर होतं त्याचं मन प्रेमात गुरफटत चाललं होतं.

जुन्या कवितेतील एक ओळ त्याला आठवली. त्याच्या प्रेमभारित मनाला ती कविता अतिशय दिव्य वाटत असे. मात्र, त्या ओळी आपल्या गंभीर प्रवृत्तीच्या भावाच्या बाबतीत आपल्या आधी खऱ्या ठरतील असं त्याला वाटलं नव्हतं –

तिच्यात खास काही आहे, काचमण्यांच्या माळेतील धाग्यासारखं, ती सगळे मणी एकत्र गुंफून

ठेवते.

आपल्या भावाला त्याच्या जीवनातील क्षण गुंफून ठेवणाऱ्या धाग्यासारखी सहचारिणी मिळाली हे लक्ष्मणाला स्पष्ट दिसत होतं.

राम नेहमी आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवत असे, आपलं मन ताब्यात ठेवत असे. त्यानं आपल्या मनाला कधीही बहकू दिलेलं नव्हतं. त्याच रामाच्या मनाला आपली जीवनसंगिनी मिळाल्याचं समजलं होतं. रामला सीता मिळाली होती.

दोन अपरिचित तरुण आपला रस्ता अडवून उभे आहेत हे पाहून आश्चर्य वाटल्यामुळे सीता अचानक थांबली. त्यांच्यापैकी एक अतिशय उंच आणि धिप्पाड आणि तरीही गोजरा आणि आडदांड होता आणि दुसऱ्यानं ज्या प्रकारचे ओबड-धोबड कपडे पेहेरले होते ते त्याला अजिबात शोभत नव्हते. तो अतिशय प्रतिष्ठित वाटत होता. आत्ता घडत असलेली विचित्र गोष्ट म्हणजे तो तिला अभिवादन करत होता.

'दूर सरक!' सीता म्हणाली आणि झर्रकन पुढे निघून गेली. राम बाजूला सरकला, पण ती त्याआधीच चोरी करणाऱ्या मुलाला आपल्या मागे खेचत पुढे निघून गेली होती.

लगेच पुढे येत लक्ष्मणाने रामच्या खांद्यावर हात ठेवला, त्याला हाक मारली, 'दादा!...'

निघून जात असलेल्या सीतेला पाहाण्यासाठी राम मागे वळला नव्हता. काहीतरी जादू झाल्यासारखा तो होता तिथेच उभा होता. जे काही घडलं, आपल्याला नेमकं काय होतंय याबद्दल त्याचं शिस्तप्रिय मन जणू विश्लेषण करत होतं. त्याला स्वतःबद्दलच अपार आश्चर्य वाटत होतं.

'हं, दादा...' लक्ष्मण म्हणाला. आता तो हसू लागला होता.

'अं..?'

'दादा, गेली ती. आता तू तुझं डोकं वर उचलू शकतोस.'

शेवटी रामनं लक्ष्मणाकडे पाहिलं. त्याच्या चेहऱ्यावर स्मित उमटल्यासारखं वाटत होतं.

'दादा,' म्हणत लक्ष्मण दिलखुलास हासला. एक पाऊल पुढे येत त्याने आपल्या भावाला मिठी मारली. रामनं त्याच्या पाठीवर थोपटलं पण त्याचं मन मात्र कुठेतरी हरवलं होतं.

एक पाऊल मागे सरकत लक्ष्मण म्हणाला, 'चांगली वहिनी बनेल ती!'

रामच्या चेहऱ्यावर नापसंतीची आठी उमटली. आपल्या भावाच्या सीतेला वहिनी म्हणायच्या फाजील उत्साहाला त्याने दाद दिली नाही.

'मला वाटतं, आता आपण स्वयंवरात भाग घेणार तर!' लक्ष्मण हसत हसत म्हणाला.

'सध्या आपण आपल्या रहायच्या जागी जाऊ,' राम म्हणाला. आता तो शांत झाला होता.

'बरोबर आहे!' लक्ष्मण म्हणाला. तो अजून हसत होता. 'अर्थातच याबाबत आपल्याला मोठ्यांसारखं वागायला हवं. परिपक्व! शांत! निर्विकार! संयमीत! आणखी एखादा शब्द मी विसरलो का दादा?!'

रामने आपला चेहरा निर्विकार ठेवण्यासाठी प्रयत्नांची शर्थ केली. पण आज त्याला ते जमत नव्हतं. शेवटी मनातील आनंदाला तो शरण गेला. त्याच्या चेहऱ्यावर स्मितहास्य झळकलं.

दोघे भाऊ मग पोळा वस्तीतील आपल्या रहात्या जागी परत निघाले.

'आता तू आपल्या मर्जीनं स्वयंवरात भाग घ्यायला तयार आहेस हे आपल्याला अरिष्टानेमींना सांगावं लागेल,' लक्ष्मण म्हणाला.

चालता चालता राम लक्ष्मणापासून दोन पावलं मागे राहिला. तेव्हा त्याने आपल्या मनातील हसू आपल्या चेहऱ्यावर पूर्ण पसरू दिलं. आपल्याला नेमकं काय झालं हे त्याच्या मनाला कदाचित उमगलं असावं. आपल्या हृदयानं केलेली दगाबाजी त्याच्या लक्षात आली असावी.

---

'चांगली बातमी आहे ही,' अरिष्टानेमी म्हणाले, 'तुम्ही कायद्याचं पालन करायचा निर्णय घेतला याचा मला आनंद वाटतो.'

राम नेहमीसारखा शांत होता. लक्ष्मणाला मात्र आपलं हसू आवरणं कठिण जात होतं.

'अर्थात, अरिष्टानेमी', लक्ष्मण म्हणाला. आम्ही कायद्याचा, विशेषतः दोन स्मृतींमध्ये जो लिहिलेला आहे त्या कायद्याचा अवमान कसा करू?'

लक्ष्मणाच्या या अचानक निर्णय बदलण्यामागचं कारण लक्षात न आल्यानं अरिष्टानेमी गोंधळले. त्यांनी खांदे उडवले आणि रामबरोबर बोलण्यासाठी ते रामच्या दिशेनं वळले. ते म्हणाले, 'तुम्ही स्वयंवरात भाग घ्यायला तयार आहात हे मी आत्ता गुरुजींना सांगतो.'

---

'दादा!' आपल्या खोलीत धावत येत लक्ष्मण म्हणाला.

रामनं सीतेला पाहिलं त्याला चार-पाच दिवस उलटले असतील. स्वयंवराला आता केवळ दोनच दिवस बाकी होते.

'काय झालं?' हातातील ताम्रपत्र खाली ठेवत रामनं विचारलं.

'तू चल माझ्याबरोबर, दादा!' रामचा हात धरून त्याला खेचत लक्ष्मण म्हणाला.

---

'काय झालं लक्ष्मण?' रामने पुन्हा विचारलं.

पोळावस्तीच्या वर असलेल्या रस्त्यांवरून ते चालले होते. शहराच्या विरुद्ध दिशेला ते वळले. पोळा वस्तीचा हा भाग तटबंदीच्या आतील भिंतीशी जोडलेला होता. तेथून दोन तटबंद्यांमधील शेती आणि बाहेरील तटबंदीबाहेरचा म्हणजे नगराबाहेरचा भाग व्यवस्थित दिसत होता. तेथे प्रचंड गर्दी जमा झाली होती. सगळे लोक एका दिशेला बोट दाखवत अतिशय उत्साहानं आपापसात बोलत होते. एकमेकांना काहीतरी सांगत होते.

---

'लक्ष्मणा, कुठे घेऊन चाललायस मला?'

रामला आपल्या प्रश्नाचं उत्तर मिळालं नाही.

'सरक बाजूला,' गर्दीतून वाट काढता काढता लक्ष्मण म्हणाला. रामचा हात त्याने अजून सोडला नव्हता. आडदांड शरीराच्या लक्ष्मणाला पाहून लोक बाजूला सरकून त्यांना पुढे जाण्यासाठी वाट मोकळी करून देत होते. थोड्याच वेळात दोघे भाऊ तटबंदीपाशी पोहोचले.

समोर जे दिसलं त्यामुळे रामची जणू नजरबंदीच झाली. बाहेरील तटबंदीबाहेरच्या खंदकवजा तलावापलीकडे आणि जंगलाच्या अलीकडे असलेल्या मोकळ्या जागेत अत्यंत शिस्तबद्ध

पद्धतीनं सैन्य गोळा होत होतं. ठराविक अंतरावर एकूण दहा निशाण हातात धरलेले प्रमुख होते. आपल्या हातातील निशाण त्यांनी उंच उभारले होते. मागील जंगलातून एकापाठोपाठ एक उसळणाऱ्या लाटांसारख्या सैनिकांच्या रांगा बाहेर येत होत्या. काही मिनिटांतच त्या सगळ्यांनी प्रत्येक निशाण पकडलेल्या सैनिकाच्या मागे हजाराच्या संख्येने आपापल्या जागा घेतल्या. मध्ये त्यांनी मोठी मोकळी जागा सोडलेली होती. त्याबद्दलही सगळ्यांच्या मनात कुतूहल निर्माण झालं होतं.

निशाण धरून उभ्या असलेल्या म्होरक्याच्या अधोवस्त्राच्या रंगासारखाच त्याच्या मागे उभ्या असणाऱ्या सैनिकांच्या अधोवस्त्रांचा रंग होता. अंदाजे दहा हजार सैनिक असावेत ते. संख्या फार मोठी नसली तरी मिथिलेसारख्या नगरीत उत्पात घडवून आणण्यासाठी ही संख्या पुरेशी होती. कारण मिथिला हे सैनिकी शहर नव्हतं.

'कोणत्या राज्यानं हे सैन्य पाठवलंय?' रामनं विचारलं.

'हे सैन्य नाहीय,' लक्ष्मणाशेजारी उभ्या असलेल्या एका व्यक्तीनं सांगितलं, 'ही शरीररक्षकांची तुकडी आहे.'

त्या माणसाकडून आणखी माहिती मिळविण्याची रामची इच्छा होती, पण तेवढ्यात वातावरणात शंखध्वनी घुमू लागला. जंगल आणि तलावामधील मोकळ्या जागेत जमा झालेले सैनिक शंख वाजवत होते. काही क्षणांत हा आवाजसुद्धा क्षीण वाटावा असा कानठळ्या बसवणारा आवाज येऊ लागला. असा आवाज रामने याआधी कधीही ऐकलेला नव्हता. प्रचंड आकाराचा राक्षस आपल्या तलवारीचे हात मारून हवा कापत चाललेला असावा असा तो आवाज होता.

आवाजाच्या मागानं लक्ष्मणानं वर पाहिलं तेव्हा त्याच्या तोंडून उद्गार निघाले, 'अरे, हे काय?.....'

गर्दी अचंभित होऊन पहात होती. ते बहुतेक लंकेचा अभिमान असलेलं उडतं वाहन पुष्पक विमान होतं. ते प्रचंड मोठं, शंक्वाकृती वाहन होतं. विचित्र, अज्ञात धातूपासून ते बनविलेलं होतं. या वाहनाच्या वरच्या बाजूला अवाढव्य आकाराच्या पात्यांचा पंखा होता. हा शक्तीशाली पंखा उजवीकडून डावीकडे गोलाकार फिरत होता. काही छोट्या आकाराचे पंखे त्या वाहनाच्या खालच्या बाजूला, तळापासून थोड्या अंतरावर सगळ्या बाजूंनी लावलेले होते. या वाहनाच्या मुख्य भागाला कित्येक खिडक्या होत्या आणि या सर्व खिडक्यांवर जाड काचा लावलेल्या होत्या.

माजावर आलेल्या हत्तीच्या आवाजालासुद्धा लाजवेल असा त्या वाहनाचा आवाज प्रचंड होता. काही काळ ते वाहन झाडांवर घिरट्या घालत राहिलं. तेव्हा त्या आवाजाच्या कर्कश्शपणानं परिसीमा गाठली. त्याच वेळी काच लावलेल्या खिडक्यांमागे धातूचे पत्रे येऊन त्या बंद झाल्या. त्यामुळे विमानाच्या आतील कोणतेही दृश्य बाहेरून दिसत नव्हते. दुसऱ्या जगातून आलेल्या या वाहनाकडे लोक कानांवर हात ठेवून पाहातच राहिले. लक्ष्मणानेही आपले कान हातांनी झाकून घेतले होते. पण रामने असं केलं नव्हतं. तो त्या वाहानाकडे पाहात राहिला. त्याच्या मनात राग उसळी मारू लागला. ते वाहन कुणाचं आहे हे त्याला माहीत होतं. रामच्या जन्माआधी त्याच्या सुखी बालपणाच्या साऱ्या शक्यता संपविण्यासाठी हाच माणूस जबाबदार होता. राम त्या गर्दीत अगदी एकटा होऊन उभा होता. त्याच्या मनातील या रागामुळे

त्याच्या डोळ्यांची आग आग होऊ लागली.

विमान खाली उतरू लागलं. अचानक त्याच्या पंख्याचा आवाज कमी झाला. लंकेच्या सैनिकांनी बनविलेल्या कड्यातील मोकळ्या जागी बरोब्बर विमान खाली उतरलं. पोळा वसाहतीत रहाणारे मिथिलेचे लोक उत्फूर्तपणे टाळ्या वाजवू लागले. लंकेच्या सैनिकांनी मात्र तिकडे अजिबात लक्ष दिलं नाही. आपल्या जागेवर ताठ उभे राहून ते आपल्या शिस्तप्रियतेची चुणुक दाखवत होते.

काही मिनिटांनंतर त्या शंक्वाकृती विमानाचे दरवाजे उघडले. त्या दारांआड आणखी एक छुपा दरवाजा होता. तो आपोआप बाजूला सरकला आणि त्यामागे उभा असलेला प्रचंड आकाराचा माणूस दिसला. तो माणूस वाहनातून बाहेर आला आणि त्याने आपल्या समोरील भूमीवर नजर फिरवली. लंकेचा एक अधिकारी धावत त्याच्यासमोर जाऊन उभा राहिला. आणि त्याने त्याला कडक सलाम केला. त्यांच्यात आपापसात काही शब्दांची देवाण-घेवाण झाली. मग त्या दैत्याकार माणसाने भिंतीवर आणि भिंतीपलीकडे उभ्या असलेल्या उत्सुक प्रेक्षकांवर नजर टाकली. अचानक मागे वळून तो पुन्हा विमानात गेला. काही वेळानंतर तो पुन्हा बाहेर आला. यावेळी त्याच्यासोबत आणखी एक माणूस होता.

दुसरा माणूस पहिल्या माणसाच्या मानानं थोडा बुटका होता. तरीही मिथिलेच्या लोकांच्या मानाने तो उंच होता. जवळ जवळ रामच्या उंचीएवढी त्याची उंची असावी. पण रामच्या सडपातळ, बांधेसूद शरीरासारखं त्याचं शरीर नव्हतं. त्याचं शरीर अजस्त्र होतं. त्याचा काळा रंग, खाली वळलेल्या भरघोस मिश्या, दाट दाढी आणि देवीच्या व्रणांनी भरलेला चेहरा यामुळे तो प्रचंड भयानक दिसत होता. त्यानं जांभळ्या रंगाचं धोतर आणि उत्तरीय पेहेरलेलं होतं. सप्तसिंधू परदेशात हा रंग फारच महाग होता. त्याने एक मोठा किरीट डोक्यावर घातला होता. त्या किरिटावर दोन्ही बाजूला दोन साधारण सहा इंचाची भयानक शिंगं होती. चालताना तो थोडा लंगडत होता.

'रावण....' लक्ष्मण कुजबुजला.

रामने कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही.

राम दूरवर दिसणाऱ्या लंकेच्या राजाकडे पाहात गप्प उभा होता.

'दादा,' लक्ष्मण म्हणाला, 'आपल्याला निघायला हवं.'

रामने लक्ष्मणाकडे पाहिले. रामच्या डोळ्यांत अंगार फुलला होता. मग त्याने बाहेरील तटबंदीच्या भिंतीपलीकडे असणाऱ्या लंकेच्या अंगरक्षकांकडे नजर वळवली आणि पुन्हा रावणावर त्याची नजर स्थिर झाली.

# प्रकरण 22

‘कृपया जाऊ नका’, अरिष्टानेमी आजीजीनं म्हणाले, ’गुरुजीसुद्धा तुमच्याइतकेच कष्टी आहेत. रावण इथे का आणि कसा आला हे आम्हाला ठाऊक नाही. पण गुरुजींना वाटतं की तुम्ही दोघांनी किल्याच्या आत रहाणं तुमच्या दृष्टीनं सुरक्षित आहे.’

राम आणि लक्ष्मण पोळा वस्तीच्या आपल्या खोलीत बसलेले होते. अरिष्टानेमी अयोध्येच्या राजकुमारांसाठी विश्वामित्रांची सूचना घेऊन आले होते. कृपया जाऊ नका. रावणाने मिथिला नगरी बाहेर आपलं शिबीर वसवलं होतं. त्याने शहरात प्रवेश केला नव्हता. पण त्याच्या काही गुप्त दूतांनी मात्र शहरात प्रवेश केला होता. ते राजवाड्याच्या मुख्य भागात राजा जनक आणि त्यांचे बंधू राजा कुशध्वजांशी बोलण्यासाठी गेले होते. राजे कुशध्वज स्वयंवराच्या कार्यक्रमात उपस्थित रहाण्यासाठी नुकतेच मिथिलेत आले होते.

‘गुरु विश्वामित्रांना काय वाटतं याची मी का पर्वा करावी?’ लक्ष्मणानं रागानं विचारलं. तो म्हणाला, ‘मी फक्त माझ्या भावाचं ऐकतो! लंकेहून आलेला हा राक्षस नेमकं काय करणार आहे याची कुणाला कल्पना नाहीय! आम्हाला निघायला हवं! आत्ता!’

‘कृपा करून जरा शांत चित्तानं विचार करा. तुम्ही दोघेच जंगलात कसे सुरक्षित रहाल? तुम्ही दोघांनी या शहराच्या भिंतींच्या आत असणंच हितावह आहे. तुमच्या रक्षणासाठी येथे मलयपुत्र आहेत.’

‘पुढे काय होईल याची वाट पाहात आम्ही येथे बसून राहू शकत नाही. माझ्या भावासोबत मी इथून निघून जाणार आहे. तुम्हा मलयपुत्रांना जे करायचं ते तुम्ही करा!’

‘राजकुमार राम,’ अरिष्टानेमी रामकडे वळत म्हणाले, ‘कृपा करून माझ्यावर विश्वास ठेवा. मी जे सांगतोय ते करणंच सध्या उत्तम ठरेल. स्वयंवरातून माघार घेऊ नका. शहर सोडून जाऊ नका.’

बाहेरून राम नेहमीसारखा शांत वाटत होता तरीही अरिष्टानेमींना त्याच्यात वेगळीच ऊर्जा जाणवली. रामची नेहमीची प्रसन्नता मात्र त्यांना जाणवली नाही.

राम जर स्वतःशी प्रामाणिक असता तर त्यानं कबूल केलं असतं की त्याला आजपर्यंत कित्येकांनी दुखावलं होतं. आणि त्यांच्याबद्दल त्याला तिरस्कार नाही तरी निदान संताप वाटायला हवा होता. रावणानं फक्त आपलं काम केलं होतं. ज्यासाठी तो लढला ते युद्ध त्यानं जिंकलं होतं. पण पोरवयाच्या रामाला हा तर्क समजणं अवघड होतं. एकटा पडलेल्या आणि दुखावलेल्या त्या पोरानं आपली सगळी हताशा, आपला सगळा राग आणि आपल्यावर झालेल्या अन्यायाचं कारण त्या प्रतीकात्मक, अदृश्य राक्षसाला मानलं होतं. त्याच्या समजुतीप्रमाणे त्याच राक्षसामुळे त्याच्या प्रेमळ वडिलांना अत्यंत कडवट, मुलांचा राग करणारे आणि नेहमी त्यांच्याकडे दुर्लक्ष करणारे बनविलं होतं. लहान असताना त्याला वाटायचं की रावणामुळेच हे दुर्भाग्य आपल्या वाट्याला आलंय. त्या दिवशी रावणाने जर करछपची लढाई जिंकली नसती तर रामच्या वाट्याला एवढं दुर्दैव आलं नसतं.

बालपणीच्या आठवणीतूनच रामच्या मनात हा राग उत्पन्न झालेला होता. हा राग

तर्कापलीकडचा आणि विह्वळ करणारा होता.

शेवटी राम आणि लक्ष्मणाला त्यांच्या मर्जीवर सोडून अरिष्टानेमी विश्वामित्रांच्या, पाहुण्यांसाठी राखीव निवासस्थानाकडे निघून गेले.

'दादा, ऐक माझं, आपण इथून निसटून जाऊ,' लक्ष्मण म्हणाला, 'नगरी बाहेर लंकेचे दहा हजार सैनिक आहेत. आपण फक्त दोघेच आहोत. आणि मी सांगतो, तशीच वेळ आली तर मिथिला निवासी आणि मलयपुत्रही रावणाला सामील होतील.'

खोलीच्या एकुलत्या खिडकीतून राम समोरील उद्यानाकडे पाहात होता.

'दादा,' लक्ष्मण जोर देत म्हणाला, 'आपल्याला इथून जायला हवं. शहराच्या दुसऱ्या टोकाला आणखी एक दरवाजा असल्याचं मला सांगण्यात आलंय. मलयपुत्रांशिवाय इथे कुणालाही आपण कोण आहोत ते ठाऊक नाहीय. आपण इथून गुपचूप निघून जाऊ. अयोध्येचे सैन्य घेऊन परत येऊ आणि या दुष्ट लंकावासियांना धडा शिकवू. पण आत्ता मात्र आपल्याला पळ काढायला हवा.'

राम लक्ष्मणाकडे वळाला आणि थरकाप उडवणाऱ्या थंड आवाजात म्हणाला, 'आपण इक्ष्वाकुचे वंशज आहोत. आपण रघुचे वंशज आहोत. आपण कुठेही पळून जायचं नाही.'

'दादा...'

दारावर थाप पडली आणि त्याचं वाक्य अर्धवट राहिलं. त्यानं एकदा रामकडे पाहिलं आणि तलवार उपसून हातात धरली. रामनं नापसंती व्यक्त करत म्हटलं, 'लक्ष्मणा, कुणाला आपली हत्याच जर करायची असती तर त्यांनी दार वाजवलं नसतं. ते दार तोडून आत आले असते. इथे लपण्यासाठी जागा नाहीय.'

लक्ष्मण अजूनही दाराकडे टक लावून पहात होता. तलवार म्यान करावी की नाही याबद्दल त्याचा निर्णय होत नव्हता.

'दार उघड लक्ष्मणा,' राम म्हणाला.

छतातील दाराकडे नेणाऱ्या पायऱ्यांवरून रांगत लक्ष्मण वर गेला. हल्ला झालाच तर वापरता येण्याजोगी आपली तलवार शेजारी तयार ठेवली. दारावर पुन्हा थाप पडली. यावेळी ती अधिक आग्रही वाटली. लक्ष्मणाने दार उघडलं. समोर मिथिला नगरीची संरक्षण आणि शिष्टाचार प्रमुख समीची उभी होती. तोकड्या केसांची, उंच, काळी आणि पुष्ट शरीराची स्त्री होती समीची. जिंकलेल्या लढायांतील जखमांच्या खुणा तिच्या शरीरावर होत्या. हिरव्या रंगाची चोळी आणि अधोवस्त्र तिने पेहेरलं होतं. दंडावर चामड्याचा बाजूबंद अडकवला होता आणि चामड्याचं छोटं जाकिट घातलं होतं. तिच्या कमरेला म्यानात घातलेली तलवार लटकत होती.

लक्ष्मणाने आपल्या तलवारीवरची पकड घट्ट केली. तो घुश्यात म्हणाला, 'नमस्ते अधिकारी समीची, आपल्या या भेटीचे कारण काय?'

समीची प्रसन्न हासली. म्हणाली, 'युवका, तुझी तलवार म्यान कर.'

'काय करायचं किंवा नाही ते मला ठरवू द्या. आपण येथे कशासाठी आलात?'

'पंतप्रधानांना आपल्या वडील भावाची भेट घ्यायची आहे.'

लक्ष्मणाला आश्चर्याचा प्रचंड धक्का बसला. तो रामकडे वळला. रामने त्याला समीचीला आत

येऊ देण्याविषयी खूण केली. लक्ष्मणाने लगेच तलवार म्यानीच्या हवाली केली. भिंतीला पाठ टेकून उभा राहात त्याने समीची आणि तिच्यासोबत आलेल्या इतरांना रस्ता दिला. समीची आत आली आणि पायऱ्या उतरून खोलीत आली. तिच्यापाठोपाठ सीता होती. दारातून खाली येता येता तिने मागे वळून खूण करून सांगितलं, 'तू तिथेच उभी रहा, उर्मिला.'

राम मिथिलेच्या पंतप्रधानांचं स्वागत करण्यासाठी उठून उभा राहात असता लक्ष्मणाची नजर सहज वर उभ्या असलेल्या उर्मिलेवर गेली. सीता आणि समीची पायऱ्या उतरून खाली गेल्या पण लक्ष्मण जागीच खिळून उभा राहिला. उर्मिलेवरून त्याची नजर ढळेना. आपल्या मोठ्या बहिणीहून – सीतेहून उर्मिलेची उंची कमी होती. फारच कमी होती. सीतेपेक्षा ती लख्ख गोरी होती. अगदी दुधासारखी. तिचा बहुतेक वेळ सूर्यप्रकाशापासून दूर राजमहालातच जात असे. छोट्या मुलांसारख्या तिच्या गोल चेहऱ्यावर दोन मोठे डोळे लक्ष वेधून घेत होते. त्या डोळ्यांत छोट्या मुलांसारखा निर्व्याज भाव आणि गोडवा होता. योध्यांसारख्या आपल्या मोठ्या बहिणीसारखी उर्मिला भक्कम नव्हती. ती अतिशय नाजुक होती. आपल्या सौंदर्याची तिला जाणीव होती. पण तिचं वागणं निष्पाप बालकांसारखं होतं. केस बटाबटांनी अंबाड्यात गुंतवून ठेवणारी केशरचना तिने केली होती. तिच्या डोळ्यांतील काजळ अप्रतिम होतं. बीटफळाच्या रसानं तिच्या ओठांच्या सौंदर्यात भर घातली होती. अद्ययावत असले तरी तिचे कपडे सभ्य आणि आकर्षक होते. गुलाबी रंगाची चोळी आणि गहिऱ्या लाल रंगाचं अधोवस्त्र तिने पेहेरलं होतं. ते इतरांपेक्षा थोडं लांब होतं. ते तिच्या गुडघ्याखालपर्यंत पोहोचलं होतं. तिच्या खांद्यावरचं उत्तरीय अतिशय व्यवस्थित होतं. तिने घातलेल्या पैंजण आणि जोडव्यांमुळे तिच्या सुंदर पावलांकडे लक्ष जात होतं. तिच्या नाजुक हातांत पाटल्या आणि बोटांत अंगठ्या सजून दिसत होत्या. लक्ष्मणावर जणू तिने गारूड केलं. तो तिच्याकडे पाहातच राहिला होता. त्याची नजर आपल्यावरून ढळत नाहीय हे उर्मिलेच्या लक्षात आलं. त्याच्याकडे पाहून ती प्रसन्न हासली पण नंतर गोंधळून तिने आपली नजर इतरत्र वळवली.

सीता मागे वळली आणि तिला लक्ष्मण उर्मिलेकडे पाहात असलेला दिसला. जी गोष्ट रामच्या लक्षात आली नव्हती ती तिने टिपली.

'दार बंद कर लक्ष्मण,' राम म्हणाला.

अनिच्छेनंच लक्ष्मणानं भावाच्या आज्ञेचं पालन केलं.

राम सीतेकडे वळला. त्याने विचारलं, 'मी आपली काय मदत करू शकतो, राजकुमारी?'

सीता हसली. 'एक मिनीट, राजकुमार,' असं म्हणून ती समीचीकडे वळली.

म्हणाली, 'मला राजकुमाराबरोबर एकांतात बोलायचं आहे.'

'हो,' समीची म्हणाली. लगेच पायऱ्या चढून ती बाहेर निघून गेली.

आपण कोण आहोत ते सीतेला कळलेलं पाहून रामला फार आश्चर्य वाटलं. पण वरकरणी ते त्यानं प्रकट होऊ दिलं नाही. त्यानं लक्ष्मणाला मानेनं खूण केली आणि लक्ष्मण अत्यंत उत्साहानं तेथून निघून जाण्यासाठी वळला. थोड्याच वेळात तेथे केवळ राम आणि सीता उरले.

सीता हासली आणि तिने खोलीतील खुर्चीकडे बोट दाखवत म्हटलं, 'कृपया बस, राजकुमार.'

'मी ठीक आहे,' राम म्हणाला.

म्हणजे गुरु विश्वामित्रांनी हिला माझी ओळख सांगितली का? आम्हा दोघांच्या मीलनाबद्दल ते एवढे आग्रही का आहेत?

'मी सांगते म्हणून बस,' सीता म्हणाली. ती स्वतःही दुसऱ्या एका खुर्चीत बसली.

राम सीतेच्या समोरच्या खुर्चीवर बसला. थोडा वेळ अवघड शांतता वातावरणात भरून राहिली. मग सीता बोलू लागली. 'तुम्हा दोघांना फसवून येथे आणण्यात आलंय असं मला वाटतं.'

राम गप्प राहिला. पण त्याचे डोळे खरं काय ते बोलून गेले.

'मग तुम्ही इथून निघून का गेला नाहीत?' सीतेनं विचारलं.

'कारण, तसं करणं कायद्याविरुद्ध ठरलं असतं.'

सीता हसली. 'आणि कायद्यासाठीच तू परवा होणाऱ्या स्वयंवरात भाग घेणार आहेस का?'

रामला गप्प राहणंच श्रेयस्कर वाटलं. त्याला खोटं बोलायचं नव्हतं.

'तू अयोध्येचा राजकुमार आहेस, सप्तसिंधूचा सर्वेसर्वा. मी मिथिलेसारख्या छोट्या, कमी बलशाली राज्याची राजकुमारी आहे. या संबंधामुळे काय साध्य होणार आहे?'

'केवळ राजनैतिक संबंधांपुरतेच विवाहसंबंध मर्यादित नसतात. त्यामागे याहून उच्च हेतू असतात.'

सीतेचा चेहरा खुलला. तिच्या चेहऱ्यावर हसू पसरलं. रामला वाटलं आपली मुलाखत घेतली जातेय. पण विचित्र गोष्ट ही होती की तरीही सीतेच्या नीट बांधलेल्या केसांमधून ओघळलेल्या बटेने त्याचं लक्ष वेधून घेतलंच. खिडकीतून येणाऱ्या हवेने ती बट झुलत होती. तिच्या बाकदार गळ्यावरून त्याची नजर हटायला तयार नव्हती. आपलं हृदय जोरजोरात धडधडतंय हे त्याच्या लक्षात आलं. ओशाळा होऊन तो स्वतःशीच हसला. स्वतःला दटावत आपलं मन शांत करण्याचा त्यानं प्रयत्न केला, काय झालंय मला? माझा स्वतःवर ताबा का नाही राहिला?

'राजकुमार राम?'

'माफ करा?' रामने पुन्हा विचारलं. ती काय बोलतेय यावर लक्ष केंद्रित करणं त्याला जड जात होतं.

'मी विचारतेय की, विवाह जर राजनीतिक संबंध नाही, तर मग काय आहे?'

'मुळात विवाह गरजेची गोष्ट नाही. विवाह करणं अनिवार्य नसावं. चुकीच्या व्यक्तीशी लग्न लागण्याइतकी वाईट दुसरी कोणतीही गोष्ट नाही. ज्यांच्याबद्दल खरोखर कौतुक वाटावं अशी व्यक्ती मिळाल्यानंतरच विवाह करावा. जीवनाचा उद्देश समजून घेण्यात आणि तो पूर्ण करण्यात ती व्यक्ती तुम्हाला मदत करू शकते. आणि मग तुम्ही सुद्धा त्या व्यक्तीला तिच्या आयुष्याचा उद्देश साध्य करण्यात मदत करू शकता. अशी व्यक्ती मिळाली तर तिच्याशी जरूर विवाह करावा.'

सीतेनं भुवया उंचावत विचारलं, 'म्हणजे तू एक-पत्नी-पद्धतीचं समर्थन करतोस का? बहुपत्नीत्वाचं नाही? लोक वेगळ्या पद्धतीने विचार करतात.'

'बहुपत्नीत्व बरोबर आहे असं जरी सगळ्यांचं मत असलं तरी ते चूकच आहे.'

'पण बहुतेक लोक, विशेषतः कुलीन, उच्चभ्रू लोक अनेक स्त्रियांशी विवाह करतात.'

'मी करणार नाही. दुसऱ्या पत्नीचा स्वीकार करताना आपण आपल्या पहिल्या पत्नीचा अपमान करत असतो.'

सीतेनं डोकं मागे केलं, त्यामुळे तिची हनुवटी समोर आली. जणू ती त्याला आजमावत होती. तिच्या डोळ्यांत प्रशंसा झळकत होती. खोलीतील वातावरणात सळसळणारी शांतता पसरली

होती. त्याच्याकडे पाहाणाऱ्या तिच्या नजरेत आता ओळख पसरू लागली होती.
'त्या दिवशी बाजारात तूच होतास ना?' तिने विचारले.
'हो.'
'मग मला मदत करायला तू पुढे का आला नाहीस?'
'परिस्थिती तुझ्या नियंत्रणात होती.'
सीता हसली.
आता प्रश्न विचारण्याची पाळी रामची होती. त्याने विचारले, 'रावण इथे काय करतोय?'
'मला माहीत नाही. पण मला माझं स्वयंवर थोडं खाजगी व्हायला हवंय.'
रामला धक्का बसला, पण वरकरणी तो निर्विकार राहिला. त्यानं सीतेला विचारलं, 'म्हणजे तो तुझ्या स्वयंवरात भाग घेण्यासाठी आलाय का?'
'मला हेच सांगितलं गेलंय.'
'आणि मग?'
'म्हणून मी इथे आलेय.'
राम तिच्या पुढे बोलण्याची वाट पाहू लागला.
'तुला धनुष्य-बाण चालवता येतो का?' सीतेनं विचारलं.
रामच्या ओठांवर स्मितरेषा उमटली.
सीतेच्या भुवया उंचावल्या. तिने विचारलं, 'अच्छा? इतकं उत्तम चालवता येतं का?'
सीता आपल्या खुर्चीतून उठली. रामही उठला. मिथिलेच्या पंतप्रधानांनी हात जोडून नमस्कार करत म्हटलं, 'रुद्रदेवांची तुझ्यावर निरंतर कृपा राहो राजकुमार.'
रामने सीताला प्रतिनमस्कार केला. म्हटलं, 'आणि, रुद्रदेव तुझ्यावरही कृपा करो राजकुमारी.'
रामची नजर सीतेच्या मनगटावरल्या रुद्राक्षजटित बांगडीवर गेली. म्हणजे, ती सुद्धा रुद्रदेवांची भक्त होती. रुद्राक्षांवरून रामची नजर घरंगळत सीतेच्या सुंदर, लांब, निमुळत्या बोटांवर गेली. एखाद्या शल्यचिकित्सकाच्या बोटांसारखी तिची बोटे होती. तिच्या डाव्या हातावर असलेली लढाईच्या जखमेची खूण मात्र ती वेगळ्या प्रकारची अवजारं हाताळत असल्याची साक्ष देत होती.
'राजकुमार राम,' सीता म्हणाली, 'मी विचारलं की...'
'माफ करा, पुन्हा विचाराल का?' रामने सीतेच्या बोलण्यावर लक्ष केंद्रित करत विचारलं.
'मी उद्या तुम्हाला आणि तुमच्या भावाला राजमहालाच्या खाजगी उद्यानात भेटू शकेन का?'
'हो, अवश्य.'
'उत्तम,' सीता म्हणाली, मग ती जाण्यासाठी वळली. मग जणू काही आठवल्यासारखी ती पुन्हा थांबली. कंबरेशी खोचलेली एक चंची काढून तिने ती उघडली आणि त्यातून एक लाल धागा काढला. ती तो रामला देत म्हणाली, 'तू उद्या जर हा बांधून आलास तर बरं होईल. हा चांगल्या भाग्यासाठी बांधायचा असतो. हा शुभशकुनाचा धागा आहे....'
रामचं लक्ष दुसऱ्याच विचारांत गुंतलं होतं. त्याचं मन पुन्हा बहकू लागलं होतं. सीतेचं बोलणं त्याच्या कानांपर्यंत पोहोचतच नव्हतं. त्याला कवितेच्या काही ओळी आठवत होत्या, बऱ्याच वर्षांपूर्वी त्यानं एका विवाहप्रसंगी त्या ऐकल्या होत्या.
मांगल्यतंतुनानेना भव जीवनाहेतु मे। संस्कृतमधील या ओळीचा अर्थ आहे – हा पवित्र धागा

तुला अर्पून मी तुला माझ्या जीवनाचा उद्देश बनण्याची विनंती करते....

'राजकुमार राम....' सीता मोठ्या आवाजात म्हणाली.

पद्याची ती ओळ मनात वाजायची अचानक थांबली आणि राम भानावर आला. त्याने स्वतःला सावरलं न् विचारलं, 'माफ कर, काय म्हणालीस?'

सीता सभ्यपणानं हसली. म्हणाली, 'मी म्हणाले की...' ती सुद्धा अचानक बोलता बोलता थांबली. म्हणाली, 'जाऊ दे, मी हे धागे इथे सोडून जातेय. तुला जर वाटलं, तर तू ते बांध हातात.'

धागा तिथेच ठेवून सीता पायऱ्या चढू लागली. दाराजवळ पोहोचल्यावर आणखी एकदा पाहाण्यासाठी ती मागे वळली. रामने तो धागा आपल्या उजव्या हाताच्या तळव्यावर ठेवला होता आणि तो त्याकडे जणू ती जगातील अत्यंत पवित्र वस्तू असल्यासारखा आदराने टक लावून पाहात होता.

मुख्य बाजारात उच्चभ्रू वस्तीकडे जाताना मिथिला नगरीचं सौंदर्य अधिकाधिक मनोवेधक होत होतं. पोळा वस्तीच्या खोलीत सीता येऊन भेटल्याच्या दुसऱ्या दिवशी संध्याकाळी राम आणि लक्ष्मण या दिशेने चालले होते. सभोवताली नजर टाकत लक्ष्मण म्हणाला, 'सुंदर आहे, हो ना दादा?'

आदल्या दिवसानंतर लक्ष्मणाच्या मिथिला नगरीबाबतच्या दृष्टीकोनात आलेला बदल रामला जाणवत होता. ते ज्या रस्त्यावरून चालले होते तो अरुंद होता पण खेड्यातील रस्त्यांसारखा होता. झाडं आणि फुलांच्या ताटव्यांनी सजलेले विभाजक दगडा-मातीने बनलेले होते आणि त्यांची उंची तीन-चार फूट होती. रस्त्यांच्या किनारी झाडांच्या रांगा होत्या. त्यापलीकडे बागा आणि त्यात श्रीमंतांच्या हवेल्या होत्या. या बंगल्यांच्या कुंपणांच्या भिंतींवर खाजगी व्यक्तींच्या आणि कुटुंबाच्या देवतेच्या मूर्ती आणि तसबिरी लावलेल्या होत्या. त्यांना ताजी फुलं वाहिलेली होती. सुगंधी उदबत्या जळत होत्या. यावरून मिथिलेच्या लोकांची आध्यात्मिक प्रवृत्ती दिसून येत होती. मिथिला भक्तांची नगरी होती.

'चला, पोहोचलोच आपण,' लक्ष्मण म्हणाला.

उजव्या बाजूला वळलेल्या एका अरुंद, चक्राकार मार्गावर राम, लक्ष्मणापाठोपाठ वळला. या मार्गावरील दोन्ही बाजूंच्या कुंपणाच्या भिंती बऱ्याच उंच होत्या. त्यामुळे त्यामागे काय असावं याबद्दलचा अंदाज बांधता येत नव्हता.

रामच्या मनातील भाव ओळखल्यागत मिश्किल हसत लक्ष्मणानं विचारलं, 'या भिंतीवरून उडी मारून आत जायचं का?'

कपाळावर आठ्या ओढून राम चालत राहिला.

काही मीटर्सच्या अंतरावर एक सजलेलं लोखंडी फाटक होतं. दोन पहारेकरी फाटकापाशी उभे होते.

'आम्ही पंतप्रधानांना भेटण्यासाठी आलो आहोत,' लक्ष्मण म्हणाला. त्यानं समीचीनं दिलेली अंगठी पुढे केली.

पहारेकऱ्याने अंगठी निरखून पाहिली. त्याचं समाधान झाल्यासारखं वाटलं. त्याने दुसऱ्या

पहारेकऱ्याला फाटक उघडण्याची विनंती केली.

राम-लक्ष्मणाने त्या सुंदर बागेत प्रवेश केला. अयोध्येतील बागेहून ही बाग वेगळी होती. ही बाग हरतऱ्हेच्या झाडांनी बहरली होती. बागेत मोजक्या प्रकारची स्थानिक रोपं आणि वाफे होते. बागेच्या सौंदर्याचं श्रेय अधिक रकमेच्या गुंतवणुकीवर नव्हे तर बागकामात वाकबगार माळ्यांना जात होतं. बागेची योजना प्रमाणबद्ध होती. आणि बाग काळजीपूर्वक वाढवलेली होती. बागेतील दाट हिरव्या गवताची चादर नेत्रसुखद होती. बागेत वेगवेगळ्या आकाराची आणि रंगाची झाडं आणि फुलं भरपूर मोठ्या प्रमाणात होती. शिस्तबद्धरीत्या निसर्गानं इथे स्वतःला व्यक्त केलं होतं.

'राजकुमार राम,' समीची एका झाडाच्या सावलीतून चालत त्यांच्यापुढे आली. आदराने वाकून तिने त्यांना नमस्कार केला.

'नमस्कार,' हात जोडून नमस्कार करत राम म्हणाला.

लक्ष्मणानेसुद्धा समीचीच्या अभिवादनाचे उत्तर दिले आणि तिला अंगठी परत केली. म्हणाला, 'पहारेकरी ही अंगठी ओळखतो.'

'त्यांनी ओळखायलाच हवी,' नगररक्षकदलाची प्रमुख म्हणाली. मग रामकडे वळून ती म्हणाली, 'राजकुमारी सीता आणि उर्मिला आपली वाट पाहात आहेत. माझ्या मागून या.'

राम आणि समीचीच्या मागे जाताना लक्ष्मणाचा चेहरा आनंदाने फुलला होता.

बागेमागच्या मोकळ्या जागेत राम आणि लक्ष्मणाला समीची घेऊन गेली. त्यांच्या पायाखाली मऊशार गवत होतं आणि डोक्यावर संध्याकाळचं मोकळं आकाश.

'नमस्कार, राजकुमारी,' सीता म्हणाली. मग आपल्या बहिणीकडे वळून ती म्हणाली, 'माझ्या छोट्या बहिणीशी, उर्मिलेशी मी आपली ओळख करून देते.' मग उर्मिलेकडे पाहून राम-लक्ष्मणाकडे संकेत करत सीता म्हणाली, 'उर्मिला, हे अयोध्येचे राजकुमार राम आणि लक्ष्मण.'

या कानापासून त्या कानापर्यंत हसून लक्ष्मण म्हणाला, 'काल यांच्या भेटीचा योग आला होता.'

उर्मिला लक्ष्मणाकडे पाहून नम्रपणे हसली. हात जोडून तिने लक्ष्मणाला नमस्कार केला. मग ती रामकडे वळली आणि त्यालाही नमस्कार केला.

'मला आज राजकुमाराशी पुन्हा एकांतात बोलायचं आहे,' राजकुमारी सीता म्हणाली.

'जरूर,' समीची लगेच म्हणाली. 'त्याआधी मी एकांतात आपणाशी थोडं बोलू शकेन का?'

समीची सीतेला बाजूला घेऊन गेली आणि तिच्या कानांत काही कुजबुजली. मग तिने रामकडे एक कटाक्ष टाकला. त्यानंतर उर्मिलेचा हात धरून ती तिला घेऊन तिथून निघून गेली. लक्ष्मण उर्मिलेपाठोपाठ गेला.

रामला वाटलं काल आपली मुलाखत जिथे संपली तेथून पुढे आज सुरू होणार. त्याने सीतेला विचारले, 'राजकुमारी तुला मला भेटायचे होते, ते का?'

समीची आणि इतर सगळे गेल्याची सीतेने खात्री करून घेतली. बोलायला सुरवात करणार तेवढ्यात तिची नजर रामच्या उजव्या मनगटात बांधलेल्या धाग्याकडे गेली. ती हसली. मग म्हणाली, 'राजकुमार, कृपया मला एक मिनिटाचा वेळ द्या.'

सीता एका झाडामागे गेली. वाकून तेथे खोळात गुंडाळून ठेवलेली मोठी वस्तू उचलली. ती घेऊन ती रामजवळ आली. राम उत्सुकतेनं हे सगळं पाहात होता. सीतेने त्या वस्तूवरून खोळ उतरवला तेव्हा रामला आतली वस्तू दिसली. ते एक असामान्य लांबीचं धनुष्य होतं. त्यावर अतिशय नाजूक कोरीवकाम केलं होतं. अत्युत्तम शस्त्र होतं ते. एक संयुक्त धनुष्य ज्याची दोन्ही टोकं मागे वळलेली होती. बहुधा त्यातून निघालेला बाण खूप दूरवर जात असावा. रामने धनुष्याच्या मुठीच्या वरच्या आणि खालच्या भागाच्या आतील बाजूला केलेलं कोरीवकाम लक्षपूर्वक पाहिलं. त्यावर ज्योतीचं चित्र रेखाटलेलं होतं. ज्योत म्हणजे अग्नीदेवतेचं प्रतीक. अत्यंत पूज्य असलेल्या अग्निदेवतेला ऋग्वेदाच्या पहिल्या अध्यायातील पहिला श्लोक समर्पित होता. पण या ज्योतीची आकृती रामला ओळखीची वाटली. कारण या ज्योतीतून निघालेले किरण बाहेरच्या बाजूला झेपावत होते.

सीतेने कापडी पिशवीतून एक चपटे लाकडी धनुष्यपीठ ओढून बाहेर काढले आणि विधिवत ते जमिनीवर ठेवले. मग तिने रामकडे पाहिले. म्हणाली, 'या धनुष्याला जमिनीचा स्पर्श होता कामा नये.'

रामच्या चेहऱ्यावर थोडी नापसंती आली-गेली. त्याला वाटलं या धनुष्यात एवढं आहे तरी काय? सीतेने धनुष्याचा खालचा भाग त्या पीठावर टेकवला. स्थिरतेसाठी त्याला आपल्या पायाचा आधार दिला. उजव्या हाताने तिने जोर लावून धनुष्याचे दुसरे टोक ओढून खाली आणले. यामुळे तिच्या खांद्यावर आणि दंडावर पडलेल्या जोरामुळे रामच्या लक्षात आलं की हे धनुष्य अतिशय मजबूत आहे आणि त्याला वाकवणं अत्यंत जिकिरीचं आहे. डाव्या हाताने तिने धनुष्याची दोरी ओढली आणि पटकन वरच्या टोकावर टांगली. मग तिने धनुष्याचे वरचे टोक सोडून त्याला पूर्वपदी जाऊ दिले. मग श्वास मोकळा करत अंग सैल सोडले. दोरीच्या क्षमतेनुसार धनुष्य ताणले गेले. तिने मग डाव्या हातावर धनुष्य पेलून प्रत्यंचा ताणली आणि सोडून दिली. सोडलेल्या दोरीतून मोठा 'टॅंग' असा आवाज आला.

प्रत्यंचेच्या आवाजावरून रामने ताडलं की हे धनुष्य खास आहे. आजपर्यंत त्याने धनुष्याच्या ताणलेल्या प्रत्यंचेचे जितके आवाज ऐकले होते त्यांच्याहून हा आवाज खूप मोठा होता. तो म्हणाला, 'अरे वा:! हे एकदम उत्तम धनुष्य आहे!'

'हे सगळ्यात उत्तम धनुष्य आहे.'

'हे धनुष्य तुझं आहे का?'

'माझ्याजवळ असं धनुष्य असणं शक्य नाही. मी फक्त या धनुष्याची सध्या काळजीवाहक आहे. माझ्या मृत्यूनंतर इतर कुणाकडे ही जबाबदारी सोपवली जाईल.'

धनुष्याच्या मुठीजवळची ज्योतीची चित्रे पाहाताना रामने डोळे बारीक केले. पाहाता पाहाता तो म्हणाला, 'या ज्योती थोड्या.....'

सीता मध्येच म्हणाली, 'हे धनुष्य एकेकाळी त्याचं होतं ज्याची आपण दोघे पूजा करतो. अजूनही हे त्याचंच आहे.'

रामला आश्चर्याचा धक्का बसला. अचंभित होऊन तो धनुष्याकडे पाहात राहिला. त्याच्या मनात आलेल्या विचारांना दुजोरा देत सीतेनं त्याला सांगितलं.

हसत सीता म्हणाली, 'होय, हे पिनाक आहे.'

पिनाक हे पूर्वीच्या महादेवाचं म्हणजे रुद्रदेवांचं परंपरागत धनुष्य होतं. आजपर्यंत निर्मिलेल्या

धनुष्यांमध्ये ते सर्वात अधिक मजबूत धनुष्य होतं. कित्येक धातुंच्या मिश्रणाने ते बनविलेलं होतं अशी आख्यायिका होती. त्याची कोणत्याही प्रकारे हानी होऊ नये म्हणून त्यावर एकामागून एक असे कित्येक उपचार केलेले होते. हे धनुष्य सांभाळणंसुद्धा सोपं नाही अशी वदंता होती. मूठ, वक्राकार आणि दोन्ही टोकाच्या मागे वळलेल्या धनुष्याच्या भागांना नियमीतपणे खास तेलाचं वंगण द्यावं लागत असे.

अर्थातच सीता हे काम व्यवस्थितपणे करत असे. त्यामुळेच धनुष्य अगदी नव्यासारखं टिकून होतं.

'मिथिलेला पिनाक कसे मिळाले?' रामने विचारले. त्या सुंदर शस्त्रावरून त्याची नजर हालत नव्हती.

'फार मोठी गोष्ट आहे ती,' सीता म्हणाली, 'पण तू या धनुष्याचा सराव करावास अशी माझी इच्छा आहे. उद्या स्वयंवरात याच धनुष्याचा वापर करण्यात येणार आहे.'

राम एक पाऊल मागे सरकला. त्याकाळी कित्येक प्रकारे स्वयंवर आयोजित केलं जायचं. त्यापैकी दोन प्रकार असे होते – वधु स्वतः आपल्या पसंतीने वराची निवड करे किंवा तिच्या वतीने स्पर्धा घेतली जाई. या स्पर्धेत जिंकणाऱ्याशी वधूचा विवाह होई. पण स्वयंवरात भाग घेणाऱ्या वराला आधीच माहिती आणि मदत देण्याची पद्धत मात्र नियमांच्या विरुद्ध होती.

रामने नकारार्थी डोकं हालवलं. तो म्हणाला, 'ज्या धनुष्याला कधी रुद्रदेवांचा स्पर्श झाला होता त्याला स्पर्श करायला मिळणे हा सुद्धा सन्मानच आहे. पण मी हे उद्याच करेन, आज नाही.'

सीतेच्या कपाळावर नाराजीच्या आठ्या उमटल्या.

ती म्हणाली, 'मला वाटलं, तुला माझा हात जिंकायचाय.'

'होय, मला नीट रीतीनं जिंकायचंय. मी नियमानुसारच जिंकू इच्छितो.'

सीता हासली. तिला एकाच वेळी भीती आणि आनंद वाटत होता.

'तुला हे पटत नाहीय का?' रामने तिला विचारलं. त्याचा थोडा अपेक्षाभंग झाल्यासारखा वाटत होता.

'नाही, तसं नाही. मला फारच आवडलं. तू वेगळा आहेस, राजकुमार राम.'

राम लाजला. त्याच्या डोक्यात प्रचंड गोंधळ माजलेला होता, तरी त्याचं हृदय जोरजोरात धडकू लागलं होतं.

'उद्या सकाळी या धनुष्यातून बाण सोडशील आणि ते मी पाहीन,' सीता म्हणाली.

# प्रकरण 23

स्वयंवराचं आयोजन दरबाराऐवजी धर्मभवनात केलं होतं. कारण दरबाराचा दीवाणखाना फारसा मोठा नव्हता. राजवाड्याची मुख्य इमारत राजा जनकांनी मिथिला विद्यापीठाला दिली होती. त्या इमारतीतच धर्मभवनसुद्धा होतं. या भवनात नेहमी धर्माचं स्वरूप, देवाचं स्वरूप, मानवी जीवनयात्रेचा उद्देश, कर्म-धर्माचा संबंध इत्यादी विविध आध्यात्मिक विषयांवर चर्चासत्रं चालत. राजा जनक तत्वज्ञानी होते. आपल्या राज्याची सारी साधनं त्यांनी बौद्धिक आणि आध्यात्मिक विषयांवर केंद्रित केली होती.

धर्म भवन दगड-गाऱ्यानं बांधलेल्या एका गोल इमारतीत होतं. या इमारतीवर प्रचंड आकाराचा एक घुमट होता. भारतात असा घुमट इतरत्र क्वचितच कुठे पहायला मिळाला असता. घुमटाचं नाजुक सौंदर्य स्त्रीत्वाचं आणि मंदिराचा मनोरा हा पुरुषत्वाचं प्रतीक आहे असं मानलं जाई. धर्मभवन राजा जनकांच्या राज्यकारभाराविषयक दृष्टीकोणाचं प्रतीक होतं. त्यातून सगळ्यांना विद्येप्रती प्रेम आणि आदरमिश्रीत समानतेची भावना दिसून येई. आणि म्हणूनच भवनाचा आकार गोल होता. सर्व ऋषी येथे समान स्तरावर स्थान ग्रहण करत. चर्चेची सूत्रं सांभाळणारा प्रमुख येथे कोणी नसे. त्यामुळे पुरेपूर अभिव्यक्तीस्वातंत्र्यासह तेथे विविध विषयांवर अत्यंत मोकळेपणाने आणि निर्भयपणे वादविवाद घडत.

पण आजची गोष्ट निराळी होती. आज तेथील बैठकीसमोरच्या बाकांवर कोणतीही पांडुलिपी पडलेली नव्हती. बोलण्यासाठी ऋषी शिस्तबद्ध होऊन आपलं मत व्यक्त करणारं भाषण देण्यासाठी सभेच्या केंद्रस्थानी जात-येत नव्हते. आज धर्मभवन स्वयंवराचं यजमानपद भूषविण्यासाठी सज्ज झालं होतं.

प्रवेशद्वाराजवळ तीन रंगांची अस्थायी दर्शकदीर्घा उभी केली होती. दुसऱ्या टोकाला लाकडी व्यासपीठावर भव्य राज सिंहासन होतं. सिंहासनाच्या मागे एका उंच बैठकीवर मिथिलेचे संस्थापक राजा मिथींचा पुतळा ठेवलेला होता. राजाच्या सिंहासनाच्या उजव्या-डाव्या बाजूनं दोन थोडी कमी भव्य आसनं मांडलेली होती. दीवाणखान्याच्या मध्य भागात गोलाकारात काही आरामदायक आसनं मांडलेली होती. या आसनांवर स्वयंवरात भाग घेणारे राजे आणि युवराज बसणार होते.

अरिष्टानेमी जेव्हा राम आणि लक्ष्मणाला घेऊन तेथे आले तेव्हा दर्शकदीर्घा लोकांनी पूर्ण भरलेली होती. स्वयंवरात भाग घेणारे बहुतेक प्रतिस्पर्धीसुद्धा स्थानापन्न झाले होते. राम आणि लक्ष्मण योग्यांच्या वेषात होते. त्यामुळे अयोध्येच्या या राजकुमारांना कुणीही ओळखलं नव्हतं. एका पहारेकऱ्यानं त्यांना दर्शकदीर्घेतील पहिल्या रांगेकडे जाण्याची खूण केली. ही रांग मिथिलेच्या कुलीन आणि श्रीमंत व्यापाऱ्यांसाठी राखीव होती. अरिष्टानेमींनी पहारेकऱ्याला सांगितले की त्यांच्यासोबत प्रतिस्पर्धी आहेत. पहारेकऱ्याला आश्चर्य वाटलं पण तो महान विश्वामित्रांच्या अंमलदाराला ओळखत होता. त्याने बाजूला होत या तिघांना पुढे जाऊ दिलं. धर्मपरायण राजा जनकांनी आपल्या मुलीच्या स्वयंवरासाठी केवळ क्षत्रिय राजांनाच नव्हे तर ब्राह्मण ऋषींनासुद्धा बोलावलं असावं हे तो जाणत होता. धर्मभवनाच्या भिंतींवर महर्षी

सत्यकाम, महर्षी याज्ञवल्क्य, विदुषी गार्गी, विदुषी मैत्रेयींसह इतर प्राचीन ऋषी आणि विदुषींच्या तसबिरी लावलेल्या होत्या. रामला वाटलं –या महान पूर्वजांचे वंशज असूनही आपण किती नालायक झालो आहोत. विदुषी गार्गी आणि विदुषी मैत्रेयी ज्ञानी होत्या आणि आज काही मूर्ख असे आहेत जे स्त्रियांना धर्मग्रंथ वाचू देण्याची किंवा नवे ग्रंथ लिहिण्याची परवानगी नाकारत आहेत. महर्षी सत्यकाम एका शूद्र अविवाहित स्त्रीचे पुत्र होते. त्यांचे सखोल ज्ञान आणि शहाणपण आपल्या महानतम उपनिषदांमध्ये जपून ठेवलेलं आहे. आणि आज काही क्षुद्र मानवरूपी अळ्या अशा आहेत ज्यांचं म्हणणं आहे की शूद्र व्यक्ती ऋषी बनू शकत नाहीत.

रामने या महान प्राचीन ऋषींना हात जोडून आणि मान लववून नमस्कार केला. जन्माने नव्हे तर आपल्या कर्माने माणूस ब्राह्मण होतो.

मागून रामाच्या खांद्याला स्पर्श करत लक्ष्मण म्हणाला, 'दादा...'

राम आपल्याला मिळालेल्या जागेकडे निघाला. राम आपल्या जागेवर बसला तेव्हा अरिष्टानेमी आणि लक्ष्मण त्याच्या मागे उभे राहिले. सगळ्यांच्या नजरा राम आणि लक्ष्मणावर खिळल्या. सर्व प्रतिस्पर्ध्यांना वाटले, स्वयंवरात सीतेला जिंकण्यासाठी आमच्या बरोबर स्पर्धा करायला हे कोण भिकारी आले? मात्र त्यांच्यापैकी काहींनी राजकुमार राम आणि लक्ष्मणाला ओळखले. प्रतिस्पर्ध्यांच्या एका गटात लगेच दबक्या आवाजात कुजबूज सुरू झाली.

'अयोध्या....'

'अयोध्या मिथिलेशी संबंध का जोडू इच्छिते?'

लोकांच्या नजरा आणि कुजबूज रामपर्यंत पोहोचली नव्हती. त्याचं मन वेगळ्याच ठिकाणी गुंतलेलं होतं. दिवाणखान्याच्या मध्यभागी एका आलीशान छोट्या मंचावर तेच धनुष्य ठेवलेलं होतं. टेबलाशेजारी जमिनीवर एक मोठं, तांब्याचा मुलामा दिलेलं जलकुंड होतं.

रामची नजर आधी पिनाकवर रेंगाळली. त्यावर अजून प्रत्यंचा चढलेली नव्हती. धनुष्याशेजारी काही बाणही ठेवलेले होते.

प्रतिस्पर्ध्यांना आधी धनुष्य उचलून त्यावर प्रत्यंचा चढवायची होती. हे सोपं काम नव्हतं. पण खरी अवघड कामगिरी त्यानंतर सुरू होणार होती. प्रतिस्पर्ध्यानं त्यानंतर तांब्याचा मुलामा दिलेल्या जलकुंडापाशी जायचं होतं. जलकुंड पाण्यानं भरलेलं होतं. भरलेल्या जलकुंडात एकीकडे लावलेल्या बारीक नळीतून थेंब थेंब पाणी ठिबकत होतं. दुसऱ्या बाजूला लावलेल्या आणखी एका नळीतून जास्त झालेलं पाणी वाहून जात होतं. कायम थेंबाथेंबानं ठिबकणाऱ्या पाण्यामुळे जलकुंडातील पाण्यावर तरंग उठत होते. जलकेंद्राच्या मध्यापासून ते काठापर्यंत पसरत जात होते. त्रासदायक बाब ही की पाण्याचे थेंब अनियमीतपणे पडत होते. त्यामुळे त्यावर उठणारे तरंगसुद्धा अनपेक्षित उमटत होते.

घुमटाच्या आधारे जमिनीपासून साधारण शंभर मीटर्सच्या उंचीवर एक चाक टांगलेलं होतं. या चाकाच्या आसावर एक हिलसा मासा ठोकून बसवलेला होता. सुदैवानं हे चक्र मात्र नियमीत गतीनं फिरत होतं. प्रतिस्पर्ध्यांनी जमिनीवरील जलकुंडातील अस्थिर पाण्यात या माशाचं प्रतिबिंब पाहून पिनाक धनुष्यातून बाण सोडून वर अधांतरी फिरणाऱ्या चाकावरील हिलसा माशाचा डोळा फोडायचा होता. ज्याला या कामात सर्वांआधी यश मिळेल त्याला राजकुमारी सीता मिळणार होती.

'तुझ्यासाठी हे फारच सोपं आहे, दादा!' लक्ष्मण खोडकरपणे म्हणाला, 'मी त्यांना ते वरचं

चक्रसुद्धा अनियमीत गतीनं फिरवा असं सांगू का? किंवा बाणांमागे दिशा देण्यासाठी लावलेल्या पिसांमध्ये बदल करण्याचं सुचवू का? काय म्हणतोस?'

रामने आपल्या भावाकडे पाहात डोळे वटारले.

लक्ष्मण हसत म्हणाला, 'चुकलो दादा, क्षमा कर.'

तो मागे सरकला तेवढ्यात महाराज जनकांच्या आगमनाची ललकारी झाली -

'मिथी वंशाचे स्वामी, बुद्धिमानांमध्ये बुद्धिमान, ऋषींचे लाडके, महाराज जनक येत आहेत हो!'

यजमान आणि मिथिलेचे राजा जनकांच्या स्वागतार्थ उपस्थित लोक उठून उभे राहिले. धर्मसभेच्या दुसऱ्या दरवाजाने ते सभेत आले. पण ते स्वतः पुढे चालत नव्हते. परंपरेला बगल देत ते ऋषी विश्वामित्रांच्या मागून चालत दरबारात प्रविष्ट झाले. जनकांच्या मागोमाग त्यांचे छोटे भाऊ आणि सांकष्यचे राजे कुशध्वज होते. विचित्र गोष्ट म्हणजे महाराज जनकांनी ऋषी विश्वामित्रांना मिथिलेच्या सिंहासनावर बसण्याची विनंती केली. ते स्वतः मुख्य सिंहासनाच्या उजव्या बाजूला असलेल्या दुसऱ्या आणि लहान खुर्चीकडे वळले. महर्षींच्या मुख्य खुर्चीच्या डाव्या बाजूला असलेल्या तसल्याच दुसऱ्या खुर्चीकडे कुशध्वज वळले. दरबाऱ्यांच्या रांगांमधून कुजबूजीचा आवाज येऊ लागला कारण राजा आणि महर्षींची बसण्याची व्यवस्था शिष्टाचाराला अनुसरून नव्हती.

बसण्याच्या या अपारंपरिक व्यवस्थेमुळे कुजबूज वाढली पण रामचं लक्ष दुसऱ्याच एका गोष्टीनं वेधून घेतलं होतं. आपल्यामागे बसलेल्या लक्ष्मणाकडे तो वळला. छोट्या भावानं जणू रामच्या भावनेला शब्द दिले. तो म्हणाला, 'रावण कुठे आहे?'

धर्मभवनाच्या प्रवेशद्वारापाशी टांगलेल्या एका मोठ्या घंटेवर भालदारानं दांडुका आपटला. सगळ्यांना ही गप्प राहाण्याची सूचना होती.

विश्वामित्रांनी घसा खाकरला आणि ते मोठ्या आवाजात बोलू लागले. धर्मभवनात ध्वनिक्षेपणासाठी केलेल्या विशेष व्यवस्थेमुळे सभेत उपस्थित सगळ्यांपर्यंत त्यांचा आवाज स्पष्ट रूपात पोहोचत होता. ते म्हणाले, 'भारतातील बुद्धीमान आणि आध्यात्मिक राजा जनक यांच्याद्वारे आयोजित केलेल्या या सभेत आपणा सर्वांचं स्वागत आहे.'

राजा जनकांच्या चेहऱ्यावर हसू झळकले.

विश्वामित्र पुढे म्हणाले, 'मिथिलेच्या राजकन्या सीताने या स्वयंवरात गुप्तरूपे उपस्थित रहाण्याचे योजिले आहे. ती आपल्यासोबत इथे या हॉलमध्ये येणार नाही. इथे स्पर्धेत भाग घेणारे महान राजे आणि राजकुमार.......'

अचानक होउ लागलेल्या कित्येक शंखांच्या कर्कश्श ध्वनीमुळे महर्षींना आपलं बोलणं मध्येच थांबवावं लागलं. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, एरवी केवळ अत्यंत गोड आणि आनंददायक आवाज निघणाऱ्या शंखांमधून आज एवढा कर्कश्श आणि कानठळ्या बसविणारा आवाज निघत होता. प्रत्येकाचं लक्ष आवाज जिथून येत होता तिकडे, म्हणजे हॉलच्या दरवाजाकडे गेलं. पंधरा उंच, दणकट योध्यांनी धर्म भवनामध्ये प्रवेश केला. त्यांच्या हातात काळ्या रंगाचे झेंडे होते. आणि त्या झेंड्यांवर लपलपणाऱ्या ज्वाळांमधून डरकाळी फोडत झेप घेणाऱ्या सिंहाचं चित्र होतं. योद्धे कडक शिस्तीचं पालन करत चालले होते. त्यांच्या मागे दोन दैत्याकार माणसं होती. त्यापैकी एक प्रचंड उंच, लक्ष्मणाहून उंच होता. तो गलेलठ्ठ होता. पण त्याचं शरीर पिळदार आणि कमावलेलं होतं. त्याचं पोट मात्र प्रचंड मोठं आणि थुलथुलीत होतं. प्रत्येक पावलागणिक

ते हालत होतं. त्याच्या संपूर्ण शरीरावर अस्वलासारखे केस होते. उपस्थितांना किळस वाटावी अशा रीतीने त्याच्या कानांतून आणि खांद्यांवरही विचित्र रीत्या दाट केस उगवलेले होते. तो नागा होता. रामला आठवलं की पुष्पक विमानातून सर्वांआधी तोच उतरला होता.

त्याच्या शेजारी गर्विष्ठ रावण चालला होता. त्यानं आपलं मस्तक उंच ठेवलं होतं. तो किंचित लंगडत चालला होता. कदाचित वाढत्या वयामुळे त्याची चाल बदलली होती.

या दोघा व्यक्तींमागे आणखी पंधरा सैनिक होते. सैनिक म्हणण्यापेक्षा त्यांना अंगरक्षक म्हणणं जास्त योग्य ठरलं असतं.

रावणाचा हा लवाजमा केंद्रस्थानी पोहोचला आणि रुद्रदेवांच्या धनुष्याशेजारी येऊन उभा राहिला. मुख्य अंगरक्षकानं मग मोठ्या आवाजात घोषणा केली, 'राजाधिराज, सम्राटांचे सम्राट, तिन्ही लोकांचे शासक, देवांना प्रिय, महाराज रावण येत आहेत हो!'

पिनाक जवळ बसलेल्या एका छोट्या राज्याच्या राजाच्या दिशेनं रावण निघाला. त्यानं घशातून हलकासा खाकरल्यासारखा आवाज काढला आणि मान उजवीकडे झटकली. सहज केलेल्या त्याच्या या इशाऱ्यातून त्याला काय म्हणायचंय हे अगदी सहज स्पष्ट होत होतं. तो राजा लगेच आपल्या जागेवरून उठला आणि घाईघाईने तेथून निघून गेला. दुसऱ्या एका प्रतिस्पर्ध्याच्या मागे जाऊन तो उभा राहिला. रावण त्या खुर्चीपर्यंत गेला पण बसला नाही. त्यानं आपला उजवा पाय त्या खुर्चीवर ठेवला आणि आपला हात त्यावर टेकवला. अगडबंब अस्वलासारख्या दिसणाऱ्या त्या माणसासह त्याचे सर्व अंगरक्षक त्याच्या मागे शिस्तीने उभे राहिले. शेवटी रावणाने विश्वामित्रांवर सहज नजर टाकली अन् म्हणाला, 'चालू द्या, महान मलयपुत्र.'

मलयपुत्रांचे प्रमुख असलेल्या विश्वामित्रांना भयंकर राग आला. त्याआधी कधीही कुणी त्यांना एवढी अपमानास्पद वागणूक दिली नव्हती.

'रावण....' ते गुरगुरले.

रावण उद्धटपणे त्यांच्याकडे पाहात राहिला.

विश्वामित्रांनी आपल्या रागाला आवर घातला. त्यांच्यावर एका महत्वपूर्ण कामाची जबाबदारी होती. रावणाचं काय करायचं ते नंतर पाहाता येईल असं त्यांनी स्वतःला बजावलं. ते म्हणाले, 'राजकुमारी सीताने महान राजे आणि युवराजांनी ज्या क्रमात स्वयंवरात भाग घ्यायचा आहे ते सांगितले आहे....'

विश्वामित्रांचं बोलणं मध्येच तोडत रावण पिनाकच्या दिशेने पुढे निघाला. मलयपुत्रांची घोषणा संपते न संपते तो रावणानं पिनाक उचलण्यासाठी हात पुढे केला. विश्वामित्र त्याला म्हणाले, 'धनुष्य उचलण्यासाठी पहिला क्रमांक अयोद्येचा राजा रामचा आहे रावणा, तुझा नाही.'

धनुष्यापासून काही इंचांवर रावणाचा हात थांबला. त्याने विश्वामित्रांकडे पाहिलं आणि मागे वळून कुणी विश्वामित्रांच्या बोलण्याला प्रतिसाद दिला ते पाहिलं. योग्यांच्या वेषातील, साधी पांढरी वस्त्रं ल्यायलेल्या एका तरुणावर त्याची नजर गेली. त्याच्यामागे आणखी एक तरुण आणि धिप्पाड युवक उभा असलेला त्याला दिसला. त्याच्यासोबत अरिष्टानेमी उभे होते. रावणाने आधी अरिष्टानेमींकडे खुनशीपणाने पाहिलं. आणि मग रामाकडे त्याची नजर वळली. नजरेनं कुणाला जर मारता आलं असतं तर त्या दिवशी रावणानं काही खून तेथे नक्कीच पाडले असते. तो विश्वामित्र, जनक आणि कुशध्वजाच्या दिशेनं वळला. गळ्यातील बोटाच्या

हाडाभोवती त्याची बोटे आवळली गेली. मोठ्या आणि कर्कश्श आवाजात गुरकावत तो म्हणाला, ‘माझा अपमान झालाय!’

रामने पाहिलं की रावणामागे उभे असलेल्यांपैकी आकाराने प्रचंड असलेल्या त्या अस्वलासारख्या माणसाची मान लक्षात येईल-न-येईलशी खेदानं हालतेय. त्याला बहुतेक या ठिकाणी आल्याचा पश्चाताप होत असावा.

रागाने थरथर कापत रावण म्हणाला, ‘जर एखाद्या नवशिक्याला आधी स्पर्धेत उतरवायचं होतं तर मग मला कशासाठी बोलावलं?’

राजा जनकांनी आधी त्रासिक मुद्रेनं कुशध्वजांकडे पाहिलं, मग ते रावणाकडे वळून क्षीण स्वरात म्हणाले, ‘लंकेच्या महान राजा, हे स्वयंवराचे नियम आहेत.....’

इतर कुणी काहीही बोलण्याआधी त्या अस्वलासारख्या दिसणाऱ्या माणसाचा वादळासारखा आवाज घुमला. तो म्हणाला, ‘पुरे झाला आता हा बाष्कळपणा.’ मग रावणाकडे वळून तो म्हणाला, ‘दादा, चल उचल धनुष्य.’

अचानक खाली वाकून रावणानं पिनाक उचललं. कुणाकडून काही प्रतिक्रिया येण्याआधी त्याने धनुष्यावर प्रत्यंचा चढवली आणि त्यावर बाण टेकवला. रावणानं विश्वामित्रांकडे बाणाची दिशा केली तेव्हा सगळेच हादरले. लक्ष्मणालासुद्धा या माणसाच्या शक्ती आणि कौशल्याची नोंद घ्यावी लागली.

विश्वामित्र उठून उभे राहिले तसे गर्दीतून भीतीचे उद्गार निघाले. विश्वामित्रांनी आपले उत्तरीय बाजूला फेकले आणि छातीवर बंद मुठीने प्रहार करत म्हणाले, ‘चालव बाण, रावणा!’

ऋषींच्या या योद्ध्यासारख्या वर्तनानं राम अवाक् झाला. ज्ञानी पुरुषामध्ये असं असामान्य साहस क्वचितच पाहायला मिळतं. अर्थात विश्वामित्र एकेकाळी योद्धा होतेच.

महर्षींचा आवाज धर्म भवनात घुमला. ते म्हणाले, ‘चल! असेल अंगात खमक तर चालव बाण!’

रावणानं बाण सोडला. तो विश्वामित्रांच्या मागे असलेल्या सम्राट मिथींच्या पुतळ्यावर आदळला. बाणानं त्या प्राचीन राजाच्या पुतळ्याचं नाक उडवलं. राम रावणाकडे पाहात राहिला. त्याच्या मुठी रागाने वळलेल्या होत्या. हे त्याच्या एकूण चरित्राशी विसंगत होते. आपल्या नगराच्या संस्थापकाच्या या अपमानाला आव्हान देण्यासाठी एकही मिथिलेचा निवासी पुढे आला नाही.

राजा जनकांनी कुशध्वजाकडे उग्र कटाक्ष टाकला. रावणानं त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं. त्यानं धनुष्य जिथे ठेवलेलं होतं तिथे ते फेकलं आणि तो दाराच्या दिशेनं चालू लागला. त्याच्या मागे त्याचे अंगरक्षकही निघाले.

या सर्व गदारोळात अस्वलासारखा दिसणारा तो माणूस पुढे आला. त्याने पिनाकवर चढवलेली दोरी सोडवली आणि दोन्ही हातांत धरून आदरानं धनुष्यावर कपाळ टेकवलं जणू काय तो पिनाकची माफी मागत होता. तो वळला आणि रावणामागोमाग धर्म भवनाबाहेर निघून गेला. तो नजरेआड होईपर्यंत रामची नजर त्याच्यावर खिळून राहिली.

लंकेचा शेवटचा योद्धा भवनातून बाहेर पडला आणि त्यांच्याकडे लागलेल्या भवनातील सगळ्यांच्या नजरा लगेच दाराकडून भवनाच्या दुसऱ्या टोकाला बसलेल्या तिघांकडे – विश्वामित्र, जनक आणि कुशध्वजांकडे गेल्या.

आता हे काय करतील?

जणू काही घडलंच नाही अशा रीतीनं विश्वामित्रांनी आपलं बोलणं पुढे चालू ठेवलं. ते म्हणाले, ‘स्पर्धेची सुरवात होऊ दे.’

भवनातील लोक निश्चल बसून राहिले. घडलेल्या घटनेमुळे जणू ते जड झाले होते. विश्वामित्र पुन्हा बोलू लागले. यावेळी त्यांचा स्वर थोडा चढा लागला होता. ते म्हणाले, ‘प्रतिस्पर्धा सुरू होऊ दे. राजकुमार राम, कृपया पुढे या.’

राम उभा राहिला. पिनाकच्या दिशेने तो पुढे गेला. त्याने झुकून सगळ्यांना आदरानं वंदन केलं. दोन्ही हात जोडून नमस्कार केला आणि मंद स्वरात एक प्राचीन प्रार्थना म्हणाला, ‘ओम् रुद्रये नमः’ - ब्रह्मांड रुद्रदेवाला नमस्कार करतं, मी रुद्रदेवांना नमस्कार करतो.

त्यानं आपलं उजवं मनगट उचललं आणि त्यावर लागलेल्या लाल धाग्यानं आपल्या दोन्ही डोळ्यांना स्पर्श केला. तेव्हा त्याला वाटलं की आपल्या सर्वांगात वीज सळसळली. रुद्रदेवांप्रती त्याच्या भक्तीनं असं घडलं की धनुष्यानं निःस्वार्थीपणानं आपल्यात जमा झालेली शक्ती अयोध्येच्या राजपुत्राच्या शरीरात पसरवली? केवळ सत्य घटनांवर ज्यांचा विश्वास असतो ते जे घडलं त्याचं विश्लेषण करतील. ज्यांचं विद्वत्तेवर प्रेम आहे ते या क्षणाचा आनंद लुटतील. धनुष्याला पुन्हा स्पर्श करताना रामनं या घटनेचा पुरेपूर आनंद लुटला. मग त्याने आपलं डोकं धनुष्यावर टेकवलं आणि धनुष्याकडून आशिर्वाद मागितले. धनुष्य सहज उचलताना रामचा श्वासोच्छवास अगदी सहज गतीनं चालला होता. कुशध्वजांशेजारी बनलेल्या जाळीच्या खिडकीआड सीता बसली होती. श्वास रोखून ती एकटक रामकडे पाहात होती.

रामने धनुष्याचं एक टोक जमिनीवर ठेवलेल्या लाकडी खाचेत बसविलं. त्यानं पिनाकचं वरचं टोक जेव्हा दोरी चढविण्यासाठी खाली खेचलं आणि धनुष्याची दोरी वर ओढून धरली तेव्हा त्याच्या दंडातील स्नायू ताणले गेले. हे काम करायला त्याच्या शरीराला बरेच परिश्रम करावे लागले. पण त्याच्या चेहऱ्यावर एकही आठी उमटली नाही. आणखी थोडा ताण वाढवून त्याने धनुष्याचं टोक आणखी थोडं खाली वाकवलं आणि त्यावर दोरी ताणली. त्यानंतर त्याने जेव्हा धनुष्याचं ताणलेलं टोक सोडून दिलं. तेव्हा त्याच्या दंडावरील स्नायूसुद्धा शिथिल झाले. त्यानं प्रत्यंचा आपल्या कानांपर्यंत ताणली आणि सोडली तेव्हा ‘टैंग’ असा आवाज अगदी स्पष्ट ऐकू आला.

त्याने एक बाण उचलला आणि जाणून बुजून सावकाश चालत तांब्याचा मुलामा असलेल्या जलकुंडापाशी आला. एक गुडघा टेकून, पाठ सरळ ठेवून तो ताठ उभा राहिला आणि धनुष्य डोक्यावर आडवं धरलं. मग त्यानं कुंडात पाहिलं. वर टांगलेल्या माशाचं प्रतिबिंब जलकुंडातील पाण्यात गोल फिरत होतं. तरंगांच्या लहरींनुसार शहारणारं पाणी त्याला जणू हतोत्साहित करण्याचा प्रयत्न करत होतं. रामने इतर सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करत माशावर लक्ष केंद्रित केलं. त्यानं धनुष्यावर बाण चढवला. दोरीत अडकवला आणि उजव्या हातानं हळूहळू मागे खेचला. त्याची पाठ ताठ होती. आणि स्नायूंवर योग्य ताण आला होता. त्याचा श्वासोच्छवास स्थिर लयीत चालला होता. तीच लय त्याच्या जागृत मनाची होती आणि प्रतिसाद देण्याऱ्या ब्रह्मांडाची लय सुद्धा त्याच्या लयीशी जुळून आली होती. त्यानं स्वतःला वरच्या उच्च शक्तीला वाहिलं आणि दोरी कानापर्यंत खेचून त्यावर टिकविलेल्या बाणासह सोडली. बाण वर गेला आणि त्यासोबत पाहाणाऱ्या सर्व लोकांच्या नजरासुद्धा वर गेल्या. प्रचंड वेगानं जाणाऱ्या बाणाचा

आणि त्यापाठोपाठ तो लाकडात घुसल्याचा आवाज भवनात घुमला.

रामच्या बाणानं माशाचा उजवा डोळा फोडला होता. आणि तो लाकडी चाकात रुतुन बसला होता. चाक लयीत गोल फिरत राहिलं आणि त्यासोबत बाणही फिरत राहिला. जलकुंडातील लहरणाऱ्या पाण्यावर नजर असतानाच रामला आसपासच्या परिस्थितीची जाण आली. तो हसला. बाणानं निशाणा साधला म्हणून नव्हे, तर अचूक लक्ष्यवेध केलेल्या बाणामुळे त्याला स्वतःच्या पूर्णत्वाची जाण आली म्हणून. त्या क्षणापासून तो एकटा उरला नव्हता.

आपल्याला कौतुक वाटणाऱ्या स्त्रीच्या सन्मानार्थ तो मनोमन कुजबुजला, कित्येक शतकांपूर्वी रुद्रदेवांनीसुद्धा देवी मोहिनींना तेच म्हटलं होतं. मी आज परिपूर्ण झालो, तू मला परिपूर्ण केलंस.

# प्रकरण 24

रामने ज्या दिवशी स्वयंवर जिंकलं त्याच दिवशी दुपारी अत्यंत साधेपणानं, काही धार्मिक विधी पूर्ण करून राम आणि सीता यांचा विवाह झाला. सीतेने सुचवलं की ज्या मुहूर्तावर त्यांचा विवाह होणार होता त्याच सुमुहूर्तावर लक्ष्मण आणि उर्मिलाचा विवाह सुद्धा व्हावा. ऐकून राम चकित झाला पण त्याला आश्चर्याचा दुसरा धक्का बसला जेव्हा सीतेच्या या सूचनेचं पालन करण्यासाठी लक्ष्मण उत्साहानं तयार झाला. त्यानुसार ठरलं की दोन्ही जोडप्यांचा विवाह मिथिला नगरीत होईल जेणेकरून सीता आणि उर्मिला या राम आणि लक्ष्मणासोबत अयोध्येला जाऊ शकतील. अर्थातच अयोध्येत पोहोचल्यानंतर रघुवंशीयांना अनुरूप असा भव्य सोहोळा अयोध्येतही पार पाडला जाईल.

शेवटी एकदाचा राम आणि सीता यांना एकांत मिळाला. जेवणाच्या खोलीत ते जमिनीवर अंथरलेल्या आसनावर बसले होते. त्यांच्यासमोर पाटांवर जेवणाची ताटं मांडून ठेवलेली होती. संध्याकाळ उलटून गेली होती. तिसऱ्या प्रहरातील सहाव्या घटिकेची ती वेळ होती. काही तासांपूर्वीच त्यांचं नातं धर्मानुसार प्रमाणित केलं गेलं होतं. त्यांच्यातील अवघडलेपण अजून संपलेलं नव्हतं कारण त्यांना एकमेकांबद्दल फारशी माहिती नव्हती.

‘हं,’ ताटाकडे पाहात राम उद्गारला.

‘काय झालं राम?’ सीतेने विचारलं, ‘काही हवंय का?’

‘माफ कर... पण... हे अन्न...’

‘तुझ्या आवडीचं नाहीय का?’

‘नाही, नाही. चांगलं आहे. खरंच खूप चांगलं आहे. पण...’

सीतेनं लगेच आपलं ताट बाजूला सारलं. उठून उभी राहात तिने टाळी वाजवली. एक सेवक लगबगीनं धावत आत आला.

‘कृपया, राजकुमारासाठी थोडं मीठ आणा,’ सेवक वळला तेव्हा सीतेनं त्याला निकड जाणवून दिली, ‘लवकर!’

सेवक मग धावतच निघाला.

मिठाची वाट पाहाताना रामनं हात पुसण्यानं हात पुसले. मग तो म्हणाला, ‘माफ कर, माझ्यामुळे तुला त्रास झाला.’

आपल्या जागेवर बसताना सीतेच्या कपाळावर नाराजीच्या आठ्या पडल्या. ती म्हणाली, ‘मी तुझी पत्नी आहे, राम. तुजी काळजी घेणं हे माझं कर्तव्यच आहे.’

राम हसला. ‘हं, एक विचारू का?’

‘अर्थातच, विचार.’

‘मला तुझ्या बालपणाबद्दल काही सांग.’

‘म्हणजे, मला दत्तक घेतलं त्याआधीचं का? मला दत्तक घेतलं होतं हे तुला ठाऊक आहे, हो ना?’

‘हो,.... म्हणजे, बोलल्यामुळे जर तुला त्रास होणार नसेल तर सांग.’

सीता हसली. म्हणाली, 'नाही, मला त्रास होत नाही त्याबद्दल बोलल्यानं. पण मला काहीच आठवत नाही. मला माझ्या पालकांनी दत्तक घेतलं तेव्हा मी खूपच लहान होते.'

रामने मान डोलावली.

मग सीतेने त्याच्या मनातील प्रश्नाचं उत्तर दिलं. ती म्हणाली, 'तू जर मला विचारलंस की, माझे खरे आई-वडील कोण आहेत? तर माझं उत्तर आहे – मला माहीत नाही. पण मला भावणारं उत्तर आहे – मी धरतीची मुलगी आहे.'

'जन्म अजिबात महत्वाचा नसतो. या कर्मभूमीत प्रवेशाचं ते फक्त एक साधन आहे. कर्मच महत्वाचं असतं. तुझं कर्म दिव्य आहे.'

सीता हसली. राम पुढे काही बोलणार तेवढ्यात सेवक मिठाची वाटी घेऊन धावतच आला. रामने थोडं मीठ आपल्या खाण्यात मिसळलं आणि तो पुन्हा जेवू लागला. सेवक मागल्या पावली परतला होता.

'तू काहीतरी म्हणत होतास,' सीता म्हणाली.

'हो,' राम म्हणाला, 'मला वाटतं की.....'

पुन्हा एकदा रामच्या बोलण्यात व्यत्यय आला. यावेळी द्वारपालानं मोठ्या आवाजात घोषणा देऊन विश्वामित्रांच्या येण्याची बातमी दिली, 'मलयपुत्रांचे प्रमुख, सप्तर्षींचे उत्तराधिकारी, विष्णूंचे रक्षक, महर्षी विश्वामित्र येत आहेत हो.'

सीतेच्या कपाळावर आठ्या उमटल्या. तिने रामाकडे पाहिलं. रामानं खांदे उडवले आणि त्यातून सूचीत केलं की मला यातलं काही माहीत नाही.

विश्वामित्रांनी प्रवेश केला तेव्हा राम आणि सीता उठून उभे राहिले. त्यांच्या मागोमाग अरिष्टानेमीसुद्धा आले. सीतेनं सेवकाला खूण करून दोघांसाठी हात धुवायला पाणी आणि पात्र आणण्याची खूण केली. विश्वामित्र औपचारिक देवाण-घेवाणीला फाटा देत म्हणाले,

'एक समस्या उद्भवलीय.'

'काय झालं, गुरुजी?'

'रावण हल्याची तयारी करतोय.'

रामच्या चेहऱ्यावर स्पष्ट नाराजी उमटली. तो म्हणाला, 'पण त्याच्याजवळ सैन्य नाहीय. केवळ दहा हजार अंगरक्षकांसह तो काय करणार आहे? एवढ्या सैन्यबळाच्या आधारे तो मिथिलेसारखी नगरीसुद्धा जिंकू शकणार नाही. त्याने जर युद्धाला तोंड फोडलंच, तर त्याचे सैनिक हकनाक बळी जातील.'

'रावण असा सुसंगत विचार करणारा नाहीय,' विश्वामित्र म्हणाले, 'त्याचा अहंकार दुखावला गेलाय. तो आपले अंगरक्षक गमावेलच पण एवढ्या अंगरक्षकांच्या बळावर तो मिथिला नगरीचं प्रचंड नुकसान करेल.'

रामनं सीतेकडे पाहिलं. ती रागानं डोकं हालवत म्हणाली, 'हे रुद्रदेवा! पण या राक्षसाला स्वयंवराला बोलावलं कशाला? माझ्या वडिलांनी बोलावलं नव्हतं हे मला ठाऊक आहे.'

विश्वामित्रांनी खोल श्वास घेतला. त्यांचे डोळे पाणावले. सीतेला ते म्हणाले, 'जे झालं ते होऊन गेलं, सीता. आता आपण काय करायचं हा खरा प्रश्न आहे.'

'आपली योजना काय आहे गुरुजी?'

'गंगेजवळच्या माझ्या एका आश्रमापासच्या जमिनीतून खोदून काढलेली एक वस्तू

माझ्याजवळ आहे. अगत्स्यकूटम् मध्ये काही वैज्ञानिक प्रयोगांसाठी मला या वस्तूची गरज होती. त्यासाठीच मी माझ्या आश्रमाला भेट दिली होती.'

अगत्स्यकूटम् मलयपुत्रांची राजधानी होती. नर्मदेपलीकडे दक्षिण दिशेला खूप खाली हे शहर होतं. खरं तर ते लंकेच्या अतिशय जवळ होतं.

'वैज्ञानिक प्रयोग?' रामने विचारलं.

'हो, दैवी अस्त्रासंबंधीचे प्रयोग.'

क्षणभर सीतेचा श्वास अडखळला. दैवी अस्त्रं किती शक्तीशाली आणि संहारक असतात हे तिला ठाऊक होतं. तिने विश्वामित्रांना विचारलं, 'गुरुजी, म्हणजे आपण ही दैवी अस्त्रं वापरायची असं आपण सुचवताय का?'

विश्वामित्रांनी होकारार्थी मान हालवली. राम म्हणाला, 'पण त्यामुळे मिथिला नगरीसुद्धा उध्वस्त होईल.'

'नाही, असं होणार नाही. हे पारंपारिक दैवी अस्त्र नाहीय. माझ्याजवळ जे आहे ते असुरास्त्र आहे.'

'ते जैविक अस्त्र आहे ना?' रामने विचारलं. आता त्याला खूपच चिंता वाटू लागली होती.

'होय. यातील विषारी वायूमुळे लंकेचे सैनिक कित्येक दिवस शिथिल होतील. त्या स्थितीत आपण त्यांना सहज कैद करू शकू. आणि ही समस्या सुटेल.'

'केवळ शिथीलच करेल का गुरुजी?' रामने विचारलं, 'माझ्या माहितीप्रमाणे मोठ्या प्रमाणात असुरास्त्राच्या हल्याने प्राणहानीसुद्धा होते.'

केवळ एकच व्यक्ती हे ज्ञान रामला देऊ शकते हे विश्वामित्रांना ठाऊक होतं. इतर दैवी अस्त्र विशेषज्ञांशी रामचा परिचय नाही. विश्वामित्रांना लगेच राग आला. रागातच त्यांनी विचारलं, 'तुला याहून चांगलं काही सुचतंय का?'

राम गप्प झाला.

'पण रुद्रदेवांच्या कायद्याचं काय?' सीतेनं विचारलं.

दुष्टांचा नाश करणाऱ्या पूर्व महादेवांनी म्हणजेच रुद्रदेवांनी कित्येक शतकांआधीच दैवी अस्त्रांच्या अनधिकृत वापरावर बंदी घातली होती. भयंकर कोपिष्ट रुद्रदेवांच्या आदेशाचं सगळेच पालन करीत असत. त्यांनी घालून दिलेल्या नियमांचं जे उल्लंघन करीत असत त्यांना रुद्रदेव 14 वर्षे वनवासाची शिक्षा देत असत. दुसऱ्यांदा नियमांच्या उल्लंघनाची शिक्षा मृत्युदंड मुक्रर होता.

'असुरास्त्राच्या वापरावर हा नियम लागू आहे असं मला वाटत नाही,' विश्वामित्र म्हणाले, 'हे सामूहिक हत्येचं अस्त्र नाहीय. यामुळे लोक सामूहिकपणे केवळ असमर्थ होतात.'

सीतेने डोळे बारीक केले. तिला हे पटलं नव्हतं हे जाहीर होतं. 'मला हे अमान्य आहे. दैवी अस्त्र हे दैवी अस्त्रच असतं. रुद्रदेवांच्या जमातीकडून अधिकृत परवानगी मिळाल्याशिवाय आपण त्याचा वापर करू शकत नाही. मी रुद्रदेवांची भक्त आहे. त्यांचा कायदा मी मोडू शकत नाही.'

'मग तू शरण जाणार आहेस का?'

'अर्थातच नाही! आपण लढू!'

विश्वामित्र उपहासानं हासले. म्हणाले, 'लढणार का आपण? आणि कृपा करून हे सुद्धा सांग की रावणाच्या सेनेशी लढणार कोण? मिथिलेचा तथाकथित बुद्धिमान? योजना तरी काय

आहे? लंकेच्या सैनिकांना वादविवादात हरविणार आहेत का ते?'

'आमचे नगर रक्षक दळ आहे,' सीता शांतपणे म्हणाली.

'त्यांना रावणाच्या सैनिकांशी लढण्याचं प्रशिक्षण दिलेलं नाहीय.'

'आपण त्यांच्या सैन्याशी लढणार नाही, आपल्याला त्यांच्या अंगरक्षक दलाशी लढायचं आहे. त्यांच्यासाठी माझं नगररक्षक दळ पुरेसं आहे.'

'ते पुरेसं नाहीय, आणि तुला ते ठाऊक आहे.'

'काहीही झालं तरी आपल्याला दैवी अस्त्राचा वापर करायचा नाही,' सीता ठामपणे म्हणाली. तिच्या निर्णयाची दृढ़ता तिच्या कठोर होत चाललेल्या चेहऱ्यावर झळकत होती.

राम म्हणाला, 'केवळ समीचीचं नगर सुरक्षा दळच नाही तर मी आणि लक्ष्मणसुद्धा येथे आहोत. मलयपुत्रसुद्धा आहेत. आपण दुर्गाच्या आत आहोत. आपल्याजवळ दुहेरी तटबंदी आहे. आपल्याजवळ नगरीला वेढून असणारा तलाव आहे. आपण मिथिलेचं रक्षण करू. आपण लढू शकू.'

रागाने रामाच्या दिशेने वळत विश्वामित्र उपहासाने म्हणाले, 'बाष्कळ बडबड आहे ही, तोंडाची वाफ नुसती! आपल्या दळाच्या तुलनेनं त्यांचं संख्याबळ कित्येक पटींनी अधिक आहे. आणि, दुहेरी तटबंदी म्हणे!!' विश्वामित्रांनी उपहासदर्शक निःश्वास टाकला. म्हणाले, 'हे सगळं उत्तम वाटतंय. पण अशा अडथळ्यांवर मात करण्यासाठी एखादी योजना बनवायला रावणासारख्या युद्धनिपुण मातब्बराला कितीसा वेळ लागेल?'

'आपण दैवी अस्त्राचा वापर करायचा नाही गुरुजी,' सीता आवाज उंचावत निग्रहानं म्हणाली. आणि आता मला क्षमा करा. मला एका युद्धाची तयारी करायचीय.'

उशीरा रात्रीची वेळ होती. चौथ्या प्रहरातील चौथी घटिका होती. राम, सीता, लक्ष्मण, समीची पोळा वस्तीच्या छतावरील तटाच्या भिंतीच्या आतल्या बाजूच्या टोकाला उभे होते. सुरक्षिततेचा उपाय म्हणून संपूर्ण पोळा वस्ती रिकामी केली गेली होती. खंदकावरील तराफ्याचा पूल नष्ट केला गेला होता.

मिथिलेच्या सुरक्षादलात एकूण चार हजार नगर रक्षक आणि रक्षिका होते. लाखभर लोकांची वस्ती असलेल्या छोट्या राजधानीत कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी एवढे दळ पुरेसे होते. दुहेरी तटबंदीचा फायदा लक्षात घेतल्यानंतरही हा प्रश्न अजून बाकी होता, की, लंकेच्या रावणाच्या अंगरक्षकांकडून होणारा हल्ला हे दळ परतवू शकेल का? कारण, नगर रक्षक दळाला विरोधी दळाचं प्रमाण दोनास पाच असं होतं.

राम आणि सीतेनं बाहेरील तटबंदीच्या भिंतीच्या संरक्षणाचा विचार मोडीत काढला. त्यावर चढून रावणाच्या सेनेनं आतल्या तटबंदीवर हल्ला करावा अशी त्यांची योजना होती. त्यानुसार त्यांनी हल्ला केला तर ते दोन तटबंदीच्या मध्ये अडकले असते. ते या कोंडीत अडकले की मग मिथिलेच्या रक्षकांनी त्यांच्यावर बाणांचा वर्षाव केला असता. मिथिलेच्या रक्षकांकडून होणाऱ्या बाणांच्या भडिमारामुळे लंकेच्या सैनिकांसाठी ती कोंडी मारक स्थान बनली असती. दुसऱ्या बाजूनंही बाणांचा वर्षाव होणार हे मिथिलेच्या रक्षकांनी गृहित धरलं होतं. त्यापासून बचावासाठी रक्षकांना आपापल्या लाकडी ढाली सोबत बाळगण्याचा सल्ला दिला गेला होता. मिथिला

नगरीतील जमावबंदीच्या कामी या ढालींचा वापर होत असे. लक्ष्मणाने त्यांना बाणांपासून बचावाच्या काही सामान्य युक्त्या शिकविल्या.

'मलयपुत्र कुठे आहेत?' लक्ष्मणाने रामला विचारले.

मलयपुत्र रणभूमीत मोर्चेबांधणीसाठी आलेले नाहीत याचं रामला आश्चर्य वाटत होतं. राम कुजबुजला, 'मला वाटतं, फक्त आपल्यालाच लढावं लागेल.'

खेदानं लक्ष्मणानं डोकं हालविलं आणि तो थुंकला. म्हणाला, 'भ्याड कुठचे.'

'ते पाहा,' समीची म्हणाली.

समीचीने दाखविलेल्या दिशेला सीता आणि लक्ष्मणाची नजर वळली. रामचं लक्ष दुसऱ्याच एका गोष्टीनं वेधून घेतलं होतं. समीचीच्या आवाजातील निराशा त्याला जाणवली होती. ती थोडी गडबडलेली वाटत होती. कदाचित सीतेला वाटलं होतं तेवढी ती शूर नव्हती. रामनं आपलं लक्ष शत्रूवर केंद्रित केलं.

मिथिलेच्या बाहेरील तटबंदीला लागून असलेल्या खंदकवजा तलावापलीकडे पेटत्या मशालींच्या रांगा दिसू लागल्या होत्या. रावणाच्या अंगरक्षकांनी संपूर्ण संध्याकाळ झटून मेहनत केली होती. त्यांनी जंगलातील झाडे कापून त्यांपासून पलीकडे जाण्यासाठी होड्या बनविल्या होत्या.

पाहाता पाहाता रावणाच्या अंगरक्षकांनी आपल्या होड्या तलावाच्या पाण्यात उतरवायला सुरवात केली. मिथिलेवर हल्ला करण्याची कारवाई सुरू झाली होती.

'वेळ झाली,' सीता म्हणाली.

'होय,' राम म्हणाला, 'आणखी अर्ध्या तासात ते बहुधा तटाच्या बाहेरील भिंतीपाशी पोहोचतील.'

रात्रीच्या अंधारात शंखध्वनी घुमला. आतापावेतो तो आवाज रावण आणि त्याच्या सेनेकडून येतो हे लोकांना ठाऊक झाले होते. मशालींच्या झगझगत्या उजेडात रावणाच्या अंगरक्षकांनी मोठमोठ्या शिड्या मिथिलेच्या बाहेरील तटबंदीच्या भिंतीशी लावल्या.

'ते इथे पोहोचले,' राम म्हणाला. तो संदेश मिथिलेच्या आता सैनिक बनलेल्या नगररक्षकांपर्यंत पोहोचविण्यात आला. रावणाचे सैनिक आता बाणांचा वर्षाव करतील असं रामाला वाटलं होतं. लंकेचे सैनिक जोवर पहिल्या तटबंदीच्या बाहेर आहेत तोवरच बाण चालवतील असा त्याचा होरा होता. ज्या क्षणी ते भिंतीवर चढतील त्या क्षणापासून त्यांच्याकडून होत असलेला बाणांचा वर्षाव थांबेल हे त्याला ठाऊक होतं. आपले लोक लक्ष्याजवळ असताना बाण चालवणं त्यांना परवडलं नसतं.

अचानक वादळ आल्यासारखा व्हूऽऽऽश असा आवाज आला आणि त्यापाठोपाठ बाणांचा वर्षाव सुरू झाला.

'ढाली,' सीता ओरडली.

मिथिलेच्या रक्षकांनी लगेच आपल्या ढाली सावरल्या. बाणांचा वर्षाव झेलण्यासाठी ते सज्ज झाले. पण रामला काहीतरी खटकत होतं. त्या आवाजातील कोणतीतरी गोष्ट त्याला डाचत होती. एकदम हजार बाण सोडल्यानंतर येणाऱ्या आवाजापेक्षा तो आवाज मोठा होता. तो

आवाज बाणांचा नसावा, काहीतरी मोठं शस्त्र असावं असं त्याला वाटलं आणि त्याचा अंदाज बरोबर ठरला. प्रचंड ताकदीच्या मोठमोठ्या क्षेपणास्त्रांतून मिथिलावासियांवर बाणांचा वर्षाव केला जात होता. मिथिलेच्या रक्षकांच्या वेदनाभरित किंकाळ्या, बाणांनी त्यांच्या ढाली फुटल्याचे भीतीदायक आवाज यांनी आसपासचं वातावरण भरून गेलं.

'काय आहे हे?' ढालीमागे लपण्याचा प्रयत्न करत लक्ष्मणाने विचारलं.

वेगानं आलेला एक बाण लोण्याच्या गोळ्यात घुसणाऱ्या सुरीसारखा रामच्या ढालीत घुसला आणि त्याच्या ढालीचे दोन तुकडे झाले. रामने खाली पडलेला बाण पाहिला. तो बाण नव्हता, भाला होता! तसूभराच्या अंतरानं राम वाचला होता.

मिथिलेच्या रक्षकांच्या ढाली बाणांपासून संरक्षणासाठी सज्ज होत्या, मोठ्या भाल्यांपासून नव्हे.

रुद्रदेवा! ते इतक्या दुरून भाले कसे फेकताहेत? हे अशक्य आहे!

बाणांचा पहिला वर्षाव थांबला होता. पण रामला ठाऊक होतं, हा केवळ काही क्षणांचा विश्राम आहे. पुन्हा बाणांचा वर्षाव सुरू होणार आहे. त्यानं भोवताली नजर टाकली.

'रुद्रदेवा, दया करा.....'

आसपास भयंकर संहाराची चिन्हं पसरली होती. रावणाच्या सैनिकांनी केलेल्या बाणांच्या वर्षावामुळे ढाली फुटून मिथिलेचे किमान एक चतुर्थांश रक्षक मारले गेले होते किंवा जखमी झाले होते. रामने सीतेकडे पाहून आदेश दिला, 'कोणत्याही क्षणी भाल्यांचा वर्षाव पुन्हा सुरू होईल! घरात जा!'

'घरात जा!' सीता ओरडली.

'घरात जा!' सेनाधिकाऱ्यांनी ओरडा केला आणि सारे घरांच्या दिशेने धावत निघाले. दरवाजे उचलले आणि त्यांनी आत उड्या मारल्या. अत्यंत अव्यवस्थितपणे घेतलेली माघार होती ती. पण ती प्रभावकारक ठरली. काही मिनिटांतच मिथिलेचे जवळ जवळ सगळे रक्षक सुरक्षितपणे घरांत पोहोचले होते. आणि, पोळा वस्तीच्या छतावर पुन्हा पहिल्यासारखा बाणांचा वर्षाव सुरू झाला. घरात येण्याच्या प्रयत्नांत जे अर्धवट बाहेर राहिले होते ते सगळे बाणांच्या भडिमारात मारले गेले. बाकीचे निदान सध्यापुरते सुरक्षित स्थळी पोहोचले होते.

रामकडे पाहाणारा लक्ष्मण काही बोलत नव्हता पण त्याचे डोळे रामला सांगत होते – हा सर्वनाश आहे.

'आता काय करायचं?' रामनं सीतेला विचारलं, 'रावणाचे सैनिक बाहेरील तटबंदीची भिंत ओलांडून आत आले असावेत. लवकरच ते आपल्यासमोर येतील. त्यांना अडवणारं, थोपवणारं कुणीच नाहीय. '

सीता दीर्घ श्वास घेत होती. चारही बाजूंनी घेरून कोपऱ्यात लोटत आणलेल्या वाघिणीच्या डोळ्यांसारखे तिचे डोळे भडकलेले होते. राग तिच्या अंगांगातून उसळी मारत होता. असहायतेच्या भावनेनं कपाळ चोळत समीची आपल्या राजकन्येच्या मागे उभी होती.

'सीता?' रामने पुन्हा प्रश्नार्थक स्वरात सीतेला हाक दिली.

अचानक सीतेचे डोळे सताड उघडले. ती उद्गारली, 'खिडक्या!'

'काय?' समीचीने विचारलं. पंतप्रधानांच्या उद्गारांनी आश्चर्यचकित होऊन समीचीने विचारलं.

सीतेनं लगेच आपल्या नगर रक्षक दलाच्या अधिकाऱ्यांना बोलावलं. तिने त्यांना माऱ्यातून

वाचलेल्या मिथिलेच्या सगळ्या रक्षकांना पोळा वस्तीतील खिडक्यांवर लागलेल्या लाकडाच्या चौकटी उचकटायच्या कामाला जुंपण्याची आज्ञा दिली. यातील काही खिडक्या आतल्या तटबंदीच्या समाईक भिंतीवर तर काही घरांच्या मधल्या मोकळ्या जागेत उघडत होत्या. ते ज्या खोलीत होते तिची खिडकी दोन तटबंदींमधील मोकळ्या जागेत उघडत होती. म्हणजे, हल्ला करणाऱ्या लंकेच्या सैनिकांवर बाण सोडले जाणार होते तर!

'अत्युत्तम!' लक्ष्मण मोठ्या आवाजात म्हणाला. घाईघाईने तो जाळी लागलेल्या एका खिडकीच्या दिशेने गेला. त्याने आपला हात मागे नेला, स्नायू थोडे ताणले आणि खिडकीच्या लाकडी गजांवर त्याने पूर्ण ताकदीनिशी ठोसा लगावला. त्याच्या एका ठोशाने खिडकीत बसवलेली जाळीची चौकट उचकटली.

पोळा वस्तीच्या या भागातील सारी घरे एकमेकांशी छोट्या वाटांनी जोडलेली होती. संदेश वाऱ्यासारखा पसरला. काही क्षणांतच मिथिलेच्या सैनिकांनी खिडक्यांच्या चौकटी उखडल्या आणि, बाहेरील आणि आतील तटबंदीच्या भिंतींमध्ये असलेल्या लंकेच्या सैनिकांवर बाणांचा वर्षाव केला. लंकेच्या सैनिकांनी आपल्या मार्गात अडथळे येणार नाहीत हे गृहित धरलं होतं. त्यामुळे बाणांच्या या वर्षावाचा त्यांच्यावर अचूक परिणाम झाला. त्यांचे बरेच सैनिक धारातीर्थी पडले. प्रचंड नुकसान झालं. मिथिलेचे सैनिक बाणांचा निरंतर वर्षाव करत राहिले. लंकेच्या शक्य तितक्या सैनिकांना त्यांनी गारद केलं. त्यामुळे लंकेच्या सैनिकांचा हल्ला बराच कमजोर पडला.

अचानक शंखध्वनी सुरू झाला. पण यावेळी त्याचा स्वर वेगळा होता. लंकेचे सैनिक लगेच मागे फिरले आणि धावत सुटले. जितक्या वेगात त्यांनी हल्ला केला होता तितक्याच वेगात त्यांनी माघार घेतली.

मिथिलेच्या सैनिक दळात उत्साहाची लाट पसरली. त्यांचे हर्षध्वनी वातावरणात पसरले. त्यांनी पहिला हल्ला परतवून लावला होता.

पहाटेच्या वेळी राम, लक्ष्मण आणि सीता पोळा वस्तीच्या छतावर उभे होते. आसपास पसरलेल्या लंकेच्या सैनिकांच्या भाल्यांमुळे झालेल्या नासधुसीच्या उध्वस्त दृश्यावर कोवळे सूर्यकिरण पसरले. उजेड झाला आणि हृदय पिळवटून काढण्याएवढं नुकसान झालंय हे लक्षात आलं.

मिथिलेच्या सैनिकांचे छिन्नविच्छिन्न देह सभोवती पसरलेले होते.

सीता त्यांच्याकडे पाहात राहिली. त्यापैकी काहींची डोकी स्नायूंच्या आधारे धडांवर लटकलेली होती. काहींचे कोथळे बाहेर निघालेले होते. काही भाल्यामुळे झालेल्या जखमेतून रक्त वाहून गेल्याने गतप्राण झाले होते.

'माझे कमीत कमी हजार सैनिक तरी.....'

'वहिनी, आपणही त्यांना मोठा दणका दिलाय,' लक्ष्मण म्हणाला, 'आतील आणि बाहेरील तटबंदींच्या भिंतींमध्ये लंकेच्या किमान हजार सैनिकांचे मृतदेह विखुरलेले आहेत.'

सीतेने लक्ष्मणाकडे पाहिलं तेव्हा एरवी नितळ असणारे तिचे डोळे अश्रुंनी डबडबलेले होते. ती खेदाने म्हणाली, 'हो, पण त्यांच्याकडे अजून नऊ हजार सैनिक आहेत. आणि आपल्याकडे

केवळ तीन हजार आहेत.'

खंदकवजा तलावाच्या पलीकडे रावणाच्या छावणीवर रुग्णालयांचे तंबू उभारले गेले होते. त्याचवेळी त्यांच्यापैकी बरेच जण झाडे तोडून जंगल मागे हटवण्याच्या कामात गुंतले होते. म्हणजे, त्यांचा परतण्याचा मनसूबा नव्हता हे स्पष्ट होतं.

'पुढच्या वेळी ते आणखी चांगल्या तऱ्हेने हल्ला करतील,' राम म्हणाला, 'जर ते तटबंदीची आतली भिंतही पार करून आले तर..... तर मग सगळंच संपेल.'

सीतेने रामच्या खांद्यावर हात ठेवला आणि उसासा सोडला. तिची नजर जमिनीवर खिळलेली होती. तिच्या जवळ असण्याने क्षणभर रामचं मन चाळवलं. आपल्या खांद्यावरच्या सीतेच्या हाताकडे रामनं पाहिलं. मग त्याने डोळे मिटून घेतले. त्याला आता आपलं मन एकाग्र करायला हवं. आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवण्याची कला आता त्याला पुन्हा शिकून घ्यायला हवी.

मागे वळून सीतेने आपल्या शहरावर एक नजर टाकली. रुद्रदेवांच्या भव्य मंदिराच्या घुमटावर तिची नजर स्थिरावली. पोळा वस्तीपलीकडील उद्यानाच्या पलीकडे ते मंदिर होतं. तिच्या डोळ्यांत कठोर निग्रह झळकला. त्या निग्रहानं तिच्या नसांनसांत फौलाद ओतलं. 'हे अजून संपलेलं नाहीय. मी नागरिकांना युद्धात भाग घेण्याची विनंती करते. स्वयंपाकाच्या सुऱ्या घेऊन जरी ते इथे येऊन उभे राहिले तरी आपली संख्या लंकेच्या त्या कुचकामी सैन्याच्या दसपटीने वाढेल. आपण नक्कीच त्यांचा सामना करू शकू.'

रामला मात्र तिच्याएवढा आत्मविश्वास वाटत नव्हता. निश्चय झाल्यासारखी सीतेने मान हालवली आणि घाईघाईने ती निघाली. मिथिलेच्या रक्षकांना तिने आपल्या मागून येण्याची खूण केली.

# प्रकरण 25

'गुरुजी, कुठे होतात तुम्ही?' अंगांगातून राग व्यक्त होत असतानादेखील अतिशय शांत आवाजात रामनं विश्वामित्रांना विचारलं.

पहिल्या प्रहराच्या सहाव्या घटिकेला शेवटी एकदाचे विश्वामित्र परतले. सकाळच्या प्रकाशात लंकेच्या सैनिक छावणीत उडालेली घाई-गडबड दिसून येत होती. सीता अजूनही नागरिकांची सेना उभी करण्यात गढलेली होती. अरिष्टानेमी काही अंतरावर उभे होते. आपल्यापर्यंत कुणाची हाक येऊ नये, आलीच तर ती आपल्याला ऐकू येऊ नये याची खबरदारी ते घेत होते.

'भ्याड मलयपुत्र होते कुठे?' लक्ष्मणाने गुरकावत विचारलं. सौजन्यानं वागण्याची त्याला गरज वाटली नाही.

रामशी बोलण्याआधी विश्वामित्रांनी लक्ष्मणावर एक उडती नजर टाकली. म्हणाले, 'इथे कुणीतरी मोठ्यासारखं वागून खरोखर ज्याची गरज आहे ते करायला हवंय.'

रामच्या कपाळावर आठ्या उमटल्या.

'माझ्याबरोबर चला,' विश्वामित्र म्हणाले.

पोळा वस्तीच्या छताच्या एका छुप्या विभागात लंकेने केलेल्या हल्याच्या क्षेत्रापासून दूर ते पोहोचले तेव्हा मलयपुत्र रात्रभर ज्यावर मेहनत करत होते त्यासमोर ते पोहोचले. ते असुरास्त्र होतं.

उभारण्यास अतिशय साधं असूनही ते उभारण्यात बराच वेळ गेला होता. विश्वामित्र आणि त्यांचे मलयपुत्र रात्रभर थोड्या प्रकाशात त्यावर काम करत होते. शेवटी क्षेपणास्त्र आणि ते फेकण्यासाठी लागणारी लाकडी घडवंची बनविण्याचं काम पूर्ण झालं होतं. लाकडी घडवंची लक्ष्मणाहून थोडी उंच होती. क्षेपणास्त्राची बाहेरील बाजू शिशाची होती. त्यात भरले जाणारे महत्वाचे घटक आणि त्याचे इतर भाग विश्वामित्र आणि त्यांच्या इतर लोकांनी गंगेच्या किनारी असलेल्या आश्रमाहून वाहून आणले होते. महत्वाचा घटक गंगाकिनारी असलेल्या आश्रमा नजीकच्या जमिनीतून खोदून काढलेला होता. हा महत्वाचा घटक आता क्षेपणास्त्रातील विस्फोटकाच्या जागी भरला जात होता.

क्षेपणास्त्र तयार झालं होतं. पण रामचा अजून निर्णय होत नव्हता. त्याने पुन्हा बाहेरील तटबंदीपलीकडे नजर टाकली.

लंकेचे सैनिक आपापल्या कामांत गर्क होते. ते जंगल तोडत होते. ते काहीतरी बनवत होते.

'जंगलाजवळ ते लोक काय काम करताहेत?' लक्ष्मणाने विचारलं.

'जवळून पाहा,' विश्वामित्र म्हणाले.

जंगलातील तोडलेल्या झाडांपासून बनविलेल्या फळ्या वापरून ते लोक काहीतरी तयार करत होते. आधी लक्ष्मणाला वाटलं की ते लोक होड्या बनवत आहेत. पण लक्ष देऊन पाहिलं तेव्हा ध्यानात आलं की ते होड्या नव्हे तर अजस्त्र आकाराच्या ढाली बनवत होते. त्या ढालींना एका

बाजूला आणि खालच्या अंगाला दांडे बसविलेले होते. प्रत्येक ढाल जवळ जवळ उभ्या असणाऱ्या किमान वीस लोकांना संरक्षण देऊ शकली असती.

'कासव ढाली,' राम म्हणाला.

'होय,' विश्वामित्र म्हणाले, 'अशा बऱ्याच ढाली तयार झाल्या की ते परत हल्ला करतील. बाहेरील तटबंदी ते सहज फोडतील. कारण त्यांना तिथे विरोध करायचा नाही असं आपलं ठरलंय. विरोधच नाही तर मग ती भिंत चढून का पार करा? सरळ फोडून आत घुसा, असा त्यांनी विचार केलेला दिसतोय. या कासव ढालींच्या संरक्षणात ते आपल्या आतील तटबंदीपर्यंत पोहोचतील. वारंवार हल्ले केल्यानं आपल्या भिंती फुटतील. मग ते या शहराचं काय करतील याचा तू विचार कर. अगदी, इथल्या उंदरांनासुद्धा ते सोडणार नाहीत.'

राम गप्प उभा होता. विश्वामित्र बरोबर बोलताहेत हे त्याला ठाऊक होतं. पंधरा-वीस मोठ्या ढाली तयार झालेल्या त्यांना दिसत होत्या. लंकेचे सैनिक अद्भुत वेगानं काम करत होते. लवकरच ते हल्ला करणार हे स्पष्टच होतं. कदाचित आज रात्रीसुद्धा हल्ला करतील ते. आणि या हल्ल्याचा प्रतिकार करायला मिथिला अजून तयार नव्हती.

'तुला समजायला हवं राम, आता असुरास्त्र चालविल्याशिवाय गत्यंतर नाही,' विश्वामित्र म्हणाले, 'ते तयार नाहीत तोवरच, लगेचच, असुरास्त्र चालवायला हवं. आत्ता ते अशा हल्ल्यासाठी तयार नाहीत. आणि ते आत्ता मिथिलेपासून बरेच लांब आहेत. एकदा का त्यांनी बाहेरील तटबंदीची भिंत फोडून हल्ला केला की आपण हा हल्लासुद्धा करू शकणार नाही. कारण यातील दारूगोळा मिथिलेच्या अतिशय जवळ फुटेल. आणि ते मिथिलेच्या दृष्टीने भयंकर ठरेल.'

राम लंकेच्या लोकांकडे पाहात राहिला.

'केवळ हाच एक मार्ग शिल्लक आहे.'

'तुम्ही ते शस्त्र चालवत का नाही, गुरुजी?' लक्ष्मणाने टोमणा मारत विचारलं.

'मी मलयपुत्र आहे, मलयपुत्रांचा प्रमुख,' विश्वामित्र म्हणाले. 'वायुपुत्र आणि मलयपुत्र मिळून काम करतात. भागीदारीत. विष्णू आणि महादेवांनी गेल्या सहस्त्रकात केलं तसं आमचं काम चालतं. वायुपुत्रांचा नियम मी मोडू शकत नाही.'

'पण माझ्या भावानं तो मोडला तर चालेल का?'

'तुम्ही मरणसुद्धा वरू शकता, तो उपायसुद्धा उपलब्ध आहे,' विश्वामित्रांनी अत्यंत कडवटपणानं टोमणा मारला. मग वळून ते सरळ रामशी बोलले, 'मग, काय करायचं राम?'

रामने वळून मिथिलेच्या राजवाड्यावर नजर टाकली. तेथे कदाचित सीता मिथिलेच्या अनिच्छुक नागरिकांना युद्ध करण्याची गळ घालत होती.

विश्वामित्र अयोध्येच्या राजकुमाराच्या जवळ गेले. म्हणाले, 'राम, रावण जर या नगरीत आला तर कदाचित येथील प्रत्येक माणसाला छळ करून मारेल. मिथिलेच्या लाखभर लोकांच्या भाग्याचा हा प्रश्न आहे. तुझ्या पत्नीच्या जीविताचा प्रश्न आहे. पतीच्या रूपे तू तुझ्या पत्नीचं रक्षण करणार आहेस की नाही? इतरांच्या भल्यासाठी तू स्वतःच्या आत्म्यावर पाप ओढून घेणार आहेस की नाही? तुझा धर्म तुला काय सांगतो?'

सीतेसाठी करेन मी हे.

'आपण आधी त्यांना सावध करू', राम म्हणाला, 'त्यांना माघार घेण्याची संधी देऊ. मला असं

सांगितलंय की असुरसुद्धा दैवी अस्त्र चालविण्याआधी हा नियम पाळतात.‘

‘ठीक आहे.’

‘आणि त्यांनी जर आपण आगावू दिलेल्या सूचनेला भीक घातली नाही तर?’ रामने विचारले.

कल्पनेनेसुद्धा रामला अस्वस्थ वाटलं. जणू बळ मिळविण्यासाठी त्याची बोटे आपोआप गळ्यातील रुद्राक्षाभोवती आवळली गेली. तो म्हणाला, ‘मग मी असुरास्त्राचा वापर करेन.’

रामचा होकार एखाद्या बक्षिसाची ढाल असल्यासारखे विश्वामित्र समाधानाने हसले.

अजस्त्र अस्वलासारखा माणूस कासव ढाली बनविणाऱ्यांच्या मधून फिरत ढाली तपासून पहात होता. त्याच्या पावला शेजारी पडलेल्या एका लाकडी फळीत येऊन रुतण्याच्या काही सेकंद आधी त्याला बाणाचा आवाज ऐकू आला. आश्चर्यानं त्यानं वर पाहिलं. मिथिलेत इतका अचूक नेम साधणारा निष्णात धनुर्धर कोण आहे?

त्यानं तटबंदीच्या भिंतीवर नजर रोखली. आतल्या तटबंदीच्या भिंतीजवळ दोन उंच आणि एक त्यांच्यापेक्षा अंमळ बुटका अशी तीन माणसं त्याला दिसली. त्या तिसऱ्या माणसाच्या हातात धनुष्य होतं. तो थेट आपल्याकडेच पाहातोय असं त्याला वाटलं.

अस्वलासारखा माणूस लगेच पुढे झाला. कासव ढालीत शिरलेल्या बाणाचं तो निरीक्षण करू लागला. बाणासोबत एक चिठ्ठी बांधलेली होती. त्याने ती बाणापासून वेगळी केली आणि उघडली.

‘कुंभकर्णा, ते असं खरंच करतील असं खरंच तुला वाटतं का?’ चिठ्ठी फेकून देऊन घृणेनं फुत्कारत रावणानं विचारलं.

‘दादा,’ अस्वलासारख्या त्या माणसानं बोलायला सुरवात केली तेव्हा घशातील प्रचंड नसांमुळे मूळ खर्जातील त्याचा स्वर आणखी खाली गेला होता. ‘जर त्यांनी असुरास्त्र चालवलं तर, तर ते....’

‘त्यांच्याजवळ असुरास्त्र नाहीय,’ रावण मध्येच म्हणाला, ‘खोटं बोलताहेत ते.’

‘पण दादा, मलयपुत्रांजवळ आहे.....’

‘विश्वामित्र थापा ठोकतोय, कुंभकर्णा!’

कुंभकर्ण गप्प झाला.

‘त्यांनी एका इंचाचीही माघार घेतलेली नाहीय,’ विश्वामित्र म्हणाले तेव्हा त्यांच्या स्वरातून घाई व्यक्त झाली आणि ‘आपल्याला ते अस्त्र चालवायला हवं आता.’

दुसऱ्या प्रहराच्या तिसऱ्या तासाच्या आसपास आकाशात सूर्य बराच वर आला होता. त्यामुळे आसपासचं सगळं स्वच्छ दिसत होतं. तीन तासांआधी रामनं लंकेच्या सैनिकांकडे सावधगिरीचा संदेश बाणावर लावून पाठवला होता. पण त्याचा काहीही परिणाम झालेला दिसून येत नव्हता.

लंकेच्या सैन्याच्या मुख्य पडावासमोर पोळा वस्तीच्या छताचा जो भाग येत होता तेथे

मलयपुत्रांनी क्षेपणास्त्राचं धूड चढवलं होतं.

'आपण त्यांना एक तास आधी सावधगिरीची आगावू सूचना दिली होती,' विश्वामित्र म्हणाले, 'आपण तीन तास वाट पाहिली. आता त्यांना वाटत असणार की आपण लोणकढी ठोकली.'

लक्ष्मणानं विश्वामित्रांकडे पाहिलं. तो म्हणाला, 'आपण आधी सीता वहिनींशी बोलायला हवं असं आपल्याला वाटत नाही का? तिनं स्पष्ट शब्दांत सांगितलं होतं की....'

विश्वामित्र अचानक म्हणाले- 'ते पाहा!'

विश्वामित्रांनी जिकडे बोट दाखवलं तिकडे लगेच राम आणि लक्ष्मणाच्या माना वळल्या.

'ते होड्यांमध्ये बसताहेत का?' रामने विचारलं.

'ते कदाचित चाचणी घेत असावेत,' लक्ष्मण म्हणाला पण याबाबतीत त्याचं स्वतःचं मन त्याला खात्री देत नव्हतं, 'म्हणजे आता आपल्याजवळ असलेला वेळ आणखी कमी झाला.'

'राम, आपण अजून संधीची वाट पाहायची का?' विश्वामित्रांनी विचारलं.

रामच्या चेहऱ्यावरची एक नससुद्धा हालली नाही.

'आपल्याला आता ते अस्त्र वापरायला हवं त्यांच्यावर,' विश्वामित्र जोर देत म्हणाले.

रामने खांद्यावरून आपले धनुष्य उतरवले, आपल्या कानांजवळ आणले आणि दोरी वाजवून पाहिली. त्याच्या तोंडून उद्गार निघाला, 'उत्तम!'

'भले वाहवाः!' विश्वामित्र उद्गारले.

लक्ष्मणानं महर्षींकडे पाहिलं. मग त्यानं रामच्या खांद्याला स्पर्श करत म्हटलं, 'दादा....'

राम मागे फिरला आणि तेथून निघून जाऊ लागला. सगळेजण त्याच्या मागून निघाले. बहुतेक दैवी क्षेपणास्त्रं एका निश्चित पद्धतीनं डागली जात असत. या पद्धतीनुसार क्षेपणास्त्रापासून दूर उभे राहून छोट्या फळाच्या आकाराच्या क्षेपणास्त्राच्या बत्तीवर तेवता बाण सोडला जात असे. क्षेपणास्त्र डागल्यामुळे होणाऱ्या सुरवातीच्या विस्फोटापासून डागणाऱ्यांना अपाय होऊ नये म्हणून ही पद्धत अनुसरली जात असे. बऱ्याच दूर अंतरावरून छोट्या फळाएवढ्या बत्तीवर अचूक बाण चालवण्याचं काम अत्यंत कुशल धनुर्धारीच करू शकत असे. असुरास्त्राहून साधारण पाचशेहे मीटर्सच्या अंतरावर पोहोचल्यानंतर विश्वामित्रांनी रामला थांबवलं. ते म्हणाले, 'एवढं अंतर पुरे झालं, अयोध्येच्या राजकुमारा.'

अरिष्टानेमींनी त्याला एक बाण दिला. रामने त्या बाणाचं टोक हुंगलं. पेट घेणाऱ्या सामग्रीचे थर तेथे लावलेले होते. बाणाला लावलेल्या पिसांचं त्यानं निरीक्षण केलं. त्याला क्षणभर आश्चर्य वाटलं. अरिष्टानेमींनी रामचाच एक बाण वापरला होता. अरिष्टानेमींना आपल्या बाण फिरवण्याच्या कौशल्याबद्दल माहिती आहे का याबद्दल विचार करण्यात रामने वेळ दवडला नाही. त्यासाठी ही वेळ योग्य नव्हती. सर्व ठीक असल्याचा संकेत त्यानं मान हालवून अरिष्टानेमींना दिला आणि क्षेपणास्त्रावर बाण चालविण्यासाठी त्याने क्षपणास्त्राच्या दिशेने तोंड केलं.

'दादा....' लक्ष्मण कुजबुजला. कायदा मानणाऱ्या आपल्या भावावर या गोष्टीचा किती परिणाम होईल या विचारानं तो फारच चिंतीत होता हे स्पष्ट दिसून येत होतं.

'मागे हो लक्ष्मणा....' पाठीला ताण देण्यासाठी हात पुढे ताणत राम म्हणाला. लक्ष्मण, विश्वामित्र आणि अरिष्टानेमी दूर झाले. ताण न देता रामने आपल्या श्वासोच्छवासाची गती कमी केली. त्यामुळे त्याच्या हृदयाच्या धडकण्याची गतीसुद्धा कमी झाली. क्षेपणास्त्रावर त्याची नजर

स्थिरावत असताना आजूबाजूच्या साऱ्या आवाजांची तीव्रता त्याच्या मनात कमी कमी होत गेली. वेळेची लय संथ झाली तेव्हा त्याने जणू हृदयाच्या गतीशी जुळवून घेण्यासाठी डोळे बारीक केले. आजूबाजूच्या एकूण पसाऱ्याची गती त्याच्या लेखी अत्यंत मंद झाली. असुरास्त्राच्या वरून एक कावळा उडत गेला. आकाशात वर वर जात असताना त्याने आपले पंख फडफडवले. कावळ्याच्या पंखांची हालचाल रामने टिपली. उंच जाण्यासाठी त्याला कमी प्रयत्न करावे लागत होते कारण त्याने आपल्या पंखांखाली वारं भरून घेतलं होतं.

रामच्या मनानं मिळालेल्या या नव्या माहितीवर प्रक्रिया केली. क्षेपणास्त्रानजीक हवा पश्चिम दिशेला वाहात होती. त्याने बाणाच्या टोकावर टिचकी मारली तेव्हा ठिणग्या उडाल्या. त्यानं मग बाणांच्या टोकाला लागलेल्या पिसांच्या आधारे बाण पकडला आणि हलकेच धनुष्याच्या दोरीवर चढवला. डाव्या हाताने धनुष्य गच्च पकडून त्याने त्यावर चढवलेल्या बाणाला अंगठा आणि तर्जनीमध्ये आधार दिला. बाणाला द्याव्या लागणाऱ्या तिरक्या दिशेच्या अंदाजानं धनुष्याची दिशा किंचित वरच्या बाजूला केली. अरिष्टानेमींना ठाऊक होतं राम हे रीतीनुसार करत नाहीय. त्यांनी जिकडे बाणाची दिशा ठेवली असती त्या तुलनेनं रामनं ती थोडी खालच्या बाजूला ठेवली होती. पण त्यांना धनुष्य-बाण चालवण्यातील आणि अर्थातच बाणाला चक्राकार गती देण्यातील रामचं अद्वितीय कौशल्यसुद्धा ठाऊक होतं. म्हणून ते अवाक्षरही बोलले नाहीत.

रामने नेम धरून निशाणावर लक्ष केंद्रित केलं. पाचशेहे मीटर्सच्या अंतरावर अननसाच्या आकाराचा लाल चौकोन होता तो. निशाणाजवळ वाहाणाऱ्या वाऱ्यावर रामचं लक्ष केंद्रित झालं. इतर सर्व गोष्टी त्याच्या मानसपटलावरून अदृश्य झाल्या. हवेची दिशा ठरविण्यासाठी अडकविलेला मोजा डावीकडे उडत होता. अचानक मोजा लटकला. वारा पडला होता. त्या क्षणी रामने दोरी मागे ताणली आणि स्थिर धरली. त्याचा दंड जमिनीपासून किंचित वरच्या दिशेला कोण करून होता. त्याचं कोपर बाणाला समांतर होतं. धनुष्याचं वजन पाठीच्या स्नायूंकडे गेलं. त्याचा दंड कठोर झाला. धनुष्याची दोरी त्याच्या ओठांजवळ आली. धनुष्य पूर्ण क्षमतेपर्यंत ताणलं गेलं होतं. बाणाचं पेटतं टोक त्याच्या डाव्या हाताला स्पर्शत होतं. पिसांच्या आधारे त्याने बाणाला चक्राकार गती दिली आणि बाण सोडला. चक्राकार गतीमुळे बाणाला हवेचा कमी प्रतिरोध सहन करावा लागत होता. धनुष्य बाण चालविण्याच्या कौशल्याचं हे खुलं प्रदर्शन अरिष्टानेमी डोळे भरभरून पीत होते. ते सगळंच अतिशय काव्यमय होतं. म्हणून राम इतकं अंतर असूनसुद्धा एवढ्या खालून बाण चालवू शकला होता. त्यानं बाणाला दिलेल्या तिरकस दिशेमुळे बाण वेगात पुढे चालला होता. आणि चक्राकार गतीमुळे वारा कापत निघालेल्या बाणाची गती मंदावत नव्हती.

धनुर्धाऱ्यानं पेटता बाण सोडल्याचं कुंभकर्णानं पाहिलं. काय घडतंय हे त्याच्या जाणिवांनी त्याला स्पष्ट सांगितलं. मागे वळून तो ओरडला, ‘दादा!’

आपल्या भावाच्या दिशेने तो सुसाट धावला. रावण आपल्या प्रचंड यानाच्या- पुष्पक विमानाच्या दाराशी उभा होता.

बाण असुरास्त्रावरच्या छोट्या चौकोनावर आदळला. क्षणात बत्ती मागे ढकलली गेली. लाल चौकोनामागील जागेत बाणासोबत आलेली आग स्वीकारली गेली. तेथून ती वेगाने क्षेपणास्त्राला गती देणाऱ्या इंधनाच्या साठ्याकडे गेली. क्षणभरात असुरास्त्र सुरू होण्याच्या वेळी होणाऱ्या विस्फोटांचा आवाज ऐकू आला. काही क्षणांत क्षेपणास्त्राखाली मोठ्या ज्वाळा निर्माण झाल्या आणि त्या वेगाने वाढत गेल्या.

कुंभकर्णाने आपलं अंग आपल्या भावावर झोकून दिलं. रावण पुष्पक विमानाच्या आत फेकला गेला.

असुरास्त्रानं अजस्त्र वळण घेत उड्डाण केलं. केवळ काही सेकंदांतच त्याने मिथिलेच्या दोन्ही तटबंदींचं अंतर ओलांडलं. पोळा वस्तीच्या छतावर उभ्या असलेल्या सगळ्यांच्या नजरा नजरबंदी केल्यासारख्या या दृश्यावर खिळलेल्या होत्या. कुणीही आपली नजर बाजूला वळवू शकत नव्हता. खंदकवजा तलावावर असताना क्षेपणास्त्रात ऐकू येईल न येईलसा विस्फोट झाला. एखाद्या छोट्या मुलानं वाजवलेल्या फटाक्यासारखा.

लक्ष्मणाचं आश्चर्य निराशेत बदललं. नाराजी व्यक्त करत तो म्हणाला, ‘बस? एव्हढंच? हेच का ते असुरास्त्र?’

विश्वामित्रांनी त्याला त्रोटक उत्तर दिलं, ‘कान झाक!’

दरम्यान पुष्पक विमानात रावण पडलेलाच होता. कुंभकर्ण उठून उभा राहिला. तो दाराकडे वळला. आणि त्याने दाराच्या धातूच्या बटनावर शरीराचा संपूर्ण भार टाकून ते दाबून धरलं. दार घसरत बंद होऊ लागलं. कुंभकर्ण प्रचंड अस्वस्थ होत ते पाहात राहिला. स्नायू ताणून जणू तो बंद होत असलेल्या दाराला वेग देऊ इच्छीत होता.

लंकेच्या छावणीवर असुरास्त्र फिरलं आणि कानाला दडे बसणारा आवाज करत त्याचा विस्फोट झाला. त्या आवाजानं मिथिलेच्या तटबंदीच्या भिंती हादरल्या. लंकेच्या कित्येक सैनिकांना वाटलं आपल्या कानाचे पडदे फाटले. श्वास घेण्यासाठी त्यांनी तोंडं उघडली. पण, त्यांना ठाऊक नव्हतं, पुढे होऊ घातलेल्या विनाशाची ही फक्त नांदी होती.

विस्फोटानंतर तिथे स्मशानशांतता पसरली. पोळा वस्तीच्या छतावर उभे राहून हे दृश्य पाहाणाऱ्या मिथिलावासियांनी पाहिलं की क्षेपणास्त्राचा जिथे विस्फोट झाला होता तेथे प्रखर हिरवा प्रकाश निर्माण झाला. प्रचंड ताकदीने तो फुटला. लंकेच्या सैनिकांवर तो वीज कोसळावी तसा कोसळला. ते सगळे अचंभीत होऊन पायांना मुळं फुटल्यासारखे जेथे उभे होते तेथेच उभे राहिले. लकवा मारल्यासारखे सगळे निश्चल झाले. विस्फोट झालेल्या क्षेपणास्त्राचे तुकडे क्रूरपणे त्यांच्यावर बरसले.

पुष्पक विमानाचं दार बंद झालं. तेव्हा कुंभकर्णाला हिरवा प्रकाश दिसला. दार आपोआप बंद झालं आणि आपसूक कडी लागली. जे विमानात होते त्यांच्यावर क्षेपणास्त्राचा परिणाम झाला नाही. विमानात ते सुरक्षित राहिले. कुंभकर्ण बेशुद्ध होऊन खाली पडला. मोठ्याने ओरडत रावण आपल्या छोट्या भावाकडे धावला.

‘रुद्र देवा!’ लक्ष्मण पुटपुटला. त्याचं हृदय भीतीने गारठलं होतं. त्याने रामाकडे पाहिलं तेव्हा त्यालासुद्धा समोर घडत असलेल्या घटना पाहून तेवढाच मोठा धक्का बसल्याचं त्याला दिसून आलं.

‘अजून हे संपलेलं नाही,’ विश्वामित्र म्हणाले.

फणा उभारलेल्या सापाच्या फुत्कारासारखा भयानक आवाज अचानक ऐकू आला. असुरास्त्राच्या विखुरलेल्या तुकड्यांमधून बीभत्स हिरवा वायू बाहेर पडला जो लंकेच्या अचंभीत सैनिकांवर धुरासारखा पसरू लागला.

'ते काय आहे?' रामने विचारलं.

'तो वायूच असुरास्त्र आहे,' विश्वामित्र म्हणाले.

त्या दाट विषारी वायूने लंकेच्या सर्व सैनिकांना हलके हलके विळखा घातला. तो वायू आता त्यांना कित्येक दिवस बेशुद्ध ठेवणार होता. त्या वायूमुळे कदाचित काही लोकांचा मृत्यूसुद्धा होणार होता. तरीही लंकेच्या त्या सैनिकी छावणीतून कोणतीही किंकाळी ऐकू आली नव्हती. कुणीही मदतीसाठी हाकारा देत नव्हतं. कुणीही रडत-ओरडत नव्हतं. त्यांच्यापैकी कुणीही पळून जाण्याचा प्रयत्न केला नाही. ते फक्त जमिनीवर निश्चेष्ट पडून राहिले. क्रूर असुरास्त्राकडून स्वतःला विस्मृतीत लोटण्याची वाट पाहात होते. त्या भयाण शांततेतून फुत्कारणाऱ्या सापासारखा केवळ एकच आवाज येत होता, विषारी वायूचा.

रामने आपल्या गळ्यात बांधलेल्या रुद्राक्षाला स्पर्श केला. त्याचं हृदय बधीर झालं होतं.

अशा तीव्र यातनादायी तीस मिनिटांनंतर विश्वामित्रांनी रामकडे वळून सांगितलं, 'काम झालं!'

एका वेळी तीन तीन पायऱ्यांवर ढांगा टाकत सीता पोळा वस्तीच्या छतावर पोहोचली. बाजाराच्या चौकात मिथिलावासियांशी ती मनमोकळेपणाने बोलून त्यांना लढाईत सामील होण्याबद्दल विनंती करत होती. अचानक तिला क्षेपणास्त्राच्या विस्फोटाचा आवाज ऐकू आला. आकाशात उसळलेला प्रकाश तिला दिसला. असुरास्त्र चालवलं गेल्याचं पटकन् तिच्या लक्षात आलं. आपण घाई करून पोहोचायला हवं हे तिच्या ध्यानी आलं.

तिला आधी अरिष्टानेमी आणि मलयपुत्र भेटले. ते एके ठिकाणी उभे होते. पुढे विश्वामित्रांपासून काही अंतरावर राम आणि लक्ष्मण उभे होते. गंभीर चेहऱ्याची समीची सीतेपाठोपाठ आली.

'असुरास्त्र कुणी चालवलं?' सीतेनं विचारलं.

अरिष्टानेमी फक्त बाजूला सरकले. राम सीतेच्या समोर आला. तेथे केवळ त्याच्या हातात धनुष्य होतं.

सीता आपल्या पतीच्या दिशेने धावत पुढे निघाली. राग अनावर होऊन नकळत मोठ्या आवाजात ती लाखोली वाहात होती. राम उध्वस्त झाला असावा हे तिला कळत होतं. नीती-अनीतीची स्पष्ट जाण असलेल्या, कायद्याला समर्पित असलेल्या रामला जे पातक करावं लागलं ते त्याला आतून किती वेदना देत असेल याची सीतेला कल्पना होती. हे पातक रामनं आपल्या पत्नीच्या आणि तिच्या लोकांच्या बाबतीत आपल्या कर्तव्याची जाण ठेवून केलं होतं.

सीतेला येताना पाहून विश्वामित्र म्हणाले, 'सीता, आता चिंता करण्याचं कारण नाही! रावणाचं सैन्य उध्वस्त झालंय. आता मिथिला सुरक्षित आहे.'

सीता विश्वामित्रांकडे रागाने पाहात राहिली. आता रागामुळे तिच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. धावतच ती आपल्या पतीजवळ पोहोचली. तिने रामला मिठी मारली. त्याआधी सीतेने त्याला कधी मिठी मारली नव्हती. ती आपलं सांत्वन करायचा प्रयत्न करतेय हे रामच्या लक्षात आलं.

तरीही त्याने जेव्हा तिला दोन्ही हातांत पकडले तेव्हा त्याच्या हृदयाची धडधड वाढली. भावनांच्या उद्रेकामुळे त्याची शक्ती क्षीण झाली. डोळ्यातून ओघळलेला एकुलता अश्रु त्याला आपल्या चेहऱ्यावर जाणवला.

सीतेने आपलं डोकं मागे घेत रामाच्या रिकाम्या डोळ्यांत खोलवर पाहिलं. तिच्या चेहऱ्यावर चिंतेचं जाळं उमटलं. ती म्हणाली, 'राम मी तुझ्या सोबत आहे.'

राम गप्प होता. विचित्र म्हणजे सम्राट पृथुंची आर्य याबद्दलची विस्मृतीत गेलेली एक संकल्पना त्याला त्यावेळी आठवली. धरतीला पृथ्वी हे नाव त्यांच्या नावावरूनच दिलं गेलंय. पृथुंनी आर्यपुत्र म्हणजे आदर्श पुरुष आणि आर्यपुत्री म्हणजे आदर्श स्त्री यांच्या गुणांबद्दल सांगताना म्हटलंय की, मीनवी आदर्शाचा नमूना व्यक्तिशः बळकट आणि खंबीर आदर्श पुरुष आणि आदर्श स्त्रीच्या मीलनातून जन्म घेतो. आदर्श पुरुष आणि आदर्श स्त्रीमध्ये प्रतिस्पर्धा नसते, ते एकमेकांना पूरक असतात. एकमेकांच्या व्यक्तीमत्वामुळे त्यांना पूर्णत्व लाभतं. एकमेकांवर अवलंबून असणारे आदर्श पुरुष आणि आदर्श स्त्री एकमेकांच्या अस्तित्वाला पूर्णत्व देतात. हे दोघे दोन अर्धगोलांसारखे आहेत ज्यांच्या मीलनाने वर्तुळ पूर्ण होतं.

त्यावेळी रामला स्वतः आर्यपुत्र असल्यासारखं वाटलं. आर्यपुत्री सीतेने त्याला सावरलं. त्याला आधार दिला.

सीतेने रामभोवती टाकलेली मिठी सैल पडू दिली नाही. ती पुटपुटत राहिली, 'मी तुझ्यासोबत आहे, राम. आपण दोघे मिळून हे सांभाळू.'

रामने डोळे मिटून घेतले. आपल्या पत्नीला त्याने मिठीत घेतले. त्याने आपलं डोकं तिच्या खांद्यावर टेकवलं. स्वर्ग.

रामच्या खांद्यावरून विश्वामित्रांकडे पाहात सीतेने डोळे वटारले. भीती निर्माण करणारी तिची नजर देवी मातेच्या संतापासारखी होती.

विश्वामित्रांनी तिच्या नजरेला नजर दिली. त्यांच्या नजरेत पश्चातापाचा लवलेशही नव्हता.

मोठ्या आवाजानं त्या सगळ्यांचं लक्ष चाळवलं. मिथिलेच्या तटबंदीच्या भिंतींपलीकडे त्यांची नजर गेली. रावणाच्या पुष्पक विमानाची घरघर सुरू झाली होती. विमानाचे प्रचंड आकाराचे पंखे फिरू लागले होते. काही क्षणांतच त्यांनी वेग घेतला. विमान जमिनीवरून उडालं. काही काळ ते जमिनीवर काही फुटांवर उडत राहिलं. त्यानंतर त्याची शक्ती आणि आवाज वाढला. विमानाने आकाशात झेप घेतली. मिथिलेपासून, असुरास्त्रामुळे झालेल्या नासधुसीपासून ते दूर निघून गेलं.

# प्रकरण 26

राम आणि सीता आपापल्या घोड्यांवर स्वार होऊन निघाले होते. आपल्या पतीवर सीतेने एक नजर टाकली. आपापल्या घोड्यांवर स्वार झालेले लक्ष्मण आणि उर्मिला या दोघांच्या मागून येत होते. लक्ष्मणाची टकळी अविश्रांत सुरू होती. उर्मिला आपल्या पतीचं बोलणं लक्ष देऊन ऐकत होती. त्याचवेळी आपल्या डाव्या हातातील तर्जनीत असलेल्या अंगठीतील मोठ्या हिऱ्याशीही ती खेळत होती. ती अंगठी तिला पतीकडून भेटीदाखल मिळालेली होती. त्यांच्यामागे मिथिलेचे शंभर सैनिक होते. राम-सीता यांच्या पुढे आणखी शंभर सैनिक होते. हा तांडा सांकष्यच्या दिशेने निघाला होता. तेथून ते नावेतून अयोध्येला जाणार होते.

असुरास्त्राच्या हल्यानंतर लंकेच्या छावणीची धुळदाण उडाली होती. त्या घटनेनंतर दोन आठवड्यांनी राम, सीता, लक्ष्मण आणि उर्मिला मिथिला नगरीहून निघाले होते. लंकेच्या राजा रावणाकडून मागे टाकलेल्या सैनिकांना राजा जनक आणि राजा कुशध्वजांनी अधिकृतपणे युद्धकैदी घोषीत केलं होतं. विश्वामित्र आणि त्यांचे सर्व मलयपुत्र त्यांच्या राजधानीला – म्हणजे अगत्स्यकूटमला जाताना या युद्धकैद्यांना सोबत घेऊन निघाले होते. महर्षी विश्वामित्र लंकेच्या राजा रावणाशी मिथिलेच्या वतीने मिथिलेच्या सुरक्षिततेच्या बदल्यात या युद्धकैद्यांना सोडण्याबद्दल वाटाघाटी करणार होते. आपली मैत्रीण समीचीला सोडून जाणं सीतेच्या जीवावर आलं होतं. पण अशा महत्वाच्या वेळी मिथिलेच्या नगररक्षक दलाच्या प्रमुख पदी कोणताही बदल करणं परवडणारं नव्हतं.

‘राम...’

राम हसतमुखानं सीतेकडे वळला आणि त्याने आपला घोडा तिच्या घोड्याजवळ आणला, ‘हं?’

‘तुला नक्की हे ठीक वाटतंय ना?’

रामने होकारार्थी मान हालवली. त्याच्या मनात कोणत्याही प्रकारची शंका नव्हती.

‘पण, रावणाला हरवणारा या पिढीतील तू पहिलाच माणूस आहेस. आणि त्याची हार खरं तर दैवी अस्त्रानं झालीच नाही. तू जर....’

राम नाराजी व्यक्त करत म्हणाला, ‘ती तांत्रिक बाजू झाली. आणि हे तू सुद्धा जाणतेसच.’

सीतेनं खोल श्वास घेतला आणि ती पुढे बोलू लागली, ‘कधी कधी आदर्श राज्याच्या निर्मितीसाठी नेत्याला वेळेच्या गरजेनुसार लोकांना जरी एखादी गोष्ट त्यावेळी बरोबर वाटत नसली तरी ती करावी लागते.’ ज्या नेत्याकडे लोकांचा उद्धार करण्याची क्षमता असते त्याने आपल्या कारकिर्दीत अशी संधी मिळाल्यास ती गमावू नये. नेहमी स्वतःला उपलब्ध ठेवणं हे त्याचं कर्तव्य आहे. खरा नेता आपल्या प्रजेच्या भल्यासाठी आपल्या आत्म्यावर पापाचं ओझं घेण्यासही कचरत नाही.

रामनं सीतेकडे पाहिलं. त्याची थोडी निराशा झाल्यासारखं वाटलं. तो म्हणाला, ‘मी असं करून बसलोय, हो ना? प्रश्न हा आहे की मला त्याबद्दल शिक्षा करायची किंवा नाही. आपल्या हातून घडलेल्या या पापाच्या क्षालनासाठी मला तपश्चर्या करावी लागेल का? मला जर माझ्या

प्रजेकडून कायदापालनाची अपेक्षा असेल तर मी सुद्धा कायद्याचं पालन करायला हवं. नेता केवळ मार्गदर्शक नसतो तर त्याचं वर्तनसुद्धा आदर्श असायला हवं. तो जे बोलतो तसंच त्यानं वागायला सुद्धा हवं, सीता.'

सीता हसली. म्हणाली, रुद्रदेवांनी म्हटलंय, 'नेता हा केवळ लोकांना जे हवं असतं ते देणारा नसतो. आपण जी कल्पना केली त्याहून आपण चांगले बनू शकतो ही शिकवण त्याने लोकांना द्यायला हवी.'

राम हसत म्हणाला, 'आणि यावर मोहिनीदेवींनी जे उत्तर दिलं होतं ते सुद्धा तू मला सांगशील ना?'

सीता हसली, म्हणाली, 'होय, मोहिनी देवी म्हणाल्या की लोकांच्या मर्यादा असतात. नेत्याने लोकांकडून त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक कशाची मागणी करू नये. त्यामुळे त्यांना अपयश येण्याची शक्यता असते.'

रामने डोकं हालवलं. महान देवी मोहिनीशी तो पूर्ण सहमत नव्हता. कित्येक लोक त्यांना विष्णू मानत आणि त्यांचा आदर करत. इतर बऱ्याच लोकांचं म्हणणं होतं की देवी मोहिनींना विष्णूपद द्यायला नको. रामला वाटायचं, लोकांनी आपल्या सीमा उल्लंघाव्या, स्वतःत चांगले बदल घडवून आणावेत. कारण त्यामुळेच आदर्श समाज बनणार होता. अर्थात त्याने आपली असहमती बोलून दाखवली नाही.

'नक्की तुला असंच वाटतं? चौदा वर्षे सप्तसिंधू प्रदेशाच्या बाहेर रहाणार आहेस तू?' गंभीर होऊन रामकडे पाहात सीतेने विचारलं. चर्चेचा ओघ पुन्हा आधीच्या विषयाकडे वळला. रामने होकारार्थी मान हालवली. तो निर्णय घेऊन चुकला होता. अयोध्येला परतल्यानंतर तो पित्याची परवानगी घेऊन स्वतःच स्वतःवर लादलेल्या 14 वर्षांच्या वनवासासाठी निघणार होता. तो म्हणाला, 'मी रुद्र देवांचा कायदा मोडला. यासाठी त्यांनी हीच शिक्षा सांगितलीय. मला शिक्षा देण्यासाठी वायुपुत्र फर्मान काढतील किंवा नाही याने फारसा फरक पडणार नाही. मला माझी शिक्षा भोगायला हवी.'

सीता त्याच्या बाजूला झुकत म्हणाली, 'आपण... फक्त मी नव्हे!'

रामने नापसंतीदर्शक मान हालवली.

सीतेने पुढे होऊन आपला हात रामच्या हातावर ठेवला. ती म्हणाली, 'आता तू माझ्या भाग्याचा भागीदार आहेस. विवाहाचा अर्थ हाच तर आहे.' तिने आपली बोटं त्याच्या बोटांत गुंफली. म्हणाली, 'राम, मी तुझी पत्नी आहे. आपण नेहमी एकत्र राहू. चांगल्या आणि वाईट वेळी एकमेकांना साथ देऊ.'

आपली पाठ सरळ करता करता रामने तिची बोटं दाबली. त्याचा घोडा खिंकाळला आणि त्याने वेग वाढविला. रामने हलकेच लगाम खेचला. आपला घोडा त्याने सीतेच्या घोड्यासोबत ठेवला.

'ही पद्धत प्रभावी ठरेल असं मला वाटत नाही,' राम म्हणाला.

राम-सीता आणि लक्ष्मण-उर्मिला ही नवविवाहित जोडपी अयोध्येच्या शाही नौकेत होते. शरयू नदीवर त्यांची नौका अयोध्येच्या दिशेनं चालली होती. आठवडाभरात ते अयोध्येत पोहोचणार

होते.

राम आणि सीता नौकेच्या वरच्या मजल्यावर आदर्श समाज कसा असावा, अशा समाजावर कोणत्या प्रकारे राज्य चालवावे याबद्दल बोलत होते. रामचं मत होतं की, जिथे कायद्यासमोर सर्वजण समान असतात तेच आदर्श राज्य असतं.

समानतेबद्दल सीतेने बराच विचार केलेला होता. तिच्या मते केवळ कायद्याने समानता देऊन समाजासमोरील समस्या सुटणार नव्हत्या. खरी समानता केवळ आत्म्याच्या स्तरावरच असू शकते, या भौतिक जगात खरं तर सगळे समान नाहीत असं तिला वाटायचं. या जगात अस्तित्वात असलेल्या दोन वस्तू एकसारख्या नसतात. माणसा-माणसांमध्येही फरक असतो. काही लोक बुद्धिमान असतात, काही लोक कुशल योद्धे असतात, काही उत्तम व्यापारी असतात तर काही लोक मेहनतीची आणि कौशल्याची कामं करण्यात वाकबगार असतात. मात्र सीतेला वाटायचं की, माणसाने जीवनात कोणता मार्ग पत्करायचा हे त्याच्या जन्मावरून ठरतं, कर्मावरून नाही ही आजच्या जगाची खरी समस्या आहे. लोकांना त्यांना हवं ते करायचं स्वतंत्र्य जेव्हा लाभेल, ज्या जातीत जन्म झाला त्या जातीचे नियम पाळून नव्हे तर कर्माच्या आधारे लोकांना आपला जीवनमार्ग निवडण्याची संधी जेव्हा मिळेल तेव्हाच आदर्श समाजाची निर्मिती होईल.

आणि हे नियम आले कुठून? ते पालकांकडून येतात. पालक आपले विचार आणि मूल्यं मुलांवर लादतात. ब्राह्मण पालक आपल्या पाल्याला जरी व्यापार-उदीमात रस असला तरी आपल्या जातीशी निगडीत ज्ञानप्राप्तीच्या मार्गावर ढकलतात. अशा चुकीच्या निवडीमुळे समाजात असंतोष पसरतो आणि गोंधळ माजतो. लोकांना ज्या कामात रस नसतो ती कामं त्यांना करावी लागतात तेव्हा समाजाचं नुकसान होतं. या मोजमापाच्या छडीचा सर्वात अधिक फटका शूद्रांना सोसावा लागतो. त्यांच्यापैकी कित्येक जण ब्राह्मणांच्या, क्षत्रियांच्या किंवा वैश्यांच्या बरोबरीचे असू शकतात. पण कठोर आणि अन्यायकारक जन्माधारित जातीय व्यवस्था त्यांना कामगार बनायला भाग पाडते. आधीच्या युगात जातीय व्यवस्था लवचिक होती. कित्येक शतकांआधी महर्षींच्या रूपात याचं उत्तम उदाहरण पाहायला मिळतं. आज त्यांना वेदव्यास म्हणून ओळखलं जातं. त्यांच्या नंतरच्या युगात ही पदवी झाली आणि वेदांचा अभ्यास आणि परीक्षण करणाऱ्यांना बहाल केली जाऊ लागली. त्यांचा जन्म शूद्र कुटुंबात झाला होता. पण त्यांच्या कर्माने ते ब्राह्मणत्वाला पोहोचले. इतकंच नाही तर, त्यांच्या कर्माने त्यांना ऋषीपदही मिळवून दिलं. त्या काळी ऋषींचं स्थान सर्वश्रेष्ठ होतं. त्यांना देवाखालोखाल मानलं जात होतं. अशा रीतीने त्याकाळी कुणीही देवत्व प्राप्त करू शकत होतं. पण आज मात्र जन्माने निर्धारित होणाऱ्या कठोर जातीय व्यवस्थेमुळे शूद्रांमधून कुणी महर्षी शक्तीचा उदय होणं जवळ जवळ अशक्य होऊन बसलंय.

‘आज कदाचित हे प्रभावी ठरणार नाही आणि हे सगळं अत्यंत कठोर आहे असं तुला वाटण्याची शक्यता आहे. तुझा मुद्दा मला मान्य आहे. कायद्यासमोर सगळे समान असायला हवेत. सगळ्यांना समान आदर मिळायला हवा. पण एवढंच पुरेसं नाही. आपल्याला जन्माधारित जातीय व्यवस्था नष्ट करायची असेल तर जास्त कठोर व्हायला हवं,’ सीता म्हणाली, ‘या व्यवस्थेमुळे आपला धर्म आणि आपला देश दुर्बल होतोय. भारताचं भलं व्हायला हवं असेल तर आज प्रचलित असलेली ही जातीय व्यवस्था संपवायला हवी. आज ज्या स्थितीत

ही जातीय व्यवस्था लागू आहे. ती नष्ट केली नाही तर आपल्यावर विदेशी हल्ले होण्याची शक्यता आहे. आपल्यातील या फुटीचा वापर ते आपल्यावर विजय मिळविण्यासाठी करून घेतील.'

सीताने सुचविलेला उपाय रामला थोडा कठोर पण योग्य वाटला. पण तो लागू करणं कठिण होतं. तिने सुचविलेली योजना अशी की, राज्यातील सगळ्या मुलांना जन्माच्या वेळीच राज्याने अनिवार्यतः दत्तक घ्यायचे. जन्म देणाऱ्यांनी आपली मुलं राज्याला अर्पण करावीत. राज्यानं या मुलांचं संगोपन करावं. त्यांना शिक्षण द्यावं आणि त्यांच्यातील उपजत गुणांना प्रोत्साहन द्यावं. पंधरा वर्षांचे झाल्यावर परीक्षा घेऊन त्यांच्या शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक कौशल्याची चाचणी घ्यावी. त्यातून समोर आलेल्या मुलांच्या क्षमतेनुसार त्यांना जात बहाल करण्यात यावी. त्यानंतर त्या क्षेत्रातील त्यांच्या कौशल्याला योग्य प्रशिक्षण देऊन आणखी धार द्यावी. त्यानंतर मुलांना त्यांच्या जातीच्या पालकांना दत्तक द्यावं. हे पालकसुद्धा राज्यानं त्यांना दिलेल्या जातीनुसार असावेत. मुलांना पल्याला जन्म देणाऱ्या पालकांबद्दलची माहिती कधीही मिळू नये. त्यांना केवळ जात-पालकांचीच माहिती असावी.

'ही व्यवस्था अतिशय उत्तम ठरेल हे मी मान्य करतो,' रामने आपली संमती व्यक्त करत म्हटलं, 'पण पालक आपली मुलं राज्याला कायमसाठी द्यायला, पुन्हा त्यांना कधीही न भेटायला, किंवा ते कुठे आहेत हे जाणून न घेण्याला तयार होतील असं मला अजिबात वाटत नाही.'

'माणसांनी नैसर्गिक पद्धतीपासून फारकत घेतली तेव्हापासूनच त्यांनी कपडे वापरायला सुरवात केली, ते अन्न शिजवू लागले आणि उपजत बुद्धीचा त्याग करून त्यांनी सांस्कृतिक कित्ते स्वीकारले. संस्कृतीचं असंच असतं. सुसंस्कृतांमध्ये बरोबर आणि चुक याचा निर्णय सांस्कृतिक नियम, रूढी आणि संकेत ठरवितात. एके काळी बहुविवाह पद्धत अत्यंत घृणित पद्धत मानली जात असे. पण ज्यावेळी युद्धामुळे पुरुषांची संख्या घटली त्यावेळी हीच पद्धत एक उपाय म्हणून स्वीकारली गेली. आणि आता, वाटलंच तर, तू पुन्हा एक विवाह पद्धतीची लाट चलनात आणू शकतोस!'

राम हसत म्हणाला, 'मला कोणतीही पद्धत सुरू करायची नाहीय. मला दुसऱ्या स्त्रीबरोबर लग्न करायचं नाहीय. कारण मला वाटतं की त्यामुळे तुझा अपमान होईल.'

सीतेच्या चेहऱ्यावर स्मित झळकलं. वाऱ्यानं सुकलेले तिचे लांब, सरळ केस आता तिच्या चेहऱ्यावर भुरभुरू लागले होते. हातानं ते बाजूला सारत ती म्हणाली, 'पण केवळ तुझ्या मते बहुविवाह पद्धत चुकीची आहे. इतरांना तसं न वाटण्याचीही शक्यता आहे. बरोबर किंवा चूक ठरवून न्याय देणं ही मानव-निर्मित संकल्पना झाली हे लक्षात असू दे. न्यायदानासाठी योग्य-अयोग्याच्या परिभाषा ठरविणं हे पूर्णपणे आपल्या हातात आहे. जे ठरवलं जाईल ते मग व्यापक जनकल्याणासाठी योग्य असेल.'

'हं, पण हे लागू करणं फार कठिण आहे, सीता.'

'भारतीय लोकांना कायद्याचा आदर करायला शिकविण्याहून जास्त अवघड नाही!' हसत सीता म्हणाली. कारण तिला ठाऊक होतं की रामला या गोष्टींचं वेड होतं.

रामसुद्धा मोठ्यानं हसत म्हणाला, 'अलबत!'

रामजवळ येऊन सीतेने त्याचा हात हातात घेतला. रामने पुढे झुकून तिचा मुका घेतला.

दोघांचाही ऊर समाधानानं भरून येईल असं हळुवार, कोमल चुंबन. रामनं सीतेला कवेत घेतलं होतं. आणि ते दोघे दूरवरच्या हिरव्या किनाऱ्यापर्यंत वाहात असलेल्या शरयू नदीकडे पाहात राहिले.

'आपल्यातील ते सोमरसाबद्दलचं बोलणं अजून पूर्ण झालेलं नाहीय..... तू काय म्हणत होतास?' सीताने विचारलं.

'मला वाटतं की सोमरस एक तर सगळ्यांना उपलब्ध असावा किंवा तो कुणालाही उपलब्ध नसावा. केवळ कुलीनांना दीर्घायुष्य आणि उत्तम आरोग्य लाभावं आणि इतरांनी त्यापासून वंचित रहावं हा अन्याय आहे.'

'पण सगळ्यांसाठी पुरेशा सोमरसाचं उत्पादन तू कसं काय करशील?'

'गुरु वशिष्ठांनी एक तंत्रज्ञान विकसित केलंय ज्याआधारे मोठ्या प्रमाणावर सोमरस निर्माण करता येईल. अयोध्येचं राज्य जर माझ्या ताब्यात आलं तर....'

'जेव्हा!' सीता मध्येच म्हणाली.

'काय म्हणालीस?'

'अयोध्येचं राज्य 'जर' नव्हे, 'जेव्हा' तुझ्या हातात येईल, असं मी म्हटलं. चौदा वर्षांनी का होईना ते तुझ्याच हातात येणार आहे.'

राम हसतच म्हणाला, 'बरं. अयोध्येचं राज्य जेव्हा माझ्याकडे येईल तेव्हा गुरु वशिष्ठांनी आराखडा बनवून दिलेला हा उद्योग मी सुरू करणार आहे. आपण सगळ्यांसाठी सोमरस उपलब्ध करून देऊ.'

'तू जर एक पूर्ण नवी जीवन पद्धत निर्माण करणार असशील तर त्यासाठी नवं नावही हवं. जुन्याचं कर्म कशाला वाहा?'

'मला वाटतं, नवं नाव तू ठरवूनही ठेवलंयस!'

'पवित्र जीवनाची धरती.'

'हे नाव आहे?'

'नाही, हा त्या नावाचा अर्थ आहे.'

'मग माझ्या नव्या राज्याचं नाव काय असेल बरं?'

सीता हसत म्हणाली, 'मेलुहा!'

'डोकं ठिकाणावर आहे ना तुझं?' दशरथ ओरडले.

कौसल्येच्या महालातील आपल्या नव्या कार्यालयात सम्राट दशरथ बसलेले होते त्यावेळी रामने त्यांना आपला निर्णय सांगितला. वायुपुत्रांच्या परवानगीशिवाय दैवी अस्त्र चालविल्याच्या कृत्याच्या परिमार्जनासाठी चौदा वर्षे सप्तसिंधू प्रदेशापासून दूर रहाण्याचा निर्णय त्याने पिता सम्राट दशरथांना कळविला. रामचा हा निर्णय दशरथांना पटला नव्हता, नव्हे, तो त्यांना अमान्य होता.

काळजीने कौसल्या धावतच पतीजवळ आल्या आणि दशरथांना बसविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. दशरथांची तब्बेत काही काळापासून खालावत चालली होती. त्या म्हणाल्या, 'कृपा करून शांत रहा, महाराज.'

दशरथांवर कैकयीच्या प्रभावामुळे डळमळीत झालेल्या कौसल्या आता पतीशी संबंधीत सगळ्याच बाबतीत दक्षतेनं वागत. किती काळ आपण दशरथांची प्रिय पत्नी राहू याची त्यांना शाश्वती नव्हती. त्यांच्यासाठी दशरथ अजूनही 'महाराज'च होते. पण त्यांच्या अशा काळजीमुळे दशरथ जास्तच वैतागले.

'देवा परशुरामा! कौसल्या मला असं लहान मुलांसारखं वागवणं बंद करा आणि आपल्या या मुलाला जरा अक्कल शिकवा,' दशरथ ओरडत म्हणाले, 'तो जर चौदा वर्षे इथून निघून गेला तर काय होईल असं तुम्हाला वाटतं? हे कुलीन लोक त्याच्या परतण्याची वाट पाहात राहातील की काय?'

'राम,' कौसल्या म्हणाल्या, 'तुझे वडील बरोबर सांगताहेत. कुणीही तुला शिक्षा द्यायला सांगत नाहीय. वायुपुत्रांनी अशी मागणी केलेली नाहीय.'

राम स्थिर स्वरात म्हणाला, 'ते अशी मागणी ठेवतीलच, फक्त त्यांना थोडा वेळ लागेल!'

'पण आपण त्यांचं ऐकलं पाहिजे असं नाही. आपण त्यांच्या कायद्यानुसार चालत नाही!'

'इतरांकडून कायद्याच्या पालनाची अपेक्षा जर मी ठेवत असेन तर मलासुद्धा कायद्यानुसार वागायलाच हवं.'

'तुला आत्महत्या करावीशी वाटतेय का राम?' दशरथांनी विचारलं. त्यांचा चेहरा पांढरा पडला होता. रागानं त्यांच्या हातांना कंप सुटला होता.

'मी फक्त कायद्याचं पालन करतोय, पिताश्री.'

'माझी तब्बेत किती खालावलीय हे तुला दिसत नाही का? लवकरच मला तुम्हा सगळ्यांचा निरोप घ्यावा लागणार आहे. तू इथे नसशील तर भरत राजा होईल. आणि तू जर चौदा वर्षांपर्यंत सप्त सिंधू प्रदेशाबाहेर राहिलास तर या काळात राज्यावर भरत आपलं बस्तान बसवेल. एखादं खेडंसुद्धा तुझ्या वाट्याला येणार नाही.'

'पिताश्री, पहिली गोष्ट ही की माझ्या पश्चात आपण जर भरतला राजा घोषित केलं तर माझ्या परतण्यानंतरही राज्यावर त्याचाच अधिकार राहील. आणि, मला वाटतं, भरत एक चांगला राजा बनेल. अयोध्येचं नुकसान होणार नाही. पण मी वनवासात असताना जर तुम्ही माझं युवराजपद कायम राखलंत तर मी परत आल्यानंतर भरत मला राज्य परत देईल. माझा त्याच्यावर पूर्ण विश्वास आहे.'

दशरथ क्रूरपणे हसले. म्हणाले, 'म्हणजे, तुला खरंच वाटतं का, की तू वनवासात गेल्यानंतर भरत अयोध्येवर राज्य करेल? नाही! तो नाही, त्याची आई राज्याची सूत्रं हातात घेईल. आणि तू वनवासात असताना कैकयी तुझा घात करेल, पोरा.'

'पिताश्री, मी कुणालाही मला मारू देणार नाही. आणि समजा, जर मी मारला गेलो तर कदाचित तेच माझ्या नशिबी लिहिलेलं असेल.'

दशरथांनी कपाळावर हात मारला. त्यांच्या कंठातून क्रुद्ध हुंकार निघाला. त्यातून त्यांची निराशा व्यक्त होत होती.

'पिताश्री, माझा निर्धार झालेला आहे,' रामचा स्वर निर्णायक होता. तो म्हणाला, 'पण आपली परवानगी घेतल्याशिवाय जर गेलो तर तुमचा अपमान केल्यासारकखं होईल. आपलाच नव्हे तर तो अयोध्येचासुद्धा अपमान ठरेल. युवराज राजाच्या आज्ञेचं उल्लंघन कसा करेल? म्हणून माझी आपणास विनंती आहे की, आपण मला घालवून द्या.'

दशरथ कौसल्येकडे वळले. निराशेनं त्यांनी आपले हात हवेत फेकले.

'शेवटी असंच होणार आहे, पिताश्री. तुम्हाला आवडो वा न आवडो,' राम म्हणाला, 'तुम्ही मला हद्दपार केलंत तर अयोध्येचा मान शाबूत राहील. म्हणून, कृपया मला हद्दपार करा.'

दशरथांचे खांदे झुकले. ते ईश्वराला शरण गेले. राम म्हणाला, 'निदान माझ्या दुसऱ्या सूचनेचा स्वीकार करा!'

राम दृढनिश्चयाने उभा राहिला. पण त्याच्या चेहऱ्यावर अपराधीपणाची भावना होती. नाही.

'पण राम, जर तू एखाद्या शक्तीशाली राज्याच्या राजकन्येशी विवाह केलास तर मात्र....'

'आपलं बोलणं मध्येच थांबविण्याबद्दल मी माफी मागतो पिताश्री, पण मी नेहमीच सांगत आलोय की मी केवळ एका स्त्रीशीच विवाह करेन. दुसऱ्या स्त्रीशी विवाह करून मी तिचा अपमान कधीही करणार नाही.'

दशरथ अगतिकतेने त्याच्याकडे पाहात राहिले.

आपल्याला आणखी फोड करून सांगावं लागेल हे रामच्या लक्षात आलं. तो म्हणाला, 'आणि जर माझ्या पत्नीचा मृत्यू झाला तर मी जन्मभर तिच्या मृत्यूचा शोक करेन, पण मी पुन्हा कधीही विवाह करणार नाही.'

शेवटी कौसल्यांच्या संयमाचा बांध फुटला. त्या रागाने म्हणाल्या, 'म्हणजे? तुला काय म्हणायचंय राम? तुला असं म्हणायचंय का की तुझे वडील तुझ्या पत्नीचा खून करवतील?'

'मी असं म्हटलेलं नाही, मातोश्री,' राम शांतपणे म्हणाला.

'राम, जरा समजून घे,' दशरथ आपल्या रागावर नियंत्रण ठेवण्याची पराकाष्ठा करत रामला समजावण्याचा प्रयत्न करू लागले, 'ती मिथिलेची राजकन्या आहे आणि मिथिला हे दुय्यम राज्य आहे. पुढे तुला ज्या प्रकारच्या संकटांचा सामना करावा लागेल त्यात ती तुझी कोणत्याही प्रकारे मदत करू शकणार नाही.'

राम ताठरला. पण आपला स्वर शांत ठेवत तो म्हणाला, 'ती माझी पत्नी आहे, पिताश्री. कारण कृपया तिच्याबद्दल आदराने बोला.'

'ती अतिशय गोड मुलगी आहे राम,' दशरथ म्हणाले, 'गेले काही दिवस मी पाहातोय तिला. ती चांगली पत्नी आहे, ती तुला सुखी ठेवेल. तू तिच्याशीसुद्धा विवाहबद्धच राहाशील. पण तू जर दुसऱ्या एखाद्या राजकुमारीबरोबर विवाह केलास तर....'

'माफ करा पिताश्री मला, पण नाही. माझं उत्तर नाही असंच राहील.'

'सत्यानाश!' दशरथ किंचाळले. 'माझ्या नसा तडकण्याआधी तू येथून निघून जा.'

'होय पिताश्री!' राम म्हणाला आणि शांतपणे तेथून निघून जाण्यासाठी वळला.

'आणि माझ्या आज्ञेशिवाय तू या शहराबाहेर जाणार नाहीस!' दशरथ रामच्या पाठमोऱ्या आकृतीवर ओरडले.

रामने मागे वळून पाहिलं. त्याच्या चेहऱ्यावरून त्याच्या मनाचा थांग लागत नव्हता. अत्यंत संथपणे त्याने मान झुकवली, हात जोडून नमस्कार केला आणि तो म्हणाला, 'पिताश्री, सर्व देवांची आपल्यावर कृपा असो.' मग तेवढ्याच संथपणे तो वळला आणि निघून गेला.

दशरथ कौसल्येकडे पाहात राहिले. त्यांच्या डोळ्यांत रागाचा आगडोंब उसळला होता. त्यांच्या पत्नीच्या- रामच्या मातेच्या चेहऱ्यावर अपराधीपणाचा भाव होता. रामने जी इच्छा व्यक्त केली होती त्यासाठी त्या स्वतः जबाबदार असल्यासारखा.

# प्रकरण 27

राम महालातील आपल्या कक्षात पोहोचला तेव्हा सीता तेथे नव्हती. ती शाही उद्यानात गेली असल्याचं त्याला समजलं. उद्यानात जाऊन तिला सामील होण्याचा त्यानं विचार केला. उद्यानात सीता भरतबरोबर बोलत होती. आपल्या मोठ्या भावाने एका छोट्या राज्याच्या राजाच्या दत्तक मुलीशी विवाह केल्याचे ऐकून इतर सगळ्यांसारखाच आधी भरतलासुद्धा धक्का बसला होता. पण केवळ काही दिवसांतच भरतच्या मनात सीतेबद्दल, तिच्या बुद्धिमत्तेबद्दल आणि तिच्या श्रेष्ठ व्यक्तीमत्वाबद्दल आदर निर्माण झाला होता.

'....आणि म्हणून मला वाटतं की स्वातंत्र्य ही जीवनाची फार मोठी ठेव आहे, वहिनी,' भरत म्हणाला.

'कायद्याहूनही मोठी आहे का?' सीतेनं विचारलं.

'होय,' भरत म्हणाला, 'मला वाटतं, जितके कमी कायदे असतील तेवढं उत्तम. कायद्याची चौकट अशी असावी की ज्यात मानवी क्रियाशीलतेला आपल्या संपूर्ण गौरवानिशी व्यक्त होण्यास वाव मिळेल. स्वातंत्र्यच जीवन जगण्याचा सहज न्याय आहे.'

सीतेनं मंद हसत विचारलं, 'आणि तुझ्या या विचारांबद्दल तुझ्या मोठ्या भावाचं काय मत आहे?'

रामने मागून येऊन सीतेच्या खांद्यावर आपले हात ठेवत म्हटलं, 'त्याच्या मोठ्या भावाला वाटतं की भरत इतरांवर आपला घातक प्रभाव टाकतो!'

भरत खळखळून हसत उठून उभा राहिला आणि आपल्या भावाला गळाभेट देण्यासाठी पुढे येत म्हणाला, 'दादा...'

'स्वातंत्र्याबद्दलच्या तुझ्या विचारांनी आपल्या वहिनीचं मनोरंजन केल्याबद्दल मी तुझे आभार मानू का?'

खांदे उडवत भरत म्हणाला, 'निदान अयोध्येतील लोकांना मी कंटाळा तर देत नाहीय!'

हसतच रामने उत्तर दिले, 'मग उत्तम आहे.'

भरतच्या चेहऱ्यावरील भाव लगेच बदलले. तो थोडा गंभीर झाला. म्हणाला, 'पिताश्री तुला जाऊ देणार नाहीत, दादा. तुलासुद्धा हे ठाऊक आहे. तू कुठेही जाणार नाहीस.'

'पिताश्रींसमोर पर्याय नाहीय. आणि तुझ्यासमोरही नाहीय. तू अयोध्येवर राज्य करणार आहेस. आणि तू उत्तम प्रकारे राज्यकारभार करशील याची मला खात्री आहे.'

'अशाप्रकारे मला सिंहासनाधिष्ठित नाही व्हायचंय,' भरतने खेदानं डोकं हालवत म्हटलं, 'नाही, अजिबात नाही.'

आपण काहीही बोललो तरी भरतचं दुःख हलकं होणार नाही हे रामला ठाऊक होतं.

'दादा, तू हा हट्ट का धरला आहेस?' भरतने रामला विचारलं.

'कारण कायदाच तसा आहे म्हणून, भरत,' राम म्हणाला, 'मी दैवी अस्त्र चालवलंय.'

'कायद्याची ऐशी-तैशी, दादा! तू गेलास तर अयोध्येचं कल्याण होईल असं तुला वाटतंय का? आपण दोघे मिळून अयोध्येसाठी काय काय करू याचा जरा विचार कर. तू कायद्यावर जोर

देशील आणि मी सर्जकतेवर. आपल्यापैकी कुणा एकाचा चांगला प्रभाव पडेल असं तुला वाटतं का?'

रामनं नकारार्थी डोकं हालवलं. म्हणाला, 'मी चौदा वर्षांनंतर परत येईन भरत. आत्ता तू स्वतःच मान्य केलंयस की समाजात कायद्याचं महत्वाचं स्थान आहे. मी स्वतःच जर कायद्याचं पालन केलं नाही तर लोकांना कोणत्या तोंडानं कायद्याचं पालन करा असं सांगणार? प्रत्येक व्यक्तीवर कायदा समान आणि योग्य रीतीनं लागू व्हायला हवा. इतकं सोपं आहे ते.' मग रामनं भरतच्या डोळ्याला डोळा देत म्हटलं, 'एखाद्या घृणित अपराध्याला जरी मृत्युदंड देता आला नाही तरी चालेल, कायदा तोडला जाऊ नये.'

भरतने रामची नजर चुकवली नाही. तो थेट त्याच्या नजरेला नजर देत राहिला. त्याच्या मनात काय चाललंय याचा वरकरणी थांग लागत नव्हता.

दोघा भावांत कोणत्यातरी विषयावर शब्दांची देवघेव चाललीय आणि बोलणं अप्रिय वळण घेतंय हे जाणवून सीता उठून उभी राहिली. तिने रामला म्हटलं, 'सेनानायक मृगस्यांशी तुझी भेट ठरलेली आहे.'

'मला उद्धटपणा करायचा नाहीय, पण तुला खरंच तुझ्या पत्नीनेही या बैठकीला हजर असावं असं वाटतं का?' अयोध्येच्या सरसेनापती मृगस्यांनी विचारलं.

राम आणि सीता आपल्या खाजगी दालनात मृगस्यांचं स्वागत करत होते.

'आमच्यात कोणतीही गुपितं नाहीत,' राम म्हणाला. आणि एरवीही नंतर मी तिला कशाबद्दल चर्चा झाली हे सांगेन. मग ते तिने इथेच का ऐकू नये?'

मृगस्यांनी सीतेवर एक गूढ नजर टाकली आणि दीर्घ निश्वास सोडून ते बोलू लागले, 'राम, तू लगेच सम्राट बनू शकतोस.'

अयोध्येचा राजा सप्तसिंधू प्रदेशाचा सम्राट बनत असे. राजा रघुंपासून कोसल देशावर राज्य करणाऱ्या सूर्यवंशी घराण्याचा हा शिरस्ता होता. रामला सिंहासनाधिष्ठित करण्याचा मार्ग सोपा करण्याचा प्रस्ताव मृगस्य मांडत होते.

सीता चकित झाली पण तिने आपल्या मनातील भाव चेहऱ्यावर येऊ दिले नाहीत. मात्र रामच्या चेहऱ्यावर नापसंती स्पष्ट उमटली.

रामच्या मनात जे चाललं होतं त्याबद्दल मृगस्यांनी बांधलेला अंदाज मात्र चुकीचा होता. त्यांना वाटलं, रामच्या मनात आलं असावं की, सरसेनापती आपली मदत का करू इच्छितात? रामच्या आज्ञेने त्यांच्या एका अधिकाऱ्याला जमीन बळकावण्याच्या छोट्या अपराधासाठी शिक्षा सुनावली गेली होती.

'आपण माझ्या बाबतीत जे केलंत ते मी विसरायला तयार आहे,' मृगस्य म्हणाले, 'मी आता आपणासाठी जे करणार आहे ते आपण लक्षात ठेवायला तयार असाल तर...'

राम गप्प राहिला.

'हे पाहा, युवराज राम,' मृगस्य बोलत राहिले. 'नगर रक्षक दलात आपण जे बदल घडवून आणलेत त्याबद्दल लोक आपणावर प्रेम करतात. धेनुकाच्या प्रकरणात काही काळ आपण अलोकप्रिय झालात पण मिथिलेत रावणाला पराभूत केल्याच्या गौरवामुळे लोक आपली नाराजी विसरले. कदाचित आपणास हे माहीत नसेल की आपण यामुळे कोसल देशातच नव्हे तर भारत वर्षातील सामान्यजनांच्या गळ्यातील ताइत बनलेले आहात. सप्तसिंधूमध्ये रावणाएवढा

तिरस्कृत कुणीही नाहीय आणि आपण त्याचा पराभव केलात. अयोध्येच्या कुलीनांना मी आपल्या पक्षात आणू शकतो. पुढील काही काळ सप्त सिंधू प्रदेशातील बहुतेक मुख्य राज्ये हिवाळ्याच्या तडाख्यात येतील. आपल्याला फक्त केकय आणि त्याच्या अधीन असणाऱ्या राज्यांबद्दलच विचार करावा लागेल. पण ही राज्येसुद्धा अनु राजाचे वंशज असून त्यांच्यात आपापसात कित्येक मतभेद आहेत. आपण त्यांचा वापर आपल्या फायद्यासाठी सहज करून घेऊ शकतो. थोडक्यात, मी आपणांस हेच सांगू इच्छितो की, आपल्याला विनासायास राज्य मिळू शकेल.'

'कायद्याचं काय?' रामने विचारलं.

त्यांना येत नसलेल्या भाषेत काही बोलल्यासारखे मृगस्य गोंधळल्यासारखे वाटले. 'कायदा?' त्यांनी विचारलं.

'मी असुरास्त्र चालवलंय आणि आता मला त्याबद्दलची शिक्षा भोगायची आहे.'

मृगस्य हासले. म्हणाले, 'सप्त सिंधू प्रदेशाच्या भावी सम्राटाला कोण शिक्षा देणार आहे?'

'सप्तसिंधूचे वर्तमान सम्राट देतील कदाचित!'

'सम्राट दशरथांची इच्छा आहे की तू सिंहासनाधिष्ठित व्हावंस, याबाबतीत माझ्यावर विश्वास ठेव. ते तुला वनवासाला पाठवणार नाहीत.'

रामच्या चेहऱ्यावरील भाव बदलले नाहीत. पण त्याने डोळे मिटून घेतले. आपल्या पतीला संताप येतोय हे सीतेच्या लक्षात आलं.

'युवराज?' मृगस्यांनी प्रश्न टाकला.

रामने आपल्या चेहऱ्यावरून हात फिरवला. त्याची बोटे हनुवटीवर येऊन टेकली. त्याने डोळे उघडून मृगस्यांच्या डोळ्यांत पाहिलं. मग राम पुटपुटला, 'माझे वडील एक आदरणीय व्यक्ती आहेत. ते महान राजा इक्ष्वाकुचे वंशज आहेत. या सन्मानाला योग्य असंच ते वागतील. आणि मी सुद्धा तसाच वागेन.'

'युवराज, मला एक कळत नाही....,'

रामने मृगस्यांचं म्हणणं मध्येच तोडत म्हटलं, 'मला वाटतं, तुमच्या लक्षात येत नाहीय, सरसेनापती मृगस्य. मी महाराज इक्ष्वाकुचा वंशज आहे. मी महाराज रघुंचा वंशज आहे. आमचं कुटुंब वंशाला काळिमा लागेल असं काही करण्याआधी मरण पत्करेल.'

'हे फक्त बोलणं झालं.....'

'नाही, हा एक कायदा आहे. ज्या कायद्याच्या आधारे आपण जीवन जगतो तो कायदा.'

मृगस्य थोडे पुढे झुकले. मग जगरहाटी माहीत नसलेल्या एखाद्या छोट्या मुलाशी बोलावं तसं ते रामशी बोलले, 'ऐक माझं, युवराज राम. तुझ्यापेक्षा मी हे जग खूप अधिक पाहिलंय. अशा गोष्टी पुस्तकात शोभतात. खऱ्या जगात...'

'मला वाटतं, आपलं बोलणं संपलंय, सरसेनापती,' उठून उभा राहात विनम्रपणे नमस्कार करत राम म्हणाला.

'काय?' कैकयीने विचारलं, 'तुला नक्की ठाऊक आहे ना?'

दशरथ किंवा त्यांचा कुणीही खाजगी सेवक उपस्थित नसल्याची खात्री करून घेतल्यानंतर

मंथराने तडक कैकयीच्या महालाकडे धाव घेतली. एरवी कैकयीच्या सेवकांचा तसा काही प्रश्न नव्हता कारण ते सगळे त्यांच्या माहेराहून म्हणजे कैकयहून आलेले होते. त्यामुळे ते सगळे कैकयीशी कमालीचे एकनिष्ठ होते. राणीशेजारी बसताना त्यांनी फारशी सावधगिरी बाळगली नाही. त्यांनी लगेच राणीच्या सर्व सेवकांना तेथून निघून जाण्याची आणि जाता जाता दार बंद करून घेण्याची आज्ञा दिली.

'खात्री नसती तर मी येथे आलेच नसते,' मंथरा म्हणाल्या. पाठीला लागलेली रग झटकण्यासाठी त्यांनी खुर्चीतली आपली बैठक बदलली. मंथराच्या भव्य महालातील उत्तम आणि परिसरानुकूल लाकडी सामानाशी राजमहालातील लाकडी सामानाची तुलना करणं हास्यास्पदच ठरलं असतं. मंथरा पुढे म्हणाल्या 'पैशानं कुणाचंही तोंड उघडता येतं. प्रत्येकाची किंमत ठरलेली असते. सम्राट उद्या दरबारात आपल्या पश्चात रामला राजा घोषित करणार आहेत. ते स्वतः आपल्या सर्व राण्यांसह वानप्रस्थाश्रमासाठी जंगलात जाणार या गोष्टीची घोषणा करणार आहेत. तुम्हाला जंगलातील एखाद्या झोपडीत रहावं लागेल.'

दातओठ खात कैकयी मंथराकडे पाहात राहिल्या.

'असे दातांवर दात घासलेत तर त्यांचे टवके उडतील,' मंथरा कैकयीला म्हणाल्या. 'यापेक्षा अधिक व्यावहारिक काही करायचं असेल तर केवळ आजचा दिवस आपल्या हातात आहे, महाराणी, केवळ आजचा दिवस. ही आत्ताची वेळच फक्त. यासारखी संधी आपणास पुन्हा कधी मिळणार नाही.'

मंथरा ज्या स्वरात बोलत होत्या त्यामुळे कैकयी वैतागल्या होत्या. सूड उगविण्यासाठी कैकयींना पैसे दिल्यापासून मंथरांची वागणूक बदलली होती. पण सध्या या वजन राखून असणाऱ्या व्यापारीची कैकयीला गरज होती. म्हणून मग कैकयीने स्वतःवर ताबा ठेवला. विचारलं, 'मी काय करावं असं आपण सुचवाल?'

'करछपच्या युद्धात दशरथांचे प्राण वाचविल्यानंतर दशरथांनी तुम्हाला वचन दिलं होतं असं आपण एकदा बोलला होतात.'

आपल्या बैठकीत मागे रेलून बसताना पुन्हा एकदा कैकयींना ती विस्मृतीत गेलेली गोष्ट आठवली. राजा दशरथांनी दिलेलं वचन त्यांना आठवलं. त्यावेळी त्यांना वाटलं होतं की जीवनात कधीही हे वचन पूर्ण करून मागण्याची वेळ त्यांच्यावर येणार नाही. रावणाबरोबरच्या त्या भयानक युद्धात त्यांनी दशरथांचे प्राण वाचवले होते. या युद्धात त्यांना आपलं एक बोट गमवावं लागलं होतं आणि त्या गंभीर जखमीसुद्धा झाल्या होत्या. दशरथांना जेव्हा शुद्ध आली तेव्हा कृतज्ञतेच्या भावनेनं त्यांनी जीवनात कधीही दोन इच्छा पूर्ण करण्याचं वचन कैकयींना दिलं होतं. ते दोन वर! मी काहीही मागू शकते!

आणि ती वचनं त्यांना पूर्ण करावीच लागतील. रघुकुल रीति सदा चलि आई। प्राण जाई पर वचन न जाई। म्हणजे- दिलेला शब्द न मोडणं ही रघुकुलाची रीत आहे. मग त्यासाठी प्राण गेले तरी बेहेत्तर.

अयोध्येवर राज्य करणाऱ्या सूर्यवंशीयांचं ब्रीदवाक्य मंथरेनं म्हणून दाखवलं होतं. किंवा निदान असं म्हणू की सम्राट रघूंच्या कारकीर्दीत ते त्यांचं ब्रीद होतं.

'ते नाही म्हणू शकणार नाहीत.....' कैकयी कुजबुजली. तिच्या डोळ्यात विचित्र चमक होती.

मंथरांनी मान हालवली.

'रामला चौदा वर्षे वनवासाला धाडा,' कैकयी म्हणाल्या, 'रुद्रदेवांच्या नियमांनुसार ते रामला शिक्षा करत आहेत असं सार्वजनिकरीत्या सांगायला मी त्यांना सांगेन'

'खूपच छान. म्हणजे, लोकांनाही ते स्वीकारावंच लागेल. राम लोकांमध्ये अतिशय लोकप्रिय आहे. पण कुणालाही रुद्रदेवांचे नियम मोडणं आवडणार नाही.'

'आणि त्यांना भरतला युवराज घोषित करावंच लागेल.'

'उत्तम! दोन वर, उपाय सर्व समस्यांवर!'

---

मोठ्या कालव्यावरच्या पुलावरून जाताना आपल्याला कुणी पाहात नाही किंवा कुणी आपला पाठलाग करत नाहीय याची सीतेने आजूबाजूला पाहून खात्री करून घेतली. एका लांब उत्तरीयानं संध्याकाळच्या गार हवेपासून आणि थंडीपासून बचावाच्या बहाण्यानं तिनं आपल्या शरीराचा वरचा भाग आणि आपला चेहरा झाकून घेतला होता.

कोसल नदीच्या पाणलोट क्षेत्राच्या पूर्वेकडील भागात तिला जायचं होतं आणि तिच्यासमोरचा रस्ता लांबवर सरळ सरळ चालला होता. काही मैलांवर तिने पुन्हा एकदा मागे वळून पाहिले. कुणी नाही याची खात्री पटल्यानंतर घोड्याचा लगाम खेचून तिने घोड्याला पश्चिमेकडे वळवले. रस्ता सोडून ती खाली उतरली. तिने जंगलात प्रवेश केला. काही अंतराच्या घोडदौडीनंतर तिने खुणेचा आवाज काढला. तिचा घोडा आता वेगानं धावू लागला होता. एका तासाचा रस्ता तिला अर्ध्या तासात पार करायचा होता.

---

'पण तुझा पती काय म्हणेल?' त्या नागा व्यक्तीनं विचारलं.

सीता जंगलातील एका मोकळ्या जागी उभी होती. जंगली जनावरांपासून सुरक्षिततेसाठी एका छोट्या म्यानीतील सुरीच्या मुठीवर तिचा हात होता.

नुकत्याच भेटलेल्या माणसाकडून तिला कोणत्याही प्रकारचं संरक्षण नको होतं. तो मलयपुत्र होता. तिला त्याच्यावर मोठ्या भावासारखा विश्वास होता. त्या नागाचं तोंड कडक हाडानं बनलेलं आणि तोंडाच्या जागेपासून चोचीप्रमाणे बाहेर आलेलं होतं. त्याचं डोकं उघडं होतं. पण चेहरा मात्र केसांनी झाकलेला होता. तो गरुडासारख्या चेहऱ्याचा माणूस होता.

'जटायू,' सीता आदराने म्हणाली, 'माझा पती केवळ वेगळाच नाही तर त्याच्यासारखा माणूस हजारों वर्षात एखादाच होतो. दुःखाची गोष्ट म्हणजे, त्याला आपलं महत्व उमगत नाहीय. त्याला वाटतं की स्वतःला वनवासात पाठवून देण्याची मागणी करून तो अगदी योग्य तेच करत आहे. पण असं करून ते स्वतःला गंभीर संकटात टाकत आहे. नर्मदा ओलांडताच आमच्यावर कित्येक हल्ले होण्याची शक्यता आहे.......त्याला मारून टाकण्यासाठी ते एकूण एक उपाय अवलंबतील.'

जटायू म्हणाले, 'तू माझ्या मनगटावर राखी बांधली आहेस, बहिणी, मी जोवर जिवंत आहे तोवर तुझ्या किंवा त्याच्या केसालाही धक्का लागणार नाही.'

सीतेच्या चेहऱ्यावर हसू उमललं.

'पण तू तुझ्या पतीला माझ्याबद्दल सांग. तू मला जे करायला सांगत आहेस त्याबद्दलही सांग.

त्याला मलयपुत्र आवडतात किंवा नाही हे मला ठाऊक नाही. अर्थात, त्याला जर मलयपुत्र आवडत नसतील तर त्याबद्दल त्याला पूर्ण दोष देता येणार नाही. मिथिला नगरीत जे काही घडलं त्याबद्दल त्याला आमच्या बाबतीत थोडी नाराजी असेलही.'

'माझ्या पतीला काय आणि कसं सांगायचं ते माझ्यावर सोड.'

'नक्की ना?'

'आता मी त्याला चांगलं जाणू लागलेय. जंगलात आम्हाला संरक्षणाची गरज पडू शकते हे कदाचित आता त्याला समजणार नाही. कदाचित नंतर ते त्याच्या लक्षात येईल. म्हणून सध्या मला आपल्या सैनिकांची गरज आहे. आमच्या ठिकाणांवर लक्ष ठेवून आमच्यावर हल्ला होऊ नये यासाठी निरंतर आणि काळजीपूर्वक लक्ष देणं त्यांचं काम असेल.'

जटायूला कुठून तरी आवाज आल्याचा भास झाला. त्याने लगेच आपली सुरी हातात घेउन झाडांमुळे पसरलेल्या अंधारापलीकडे नजर टाकली. काही क्षणांच्या निरीक्षणानंतर त्याचं समाधान झालं. आणि पुन्हा त्यानं आपलं लक्ष सीतेवर केंद्रित केलं.

'काही नाही', सीता म्हणाली.

'तुझा पती शिक्षा भोगण्यावर अडून का बसलाय?' जटायूंनी विचारलं, 'त्यांच्या निर्णयावर वाद-विवाद घडवून ते रद्दबातल ठरविता येईल. असुरास्त्र सार्वजनिक संहाराचं अस्त्र नाही. तांत्रिक बाजूंवर भर देत त्याला या शिक्षेपासून स्वतःला वाचविता येईल. अर्थात्, त्याची इच्छा असेल तर.'

'कायदाच तसा आहे म्हणून ते शिक्षा घेण्यावर हटून बसले आहेत.'

'त्यानं असं हटून बसायला....' जटायूने वाक्य अर्धवटच सोडलं. पण त्यांना काय म्हणायचं होतं ते तेवढ्यावरूनच स्पष्ट होत होतं.

'लोक माझ्या पतीला भाबडा आणि कायद्याचा अंध भक्त समजतात. पण एक वेळ अशी येईल की संपूर्ण जग त्यांना एका महान नेत्याच्या रूपात मान्यता देईल. पण तोवर त्यांचं रक्षण करून त्यांना जिवंत ठेवणं हे माझं कर्तव्य आहे.'

जटायू हसले.

पुढील विनंती करताना सीताला फारच संकोचल्यासारखं झालं. कारण ती विनंती स्वार्थीपणानं केली जात असल्यासारखं वाटत होतं. पण तिला खात्री करून घ्यायची होती. 'आणि ते....'

'सोमरसाची व्यवस्था होईल. तुला आणि तुझ्या पतीला त्याची गरज लागेल हे मी मान्य करतो. विशेषतः तुमची मोहीम पूर्ण करण्यासाठी चौदा वर्षांनंतर तुम्ही जेव्हा परताल तेव्हा तुम्ही बलवान असायला हवं.'

'पण सोमरस मिळवून आणण्यासाठी तुम्हाला तसदी पडणार नाही ना? आणि त्याबद्दल..'

'त्याची चिंता माझ्यावर सोड,' जटायू हसत म्हणाले.

ज्याबद्दल खात्री करून घ्यायची होती त्याबद्दल सीतेनं खात्री करून घेतली होती. जटायू सगळी कामगिरी पूर्ण करतील याबद्दल आता तिची खात्री पटली होती.

'नमस्कार. परशुरामाच्या सोबतीनं जा माझ्या भाऊ!'

'रुद्रदेवतांच्या सोबतीनं जा, माझ्या बहिणी.'

आपल्या घोड्यावर स्वार होऊन सीता निघून गेल्यानंतर जटायू थोडा वेळ तेथेच रेंगाळले. ती गेली याची खात्री पटली तेव्हा झुकून त्यांनी ती उभी होती त्या ठिकाणी जमिनीला स्पर्श केला.

तेथील थोडी माती उचलली आणि कपाळाला लावली. मोठ्या नेत्याला वंदन करण्याची ती त्यांची पद्धत होती.

‘धाकटी आई कोपभवनात आहे!’ आश्चर्यचकित राम उद्गारला. तो कैकयीबद्दल बोलत होता.

‘होय!’ वशिष्ठ म्हणाले.

त्याआधी रामला सूचना मिळाली होती की दुसऱ्या दिवशी त्याचे पिता युवराजाच्या राज्याभिषेकाची घोषणा करणार आहेत.

त्यानुसार त्याने आपल्याला पुढे काय करायचे आहे त्याची योजना बनविली होती. आपण सिंहासनाचा त्याग करायचा आणि भरतला सिंहासनावर बसवायचा असा निर्धार त्यानं केला होता. त्यानंतर तो वनवासाला निघून जाणार होता. पण ही योजना रामला पूर्णपणे योग्य वाटत नव्हती. कारण त्यामुळे पित्याच्या इच्छेचा त्याला सार्वजनिक अवमान करावा लागणार होता.

म्हणून, जेव्हा महर्षी वशिष्ठांनी येऊन त्याला त्याच्या आईबद्दल बातमी दिली तेव्हा त्याची पहिली प्रतिक्रिया विरोधाची नव्हती.

कैकयीने स्वतःला कोपभवनात कोंडले होते. कित्येक शतकांपूर्वी राजेरजवाड्यांत बहुविवाह पद्धत जेव्हा रूढ झाली तेव्हा शाही भवनात अशा खोल्या बनविल्या जात असत. पत्नींची संख्या अधिक असल्याकारणाने राजा त्यांच्यापैकी प्रत्येकीला पुरेसा वेळ देऊ शकत नसे. त्यामुळे पतीवर रागावलेली किंवा नाराज असलेली पत्नी कोप भवनात जाऊन रहात असे. राणी कोपभवनात गेली की राजाला कळत असे की तिच्या एखाद्या तक्रारीत राजाने लक्ष घालण्याची गरज आहे. राणीला कोपभवनात रात्र घालवू देणं हे पतीसाठी अशुभ असतं असं मानलं जाई.

आपल्या नाराज पत्नीला भेटण्यावाचून दशरथाकडे दुसरा पर्याय उरला नव्हता.

‘तिचा प्रभाव जरी कमी झाला असला तरी पिताश्रींचं मन पालटण्यासाठी केवळ त्याच त्यांना भरीस घालू शकतात,’ राम म्हणाला.

‘तुझी इच्छा शेवटी पूर्ण होणार असं दिसतंय.’

‘होय. आणि तशी आज्ञा मिळताच मी आणि सीता लगेच निघू.’

महर्षी वशिष्ठांनी नापसंती व्यक्त केली. त्यांनी विचारलं, ‘लक्ष्मण तुझ्याबरोबर जाणार नाही का?’

‘त्याला सुद्धा यायचं आहे. पण मला वाटतं त्याची गरज नाही. त्यानं इथेच रहायला हवं. आपल्या पत्नीसोबत- उर्मिलेसोबत. ती नाजुक आहे. जंगलातील कठोर जीवन आपण तिच्यावर लादायला नको.’

वशिष्ठांनी संमतीदर्शक मान हालवली. मग थोडं पुढे झुकून ते मनापासून म्हणाले, ‘पुढची चौदा वर्षे मी तुझ्यासाठी पृष्ठभूमी तयार करण्यात घालवेन.’

गुरुजींकडे पाहून राम मंद हसला.

आपल्या भाग्याबद्दल लक्षात ठेव. कुणी काहीही म्हणालं तरी पुढील विष्णू होणार आहेस तू. तुला आपल्या देशाचं भविष्य घडवायचं आहे. मी त्याच उद्दीष्टाच्या पूर्ततेच्या तयारीला लागेन. तू जेव्हा परतशील तेव्हा तयारी पूर्ण झालेली असेल इकडे मी लक्ष ठेवेन. पण तू जिवंत राहाशील याची काळजी तुलाच घ्यायची आहे.’

‘मी निश्चितरूपे काळजी घेईन.’

# प्रकरण 28

आधार घेऊन पालकीतून उतरलेले सम्राट दशरथ लंगडत लंगडत कोप भवनात गेले. अचानक त्यांचं वय दहा वर्षांनी वाढल्यासारखं वाटत होतं. गेल्या काही दिवसांत त्यांच्यावर प्रचंड ताण आला होता. आपल्या नेहमीच्या झुलत्या खुर्चीत बसून त्यांनी सेवकाला निघून जाण्याची खूण केली.

मग नजर उचलून त्यांनी आपल्या पत्नीचं निरीक्षण केलं. त्यांच्या येण्याची दखल कैकयींनी घेतलेली नव्हती. एका दीवाणावर त्या केस मोकळे सोडून बसलेल्या होत्या. त्यांनी केस विंचरलेले सुद्धा नव्हते. त्यांच्या अंगावर एकसुद्धा दागिना नव्हता. त्यांचं उत्तरीय जमिनीवर पडलेलं होतं. त्यांनी पांढऱ्या रंगाचं अधोवस्त्र आणि उत्तरीय पेहेरलेलं होतं. आत उसळणारा राग घेऊन त्या वरकरणी शांत बसून होत्या. दशरथ त्यांना चांगलं ओळखून होते. आता पुढे काय होणार हे सुद्धा त्यांना ठाऊक होते. आपण कैकयींच्या कुठल्याच मागणीला नाही म्हणू शकणार नाही याचीही त्यांना कल्पना होती.

'बोला!' दशरथ म्हणाले.

दु:खाने भरलेल्या नजरेनं कैकयीनं त्यांच्याकडे पाहिलं. म्हणाल्या, 'दशरथ, तुमचं माझ्यावर आता प्रेम नसेल, पण माझं अजूनही तुमच्यावर प्रेम आहे.'

'हो, तुमचं माझ्यावर प्रेम आहे हे मला ठाऊक आहे. पण तुमचं स्वतःवर त्याहून जास्त प्रेम आहे.'

कैकयी ताठरल्या. त्यांनी विचारलं, 'आणि आपण काही वेगळे आहात असं आपल्याला वाटतं का? खरं सांगा, तुम्ही मला निःस्वार्थीपणाचे धडे देणार आहात का?'

दशरथ रडवेल्या चेहऱ्यानं हसले.

पतीने त्यागलेल्या स्त्रीसारखी कैकयी रागानं उसळत होती.

दशरथ म्हणाले, 'माझ्या इतर पत्नींपेक्षा आपण अधिक शहाण्या आहात. तुमच्या बरोबर घडणाऱ्या शाब्दिक चकमकींमध्ये मला एखाद्या योध्याशी दोन हात करण्यासारखा आनंद मिळत असे. रक्तबंबाळ करणाऱ्या तुमच्या धारदार, खवचट शब्दांची मला अजून आठवण येते.'

'मी तलवारीनेसुद्धा तुम्हाला रक्तबंबाळ करू शकते.'

दशरथ हसत म्हणाले, 'हो, हो, ठाऊक आहे मला.'

कैकयी दीवाणाच्या आधाराने रेलल्या. त्यांनी आपल्या श्वासावर नियंत्रण मिळवलं, स्वतःवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न केला. पण त्यंच्या मनात लपलेली वेदना व्यक्त होत राहिली. त्या म्हणाल्या, 'मी माझं आयुष्य तुम्हाला वाहिलं. तुमच्यासाठी मी स्वतःचा जीव धोक्यात घातला. तुमच्यावर आपला जीव ओवाळून टाकला. तुमचा जीव वाचवताना माझं शरीर विद्रुप झालं. तुमच्या प्रिय रामासारखा मी कधीही चारचौघांत तुमचा अपमान केला नाही.'

'रामने कधीही....'

दशरथांचं बोलणं मध्येच तोडत कैकयी म्हणाल्या, 'पण आत्ता तो करतोय! तुम्हाला ठाऊक आहे की उद्या तो तुमची आज्ञा पाळणार नाही. तो तुमचा अपमान करणार आहे. आणि भरत

कधीही तुमचा अपमान.....'

आता बोलणं मध्येच तोडण्याची पाळी दशरथांची होती. ते म्हणाले, 'मी भरत किंवा राम यांमधून कुणा एकाला निवडत नाहीय. तुम्हाला ठाऊक आहे, त्या दोघांमध्ये आपसात कोणतीही समस्या नाहीय.'

कैकयी थोडी पुढे येत फिस्कारली, 'मी जे बोलतेय ते राम आणि भरतबद्दल नाहीय. हे राम आणि माझ्याबद्दल आहे. तुम्हाला राम आणि मी यामधून कुणा एकाची निवड करायचीय. त्यानं आजपर्यंत तुमच्यासाठी काय केलंय? त्यानं एकदा तुमचं जीवन वाचवलं, बस. फक्त तेवढंच. मी दररोज तुमचं जीवन वाचवते. गेल्या कित्येक वर्षांपासून! माझ्या या त्यागाची काहीच किंमत नाही का?'

कैकयीच्या अशा भावनिक दबावाला दशरथ बळी पडणार नव्हते.

कैकयी तिरस्काराने हासली, 'अर्थात! तुमच्या जवळ जेव्हा उत्तर नसतं तेव्हा तुम्ही कोषात जाता!'

'माझ्याजवळ उत्तर आहे, पण ते तू स्वीकारणार नाहीस.'

कैकयी क्रूरपणाने हासली. म्हणाली, 'जन्मभर ज्या गोष्टी मला आवडत नाहीत त्या मी स्वीकारत आले. माझ्या वडिलांनी केलेला अपमान मी स्वीकारला. तुमचा स्वार्थीपणा मी स्वीकारला. मुलाची अवहेलना सहन करत मी जगतेय. आणखी काही शब्द मी नक्कीच सहन करू शकेन. बोला, सांगा मला!'

'रामकडून मला अमरत्व मिळणार आहे.'

कैकयी क्षणभर गोंधळली. तिचा गोंधळ तिच्या चेहऱ्यावर व्यक्त झाला. ती नेहमी दशरथांसाठी भरपूर सोमरस आणण्याची व्यवस्था करत असे. देवांच्या या पेयासाठी राजगुरु वशिष्ठांपाशी ती नेहमी भुणभुण करत असे. सोमरस प्यायल्याने जीवन वाढत असे. पण काही कारणाने दशरथांवर सोमरसाचा काहीही परिणाम झाला नव्हता.

दशरथांनी सांगितलं, 'माझ्य शरीराला तो अमर करत नाहीय. गेल्या काही दिवसांपासून आपण मर्त्य असल्याची जाणीव मला तीव्रतेनं होऊ लागली आहे. मी माझं नाव अमर करण्याबद्दल बोलतोय. आपली क्षमता आणि आपलं आयुष्य मी उधळून दिलंय हे मला ठाऊक आहे. लोक आपल्या पूर्वजांशी माझी तुलना करतात. पण राम..... इतिहासात एक महान व्यक्तीच्या रूपात अमर होणार आहे. आणि माझं नावही अमर करणार आहे. मला मुक्त करणार आहे. भविष्य काळात मला रामचे पिता म्हणून ओळखलं जाणार आहे. रामच्या महानतेमुळे माझं जीवन घासून लख्ख होणार आहे. माझं जीवनसुद्धा उजळून निघणार आहे. त्यानं रावणालासुद्धा हरवलंय!'

कैकयी गडगडाटी हसली. मग हसतच म्हणाली, 'अहो अज्ञानी महाराज! तो केवळ एक योगायोग होता. गुरु विश्वामित्र असुरास्त्रासह तेथे होते हा निव्वळ योगायोगच होता.'

'हो, राम भाग्यवान होता म्हणून हा योगायोग जुळून आला. म्हणजे देव त्याच्या बाजूनं आहेत. त्याच्यावर देवांची कृपादृष्टी आहे.'

कैकयी रागानं दशरथांकडे पाहात राहिली. तिला वाटलं, आपल्या संभाषणाला दिशाच नाहीय. ती उघड म्हणाली, 'खड्ड्यात गेलं हे सगळं, हे सगळं सोडून देऊ न् बोलू आपण. तुम्ही मला नकार देऊ शकत नाही हे तुम्ही जाणताच.'

दशरथ मागे रेलले आणि दुःखाने हसत म्हणाले, 'आत्ता कुठे मला संभाषणात रस येऊ लागला होता....'

'मला माझे दोन वर हवेत.'

'दोन्ही हवेत, एकदम?' दशरथांनी आश्चर्य वाटून विचारलं. त्यांच्यापैकी एकाचीच मागणी केली जाईल असं त्यांना वाटलं होतं.

'पहिल्या वरानं मी मागणी करते की रामला सप्त सिंधू प्रदेशातून 14 वर्षांसाठी हद्दपार करावं. रुद्रदेवांचा कायदा त्यानं मोडला म्हणून त्याला शिक्षा देत असल्याचं आपण दरबारात सांगू शकता. याबद्दल लोकांकडून आपली प्रशंसाच होईल. वायुपुत्रांकडूनही आपलं अभिनंदन होईल.'

'होय, मझ्या सन्मानाबद्दल तुला किती चाड आहे ते ठाऊक आहे मला,' दशरथ कडवटपणे म्हणाले.

'तुम्ही नाही म्हणू शकत नाही!'

दशरथांनी उसासा सोडत विचारलं, 'आणि दुसरी मागणी?'

'उद्या दरबारात आपण भरतला युवराज घोषित कराल.'

दशरथांना हा धक्का अनपेक्षित होता. यामुळे होणारे परिणामही उघडच होते. आता ते नकारही देऊ शकत नव्हते. घुश्शात त्यांनी म्हटलं, 'वनवासात असताना राम जर मारला गेला तर त्याबद्दल लोक तुला दूषणं देतील.'

हा टोमणा कैकयीसाठी असहनीय आणि खूपच मोठा होता. ती ओरडली, 'मी शाही रक्त सांडेन असं तुम्हाला वाटतं का? महाराज रघुंच्या वंशाचं रक्त?'

'हो, मला असं वाटतं की तू हे करू शकतेस. पण भरत असं करणार नाही हे मी जाणतो. त्याला मी तुझ्याबद्दल सावध करणार आहे.'

'तुम्हाला जे वाटतं ते तुम्ही करा. मला फक्त मी मागितलेले माझे दोन वर द्या.'

दशरथांनी रागानं कैकयीकडे पाहिलं. मग अचानक त्यांनी आपली नजर दाराकडे वळवली अन् ते म्हणाले, 'रक्षक!'

चार रक्षक दशरथांच्या सेवकांसह आत आले.

'माझी पालखी मागवा,' घाई करत दशरथ म्हणाले.

'होय महाराज,' सेवक म्हणाला आणि ते सगळे घाईघाईने बाहेर निघून गेले.

जेव्हा ते दोघेच उरले तेव्हा दशरथ म्हणाले, 'आता आपण कोप भवनातून बाहेर पडू शकता. तुमचे दोन्ही वर तुमच्या इच्छेप्रमाणे पूर्ण केले जातील. पण मी तुम्हाला एक ताकीद देतो, तुम्ही रामला जर काही केलं तर मी....'

'तुमच्या मौल्यवान रामला मी काहीही कऱणार नाही!' कैकयी किंचाळल्या.

दुसऱ्या प्रहराच्या दुसऱ्या तासाला अजेय साम्राज्याच्या मोठ्या दीवाणखान्यात शाही दरबार भरला. दशरथ सिंहासनारूढ झाले. ते थकलेले आणि दुःखी वाटत होते. पण त्यांचा थोरपणा त्यांच्या व्यक्तीमत्वातून व्यक्त होत होता. त्यांच्या कोणत्याही महाराणी दरबारात उपस्थित नव्हत्या. सम्राटांच्या उजव्या बाजूच्या आसनावर राजगुरू वशिष्ठ विराजमान होते. दरबारात

केवळ कुलीनांचीच नव्हे तर शक्य तेवढ्या सामान्य लोकांचीही उपस्थिती होती. केवळ काही लोकांचा अपवाद सोडल्यास बहुतेक लोकांना दरबारात काय घडणार हे याच अंदाज येत नव्हता. रावणाला हरवल्याबद्दल रामला का शिक्षा मिळावी हे त्यांच्या लक्षात येत नव्हतं. खरं तर, अयोध्येला पुन्हा सन्मान मिळवून देण्याबद्दल आणि स्वतःच्या जन्मावर लागलेला कलंक धुवून काढण्याबद्दल युवराजाचं कौतुक व्हायला हवं होतं.

भालदारानं पुकारा केला, 'शांतता!'

विझलेल्या मनानं दशरथ सिंहासनावर बसलेले होते. त्यांना आपल्या मुलाच्या डोळ्यात स्वतःबद्दल सन्मान पाहायचा होता. त्यांना सहज दिसेल अशा जागी राम उभा होता. सिंहासनाच्या सिंहाच्या आकाराच्या हातांवर नजर पडताच सम्राट हलकेच खोकले. त्यांच्या हातांची सिंहासनाच्या हातांवरची पकड आवळली. आपल्या मनात येणाऱ्या सगळ्या विचारांपासून मुक्त होण्याची गरज त्यांना जाणवली पण ते त्यांना शक्य होत नव्हतं. आपल्या प्रयत्नांची व्यर्थता ध्यानी आली आणि त्यांनी तो प्रयत्न सोडून देत डोळे मिटून घेतले.

वाचवणं अवमानास्पद आहे असं वाटणाऱ्याला आपण कसे वाचवू शकणार?

आदर्शाचं खूळ डोक्यात घेतलेल्या आपल्या गुणी मुलाच्या डोळ्यास दशरथांनी डोळा दिला. ते बोलू लागले, 'रुद्रदेवांचा कायदा तोडला गेला आहे. त्यातून थोडं चांगलंसुद्धा घडलंय. रावणाचं अंगरक्षक दळ उध्वस्त झालं. लंकेत तो आपल्या जखमा चाटत बसला असणार खास!'

गर्दीतून जयघोषाचे ध्वनी उसळले. सगळ्यांच्याच मनात, जवळ जवळ सगळ्यांच्याच मनात रावणाबद्दल तिरस्कारच होता.

'माझ्या प्रिय पुत्राची पत्नी, मिथिलेची राजकुमारी सीतेच्या माहेरची राजधानी मिशिलानगरी उध्वस्त होण्यापासून बचावली.' गर्दीतून पुन्हा जयघोष झाला पण यावेळी गर्दीचा स्वर जल्लोषाचा नव्हता, संयमित होता. फारच कमी लोकांना सीतेबद्दल माहिती होती. त्यापैकी कित्येकांना हा प्रश्न पडला होता की, एका आध्यात्मिक आणि शक्तीविहीन राज्याशी सप्तसिंधू प्रदेशाचे स्वामी आणि अयोध्येचे युवराज असलेल्या रामने विवाहसंबंध का जोडले?

दशरथ पुढे बोलू लागले तेव्हा त्यांच्या आवाजाला कंप सुटला होता, 'पण कायदा मोडला गेलाय. रुद्रदेवांच्या शब्दांचा सन्मान झालाच पाहिजे. वायुपुत्रांनी अजून रामला शिक्षा देण्याची मागणी केलेली नाहीय. पण म्हणून, जे योग्य आहे ते करण्यापासून रघुवंशी मागे हटणार नाहीत.'

दरबारात शांतता पसरली. आपला राजा कशाची घोषणा करणार आहे याबद्दल लोकांच्या मनात उत्सुकता होतीच, पण त्याचबरोबर एक अनामिक भयही त्यांचं मन व्यापून होतं.

रामाला जी शिक्षा द्यायची आहे तिचा त्याने स्वीकार केलेला आहे. तो अयोध्या सोडून जाईल, पण मी त्याला सप्तसिंधूमधून चौदा वर्षांच्या हद्दपारीची शिक्षा देत आहे. पश्चातापाच्या आगीत तावून, सुलाखून, स्वतःचं परिमार्जन करून तो पुन्हा आपल्यात परत येईल. रुद्रदेवांचा तो खरा अनुयायी आहे. मला त्याचा अभिमान वाटतो!'

गर्दीचा आर्त स्वर वातावरणात दुमदुमला. त्यात सामान्यांना वाटलेलं दःख, आश्चर्य सामावलेलं होतं तसंच कुलीनांना बसलेला धक्काही होता.

दशरथांनी हात उंचावला तेव्हा गर्दी पुन्हा शांत झाली. दशरथ बोलू लागले, 'माझा दुसरा पुत्र, भरत, आता कोसलदेश आणि सप्तसिंधू प्रदेश आणि अयोध्येचा युवराज बनेल.'

टाचणी पडली तरी ऐकू येईल अशी शांतता दरबारात पसरली. वातावरण अत्यंत गंभीर बनलं.

राम पुढे आला. त्याने सगळ्यांना हात जोडून नमस्कार केला. मग खणखणीत आणि स्पष्ट आवाजात दरबाराला संबोधीत करताना तो म्हणाला, 'पिताश्री, आज स्वर्गातील देवांनीसुद्धा आपल्या विद्वत्तेची आणि न्यायबुद्धीची वाहवा केली असेल!'

प्रजेतील काही लोक आता उघडपणे रडू लागले होते.

'महान सूर्यवंशी राजा इक्ष्वाकुंचा आत्मा आपल्यात वास करतो, माझे पिताश्री!' राम म्हणाला, 'सीता आणि मी एका दिवसात अयोध्या सोडून निघू.'

दरबाराच्या एका कोपऱ्यात, एका खांबाच्या आडोशाला एक उंच, गोरापान माणूस उभा होता. त्यानं पांढरं धोतर आणि अंगवस्त्र पेहेरलं होतं. धोतर त्याला नीट सावरता येत नव्हतं हे स्पष्टच दिसत होतं. तो कदाचित त्याच्या सरावाचा पोषाख नसावा. त्याचं नाक बाकदार होतं. त्याच्याकडे पाहाणाऱ्याच्या डोळ्यांत ते सगळ्यात आधी भरत होतं. नाकाच्या आजूबाजूला बरेच केस होते. आणि त्याच्या मिशा खालच्या बाजूला वळलेल्या होत्या. विद्वत्तेची झलक असणारा त्याचा चेहरा रामचे शब्द ऐकून खुलला.

गुरु वशिष्टांनी योग्य व्यक्तीचीच निवड केली.

'सम्राटांचं मला आश्चर्यच वाटतं,' गोऱ्या चामडीच्या आणि बाकदार नाकाच्या त्या माणसानं धोतर सावरत गुरु वशिष्ठांना म्हटलं.

राज गुरुंच्या खाजगी दालनात तो त्यांच्या बरोबर बसला होता.

'खरं श्रेय कुणाला जातं ते विसरू नका,' वशिष्ठ म्हणाले.

'ते उघडच आहे. तुमची निवड अचूक आहे.'

'मग तुम्ही आपली भूमिका निभावणार ना?'

गोऱ्या चामडीच्या त्या व्यक्तीनं एक दीर्घ निःश्वास सोडला. म्हणाला, 'गुरुजी, आम्ही फार दखल देऊ शकत नाही हे आपण जाणता. याबाबतीत आम्ही निर्णय घेऊ शकत नाही.'

'पण....'

'पण शक्य ते सर्व आम्ही करू. हे आमचं वचन आहे. आणि आम्ही आपल्या शपथा मोडत नसतो हे आपण जाणता.'

वशिष्ठांनी होकारार्थी मान डोलावत म्हटलं. 'धन्यवाद, मित्रा. मला फक्त एवढंच हवंय. जय रुद्रदेव!'

भरतच्या नावाची घोषणा होत असतानाच भरतने राम आणि सीतेच्या बैठकीच्या कक्षात प्रवेश केला. तोपावेतो राम आणि सीतेनं योग्यांची वस्त्रं धारण केली होती. ते ओबड-धोबड, सुती वस्त्रं आणि वल्कलं ल्यायले होते.

'जंगलातील लोक जशा प्रकारची वस्त्रं वापरतात तशीच वस्त्रे आम्हाला धारण करावी लागतील, भरत,' सीता म्हणाली.

भरतचे डोळे भरून आले. रामकडे पाहात मान नकारार्थी हालवत भरत म्हणाला, 'दादा,

तुमचं अभिनंदन करावं की तुमच्या डोक्यात काही अक्कल घालावी हे मला समजत नाहीय.'

'दोन्हीही करू नकोस,' राम हसत म्हणाला, 'मला मिठी मार आणि निरोप दे.'

भरत आपल्या भावाजवळ गेला आणि त्याने त्याला मिठी मारली. त्याच्या डोळ्याला अश्रुंची धार लागली होती. रामने त्याला घट्ट मिठी मारली.

भरत मागे सरला तेव्हा राम म्हणाला, 'चिंता करू नकोस. संकटांनंतर चांगला काळही येतो. मी जेव्हा परत येईन तेव्हा नक्कीच माझ्यात थोडी जास्त अक्कल आलेली असेल. खात्री देतो मी तुला.'

भरत मंद हसला. म्हणाला, 'आजकाल तुझ्याशी बोलायचीसुद्धा भीती वाटते, तुला सगळंच समजतं.'

रामही हसला, म्हणाला, 'नीट राज्य कर, बंधु.'

काही लोकांना वाटायचं की भरतची स्वातंत्र्यावर भर देणारी व्यवस्था अयोध्येच्या नागरिकांसाठी आणि सप्तसिंधूच्या लोकांसाठी अधिक अनुकूल आहे.

'मला हे नको होतं असं मी खोटं खोटं सांगणार नाही,' भरत म्हणाला, 'पण अशा रीतीनं नको होतं, अशा रीतीनं नको होतं....'

रामने भरतच्या मजबूत, मांसल खांद्यावर हात ठेवले आणि म्हणाला, 'तू चांगलं राज्य करशील, ठाऊक आहे मला. आमच्या पूर्वजांना अभिमान वाटू दे तुझ्याबद्दल.'

'आपल्या पूर्वजांना काय वाटेल याची मला पर्वा नाही.'

'मग मला अभिमान वाटेल असं राज्य कर,' राम म्हणाला.

भरतच्या डोळ्यांतून पुन्हा अश्रुंची धार लागली. त्याचा चेहरा पडला. पुन्हा त्याने रामला मिठी मारली. दोघांनी बराच वेळ एकमेकांना धरून ठेवलं. भरत कुशीत असतानाच राम हळू हळू सहज झाला. आपल्या भावाला याची गरज आहे हे तो जाणून होता.

'पुरे झालं,' डोकं हालवत भरत म्हणाला. रामपासून त्यानं स्वतःला वेगळं केलं. अश्रु पुसले. मग तो सीतेकडे वळला. म्हणाला, 'माझ्या भावाची काळजी घे, वहिनी. जग किती वाईट आहे याची त्याला कल्पना नाही.'

सीता हसली. म्हणाली, 'त्याला ठाऊक आहे. तरी तो सगळं बदलण्याचा प्रयत्न करतो.'

भरतने निःश्वास सोडला. मग तो रामकडे वळला. त्याच्या डोक्यात एक कल्पना आली होती. भरत म्हणाला, 'दादा, मला तुझी पादत्राणं दे.'

रामच्या चेहऱ्यावर नाराजी उमटली. त्याने आपल्या पावलांवर नजर टाकली. त्यावेळी त्याने खडावा घातलेल्या होत्या.

'या नव्हे, तुझ्या आधीच्या राजेशाही जोडे दे,' भरत म्हणाला.

'का?'

'फक्त मला तू त्या दे, दादा!'

राम बिछान्याच्या दुसऱ्या बाजूला गेला. तेथे त्याने नुकतीच त्यागलेली त्याची राजसी वस्त्रप्रावरणं होती. जमिनीवर त्याच्या सोनेरी रंगाच्या सपातासुद्धा होत्या. त्यावर अप्रतीम चंदेरी आणि तपकिरी रंगाचं भरतकाम केलेलं होतं. रामनं त्या उचलून भरतला दिल्या.

'याचं तू काय करणार आहेस?' रामने विचारलं.

'वेळ आली की मी यांना सिंहासनावर ठेवेन,' भरत म्हणाला.

सगळा प्रकार राम आणि सीताच्या लगेच लक्षात आला. या एका कृत्यातून भरत जाहीर करणार होता की राम हाच अयोध्येचा राजा आहे आणि भरत हा फक्त काळजीवाहू आहे. मोठ्या भावाच्या अनुपस्थितीत तो राज्यकारभाराची काळजी वाहात आहे. अयोध्येच्या राजाचा खून करणाच्या कोणत्याही प्रयत्नाला शक्तीशाली सप्तसिंधू साम्राज्याची अपमर्जी झेलावी लागेल. सप्तसिंधूतील इतर सर्व राज्यांसाठीसुद्धा ही व्यवस्था अनिवार्य केली जाणार होती. तहाच्या कलमांमध्ये हे कलम जोडण्यात येणार होतं. तहाच्या इतर अटींमध्ये 'युद्धात किंवा खुल्या स्पर्धेव्यतिरिक्त राजा किंवा युवराजाची हत्या केल्यानं पाप लागतं' या श्रद्धेचाही समावेश केला गेला होता. यामुळे रामला एक शक्तीशाली संरक्षण कवच प्राप्त होणार होतं. पण यामुळे भरतचा अधिकार आणि त्याची शक्ती कमी होणार होती.

रामने पुन्हा एकदा आपल्या भावाला – भरतला मिठी मारली. त्याच्या तोंडून उद्गार निघाला, 'बंधू....'

'लक्ष्मण?' सीता म्हणाली, 'मला वाटतं, मी तुला सांगितलंय.....'

लक्ष्मण नुकताच राम आणि सीतेच्या खोलीत आला होता. तो सुद्धा आपल्या मोठ्या भावासारखा आणि वहिनीसारखा जाडी-भरडी वस्त्रं आणि वल्कलं ल्यायला होता.

लक्ष्मणाने आपल्या नजरेतील निग्रहाने सीतेला आव्हान देत म्हटलं, 'मी सुद्धा येतोय, वहिनी.'

'लक्ष्मण...' रामने सुद्धा त्याला समजावण्याचा प्रयत्न केला.

'माझ्याशिवाय तू जगू शकणार नाहीस, दादा,' लक्ष्मण म्हणाला, 'मी तुम्हाला माझ्याशिवाय जाऊच देणार नाही.'

राम हसला. म्हणाला, 'माझ्या कुटुंबाची माझ्यावरील निष्ठा पाहून मन भरून येतं. जंगलात मी स्वतःला जिवंत ठेवू शकेन याची कुणालाच खात्री वाटत नाही.'

लक्ष्मणसुद्धा हसला. पण क्षणात तो पुन्हा गंभीर झाला. म्हणाला, 'याबद्दल तू हसायला किंवा रडायला मोकळा आहेस, दादा, पण मी मात्र तुमच्यासोबत येणार.'

लक्ष्मणाने आपल्या खाजगी दालनात प्रवेश केला तेव्हा उत्साहात असलेल्या उर्मिलेनं त्याचं स्वागत केलं. तिने अगदी साधा पण आधुनिक पेहेराव केला होता. तिची साडी आणि काचोळी एकाच तपकिरी रंगाची असली तरी त्यांची किनार सोनेरी रंगाची होती. तिने सोन्याचे साधे हलके दागिने घातले होते. अर्थातच हा तिचा नेहमीचा किंवा आवडीचा पोषाख नव्हता.

'ये प्रिया,' उर्मिला म्हणाली, तिच्या वागण्यात लहान मुलांसारखा उत्साह होता. तिचं हसूसुद्धा छोट्या मुलांसारखं होतं. ती म्हणाली, 'तू हे पाहायलाच हवंस. मी एकटीनं सगळ्या बांधाबांधीवर नजर ठेवली. सगळं काम आता जवळ जवळ उरकलंच आहे.'

'बांधाबांध?' आश्चर्यचकित झालेल्या लक्ष्मणानं कौतुकानं विचारलं.

'हो,' उर्मिला म्हणाली, 'मग हाताला धरून ती लक्ष्मणाला कपडे ठेवण्याच्या खोलीत घेऊन गेली. सागवानाच्या दोन मोठ्या, भक्कम पेट्या खोलीत मधोमध ठेवलेल्या होत्या. उर्मिलेनं पुढे होऊन लगेच त्या उघडल्या. म्हणाली, 'या पेटीत माझे कपडे आहेत आणि त्या पेटीत तुमचे.'

लक्ष्मण अवाक् होऊन उभा राहिला. निष्पाप उर्मिलेला काय प्रतिक्रिया द्यावी तेच त्याच्या लक्षात येईना.

उर्मिला मग लक्ष्मणाला ओढत शयनकक्षात घेऊन गेली. तेथे आणखी एक पेटी होती. भरलेली. नेण्यासाठी तयार. त्यात भांडी-कुंडी होती. पेटीच्या एका कोपऱ्यात एक छोटा डबा होता. उर्मिलेनं तो उघडून लक्ष्मणाला दाखवला. त्यात मसाल्यांची पाकिटं होती. ती म्हणाली, 'मला वाटतं, जंगलात आपल्याला भाज्या आणि मांस सहज मिळेल, नाही? पण मसाले आणि भांडी मिळणं शक्य नाही, म्हणून.....'

लक्ष्मण टक लावून तिच्याकडे पाहात राहिला. त्याला तिची गंमत वाटत होती आणि थोडं आश्चर्यही वाटत होतं.

उर्मिला लक्ष्मणाजवळ आली आणि तिने त्याला मिठी मारली. आपल्या पतीकडे कौतुकानं पाहात ती म्हणाली, 'मी तुमच्यासाठी भोजन बनवेन. अर्थातच सीताताई आणि राम भाऊजींसाठीसुद्धा बनवेन. चौदा वर्षांच्या सुट्टीनंतर आपण चांगले लठ्ठ आणि ठणठणीत होऊन परतू.'

लक्ष्मणाने हळुवार आपल्या पतीची मिठी सोडवली. तिचं डोकं त्याच्या छातीवर विसावलं होतं. सुट्टी?

त्याने खाली मान करून आपल्या उत्साहाने भरलेल्या पत्नीकडे पाहिलं. प्रचंड गोंधळवून टाकणाऱ्या परिस्थितीचा ती आपल्या परीनं अर्थ लावण्याचा आटोकाट प्रयत्न करत होती. तिनं आजवरचं आपलं सगळं आयुष्य राजकुमारीच्या रूपात घालवलं होतं. विवाहानंतर अयोध्येत आपण याहून मोठ्या महालात राहू असं तिला वाटलं होतं. ती मनानं चांगली आहे. तिला एक चांगली पत्नी बनायचंय. पण तिचा पती म्हणून माझ्याबोरबर जंगलात येण्याचा तिचा हट्ट मानणं योग्य ठरेल का? राम दादाचं रक्षण करण्यासारखंच तिचं रक्षण करणं हे सुद्धा माझं कर्तव्य नाही का?

जंगलात ती एक दिवस सुद्धा जगू शकणार नाही. अजिबात नाही.

आपण काय करायला हवं हे जेव्हा त्याच्या लक्षात आलं तेव्हा त्याच्या मनावर मणामणाचं ओझं आलं. उर्मिलेचं हृदय दुखावू नये म्हणून त्याला हे काम अतिशय नाजूकपणे करावं लागणार होतं.

एक हात उर्मिलेभोवती टाकून दुसऱ्या हाताने त्याने तिची हनुवटी उचलली. लहान मुलांच्या निष्पाप नजरेनं उर्मिलेने त्याच्याकडे पाहिलं. तो अतिशय कोमलपणे म्हणाला, 'उर्मिला मला चिंता वाटते.'

'अजिबात चिंता करू नकोस. आपण दोघे मिळून या परिस्थितीचा सामना करू. जंगल आपल्यासाठी.....'

'जंगलाबद्दल नव्हे. म्हणजे इथे राजवाड्यात काय होईल याची मला चिंता लागून राहिलीय.'

उर्मिलेनं कण्याला बाक देऊन मान मागे नेली. आपल्या उंच पतीच्या चेहऱ्याकडे तिला नीट पहायचं होतं. तिने विचारलं, 'राजवाड्यात?'

'होय, पिताश्रींची तब्बेत ठीक नाहीय. आता सगळं छोटी आई कैकयी सांभाळेल. आणि खरं सांगायचं तर, भरत दादाचाही त्यांच्यासमोर टिकाव लागायचा नाही. माझ्य आईजवळ तिची काळजी घ्यायला निदान शत्रुघ्न तरी आहे. पण मोठी आई कौसल्यांची काळजी कोण घेणार?

काय होईल त्यांचं?......'

मान हालवत उर्मिला म्हणाली, 'खरंय...'

'आणि छोटी आई जर राम दादाच्या बाबतीत असं वागू शकत असली तर विचार कर ती मोठ्या आईच्या बाबतीत कशी वागेल?'

उर्मिलेचा चेहरा तसाच निष्कपट राहिला.

'मोठ्या आईची काळजी घ्यायला कुणीतरी हवं,' लक्ष्मण पुन्हा एकदा म्हणाला. जणू त्याला आपलं म्हणणं उर्मिलापर्यंत पोहोचवायचं होतं.

'होय. ते खरंय. पण राजमहालात इतके लोक आहेत. राम दादानं त्यांची काही व्यवस्था नाही का केली?' उर्मिलेनं विचारलं.

लक्ष्मण दुःख व्यक्त करत कसनुसं हसला. म्हणाला, 'रामदादा तितका व्यवहारी नाही. आपल्यासारखंच सगळं जग सरळमार्गी आहे असं त्याला वाटतं. तुला काय वाटतं? उगीच चाललोय का मी त्यांच्यासोबत? मला त्यांचं रक्षण करायचंय.'

लक्ष्मणाला नेमकं काय सांगायचंय ते शेवटी एकदाचं उर्मिलेच्या लक्षात आलं. तिचा चेहरा पडला. ती म्हणाली, 'तुझ्याशिवाय मी इथे एकटी रहाणार नाही लक्ष्मणा.'

लक्ष्मणाने आपल्या पत्नीला जवळ घेतलं. म्हणाला, 'फक्त थोड्या काळासाठी, उर्मिला.'

'चौदा वर्षे!.... मी नाही..... नाही....' उर्मिलेच्या डोळ्यांतून अगतिकतेचे अश्रू वाहू लागले. तिने लक्ष्मणाला घट्ट मिठी मारली.

लक्ष्मणाने आपली मिठी थोडी ढिली करत पुन्हा हनुवटीला धरून तिचा चेहरा उंचावला. हळुवारपणे तिचे अश्रु पुसले. तो म्हणाला, 'आता तू रघुवंशी आहेस. आम्ही प्रेमापेक्षा कर्तव्याला अधिक महत्व देतो. सुखाचा बळी द्यावा लागला तरी आम्ही सन्मानाशी फारकत घेत नाही. यात आपल्या आवडी-निवडीचा प्रश्नच नाहीय, उर्मिला.'

'असं करू नका, लक्ष्मण, कृपा करा. माझं तुमच्यावर प्रेम आहे. मला सोडून जाऊ नका.'

'माझंसुद्धा तुझ्यावर प्रेम आहे, उर्मिला. आणि तुला जे करायचं नाहीय ते करायला मी तुला भाग पाडणार नाही. मी तुला फक्त विनंती करतोय. पण उत्तर देण्याआधी तू एकदा कौसल्या आईंचा विचार करावास असं मला वाटतं. गेल्या काही दिवसांत त्यांनी तुझ्यावर जो प्रेमाचा वर्षाव केलाय तो आठव. बऱ्याच काळानंतर कौसल्या आईत आपली आई मिळाली असं तूच मला सांगितलं होतंस ना? मग त्यांनासुद्धा तुझ्याकडून काही मिळायला हवं ना?'

उर्मिला पुन्हा धाय मोकलून रडू लागली. पुन्हा तिने लक्ष्मणाला घट्ट मिठी मारली.

तिसऱ्या प्रहराच्या पाचव्या घटिकेची वेळ होती. राज महालात थंड हवा वाहात होती. लक्ष्मण आणि सीतेच्या खाजगी दालनाकडे सीता चालली होती. तिला पाहाताच पहारेकरी लगेच उठून उभे रहात होते. ते सीतेच्या आगमनाची घोषणा करणार तेवढ्यात आपल्या दालनातून दुःखी लक्ष्मण बाहेर पडला. त्याच्या चेहऱ्याकडे पाहून सीतेच्या घशाशी आवंढा दाटला.

'मी पाहाते काय करायचं ते,' सीता कडक आवाजात म्हणाली. लक्ष्मणाला ओलांडून ती आपल्या बहिणीच्या दालनात जाऊ लागली.

लक्ष्मणाने तिला थांबविलं. तिचा हात धरून त्याने डोळ्यांनी विनवणी करत तिला म्हटलं,

‘आत्ता नको, वहिनी.’

सीतेनं आपल्या प्रचंड दीराकडे पाहिलं. तो त्यावेळी अगदीच केविलवाणा आणि एकटा वाटत होता.

‘लक्ष्मणा, माझी बहीण माझं ऐकते. विश्वास ठेव माझ्यावर.....’

‘नको वहिनी,’ लक्ष्मण मध्येच नकारार्थी मान हालवत म्हणाला. ‘जंगलातलं जीवन सोपं नसणार. दररोज आपल्याला मृत्यूचा सामना करावा लागेल. तुम्हाला ते ठाऊक आहे. तुम्ही कणखर आहात, तग धरून रहाल. पण ती....’ लक्ष्मणाच्या डोळ्यांत अश्रू दाटले. ‘तिलाही आपल्याबरोबर यायचं होतं, वहिनी. पण तिनं यावं असं मला वाटत नाहीय. तिनं येऊ नये याबद्दल मी तिची खात्री पटवून दिलीय.... हे सगळ्यांच्याच हिताचं ठरेल.’

‘लक्ष्मण...’

‘हेच योग्य आहे, वहिनी,’ लक्ष्मणानं पुन्हा तेच म्हटलं जणू तो स्वतःलाच खात्री पटवून देत होता. तो पुन्हा स्वतःशीच पुटपुटला, ‘हेच सगळ्यांच्या हिताचं ठरेल.’

# प्रकरण 29

राम आणि सीताने अयोध्या सोडली त्यानंतरच्या पहिल्या सहामाहीत बऱ्याच घडामोडी घडल्या. सम्राट दशरथांच्या मृत्यूची बातमी कळल्यानंतर रामने आपल्या भाग्याला खूप दोष दिला. वडिलांच्या उत्तरक्रियेला उपस्थित राहून वडील मुलाचं कर्तव्य पूर्ण करण्यात तो उणा पडला होता. आयुष्यात बऱ्याच उशीरा वडिलांची ओळख पटली हे आठवायचं तेव्हा त्याला खूप वाईट वाटायचं. अयोध्येला परतणं शक्य नव्हतं. म्हणून त्यानं पित्याचा आत्मा ज्या प्रवासासाठी निघाला होता त्या प्रवासासाठी त्यानं जंगलातच यज्ञ केला. भरतने दिलेला शब्द पाळला होता. त्यानं रामाची पादत्राणं अयोध्येच्या सिंहासनावर ठेवली होती आणि आपल्या भावाच्या प्रतिनिधीच्या रूपात राज्यकारभार हाती घेतला होता. रामला अनुपस्थित राजाच्या रूपात प्रतिष्ठित केलं गेलं होतं. ही पद्धत नवी होती पण भरताच्या मुक्त आणि विकेंद्रित राज्यकारभारामुळे हा त्याचा निर्णय सप्त सिंधूच्या सर्व राज्यांत स्वीकारला गेला.

राम, लक्ष्मण आणि सीता दक्षिण दिशेने प्रवासाला निघाले. ते नदीच्या किनाऱ्यानं चालत जायचे. गरज लागेल तेव्हाच वस्तीत जायचे. शेवटी ते सप्तसिंधूच्या सीमेपाशी पोहोचले. ती दक्षिण कोसलची राजधानी होती. कोसलवर महाराणी कौसल्याच्या वडिलांचे राज्य होते.

राम गुडघ्यावर बसला. आणि कपाळ टेकून त्याने भूमीला वंदन केले. या जमिनीने त्याच्या आईचे पालन-पोषण केले होते. उठून उभे राहाताना जणू तिचे गुपित समजल्यासारखा तो सीतेकडे पाहून हसला.

'काय झालं?' सीतेनं विचारलं.

'गेले कित्येक आठवडे काही लोक कायम आपला पाठलाग करत आहेत,' राम म्हणाला, 'ते कोण आहेत हे तू मला कधी सांगणार आहेस?'

सीतेने खांदे उडवले आणि कोण आहे ते पाहाण्यासाठी तिने जंगलात दूरवर नजर टाकली. तिला ठाऊक होतं की जटायू आणि त्यांचे सैनिक हलक्या पावलांनी चालतात. ते कायम नजरेआड पण जवळपासच रहायचे. गरज असली की लगेच धावून येता येईल इतक्या अंतरावरून ते राम, सीता, लक्ष्मणावर नजर ठेवून होते. पण त्यांनी सीतेला जेवढी अपेक्षा होती तेवढी गुप्तता पाळली नव्हती. शिवाय तिला आपल्या पतीच्या जागरुकपणाची आणि आसपासच्या वातावरणाबद्दल जाणून घेण्यास नेहमी उत्सुक असणाऱ्या वृत्तीबद्दल माहिती नव्हती. 'सांगेन,' सीता म्हणाली. तिच्या चेहऱ्यावर हसू पसरलं होतं, 'जेव्हा योग्य वेळ येईल तेव्हा सगळं सांगेन. आता फक्त एवढंच सांगते की ते आपल्या रक्षणासाठी आपल्या सोबत आहेत.'

रामने तिच्यावर खोचक नजर टाकली पण मग गोष्ट तिथेच सोडून दिली.

लक्ष्मण म्हणाला, 'मनुदेवांनी नर्मदा ओलांडण्यावर बंदी घातली आहे. नर्मदा ओलांडली तर कायद्यानुसार आपण परतू शकणार नाही, कधीच.'

'एक उपाय आहे,' सीता म्हणाली, 'जर माता कौसल्यांच्या वडिलांच्या राज्याशेजारून दक्षिणेकडे गेलो तर आपल्याला नर्मदा ओलांडावी लागणार नाही. दक्षिण कोसल राज्य नर्मदा

नदीच्या मुखाच्या पूर्वेला आहे. नदी पश्चिमेकडे वाहाते. जर आपण दक्षिणेकडे चालत राहिलो तर नर्मदा न ओलांडता दंडकारण्यात पोहोचू. म्हणजे मनुदेवांच्या कायद्याचं आपल्याकडून उल्लंघन होणार नाही. कसं?'

'ही तांत्रिक माहिती झाली, वहिनी, आणि तुला ती माहीत आहे. आपल्या दोघांसाठी हे चालेल पण रामदादांसाठी नाही चालणार.'

'हं, मग आपण पूर्वेला प्रवास करत जाऊन नावेनं सप्तसिंधू ओलांडायचा का?' रामनं विचारलं.

'आपण या मार्गानं जाऊ शकणार नाही,' सीता म्हणाली, 'समुद्रावर रावणाचं राज्य आहे. भारतीय द्वीपकल्पातील कित्येक बंदरांवर त्याचे किल्ले आहेत. पश्चिम किनाऱ्यावर त्याचं राज्य चालतं हे सगळ्यांनाच ठाऊक आहे. पण खरी गोष्ट ही आहे की पूर्वेच्या किनाऱ्यावरसुद्धा त्याच्या चौक्या आहेत. म्हणून आपल्याला समुद्रमार्गानं जाता येणार नाही. पण किनाऱ्यावरील प्रदेशावर रावणाचं प्रभुत्व नाहीय. नर्मदेच्या दक्षिणेकडे दंडकारण्यात आपण सुरक्षित राहू.'

'पण वहिनी,' लक्ष्मण म्हणाला, 'मनुदेवाचे कायदे स्पष्ट सांगतात की-

'कोणते मनुदेव?'

लक्ष्मणाला धक्का बसला. वहिनीला मनुदेव माहीत नाही? 'वैदिक जीवन पद्धतीचे संस्थापक, वहिनी. सगळ्यांनाच ते माहीत आहेत.....'

सीता मनापासून हसली. म्हणाली, 'केवळ एक नव्हे कित्येक मनु होऊन गेलेत लक्ष्मण. प्रत्येक युगाचा आपला एक मनु आहे. म्हणून तू जेव्हा मनुच्या कायद्याबद्दल बोलतोस तेव्हा कोणते मनु हे सुद्धा तुला सांगायला हवं.'

'मला हे ठाऊक नव्हतं...' लक्ष्मण म्हणाला.

दोघा भावांना चिडवताना सीतेनं प्रेमानं डोकं हालवलं. पुढे ती म्हणाली, 'तुम्ही मुलांनी गुरुकुलात काही शिक्षण घेतलं की नाही? तुमच्याकडे फार कमी माहिती आहे.'

'मला हे ठाऊक होतं,' राम म्हणाला, 'लक्ष्मणाने कधीही वर्गात लक्ष नाही दिलं. मला त्याच्या पंक्तीत नको बसवूस.'

'शत्रुघ्नला सगळं ठाऊक असायचं, दादा,' लक्ष्मण म्हणाला, 'आपण सगळे त्याच्यावरच अवलंबून असायचो.'

'सगळे नाही, फक्त तू,' राम लक्ष्मणाला चिडवत म्हणाला. बोलता बोलता त्याने आपली पाठ ताणून आळस झटकला.

राम सीतेकडे वळला तेव्हा लक्ष्मण हसत होता. मग तो म्हणाला, 'ठीक आहे, मान्य. पण ते आपल्या युगाचे मनु आहेत. आणि त्यांनी नियम घालून दिलाय की आपण नर्मदा ओलांडायची नाही. आणि तरी आपण जर नर्मदा ओलांडून गेलो तर आपल्या परतण्याची शक्यता शून्य. म्हणून....'

'तो कायदा किंवा नियम नव्हता, तो एक करार होता.' सीता म्हणाली.

'करार?' राम आणि लक्ष्मणाने आश्चर्यानं विचारलं.

सीता बोलत राहिली, 'तुम्हाला ठाऊक असेलच की, मनुदेव दक्षिण भारतातील संगमतमिल राज्याचे राजपुत्र होते. त्यांची जमीन जेव्हा समुद्रानं गिळंकृत केली तेव्हा आपल्या राज्यातील बऱ्याच लोकांना आणि द्वारकेच्या लोकांना ते उत्तरेला सप्तसिंधू प्रदेशात घेऊन आले होते.'

‘हो, मला हे ठाऊक आहे,’ राम म्हणाला.

‘पण या दोन प्रदेशातील सगळेच लोक मनुदेवांबरोबर आले नव्हते. त्यांच्यापैकी बरेच लोक मागेच, म्हणजे संगमतमिल आणि द्वारकेत राहिले होते. समाज कसा असावा याबद्दल मनुदेवांची एक निश्चित कल्पना होती. त्यांची कल्पना कित्येकांना मंजूर नव्हती. त्यामुळे त्यांचे शत्रुसुद्धा बरेच होते. त्यांना संगमतमिल आणि द्वारकेतील आपल्या अनुयायांसोबत जाण्याची परवानगी मिळाली ती या अटीवर की त्यांनी पुन्हा परत यायचं नाही. त्याकाळी द्वारकेची उत्तरेकडची सीमा नर्मदेनं बनलेली होती. आणि संगमतमिल अर्थातच दक्षिणेला होतं. परिणामतः त्यांनी एकमेकांना शांततेत जगता यावं यासाठी वेगळे मार्ग स्वीकारले. या करारानुसार नर्मदा नैसर्गिक सीमा बनणार होती. तो कायदा नव्हता, करार होता.’

‘पण आपण जर त्यांचे वंशज असलो तर त्यांनी बनविलेला करार आपण पाळला पाहिजे,’ राम म्हणाला.

‘बरोबर,’ सीता म्हणाली, ‘पण मला सांगा, एखाद्या कराराचं पालन करायचं झालं तर किमान गरज कशाची असते?’

‘एका निर्णयाप्रत येण्यासाठी किमान दोन पक्ष हवेत.’

‘आणि समजा, एक पक्ष जर उरलाच नाही, तर तो करार उरेल का?’

राम आणि लक्ष्मणांना प्रचंड धक्का बसला.

‘मनुदेव निघाले तेव्हाच संगमतमिलचा बराच भाग पाण्याखाली गेला होता. उरलेला भागसुद्धा नंतर समुद्रानं बळकावला. समुद्र वेगाने जमिनीवर अतिक्रमण करत होता. बराच काळ द्वारका या चढत्या पाण्यापासून बचावली पण हळू हळू समुद्राचं पाणी जसजसं आत येऊ लागलं तसतसे द्वारकेच्या भूमीचे मोठमोठे भाग पाण्याखाली जात राहिले. आणि शेवटी भारताला जोडून असलेली द्वारका केवळ एका लांब निमुळत्या बेटाच्या रूपात शिल्लक राहिली.’

‘द्वारावती?’ रामने अविश्वास व्यक्त करत विचारलं.

पश्चिम भारताच्या किनाऱ्यापलीक़डे समुद्रात द्वारावती एक लांब, निमुळतं बेट होतं. उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत या बेटाची लांबी तब्बल पाचशे किलोमीटर्स एवढी होती. बेट साधारण 3000 वर्षांआधी समुद्रानं गिळंकृत केलं होतं. द्वारावतीतील वाचलेले लोक संपूर्ण भारतात विखुरले होते. आणि, स्पष्टच सांगायचं तर, आपण मूळ द्वारकेचे निवासी आहोत हे या लोकांचं म्हणणं कुणीही गंभीरपणे घेतलं नव्हतं. याचं एक कारण, केवळ आपणच मूळ द्वारकावासियांचे वंशज आहोत असा यमुनेच्या किनारी वसलेल्या एका बलशाली राज्याचे निवासी असलेल्या यादव कुळाच्या लोकांचा जोरदार दावा होता. खरी गोष्ट ही आहे की, संपूर्ण भारतातील वेगवेगळ्या जातीजमाती आपापसात एवढ्या मिसळून गेल्या आहेत की जवळ जवळ प्रत्येक जण आपण मूळ संगमतमिलवासियांचे किंवा द्वारकावासियांचे वंशज असल्याचं सांगू शकतात.

सीतेनं मान डोलावली. म्हणाली, ‘द्वारावती बेट हे द्वारकेच्या प्रलयातून वाचलेल्या लोकांचं आश्रयस्थान बनलं होतं. आज आपल्या सर्वांमध्ये ते मिसळलेले आहेत.’

‘अद्भुतच!’

‘म्हणजे, संगमतमिल आणि द्वारकेचे मूळ वंशज आता उरले नाहीत. आपल्या आसपास जे आहेत ते दोन्ही प्रदेशांचे मिळून बनलेले वंशज आहेत. आपण स्वतःशीच केलेल्या कराराचं आपण उल्लंघन कसं करू शकू? कारण या कराराचा दुसरा पक्ष आता अस्तित्वात नाही!’

या तर्काला प्रतिवाद नव्हताच.
‘म्हणजे वहिनी,’ लक्ष्मण म्हणाला, ‘आपण दक्षिण दिशेला कूच करायचं आणि पुढे दंडकारण्यात जाऊन रहायचं का?’
‘होय, कारण आपल्यासाठी सगळ्यात अधिक सुरक्षित जागा तीच आहे.’

राम, लक्ष्मण आणि सीता नर्मदेच्या दक्षिण किनाऱ्यावर उभे होते. एक गुडघा टेकून राम खाली वाकला. आणि त्याने आदराने एक मूठ माती उचलली. ती कपाळाला लावली. त्याच्या कपाळावर मातीच्या तीन आडव्या रेघा उमटल्या. रुद्रदेवांचे भक्त जसे विभूतीने तीन बोटं कपाळावर ओढतात तशा. मग तो पुटपुटला, ‘आमच्या पूर्वजांची भूमी..... त्यांच्या महान कृत्यांची साक्षीदार भूमी... आम्हांवर कृपादृष्टी असू दे.’
सीताने आणि लक्ष्मणानेसुद्धा रामचं अनुसरण केलं. त्यांनी आपल्या कपाळावर पवित्र भूमीच्या मातीचा टिळा लावला.
सीता रामकडे पाहून हासली. म्हणाली, ‘ब्रह्मदेवांनी या भूमीबद्दल जे म्हटलंय ते तुला आठवलं असेल, हो ना?’
रामने होकारार्थी मान हालवली. तो म्हणाला, ‘होय, बऱ्याच वेळा. भारतावर जेव्हा अस्तित्वाचं संकट येतं तेव्हा आमची पीढी भारतीय द्वीपातून, नर्मदेच्या दक्षिणेला असलेल्या भूमीतून जन्म घेते.’
‘ते असं का म्हणाले ते तुला ठाऊक आहे का?’
रामने मान हालवली. म्हणाला, ‘आपल्या धर्मग्रंथांमध्ये सांगितलेलं आहे की दक्षिण ही मृत्यूची दिशा आहे. बरोबर?’
‘हो?’
‘पश्चिमेकडील काही देशांमध्ये मृत्यु अशुभ मानला जातो. त्यांच्या मते मृत्यु ही सगळं संपल्याची खूण आहे. पण खरं तर काहीही खऱ्या अर्थानं संपत नाही. कोणतंही तत्व ब्रह्मांडातून बाहेर जात नाही. त्याचं केवळ रूप बदलतं. याअर्थी मृत्यू ही नव्या निर्मितीची नांदीच असते. जुनं मृत्यू पावतं आणि नवं जन्म घेतं. आणि म्हणून दक्षिण दिशा जर मृत्यूची दिशा असेल तर नवनिर्मितीचीसुद्धा तीच दिशा आहे.’
रामच्या मनात या विचारानं कुतूहल निर्माण झालं. सप्त सिंधू आपली कर्मभूमी आहे. आणि नर्मदेच्या दक्षिणेकडची भूमी आपल्या पितरांची भूमी आहे, आपल्या पूर्वजांची भूमी. तीच आपल्या पुनःनिर्मितीची भूमी आहे.
‘आणि एके दिवशी आपण दक्षिणेकडून परतून भारताच्या नवनिर्मितीचं कार्य हाती घेऊ.’ बोलता बोलता सीतेने मातीचे दोन पेले त्या दोघांना दिले. त्या पेल्यांमध्ये दुधासारख्या पांढऱ्या रंगाचा द्राव होता.
‘हे काय आहे, वहिनी?’ लक्ष्मणानं विचारलं.
लक्ष्मणाने एक घोट घेतला तेव्हा त्याचं तोंड वेडंवाकडं झालं आणि त्याच्या तोंडून उद्गार निघाला, ‘छीः.’
‘पिऊन टाक, लक्ष्मणा,’ सीतेने आदेश दिला.

लक्ष्मणानं एका हातानं नाक दाबलं आणि घटाघट करत पेल्यातील सारा द्राव रिचवला. नदीवर जाऊन त्यानं पेला विसळला आणि चुळाही भरल्या.

रामने सीतेकडे पाहात म्हटलं, 'हे काय आहे ते मला ठाऊक आहे. कुठून मिळवलंस हे?'

'जे लोक आपलं रक्षण करतात त्यांच्याकडून.'

'सीता....'

'राम, तू भारतासाठी महत्वाचा आहेस. तुला आरोग्यवान असायलाच हवं. तुला जिवंत रहायलाच हवं. आपण जेव्हा चौदा वर्षांनंतर परतू तेव्हा तुला बरंच काही करायचं आहे तुला म्हातारं होऊन चालणार नाही. कृपा करून पी ते.'

'सीता,' राम हसला, 'एक कप सोमरसानं काय फरक पडणार आहे? नियमीतपणे हे पेय प्यायला हवं. वर्षानुवर्ष. म्हणजे त्याचा परिणाम होईल आणि सोमरस मिळवणं किती कठिण आहे हे तू जाणतेसच, पुरेसा सोमरस मिळणं शक्यच नाही.'

'ती काळजी माझ्यावर सोपव.'

'तुझ्याशिवाय मी ते पीणार नाही. साथ द्यायला तू नसशील तर दीर्घायू मिळवून करायचं काय?'

सीता हसली, म्हणाली, 'माझ्या वाटेचा सोमरस मी आधीच प्यायलेय, राम. मला प्यावाच लागला. पहिल्यांदा सोमरस प्यायल्यावर बहुधा आजारी पडायला होतं.'

'म्हणूनच गेल्या आठवड्यात तुझी तब्बेत बिघडली होती का?'

'होय. आपण तिघे एकाच वेळी आजारी पडलो तर थोडं कठिण गेलं असतं ना? माझी तब्बेत ठीक नव्हती तेव्हा तू मला सांभाळलंस. आता मी तुझी आणि लक्ष्मणाची काळजी घेईन!'

'पहिल्यांदा सोमरस प्यायल्यानंतर का आजारी पडत असतील?'

सीतानं खांदे उडवले. म्हणाली, 'मला माहीत नाही. हा प्रश्न ब्रह्मदेवांना आणि सप्तर्षींना विचारायला हवा. पण बिघडलेल्या तब्बेतीची काळजी करू नका. माझ्याजवळ बरीच औषधं आहेत.'

सीता आणि राम दोघेही एक गुडघा टेकून लक्षपूर्वक जंगली डुकराचं निरीक्षण करत होते. रामच्या हातात बाण चढवलेलं धनुष्य होतं. बाण सोडायला तो तयार होता.

'सीता,' राम कुजबुजत म्हणाला, 'प्राणी मला व्यवस्थित दिसतोय. मी लगेच बाण मारून त्याची शिकार करू शकतो. खरंच तुला शिकार करायची आहे का?'

'हो,' सीता कुजबुजली, 'धनुष्य आणि बाण तुझी हत्यारं झाली, तलवारी आणि भाले माझी हत्यारं आहेत. मला त्यांचा सराव ठेवायला हवा.'

राम, सीता आणि लक्ष्मण यांच्या वनवासाला आता अठरा महिने पूर्ण होत आले होते. काही महिन्यांपूर्वी सीतेनं शेवटी जटायूची ओळख रामला करून दिली होती. सीतेवर विश्वास ठेवून रामने या मलयपुत्राचा आणि त्याच्या पंधरा सैनिकांचा आपल्या पक्षात समावेश करून घेतला होता. आता त्यांची एकूण संख्या एकोणीस झाली होती. तीन लोकांपेक्षा मोठा समूह झाल्यानं आता त्यांचे बळ वाढले होते. रामला हे कळले होते. ते ज्या स्थितीत होते त्यात मित्रपक्षाचं काय महत्व असतं ते सुद्धा त्याच्या चांगलंच लक्षात आलं होतं. पण तरी राम मलयपुत्रांबद्दल दक्ष

रहात असे.

जटायूमुळे त्याला चिंतेचं उघड कारण मिळालं नव्हतं. पण तरीही तो आणि त्याचे साथीदार गुरू विश्वामित्रांचे शिष्य आहेत हे राम विसरू शकत नव्हता. मलयपुत्रांच्या प्रमुखाबद्दल गुरु वशिष्ठ जे बोलले होते ते त्याच्या मनात पक्कं बसलेलं होतं. शिवाय गुरु विश्वामित्र किती सहजपणाने कायद्याची पर्वा न करता, तो तोडूनसुद्धा असुरास्त्राचा वापर करायला तयार झाले होते. त्यामुळे सुद्धा राम त्यांच्याबद्दल सावध राहू इच्छित होता.

दंडकारण्यात आणखी आत जाता जाता त्या सगळ्यांची दैनंदिन दिनचर्या सुरू झाली होती. शिबीर उभारण्यासाठी त्यांना अजून योग्य जागा मिळाली नसल्याकारणाने ते एका जागी जास्तीत जास्त दोन-तीन आठवडे रहात असत आणि पुन्हा पुढे निघत असत. क्षेत्र आणि संरक्षणाबद्दल आपापसात बोलून सहमतीनं त्यांनी व्यवस्था आखली होती. स्वयंपाक आणि स्वच्छतेची कामे आळीपाळीने वाटून घेतली होती. शिकारीसाठीसुद्धा ते गटागटाने आलटून-पालटून जात. पण शिबिरातील सगळेच मांस खात नसल्यानं वरचेवर शिकार करावी लागत नसे.

'हल्ला केला तर हे प्राणी अतिशय धोकादायक असतात,' रामने सीतेला सावध केलं.

पतीला आपल्याबद्दल वाटत असलेली काळजी जाणवून सीता तलवार उपसता उपसता हसली. त्याला चिडवत म्हणाली, 'म्हणूनच बाण मारल्यानंतर सावजाजवळ जाताना तू मागे रहावंस असं मला वाटतं.'

रामही हासला. नेम धरताना त्यानं आपलं लक्ष जंगली डुकरावर केंद्रित केलं. प्रत्यंचा ताणून त्यानं बाण सोडला. बाण सरळ जंगली डुकराच्या मानेला घासून जमिनीत घुसला. डोके झटकून त्या प्राण्याने बाण आलेल्या दिशेला पाहिले. त्याच्या आरामात व्यत्यय आणणाऱ्यांचा त्याला राग आला असावा. कारण त्याने घशातून आवाज काढला, पण ते जागचे हालले नाही.

'आणखी एक,' उभी रहात सीता म्हणाली. तिने गुडघे थोडे वाकवले होते, दोन्ही पायांत अंतर ठेवलं होतं आणि हातात धरलेली तलवार तिच्या एका बाजूला लटकली होती.

रामने लगेच आणखी एक बाण सोडला. तो त्या जंगली डुकराच्या कानाला लागून जमिनीत रुतला.

पुन्हा एकदा डुक्कर किंचाळले. आणि यावेळी त्याने आपली खुरे जमिनीवर आपटली. शत्रूला भिवविण्यासाठी त्याने डोकं खाली घालून बाण आलेल्या दिशेनं पाहिलं. नाकाखालून त्याचे दोन बांक असलेले, सुऱ्यांसारखे लांब दात दिसत होते, हल्ला करायला एकदम तयार असलेले!

'आता माझ्या मागून ये,' सीता पुटपुटली.

रामने धनुष्य-बाण तिथेच टाकलं आणि काही पावलांचं अंतर राखून तो सीतेमागून चालू लागला. त्याने आपली तलवार म्यानेतून काढून हातात तयार ठेवली. तिला मदत लागली तर आता क्षणाचाही विलंब न लावता तो धावणार होता.

उडी टाकून डुकरासमोर जाताना सीतेनं आरोळी ठोकली. डुकरानं लगेच समोर आलेलं आव्हान स्वीकारलं. ते सरळ मुसंडी मारून सीतेवर चाल करून आलं. त्याचा वेग भयानक होता. धावताना त्याचं डोकं खाली गेलं होतं. आणि त्याचे दोन सुळे भयंकर तलवारींसारखे दिसत होते. सीता जागीच उभी राहिली. तिचा श्वास संथ गतीने चालला होता. जंगली डुक्कर विजेच्या वेगानं तिच्या दिशेनं येत होतं. शेवटच्या क्षणी जेव्हा डुकरानं सीतेवर हल्ला केला आणि

आता ते तिचा खात्मा करणार असं वाटलं तेव्हा सीतेनं पटापट काही पावलं टाकली. तिने हवेत उंच उडी मारली. तिची झेप अप्रतिम होती. आता ती हल्ला करून येणाऱ्या डुकरावर हवेतच आडवी होती, त्याचवेळी तिने आपली तलवार सरळ खाली डुकराच्या मानेवर चालवली. ती हवेत, डुकराच्या वर असल्याकारणाने तिने केलेला वार डुकराच्या मानेत सरळ खोलवर घुसला. त्या वारानं डुकराच्या मानेचा कणा चक्काचूर झाला. तलवारीच्या मुठीचा आधार घेत सफाईदारपणे तिने स्वतःला पुढे झोकून दिले आणि ती डुकराच्या पलीकडे जमिनीवर उतरली. पुन्हा एक उडी घेत ती आपल्या पायांवर नीट उभी राहिली. त्याचवेळी ते जंगली डुक्कर रामसमोर जमिनीवर गतप्राण होऊन कोसळलं.

रामचे डोळे आश्चर्याने विस्फारले. सीता पुन्हा डुकराजवळ गेली. ती धापा टाकत होती, म्हणाली, 'तलवारीनं मान फोडली की क्षणात जनावर मरतं. त्याला अजिबात वेदना होत नाहीत.'

'स्पष्टच आहे,' रामनं आपली तलवार म्यानीत सरकवत म्हटलं.

सीता खाली वाकली. डुकराच्या डोक्याला स्पर्श करून ती पुटपुटली, 'हे निर्दोष प्राण्या, तुला मारल्याबद्दल मला माफ कर. तुझ्या आत्म्याला पुन्हा उद्दीष्ट मिळो आणि तुझं शरीर माझ्या आत्म्याचं पोषण करो.'

जंगली डुकराच्या मानेत अडकलेल्या सीतेच्या तलवारीची मूठ रामानं दोन्ही हातांनी पकडली आणि पातं त्या प्राण्याच्या मानेतून बाहेर खेचायचा प्रयत्न केला. पण तलवार गच्च अडकली होती. त्यानं सीतेकडे पाहिलं अन् म्हणाला, 'फारच आतवर घुसलीय तलवार!'

सीता हसत म्हणाली, 'मी तुझे बाण आणते तोवर तू ती खेचून काढ.'

राम मग जंगली डुकराच्या मानेतून तलवार सही सलामत खेचून काढण्याच्या नाजुक कामाला लागला. कठिण हाडावर घासून तलवारीचं पातं बोथट होऊ नये याची त्याला काळजी घ्यावी लागत होती. तलवार बाहेर काढल्यानंतर तो चवड्यांवर बसला आणि आसपास पडलेल्या पानांनी पुसून तलवार स्वच्छ करू लागला. त्याने तलवारीच्या पात्याची धार पाहिली. ती व्यवस्थित होती. तलवारीचं नुकसान झालेलं नव्हतं. त्याने मान वर केली तेव्हा दुरून सीता त्याच्या दिशेनं येत असलेली त्याला दिसली. तिच्या हातात त्यानं सुरवातीला डुकरावर चालवलेले बाण होते. तलवारीकडे खूण करून अंगठा उचलून त्यानं तिला तलवार ठीक असल्याचं खुणेनं सांगितलं. सीता हसली. ती अजूनही त्याच्यापासून थोड्या अंतरावर होती.

'स्वामिनी!'

मोठ्यानं दिलेली हाक जंगलात घुमली. रामने लगेच मलयपुत्र मक्रांतकडे पाहिलं. सीतेच्या दिशेनं धावताना तो एका दिशेकडे बोट दाखवत होता. रामची नजर त्या दिशेला वळली आणि त्याच्या हृदयाचा ठोकाच चुकला. दाट झाडीतून दोन जंगली डुकरे सीतेवर चाल करून येत होती. तिची तलवार रामजवळ होती. तिच्याजवळ केवळ एक छोटी सुरी होती. राम उसळून उभा राहिला आणि आपल्या पत्नीच्या दिशेनं धावला, 'सीते!'

त्याच्या आवाजातील भीती जाणवून सीता पटकन् मागे फिरली. जंगली डुकरं तिच्या जवळच होती. तिने सुरी म्यानीतून खेचून काढली आणि डुकरांचा सामना करण्यासाठी उभी राहिली. त्यांच्यापासून पळ काढणं आत्महत्या करण्यासारखं होतं कारण त्यांचा वेग भयानक होता. ती त्यांच्याहून वेगानं धावू शकली नसती. म्हणून तिने जागीच उभं राहून त्यांच्या डोळ्याला डोळा

द्यायचं ठरवलं. सीता निश्चल उभी राहिली. तिने खोल श्वास घेतला आणि ती वाट पाहू लागली.

'स्वामिनी!' मक्रंत किंचाळला. क्षणार्धात आणि अगदी ऐन क्षणी तो सीतेच्या समोर उभा होता. तलवार फिरवून त्याने पहिल्या डुकराचा हल्ला परतवून लावला. पहिलं डुक्कर हेलपाटत दूर गेलं. पण मक्रंत स्वतःला सावरत असतानाच दुसऱ्या डुकरानं त्याच्यावर हल्ला चढवला. डुकराचे अणकुचीदार सुळे मक्रंतच्या मांडीत घुसले.

'सीता!' राम ओरडला. सीतेची तलवार त्याने सीतेच्या दिशेनं फेकली.

सीतेनं ती अचूक झेलली. मग ती पहिल्या डुकराकड़े वळली. तो पावेतो ते पुन्हा तिच्यावर चाल करून येऊ लागलं होतं. मक्रंत क्षणभर डुकराच्या सुळ्यावर लटकलेला होता. मग डुकराच्या डोक्याच्या हालचालीमुळे तो हवेत फेकला गेला. त्याचवेळी त्याच्या वजनामुळे डुकराचा तोल गेला आणि ते जमिनीवर कोसळले. त्याचे पाय हवेत फेकले गेले आणि त्याचं पोट उघडं पडलं. नेमक्या त्या क्षणी रामने हिंस्त्रपणे त्याच्या पोटात तलवार खुपसली. तलवार डुकराच्या छातीत आरपार गेली. ते तात्काळ मरून जमिनीवर कोसळलं.

या दरम्यान पहिलं डुक्कर भयानक रीत्या डोकं हालवत सीतेवर चाल करून आलं. सीतेनं उंच उडी मारली. डुकरापर्यंत पोहोचू नयेत म्हणून हवेतच पाय वर दुमडून घेतले. खाली येता येता तिने आपल्या तलवारीने डुकरावर वार केला. घाव मानेवर बसला पण त्याची मान पूर्णपणे कापली गेली नव्हती. पण घाव वर्मी होता. त्यामुळे डुक्कर जखमी होऊन जमिनीवर कोसळलं. पाय जमिनीवर टेकता टेकता तिने खच्चून दुसरा वार केला. या वारामुळे डुकराची मान सफाईनं कापली गेली आणि त्याचे हाल संपले.

तिने मागे वळून पाहिले. राम धावत तिच्या दिशेने येत होता. त्याने आपली उघडी तलवार हातात धरली होती. ती त्याच्या बाजूला लटकली होती.

'मी ठीक आहे!' सीतेने त्याला दिलासा दिला.

त्याने मान हालवली. आणि मक्रंतच्या दिशेने तो धावू लागला. सीता सुद्धा घायाळ मलयपुत्राच्या दिशेने धावली. रामने घाईघाईने त्याचे उत्तरीय त्याच्या जखमेभोवती गुंडाळले. भळाभळा वाहाणाऱ्या रक्ताचा वेग किंचित कमी झाला पण ते वाहातच राहिलं. रामने लगेच उभं राहून मक्रंतला उचललं. सीतेला तो म्हणाला,

'आपल्याला लगेच छावणीवर परतायला हवं.'

जंगली डुकराच्या सुळ्यांनी मक्रंतच्या जांघेवरील मांस छेदून त्याच्या मांडीतली मुख्य शीर कापली होती. सुदैवानं त्यानंतर त्याच्या सुळ्यांची मकरंतच्या ओटीपोटाच्या कठिण हाडाशी टक्कर झाली. त्यामुळे उठलेल्या झिणझिण्यांमुळे डुकराने आपली मान जोरजोरात झटकली आणि मक्रंत हवेत फेकला गेला होता. त्यामुळेच कदाचित त्याचे प्राण वाचले असावेत. कारण डुकराने जर ढुशी देऊन सुळे आणखी खोल घुसवले असते तर ते मक्रंतच्या आतड्यांत घुसले असते त्यामुळे होणाऱ्या जखमेवर जंगलात उपचार करणं अशक्य होतं. म्हणजे त्याचा मृत्यू अटळ ठरला असता. सुदैवानं असं जरी झालं नसलं तरी त्याचं बरंच रक्त वाहून गेलं होतं आणि तो अजूनही जीवाच्या धोक्यातून बाहेर नव्हता.

मक्रंतने निःस्वार्थीपणे सीतेला वाचविण्यासाठी आपल्या प्राणांचीही तमा बाळगली नव्हती.

रामला याची पूर्ण जाणीव होती. म्हणून त्याची तब्बेत ठीक होण्यासाठी राम दिवसरात्र त्याची शुश्रुषा करत होता. सीता त्याला मदत करत होती. रामच्या मते मक्रंतची सेवा करणं हे त्याचं कर्तव्यच होतं. पण ते त्याचं काम नसतानाही, सप्तसिंधूच्या शाही कुटुंबातील एका व्यक्तीने, आपल्या साथीदाराची इतकी मनापासून सेवा करणं हे मलयपुत्रांसाठी आश्चर्यच होतं.

'तो चांगला माणूस आहे,' जटायू म्हणाला.

त्यावेळी तो आणि इतर दोघे मलयपुत्र सैनिक शिबिराबाहेर लागलेल्या मुख्य तंबूत सगळ्यांसाठी संध्याकाळचं जेवण तयार करत होते.

'केवळ सैनिकांनी आणि वैद्यकीय सहाय्यकांनी करायचं कामही तो स्वतःच्या मर्जीनं करतोय हे पाहून मला खरोखर आश्चर्य वाटतंय,' एक मलयपुत्र म्हणाला. तो चुलीतील मंद आगीवर एका भांड्यात रटरटणारा एक पदार्थ मोठ्या पळीने ढवळत होता.

'मला तो नेहमीच प्रभावशाली वाटतो,' आणखी एक सैनिक म्हणाला. तो एका कापलेल्या झाडाच्या खुंटावर वनस्पती चिरत होता. तो पुढे म्हणाला, 'सप्तसिंधूतील राजांच्या इतर मुलांमध्ये असतो तसा याला कोणत्याच बाबतीत कसलाही गर्व नाही.'

'हं,' जटायू म्हणाले, 'त्याने लगोलग निर्णय घेऊन त्यावर अंमल करून मक्रंतचे प्राण कसे वाचवले हे सुद्धा मी ऐकून आहे. त्याने लगेच जर त्या जंगली डुकराला मारलं नसतं तर डुकराने पुन्हा मक्रंतवर मुसंडी मारली असती. कदाचित त्याला मारूनही टाकलं असतं. आणि सीता देवींना जखमी केलं असतं ते वेगळंच.'

'तो एक श्रेष्ठ योद्धा आहे. त्याच्याशी संबंधीत अशा बऱ्याच घटना आपण पाहिल्या आणि ऐकल्या आहेत,' दुसरा सैनिक म्हणाला.

'हो, तो आपल्या पत्नीशीही चांगला वागतो. तो शांत आहे आणि स्वच्छ मनाचा आहे. उत्तम नेता आहे. पराक्रमी योद्धा आहे. पण या सगळ्याहून महत्वाचं म्हणजे, आतापर्यंत आपल्याला समजून चुकलंय की, त्याचं हृदय सोन्यासारखं आहे.' मलयपुत्र सैनिक म्हणाला. त्याच्या मनात रामाबद्दल केवळ प्रशंसाभावच होता. तो म्हणाला, 'मला वाटतं, गुरु वशिष्ठांनी अगदी योग्य व्यक्तीची निवड केलीय.'

त्याच्याबरोबरच्या इतर दोघा मलयपुत्रांनी माना हालविल्या. जटायूंनी त्या सैनिकाकडे डोळे वटारून पाहिले. जणू ते त्याला 'फार बोलू नकोस' अशी ताकीद देत होते. त्या गरीब सैनिकाला आपण फारच वाहावत गेल्याची जाणीव झाली. तो लगेच गप्प झाला. भांड्यातला पदार्थ हालविण्यावर त्यानं आपलं लक्ष केंद्रित केलं.

याबाबतीत आपल्या कोणत्याच व्यक्तीच्या मनात कसलाही संशय येणं परवडणारं नाही हे जटायूंना कळत होतं. त्यांची निष्ठा मलयपुत्रांच्या ध्येयावर पूर्णपणे केंद्रीत असायला हवी. ते म्हणाले, 'राजकुमार राम कितीही विश्वासार्ह वाटला तरी एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा, आपण गुरु विश्वामित्रांचे अनुयायी आहोत. आपल्याला जे करण्याची त्यांनी आज्ञा दिली तेच आपण करायला हवं. तेच आपले नेता आहेत आणि तेच सर्व जाणतात.'

दोघाही मलयपुत्रांनी आपल्या माना डोलावल्या.

'अर्थातच आपण त्याच्यावर विश्वास टाकू शकतो,' जटायू म्हणाले, 'आणि आता त्याचाही आपल्यावर विश्वास बसतोय. हे चांगलंच आहे. तरीही आपली निष्ठा कुठे असायला हवी ते अजिबात विसरू नका.'

‘होय, प्रमुख,’ दोघाही सैनिकांनी एकापाठोपाठ एक म्हटलं.

राम, लक्ष्मण आणि सीता यांना अयोध्या सोडल्याला सहा वर्षे झाली होती.

गोदावरी नदीच्या उगमाजवळच्या प्रदेशात तिच्या पश्चिम किनाऱ्याजवळच्या पंचवटी, म्हणजे पाच वडाच्या झाडांजवळच्या स्थानी 19 लोकांच्या या समूहानं तळ ठोकला होता. या छोट्या रानवट, साध्या पण आरामदायक जागेला एका बाजूने नदीने संरक्षण दिलेलं होतं. या शिबिरातील केंद्रस्थानी मातीने बनलेल्या मुख्य कुटीत दोन खोल्या होत्या. एक राम आणि सीतेसाठी आणि दुसरी लक्ष्मणासाठी. समोर मोकळी जागा होती. व्यायामासाठी किंवा भेटीगाठीसाठी त्या मोकळ्या जागेचा वापर केला जात असे. दूरवर, वस्तीच्या परिघावर जंगली श्वापदांबद्दलची सूचना मिळावी यासाठी प्राथमिक पद्धतीची एक संकट-सूचक व्यवस्था तयार केली गेलेली होती.

या वस्तीच्या परिघावर दोन गोलाकार कुंपणं होती. त्यापैकी बाहेरील बाजूचं कुंपण विषारी वेलींनी बनलेलं होतं. या कुंपणाला एक संकट सूचक प्रणाली जोडलेली होती. पूर्ण कुंपणभर तिची व्याप्ती होती. शेवटी एका लाकडी पिंजऱ्याच्या दाराला ती जोडलेली होती. या पिंजऱ्यात वेगवेगळ्या प्रकारचे पक्षी होते. हर प्रकारे त्यांची बडदास्त ठेवली जात असे. दर महिन्याला नवे पक्षी पकडले जात. त्यांना पिंजऱ्यात ठेवून जुन्या पक्षांना मुक्त केलं जाई. कुणी बाहेरचं कुंपण ओलांडून अनाहूतपणे आतलं कुंपण ओलांडायचा प्रयत्न केला तर कुंपणात लागलेल्या संकटसूचक प्रणालीमुळे पक्षांच्या पिंजऱ्याचं छप्पर उघडलं जाई. पंख फडफडवत, कलकलाट करत उडून जाणाऱ्या पक्षांमुळे शिबिरात रहाणाऱ्यांना काही मिनिटांआधी आगंतुकाची सूचना मिळत असे.

या शिबीराच्या पूर्वेकडच्या भागात काही झोपड्या जटायू आणि त्यांच्या सैनिकांसाठी बनविलेल्या होत्या. रामला जरी मलयपुत्रांवर विश्वास असला तरी लक्ष्मणाच्या मनात असलेला मलयपुत्रांविषयीचा संशय अजून पूर्णपणे निवळलेला नव्हता. कित्येक भारतीयांप्रमाणे, त्याच्या मनात नागांबद्दल भक्कम अंधश्रद्धा होत्या. ‘गरुडासारख्या’ दिसणाऱ्या माणसावर त्याला विश्वास ठेवताच येत नव्हता. लक्ष्मणाने जटायूच्या परोक्ष उल्लेखासाठी त्यांना नाव दिलं होते – ‘गरुड-मानव’

अर्थातच या सहा वर्षांत त्यांना कित्येक संकटांना सामोरं जावं लागलं होतं. पण ही संकटं मानवांमुळे आलेली नव्हती. त्यांच्या शरीरावरील तुरळक खुणा त्यांना जंगलातील त्यांच्या साहसकथांची आठवण करून देत असत. सोमरसामुळे त्यांना ज्या दिवशी त्यांनी अयोध्या सोडली होती त्या दिवसासारखंच तरुण आणि सळसळत्या रक्ताचं ठेवलं होतं. उन्हामुळे त्यांच्या त्वचा सावळ्या पडल्या होत्या. राम आधीपासूनच सावळ्या रंगाचा होता पण गोरा रंग असलेल्या लक्ष्मण आणि सीताची त्वचासुद्धा सावळी झाली होती. राम आणि लक्ष्मणानं दाढी-मिशा वाढवल्या होत्या. त्यामुळे ते युद्धरत साधूंसारखे दिसत होते.

आता त्यांच्या जीवनाला एक निश्चित पद्धत लाभली होती. ही पद्धत अतिशय साधी आणि पटकन् लक्षात येण्याजोगती होती. आंघोळ करण्यासाठी आणि काही निवांत क्षण सोबत घालविण्यासाठी राम आणि सीताला पहाटे पहाटे उठून नदीवर जायला आवडत असे. ती त्यांची

दिवसभरातील आवडती वेळ होती.

आजचा दिवससुद्धा असाच एक दिवस होता. गोदावरीच्या स्वच्छ पाण्यात त्यांनी आपले केस धुतले आणि मग ते नदीकिनारी बसले होते. ताज्या बोरांचा स्वाद चाखत त्यांच्या गप्पा चालल्या होत्या. सकाळच्या हवेत ते आपले केस सुकवत होते. रामने सीताचे केस विंचरून तिची वेणी घालून दिली. त्यानंतर सीता रामच्या मागे बसली आणि तिने त्याच्या अर्धवट सुकलेल्या केसांमध्ये बोटं फिरवली. बटांमधला गुंता सोडवला.

'अरे! अरे!!' रामचं डोकं हलकेच मागं खेचलं गेलं तेव्हा राम ओरडला.

'माफ कर,' सीता म्हणाली.

राम हसला. 'कसला विचार करतोयस?' सीताने विचारलं. तिने गुंता उकलण्यासाठी दुसरी बट हातात घेतली.

'लोक म्हणतात की जंगलं धोकादायक असतात. त्यांच्या मानाने शहरं सुरक्षित आणि आरामदायक असतात. पण मला याच्या अगदी उलट वाटतं. दंडकारण्यात मी जेवढा सुखी आणि आरामात आहे. तेवढा मी माझ्या संपूर्ण जीवनात कधीच नव्हतो.'

सीतेनं पुटपुटून आपली सहमती नोंदवली.

रामनं आपल्या पत्नीकडे पाहाण्यासाठी डोकं मागे वळवलं. म्हणाला, 'तुलासुद्धा सुसंस्कृत लोकांमध्ये त्रास व्हायचा हे मला ठाऊक आहे....'

'होय,' सीता खांदे उडवत म्हणाली, 'हीरे तयार होण्यासाठी प्रचंड दबावाची गरज लागते असं म्हणतात.'

राम मंद हसला. म्हणाला, 'तुला ठाऊक आहे का? मी लहान होते तेव्हा गुरु वशिष्ठ मला म्हणाले होते की, दया आणि करुणेचं उगाचच स्तोम माजवलं जातं. त्यांनी मला कठिण कोषातून बाहेर पडणाऱ्या फुलपाखराबद्दल सांगितलं. त्याच्या आयुष्याची सुरवात कुरूप अळीच्या रूपात होते. योग्य वेळ आली की ती अळी स्वतःभोवती कोष विणते आणि त्या कोषाच्या कठिण भिंतीमध्ये स्वतःला कोंडून घेते. याच कोषात अळीचे रूपांतर फुलपाखरात होते. कुणालाही त्याची खबरबात नसते. पूर्ण तयार झालं की ते आपले धारदार छोटे पंजे आपल्या पुढच्या पंखांच्या खालील बाजूला चालवून ते आपल्या कठिण, सुरक्षित कवचात छोटी फट तयार करतं. या छोट्या फटीतून संघर्ष करत ते बाहेर पडतं. ती एक कठिण, वेदनादायक आणि मोठी प्रक्रिया असते. फुलपाखराचे कष्ट कमी करण्याच्या हेतूने किंवा चुकीच्या दयाबुद्धीने आपल्य मनात या कोषाची फट मोठी करण्याची इच्छा निर्माण होऊ शकते. पण फुलपाखरासाठी तो संघर्ष आवश्यकच नव्हे तर महत्वाचा असतो. कारण त्या छोट्याश्या फटीतून अंग आकसून बाहेर पडताना सुजलेल्या शरीरात फुलपाखरू चिकट द्राव निर्माण करतं. हा द्राव फुलपाखराच्या पंखांत जातो. त्यांना मजबूत बनवितो. कोषातून बाहेर आल्यानंतर हा द्राव जेव्हा सुकतो तेव्हा हे नाजुक फुलपाखरू उडायला तयार होतं. कोषाची फट मोठी करून त्याचं कोषातून बाहेर पडणं जर आपण सोपं केलं तर फुलपाखरू क्षीण बनतं. त्या संघर्षाशिवाय फुलपाखराच्या पंखात बळ येत नाही. ते उडूच शकत नाही.'

सीतेनं हसत होकारार्थी मान डोलावली. म्हणाली, 'मला एक दुसरीच गोष्ट सांगितली होती. छोट्या पक्षांना त्यांचे पालक घरट्याबाहेर ढकलून देतात, त्याची. त्यामुळे पक्षांची पिलं उडायला शिकतात. पण मुद्दा तोच आहे.'

राम हासला. ‘होय, सौभाग्यवती! या संघर्षानं आपल्याला अधिक बळ दिलं.’

सीताने लाकडी कंगवा घेऊन तो रामच्या केसांतून फिरवायला सुरवात केली.

रामने विचारलं, ‘पक्षांबद्दल हे सगळं तुला कुणी सांगितलं? तुझ्या गुरुंनी?’

रामचा चेहरा आणि नजर समोरच्या बाजूला असल्याकारणाने सीतेच्या चेहऱ्यावर क्षणकाल रेंगाळलेला संकोच तो पाहू शकला नाही. सीता म्हणाली, ‘कित्येक लोकांकडून मी शिकलेय राम. पण त्यांच्यापैकी कुणीही तुझ्या गुरु वशिष्ठांएवढे मोठे नव्हते.’

राम हसला, म्हणाला, ‘मी भाग्यवान खराच. त्यांच्यासारखे गुरु मला मिळाले.’

सीता म्हणाली, ‘होय, खरंच तू भाग्यवान आहेस. त्यांनी तुला उत्तम प्रशिक्षण दिलंय. तू चांगला विष्णू बनशील.’

रामला एकदम लाजल्यासारखं झालं. आपल्या लोकांसाठी कोणतीही जबाबदारी घ्यायला तो तयार होता. वशिष्ठांना खात्रीनं वाटायचं राम सगळ्यात श्रेष्ठ पदवी प्राप्त करेल. आणि या विचारानंही रामला अत्यंत विनीत वाटायचं. त्याला स्वतःच्या क्षमतेबद्दल शंका होती. त्याला वाटायचं की खरंच आपण ही जबाबदारी पेलायला तयार आहोत का? त्याने आपल्या मनातील ही शंका आपल्या पत्नीला बोलून दाखवली होती.

जणू आपल्या पतीचं मन वाचत असल्यासारखी सीता हसत म्हणाली होती, ‘तू तयार होशील. विश्वास ठेव माझ्यावर. तुला ठाऊक नाही तू किती दुर्मिळ प्रकारचा जीव आहेस ते.’

रामने सीताकडे वळून तिच्या गालाला हलकेच स्पर्श केला. तिच्या डोळ्यांत खोलवर पाहात तो मंद हासला. मग पुन्हा त्यानं आपलं तोंड नदीच्या दिशेनं वळवलं. तिने त्याच्या डोक्यावर केसांची गाठ बांधली. अशा प्रकारे केस बांधणं त्याला नेहमी आवडायचं. मग दोरवलेल्या मण्यांचं बंधन या गाठीला बांधून ठेवण्यासाठी त्याभोवती गुंडाळलं. मग ती म्हणाली, ‘झालं!’

# प्रकरण 30

एका लांब लाकडी दांड्याला लटकवलेलं हरीण घेऊन राम आणि सीता शिकारीहून परतले होते. त्यांनी तो दांडा आपल्या खांद्यावर पेलला होता. आज स्वयंपाक बनविण्याची पाळी लक्ष्मणाची होती. म्हणून तो त्यांच्यासोबत आला नव्हता. सप्त सिंधू बाहेर हे त्यांचं तेरावं वर्ष होतं.

'आणखी फक्त एक वर्ष राम,' शिबिराच्या परिसरात प्रवेश करताना सीता म्हणाली.

'हो,' राम म्हणाला, दांड्यासह त्यांनी हरीण खाली ठेवलं. राम पुढे म्हणाला, 'आपली लढाई तेव्हा कुठे सुरू होईल.'

पाठीवर आडव्या बांधलेल्या म्यानीतून एक लांब सुरी काढता काढता पुढे येत लक्ष्मण म्हणाला, 'तुम्ही दोघे तत्वज्ञानाची आणि ध्येय-धोरणांची आपली चर्चा करत रहा तोवर मी काही बायकी कामं आटोपून घेतो!'

सीतेनं लक्ष्मणाच्या गालावर थोपटत म्हटलं, 'भारतातील उत्तम आचार्यांमध्ये पुरुषांचीसुद्धा गणना होते, मग स्वयंपाक करण्यात बायकी असं काय आहे? प्रत्येकाला स्वयंपाक करता आला पाहिजे!'

लक्ष्मणानं हसत, नाटकीपणानं कंबरेत झुकून म्हटलं, 'होऽऽ वहिनी!'

त्याचे हावभाव पाहून राम आणि सीतेलासुद्धा हसू आलं.

आजच्या या संध्याकाळी आकाश किती सुरेख दिसतंय, नाही?' सीता ध्यौषापित्याची म्हणजे आकाशरूपी पित्याची कलाकारी पाहून म्हणाली. मुख्य झोपडी बाहेरील जमिनीवर राम आणि सीता पहुडले होते.

तिसऱ्या प्रहरातील ती पाचवी घटिका होती. सूर्यदेवाचा रथ आकाशात वेगवेगळ्या रंगांची उधळण करून गेला होता. पश्चिमेकडून संध्याकाळचे थंड वारे वाहात होते. उन्हाळा नसूनही प्रचंड तापलेल्या दिवसानंतर ती थंड हवा दिवसभराच्या उकाड्यापासून सुटका करणारी वाटत होती. पावसाळा संपला होता. आणि या थंड हवेमुळे येणाऱ्या हिवाळ्याची चाहूल लागत होती.

'होय,' राम हसत म्हणाला. हसत थोडं पुढे जाऊन त्याने सीतेचा हात हातात घेतला. ओठांजवळ आणला आणि तिच्या बोटांचं हळुवार चुंबन घेतलं.

रामच्या दिशेनं वळत सीता म्हणाली, 'पतिराज, काय विचार आहे?'

'अगदी पतीसारखे विचार आहेत, पत्नीश्री......'

तेवढ्यात कुणीतरी जोरात खाकरलं. सीता आणि रामने वर पाहिलं तेव्हा त्यांना समोर उभा असलेला लक्ष्मण दिसला. कृतक् कोपाने ते त्याच्याकडे पाहू लागले.

'काय झालं?' लक्ष्मणने विचारलं. तो म्हणाला, 'तुम्ही झोपडीत जायची वाट अडवलीय. मला माझी तलवार हवीय. अतुल्यसोबत सरावाची माझी वेळ झालीय.'

राम उजवीकडे वळला आणि त्याने लक्ष्मणला जायसाठी वाट करून दिली. लक्ष्मण आत जाता जाता म्हणाला, मी लगेच निघतो....

झोपडीत पाय ठेवल्या ठेवल्या तो जागीच उभा राहिला. संकट-सूचक प्रणालीला जोडलेल्या पक्षांच्या पिंजऱ्यातील पक्षी अचानक मोठ्या आवाजात पंख फडफडवू लागले होते. लक्ष्मण गर्रकन वळला तेव्हा त्याने पाहिलं की राम आणि सीता सुद्धा उठून उभे राहिले आहेत.

'हा कसला आवाज?' लक्ष्मणानं विचारलं.

रामच्या उपजतबुद्धीने त्याला सांगितलं की, आत येणारे प्राणी नव्हते, माणसं होती.

'शस्त्रं,' रामने शांतपणे आज्ञा दिली.

सीता आणि लक्ष्मणानं तलवारींसह आपल्या म्यानी कंबरेभोवती बांधल्या. लक्ष्मणाने आपलं धनुष्य उचलण्याआधी रामला त्याचं धनुष्य दिलं. दोघाही भावांनी आपापली धनुष्ये खांद्यावर अडकवली. तेवढ्यात जटायू आणि त्याचे सैनिक घाईघाईने आत आले. ते शस्त्रास्त्रांनी सज्ज होते. राम आणि लक्ष्मणांनी बाणांनी भरलेले भाते पाठीवर अडकवले. सीतेने एक लांब भाला उचलला. रामने तलवारीसह म्यान कंबरेला बांधली. सुरीची म्यान आधीच त्यांच्या पाठीवर आडवी बांधलेली होती. हे शस्त्र ते चोवीस तास जवळ बाळगत असत.

'कोण असतील ते?' जटायूंनी विचारलं.

'मला माहीत नाही,' राम म्हणाला.

'लक्ष्मणाची भिंत?' सीताने विचारलं.

मुख्य झोपडीच्या पूर्वेला लक्ष्मणाने आपल्या कल्पकबुद्धीने उभारलेली 'लक्ष्मण भिंत' ही एक संरक्षण व्यवस्था होती. एका छोट्या चौकोनी जागेला तीन बाजूंनी घेरून ही पाच फूट उंचीची भिंत उभी होती. याची मधली जागा झोपडीच्या दिशेने अर्धी उघडी होती. या इमारतीकडे पाहून एका नजरेत ते स्वयंपाकघर असल्याचा भास होत असे. पण खरं तर तो घनाकार रिकामा होता. त्यात योध्यांच्या हालचालींना पुरेशी जागा होती. पण योध्यांना गुडघ्यावर बसावं लागत असे. भिंतीच्या पलीकडे असलेल्या शत्रूच्या माणसांना आत असलेल्या व्यक्ती दिसत नसत. याच्या दक्षिणेकडील भिंतीतून एक छोटी भट्टी, स्वयंपाकाचा कट्टा बाहेर निघालेला होता. स्वयंपाकाच्या जागेसारखी ती जागा दिसावी यासाठी त्याच्या अर्ध्या भागावर छप्पर होतं. इथे आत बसलेल्यांना शत्रूच्या बाणांपासून संरक्षण मिळत असे. तेथील दक्षिण, पूर्व आणि उत्तर दिशेला तोंड करून असलेल्या या भिंतींमध्ये काही अंतरांवर भोकं होती. ही भोकं आतल्या बाजूला छोटी आणि बाहेरच्या बाजूला मोठी होती. यामुळे स्वैपाकघरात हवा खेळती ठेवण्यासाठी बनविलेल्या खिडक्यांसारखी ती भोकं दिसायची. पण आत लपलेल्या लोकांना बाहेरून येणाऱ्या शत्रूचं निरीक्षण करण्याची संधी देणं आणि त्याच वेळी आत लपलेले लोक बाहेरच्यांना दिसू न देणं हा त्यांचा खरा उपयोग होता. या भोकांमधून बाणसुद्धा चालविता येत असत.

हे बांधकाम मातीचं होतं. त्यामुळे मोठ्या सैन्याकडून बराच वेळ मारा झाला तर ते टिकाव धरून राहू शकलं नसतं. पण, घातपातासाठी आणि जीवे मारण्यासाठी पाठविल्या गेलेल्या छोट्या टोळ्यांपासून बचावासाठी ही भिंत उत्तम संरक्षण देऊ शकत होती. लक्ष्मणाला वाटत होतं की त्यांच्यावर अशाच प्रकारचे हल्ले होण्याची शक्यता होती. या भिंतीची कल्पना लक्ष्मणाची होती आणि ती साकार करण्यासाठी सगळ्यांनी हातभार लावला होता.

'होय,' राम म्हणाला.

सगळेजण त्या भिंतीकडे धावले. आत जाऊन सगळे गुडघ्यांवर बसले आणि हत्यारं परजून वाट पाहू लागले.

लक्ष्मणने दक्षिणेकडच्या भिंतीला असलेल्या भोकातून बाहेर पाहिलं. डोळे ताणून पाहिलं तेव्हा त्याला दिसलं की दहा जणांची एक टोळी शिबीराच्या आवारात आली होती. एक माणूस आणि एक स्त्री त्यांचं नेतृत्व करत होते. नेतृत्व करणाऱ्या पुरुषाची उंची सामान्य होती. पण त्याचा रंग असामान्य गोरा होता. एखाद्या धावपटूसारखं त्याचं शरीर वेतासारखं सडपातळ होतं. हा माणूस योद्धा नव्हता. दुबळे खांदे आणि बारकेले हात असूनसुद्धा तो माणूस बरगड्यांमध्ये फोड आल्यासारखा खांदे फुलवून भरदार बाहू असल्याचं भासवत होता. बहुतेक भारतीय पुरुषांसारखे त्याचे केस लांब आणि काळेभोर होते. ते त्यानं डोक्यामागे गाठ बांधून ठेवले होते. त्याची दाढी लांब होती आणि व्यवस्थित कापलेली होती. विचित्र म्हणजे, ती तपकिरी रंगात रंगवलेली होती. त्यानं तपकिरी रंगाचं धोतर आणि उत्तरीय ल्यायलं होतं. धोतराच्या रंगाहून त्याच्या उत्तरीयाचा रंग थोडा फिका होता. त्याने घातलेले दागिने उच्च प्रतीचे असले तरी सौम्य पद्धतीने वापरले होते. मोत्याची कर्णभूषणे आणि हातात तांब्याचे बारीकसे कडे. आता तो थोडा अव्यवस्थित दिसत होता. बराच काळ प्रवास करून आल्यासारखा, प्रवासात कपडे न बदलल्यासारखा अस्ताव्यस्त दिसत होता.

त्याच्यासोबत येत असलेली स्त्री काही अंशी त्याच्यासारखीच दिसत असली तरी तिचं व्यक्तीमत्व अत्यंत मोहक होतं. ती बहुधा त्याची बहीण असावी. उंचीला ती जवळ जवळ उर्मिलेएवढी होती. ठेंगणी. तिची त्वचा बर्फासारखी पांढरी होती. म्हणून खरं तर तिने आजारी किंवा मलूल दिसायला हवं होतं. पण ती पटकन् लक्ष जाण्याएवढी आकर्षक आणि मोहक होती. तिच्या सरळ आणि टोकाला किंचित अपऱ्या नाकामुळे आणि उंच गालांमुळे ती परीहांसारखी दिसत होती. पण परीहांचे केस सोनेरी रंगाचे नसतात. हिच्या केसांवर सोनेरी रंगाची छटा होती. एरवी सोनेरी रंगाचे केस क्वचितच आढळतात. तिच्या केसांच्या बटा अतिशय व्यवस्थित, जागच्या जागी होत्या. तिचे डोळे चुंबकासारखे होते. बहुधा ती हिरण्यलोम म्लेच्छ असावी. गोरी त्वचा, घारे डोळे आणि सोनेरी केसांचे जे विदेशी वायव्येला अर्ध्या जगाच्या अंतरावर रहात असत त्यांचं हिंसक वागणं आणि न समजणाऱ्या त्यांच्या भाषेमुळे भारतीय लोक त्यांना जंगली लोक म्हणत असत. पण ही स्त्री जंगली नव्हती. उलट ती अतिशय मोहक, शिडशिडीत, लहानखोरी, नीटनेटकी होती. फक्त तिचे उरोज शरीराच्या मानाने प्रचंड मोठे होते. तिने अतिशय किंमती, रंगवलेलं अंजिरी-जांभळ्या रंगाचं अधोवस्त्र पेहेरलेलं होतं. ते शरयू नदीच्या पात्रासारखं चकाकत होतं. कदाचित पूर्वेकडून येणाऱ्यांचे प्रसिद्ध रेशमी वस्त्र असावं ते. केवळ श्रीमंतांनाच परवडणारं. अधोवस्त्र तिनं कमरेच्या बरंच खाली, अत्यंत आधुनिक पद्धतीनं बांधलेलं होतं. त्यामुळे तिचं सपाट पोट आणि सडपातळ, बाकदार कंबर दिसत होती. तिची चोळीसुद्धा रेशमी कापडाचीच शिवलेली होती. ती अतिशय तोकडी होती आणि त्यामुळे तिच्या उरोजांचा बराच भाग उघडा होता. तिचं उत्तरीय तिनं अंगाभोवती लपेटण्याऐवजी एका खांद्यावरून नुसतंच लटकवलं होतं. या अती श्रीमंतीचं प्रदर्शन करणाऱ्या वेषभूषेत अत्यंत किंमती अलंकारांनी भर टाकलेली होती. केवळ एकच गोष्ट विसंगत होती आणि ती म्हणजे तिच्या कंबरेला अडकवलेली म्यान. कुणीही पहात रहावं अशीच होती ती.

रामनं सीतेकडे पहात विचारलं, ‘कोण आहेत हे?’

सीतेनं खांदे उडवून आपल्याला माहीत नसल्याचं सांगितलं.

‘लंकेचे लोक आहेत हे,’ जटायू म्हणाले.

थोड्या अंतरावर वाकून बसलेल्या जटायूंकडे पाहात रामनं विचारलं, 'खात्री आहे तुमची?'

'होय. तो माणूस रावणाचा छोटा भाऊ विभीषण आहे. आणि ही स्त्री त्याची सावत्र बहीण आहे – शूर्पणखा.'

'ते इथे काय करताहेत?' सीतेनं विचारलं.

भिंतीतल्या एका भोकातून अतुल्यसुद्धा बाहेर पहात होता. तो रामकडे वळत म्हणाला, 'ते युद्ध करण्यासाठी आलेत असं मला नाही वाटत. पाहा....' भिंतीतल्या भोकातून बाहेर पाहाण्याचा संकेत देत तो म्हणाला.

सगळेच बाहेर पाहू लागले. विभीषणाशेजारी असलेल्या सैनिकानं एक पांढरं निशाण उंच धरलं होतं. पांढरा रंग शांतीचा रंग होता. त्यांना मसलत करायची होती हे उघड होतं. पण त्यांना कशाबद्दल तहाच्या वाटाघाटी करायच्या होत्या हे खरं रहस्य होतं.

'रावणाला आमच्याशी का बोलणी करायची आहेत?' संशयी लक्ष्मणानं आपली शंका उपस्थित केली.

'मला माझ्या सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार विभीषण आणि शूर्पणखा कधी रावणाच्या डोळ्याला डोळा देत नाहीत. त्यांचं आपसात फारसं पटत नाही.' जटायू म्हणाले, 'म्हणून, रावणानं यांना पाठवलं असेल असं आपण गृहित धरायला नको.'

अतुल्य मध्येच म्हणाला, 'मी आपल्या मताशी सहमत नाही, जटायू. त्याबद्दल क्षमस्व. पण राजकुमार विभीषण आणि राजकुमारी शूर्पणखा आपल्या हिंमतीवर असं काही करतील असं मला वाटत नाही. राजा रावणानंच त्यांना पाठवलं असावं हे आपण गृहित धरायला हवं.'

'अंदाज बांधणं थांबवून प्रश्न विचारायला सुरवात करण्याची वेळ आहे ही,' लक्ष्मण म्हणाला, 'दादा?'

रामने पुन्हा एकदा भोकातून पलीकडे पाहिलं. मग तो आपल्या लोकांच्या दिशेनं वळत म्हणाला, 'आपण सगळे मग बाहेर जाऊ. त्यामुळे मूर्खासारखं काही वागण्यापासून ते परावृत्त होतील.'

'हेच शहाणपणाचं ठरेल,' जटायू म्हणाले.

'चला,' राम म्हणाला. तो संरक्षक भिंतीआडून बाहेर आला. त्याने आपला उजवा हात उंच ठेवला होता. 'आमच्याकडून काहीही धोका नाही,' हे यातून सूचित होत होतं. इतर सगळ्यांनी रामचं अनुकरण केलं. सगळे रावणाच्या सावत्र भावंडांना भेटायला बाहेर पडले.

राम, लक्ष्मण, सीता आणि त्यांच्या सैनिकांवर नजर पडताच घाबरलेला विभीषण जागीच उभा राहिला. त्याने वळून आपल्या बहिणीकडे पाहिले. जणू पुढे काय करावं याबद्दल त्याचा निर्णय होत नव्हता. पण शूर्पणखेची नजर रामवर खिळली होती. निर्लज्जपणे ती त्याच्याकडे टक लावून पहात राहिली होती. जटायूला पाहिल्यावर क्षणभर विभीषणाच्या चेहऱ्यावर ओळख झळकली.

राम, लक्ष्मण आणि सीता पुढे निघाले. जटायू आणि त्यांचे सैनिक त्यांच्या मागे होते. हे जंगलात रहाणारे जेव्हा लंकावासियांच्या समोर पोहोचले तेव्हा विभीषणानं आपली पाठ ताठ केली, छाती फुलवली. आणि स्वतः अतिशय महत्वाची व्यक्ती असल्यासारखा तो बोलू लागला, 'आम्ही शांतीसाठी आलो आहोत, अयोध्येच्या राजा!'

'आम्हालासुद्धा शांतीच हवीय,' राम म्हणाला. त्याने आपला उजवा हात खाली आणला.

त्याच्यामागोमाग त्याच्या सगळ्या लोकांनी आपापले हात खाली आणले. 'अयोध्येचा राजा' या संबोधनावर रामनं कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. विचारलं, 'आपल्या आगमनाचं कारण काय? लंकेच्या राजकुमारा?'

आपल्याला ओळखलं म्हणून विभीषण फुलारला. म्हणाला, 'म्हणजे आम्हाला वाटतं तेवढे सप्तसिंधूचे लोक अज्ञानी नाहीत म्हणायचे.'

राम सुसंस्कृतपणे हसला. मध्यंतरी शूर्पणखाने एक छोटा जांभळा रुमाल काढून आपलं नाक नाजुकपणे झाकलं.

'खरं तर, सप्तसिंधूच्या लोकांच्या पद्धती मला समजतात आणि त्याबद्दल मला आदर वाटतो,' विभीषण म्हणाला.

सीतेनं बाजासारख्या तीक्ष्ण नजरेनं शूर्पणखाकडे पाहिलं. कारण ती एकटक रामवर नजर खिळवून उभी होती. शूर्पणखेच्या जादुई नजरेचं मूळ तिच्या बुबुळाच्या आश्चर्यकारी रंगात दडलेलं होतं. तिचे डोळे चमकत्या निळ्या रंगाचे होते. नक्कीच तिच्या अंगात हिरण्यलोम म्लेच्छांच्या रक्ताचा अंश होता. खरं तर इजिप्तच्या पूर्वेकडील प्रदेशातील कुणाच्याच बुबुळांचा रंग निळा नसतो. आणि, तिने अत्तरात जणू आंघोळ केली होती. कारण त्या वासात पंचवटीच्या त्या रानवट शिबिराचा, प्राण्यांसारखा वास कुठेतरी हरवला होता. निदान तिच्या आसपास तरी केवळ तिने लावलेल्या अत्तराचाच वास दरवळत होता. अर्थात, तिच्यावर त्याचा काहीही परिणाम झालेला नव्हता हे उघड दिसत होतं. आसपासचा वास तिने नाकावर रुमाल ठेवून दूर राखला होता.

'आपण आमच्या या छोट्या झोपडीत येणार का?' रामनं झोपडीकडे बोट दाखवत विचारलं.

'नको, धन्यवाद, महाराज,' विभीषण म्हणाला, 'आम्ही येथे ठीक आहोत.'

जटायूच्या उपस्थितीने तो गडबडला होता. वाटाघाटी पूर्ण होण्याआधी इतर कोणत्याही धक्क्याचा त्याला सामना करायचा नव्हता. विशेषतः झोपडीच्या बंदिस्त वातावरणात कोणतं आश्चर्य आपली वाट पहात असावं याचा त्याला अंदाज नसल्यानं त्यानं स्पष्ट नकार दिला होता. काही झालं तरी सप्त सिंधू नरेशाच्या शत्रू राजाचा तो भाऊ होता. सध्या आतल्याहून बाहेर, इथे मोकळ्यावर जास्त सुरक्षित आहे असं त्याच्या मनानं त्याला सांगितलं.

'ठीक आहे तर मग,' राम म्हणाला, 'सोन्याच्या लंकेच्या राजकुमाराच्या या भेटीच्या सन्मानामागचा हेतु आम्ही काय बरे समजावा? '

यावेळी शूर्पणखा घोगऱ्या, मोहात पाडणाऱ्या आवाजात बोलली, 'हे सुंदर पुरुषा, आम्ही तुमच्या आश्रयाला आलो आहोत.'

'मला नीट कळलं नाही,' राम म्हणाला. क्षणभर अपरिचित स्त्रीकडून आपल्या सौंदर्याची वाखाणणी ऐकून तो सुद्धा गोंधळून गेला होता. काय प्रतिक्रिया द्यावी हे त्याला कळलं नव्हतं. तो पुढे म्हणाला, 'रावणाच्या नातेवाइकांना आम्ही काही मदत देऊ शकू असं मला वाटत नाही.....'

'आम्ही इतर कुणाकडे जावं, हे महान पुरुषा?' विभीषणानं विचारलं. 'रावणाची भावंडं असल्यामुळे सप्त सिंधूतील कुणीही आमचा स्वीकार करणार नाही. पण आम्हाला हे सुद्धा ठाऊक आहे की सप्त सिंधूमध्ये असे अनेक लोक आहेत जे तुझं सांगणं टाळू शकत नाहीत. रावणाचा क्रूर अत्याचार मी आणि माझ्या या बहिणीनं बराच काळ सहन केलाय. आम्हाला

तेथून पळ काढायचाच होता.'

राम गप्प राहिला. तो विचार करत होता.

'हे अयोध्येच्या राजा,' विभीषण बोलू लागला, 'मी लंकेचा असेन पण खरं सांगायचं तर मी तुमच्या सारखाच, तुमचाच आहे. तुमच्या जगण्याच्या पद्धतीचा मला आदर आहे. आणि मी तुमचं अनुकरण करतो. लंकेच्या इतर लोकांसारखा मी नाही. रावणाच्या प्रचंड संपत्तीची भूल पडते आणि ते त्याचा राक्षसी मार्ग स्वीकारतात. आणि शूर्पणखा माझ्यासारखीच आहे. आमच्या बाबतीत तरी आपलं काही कर्तव्य आहे असं आपणास वाटत नाही का?'

सीता मध्येच म्हणाली, 'एका प्राचीन कवीनं एके ठिकाणी म्हटलंय – कुऱ्हाड जेव्हा जंगलात आली तेव्हा झाडांनी एकमेकांना सांगितलं, चिंता करण्याचं काही कारण नाही, कुऱ्हाडीचा दांडा आपल्यापैकीच एक आहे.'

शूर्पणखा लबाडीने पण मिश्किल स्वरात म्हणाली, 'म्हणजे, महान रघू राजाचा वंशज आपले निर्णय आपल्या पत्नीला घेऊ देतो म्हणायचं का?'

विभीषणानं हलकेच शूर्पणखेच्या हाताला स्पर्श केला. आणि शूर्पणखा बोलायची थांबली. विभीषण म्हणाला, 'राणी सीता, आपल्या लक्षात आलं असेल की इथे केवळ दांडेच आलेयत. कुऱ्हाडीचं पातं लंकेतच आहे. आम्ही खरोखर आपल्यासारखेच आहोत. कृपा करून आम्हाला मदत द्या.'

शूर्पणखा जटायूंकडे वळली. तोपावेतो तिच्या लक्षात आलं होतं की राम आणि लक्ष्मणाचा अपवाद वगळता तेथे उपस्थित सारेच पुरुष तिच्याकडे टकामका पाहात होते. ती म्हणाली, 'हे महान मलयपुत्रा, आम्हाला शरण देणं हे तुमच्या फायद्याचं आहे असं आपणास वाटत नाही का? तुम्हाला लंकेबद्दल जेवढी माहिती आहे तीत आम्ही भर घालू. यात आपणास आणखी जास्त सोनं मिळेल.'

जटायू ताठरला. म्हणाला, 'आम्ही प्रभु परशुरामांचे अनुयायी आहोत. आम्हाला सोन्यात अजिबात रस नाही.'

'बरोबर....' शूर्पणखा तिरस्कारानं म्हणाली.

विभीषणानं लक्ष्मणाला विनंती केली, 'हे लक्ष्मणा, कृपया आपल्या भावाला समजावा. अयोध्येला परतल्यानंतर तुम्हालाही पटेल की रावणाशी एकदा का तुमचं युद्ध सुरू झालं की आम्ही तुम्हाला बरीच मदत करू शकतो.'

'मी तुमच्याशी सहमत झालोसुद्धा असतो, लंकेच्या राजकुमारा,' लक्ष्मण हसत म्हणाला, 'पण आपण दोघेही चूक ठरण्याची शक्यता आहेच ना?'

विभीषणानं खाली मान घालून लांब सुस्कारा सोडला.

'राजकुमार विभीषण,' राम म्हणाला, 'मला खरंच वाईट वाटतं, पण.....'

विभीषणानं रामला मध्येच थांबवलं, 'दशरथपुत्रा, मिथिलेची लढाई लक्षात ठेवा. माझा भाऊ रावण आपला शत्रू आहे. तो माझासुद्धा शत्रू आहे. म्हणून तुम्ही माझे मित्र व्हायला हवं, हो ना?'

राम गप्प राहिला.

विभीषणच पुढे म्हणाला, 'हे महान राजा, लंकेहून सुटका करून घेऊन आम्ही आमचा जीव धोक्यात घातलाय. काही काळासाठी तरी निदान आपण आम्हाला आपले पाहुणे म्हणून ठेवून घेणार नाही का? काही दिवसांतच आम्ही येथून निघून जाऊ. तैत्तरीय उपनिषदात जे म्हटलंय ते

लक्षात असू द्या. त्यात म्हटलंय – 'अतिथी देवो भव'. कित्येक स्मृतींमध्येसुद्धा म्हटलंय की जे बलशाली आहेत त्यांनी दुर्बलांचं रक्षण करायला हवं. आम्हाला फक्त काही दिवस आश्रय देण्याचीच मागणी आम्ही करत आहोत. कृपा करून नकार देऊ नका.

सीतेने रामकडे पाहिलं. विभीषणानं कायद्याचा आधार घेत आवाहन केलं होतं. पुढे काय होणार हे तिला समजलं. राम आता त्यांना परत पाठवणार नाही.

'फक्त काही दिवस,' विभीषण आजीजीनं म्हणाला, 'कृपा करा.'

रामने विभीषणाच्या खांद्याला स्पर्श केला. म्हणाला, 'तुम्ही इथे काही दिवस राहू शकता. थोडी विश्रांती घ्या आणि पुन्हा आपल्या प्रवासाला निघा.'

विभीषणाने दोन्ही हात जोडून रामला नमस्कार केला. तो म्हणाला, 'महान रघुवंशाची भरभराट होवो.'

---

'मला वाटतं ती लाडावलेली राजकन्या तुझ्यावर भाळलीय,' सीता रामला म्हणाली.

चौथ्या प्रहराच्या दुसऱ्या घटिकेची वेळ होती. राम-सीता आपल्या खोलीत बसलेले होते. संध्याकाळचं जेवण त्यांनी नुकतंच आटोपलं होतं. सीतेनं बनविलेल्या स्वयंपाकाबद्दल शूर्पणखाने कडवट तक्रारी केल्या होत्या. स्वैपाक आवडला नसला तर तो न खाण्याचा सल्ला सीतेनं तिला दिला होता. जेवण झाल्यानंतर ते दोघे आपल्या खोलीत आले होते.

रामनं डोकं हालवलं. सीता म्हणते ते फारच बालिश आहे असं त्याला वाटत होतं. त्याच्या डोकं हालवण्यातून ते व्यक्त होत होतं. तो सीतेला म्हणाला, 'सीता हे कसं शक्य आहे? मी विवाहित आहे हे तिला ठाऊक आहे. मी तिला का आवडेन?'

सीता आपल्या पतीशेजारी गवताच्या गादीवर पहुडली होती. ती म्हणाली, 'तुला वाटतं त्याहून तू कितीतरी पटींनी अधिक सुंदर आहेस हे तुला ठाऊक असायला हवं.'

रामनं कपाळावर आठ्या आणल्या आणि तो हसला. म्हणाला, 'काहीतरीच.'

सीता सुद्धा हसली. आणि तिने रामभोवती आपल्या बाहुंचा विळखा घातला.

---

पंचवटीच्या जंगलात रहाणाऱ्या या समूहासोबत पाहुणे रहायला लागून आता एक आठवडा उलटला होता. त्यांनी कुणालाही त्रास दिला नव्हता. ते त्रासदायक नव्हतेच. पण लंकेची राजकुमारी मात्र याला अपवाद होती. तरीही लक्ष्मण आणि जटायूंना त्यांच्याबद्दल असलेला संशय अजूनही फिटला नव्हता. पहिल्याच दिवशी त्यांनी लंकावासियांना निःशस्त्र केलं होतं. त्यांची हत्यारं त्यांनी आपल्या शस्त्रागारात कड्या-कुलुपात ठेवली होती. धोरणीपणानं, आपल्या संशयाच्या निरसनापर्यंत त्यांनी लंकेच्या लोकांवर 24 तास नजर ठेवण्याची व्यवस्था केली होती. क्षणभरही त्यांनी पाहुण्यांना नजरेआड होऊ दिलं नव्हतं.

आदल्या रात्री जागरण झाल्यामुळे हातात तलवार घेऊन आणि वाजविण्यासाठी शंख तयार ठेवून लक्ष्मणानं सगळी सकाळ झोपून काढली होती. दुपारी तो उठला तेव्हा शिबिरात वेगळ्याच घडामोडी घडत होत्या.

आपल्या झोपडीतून तो बाहेर आला तेव्हा त्याने पाहिलं की, जटायू आणि मलयपुत्र

शस्त्रागारातून लंकावासियांची शस्त्रास्त्रं घेऊन बाहेर पडत होते. विभीषण आणि त्याचे साथीदार आता परत निघाले होते. आपापली शस्त्रास्त्रं घेऊन ते शूर्पणखेच्या येण्याची वाट पहात होते. ती गोदावरीमध्ये आंघोळीसाठी गेली होती. आंघोळीनंतर ती परतण्यासाठी तयार होऊन येणार होती. तिने सीतेला कपडे नेसण्यात आणि केशरचना करण्यासाठी मदतीची विनंती केली होती. ही त्रासदायक तारका आता जाणार म्हणून सीता खूपच आनंदली होती. या साध्या जंगलातील शिबिरातही शूर्पणखेच्या मागण्यांना अंतच नव्हता. म्हणून तिची ही शेवटची विनंती सीतेनं लगेच मान्य केली.

'आपल्या मदतीसाठी खूप खूप धन्यवाद, राजकुमार राम,' विभीषण म्हणाला.

'आम्हालाही आनंदच वाटला.'

'आम्ही कुठे निघालोय याची माहिती कुणालाही न देण्याची मी आपणास आणि आपल्या अनुयायांना विनंती करतो.'

'अर्थातच कुणी कुठे काही बोलणार नाहीत.'

'धन्यवाद,' विभीषण म्हणाला. मग त्याने हात जोडून नमस्कार केला.

रामने घनदाट अरण्याच्या टोकाशी नजर टाकली. त्यापलीकडे गोदावरी वाहात होती. आपली पत्नी सीता आणि विभीषणची बहीण शूर्पणखा कोणत्याही क्षणी तेथून परत येणार होत्या.

त्याऐवजी जंगलातून एका स्त्रीची किंकाळी ऐकू आली. राम आणि लक्ष्मणानं त्वरित एकमेकांकडे पाहिलं. आणि ते धावतच आवाजाच्या दिशेनं निघाले. उंच, राजसी पण भिजून चिंब आणि रागानं फणफणलेल्या सीतेला जंगलातून बाहेर येताना पाहून ते जागच्या जागी उभे राहिले. ती विरोध करणाऱ्या शूर्पणखाला दंडाला धरून खेचून आणत होती. लंकेच्या राजकुमारीचे दोन्ही हात सुरक्षितरीत्या बांधलेले होते.

लक्ष्मणाने लगेच आपली तलवार उपसली. तेथे उभ्या असलेल्या सगळ्यांनीच आपापल्या तलवारी उपसल्या. अयोध्येच्या छोट्या राजकुमाराला सगळ्यात आधी आवाज फुटला. विभीषणाकडे आरोपीसारखा पहात त्याने विचारलं, 'इथे नेमकं काय चाललंय?'

दोन्ही स्त्रियांवरून विभीषणाची नजर हटत नव्हती. एक क्षण त्याला फारच मोठा धक्का बसल्यासारखं वाटलं. पण त्यानं लगेच स्वतःला सावरलं. आणि उत्तरला, 'तुझी वहिनी माझ्या बहिणीला काय करतेय? तिनेच शूर्पणखेवर हल्ला केलाय हे स्पष्टच दिसतंय.'

'थांबवा हे नाटक!' लक्ष्मण ओरडला. 'वहिनी कारणाशिवाय हल्ला करणार नाही. तुझ्या बहिणीनेच आधी हल्ला केला असेल.'

लोकांच्या गराड्यात पोहोचल्यानंतर सीतेने शूर्पणखेला सोडून दिले. लंकेची राजकुमारी रागाने लालेलाल झाली होती. तिचा स्वतःवरचा ताबा सुटलेला दिसत होता. विभीषण धावतच आपल्या बहिणीजवळ गेला. सुरीने त्यानं तिला बांधलेली बंधनं कापून टाकली. तो तिच्या कानात काहीतरी कुजबुजला. विभीषण काय बोलला ते लक्ष्मण खात्रीपूर्वक सांगू शकत नव्हता, पण त्यानं तिला बहुधा 'शांत रहा' असं म्हटलं होतं.

सीता रामकडे वळली आणि तिने शूर्पणखेकडे बोट दाखवत दुसऱ्या हातातील वनस्पती दाखवली आणि सांगितलं, 'लंकेच्या त्या क्षुद्र स्त्रीने माझ्य तोंडात हे कोंबून मला नदीत ढकलून दिलं.'

राम ती वनस्पती ओळखत होता. शल्यक्रियेआधी लोकांना बेशुद्ध करण्यासाठी तिचा वापर

केला जात असे. त्याने विभीषणाकडे पाहिले. त्याच्या डोळ्यांत अंगार फुलला होता. आणि त्याची नजर खोचक झाली होती. त्याने विभीषणाला विचारलं, 'काय चाललंय काय?'

विभीषणानं शूर्पणखेकडे पाहिलं तोवर ती सुद्धा उठून उभी राहिली होती. तो तिला शांत रहायला सांगत होता असं वाटलं पण त्याचं म्हणणं तिच्यापर्यंत पोहोचलंच नव्हतं हे उघड दिसत होतं.

'खोटं बोलतेय ती!' शूर्पणखा कर्कश्श आवाजात किंचाळली.

'मी असं काही केलंच नाही!'

'तू मला खोटं ठरवतेयस?' सीता गुरकावत म्हणाली.

त्यानंतर जे घडलं ते इतकं अनपेक्षित आणि अचानक घडलं की कुणालाही काही करायची संधीच मिळाली नाही. भयानक वेगानं शूर्पणखेनं आपली सुरी उपसली. सीतेच्या डावीकडे उभ्या असलेल्या लक्ष्मणाने हे पाहिलं आणि तो लगेच, 'वहिनीऽऽ' असं ओरडत पुढे धावला.

वार चुकविण्यासाठी सीता एकदम विरुद्ध दिशेला झुकली. त्या चुकार क्षणी लक्ष्मणाने पुढे झेप घेतली. पण सीता मागे झुकली होती त्यामुळे तो सरळ जाऊन हल्ला करणाऱ्या शूर्पणखेवर आदळला. लक्ष्मणाने तिचे दोन्ही हात पकडले आणि तिला संपूर्ण ताकदीनिशी मागे ढकलले. लंकेची शेलाटी राजकन्या शूर्पणखा अचानक धडकलेल्या लक्ष्मणामुळे मागे फेकली गेली आणि लंकेच्या सैनिकांमध्ये जाऊन पडली. सैनिकांसाठी हा मोठाच धक्का होता. ते थक्क होऊन नुसते पहातच राहिले. लक्ष्मणाच्या हातातील सुरी या गादरोळात तिच्या चेहऱ्यावर आडवी लागली. शूर्पणखाचं नाक खोलवर कापलं गेलं. आधी ते तिच्या हातात आलं, मग ती जेव्हा जमिनीवर कोसळली तेव्हा ते सुद्धा जमिनीवर पडलं. वार एवढा जबरदस्त होता की नाक कापलं गेलं तरी तिला वेदना जाणवली नव्हती. रक्त जेव्हा भळाभला वाहू लागलं, तिचं मन जेव्हा थोडं ताळ्यावर आलं तेव्हा जे घडलं त्याची भयानकता तिच्या मनाला जाणवली. तिने चेहऱ्याला हात लावला आणि रक्तानं माखलेला आपला हात पाहिला. आपल्या चेहऱ्यावर खोल जखमा होणार आणि नंतर त्यांच्या खुणा मागे रहाणार हे तिला कळून चुकलं. त्या खुणा मिटविण्यासाठी वेदनादायक शल्यचिकित्सा करवून घ्यावी लागणार याची तिला जाणीव झाली.

पाशविक उन्मादानं ती किंचाळली. पुन्हा हल्ला करण्यासाठी तिने झेप घेतली. यावेळी ती लक्ष्मणाच्या दिशेनं पुढे झेपावली. विभीषण तिच्या दिशेनं धावला. क्रोधाने वेडीपिशी झालेल्या आपल्या बहिणीला त्याने पकडलं.

'मार त्यांना!' वेदनेनं विह्वळत शूर्पणखा किंचाळली, 'सगळ्यांना मारून टाका!'

'थांबा!' भीतीने गळाठून विभीषण म्हणाला. शत्रूची संख्या आपल्यापेक्षा अधिक आहे याची त्याला जाणीव होती. त्याला मरायचं नव्हतं. त्याला मृत्यूहून भयानक कशाची तरी भीती वाटत होती. तो पुन्हा म्हणाला, 'थांबा!'

रामने आपला डावा हात उंचावला. त्याने मूठ गच्च बंद केली होती. आपल्या लोकांना त्याने थांबण्याचा पण सावध रहाण्याचा इशारा केला होता. तो म्हणाला, 'इथून निघून जा राजकुमारा, नाहीतर नरकयातना भोगाव्या लागतील.'

'मागे फिरा!' विभीषण पुटपुटला.

त्याचे सैनिक माघार घेऊ लागले. त्यांच्या तलवारी अजूनही जंगलात रहाणाऱ्या या लोकांवर उगारलेल्याच होत्या.

‘मार त्यांना, भित्र्या!’ शूर्पणखानं आपल्या भावावर राग काढला, ‘मी तुझी बहीण आहे! सूड घे!’

बरंच रक्त वाहून गेल्यानं आतापावेतो दुर्बलतेनं झुलू लागलेल्या शूर्पणखाला विभीषण ओढत घेऊन गेला. त्याची नजर रामवर खिळलेली होती. त्याने अचानक काही हालचाल केली तर प्रतिकारासाठी तो स्वतःला सज्ज ठेवून होता.

‘मारा त्यांना!’ शूर्पणखा किंचाळली.

आपल्या किंचाळणाऱ्या बहिणीला खेचत विभीषण पंचवटीच्या शिबिरातून आपल्या सैनिकांसह बाहेर पडला.

राम-लक्ष्मण-सीता आपल्या जागी खिळून उभे होते. जे घडलं ते भयंकर होतं.

‘आपण आता येथे राहू शकत नाही,’ जटायूनं अपरिहनर्याला वाचा फोडली, ‘आपल्याकडे कोणताही पर्याय नाहीय. आपल्याला लगेच पळ काढायला हवा. आत्ता, लगेच’

राम जटायूकडे पाहात राहिला.

‘विद्रोही सदस्याचं असलं तरी, आपण लंकेच्या राजघराण्याचं रक्त वाहावलंय,’ जटायू म्हणाले, ‘त्यांच्या कायद्यानुसार रावणाला आता आपल्यावर हल्ला करण्यावाचून गत्यंतर नाही. सप्तसिंधूच्या कित्येक राजघराण्यांतही असाच कायदा आहे, होय ना? रावण नक्की येणार. मला त्याबाबत अजिबात शंका नाही. विभीषण भ्याड आहे. पण रावण आणि कुंभकर्ण भ्याड नाहीत. ते हजारो सैनिक घेऊन येतील. आणि मिथिलेच्या युद्धापेक्षा भयंकर युद्ध होईल इथे. तेथे सैनिकांमध्ये युद्ध झालं होतं. युद्धाचा तो भाग असतो. आणि ते सुद्धा हे जाणतात. पण हे खाजगी आहे. त्याच्या बहिणीवर, त्याच्या कुटुंबातील एका सदस्यावर हल्ला झाला आहे. रक्त वाहिलंय. त्याचा स्वाभिमान याची भरपाई मागेल.’

लक्ष्मण ताठरला. म्हणाला, ‘पण मी तिच्यावर हल्ला केला नाही...’

‘रावणाला तसं वाटणार नाही,’ त्याला मध्येच तोडत जटायू म्हणाले, ‘नेमकं काय झालं हे तो तुला विचारत बसणार नाही, राजकुमार लक्ष्मण. आपण पळायला हवं, लगेचच.’

साधारण तीसेक सैनिक जंगलातील मोकळ्या जागी आपल्या तोंडात बकाबका अन्न कोंबत बसले होते. ते प्रचंड घाईत असल्यासारखे दिसत होते. त्या सगळ्यांचा वेष एकसारखा होता. लांब, तपकिरी-काळसर झग्यानं त्यांची शरीरं झाकलेली होती. कंबरेजवळ त्यांचे झगे जाडसर नाडीने आवळलेले होते. त्यांच्यापैकी प्रत्येकाकडे तलवार असल्याचं त्या जाड झग्यातूनही दिसत होतं. सगळेच सैनिक अनैसर्गिक वाटावं इतके गोरे होते. भारतातील ऊष्णकटिबंधीय प्रदेशात हे दृश्य क्वचित आढळणारं होतं. त्यांची बाक असलेली नाकं, पूर्ण वाढीच्या आणि व्यवस्थित बांधलेल्या दाढ्या, उठून दिसणारी कपाळं, चौकोनी पांढऱ्या टोप्यांमधून निघालेले त्यांचे लांब केस आणि खाली वळवलेल्या मिशांवरून ते कोण होते ते अगदी स्पष्ट कळून येत होतं – ते परीहा होते.

भारताच्या पश्चिमी सीमेपलीकडील परीहा हा एक दंतकथांमधील देश होता. आधीच्या महादेवांची – रुद्रदेवांची ती भूमी होती.

या समूहाचा नायक हा नागा होता हे स्पष्ट दिसून येत होतं. इतर परीहांसारखा तो सुद्धा गोरा

होता. पण इतर सर्व बाबतीत तो इतरांहून पूर्णपणे वेगळा होता. त्यानं त्यांच्यासारखा वेषही केला नव्हता. त्याचा वेष भारतीयांसारखा होता – धोतर आणि उत्तरीय. दोन्हींचा रंग भगवा होता. त्याच्या पाठीवर खालच्या बाजूला शेपटीसारखा अवयव उगवला होता. त्याचं स्वतःचं जणू एक वेगळं मन असल्यासारखा नियमीत लयीत तो अवयव निरंतर फडफडायचा. नागांचा हा केसाळ नेता खूप उंच होता. त्याच्या प्रचंड आणि भक्कम शरीरामुळे त्याच्याबद्दल दैवी भावना आणि आश्चर्याचा भाव निर्माण होत असे. मनात आणलं तर आपल्या हातानं एखाद्या दुर्भागी जीवाची पाठ तो फोडू शकला असता. बहुतेक नागांसारखा त्याने मुखवट्याआड आपला चेहरा किंवा झग्यात आपलं शरीर झाकलं नव्हतं.

'आपल्याला घाई केली पाहिजे,' त्यांचा प्रमुख म्हणाला.

त्याच्या चेहऱ्यावर जणू दाबून बसविल्यासारखं त्याचं नाक चपटं होतं. त्याच्या दाढीनं आणि चेहऱ्यावरील केसांनी त्याच्या चेहऱ्याची किनार उत्तम तऱ्हेनं घेरली होती. विचित्र गोष्ट म्हणजे त्याच्या ओठांच्या वरची आणि खालची बाजू एकदम मऊ मुलायम आणि केशविरहीत होती. हा भाग थोडा सुजल्यासारखा होता. आणि त्याचा रंग थोडा गुलाबी होता. त्याचे ओठ अतिशय पातळ, जवळ जवळ अदृश्य होते. बुद्धिमान आणि तपस्व्यासारख्या त्याच्या शांत डोळ्यांवर भरघोस भुवयांची तीक्ष्ण वळणांच्या कमानी होत्या. गरज पडल्यास क्रूर हिंसा करण्यास मागे-पुढे न पाहाण्याचा भावही त्याच्या डोळ्यांतून व्यक्त होत आहे असे वाटत असे.

तो बुद्धिमान वाटत असे. त्याच्याकडे पाहून वाटत असे जणू देवानंच माकडाच्या डोक्याचं रूप धारण करून ते माणसाच्या डोक्यावर डकवलंय.

'होय देवा!' एक परिहन म्हणाला, 'आपण जर आम्हाला आणखी काही मिनिटांचा अवधी दिलात तर.... हे लोक निरंतर चालत आहेत. त्यांना थोडी विश्रांती मिळाली तर.....'

'विश्रांतीसाठी अजिबात वेळ नाहीय!' त्यांचा नेता गुरकावला. 'गुरु वशिष्ठांना मी शब्द दिलाय! आपल्या आधी रावण त्यांच्यापर्यंत पोहचायला नकोय! त्यांना लगेच शोधून काढणं गरजेचं आहे. तुझ्या माणसांना घाई करायला सांग!'

हुकुमाची तामिली करण्यासाठी परिहन धावतच निघाला. दुसऱ्या एका परिहनचं जेवण झालं होतं. तो नागा व्यक्तीजवळ गेला, म्हणाला, 'देवा, या माणसांना कळायला हवं. त्यांच्यापैकी महत्वाचा कोण आहे?'

नेत्यानं क्षणाचाही संकोच दाखवला नाही. म्हणाला, 'दोघेही, ते दोघेही महत्वाचे आहेत. सीता मलयपुत्रांसाठी महत्वाची आहे, आणि राजकुमार राम आपल्यासाठी.'

'होय, हनुमान देवा!'

गेले तीस दिवस ते चालत होते. दंडकारण्यातून ते पूर्व दिशेला निघाले होते. कुणालाही आपण दिसू नये आणि कुणालाही आपला माग लागू नये म्हणून गोदावरीच्या समानांतर चालत त्यांनी बरंच अंतर कापलं होतं. पण प्राण्यांच्या शिकारीच्या संधी गमावतील म्हणून उपनद्यांपासून आणि पाण्याच्या इतर स्त्रोतांपासून ते फार दूर राहू शकत नव्हते.

राम आणि लक्ष्मणानं नुकतीच एका हरिणाची शिकार केली होती. आणि दाट जंगलातून मार्ग काढत ते आपल्या शिबिराकडे परतत होते. राम पुढे आणि लक्ष्मण मागे होता. त्या दोघांनी एक

मोठा दांडुका खांद्यावर अडकवला होता. आणि या लाकडी दांडुक्याला बांधलेलं हरिणाचं शरीर झुलत होतं.

लक्ष्मण रामबरोबर वाद घालत होता, ‘पण तुला असा विचार करणं अतार्किक का वाटतं की भरत दादानेच.....’

‘शूऽऽऽ’ लक्ष्मणाला गप्प रहाण्याचा इशारा करत राम म्हणाला, ‘ऐक.’

लक्ष्मणानं कान टवकारले. त्याच्या पाठीच्या कण्यातून भीतीची लहर दौडत गेली. रामने मागे वळून लक्ष्मणाकडे पाहिलं तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर भय पसरलेलं होतं. त्यांना स्पष्ट ऐकू आली होती, एक जोरदार किंकाळी! ती सीतेची किंकाळी होती. मधल्या अंतरामुळे तिच्या निकराच्या प्रतिकाराचे, संघर्षाचे आवाज ऐकू येत नव्हते, पण ती किंकाळी सीतेचीच होती. ती आपल्या पतीला हाक मारत होती.

राम आणि लक्ष्मणाने हरीण तेथेच टाकलं. आणि ते शिबिराच्या दिशेनं धूम पळत सुटले. आपल्या अस्थायी शिबिरापासून अजून ते काही अंतरावर होते.

पक्षांच्या फडफडण्याच्या आवाजातूनही त्यांना सीतेचा आवाज ऐकू येत होता.

‘.....रामऽऽऽऽऽ!’

मग त्यांना शस्त्रांचा खणखणाट ऐकू येऊ लागला.

धावण्याचा वेग वाढवत राम किंचाळला, ‘.........सीताऽऽऽऽऽऽऽऽऽऽ!’

लक्ष्मणाने धावता धावता तलवार उपसली. तो लढण्यासाठी तयार झाला.

‘......रामऽऽऽऽऽऽ!’

‘तिला सोडून द्या!’ राम ओरडला. घनदाट फांद्या कापत तो पुढे धावत होता.

‘......रामऽऽऽऽऽऽऽऽ!’

रामने धनुष्यावरील आपली पकड घट्ट केली. आपल्या शिबिरापासून ते फक्त काही मिनिटांच्या अंतरावर होते.

‘सीताऽऽऽऽऽऽऽऽ!’

‘....रा...’

सीतेचा आवाज मध्येच थांबला. काय झालं असेल याचा अंदाज बांधत न बसता राम धावत राहिला. त्याचं हृदय जोरजोरात धडधडत होतं. त्याचं मन चिंतेनं भारलं होतं.

विमानाच्या पंख्याचा जोरदार आवाज त्यांना ऐकू आला. ते रावणाचं प्रसिद्ध पुष्पक विमान होतं.

‘नाही!’ राम किंचाळला. धावता धावता त्याने आपलं धनुष्य पुढे घेतलं. त्याच्या डोळ्यातून वहाणारे अश्रु त्याच्या गालांवरून ओघळत होते.

दोघे भाऊ धावतच जंगलातील मोकळ्या जागी पोहोचले जिथे त्यांचं शिबीर होतं. ते पूर्णपणे उध्वस्त केलं गेलं होतं. सगळीकडे रक्ताचा सडा सांडला होता.

‘सीता!’

विमान वेगानं आकाशात अदृश्य होत होतं. रामने वर पहात पुष्पक विमानाच्या दिशेनं एक बाण सोडला. तो षंढ रागानं केलेला वार होता. कारण विमान उडत बरंच दूर निघून गेलं होतं.

‘सीताऽऽऽ!’

लक्ष्मणानं वेड्यासारखं संपूर्ण शिबीर फिरून पाहिलं. सैनिकांची प्रेतं सर्वत्र विखुरलेली होती.

पण सीता तेथे नव्हती.

‘राज....कुमार...राम....’

रामनं तो क्षीण आवाज ओळखला. तो धावतच पुढे गेला. त्याला नागाचे रक्तबंबाळ जखमी शरीर दिसलं.

‘जटायू!’

गंभीर रीत्या जखमी जटायूला बोलण्यासाठी महत्प्रयास पडत होते,

‘तो....’

‘काय?’

‘रावणाने.... तिला... उचलून नेलं.......’

प्रचंड रागाने रामाने आकाशात दूर जात असलेल्या विमानाच्या ठिपक्याकडे पाहिलं. तो रागानं ओरडला,


‘सीता!’

‘राजपुत्रा.....’

जटायूंना आपले प्राण निघून जात असल्याचं जाणवलं आपली इच्छाशक्ती एकवटून शेवटची ताकत वापरून त्यांनी आपलं शरीर उचललं, हात लांबवून त्यांनी रामला आपल्या जवळ ओढलं.

शेवटच्या श्वासांच्या आधारे जटायू पुटपुटले ‘तिला परत.... आण... मी हारलो... ती महत्वाची आहे..... सीता देवी...... वाचली पाहिजे.....सीता देवी... वाचली पाहिजे....विष्णू... सीता देवी....’

(......पुढची गोष्ट पुढील भागात)


INDIA, 3400 BCE
Western Sea
Eastern Sea
KINGDOMS
NOT TO SCALE